22386

सारस्तकुलावंतस

माधवोपाध्यायविरचित

आयुर्वेद-प्रकाश.

(संस्कृत मूळ व मराठी भाषांतरसह)

भाषांतरकार-आयुर्वेदसेवक

रामचंद्र विनायक उर्फ बाबासाहेब पटवर्धन.

बी. ए. एल्. एल्. बी. पुणें.

प्रकाशक,

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित.

बुकसेलर व पब्लिशर

बुधवार पेठ, पुणें सिटी.

सन १९२५

किंमत ३ रुपये

७७९
GPSSTRAT
११८

२२३८७ शास्त्र १२३

सारस्वतकुलावतंस

माधवोपाध्यायविरचित

आयुर्वेद-प्रकाश

(संस्कृत मूळ व मराठी भाषान्तर)

उपोद्घातसाहित

भाषान्तरकार

आयुर्वेदसेवक

रामचंद्र विनायक पटवर्धन,

बी. ए., एल्एल्. बी.

प्रकाशक

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित

बुकसेलर व पब्लिशर, बुधवार पेठ

पुणें.

मुद्रक

दत्तात्रय गणेश खांडेकर,

लॉ प्रिंटिंग प्रेस, ५३० शनवार पेठ, पुणें.

सन १९२५

किंमत तीन रुपये

वा. वि. आगाशे
G15.537

: भाषांतराबद्दल सर्व हक्क प्रकाशकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

वाई के ग्रंथसंग्रहालय
दा. क्र.
2326
वाई जि. सातारा

वाचकांस.

आयुर्वेदप्रकाश नांवाचा आयुर्वेदीय रसायनावरील एक जुना अत्युत्तम ग्रंथ अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाचें मराठी भाषांतर मीं करावें अशी इच्छा जेव्हां श्रीयुत यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित यांनीं प्रकट केली तेव्हां असा ग्रंथ भाषांतराकरतां त्यांनीं अचूक निवडून काढला याचेंच मला कौतुक वाटलें. कारण हा ग्रंथ ग्रंथकर्त्यानें स्वानुभवानें व मोठ्या कळकळीनें लिहिला आहे. भस्मक्रिया करण्याचा ज्यांना थोडाबहुत सराव आहे अशा वैद्यांना यांतील क्रिया साधतील असा मला भरंवसा वाटतो. आतां भाषांतर कसें काय उतरलें आहे हें सांगण्याचा अधिकार तज्ज्ञांचा व वाचकांचा आहे. तथापि मी एवढेंच सांगतों कीं, तें होईल तितकें सुबोध करण्याची मीं खबरदारी घेतली आहे, तरी त्यांत दोष असतील हें लिहिण्याची आवश्यकताच नाहीं. "गुणलेशादपि समादधति सज्जनाः" या सज्जनांच्या प्रवृत्तीवर माझी भिस्त आहे. यापेक्षां जास्त लिहिणें नको.

भाषांतर छापत असतांना माझे सन्मान्य मित्र श्रीयुत प्रो. गणपतराव दीक्षित, एम्. ए., (डेक्कन कॉलेज), भिषग्रत्न गंगाधरशास्त्री जोशी, आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल (टि. म. वि.), व वै. पं. कृष्णशास्त्री कवडे यांनीं ज्या उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

रामचंद्र विनायक पटवर्धन.

हो. हिंदु संस्कृति संग्रहालय
पाई
सातारा जि.

शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६	२३	किंचुक	कंचुक
४९	७	धूमक्रिया म्हणजे	धूमक्रियेनें
,,	८	"ही...तीच"	हे शब्द गाळावे.
५७	११	निवडुंगाचें फळ	निवडुंगाचा तुकडा.
९४ } १२० }	१४ } ९ }	आघाडा	तांदुळजा
९९	२०	सहा मण	दोन मण
११९	९	.....	टीप १२० व्या पानांत वाचावी.
१२२	१७	वर्ष	कर्ष
१५९	६	त्रिकटुचे	या शब्दांपूर्वी "वाव-डिंग व" वाचावें.
१९३	२०	होऊन मनुष्य	हे शब्द गाळावे.
१३६	१७	गाड्य	जाड्य

खुलासा

बर्बरी=बाभळ
लिंगी=शिवलिंगी
औषध=सुंठ
अरिमेदक=खैर
हरिरथ=हरताळ
निष्क=३ मासे
टंक=टांक=४ मासे

पिचु } कर्ष } =१ तोळा
पल=४ तोळे
प्रस्थ=६४ तोळे
आढक=२५६ तोळे
शाण=४ मासे
गद्याणक=८ मासे

उपोद्घात.

भारतीय रसविद्या.

ग्रंथकर्ता माधव उपाध्याय यानें या ग्रंथाला "आयुर्वेदप्रकाश" असें नांव दिलें आहे, तरी त्यांत आयुर्वेदाचीं जीं आठ अंगें* प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं "चिकित्सा" व "रसायन" म्हणून जीं अंगें आहेत त्यांसंबंधानेंच हा ग्रंथ आहे; व त्या चिकित्सेंतहि वनस्पतींचीं औषधें न देतां पारा, अभ्रक, गंधक, सोनें, ताम्र वगैरे जे खनिज पदार्थ आहेत त्यांचीं औषधोपयोगी भस्में व रसायनें कशीं करावीं या क्रियेचेंच वर्णन व्यवस्थित रीतीनें केलें आहे. या ग्रंथाचा उद्देश धातूंची भस्मक्रिया वर्णन करणें हा आहे, म्हणून या ग्रंथाला "**आयुर्वेदीय रसशास्त्र**" हेंच नांव यथार्थ होईल. आपण औषधिक्रियेंत नानाप्रकारच्या वनस्पतींचे रस, कषाय, अर्क, सत्व यांचा उपयोग करतों; तसेंच प्राणिज पदार्थांमध्येंहि सांबराचें शिंग, समुद्रफेस, कस्तुरी, गोरोचन, गोमूत्र, गोदुग्ध हे जिन्नस आपण वापरतों; त्याचप्रमाणें खनिज पदार्थांत खडू, हिराकस, सैंधव, काव, शेंदूर वगैरे जे शेंकडों जिन्नस जमिनींत सांपडतात तेहि आपण उपयोगांत आणतों. यांपैकीं खनिज पदार्थांचीं औषधें कशीं तयार करावींत एवढाच भाग ज्या शास्त्रांत वर्णन केलेला असतो त्यास "रसशास्त्र" म्हणतात. कारण "रस" हें नांव पाऱ्याला आहे; आणि खनिज पदार्थांत पारा हाच जिन्नस मुख्य व महत्वाचा आहे. याप्रमाणें आयुर्वेदीय "रसशास्त्रांत" ज्याला पारा किंवा "रस" असें म्हणतात तो, व सोनें, चांदी, तांबें, कथील, जस्त, शिसें, लोखंड वगैरे धातू; तसेंच हरताळ, मनशीळ (Realgar), गंधक, टांकणखार, नवसागर वगैरे अधातू किंवा बिन-धातू; आणि शेंदूर, मोरचूद, सोरा, पापडखार, व तुरटी, आणि माणिक वगैरे ज्यांना आपण रत्नें म्हणतों ते धातू व अधातू यांच्या संयोगानें बनलेले सर्व पदार्थ यांच्यापासून कोणतें औषध कसें बनवावयाचें याची माहिती दिलेली असते. रत्नांमध्यें समुद्रांत उत्पन्न होणारीं मोत्यें, पोंवळीं, शंख, शिंपलें यांचाहि समावेश करतात. अशा प्रकारचें जें हें आयुर्वेदीय शास्त्र आहे त्यालाच "**रसशास्त्र**" किंवा "**रसविद्या**" हें नांव आहे. पण इतकें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्या रसविद्येचा संबंध प्रत्यक्षपणें रोगनिवारणाशीं व आरोग्याशीं आहे. पदार्थांच्या निव्वळ भौतिक गुणधर्मांचें विवरण करणारें तें शास्त्र

[* सुश्रुतांत आठ अंगांचीं नांवें आहेत तीं—शल्य, शालाक्य, कायचिकित्सा, भूतविद्या, कौमारभृत्य, अगदतंत्र, रसायन व वाजीकरण.]

नव्हे. आपलें रसशास्त्र मुख्यत्वेंकरून चिकित्सेच्या कार्याकारितांच निर्माण झालेलें आहे.

आतां रस, उपरस, धातू व उपधातू हे काय प्रकार आहेत त्यांची फोड करणें आवश्य आहे. खनिज पदार्थांत धातू कशाला म्हणतात हें आपल्याला पक्कें माहित आहे. धातू हे आपल्या ओळखीचे आहेत. सोनें, चांदी, तांबें, जस्त, कथील, लोखंड, निकेल, वगैरेसारखे जे जे खनिज पदार्थ खणखणीत, चकचकीत व चिवट असतात, त्यांना आपण धातू म्हणतों. त्यांचा चिवटपणा अशा तऱ्हेचा असतो कीं, ते हातोड्यानें किंवा घणानें ठोकले असतां त्यांचा चुरा न होतां पातळ पत्रे बनत जातात. धातूंच्या ह्या गुणधर्मास " **घनवर्धनीयता** " असें नांव आहे. धातूंशिवाय दुसरा कोणताहि पदार्थ हातोड्यानें ठोकला असतां त्याचा पातळ पत्रा होत नाहीं; पण त्याची पूड मात्र होते. तापवून किंवा दुसऱ्या कृतीनें धातूंचा देखील चुरा करतां येतो. परंतु " **घनवर्धनीयता** " हा धातूंचा सामान्यपणें मुख्य धर्म आहे. याप्रमाणें धातूंचे मुख्य धर्म तीन ठरले. (१) पहिला धर्म चिवटपणा, (२) दुसरा चकाकी आणि तिसरा (३) घनवर्धनीयता. या तीन गुणधर्मांवरून कोणताहि खनिज पदार्थ धातू आहे कीं नाहीं तें सहज समजतें. याप्रमाणें पाहिलें असतां सोनें, चांदी, तांबें, कथील, जस्त, शिसें, लोखंड, अल्यूमिनियम, निकेल हे धातू होत.

रस व धातू.

वास्तविक पाहतां पारा, सुरमा व दुसरे कांहीं खनिज पदार्थ यांचें धातूंशींच साम्य आहे व पाश्चात्य रसायनशास्त्रांत यांची गणना धातूमध्यें केलेली आहे. परंतु धातूंच्या अंगीं असणारा जो " **घनवर्धनीयता** " गुण त्याच्यावरून धातू व अधातू हा भेद पाश्चात्य शास्त्रज्ञ करीत नाहींत. धातू व अधातू हा भेद पाश्चात्य शास्त्रज्ञ निराळ्या कारणावरून मानतात व तें कारण सयुक्तिक असलें तरी तत्काळ लक्षांत येण्यासारखें नसल्यानें व्यवहारांत उपयोगी नाहीं. त्यापेक्षां घनवर्धनीयता हेंच कारण जास्त व्यवहारोपयोगी आहे व त्यावरून आपल्या शास्त्रज्ञांनीं केलेला धातू व अधातू हा भेद लक्षांत ठसण्याजोगा आहे. पारा व सुरमा यांच्या अंगीं घनवर्धनीयता नाहीं.* शिवाय पारा हा पाण्याप्रमाणें पातळ नसला तरी प्रवाही व चंचल आहे. सुरमा कुटला असतां त्याची पूड होते. सोडियम व पोटॅशियम हे खनिज पदार्थ हवेंतच काय, पण पाण्यांतहि टिकत नाहींत,

---

* बर्फसंपर्कानें पारा गोठला म्हणजे तो थोडासा घनवर्धनीय होतो; परंतु त्याच्या स्वाभाविक पातळ स्वरूपांत तो घनवर्धनीय असणें शक्य नाहीं.

ताबडतोब जळून जातात. अशा स्थितींत त्यांना धातू म्हणतां येत नाहीं. बरें, त्यांनां अधातू म्हणावें, तरी तेंहि जुळत नाहीं. कारण विद्युद्वाहकता वगैरे जे धातूंचे दुसरे गुण ते त्यांच्यांत आहेतच; आणि त्यांतले त्यांत पारा हा खनिज पदार्थ तर अगदीं अपूर्व आहे. पारा जर धट्टा होईल तर त्याचें महत्त्व सोन्यापेक्षांहि जास्त ठरेल ही अत्यंत महत्वाची गोष्ट प्राचीन भारतीयांच्या लक्षांत प्रथम आली व म्हणूनच पाऱ्याला त्यांनीं सोन्यापेक्षांहि महत्त्व दिलें. परंतु तो प्रवाही असल्यानें त्याला "धातू" हें नांव न देतां "रस" असें सार्थ नांव दिलें. रस याचा अर्थ "पातळ अर्क," "सार," 'सर्वस्व,' 'मर्म' असा आहे. वनस्पतींचें सार जसें त्यांच्या रसांत त्याचप्रमाणें सोनें व चांदी यांचें सार पारा हा होय, असा निष्कर्ष काढून त्यांनीं पाऱ्याला "रस" हें नांव दिलें; व रस आणि धातू यांच्या औषधिक्रियेचें "रसशास्त्र" नांवाचें एक शास्त्रच बनविलें.

रस म्हणजे पारा, आणि घनवर्धनीय असे जे खनिज पदार्थ ते धातू असा व्यवहारदृष्ट्या सोईचा अर्थ ठरल्यावर उपरस कोणते व उपधातू कोणते ह्यांचा उलगडा सहजच होतो. एका अलकिडील ग्रंथांत माक्षिक मोरचूद, शेंदूर, या जिनसांची गणना उपरसांत केली आहे. त्याचें कारण पारा व धातू यांचे रासायनिक संयोगानें बनलेले जे जे पदार्थ ते सर्व त्याचे मतानें उपरस होत. परंतु असें म्हणणें बरोबर नाहीं. निदान आयुर्वेदप्रकाशकाराच्या मतें तरी बरोबर नाहीं. त्यानें शेंदूर, मोरचूद, इत्यादि जे रासायनिक संयोग धातूपासून बनलेले आहेत त्यांचा समावेश उपधातूंत केला आहे. पारा म्हणजेच जर रस व धातू हे रस नव्हेत, तर धातूंचे रासायनिक संयोग उपरस कसे होतील ? म्हणून गंधक, नवसागर, टांकणखार, हरताळ इत्यादि जे अधातूजन्य संयुक्त पदार्थ आहेत तेच उपरस होऊं शकतील.

उपधातू व उपरस.

याप्रमाणें रसशास्त्राचा पाया पारा हा आहे. पाऱ्याबरोबरच रसशास्त्रांत सुवर्णादि धातू येतात व त्यांचें महत्वहि पाऱ्याप्रमाणेंच आहे. मुख्य धातूंच्या मिश्रणापासून उपधातू बनतात. तांबें व जस्त यांच्या मिश्रणापासून पितळ होतें. तांबें व कथील यांच्यापासून कांसें व तत्सदृश दुसरे उपधातू तयार होतात. धातूंच्या मिश्रणांना उपधातू हें नांव योग्य आहे. उपधातूंन इंग्रजींत Alloys म्हणतात; व पारा व इतर धातू यांच्या मिश्रणाला पारदामिश्रण (किंवा इंग्रजींत Amalgam) असें म्हणतात. उपधातूंची संख्या फार आहे.

धातू व उपधातू यांच्याशिवाय जे मौल्यवान् पदार्थ म्हणजे हिरा, पाच, माणिक, नीळ वगैरे खडे खाणींत सांपडतात त्यांना रत्नें म्हणतात हें सर्वांस माहित आहेच. त्याचप्रमाणें मोत्यें व पोवळीं हीं समुद्रांत उत्पन्न होतात, त्यांची गणनाहि रत्नांतच केली आहे. तोरमल्ली, राजावर्त वगैरे सारख्या हलक्या जातीच्या हिऱ्यांना उपरत्नें म्हणतात. याप्रमाणें खनिज पदार्थांचे रस,धातू,उपधातू,रत्नें,उपरत्नें हे प्रकार वर्णन केले.तथापि रस,धातू, उपधातू व रत्नें इत्यादि कोणत्याच प्रकारांत जो येत नाहीं असा खनिज दार्थांचा एक मोठा वर्ग आहे. त्यांत गंधक, सोमल, हरताळ,मनशीळ (Realgar), सुरमा, टाकणखार, नवसागर, हिंगूळ वगैरे महत्वाचे जिन्नस येतात. हे जिन्नस धातू नव्हेत व उपधातूहि नव्हेत. परंतु पाऱ्यापासून जीं औषधें बनतात त्यांत त्यांचा संबंध फार येतो व यांपैकीं पुष्कळांचा पाऱ्यांशीं मिलाफहि उत्तम होतो. हिंगुळांत तर पाराच आहे. म्हणून या सर्वांना उपरस असें म्हणतात. परंतु अभ्रक, चुनखडी, हिराकस,तुरटी, मुर्दाडाशिंग हेहि पदार्थ माधव उपाध्याय यानें उपरसांमध्यें गणले आहेत.वास्तविक पाहातां हे जिन्नस धातूंपासून बनले आहेत. अभ्रकांत व तुरटींत अल्युमिना असतो. हिराकसांत लोखंड सांपडतें व मुर्दाडाशिंग यांत शिसें आढळतें, म्हणून हे जिन्नस धातूंच्याच विकृति होत. अर्थात् वास्तविक ते उपरस नव्हेत, परंतु यांना उपरस म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांच्यायोगानें पाऱ्याचें बंधन किंवा भस्म होतें असा प्राचीन रसशास्त्रज्ञांचा अनुभव होता. हिराकसांत लोखंड व मुर्दाडाशिंगांत शिसें असतें ह्या गोष्टी पूर्वीच्या ग्रंथकारांना माहीत होत्या असें असून त्यांनीं या जिनसांना उपरस म्हटलें, यावरून पाऱ्याचें भस्म करण्याच्या कामीं त्या पदार्थांचा जास्त उपयोग होतो हीच गोष्ट त्यांना निदर्शनास आणावयाची होती. या दृष्टीनें विचार केला असतां, अभ्रक, * गंधक, हरताळ, मनशीळ, हिंगूळ, तुरटी, टाकणखार, नवसागर, हिराकस यांना उपरस असें म्हटलें आहे तें गैरवाजवी नाहीं असें उघड होतें.

रसशास्त्र.

वरील विवेचनावरून आपल्या असें नजरेस येतें कीं, आयुर्वेदांत ज्याला रसशास्त्र म्हटलें आहे तें शास्त्र म्हणजे पारा व त्याचे उपरस, सोनें, चांदी, तांबें, कथील वगैरे धातू व इतर मिश्रधातू, आणि तशींच रत्नें यांच्याविषयीचें शास्त्र होय. खनिज पदार्थांचा औषधांत उपयोग करावयाचा असल्यास ते पदार्थ त्यांच्या स्वाभाविक स्थितींत उपयोगांत आणावे, किंवा त्यांचें रूपांतर करून ते जास्त गुणावह होतील असें करावें, असा प्रश्न पूर्वीच्या रसशास्त्रज्ञांनीं आपल्यासमोर ठेऊन खनिज पदार्थांचा औषधाकडे कसा

---

*टीप—अभ्रकांत अनेक धातू मिश्र आहेत.

उपयोग करावा याबद्दलची समग्र क्रिया आयुर्वेदीय रसशास्त्रांत वर्णन केली. त्याकरितां त्यांनीं अनेक प्रयोग करून पाहिले असले पाहिजेत. हल्लीं ज्या औषधिक्रिया आपल्या वाचनांत किंवा ऐकण्यांत येतात त्यांपैकीं कांहीं आपल्यास अज्ञानमूलक व चमत्कारिक वाटतील, परंतु जास्त खोल विचार केला तर आपल्याला असें समजून येईल कीं, हल्लींप्रमाणें जेव्हां यंत्र-सामग्री सुलभ नव्हती व कोणत्याच शास्त्राला प्रगल्भ स्वरूप आलें नव्हतें अशा काळांत ज्या क्रिया त्यांनीं शोधपूर्वक लिहिल्या त्याच आश्चर्यकारक होत. त्यांनीं इतकें केलें हेंच फार झालें. आपलें काम इतकेंच कीं, त्यांच्या कृतींचा हेतू उलगडून पाहून त्या हेत्वनुरूप शास्त्राची वाढ आधुनिक ज्ञानानें साध्य करून घेणें हें होय.

रसशास्त्र व रसायनशास्त्र.

जुनें रसशास्त्र व हल्लींचें रसायनशास्त्र (Chemistry) हीं एक नाहींत. हल्लींच्या रसायनशास्त्रांत पदार्थांचें मूलभूत स्वरूप कोणतें, त्यांचीं रूपांतरें कोणतीं, याचें विवरण असतें. खनिज, प्राणिज, व उद्भिज या वर्गांतील जे अगणित पदार्थ या जगांत आपणांस आढळतात, ते स्वतःसिद्ध आहेत, किंवा त्यांतील बहुतेक पदार्थ अनेक मूलभूत पदार्थांच्या पूर्ण एकीकरणामुळें बनले आहेत आणि तसे ते बनले असल्यास पूर्ण एकीकरणाचे नियम कोणते हें ज्या शास्त्रावरून आपणांस कळतें त्यास रसायनशास्त्र म्हणतात. मूलभूत पदार्थ (Elements) कोणते, त्यांच्या रासायनिक एकीकरणाचे अथवा संयोगाचे नियम कोणते, संयुक्त पदार्थांचें पृथक्करण कसें करावयाचें, व संयुक्त पदार्थ कसे बनावयाचे याचें जें शास्त्र तें आधुनिक रसायनशास्त्र होय. पूर्वीच्या रसशास्त्राचा संबंध व उद्देश औषधिक्रियेशीं आहे. हल्लींच्या रसायनशास्त्राचा उद्देश औषधिक्रियेशीं प्रत्यक्ष नाहीं. हल्लींच्या रसायनशास्त्रांत मूलभूतपदार्थांचे अगदीं मूलभूत **भौतिक गुणधर्म** सांगितलेले असतात व पूर्वीच्या रसशास्त्रांत खनिज पदार्थांचे **औषधिगुणधर्म** सांगितलेले असतात. वजन, घनत्व, द्रवत्व किंवा वायुरूपत्व हे पदार्थाचे मूलभूतधर्म होत. कोणताहि पदार्थ घ्या, त्याला वजन असतेंच व तो घट्ट असतो, प्रवाहि असतो, किंवा वायुरूप असतो. शिवाय त्याला रंग, रुचि व वास हेहि कमीजास्त प्रमाणानें असतात. परंतु अनेक मूलभूतपदार्थांचा

रासायनिक संयोग

झाला म्हणजे मात्र वजनावांचून त्यांचे बाकीचे सर्व गुणधर्म अगदीं पालटतात. नुसत्या मिश्रणानें हे गुणधर्म पालटत नाहींत. उदाहरणार्थ, असें करा कीं, कागदी लिंबाच्या रसांत साखर घाला किंवा मीठ टाका,

म्हणजे तुम्हांला आंबट व गोड, किंवा आंबट व खारट अशी चव निर. निराळी अनुभवास येईल. जिलबींत केशर घातलें म्हणजे जिलबीला रंग येऊन केशराचा वासहि येतो. फोडणींत हिंग घातला म्हणजे पदार्थाला हिंगाचा दर्प येतो. पुरणाचे पोळींत, डाळ, गूळ व गव्हाची कणिक आहे असें आपण तिची चव घेऊन व रंग पाहून सांगूं शकतों. पिवडी व चुना एके ठिकाणीं मिसळले तर पिवडी पांढुरकी व चुना पिवळसर होतो. काव टाकली तर लालवट होतो. मिळून दोन्ही पदार्थांचें स्वरूप कायम रहातें. म्हणून हीं सर्व मिश्रणें साधीं होत. हे रासायनिक संयोग नव्हेत. रासायनिक संयोगांत रंग, रूप, चव, व स्थिति हे गुणधर्म पार बदलून जातात. चुन्यांत हळद टाकली असतां रंग एकदम तांबडा होतो. हा संयोग रासायनिक होय. चुना पांढरा व हळद पिवळी; या दोहोंत तांबडा रंग नसूनहि तो उत्पन्न होतो. जास्वंदीचीं फुलें चुरून त्यांचा लेप कागदावर चोळावा; कागद वाळला असतां रंग जांभळा बनतो; परंतु त्याच्यावर लिंबाचा रस पिळतांच जांभळ्याचा एका एकी तांबडा भडक रंग होतो. हाहि संयोग रासायनिक होय. बिनकल्हईच्या तांब्याच्या किंवा पितळेच्या भांड्यांत ताक ठेवलें असतां एक दोन दिवसांत त्या भांड्यावर हिरवट रंग चढतो, त्याला आपण कलंक म्हणतो. हा कलंक कसा उत्पन्न झाला तर तांबें आणि ताक यांच्या रासायनिक संयोगामुळें उत्पन्न झाला. रासायनिक संयोगाचें अतिशय महत्वाचें उदाहरण येथें सांगणें आवश्यक आहे. आपण लांकूड कितीहि बारीक उगाळलें किंवा ठेंचलें, तर त्याचा चुरा होईल; पण त्यांत लांकडाचे गुणधर्म कायमच राहतील. पण तेंच लांकूड तुम्ही जाळा, म्हणजे त्याचा कोळसा किंवा राख होईल. कोळसा तुम्ही कितीहि उगाळा, किंवा राख तुम्ही कितीहि चाळा त्यांत लांकडाचा एक कणहि सांपडणार नाहीं. आगीनें लांकडाचेंच रूपांतर होऊन त्याचा कोळसा व राख हीं बनलीं. हें रूपांतर म्हणजेच रासायनिक क्रिया. कोळसा, राख किंवा भस्म हें रासायनिकरूपान्तराचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. यावरून मिश्रण म्हणजे काय व रासायनिक संयोग म्हणजे काय याची बरोबर कल्पना येईल.

आमचें रसशास्त्र हें जरी औषधीक्रियेचा एक भाग आहे तरी त्याची उभारणी रसायनशास्त्राच्या नियमानुसारच केली आहे. रसशास्त्राचा मुख्य उद्देश पारा, सोनें, चांदी, तांबें उपधातू व उपरस वगैरे खनिज पदार्थांपासून औषधें बनविणें हा जरी आहे तरी तीं औषधें, खनिज पदार्थ व वनस्पति यांच्या रासायनिक संयोगापासून बनविणें हीच त्यांतील पद्धति आहे व भस्म हें त्या औषधांचें स्वरूप आहे.

धातूंचीं भस्में.

आगीच्या योगानें लांकडाचें रासायनिक रीत्या रूपांतर होऊन त्याची राख अथवा भस्म होतें, तसाच कांहीं अंशीं प्रकार होऊन पारा, सोनें, चांदी, तांबें, कथील, शिसें, हरताळ इत्यादिकांचें अग्नीच्या आचीनें भस्म होतें. लांकडें सहज जळतात. ती स्थिति धातूंची नाहीं. व्यवहारांत साधारण रीतीनें जितकी आंच आपण देऊं तितक्या आंचीनें तांबें, सोनें हे धातू जळणार नाहींत. लोखंडाची सळई तुम्ही भट्टींत घाला. ती निखाऱ्याप्रमाणें लाल होईल; तथापि पेट घेणार नाहीं. पण तीच लाल झालेली सळई प्राणवायूंत (Oxygen मध्यें) बुडवा कीं, त्याबरोबर ती एखाद्या सनकाडीप्रमाणें झगझगीत पेटेल. एकंदरीनें पाहतां धातूंचें भस्म करणें मोठ्या चातुर्याचें व युक्तीचें काम आहे व हें चातुर्य आपल्या रसशास्त्रांत जागोजाग प्रकट झालें आहे.

भस्मक्रिया ही केवळ अग्नीनेंच होते असें नव्हें. क्षार (Alkali), आम्ल पदार्थ (Acid), तेजाब (Aqua fortis), व गंधक, सोरा वगैरे ज्वालाग्राही पदार्थ यांच्या (रासायनिक) संयोगानेंहि भस्में होतात. वनस्पतींत क्षार असतात, आम्लपणा असतो, व गंधक वगैरे ज्वालाग्राही पदार्थहि असतात. त्या कारणानें वनस्पतींचा उपयोग आपल्या रसशास्त्रांत पूर्णपणें करून घेतला आहे. "मारलेला" पारा, "मारलेलें" ताम्र, "मारलेला" सोमल किंवा हरताळ अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग आपण वैद्यांचे तोंडून वारंवार ऐकतों. त्याचा अर्थ पाऱ्याचें, हरताळाचें अगर ताम्राचें भस्म असा आहे. माणें म्हणजे भस्म करणें, आणि भस्म म्हणजे पारा अगर दुसरा एखादा धातु किंवा उपधातू यांचा (वनस्पतिजन्य क्षार, आम्ल किंवा उपरस यांच्याशीं झालेला) रासायनिक संयोग होय. हा संयोग जितका पक्का व स्थिर असेल तितकें तें भस्म पक्कें व चांगलें असतें. पक्क्या भस्माची परीक्षा या ग्रंथांत दिली आहे ती फारच मार्मिक आहे. आम्ल, क्षार किंवा साधारण आंच यांच्या संपर्कानें ज्या भस्मांतून मूळचा धातु पुनः बाहेर पडत नाहीं तें भस्म पक्कें असें त्या परीक्षेचें धोरण आहे. यावरून भस्म पक्कें करण्याची किती खबरदारी घेण्यांत येत असे तें सहज लक्षांत येईल.

रसशास्त्र व किमया.

रसशास्त्र हा शब्द ऐकतांक्षणींच आपल्या मनांत दुसरी एक कल्पना उभी राहते. ती कल्पना म्हणजे "किमया" ही होय. पाऱ्याचें भस्म करतां आलें कीं, "किमया" साधली पाहिजे, अर्थात् तांबें किंवा पारा यांचें सोनें करतां आलेंच पाहिजे असा लोकांचा समज पूर्वापार आहे. हा समज

निराधार आहे असेंहि म्हणवत नाहीं. आपल्या रसशास्त्रांतहि "हेमवती" विद्या प्रसिद्ध आहे. हिलाच किमया म्हणतात. किमयेला " धातुवाद" किंवा धातुविद्या अशीहि नांवें आहेत. ज्याप्रमाणें हल्लींच्या लोकांना शर्यतीचा किंवा "शेअर" बाजारचा किंवा सट्टयाचा नाद असतो, त्याप्रमाणें पूर्वीच्या लोकांना किमयेचा फार नाद असे व त्या पायीं ते हजारों रुपये खर्च करीत. पुढें आधुनिक रसायनशास्त्राचा उदय झाल्यावर किमया म्हणजे पाऱ्याचें किंवा तांब्याचें सोनें करणें ही गोष्ट अशक्य आहे अशी खात्री तज्ज्ञांची झाली; परंतु विद्युत् शास्त्र व " रेडिओ " शास्त्र यांचा विकास झाल्यानें त्यांतील प्रयोगांनीं ही खात्री कायम राहील असें म्हणवत नाहीं. सध्यांच ती डळमळूं लागली आहे. तथापि "आरोग्य" हाच आपल्या रसशास्त्राचा खरा हेतु आहे. किमया हा हेतु नव्हें. त्यामुळें किमया खरी असो खोटी असो, त्याच्याशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. मात्र एवढें खरें कीं, पाऱ्याचें जें स्वरूप आहे तें प्लॅटिनम ह्या धातूशीं फार जुळतें. प्लॅटिनम हा धातू सोन्याप्रमाणेंच मौल्यवान् अहे. पारा, प्लॅटिनम व सोनें यांच्या परमाणूंचें वजन जवळ जवळ सारखेंच आहे. सोनें गंजत नाहीं व शुद्ध पारा देखील गंजत नाहीं.

आतां आकारमानानें पाहतां पारा वजनांत सोन्यापेक्षां हलका भरतो. याचा अर्थ असा कीं, एका लहानशा कुपींत सोन्याचा अगदीं बारीक चुरा भरला व तशाच दुसऱ्या एका कुपींत पारा भरून दोघांचें वजन केलें तर सोन्याच्या पाऊण पट पाऱ्याचें वजन होईल. बरोबरीनें होणार नाहीं; परंतु त्याचें कारण पूर्वीच्या लोकांनीं असें ठरविलें कीं, पारा हा पातळ नसता आणि सोन्यासारखाच घट्ट असता तर दोघांचें वजन आकारमानानेंहि जवळ जवळ सारखेंच भरलें असतें. कारण त्यांच्या मूलभूत परमाणूंचें वजन सारखें आहे. अशा चमत्कारिक साद्दश्यामुळें पाऱ्याचा पातळपणा काढून टाकून तो घट्ट करून त्यास पिंवळा रंग येईल. असें केलें म्हणजे पाऱ्याचें सोनें बनलेंच, अशा तऱ्हेची पूर्वीच्या रसशास्त्रज्ञांची विचारपरंपरा होती. ही विचारपरंपरा चुकीची नाहीं. चूक होते ती किमया करूं पाहणारांची होते; व त्याचें कारण असें कीं, पाऱ्याचें सोनें होणें ही गोष्ट रसायनशास्त्राच्या परमावधीची आहे. म्हणून सध्यां तरी किमया कोणास साध्य होणार नाहीं. रसायनशास्त्र हें अद्यापि पुष्कळच अपूर्ण आहे. अशा स्थितींत मोठमोठ्या रसायनशास्त्रवेत्त्यांनासुद्धां किमया साधेलच असें नाहीं. मग भलत्याच माणसानें या नादांत पडणें हा वेडेपणा नव्हे काय ? दुसरें असें कीं, अमक्या तमक्या गोसाव्यानें आमच्या देखत सोनें केलें असें सांगणारीं माणसें आढळतात, तीं लबाड नसलीं तरी

मोळसर खास असतात, म्हणून त्यांच्या म्हणण्याकडेहि बिलकुल लक्ष देऊं नये. कधीं काळीं पाऱ्याचें सोनें करतां आलेंच तर ती गोष्ट रसायनशास्त्रा-तील तज्ज्ञालाच साध्य होईल, इतरांस नाहीं. म्हणून सामान्य लोकांनीं या भानगडींत न पडणें व किमया खरी न मानणें हेंच उत्तम. तथापि धातु-वाद, राजवती विद्या अथवा किमया ही आपल्या प्राचीन पूर्वजांच्या शुद्ध विचार-परंपरेची दिशा आहे व ती तात्विक दृष्ट्या बरोबर आहे, म्हणून आपणांस आनंद व अभिमान वाटला पाहिजे.

इतिहास.

यापुढील प्रश्न म्हणजे रसशास्त्र व धातुविद्या (अथवा किमया) यांचा आपल्या देशांत उदय केव्हां झाला हा होय. या बाबतींतच काय, परंतु आपल्या देशाच्या इतिहासाविषयींच्या सर्व बाबतींत पाश्चात्य पंडितांचें मत आपल्या अगदीं विरुद्ध आहे. वैद्यशास्त्र घ्या, ज्योतिषशास्त्र घ्या, रसायनशास्त्र घ्या, पाश्चात्यांचें म्हणणें एकच कीं, हीं शास्त्रें आपण असी-रिया किंवा ग्रीक लोक यांच्यापासून शिकलों. पाश्चात्य पंडित प्रत्येक गोष्ट राष्ट्रीय दृष्टयाच पाहतात. त्यामुळें त्यांना भारतीयांचें बौद्धिक वर्चस्व सहन होत नाहीं. आम्ही हा आरोप वृथा करतों असें पुष्कळांस वाटेल; परंतु पाश्चात्यांच्या विचारसरणीचा ज्यान अनुभव घेतला आहे त्याला हें आमचें म्हणणें बहुतांशीं तरी बरोबर आहे असें वाटेल यांत शंका नाहीं.

आपल्यास निःपक्षपाती म्हणावें अशा समजुतीचे जे लोक असतात तेच बहुधा पाश्चात्यांच्या विचारसरणीला बळी पडतात. आपल्या पूर्वजांच्या यथार्थ ज्ञानाची स्तुति केली तरी अन्याय व पक्षपातित्व यांचा डाग लागेल अशी त्यांना भलतीच भीति उत्पन्न होते. परंतु ही भीति बाजूस ठेवली पाहिजे. पाश्चात्य पंडितांचें असें म्हणणें आहे, कीं प्राचीन ईजिप्शान लोकांत जे विद्वान् होते त्यांना किमया करतां येत असे. परंतु या म्हणण्यास कांहीं एक आधार ते देत नाहींत. उलट,गोसाव्या-बैराग्याच्या गोष्टीप्रमाणेंच कांहीं दंत-कथा सांगतात. जर दंतकथा सर्व खोट्या तर त्या पाश्चात्यांनीं सांगितल्या म्हणून विश्वसनीय थोड्याच होणार डायोक्लेशियन यानें इजिप्सियनांचे किमयेचे ग्रंथ जाळले अशी दंतकथा आहे. त्या दंतकथेंत बिलकुल अर्थ नाहीं असें जगद्विख्यात इतिहासकार गिबन यानें सिद्ध केलें आहे. मुसल-मानी राज्याचा उदय झाल्यावर मग पाश्चात्यांत " किमये"चा विचार सुरू झाला हें निर्विवाद ठरत आहे; आणि आपल्या इकडे शककालाच्या आरंभा-पासून किमयेविषयीं उल्लेख आढळतात. तेव्हां किमयेचा विचार प्रथम आपल्याइकडेच सुरू झाला असावा. रसविद्येचा प्रसार प्रथम नागार्जुन यानें केला. नागार्जुन हा हेमवती विद्येंत प्रवीण असून तो सातवाहन

राजाचा मित्र होता असें चिनी प्रवासी हुएनत्संग यानें लिहिलें आहे. बाणभट्टानेंहि नागार्जुन याचा उल्लेख केला आहे. नागार्जुन हा बुद्धानंतर दीडशें वर्षांनीं झाला असें राजतरंगिणिकार म्हणतो. तेव्हां नागार्जुन हा शालिवाहन शकाच्या पूर्वीच होऊन गेला असला पाहिजे. निदान शालिवाहन शकाच्या आरंभापेक्षां जास्त अलीकडे त्याचा काल येऊं शकत नाहीं. रसविद्या म्हणजे पाऱ्याचीं औषधें बनाविणें व त्याचें सोनें करणें ही विद्या होय. अर्थात् रसविद्या ज्या देशांत प्रचलित असेल तेथें पाऱ्याचे औषधीय गुणधर्म तरी माहित असलेच पाहिजेत. हे पाऱ्याचे गुणधर्म हिपोक्रॅटिसच्या ग्रीक ग्रंथांत नाहींत, इतकेंच नव्हे तर खिस्ती शकानंतर सुद्धां ग्रीक शास्त्रज्ञांस पाऱ्याच्या औषधी गुणधर्मांचें ज्ञान नव्हतें. पाऱ्यासंबंधानें जेथें ग्रीक लोकांत इतकें अज्ञान, तेथें रसविद्येचा उगम झाला असें म्हणणें हास्यास्पद होय. आपल्या इकडे शालिवाहन शकापूर्वी रसविद्येचा प्रसार आणि युरोपांत व ग्रीक लोकांत खिस्ती शकानंतर तीन चार शतकेंपर्यंतहि पाऱ्याच्या औषधी गुणधर्मांविषयींचें अज्ञान यांचा विचार केला असतां रसविद्येचा शोध आपल्या देशांतच लागला, व ही विद्या बाहेरून कोठून इकडे आली नाहीं अशी खात्री होते. यासंबंधानें आपल्याइकडचा पुरावा जय्यत आहे.

पारा, सोनें, माक्षिक यांचा पोटांत घेण्याच्या औषधांकडे उपयोग होत असे अशाविषयीं स्पष्ट उल्लेख वैद्यकावरील अतिप्राचीन ग्रंथ जो "**चरकसंहिता**" त्यांत आहे. चरकाचा काल बुद्धापूर्वीचा म्हणजे शकापूर्वी सहा शतकें इतका आहे. चरकसंहितेचें हल्लींचें स्वरूपहि शालिवाहन शकापूर्वीचें आहे. रसविद्येवरी ६ आद्य ग्रंथकार नागार्जुन व भाष्यकार पतंञ्जली हे होत. त्यांपैकीं नागार्जुनाचा ग्रंथ उपलब्ध आहे. पतंञ्जली हे शकापूर्वी दुसऱ्या शतकांत होऊन गेले. रसविद्येवर तिसरा प्रसिद्ध ग्रंथकार गोरक्षनाथ होय. ह्याचाहि एक ग्रंथ संस्कृतांत आहे. आपल्या इकडील रसविद्या व किमया यांचा प्रचार "नाथपंथी" लोकांत म्हणजे मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ यांच्या सांप्रदायिकांत आहे. प्रसिद्ध भगवद्भक्त ज्ञानेश्वरमहाराज हे "नाथपंथी"च होत. याप्रमाणें आपल्या इकडील परंपरा आहे. पाश्चात्यांच्या इकडे खिस्ती शकाच्या चौथ्या शतकानंतर पाऱ्यासंबंधीं औषधी गुणधर्माचा प्रसार होऊं लागला. मग रसविद्येचें ज्ञान तिकडून इकडे येणार कोठून ? उगीच कांहीं तरी दीर्घ शंका काढून पुढें आलेल्या पुराव्याकडे दुर्लक्ष करून ग्रीकांची बडेजाव माजविणें हें न्याय्य नव्हे. यांसंबंधानें आपला पुरावा अगदीं भक्कम आहे; पण त्याचा विचार येथें करतां येत नाहीं. तथापि रसविद्येच्या येथील परंपरेंत मुख्य मुख्य व्यक्ती कोण होऊन गेल्या त्यांचा नामनिर्देश तरी करणें हें अगदीं अवश्य आहे.

ग्रंथकाराचें नांव.	कालानुक्रम.	ग्रंथाचें नांव.
दृढबल.	शालि. शकाच्या दुसऱ्या शतकापूर्वी.	'चरकसंहिता'
पतंञ्जलि	शकापूर्वी दुसरें शतक.	" लोहसिद्धि " (उपलब्ध नाहीं).
नागार्जुन	शकानंतर पहिलें शतक.	कक्षापुट तंत्र, रसरत्नाकर
गोरक्षनाथ.	,, दुसरें ,,	गोरक्षकल्प
वराहमिहिर	,, पांचवें ,,	स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाहीं
गोविंदाचार्य	,, सातवें ,,	रसहृदय
माधव (निदानकार)	,, ,, ,,	स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाहीं
वाग्भट	,, अकरावें ,,	रसरत्नसमुच्चय
नित्यनाथ	,, बारावें ,,	रसरत्नाकर
शार्ङ्गधर	,, ,, ,,	शार्ङ्गधर

शार्ङ्गधर व वाग्भट यांचे समकालीन किंवा त्यानंतरचे रसशास्त्रावर पुष्कळ ग्रंथ आहेत; तत्रापि ते अर्वाचीन असल्यामुळें त्यांचीं नांवें देण्याचें कारण नाहीं. परंतु वर जी यादी दिली आहे तीहि अपुरी आहे. कारण ख्रि. शकापूर्वीपासून सन १९०० पर्यंतच्या कालांतील रसशास्त्रावरील मुख्य मुख्य ग्रंथ सुद्धां आज सर्व सांपडत नाहींत. तथापि थोडे तरी ग्रंथ आज उपलब्ध आहेत हेंच भाग्य समजलें पाहिजे. नाहीं तर चोर हे साव बनून आम्ही मात्र निष्कारण चोर ठरलों असतों. ती अन्याय्य आपत्ति येण्याची भीति आतां नाहीं. या कामीं मुंबईचे प्रसिद्ध वैद्यराज पं० यादवजी त्रिकमजी यांची मेहनत खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. त्यांनीं रसशास्त्रावर उपलब्ध असलेल्या ग्रंथांपैकीं पुष्कळ ग्रंथ आपल्या खर्चानें छापून प्रसिद्ध केले आहेत आणि ज्या ग्रंथाचें भाषांतर या उपोद्घातासोबत आहे तो "आयुर्वेदप्रकाश" ग्रंथहि पं० यादवजीनींच संस्कृतांत प्रसिद्ध केला आहे.

रसायन.

आपल्या रसशास्त्रांत औषधोपयोगी पारद भस्माला किंवा मूर्च्छित झालेल्या शुद्ध पाऱ्याला रसायन असें नांव आहे. रोगनाशक, वार्धक्यनाशक व आरोग्यरक्षक असें शुद्ध पाऱ्याचें कोणतेंहि औषध असो, त्याला रसायन म्हणतात. वनस्पति-चिकित्सेंत रसायन शब्दाचा अर्थ निराळा आहे. त्यांत पाऱ्याचा संबंध नाहीं इतकें लक्षांत ठेविलें म्हणजे पुरे. तथापि औषधि रसायन म्हणजे पाऱ्याचें व अभ्रक, गंधक किंवा ताम्र इत्यादिकांच्या भस्माचें औषध असाच अर्थ सामान्यतः समजण्यांत येतो, म्हणून तोच घेऊन चालूं. आपल्या शास्त्रांत रसायन क्रियेचा बराच विकास झालेला दृष्टीस पडतो.

जिन्नस पारा असो, अभ्रक, गंधक, हरताळ इत्यादि उपरस असोत किंवा सोनें, चांदी, ताम्र, वंग वगैरे धातू असोत, कोणताहि जिन्नस रसायन-क्रियेंत वापरणें झाल्यास तो शुद्ध करूनच वापरावा असा शास्त्रज्ञांचा फारच कडक निर्बंध आहे. हेंच काय पण बचनाग, कुचला इत्यादि विषें देखील शुद्ध करूनच उपयोगांत आणलीं पाहिजेत. जो मनुष्य अशुद्ध औषधें उपयोगांत आणतो तो नीच घातकी अशी त्याची निंदा प्राचीन शास्त्रज्ञांनीं केलेली आहे. म्हणून रसायन हें जरी जास्त गुणावह आहे तरी त्यांतील जिन्नस शुद्ध आहेत कीं कसें हें ओळखणें फार कठीण असल्यामुळें बाजारी रसायन पोटांत घेतल्यानें दुष्परिणाम घडून येण्याचा अतिशय संभव आहे. याकरितां रसायन घेणें असेल तर तें स्वत: तयार करावें. रसायन म्हणजे खनिज पदार्थापासून तयार केलेलें औषध हें बरोबर साधलें नाहीं, कच्चें राहिलें किंवा अतिशय तीव्र झालें तर ओकारी, चक्कर, अंगाचा दाह, पोटशूळ वगैरे विकार उत्पन्न होतात. म्हणून रसायनें खात्रीचींच वापरावीं किंवा आपल्या विश्वासाच्या वैद्याकडूनच घ्यावीं; त्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

जिन्नस शुद्ध करण्याचा हेतू असा कीं, खनिज पदार्थांत मूळचीच भेसळ असते. शिवाय अप्रामाणिक व्यापारी आणि लबाड दुकानदार यांच्या लोभामुळें होणारी भेसळ ती निराळीच. मिळून काय, कीं पारा, गंधक, ताम्र, सोनें हें शुद्ध स्थितींत आयतें मिळणें अशक्य आहे. पाऱ्यांत तर शिसें, कथील, जस्त, बिस्मथ इत्यादिकांची भेसळ असते म्हणून हल्लींच्या पाश्चिमात्य वैद्यकांतहि पारा शुद्ध कसा करावा ती क्रिया दिलेली असते. त्या क्रियेंत आणि आपल्या इकडील क्रियेंत तत्वत: साम्यच आहे. फरक इतकाच कीं, आपल्याइकडील पद्धति जुन्या तऱ्हेची व थोडी जास्त मेहनतीची आहे. परंतु ज्या प्राचीन काळांत ती पद्धति पसंत ठरली त्या काळीं हल्लींप्रमाणें रिटॉर्ट (म्ह० पर्युत्क्षेपक) टेस्टटयूब (परीक्षानळी) निरनिराळीं असिडें, हत्यारें, तऱ्हेतऱ्हेच्या डिस्टिलरीज, हीं साधनें नव्हतीं हें ध्यानांत आणलें म्हणजे बिकट परिस्थितींत पूर्वीच्या शास्त्रज्ञांनीं जें कार्य करून दाखविलें याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. हिंदुस्थानावर परकीय लोकांच्या स्वाऱ्या सुरू झाल्यानंतर येथील वैद्यकपरंपरा बुडाली, ग्रंथ दुर्बोध झाले, भलतेच अशुद्ध पाठ ग्रंथांत शिरले व त्यामुळें ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें अनुभव येईनासा झाला. याचा परिणाम असा झाला कीं, हजारों ग्रंथ नाहींसे झाले. उघडच आहे कीं, जो ग्रंथ अनुभवाला टिकत नाहीं तो बुडणारच. अजूनहि हें संकट दूर झालें आहे असें नाहीं; म्हणून जुन्या ग्रंथांतलि क्रिया करतांना क्रियेचें निव्वळ बाह्यानुकरण करण्यापेक्षां तत्वाकडे दृष्टि ठेऊन हल्लींच्या शानाचा आणि साधनांचा पूर्ण उपयोग करून

घेतला पाहिजे. म्हणजे ग्रंथोक्त क्रिया सहसा चुकणार नाहीं. जो थोडाबहुत अनुभव प्रस्तुत लेखकास घेतां आला आहे त्यावरून असें कळलें कीं, पारा घट्ट करण्याचीं किंवा चांदीचें बत्ताशाप्रमाणें भस्म करण्याची शक्ति गंगावती जातीच्या वनस्पतींत आहे. या क्रियेला जटिली क्रिया म्हणतात. परंतु वनस्पतीची बिनचुक माहिती असेल तरच तीं साधेल. त्यापेक्षां ग्रंथोक्त क्रिया अवघड व खर्चाची आहे परंतु जास्त निश्चित आहे. असें आढळून आलें आहे कीं, वनस्पतीच्या जोरावर जटिली क्रियेनें जें ताम्र होतें त्यापेक्षां कमी प्रतीचें ताम्र कथिलाच्या जोडानें नव्हे, परंतु साहचर्यानें तयार होतें. पण त्याकरितां आंच द्यावी लागते ती फार जपून दिली पाहिजे. नाहीं तर कांहींच निष्पन्न होत नाहीं. आंच साधली कीं काम झालेंच. याच पद्धतीनें शिशाच्या साहचर्यानें वंग भस्म होतें. ह्या साहचर्य व्यापाराला पाश्चात्य शास्त्रांत कॅटॅलिटिक ॲक्शन (Catalytic Action) म्हणतात. या धोरणानें रसहृदयांतील गोविंदाचार्यांची जी एक तत्वदर्शक आर्या आहे तिच्या अर्थाचा उलगडा वरील अनुभवावरून बऱ्याच अंशीं झाला. ती आर्या अशी:—

काष्ठौषध्यो नागे, नागं वंगेऽथ वंगमपि शुल्बे ।
शुल्बं तारे, तारं कनके, कनकं च लीयते सूते ॥

हल्लींच्या शुद्धिक्रियेंत ज्याप्रमाणें निरनिराळ्या आकाराच्या कांचेच्या कुप्या, नळ्या, व पर्युत्क्षेपक (रिटॉर्ट) असतात त्याप्रमाणें पूर्वीं कांचे-ऐवजीं लाखलोट्या मजबूत मडक्यांची योजना करीत व कांचेच्या नळी-ऐवजीं वेळूच्या नळ्यांचा उपयोग करीत. या साधनांना यंत्रें म्हणत. त्यांचीं नांवें दोलायंत्र, डमरूयंत्र, पातनयंत्र, वालुकायंत्र अशीं आहेत. त्याशिवाय ते मुशी करीत त्याहि फार मजबूत असत. परतु बाहेर वाफ जाऊं न देतां आंतल्याआंत पदार्थ भाजावयाचा असेल तेव्हां खापराच्या दोन खोलगट पणत्या, किंवा परळ घेऊन त्यांपैकीं एकांत जिन्नस ठेऊन वर दुसरी पणती किंवा परळ पालथा बसवून त्याचे सांधे लेपानें किंवा लुकणानें चिणून टाकीत. या प्रकाराला संपुट म्हणत. हीं संपुटें लोखंडाचींहि करीत. यंत्रें, मुशी व संपुट यांच्याप्रमाणेंच पूर्वीच्या रसक्रियेंत खल व बत्ता हें फार महत्वाचें साधन असे. हल्लीं " वेजवुड " याच्या पद्धतीनें खल तयार करितात. पूर्वीचे खल सारलोहाचे म्हणजे अतिशय कठिण अशा पोलादाचे किंवा गारेचे करीत. म्हणून त्यास फार किंमत पडे. जिनसांचा खल महिनो गणती चाले. त्यामुळें खलबत्ता हा सारलोहाचा किंवा गारेचा पाहिजे; नाहीं तर खलच झिजून ती झीज औषधांत मिसळून औषध बिघडतें.

पूर्वीच्या पद्धतींत दुसरा अवघड भाग म्हणजे आंच कशी द्यावी हा आहे. हल्लींदेखील आंच साधणें हा विषय काठिणच आहे. तथापि त्या-करितां निरनिराळ्या भट्टया असतात, उष्णतामापक साधनें असतात व दगडी कोळसा,कोक,ऑक्सिहैड्रोजनज्वाला व विद्युज्ज्वाला म्हणजे ज्यांना आपण सर्पण म्हणूं ते ज्वालानिष्पादक जिन्नस असतात. पूर्वी हीं साधनें नव्हतीं,त्यामुळें पूर्वीच्या लोकांनीं निराळीच युक्ति योजली.त्या युक्त्यांना अग्नि-पुटें म्हणतात.दहा गोवऱ्यांची आंच, दोनमण लांकडाची,हातभर औरस चौरस व खोल खळगा खणून त्यांत कोळसे किंवा गोंवऱ्या भरून त्यांची आंच,असे पुट द्यावयाचे निरनिराळे प्रकार त्यांनीं काल्पिले, व त्यांना लघुपुट, कुक्कुटपुट, वराहपुट, गजपुट, प्रखराग्निपुट अशीं नांवें दिलीं. पदार्थ पुष्कळ वेळ खलला असतां तो गरम होतो, म्हणून खल करणें म्हणजे एक प्रकारची आंचच आहे. त्यामुळें पुट देणें म्हणजे सडकून खल करणें असाहि अर्थ प्रचारांत आला.

याप्रमाणें न झिजणारा खलबत्ता, दोलायंत्र वगैरे यंत्रें, मुशी, संपुटें हीं साधनें उत्तम तऱ्हेचीं तयार करावीं, आंच देण्याचे प्रकार अनुभवून पाहावे आणि रसायनशास्त्राची साधारण तरी माहिती घेऊन मग रस-क्रियेच्या उद्योगास लागावें. रसक्रियेंत शुद्धिकरण ही क्रिया अगदीं अवश्य आहे. शुद्धिकरणद्रव्यात आम्ल, कांजी व आरनाल यांचा उपयोग पूर्वी करीत. हल्लींच्या शुद्धिक्रियेंत ॲसेटिक ॲसिड, हैड्राक्लोरिक ॲसिड वगैरे ॲसिडें वापरतात. यांना री–एजंट्स म्हणतात. धान्यें आंबवून त्यांत आम्लोत्पादक वनस्पति टाकून त्याचें स्वाम्ल म्हणजे कांजी करीत व कांजी-पेक्षांहि जें अतिशय आंबट पाणी तयार करीत त्याला आरनाल म्हणत. पारा हा आम्लांत, किंवा आरनालांत, उकळून, वाफारून धुवून घेत. शुद्धिक्रियेंत ज्या वनस्पति पाहिजेत त्यांत त्रिकटु, त्रिफळा, कोरफड, चित्रक, लसूण, आघाडा, तांदुळजा, चुका इत्यादि अनेक आहेत. त्यांतून निर-निराळ्या प्रकारचे क्षार आम्ल, व दुसरीं विद्रावक द्रव्यें उत्पन्न होतात. अशा वनस्पति पूर्वीच्या लोकांनीं उपयोगांत आणल्या ह्यांत त्यांचें खरोखरच चातुर्य दिसून येतें. वरील वनस्पति व त्याचप्रमाणें गोमूत्र हे जिन्नस असे आहेत कीं, त्यांत अपायकारक व हिणकस पदार्थ विरून जातात किंवा निराळे बाहेर पडतात. या गुणामुळें वरील वनस्पतींना व गोमूत्राला संशो-धकवर्ग म्हटल्यास चालेल. रस किंवा धातू हे संशोधक वनस्पतींत व आम्लांत उकळून, खलून त्यांना अग्निपुट देणें किंवा पातनंयत्रानें (ते Distill करणें म्हणजे) त्यांची वाफ बनवून ती पुनः थंड करणें हें घोरण शुद्धिक्रियेंत स्पष्ट दिसून येतें.

याप्रमाणें पारा शुद्ध केला म्हणजे तो पहिल्यानें जितका घेतला असेल त्यापेक्षां वजनांत पुष्कळच कमी भरतो. कारण उकळणें, खलणें व

परिपातन (Distill) करणें यांत बराच पारा फुकट जातो. शुद्ध पाऱ्याला "आरोट" अशी संज्ञा आहे. यानंतर पुढची पायरी पारदबंधन ही आहे. पारा घट्ट करून तो अग्नीवर ठेवला असतांहि त्याची वाफ न होईल असें करणें ही ती पायरी होय. रसशास्त्रांत अतिशय कठीण अशी क्रिया हीच. वनस्पतीनें पारा घट्ट होतो व घट्ट झालेल्या पाऱ्याला "खोट" असें म्हणतात. परंतु हा "खोट" उष्णतास्थायी* करणें हाच प्रकार साधत नाहीं. खरें रसायन व खरी किमया ती ही. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें पाहतां ही पाऱ्याची पक्की बनावट जारणाक्रियेनें होते. जारणा म्हणजे कच्छप किंवा भूधरयंत्रांत पाऱ्याला आंच देऊन त्यांत गंधक जिरवून पुनः पाऱ्याचें धातुस्वरूप कायम राखणें ही क्रिया होय. पाऱ्याच्या सहा पट भरेल इतका गंधक पाऱ्यांत थोडथोडा जिरविला म्हणजे पारा कठीण होऊन तो अग्निस्थायी* होतो असें आपल्या शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. परंतु अडचण ही आहे कीं, पारा व गंधक यांचा रासायनिक संयोग झाला म्हणजे पाऱ्याची काळी कज्जली किंवा तांबडें भस्म बनतें, त्याचें मूळचें धातुस्वरूप कायम राहत नाहीं. ह्या अडचणीमुळें पारा अग्निस्थायी होऊं शकत नाहीं, व इतक्या सर्व गंधकाचा पाऱ्याशीं रासायनिक संयोग होत नाहीं.

याप्रमाणें जारणाक्रिया हीच फार अवघड आहे. परंतु ती असाध्य आहे असेंहि ग्रंथकार माधव उपाध्याय म्हणत नाहीं. गंधक जारणेनंतर बीजजारण, "सारणा तेलाची कृति" व क्रामणसंस्कार हे सांगितले आहेत. परंतु या सर्वांचा संबंध किमयेशीं विशेष असल्यानें जारणाक्रियेपासूनच रसशास्त्राला निराळी दिशा लागली व ज्यांना किमया करावयाची नाहीं ते सहा पट गंधक जिरविण्याची क्रिया साध्य करण्याचा नाद सोडून शक्य व व्यवहारोपयोगी मार्गाकडे वळले व पाऱ्याचा उपयोग औषधांत करावयाचा असल्यास तो शुद्ध केला म्हणजे पुरे, षड्गुणगंधक जारणा क्रियेसारख्या अवघड क्रिया करण्याचें कांहीं कारण नाहीं असें मनाशीं ठरवून शुद्ध पाऱ्याचीं भस्में करण्याचाच मार्ग त्यांनीं पतकरला. पारा घट्ट करून अग्निस्थायी करण्याचें ध्येय जरा बाजूस ठेवलें तरी इतर दिशेनें पाऱ्याचा योग्य उपयोग करण्याच्या उद्योगांत पूर्वी पुष्कळच प्रगति झाली होती. ही प्रगति "भस्म" क्रियारूपानें दृष्टोत्पत्तीस येते. गंधक, टाकणखार, नवसागर इत्यादि उपरस, आणि खनिज किंवा वनस्पतिजन्य क्षार व आम्ल यांचा पारा किंवा इतर धातू यांच्याशीं जो रासायनिक संयोग होतो त्याला "भस्म" असें नांव आहे. रससिंदूर, रसकर्पूर, हेमसुंदर, मृत्युंजय, त्रिनेत्र वगैरे रसायनें हीं सर्व पाऱ्याचीं भस्में होत. त्यांत पारा व

---

* उष्णतास्थायी—उष्णतेस दाद न देणारा; उष्णतेनें उडून न जाणारा.

गंधक अगर पारा व नवसागरांतील हरिद्वायु यांचा रासायनिक संयोग झालेला असतो. पाऱ्याप्रमाणेंच सुवर्ण, ताम्र, वंग, नाग (शिसें) व लोह यांचींहि भस्में होऊं शकतात व करतातहि. हीं भस्में जुन्या पद्धतीनें व त्याचप्रमाणें नवीन पाश्चात्य पद्धतीप्रमाणेंहि होतील. परंतु दोहोंमध्यें फरक पडेल. पाश्चात्य पद्धतीचीं रसायनें Inorganic म्हणजे (वनस्पीतजन्य क्षाररहित व निव्वळ) धातु व अधातु यांच्या संयोगानें झालेलीं असतात. त्यामुळें तीं तीव्र होतात व चिकित्सा दृष्टीनें पाहतां जास्त क्षोभकारक (Irritant) असतात. आपल्या इकडील पद्धतीनें भस्म करणें हें केव्हां केव्हां फार त्रासाचें व खर्चाचें आहे. परंतु आपल्या पद्धतींत वनस्पतींचा संबंध अतिशय असल्यानें आपलीं भस्में साधलीं तर तीं जास्त सौम्य असतात व पोटांत घेतल्यानें त्यांपासून क्षोभ किंवा मलावष्टंभ होत नाहीं. तथापि याविषयीं जास्त शोध केला पाहिजे, म्हणजे याप्रमाणें खरोखरच स्थिति आहे कीं नाहीं हें कळेल. शिवाय ताम्र, वंग (कथील), शिसें यांचीं भस्में पोटांत देण्याचा प्रकार पाश्चात्य पद्धतींत अद्यापि नाहीं. त्याचप्रमाणें अभ्रक, माणिक, मोतीं यांचीं भस्में करण्याचाहि रिवाज नाहीं. पाश्चात्य प्रवृत्ति अशी आहे कीं, अभ्रक, माणिक, मोतीं किंवा मोत्यांचे शिंपले अशा वस्तूंत जे मूलभूत धातु आहेत त्यांचीं भस्में करावयाचीं; परंतु या योगानें त्या त्या वस्तूंच्या भस्माचें कार्य होणार नाहीं. याचें कारण रसायनशास्त्रज्ञांस सांगावयास नको. याप्रमाणें आयुर्वेदीय पद्धति आणि पाश्चात्य पद्धति हींत फरक आहे. त्याचें मर्म ओळखून आयुर्वेदीय पद्धतीच्या भस्मांचें स्वरूप, परीक्षा व गुणावगुण ठरविले पाहिजेत. परंतु हें करण्याला मुख्य साधन म्हणजे आयुर्वेदीय रसक्रियेची अनुभविक माहिती हेंच आहे व त्या कामीं "आयुर्वेदप्रकाश" या ग्रंथाचा चांगला उपयोग होईल.

भस्म खरें किंवा खोटें व खरें असल्यास तें कच्चें किंवा पक्कें आहे ह्याची परीक्षा करतां येणें हेंहि फार महत्वाचें आहे. ही परीक्षा अनेक रीतींनीं केली पाहिजे. प्रत्येक भस्माची परीक्षा निराळी ठरेल. यासंबंधानें स्वतंत्र विवरण येथें करतां येत नाहीं. तथापि साधारण रीतीनें परीक्षेची दिशा " आयुर्वेदप्रकाशांत " सांगितली आहे ती फार उत्तम आहे. धातूचें भस्म हें निश्चंद्र झालें पाहिजे. म्हणजे त्यांतील धातूची तकाकी पूर्णपणें नाहींशी झाली पाहिजे. दुसरी परीक्षा अशी कीं, तें निर्धूम व निरुत्थ* झालें पाहिजे. जें भस्म अग्नीवर टाकलें असतां तें जळून किंवा त्याची वाफ होऊन जात

---

* अग्नीच्या उष्णतेनें किंवा री-एजंटसनीं भस्मांतील मूळ धातु पुनः प्रकट झाला नाहीं म्हणजे भस्म निरुत्थ झालें.

नाहीं तें निर्धूम होय. याशिवाय निरनिराळ्या भस्मांच्या निरनिराळ्या परीक्षा आहेत; पण वर दिलेली परीक्षा सर्वसाधारण आहे ती प्रथम करून नंतर प्रत्येक भस्माची खास परीक्षा केली पाहिजे. खास परीक्षेशिवाय भस्म खरें किंवा खोटें याचा निर्णय लागणार नाहीं. तथापि हें सांगणें अवश्य आहे कीं, पाश्चात्य पद्धतीनें केलेलीं जीं पाऱ्याचीं भस्में किंवा औषधें आहेत त्यांतील कोणतेंहि भस्म ३००–३५० सेंटिग्रेड अंशापुढील उष्णतेनें " निरुत्थ " स्थितींत टिकत नाहीं व आपल्या इकडील साधारण प्रतीच्या रससिंदुरादि मात्रा आहेत, त्यांना देखील " निरुत्थ " करण्याची कसोटी तंतोतंत लागू पडणार नाहीं. कारण पारा हा धातूच मुळीं अतिशय चंचल आणि अस्थिर आहे. म्हणून पारदभस्माच्या कच्चे–पक्केपणाची परीक्षा निराळ्या तऱ्हेनें व तारतम्यानेंच केली पाहिजे.

पथ्याहार.

आयुर्वेदीय चिकित्सेंत पथ्याचें महत्व फार आहे. पुष्कळ लोकांना अलीकडे पथ्याहाराचा कंटाळा वाटतो हें खरें;पण दुर्धर रोगापासून पूर्ण सुटका करून घेणें असेल तर उत्तम औषध व उत्तम पथ्याहार यांची सांगड घातलीच पाहिजे. निःसत्व व बेचव पदार्थ खाणें हें खरें पथ्य नव्हें. पथ्याहार म्हणजे अगदीं हलका परंतु पौष्टिक आहार होय. पथ्याची खरी खुबी हलका व पौष्टिक आहार कोणता तें ठरविणें ही आहे. पथ्यामध्यें पौष्टिक असा अल्पाहार, स्वच्छता आणि स्वच्छ हवेंतील व्यायाम ह्या गोष्टी येतात. तसेंच स्वच्छ आणि निर्दोष पाणी पिणें हेंहि पथ्यच होय. असें पथ्य कोणतें व तें कशा रीतीनें करावें तें या ग्रंथांत विशद रीतीनें सांगितलें आहे. हा या ग्रंथाचा आणखी विशेष होय. साधारण वाचकांसहि हा भाग मनोरंजकच वाटेल. सुग्रास अन्न नेहमीं खावें हें उत्तम. निदान सणावारीं तरी आपण सुग्रास अन्न अवश्य खातों, त्याप्रमाणें हलकें, पौष्टिक, परिमित अन्न, स्वच्छ व निर्दोष पाणी आणि नेमस्त व्यायाम या गोष्टी जरी नित्यशः आचरण्यालायक आहेत तथापि आजारामध्यें तरी निदान त्या पाळाव्या. अर्थात आजारामध्यें तरी पथ्यानें रहावें असा प्राचीन वैद्यांचा आपणांस सदुपदेश आहे.

आतां भाषांतर केलेल्या ग्रंथासंबंधानें व ग्रंथकारासंबंधानें थोडी माहिती द्यावयाची. त्यांत ग्रंथासंबंधानें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. ग्रंथ वाचकांसमोर आहेच. तथापि " मीं स्वतः अनुभव घेतल्याशिवाय या ग्रंथांत कोणतीहि क्रिया लिहिली नाहीं " असें ग्रथकार म्हणतो तें खरें आहे असें त्यांतील कांहीं विशेष उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. अनुभवाची योग्यता केव्हांहि जास्तच. त्या कारणानें ह्या ग्रंथाचा दर्जा बराच उच्च ठरेल

यांत संशय नाहीं. ग्रंथकाराच्या चरित्रासंबंधानें मात्र कांहीं एक माहिती लागत नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. आत्मचरित्र देणें हा आत्म-स्तुतीचाच एक पर्याय आहे अशा समजुतीनें आपल्या स्वत:संबंधानें माहिती ग्रंथकार देत नाहींत. त्यामुळें असा अनिष्ट प्रसंग ओढवतो. ग्रंथकाराची माहिती त्यानें प्रत्येक अध्यायाचे अखेरीस जो आपला नामनिर्देश केला आहे तेवढीच. त्यावरून असें दिसतें कीं, ग्रंथकाराचा जन्म काठेवाडांत सारस्वत ब्राह्मण जातींत झाला. ग्रंथकाराचें नांव माधव व आडनांव उपाध्ये. ग्रंथकाराचें अध्ययन काशीस झालें व त्याचें रहाण्याचें ठिकाणहि काशीक्षेत्र हेंच होतें. ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत भावप्रकाशाचा उल्लेख केला आहे, त्यावरून माधव उपाध्याय हा भावमिश्रानंतर म्हणजे इसवी सनाच्या १७व्या शतकांत झाला असावा असा विद्वानांचा तर्क आहे व तोच संभव-नीय दिसतो.

याप्रमाणें " भारतीय रसशास्त्रा "विषयीं व भाषांतरित ग्रंथासंबंधानें जितकी माहिती थोडक्यांत देणें शक्य होतें तितकी देऊन हा उपोद्घात पुरा करतों.

रा. वि. पटवर्धन.

आयुर्वेदप्रकाश.

अनुक्रमणिका.

विषय	पृष्ठ
प्रथमोऽध्यायः।	
मङ्गलाचरण	१
रसदोषाः	५
रससंस्कारसंख्या	८
स्वेदनविधि	१०
मर्दनविधि	१४
मूर्च्छनविधि	१५
उत्थापनविधि	१७
पातनाविधि	१८
बोधनाविधि	२३
नियमनाविधि	२५
दीपनीविधि	२६
अनुवासन	२७
अथ जारणं	२८
गन्धकजारणं	३३
सुवर्णजारणाविधि	५६
अभ्रकसत्वजारणाविधि ...	६३
गर्भद्रुति	६४
ग्रासस्य चारणप्रमाणं ...	६६
रंजनविधि	६७
बाह्यद्रुति	७७
सारणविधि	”
क्रामणविधी	७९
हेमवतीविद्या (किमया) ...	८३
रसबन्धनविद्या	८६
रसभस्मीकरणम् ...	९५
रसकर्पूरविधान	९९
सिन्दूररसः ...	१०२
रसमारणाविधिः ..	१०३
मृत पाऱ्याचें लक्षण ...	१०७
जलौकाबन्धविधान ...	११०
खेचरीगुटिका ...	१११
पारदसेवनविधि ...	११२
रसभक्षणकालः ...	११५
रसभक्षणमात्रा ...	”

विषय	पृष्ठ
रससेवन पथ्यापथ्य ...	११९
पारा अंगांत सांचून अजीर्ण झाल्यास ...	१२२
गन्धामृतरसः ...	१२७
हेमसुन्दररसः ...	१२८
मृत्युंजयरसः ...	”
आनन्दसूतरसः ...	१२९
प्राणिकल्पद्रुमगोलरसः ...	१३१
त्रिनेत्ररसः ...	१३२
शार्दुलरसः ...	”
अमृतार्णवरसः ...	१३३
जयावटी ...	१३४
गन्धलोहम ...	”
रसायनचूर्ण ...	१३५
चतुर्मुखरस ...	१३६
द्वितीयोऽध्यायः	
उपरस ...	१३६
गन्धकनामानि ...	१३८
गन्धकस्वरूप ...	”
शुद्धगन्धकगुण ...	१३९
गन्धकशोधन ...	१४१
गंधककल्प ...	१४४
हिंगुलशोधन ...	१५२
हिंगुलमारण ...	”
अभ्रकक्रिया ...	१५४
हरताळाचीं नांवें, लक्षण, शोधन व मारण ...	१७३
मनशीळ	१८३
सुरमा	१८६
रसांजनाची उत्पत्ति ...	१८७
नीलांजन, पुष्पांजन व कुलिथ्थांजन	१८८
टंकण	१८९
गजावर्त	१९०
चुंबक	१९१

विषय			पृष्ठ
स्फटिका-तुरटी	...	...	१९२
शंख	,,	,,	१९३
खटिका	...	...	१९३
गैरिक (गेरू)	...	...	१९४
कासीस हिराकस	...	...	१९५
रसक-कालखापरी	...		१९६
कपर्दिका	...	...	१९९
सिकता	...	...	२०१
कंकुष्ठ	...	...	२०३
सौराष्ट्री	...	...	२०४
समुद्रफेस	...		२०४
क्षुद्रशंख	...	...	२०५
कृष्णमृत्तिका	...	...	२०६
कंपिल्लक	...	...	२०७
नवसागर		...	२०८
गौरीपाषाण	...	...	२०८
अग्निजार	...	...	२०९
गिरिसिंदूर	,,	,,	,,
बोदारशृंग	,,	,,	,,
साधारणरस	...	...	२१०
उपरस	...	...	२११

तृतीयोऽध्यायः

धातूपधातूनिर्णय	...	...	२११
सुवर्ण उत्पत्ति, लक्षण गुण व शोधन मारण	...	...	२१३
रौप्य	...	...	२२८
ताम्र	...	...	२३०
वंग	...	...	२४२
जस्त	...	...	२५०
नाग	...	...	२५१
लोह	...	...	२५२

चतुर्थोऽध्यायः

स्वर्णमाक्षिक	...	...	२७१
विमला	...	...	२८३

विषय			पृष्ठ
विमलामाक्षीकनिर्णय	...	...	२८६
तुत्थ मोरचूद	...	...	२८८
भूनाग	...	...	२९०
कांस्य	...	...	२९६
पित्तल	...	...	२९७
रीतीकागुण	...	...	२९८
पंचलोह पंचरसवर्णन	...	...	३००
सिंदूर	...	...	३०१
शिलाजतु	...	...	३०२
चपल	...	...	३१०

पञ्चमोऽध्यायः

रत्नें, उपरत्नें यांचें वर्णन, शोधन वगैरे.	...	...	३११
हीरक-हिऱ्याविषयीं	...	...	३१४
मौक्तिक	...	...	३२८
वज्रमारणं	...	...	३३८
प्रवाल	...	...	३३९
मौक्तिकगुणाः	...	...	३४१
माणिक	...	...	३४२
पाच किंवा पन्ना	...	...	३४३
वैडूर्य	,,	,,	,,
गोमेद	...	...	३४५
इंद्रनील	,,	,,	,,
पुष्पराग	...	...	३४७
पंचरत्ननिरूपणं	...	...	३४९
रत्नद्रुतीकरणं	...	...	३५९
सौराष्ट्रीसत्वपातन	,,	,,	,,
सस्यकसत्वपातन	...	...	,,

षष्ठोऽध्यायः ।

विषें आणि उपविषें यांविषयीं	...	...	३६१
उपविषांची शुद्धि	...	...	३८२
विषवज्रपात औषध	...	...	३८४
लवणभेदी	,,	,,	,,

समाप्त.

उपाध्यायश्रीमाधवविरचितः

आयुर्वेदप्रकाशः

प्रथमोऽध्यायः ।

अर्थप्रकाशकासारविमर्शाम्बुजिनीमयम् ।
सच्चिदानन्दविभवं शिवयोर्वपुराश्रये ॥ १ ॥

देवेन्द्रमौलिमन्दारमकरन्दकणारुणाः ।
विघ्नं हरन्तु हेरम्बचरणाम्बुजरेणवः ॥ २॥

अधुना रसराजस्य संस्कारान् संप्रचक्ष्महे ।
नानातन्त्राणि संदृश्य भिषजां सिद्धिहेतवे ॥ ३ ॥

संस्काराः परतन्त्रेषु ये गूढाः सिद्धसूचिताः ।
तानेव प्रकटीकर्तुमुद्यमं किल कुर्महे ॥ ४ ॥

रसायनग्रंथाचा स्पष्टार्थ हेंच कोणी सरोवर, आणि त्याचें मनन हाच कोणी कमलसमूह—अशा दोन्ही स्वरूपानें जें प्रकट झालें, व ज्याच्या सच्चिदानंदस्वरूपाचें वैभव अवणनीय आहे असें जें ईश्वर आणि पार्वती यांचें जोडपें, त्यांच्या चरणांचा मी आश्रय करतों (१)

इंद्राच्या मुकुटावर जीं कल्पवृक्षांचीं पुष्पें असतात, त्यांच्या मकरंदाच्या कणांनीं ज्याच्या चरणाची धूळ लाल झाली आहे, अशा श्रीगणाधीशाच्या चरणकमलांच्या रजःकणांच्या प्रतापानें सर्व विघ्नें दूर होवोत. (२)

मंगलाचरण झाल्यानंतर आतां पारदाला जे निरनिराळे संस्कार करावयाचे असतात ते सांगतों. त्याकरितां आम्हीं ह्या विषयावरील अनेक ग्रंथ पाहिले आहेत; त्याचा हेतु असा आहे कीं, रसायन--क्रिया वैद्यांना उत्तम रीतीनें साध्य व्हावी. (३)

रससिद्ध म्हणजे रसायनशास्त्रांत ज्यांना सिद्धि प्राप्त झाली आहे त्यांनीं योजिलेले संस्कार पुष्कळ ग्रंथांत दिलेले असतात; पण विवेचनपद्धति दुर्बोध असते, म्हणून ते संस्कार स्पष्ट करून सांगप्याकरतां हा आमचा उद्योग आहे. (४)

ग्रन्थादस्मादाहरन्ति प्रयोगान् स्वीयं वाऽस्मिन्नामधेयं क्षिपन्ति।
गोत्राण्येषामस्मदीयश्रमोष्मा भस्मीकुर्वन्नायुगं बोभवीतु ॥५॥
अश्रौषं बहुविदुषां मुखादपश्यं शास्त्रेषु स्थितमकृतं न तल्लिखामि।
यत्कर्म व्यरचयमग्रतो गुरूणां प्रौढानां तदिह वदामि वीतशंकः॥
अध्यापयन्ति यदि दर्शयितुं क्षमन्ते
सूतेन्द्रकर्म गुरवो गुरवस्त एव।
शिष्यास्त एव रचयन्ति पुरो गुरूणां
शेषाः पुनस्तदुभयाभिनयं भजन्ते ॥ ७ ॥
यद्यन्मयाऽक्रियत कारयितुं च शक्यं
सुतेन्द्रकर्म तादिह प्रथयांबभूवे।
अध्यापयन्ति य इदं न तु कारयन्ति
कुर्वन्ति नेदमधियन्त्युभये मृषार्थाः ॥ ८ ॥

जे कोणी ग्रंथकार या आमच्या ग्रंथांतील प्रयोग चोरून घेऊन आपल्या पुस्तकांत दडपून देतील, किंवा ह्या आमच्या ग्रंथांत आपलें स्वतःचें नांव घुसडून देतील त्यांनीं खूब समजून असावें कीं, हा ग्रंथ करण्याला आम्हांला फार श्रम पडले आहेत; तेव्हां आमच्या तळतळाटाची आग अशा चोरट्या ग्रंथकारांनां व त्यांच्या भाईबंदांना युगान्तापर्यंत जाळीत राहील.(५)

पुष्कळ विद्वानांच्या तोंडून मीं रसायनक्रिया ऐकलेली आहे, व शास्त्रामध्यें काय आहे तेंहि पाहिलें आहे; पण न केलेल्या अशा कोणत्याच कृतीची माहिती मी ह्या ग्रंथांत लिहीत नाहीं, तर ज्या ज्या क्रिया आमच्या विद्वान् गुरूंच्या नजरेखालीं मी केल्या आहेत, त्या क्रिया मनामध्यें कांहीं एक खटका न ठेवतां सांगून टाकतों.(६)

रसायनशास्त्र जाणणारे विद्वान् आहेत ते शास्त्र शिकवितातच; पण त्याचे प्रयोग प्रत्यक्ष करून दाखविण्याला जर ते समर्थ

असतील तर ते खरे गुरू आणि जे विद्यार्थी गुरूंनीं सांगितल्या-प्रमाणें क्रिया स्वतः करतील तेच खरे शिष्य. इतर गुरू आणि इतर शिष्य नुसतें नाटक करतात, यापेक्षां कांहीं नाहीं. (७)

जी क्रिया मीं स्वतः केली आहे व दुसऱ्याच्या हातून कर-विण्यासारखी आहे तीच रसायनक्रिया ह्या ग्रंथांत मीं विस्तारानें सांगितलेली आहे. म्हणून जे कोणी हा ग्रंथ शिकवितील, पण त्यांत लिहिल्याप्रमाणें शिष्यांकडून प्रयोग करविणार नाहींत, ते व जे कोणी नुसता ग्रंथाचा शब्दार्थ शिकतील, पण प्रत्यक्ष प्रयोग कर-णार नाहींत ते असे दोघे खोट्याचे धनी होतील. दुसरें काय ?(८)

संस्काराः शिवजनुषो बहुप्रकारा-
स्तुल्या ये लघुबहुलप्रयाससाध्याः ।
यद्येकं सुकरमुदाहरामि तेषां
व्याहारैः किमिह फलं ततः परेषाम् ॥ ९ ॥
कर्म यद्यदसाध्यं स्याद्दुर्लभं यद्यदौषधम् ।
तत्तत्सर्वं परित्यज्य सारभूतं प्रकाशितम् ॥१०॥
क्वचिच्छास्त्रे क्रिया नास्ति कर्मसंख्या न च क्वचित् ।
रसयुक्तिः क्वचिन्नास्ति संप्रदायः क्वचिन्न च ॥ ११ ॥
अतः सिद्धिर्न सर्वत्र रस वापि रसायने ।
वैद्यवादे प्रयोगे च तस्माद्यत्नो मया कृतः ॥१२॥
यद्यद्गुरुमुखोद्गीतं स्वानुभूतं च यन्मया ।
तत्तल्लोकाहितार्थाय वक्ष्याम्यनातिविस्तरम् ॥ १३ ॥
यदन्यत्र तदत्रास्ति यदत्रास्ति न कुत्रचित् ।
मुक्त्वैकं रसवैद्यं तु लाभं पूजां च कीर्तनम् ।
तृणकाष्ठौषधैर्वैद्यः को लभेत वराटिकाम् ॥ १४ ॥
यावत्सूतो न शुद्धो न च मृत इह वा मूर्च्छितो गन्धबद्धो
नो वज्रं मारितं स्यान्न च गगनवधो नोपसूताश्च शुद्धाः ।
स्वर्णाद्यं सर्वलोहं विषमपि न मृतं तैलपाको न जात-
स्तावद्वैद्यः क्व सिद्धो भवति वसुभुजां मण्डले श्लाघनीयः ॥

शंकराचें वीर्य असा जो पारद, त्याचे संस्कार पुष्कळ प्रका-रचे आहेत. त्यांपैकीं कांहीं थोड्या परिश्रमानें होण्याजोगे आहेत व

कांहींना फार परिश्रम लागतात; परंतु सर्वांचें महत्व सारखेंच. म्हणून त्यांपैकीं सहज होणारे प्रयोग सांगितले म्हणजे दुसरे अवघड प्रयोग सांगण्याची आवश्यकताच उरत नाहीं. (९)

जी क्रिया असाध्य, व जी औषधी मिळण्यासारखी नाहीं, ती क्रिया व ती औषधी अशा दोन्ही सोडून जी मुद्द्याची गोष्ट आहे तेवढीच मीं यांत स्पष्ट केली आहे.(१०)

कांहीं शास्त्रग्रंथ असे आहेत कीं, त्यांत क्रिया कशी करावयाची तें सांगितलेलें नाहीं, किंवा संस्कार किती करावे त्यांची संख्या दिली नाहीं. कोठें रसयुक्तिच लिहिली नाहीं, कांहीं ग्रंथांत परंपरा म्हणजे कोणत्या क्रियेनंतर कोणती क्रिया करावी त्याचा अनुक्रम नाहीं; सारांश, कोठें कांहीं, कोठें कांहीं असा गुप्तपणा ठेवलेला आहे.(११)

याप्रमाणें गुप्तपणा राखल्यामुळें पारदाचा प्रयोग किंवा रसायनक्रिया साधत नाहीं, मग ती क्रिया औषधाची असो, किंवा नुसती प्रयोगदाखल असो. ही अडचण दूर करण्याकरतां हा प्रस्तुतचा ग्रंथ आहे. (१२)

म्हणून जी क्रिया मला गुरूपासून कळली आहे व जी मीं स्वतः करून अनुभव पाहिला आहे, तीच क्रिया फार पाल्हाळ न लावतां लोककल्याणाकरितां प्रसिद्ध करतों. (१३)

जें इतर ग्रंथांत आहे तें तर या ग्रंथांत आहेच; पण जें या ग्रंथांत आहे तें सर्व दुसरीकडे सांपडेलच असें मात्र समजूं नये.(१५)

रसायनशास्त्र जाणणाऱ्या वैद्याची गोष्ट सोडा; आणि त्याला होणारा लाभ, त्याला मिळणारा सन्मान आणि कीर्ति हीं एका बाजूस ठेऊन पहा, कीं, नुसती काष्ठौषधिक्रिया जाणणाऱ्या वैद्याला एका कवडीची तरी प्राप्ति होत आहे काय ! (१४)

जोंपर्यंत पारा शुद्ध करून तो मारतां येत नाहीं, किंवा गंधकाशीं त्याचा संयोग करून तो मूर्च्छित करतां येत नाहीं, किंवा

त्याचें बंधन करतां येत नाहीं; * काळ्या फत्तरी अभ्रकाचें किंवा हिऱ्याचें भस्म करतां येत नाहीं, साध्या अभ्रकाचेंहि नाहीं, अथवा मोरचूद वगैरे जे धातूंचे उपरस आहेत त्यांची देखील शुद्धिक्रिया ठाऊक नाहीं, लोहादि अष्ट धातूंचीं व बचनाग इत्यादि महाविषांचीं भस्में कशीं करावीं त्याची माहिती नाहीं, व नानाप्रकारचीं रसायन तैलें सिद्ध करतां येत नाहींत; अशी स्थिति आहे तोंपर्यंत कोणी वैद्य राजदरबारीं तज्ज्ञ म्हणून वाखाणला जाईल काय? (१५)

अथ रसदोषाः ।

नागो वङ्गो मलो वान्हिश्चापल्यं च विषं गिरिः ।
असह्याग्निर्महादोषा निसर्गात्पारदे स्थिताः ॥ १६ ॥
जाड्यगण्डौ तनौ नागात् कुष्ठं वङ्गाद्भुजो मलात् ।
दाहो वन्हेश्च चापल्याद्वीर्यनाशो मृतिर्विषात् ॥ १७ ॥
गिरेः स्फोटो ह्यसह्याग्निदोषान्मोहोऽभिजायते ।
विषं वान्हिर्मलश्चेति दोषा मुख्यतमाह्यमी ॥ १८ ॥
रसे मरणसंतापमूर्च्छानां हेतवः क्रमात् ।
योगिकौ नागवङ्गौ द्वौ तौ जाड्याध्यानकुष्ठदौ ॥ १९ ॥

आतां पाऱ्यांत दोष कोणते असतात ते सांगतों.

शिसें, कथील, कडकी, चंचलपणा, कचऱ्यासारखे गदळ पदार्थ, विषार, पर्वतांतील अशुद्ध पदार्थ, आणि असह्य कडकी असे आठ प्रकारचे मोठमोठे दोष पाऱ्यामध्यें मुळचेच असतात, म्हणून पारा शुद्ध करूनच उपयोगांत आणला पाहिजे. (१६)

शिसें मिसळलेला अशुद्ध पारा सेवन केला तर शरीरांत अग्निमांद्य, गंडमाळा हे रोग उत्पन्न होतात; कथलामुळें कुष्ठ होतें. गलिच्छ पदार्थांच्या मिसळीनें अनेक रोग जडतात, पाऱ्यांतील उष्णता काढून न टाकल्यास अंगाचा दाह होतो, पाऱ्यांत चांचल्य राहिलें तर वीर्यनाश होतो आणि विषारानें तर मृत्यु येतो. (१७)

---

* वज्र म्हणजे काळा दगडी अभ्रक किंवा हिरा.

तसेंच, पर्वतांत मिसळलेल्या भलत्याच पदार्थांनीं अंगावर गळवें उठतात, त्यांतील असह्य कडकीनें डोकें भणाणून जातें, असे बरेच दोष अशुद्ध पाऱ्यांत आहेत. परंतु एकंदरीनें विषार, कडकी, आणि गदळ पदार्थांची भेसळ हे तीन दोष त्यांत मुख्य आहेत, आणि त्यांच्यामुळें अनुक्रमें मृत्यु, दाह आणि मूर्च्छा हे दुष्परिणाम होतात; पण शिसें व कथील हे दोन धातू जर मिसळलेले असतील तर त्यांच्यामुळें जडपणा किंवा अग्निमांद्य, पोटफुगी व कुष्ठ हे उद्भवतात. (१८)

औपाधिकाः पुनश्चान्ये कीर्तिताः सप्त कञ्चुकाः ।
भूमिजो गिरिजो वार्जो द्वौ च द्वौ नागवङ्गजौ ॥ २० ॥

द्वादशैते रसे दोषाः प्रोक्ता रसविशारदैः ।
भूमिजः कुरुते कुष्ठं गिरिजो जाड्यमेव च ॥ २१ ॥

वारिजो वातसंघातं दोषाढ्यौ नागवङ्गजौ ।
अतो दोषनिवृत्त्यर्थं रसः शोध्यः प्रयत्नतः ॥ २२ ॥

ह्याशिवाय पाऱ्याला औपाधिक म्हणजे भेसळीमुळें आणखी सात प्रकारचे दोषरूप कंचुक अथवा पापुर्दे चिकटलेले असतात. दोषाचा पहिला पापुद्रा जमीनीचा म्हणजे जमीनींतील पदार्थांच्या भेसळीचा असतो; दुसरा पर्वताचा; तिसरा पाण्याचा; दोन (इतर धातूंचे) व दोन शिसें व कथील ह्यांचे. असे (सात पापुद्रे आणि पांच इतर दोष मिळून) पाऱ्यांत बारा दोष आहेत असें रसशास्त्रज्ञ म्हणतात. पैकीं जमीनींतील भेसळीनें कुष्ठ होतें, पर्वतातील भेसळीनें जाडय होतें, पाण्यांतील पदार्थांच्या भेसळीनें अनेक प्रकारचे वात-विकार जडतात; शिसें आणि कथील हे तर दोषांचा साठाच आहेत, म्हणून हे सर्व दोष पाऱ्यांतून काढून टाकण्याकरितां पारा शुद्ध केलाच पाहिजे. (२२).

शोधितो रसराजस्तु सुधातुल्यफलप्रदः ।
दोषहीनो यदा सूतस्तदा मृत्युजरापहः ॥ २३ ॥

साक्षादमृतमप्येष, दोषयुक्तो रसो विषम्।
तस्माद्दोषनिवृत्त्यर्थं सहायैर्निपुणैर्भिषक् ॥ २४ ॥

पारा शुद्ध झाला म्हणजे अमृताप्रमाणें तो गुणदायक होतो. त्यांतील दोष नाहींसे झाले म्हणजे वार्धक्य आणि मृत्यु ह्यांचा तो परिहार करतो. शुद्ध पारा प्रत्यक्ष अमृतच आहे हें जरी खरें, तरी अशुद्ध पारा म्हणजे प्रत्यक्ष जहर आहे, म्हणून रसवैद्यानें हुषार माणसें मदतीला घेऊन, आणि सर्व सामुग्री जुळवून पाऱ्याची शुद्धि साध्य करून घ्यावी. (२४)

सर्वोपस्करमादाय रसकर्म समाचरेत्।
रसो ग्राह्यः शुभे काले पलानां शतमात्रकम् ॥ २५ ॥
पञ्चाशद्वा तदर्धं वा दश पञ्चैकमेव वा।
पलादूने न कर्तव्यो रसे संस्कार उत्तमः ॥ २६ ॥

सुमुहूर्त पाहून १०० पळें म्हणजे चारशें तोळे पारा घ्यावा. (अनुकूल नसल्यास) २०० तोळे, १०० तोळे, अगर ४० तोळे, नाहींतर २० तोळे, निदान ४ तोळे तरी घ्यावा; मात्र ४ तोळ्यांपेक्षां कमी पारा घेऊन त्यावर शुद्धिक्रिया करूं नये. कारण शुद्धिक्रियेला प्रयास फार आणि (कमी पारा घेतल्यास श्रम होऊन) त्यापासून शुद्ध असा पारा फार थोडा हातीं लागेल. २६

बहुप्रयाससाध्यत्वात्फलं स्वल्पं यतो भवेत्।
संपूज्य श्रीगुरूं कन्यां बटुकं च गणाधिपम् ॥ २७ ॥
योगिनीं क्षेत्रपालांश्च चतुर्धा बलिपूर्वकम्।
ततस्तु निभृते स्थाने सुमुहूर्ते विधोर्बले ॥ २८ ॥

शुद्धिक्रियेला आरंभ करण्यापूर्वी श्रीगणाधीश, आपला गुरु, दुर्गादेवी आणि बटुक भैरव यांची पूजा करावी, व योगिनी क्षेत्रपाल यांचीहि त्यांना चार प्रकारचा बलि अर्पण करून पूजा करावी; आणि मग रसक्रियेला योग्य अशा निवान्त जागीं, सुमुहूर्तावर व चंद्रबल पाहून, शुभतिथि, शुभनक्षत्र अशा शुभदिवशीं पाऱ्याची शुद्धि करण्याला सुरवात करावी. (२८)

सुदिने शुभनक्षत्रे रसशोधनमाचरेत् ।
अघोरेण च मंत्रेण रसं प्रक्षाल्य पूजयेत् ।
स्वेदनादिमुखान् पश्चात्संस्कारान् सम्यगाचरेत् ॥२९॥
'अघोरेभ्योऽथ घोरेभ्य' इत्यादि वैदिको मन्त्रः ॥
खल्वो लोहमयः श्रेष्ठस्तस्माच्छ्रेष्ठस्तु सारजः ।
कान्तलोहभवस्तस्मात्, मर्दकश्च तथाविधः ॥३०॥
अभावे लोहखल्वस्य स्निग्धपाषाणजः शुभः ।
तादृशस्वच्छसुश्लक्ष्णमर्दकेन समन्वितः ॥३१॥

प्रथम "अघोरेभ्योऽथ घोरेभ्यः" हा मंत्र म्हणत असतांना पारा स्वच्छ धुवावा व त्याची पूजा करावी आणि नंतर त्याला स्वेदन, मर्दन वगैरे जे संस्कार करावयाचे आहेत ते व्यवस्थित रीतीनें करावे. (२९)

'अघोरेभ्यः' हा वैदिकमंत्र तैत्तिरीय संहितेंत आहे.

पारा शुद्ध करण्याकरतां एक खल व बत्ता पैदा करावा. ह्या कामाकरितां लोखंडाचा खल उत्तम, पोलादाचा त्याच्यापेक्षां उत्तम आणि कान्तलोहाचा तर सर्वांत उत्कृष्ट; ज्या प्रकारचा खल, त्याच प्रकारचा बत्ता असावा. लोखंडाचा खलबत्ता न मिळाल्यास, स्वच्छ व तकतकीत दगडाचा खल करावा, आणि त्याला बत्ता देखील तसाच स्वच्छ आणि घोटीव असा घ्यावा. (३१)

अथ रससंस्काराः ।
अष्टादशैव संस्कारा ऊनविंशतिकाः क्वचित् ।
संप्रोक्ता रसराजस्य वसुसंख्याः क्वचिन्मताः ॥ ३२ ॥
यथा—स्यात्स्वेदनं तदनु मर्दनमूर्च्छने च
स्यादुत्थितिः पतनरोधनियामनानि ।
संदीपनं गगनभक्षणमानमत्र
संचारणं तदनु गर्भगता द्रुतिश्च ॥ ३३ ॥
बाह्या द्रुतिः सूतकजारणा स्याद्रागस्तथा सारणकर्म पश्चात् ।
संक्रामणं वेधविधिः शरीरयोगस्तथाऽष्टादशधाऽत्र कर्म ॥३४॥
रसपद्धत्याम्—
स्वेदो मर्दनमूर्च्छनोत्थिति ततः पातोऽपि भेदान्वितो
रोधः संयमनं प्रदीपनामिति स्पष्टाऽष्टधा संस्कृतिः ।

अस्याः सर्वरसोपयोगिकतया त्वन्या न विन्यस्यते
ग्रन्थेऽस्मिन् प्रकृतोपयोगविरहाद्विस्तारभीत्याऽथवा ॥ ३५ ॥
वाग्भटोऽपि—
इत्यष्टौ सूतसंस्काराः समा द्रव्ये रसायने ।
शेषा द्रव्योपयोगित्वान्न ते वैद्योपयोगिनः ॥३६॥
अथोनाविंशतिकर्माणि यथा—स्वेदनमर्दनमूर्च्छनोत्थापनपातन-बोधननियमनसंदीपनानुवासनगगनादिग्रासप्रमाणचारणगर्भद्रुति--बाह्यद्रुति-योगजारणरञ्जनसारणक्रामणवेधनभक्षणाख्या ऊनविंशति-संस्काराः सूतसिद्धिदा भवन्ति; दीपनान्ता अष्टौ संस्कारा वा देहसिद्धिदा भवन्ति ॥

पाऱ्याला करावयाचे संस्कार अठरा आहेत. कोणी कोणी म्हणतात कीं संस्कार एकोणीस आहेत; आणि आठच संस्कार पाऱ्याला करावे असेंहि कांहींचें मत आहे. (३२)

अठरा संस्कार येणेंप्रमाणें:—स्वेदन, मर्दन, मूर्च्छन, उत्थापन, पातन, बोधन, नियमन, संदीपन, गगनभक्षण, संचारण, गर्भद्रुति, बाह्यद्रुति, जारण, रंजन, सारण, क्रामण, वेधन आणि शरीरयोग.(३४).

रसपद्धतिग्रंथांत म्हटलें आहे कीं—

स्वेदन, मर्दन, मूर्च्छन, उत्थापन, पातन, रोधन, संयमन आणि प्रदीपन इतके आठ प्रकारचे संस्कार स्पष्ट निरनिराळे दिसतात; हे आठ संस्कार कोणत्याहि रसाला (म्हणजे मुख्य धातूला) केले म्हणजे काम भागतें, म्हणून ह्या (रसपद्धति) ग्रंथांत बाकीचे संस्कार विस्तारभयास्तव दिले नाहींत किंवा त्यांचा फारसा उपयोगहि नाहीं. (३५)

वाग्भटाचेंसुद्धां असें मत आहे कीं, वर जे पाऱ्याचे आठ संस्कार सांगितले ते रसायनक्रियेंत पाऱ्याला आणि इतर द्रव्यांनां सारखेच द्यावयाचे; बाकीच्या संस्कारांचा इतर द्रव्यांना उपयोग आहे. (पाऱ्याला नाहीं म्हणून) रसवैद्याला त्यांची जरूर नाहीं.(३६)

आतां १९ संस्कार कोणतें ते सांगतोः—

स्वेदन, मर्दन, मूर्च्छन, उत्थापन, पातन, बोधन, नियमन, संदीपन अनुवासन गगनग्रास, प्रमाणचरण, गर्भद्रुति, बाह्यद्रुतियोग,

जारण, रञ्जन, सारण, क्रामण, वेधन आणि भक्षण हे एकोणिस संस्कार केले असतां पाऱ्यामुळें प्राप्त होणारी सिद्धि मिळते; आणि संदीपनापर्यंतचें आठ संस्कार शरीराला केले तर शरीरसुद्धां आयुरारोग्य संपन्न होतें.

अथ तेषु स्वेदनाविधिः।—

नानाधान्यैर्यथाप्राप्तैस्तुषवर्जैर्जलान्वितैः।
मृद्भाण्डं पूरितं रक्षेद्यावदम्लत्वमाप्नुयात् ॥ ३७ ॥
तन्मध्ये घनवाङ्मुण्डीविष्णुक्रान्तापुनर्नवाः।
मीनाक्षी चैव सर्पाक्षी सहदेवी शतावरी ॥ ३८ ॥
त्रिफला गिरिकर्णी च हंसपादी च चित्रकः।
संमूलकाण्डं पिष्ट्वा तु यथालाभं विनिक्षिपेत् ॥ ३९ ॥
पूर्वाम्लभाण्डमध्ये तु धान्याम्लकमिदं भवेत्।
स्वेदनादिषु सर्वत्र रसराजस्य योजयेत्।
अत्यम्लमारनालं वा तदभावे प्रयोजयेत् ॥ ४० ॥

घनो मुस्ता, वाक् ब्राह्मी, केचित् 'तन्मध्ये भङ्गुरामुण्डी' इति पठन्ति, मुण्डी प्रसिद्धा, विष्णुक्रान्ता श्वेतपुष्पा अपराजिता, पुनर्नवा गन्धपूर्णेति भाषा, मत्स्याक्षी मीनाक्षी 'मछेछी' इति भाषा (हुनगुंदा इत्यपि,) सर्पाक्षी सर्पनेत्रोपमा 'चुर्ची' इति भाषा, सहदेवी प्रसिद्धा, शतावरी शतावरीति भाषा, त्रिफला प्रसिद्धा गिरिकर्णी नीलपुष्पा अपराजितैव, हंसपादी हंसचरणा, चित्रकः प्रसिद्धः। समूलकाण्डं समूलशाखं, यथालाभं अर्धसंख्याधिकमिति गुरुसङ्केतः ॥

स्वेदनविधि

जीं जीं धान्यें मिळतील तितकीं घेऊन त्यांचीं तुसें, कोंडा वगैरे काढून टाकून तीं साफ करावीं आणि एका गाडग्यांत ठेवून त्यांत पाणी घालून भिजत ठेवावीं. पाण्यानें मडकें तोंडोतोंड भरावें. म्हणजे एक दोन दिवसांनीं तें धान्य आंबून पाण्याची आंबिल बनते. मग त्यांत नागरमोथे, ब्राम्ही, गोखरमुंडी, विष्णुक्रांत, पुनर्नवा, मीनाक्षी, सापसंद, सहदेवी, शतावरी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, गिरिकर्णी —हिला नीलपुष्पी किंवा अपराजिता असेंहि नांव आहे. हंसपादी

व चित्रक ह्यांपैकीं जितक्या वनस्पति मिळतील तितक्या मुळासकट आणून त्या ठेंचून बारीक करून त्या अंबलेल्या पाण्यांत टाकाव्या, म्हणजे **धान्य'म्ल** तयार झालें. जेथें पाऱ्याचें स्वेदन सांगितलें आहे, तेथें ह्या धान्याम्लाचा उपयोग करावा आणि धान्याम्ल करण्याचें न जुळल्यास अतिशय आंबट असें **आरनाल** तयार करून त्यांत स्वेदनक्रिया करावी. (४०)

नागरमोथे ह्याला मुळसंस्कृतांत ' घन ' शब्द आहे. ब्राम्ही-बद्दल मुळांत " वाक् असा शब्द आहे. पुनर्नवा म्हणजे घेटोळी, मीनाक्षी म्हणजे चुका (हुनगुंदा) सर्पाक्षी म्हणजे सापसंद ह्याप्रमाणें वनस्पतींचीं नांवें आहेत. जितक्या वनस्पति मिळतील तितक्या आणाव्या असें वर लिहिलें आहे त्याचा अर्थ असा कीं, त्यापैकीं निदान अर्ध्या अधिक तरी आपल्या पाहिजेत, असें आमच्या गुरुंचें मत आहे.

त्र्यूषणं लवणं राजी लशुनं त्रिफलाऽऽर्द्रकम् ।
महाबला नागबला मेघनादः पुनर्नवा ॥ ४१ ॥
चित्रको मेषशृङ्गी च नवसारः समं समम् ।
रसस्य षोडशांशेन सर्वं युञ्ज्यात् पृथक् पृथक् ॥ ४२ ॥
एतच्चूर्णं समस्तं वा पूर्वाम्लेनैव पेशयेत् ।
प्रलिम्पेत्तेन कल्केन वस्त्रं चाङ्गुलिमात्रकम् ॥ ४३ ॥
तन्मध्ये निक्षिपेत्सूतं बध्वा तात्त्रादिनं पचेत् ।
दोलायन्त्रेऽम्लसंयुक्ते जायते स्वेदितो रसः ॥ ४४ ॥

मेघनादस्तण्डुलीयभेदः पत्रशाकविशेषः 'चवलाई' इति भाषा, शृङ्गी मेषशृङ्गी तदलाभे कर्कटशृंगी ग्राह्या, नवसारो नव-सागरः क्षारविशेषः

नंतर सुंठ, मिरें, पिंपळीं, सैंधव, राजी* (काळी मोहरी), लसूण, त्रिफळा, आलें, महाबल,* नागबळा तांदुळजा, पुनर्नवा, मेढाशिंगी, चित्रक आणि नवसार असे जिन्नस समभाग घ्यावे. प्रत्येक

× मूळ ग्रंथकार विष्णुक्रांत आणि अदराजिता ह्या एकच आहेत असें म्हणतो. कोणी हंसपादीला राजहंस असें म्हणतात, कोणी लाजाळू असा अर्थ करतात.

जिन्नस पाऱ्याच्या सोळाव्या हिश्याइतका पृथक घ्यावा. मग सर्व एकदम खलांत टाकून त्यांचा एकत्र खल करावा, किंवा एकेक जिन्नस घेऊन त्याचा खल करून मग त्यांत दुसरा जिन्नस टाकून तो खलावा. खल पूर्वी सांगितलेल्या धान्याम्लाबरोबर करावा, तो इतका कीं, सर्व जिनसांची राबडी बनेल. ती राबडी एका टीचभर लांबीच्या स्वच्छ फडक्यास चोपडावी व त्यांत पारा ठेवून त्याची पोटळी म्हणजे पुरचुंडी बांधावी आणि ती त्या धान्याम्लांत दोलायंत्रानें तीन दिवसपर्यंत उकळावी, म्हणजे पाऱ्याचें स्वेदन झालें. (४४)

" मेघनाद " म्हणून तांदुळज्याची एक जात आहे ती घ्यावी. मेषशृंगी म्हणजे मेढाशिंगी. ती न मिळाल्यास काकडाशिंगी घ्यावी. नवसार म्हणजे नवसागर. हा एक प्रकारचा क्षार आहे.

अथान्यत्सिद्धमतम्।—

त्र्यूषणं लवणासूयौं चित्रकार्द्रकमूलकम्।
पिष्ट्वा सूतो मुहुः स्वेद्यः काञ्जिकेन दिनत्रयम्॥ ४५॥

त्र्यूषणं त्रिकटु, लवणं सैन्धवं, आसुरी राई, चित्रकः प्रसिद्धः आर्द्रकं शृङ्गवेरं, मूलकं श्वेतमूलकः 'मुली' इति भाषा। पिष्ट्वा तत्कल्केन वस्त्रं लिप्त्वेत्यादि पूर्ववत्। मुहुरिति प्रतिदिनं कल्कावृत्तिरित्यर्थः॥

दुसऱ्या एका रससिद्धाचें मत असें आहे कीं—

त्रिकटु, लवण, असुरी, चित्रक, आले, मुळा हे जिन्नस एकत्र कुटावे आणि त्याच्या चोथ्याबरोबर पारा तीन दिवस कांजीमध्यें वारंवार उकळून वाफारावा. (४५)

वरील श्लोकांत लवण म्हणजे सैंधव, आसुरी म्हणजे मोहोरी, मुळा म्हणजे पांढरा मुळा भाजीचा, असा अर्थ आहे. सर्व जिन्नस कुटल्यावर त्यांच्या चोथ्यानें कापड चोपडावें आणि वर (श्लोक ३, ४४ यांत) सांगितल्याप्रमाणें कृति करावी. 'वारंवार' याचा अर्थ असा कीं, रोजच्या रोज नवा चोथा तयार करून कापडाला चोपडावा आणि पुनः पोटळी बांधून स्वेदन करावें.

अथान्यत्सिद्धमतम् ।—

दिनं व्योषवरावन्हिकन्याकल्केषु काञ्जिके ।
रसं चतुर्गुणे वस्त्रे बध्वा दोलाकृतं पचेत् ॥ ४६ ॥

व्योषं त्रिकटु, वरा त्रिफला, वन्हिश्चित्रकः; कन्या 'कुवारी' इति भाषा, तन्मध्यगर्भो ग्राह्यः ॥

अन्यच्च—

रसस्य षोडशांशेन द्रव्यं युञ्ज्यात्पृथक् पृथक् ।
द्रव्येष्वनुक्रमानेषु मतं मानमिदं बुधैः ॥ ४७ ॥
त्रिदिनं स्वेदनाशक्तौ दिनमेकं निरन्तरम् ।
स्वेदयेद्रसराजं तु नातितीक्ष्णेन वन्हिना ॥ ४८ ॥

केचित्तु मर्दनपूर्वकं स्वेदनमिच्छन्ति, ते उपपत्तिज्ञानरहिताः, क्रमविरोधश्च तेषां (मते) दूषणम ॥

आणखी एका सिद्धाचें मत असें कीं:—

त्रिकटु, वरा, वन्हि आणि कन्या यांच्या राबडींत चार पदरी घडी केलेल्या वस्त्रांत पारा बांधून कांजींत दोला-यंत्रानें शिजवावा. (४६ .

या श्लोकांत त्रिकटु म्हणजे सुंठ, मिरे, पिंपळी, वरा म्हणजे त्रिफळा, वन्हि म्ह० चित्रक, आणि कन्या म्ह० कोरफड असा अर्थ आहे. कोरफडीपैकीं मधला गाभा घ्यावा.

आणखी एक मत:—

(स्वेदनाकरितां) जिनस घ्यावयाचे, त्यांपैकीं प्रत्येक जिन्नस पाच्याच्या सोळाव्या हिश्शाइतका घ्यावा, व एकेक जिन्नस घेऊन खल करावा. जिनस कोणता तें सांगितलें नसलें तरी विद्वानांनीं त्यांचें प्रमाण हें असें ठरविलें आहे. तीन दिवस उकळण्याची अनुकूलता नसेल तर एक सबंध दिवस खंड न पडतां पारा उकळावा. पण अग्नि फार कडक देऊ नये. (४८).

आतां कांहींचें मत असें आहे कीं, अगोदर मर्दन—क्रिया करून मग स्वेदन—क्रिया करावी; पण असें जे कोणी म्हणतात त्यांना ह्या संस्कारांचें सयुक्तिक कारणच समजलें नाहीं असें म्हटलें

पाहिजे. त्याशिवाय 'स्वेदन, मर्दन इ॰ जो पूर्वापर क्रम ठरलेला आहे त्याला विरोध येतो, हा आणखी एक आक्षेप त्यांच्या मतावर येतो. (म्हणून मर्दनसंस्कार स्वेदनापूर्वी करणें बरोबर नाहीं).

---

२ अथ मर्दनम् ।

भिषग्विमर्दयेच्चूर्णौर्मिलित्वा षोडशांशतः ।
सूतस्य गालितैर्वस्त्रैर्वक्ष्यमाणद्रवादिभिः ॥ ४९ ॥
गृहधूमेष्टिकाचूर्णं तथा दधिगुडान्वितम् ।
लवणासुरिकायुक्तं क्षिप्त्वा सूतं विमर्दयेत् ॥ ५० ॥
जीर्णाभ्रकं तथा जीर्णं बीजं सूतस्तथैव च ।
गृह्णाति निर्मलो रागान् ग्रासे ग्रासे विमर्दितः ॥ ५१ ॥

अथान्यत्सिद्धमतम् ।—

रक्तेष्टिकानिशाधूमसारोर्णाभस्मचूर्णकैः ।
जम्बीरद्रवसंयुक्तैर्मुहुर्मर्द्यो दिनत्रयम् ॥ ५२ ॥
दिनैकं वापि सूतः स्यान्मर्दनान्निर्मलः परम् ।
ऊर्ध्वपातनयत्नेण गृह्णीयाच्च पुनः पुनः ॥ ५३ ॥
पट्टसारणतो वाऽपि क्षालनादारनालतः ।

२ मर्दन–संस्कार सांगतों.

घरांतील घेरोसा व विटकरीचा चुरा वस्त्रगाळ करावा; रसवैद्यानें तो वस्त्रगाळ चुरा व पुढें लिहिलेले पातळ आणि दुसरे पदार्थ पाऱ्याच्या सोळाव्या हिश्शाइतके घ्यावे. विटकरीचें चूर्ण, दहीं, गुळ, सैंधव आणि मोहोऱ्या हे जिन्नस पाऱ्याशीं एकत्र करून सपाटून खल करावा. अशा तऱ्हेनें खल चालविला म्हणजे पाऱ्यांत जें अभ्रक जिरविलें असेल किंवा (एखाद्या धातूचें) बीज जिरविलें असेल त्याच्या प्रत्येक घासागणिक त्या बीजाला अनुरूप असा निर्भेळ रंग खल केल्यानें पाऱ्याला चढतो. (५१).

आतां आणखी एका सिद्धाचें मत लिहितों:—

लाल विटकर, घेरोसा व लोंकरीची राख, यांचें एकत्र चूर्ण करून त्यांत कागदी लिंबाचा रस वरचेवर घालून तीन असा खल

करावा. निदान एक दिवस तरी खल करावा. म्हणजे खल केल्यानें पारा अगदीं स्वच्छ होईल. मग ऊर्ध्वपातन यंत्रानें तो पारा बाष्परूप करून पुनः थंड करावा किंवा फडक्यांतून वारंवार गाळून आरनालानें स्वच्छ धुवून घ्यावा. (५३).

अथ मूर्च्छनम् ।

गृहकन्या मलं हन्ति त्रिफला वन्हिनाशिनी ॥ ५४ ॥
चित्रमूलं विषं हन्ति तस्मादेभिः प्रयत्नतः ।
मिश्रितं मर्दयेत्सूतं सप्तवाराणि मूर्च्छयेत् ॥ ५५ ॥
इत्थं संमूर्च्छितः सूतो दोषशून्यः प्रजायते ।
सप्तवाराणि मूर्च्छयेदिति धातुवादे, न रसेषु ॥ ५६ ॥

३ आतां मूर्च्छन सांगतों.

कोरफडीनें पाऱ्याचा मळ जातो. त्रिफळ्यानें त्यांतील कडकी नाहींशी होते आणि चित्रकानें त्यांतला विषार मरतो. म्हणून कोरफड, त्रिफळा व चित्रकमूळ ह्या प्रत्येकाचें चूर्ण करून तें एकत्र करून त्याच्याबरोबर पाऱ्याचा खल हरप्रयत्नानें सात दिवस करावा. म्हणजे पारा मूर्च्छित होतो आणि मूर्च्छित झाला म्हणजे दोषरहित होतो.

सात दिवस खल करावयाचा तो किमया करणें असेल तर करावा. नुसतें रसायन बनवावयाचें असेल तर सात दिवस खल करण्याची आवश्यकता नाहीं. (५६).

अथान्यन्मतम् ।—

राजवृक्षस्य मूलेन मर्दयेत्सह कन्यया ।
मलदोषापनुत्त्यर्थं मर्दनोत्थापने शुभे ॥ ५७ ॥
कृष्णधत्तूरकद्रावैश्चांचल्यविनिवृत्तये ।
मर्दनोत्थापने कुर्यात् सूतराजस्य चासकृत् ॥ ५८ ॥
त्रिफलाकन्यकातोयैर्विषदोषोपशान्तये ।
व्योषेण गिरिदोषं तु कन्यातोयेन यत्नतः ॥ ५९ ॥
चित्रकस्य च चूर्णेन सकन्येनाग्निनाशनम् ।
आरनालेन चोष्णेन प्रतिदोषं विशोधयेत् ॥ ६ ॥

एवं संशोधितः सूतः सप्तदोषविवर्जितः ।
जायते कार्यकर्ता च ह्यन्यथा कार्यनाशकः ॥ ६१ ॥

अथ रसस्य कञ्चुकहरणम्

कुमारिकाचित्रकरक्तपर्षपैः
कृतैः कषायैर्बृहतीविमिश्रितैः ।
फलत्रिकेणापि विमर्दितो रसो
दिनत्रयं सप्तमलैर्विमुच्यते । ६२ ॥

इति युगपत्सप्तमलनाशनम् ॥

दुसऱ्या एका ग्रंथकाराचें मत असें आहे कीं:—

बाहव्याचें मूळ व कोरफडीचा बलक ह्यांच्याबरोबर (पाऱ्याचा) खल करून उत्तम प्रकारचें मर्दन व उत्थापन करावें, म्हणजे त्यांतील मळ दूर होतो. मग त्याचें चंचलत्व घालविण्याकरितां त्याला काळ्या धोत्र्याच्या रसांत खलून पुनः पुनः मर्दन व उत्थापन करावें; विषदोष काढून टाकण्याकरितां त्रिफळाच्या काढ्यांत खल करावा; गिरिदोष नाहींसा करण्याकरितां सुंठ, मिरे, पिंपळी यांच्या काढ्यांत खलावा. त्यानंतर कोरफडीचे रसांत व शेवटीं चित्रकचूर्ण आणि कोरफडीचा रस एकत्र करून त्यांत खल करावा, म्हणजे त्यांतील कडकी निघून जाते. परंतु प्रत्येक दोष घालविण्याचे वेळीं आरनालाच्या कढत पाण्याने पारा धुवून टाकीत जावा. याप्रमाणें पाऱ्याचें शोधन केलें असतां त्यांतील सातहि दोष जाऊन तो इष्टकार्य उत्तम रीतीनें पार पाडतो. पण शोधन न केल्यास इच्छित कार्याचा विघात मात्र होतो. ६१)

किंञ्चुक म्हणजे दोषांचें आवरण
पाऱ्यापासून काढून टाकण्याचा प्रकार.

कोरफड, चित्रक, लालमोहरी, ह्यांचा निरनिराळा काढा करून त्या प्रत्येकांत डोरलीचा व रिंगणीचा काढा मिसळावा, आणि त्यांत पारा खलावा; व मग त्रिफळ्याचे काढ्यांत त्याचा खल करावा. याप्रमाणें तीन दिवस केल्यास पाऱ्यांतील सप्तदोष एकदम नष्ट होतात. (६२)

४ अथोत्थापनम् ।❀

तत उत्थापयेत्सूतमातपे निम्बुकार्दितम् ।
उत्थापनावशिष्टं तु चूर्णं पातनयंत्रके ॥ ६३ ॥
धृत्वाऽग्नावूर्ध्वभाण्डाप्तं संगृहेत्पारदं भिषक् ॥ ६४ ॥

वाग्भटोऽपि—

संशुद्धोऽस्माद्विरेकात्तु रसः पाल्यस्ततः परम् ॥
उत्थितः काञ्जिकक्वाथैः क्षालनीयस्ततः परम् ॥ ६५ ॥

रसरत्नाकरस्तूत्थापनक्लेशमसहमानः सुगमोपायमाहः यथा—

प्रक्षाल्य काञ्जिकैः साम्लैस्तमादाय विमर्दयेत् ।
प्रक्षाल्य काञ्जिकेनैव तमादाय विमूर्च्छयेत् ॥ ६५ ॥

इति सुगमप्रकारः ॥

अन्यत्रापि ।—

जलैः सोष्णारनालैर्वा क्षालनादुत्थितो भवेत् ।
अथवा पातनायन्त्रे पातनादुत्थितो भवेत् ॥ ६७ ॥ इति

४ उत्थापनक्रिया.

याप्रमाणें पाऱ्यांतील सप्तदोष नाहींसे झाल्यावर तो कागदी लिंबाच्या रसांत खलावा, आणि उन्हांत ठेवावा म्हणजे उन्हांत तापून पाऱ्याचें उत्थापन होतें. (खललेल्या मिश्रणांतून पारा निराळा होणें ह्याला "उत्थापन" म्हणतात.) उत्थापनानंतर मिश्रणांत कांहीं तरी पारा शिल्लक राहतो. तो काढून घेण्याकरितां तें मिश्रण एका मडक्यांत ठेवून त्याचे तोंडावर दुसरें मडकें पालथें बसवून संधिलेप करावा. म्हणजे पातनयंत्र तयार झालें. पातनयंत्रांत मिश्रण ठेवलें असेल त्या मडक्याखालीं जाळ लावावा, म्हणजे त्यांतील पारा वरच्या मडक्याला आंतील बाजूनें चिकटून बसतो, तो वैद्यानें काढून घ्यावा. (६४)

वाग्भट म्हणतात—

याप्रमाणें एकदां दोनदां क्रिया करून पारा शुद्ध झाला झाला म्हणजे (बाकीचा पारा) पातनयंत्रानें निराळा करावा व कांजीनें स्वच्छ धुवून घ्यावा. (६५)

❀ पुढें श्लोक पहा. ह्याला Separation म्हणतात. ही क्रिया उन्हाच्या तापानें होते.

उत्थापनक्रियेला कष्ट फार पडतात म्हणून रसरत्नाकारांत एक सोपी युक्ति सांगितली आहे, ती अशी कीं—

*आम्ल मिसळलेल्या कांजीनें पारा धुवून (तसल्याच कांजींत) त्याचा खल करावा, आणि पुनः कांजीनेंच धुवून त्याचें मूर्च्छन करावें. ही सोपी युक्ति सांगितली. (६६)

दुसऱ्या एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं,

कढत पाण्यानें किंवा कढत आरनालानें पारा धुतला असतां तो उत्थित होतो किंवा पातनयंत्रानें निराळा काढून घेतला असतांही उत्थित होतो

५ अथ पातनम्।

तच्च त्रिविधं—ऊर्ध्वाधस्तिर्यग्भेदात्; तत्रोर्ध्वपातनं यथा—

भागास्त्रयो रसस्याऽर्कचूर्णस्यैकोऽथ निम्बुकैः ॥ ६८ ॥

एतत्संमर्दयेत्तावद्यावदायाति पिण्डताम्।

तत्पिण्डं तलभाण्डस्थमूर्ध्वभाण्डे जलं क्षिपेत् ॥ ६९ ॥

कृत्वाऽऽलवालं केनापि दत्त्वा चार्द्रं हि स्रोतकम्।

संमुद्र्याग्निमधस्तस्य चतुर्यामं प्रबोधयेत् ॥ ७० ॥

युक्त्योर्ध्वभाण्डसंलग्नं गृह्णीयात्पारदं ततः।

ऊर्ध्वपातनामित्युक्तं भिषग्भिः सूतशोधने ॥ ७१ ॥

५ पातनक्रिया.

पातनक्रिया तीन प्रकारची आहे. एक उर्ध्वपातन, दुसरें अधःपातन, आणि तिर्यक् पातन. पहिल्यानें उर्ध्वपातन सांगतों. (६८--७३)

पारा तीन भाग, उत्तम तांब्याचा चुरा एक: भाग, आणि लिंबाचा रस असें एकत्र खलावें. तें इतका वेळ कीं, पाऱ्याची गोळी बनेल. गोळी बनल्यानंतर खल पुरे करून ती गोळी एका (मातीचे) भांड्यांत ठेवावी, व त्या भांड्यांच्या तोंडावर दुसरें एक भांडें पालथें घट्ट बसवून वरच्या पालथ्या भांड्यांवर थंड पाणी

---

*आम्लपदार्थाचा वर्ग आहे, त्यांतील कोणताही आम्लरस.

मारीत रहावें किंवा त्या भांड्यांच्या बुडावर आढें करून त्यांत थंड पाणी ओतून ठेवावें अथवा फडकें थंड पाण्यांत भिजवून त्याची घडी करून ती वरच्या बुडावर ठेवावी. × मग दोन्ही भांड्यांच्या सांध्याच्या ठिकाणीं पक्का लेप करून खालच्या मडक्याखालीं चार प्रहरपर्यंत जाळ लावावा आणि (आंच थांबून भट्टी) थंड झाल्यावर वरच्या भांड्याच्या बुडाला आंतून चिकटलेला पारा हलकेच काढून घ्यावा. ह्या क्रियेला वैद्य उर्ध्वपातन म्हणतात, व पाऱ्याचें शोधन या यंत्रानें करतात. (७१)

सस्तभाण्डरन्ध्रे तु ह्यन्याद्विशति भाण्डकम् ।
तथा संधिर्द्वयोः कार्यः पातनात्रययन्त्रके ॥ ७२ ॥
यन्त्रप्रमाणं वदनादुरोर्ज्ञेयं विचक्षणैः ।
रसस्य मानानियमात्कथितुं नैव शक्यते ॥ ७३ ॥
अर्कचूर्णस्य ताम्ररजसः ॥

या यंत्रांची रचना अशी करावयाची कीं,

ज्या (मडक्यांत किंवा) भांड्यांत पारा ठेवावयाचा असतो त्या भांड्याचें तोंड वरील उपड्या भांड्याच्या तोंडाच्या आंत चिकार बसलें पाहिजे आणि त्यांच्या सांध्यावर संधिलेप दिला पाहिजे. तिन्ही प्रकारच्या पातनयंत्राच्या रचनेचें तत्व एकच. किती पाऱ्याला केवढें यंत्र पाहिजे तें गुरूकडून समजावून घ्यावें. कारण पारा किती घ्यावयाचा त्याचा नियम नसल्यानें यंत्र किती मोठें करावें तें सांगतां येणार नाहीं. (७३)

तांब्याला मूळ पुस्तकांत " अर्क " असें नांव दिलें आहे.

अथान्यन्मतम् ।—
मयूरग्रीवताप्याभ्यां नष्टापिष्टीकृतस्य च ।
यन्त्रे डमरुके कुर्याद्रसेन्द्रस्योर्ध्वपातनम् ॥ ७४ ॥
मयूरग्रीवं तुत्थकं, ताप्यं स्वर्णमाक्षिकं, नष्टापिष्टीकृतस्य 'कुमारिकाद्रवयोगेन' इति शेषः ॥

× ही घडी ओली राहील असें केलें पाहिजे. ताप्य म्हणजे तापी नदींत सांपडणारी माक्षिक धातु. पिष्टि म्हणजे लोण्याप्रमाणें मऊ करणें.

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं,

मोरचूद व ताप्य म्हणजे सुवर्ण माक्षिक ह्यांची पूड (पाऱ्या-बरोबर) कोरफडीच्या रसांत खलून सर्वांचा एकजीव करावा आणि डमरुयंत्रांत पाऱ्याचें–ऊर्ध्व पातन करावें. ऊर्ध्वपातनयंत्रालाच डमरु-यंत्र म्हटलें आहे.

अथाधःपातनम् ।

त्रिफलाशिग्रुचित्रैश्च लवणासुरिकायुतैः ।
नष्टपिष्टं रसं कृत्वा लेपयेदूर्ध्वभाण्डके ॥ ७५ ॥
ऊर्ध्वभाण्डोदरं लिप्त्वा ह्यधोभाण्डे जलं क्षिपेत् ।
सन्धिलेपं द्वयोः कृत्वा तद्यन्त्रं भुवि पूरयेत् ॥ ७६ ॥
उपरिष्टात्पुटे दत्ते जले पतति पारदः ।
अधःपातनमित्युक्तं सिद्धाद्यैः सूतकर्माणि ॥ ७७ ॥

त्रिफलेति व्याख्याता । अधोभाण्डे जलं क्षिपेदिति वचनात्सं-पुटपात्रमध्ये जलं प्राप्यते, तच्च संप्रदायविरुद्धं, अतः संपुर्णाम्बुनि पात्रान्तरे भूमौ निखातिते तस्योपरि संपुटं दद्यात्, पश्चात्तस्य संपु-टस्याधःपात्रस्य च संधिरोधः कार्य इति तात्पर्यतो ज्ञेयम् । उपरिष्टा-त्पुटे दत्ते इति पुटं चात्र कौक्कुटं यथायथरसमात्रापेक्षया वा, विंश-तिवनोत्पलैरधिकैर्वा निवातस्थले शनैः शनैर्देयमिति गुरुसंप्रदायः॥

अधःपातन क्रिया.

त्रिफळा, शेवगा, चित्राक, सैंधव व मोहरी ह्या प्रत्येक जिन-सेची बारीक पूड करून त्याचा पाऱ्याशीं खलून एकजीव करावा आणि ती राबडी डमरुयंत्रांतील उपडचा भांडचाच्या बुडाला आंतील बाजूनें चोपडावी आणि खालच्या भांड्यांत पाणी ओतून ठेवावें. मग सांध्याच्या ठिकाणीं संधिलेप करून सर्व यंत्र जमीनींत पुरावें; आणि वर अग्निपुट द्यावें, म्हणजे वरच्या भांडचांतील पारा खालच्या भांडचांतिल पाण्यांत पडतो. याप्रमाणें अधःपातन यंत्राची रचना रससिद्धांनीं पारदशोधनाकरतां सांगितलेली आहे.

वरील वर्णनांत खालच्या भांड्यांत पाणी ओतावें असें सांगि-तलें आहे; पण असें कारणें नेहमींच्या पद्धतीला सोडून आहे. म्हणून

करावें काय कीं, दुसऱ्या एका भाड्यांत पाणी तोंडोतोंड भरून तें भांडें जमीनींत खळगा करून त्यांत ठेवावें व भांड्यांवर (पाण्याला चिकटून) डमरुयंत्राचें खालचें सुंपुट बजावून संधिलेप करावा आणि खळगा मातीनें भरावा. भांड्याच्यावर पुट द्यावयाचें तें कुक्कुट पुट द्यावें. कुक्कुट पुट म्हणजे पारा घेतला असेल त्या मानानें वीस किंवा त्यापेक्षां जास्त रानशेणीची आंच एखाद्या निवांत जागीं अग्नि हळू हळू जळत राहील अशी देणें. ही पद्धति आमच्या गुरूनीं सांगितली आहे.

अथान्यन्मतम् ।—

नवनीताभ्रकं सूतं घृष्ट्वा जम्भाम्भसा दिनम् ।
वानरीशिग्रुचित्रैश्च लवणासुरिकायुतैः ॥ ७८ ॥
,नष्टापिष्टं रसं कृत्वा ' इत्यादि पूर्ववत् ॥

कित्येकांचें असें मत आहे कीं,

नवनीताभ्रक आणि पारा ह्यांचा खल ईडालिंबाच्या रसांत एक दिवस करून वानरी (कुहिली), शेवगा, चित्रक, सैंधव आणि मोहरी यांच्या चूर्णाशीं अगदीं एकजीव करावा. (आणि वरीलप्रमाणें कृति करावी. (७८)

अथ तिर्यक्पातनम् ।
घटे रसं विनिक्षिप्य सजलं घटमन्यकम् ।
तिर्यङ्मुखं द्वयोः कृत्वा संमुखं रोधयेत्सुधीः ॥ ७९ ॥
चुल्ल्यां तथैव संस्थाप्य यत्नतस्तु ततो भिषक् ।
रसाधो ज्वालयेदाग्निं यावत्सूतो जलं विशेत् ॥ ८० ॥

तिर्यक् पातन.

पाऱ्याचें मिश्रण एका मडक्यांत ठेऊन दुसऱ्या मडक्यांत पाणी घालावें व त्यांचीं तोंडें बंद करून दोन्ही घट समोरासमोर शेजारीं थोड्या अंतरानें ठेवावे (व पारद मिश्रण ठेवलेल्या मडक्याच्या झांकणांत एक नळी बसवून ती पाण्याच्या मडक्यांत सोडावी.) आणि पाऱ्याच्या मडक्याखालीं जाळ लावावा तो इतका कीं, त्यां-

तील पाऱ्याची वाफ होऊन ती नळीतून दुसऱ्या मडक्यांत ठेवलेल्या पाण्यांत उतरेल. ह्याला तिर्यक्पातनयंत्र असें नांव नागार्जुन इत्यादि रसासिद्धांनीं दिलें आहे.

तिर्यक्पातनामित्युक्तं सिद्धैर्नागार्जुनादीभिः ।
मिश्रितौ चेद्रसे नागवङ्गौ विक्रयहेतुना ॥ ८१ ॥
ताभ्यां स्यात् कृत्रिमो दोषस्तन्मुक्तिः पातनत्रयात् ।
एवं सुसंस्कृतः सूतः पातनावधि यत्नतः ॥ ८२ ॥
सर्वदोषविनिर्मुक्तो जायते नात्र संशयः ॥ ८३ ॥

बाजारी पाऱ्यांत शिसें, कथील वगैरे मिसळ असली म्हणजे पारा दूषित होतो. तो दोष तिहींतून कोणत्याही प्रकारानें पातनक्रिया केल्यानें जातो. याप्रमाणें पातनपर्यंत जे पांच संस्कार पाऱ्याला हरप्रयत्नानें केले म्हणजे पारा शुद्ध होऊन त्यांत असलेले एकंदर दोष दूर होतात, असें खात्रीनें समजावें. (८३)

अत्रावसरे केचित्पुनः स्वेदनमिच्छान्ति; यथा—

रसं चतुर्गुणे वस्त्रे सरसोनशरावके ।
नियन्त्र्य दोलिकायन्त्रे मध्याग्नौ दिवसं पचेत् ॥ ८४ ॥
सव्योषत्रिफलावन्हिकन्याकल्के तुषांम्बुनि ।
दोषशेषापनुत्त्यर्थमिदं स्वेदनमिष्यते ॥ ८५ ॥

कांहींचें असें मत आहे कीं, पातनानंतर पाऱ्याचें पुनः स्वेदन करावें. ते म्हणतातः—

एका स्वच्छ वस्त्राची चार वेळां घडी करावी आणि त्यावर लसणीच्या लुगदीची वाटी करून ठेऊन त्यांत पारा घालून बंद करून त्याची पोटळी बांधावी. मग त्रिकटु, त्रिफळा, चित्रक व कोरकडीचा बलक हे तुषाम्बूंत (आंबिलींत) कालवून त्यांत ती पोटळी दोला यंत्रानें मध्यम अग्नि देऊन एक दिवस उकळावी. अशा रीतीनें राहिले साहिले दोष घालविण्याकरितां पाऱ्याचें स्वेदन करावें. (८५)

अथ बोधनम् ।

एवं कदार्थितः सूतः षण्ढत्वमधिगच्छति ।
मुक्तये क्रियते तस्य बोधनं कथ्यते हि तत् ॥ ८६ ॥

पार्ई

वाग्भटोऽपि—

मर्दनैर्मूर्च्छनैः पातैर्मरणान्तो भवेद्रसः ।
शक्त्युत्कर्षाय बोध्योऽसौ गुरुदर्शितवर्त्मना ॥ ८७ ॥

६ बोधनक्रिया.

येथपर्यंत वर्णन केलेले संस्कार पाऱ्याला केल्यानें तो हलक होऊन निर्वीर्य होतो, म्हणून त्याला चेतना आणण्याकरितां बोधन-क्रियेची योजना केली आहे. (८६)

वाग्भट म्हणतातः—

स्वेदन, मर्दन, पातन येथपर्यंत केलेल्या संस्कारांनीं पारा निर्जीव होतो, म्हणून त्याला शक्ति आणण्याकरितां गुरूंनीं सांगितलेल्या पद्धतीनें त्याचें बोधन केलें पाहिजे. ८७).

यथा—

विश्वामित्रकपाले वा काचकूप्यामथापि वा ।
सृष्ट्यम्बुजं विनिक्षिप्य तत्र तन्मज्जनावधि ॥ ८८ ॥
पूरयेत्त्रिदिनं भूम्यां राजहस्तप्रमाणतः ।
अनेन सूतराजोऽयं षण्ढभावं विमुञ्चति ॥ ८९ ॥

विश्वामित्रकपालं नारिकेलपात्रं; ' सृष्ट्यम्बुजं सैन्धववारि ' इत्येके, अपरे तु ' मूत्रं रजः शुक्रं च ' इत्याहुः । युक्तं तु सृष्ट्यम्बुज-मरुणायाः षोडशवार्षिक्याः स्त्रिय आर्तवम् । राजहस्तः सपादकरः ॥

तीं क्रिया अशीः—

एक नारळाची करवंटी किंवा कांचेची कुपी घेऊन त्यांत ' सृष्ट्यंबुज '* इतकें घालावें कीं, पारा त्यांत बुडून जावा; मग (त्या कुपीस बुच बसवून) एक औरसचौरस सवा हात खळगा खणून त्यांत ती कुपी पुरून ठेवावी व तीन दिवस झाल्यानंतर चौथ्या दिवशीं काढून घ्यावी, म्हणजे पाऱ्याचें षंढत्व जाऊन तो पुनः ताजा तवाना होतो. (८९).

करवंटी ह्याअर्थीं मुळांत " विश्वामित्रकपाल " असा शब्द वापरला आहे " सृष्ट्यंबुज " म्हणजे कोणी म्हणतात कीं, सैंधवाचें

पाणी; व कोणी, मूत्र, शुक्र किंवा स्त्रियांचें रज' असाहि अर्थ करतात. परंतु सृष्ट्यंबुज हें सोळा वर्षांच्या निरोगी तरुणीचें आर्तव होय हा अर्थ स्वाभाविक दिसतो. मुळांत "राजहस्त" असा शब्द आहे त्याचा अर्थ सवा हात.

मतान्तरं सुगमं च—

कदर्थनेनैव नपुंसकत्वमेवं भवेदस्य रसस्य पश्चात् ।
वीर्यप्रकर्षाय तु भूर्जपत्रे स्वेद्यो जले सैन्धवचूर्णगर्भे ॥ ९० ॥

मतान्तरम्—

लवणेनाम्लपिष्टेन हाण्डिकान्तर्गतं रसम् ।
आच्छाद्याथ जलं किंचित् क्षिप्त्वा श्रावेण रोधयेत् ॥ ९१ ॥
ऊर्ध्वं लघुपुटो देयः प्राप्तपुंस्त्वो रसो भवेत् ॥ ९२ ॥

बोधनाचा दुसरा एक प्रकार सोपा आहे तो असाः—

पांच संस्कारांच्या धौशानें पारा निर्वीर्य होऊन अगदीं नरम पडतो. म्हणून त्याला पुनः खूप जोमदार करण्याकरितां कृति करावी ती अशी कीं, पारा भूर्जपत्रांत गुंडाळून पोटळी करावी व तो सैंधव विरविलेल्या पाण्यांत वाफारून काढावी. (९०)

आणखी एक प्रकारः—

आम्लकांजींत मीठ वांटून तें मीठ एका मडक्यांत घालून त्यांत पारा दडपून ठेवावा. मग त्या मिठावर थोडें पाणी शिंपडून मडक्याला घट्ट झांकण(श्राव) बसवून बंद करावें आणि माथ्यावर लघुपुट द्यावें, म्हणजे हंडींतील पारा ताजातवाना होतो. (९२)

मतान्तरम्—

एवं कदर्थितः सूतः षण्डभावं प्रयाति हि ।
बह्वौषधिकषायेण स्वेदितः सबलो भवेत् ॥ ९३ ॥

यथा--

सर्पाक्षीचिञ्चिकावन्ध्याभृङ्गाब्दैः स्वेदितो बली ।
निरस्तषण्ढभावोऽसौ जायते हि रसोत्तमः ॥ ९४ ॥

सर्पाक्षी नागिणी, चिञ्चा आम्लिका, वन्ध्या वांझखवसा, भृङ्गो भृङ्गराजः, अब्दो मुस्ता नागरसंज्ञको ग्राह्यः । एषां रसो ग्राह्यः ॥

आणखी एक प्रकारः--

पातनापर्यंतच्या संस्कारांनीं पाऱ्याचे हाल हाल होतात, त्यामुळें तो नामर्द होतो, म्हणून पुढील औषधींच्या काढ्यांत त्याचें स्वेदन करावें. त्या औषधि अशाः--

सर्पाक्षी (मुंगुसवेल) चिंच, वंन्ध्या म्हणजे वांझ खवसा, भृंग म्हणजे माका, आणि मुस्ता म्हणजे नागरमोथा, ह्यांच्या रसांत किंवा काढ्यांत पाऱ्याचें स्वेदन केलें म्हणजे त्याचा नरमपणा दूर होऊन तो सणसणीत होतो. ९४).

७ अथ नियमनम् ।

सर्पाक्षीचिंचिकावन्ध्याभृङ्गाब्दकनकाम्बुभिः ।
दिनं संस्वेदितः सूतो नियमात् स्थिरतां व्रजेत् ॥ ९५ ॥

मतान्तरम्—

उत्तराशाभवस्थूलरक्तसैन्धवलोष्टकः ।
तद्गर्भे रन्ध्रकं कृत्वा सूतं तत्र विनिक्षिपेत् ॥ ९६ ॥
ततस्तु चणकक्षारं दत्त्वा चोपरि निम्बुजम् ।
रसं प्राक्षिप्य दातत्यं तादृकसैन्धवखण्डकम् ॥ ९७ ॥
गर्तं कृत्वा धरागर्भे दत्त्वा सैन्धवसंपुटम् ।
धूलिमष्टाङ्गलां दत्त्वा कारीषं दिनसप्तकम् ॥ ९८ ॥
वन्हिं प्रज्वाल्य तन्ग्राह्यं क्षालयेत्काञ्जिकेन च ।
अयं नियमनो नाम संस्कारो गादितो बुधैः ॥ ९९ ॥
अभावे चणकक्षारस्यापेयन्नवसागरम् ।
स्वर्जिका वा प्रदातव्या नूनमित्याह भास्करः ॥ १०० ॥

७ वी (सातवी) नियमन क्रिया.

सर्पाक्षी, सापसंद, चिंच, वांझ खवसा, म्हाका, नागरमोथे व धोत्रा ह्यांच्या रसांत किंवा काढ्यांत पाऱ्याचें स्वेदन केलें असतां तो स्थिर होतो.

दुसरा प्रकारः—

उत्तरेकडील देशांत सैंधवाच्या मोठमोठ्या तांबड्या ढेपा सांपडतात. त्यांपैकीं एक मोठी ढेप घेऊन तिला एका लहानसें

भोंक कोरून त्यांत पारा भरावा, आणि त्यावर हरभऱ्याची आंब घालावी. नंतर कागदी लिंबाचा रस घालावा व भोंक सैंधवाच्याच गुडदीनें चांगलें बंद करावें; नंतर एक खाडा खणून त्यांत ती ढेप ठेवावी व तिच्यावर आठ अंगुलें माती राहील अशा रीतीनें तो खाडा बुजवावा आणि वर सात दिवस (एकसारखा) रानशेणींचा अग्नि द्यावा. मग खड्डयांतून पारा काढून घेऊन कांजीनें स्वच्छ धुवावा. ह्या क्रियेला रसवैद्य नियमन असें म्हणतात. भास्कर नांवाच्या रसशास्त्रज्ञाचें मत असें आहे कीं, आंब न मिळेल तर नवसागर किंवा सजीखार तिच्याऐवजीं घेतल्यास चालेल. (१००).

८ अथ संदीपनम्।

कासीसं पञ्चलवणं राजिका मरिचानि च ।
द्विशिग्रुबीजमकेत्र टङ्कणेन समन्वितम् ॥ १०१ ॥
आलोड्य काञ्जिके दोलायत्ने पाच्यो दिनैस्त्रिभिः ।
दीपनं जायते सम्यक् सूतराजस्य जारणे ॥ १०२ ॥
अथवा चित्रकद्रावैः काञ्जिके त्रिदिनं पचेत् ।
दीपनं जायते तस्य रसराजस्य चोत्तमम् ॥ १०३ ॥

८ संदीपन क्रिया.

हिराकस, पंच लवण, मोहोरी (काळीं), मिरें, शेवग्याचें बीं ह्यांची पूड करून त्यांत टाकणखार मिसळावा आणि तें चूर्ण कांजीमध्यें घोंटावें. मग त्या मिश्रणांत शुद्ध पारा दोलायंत्रानें तीन दिवस उकळावा, म्हणजे ज्या जिन्नसा त्या पाऱ्यांत जिरवावयाच्या असतील त्या जिरविण्याइतक्या त्या पाऱ्याचा अग्नि प्रदीप्त होतो किंवा चित्रकाचा रस काढून त्यात कांजी मिसळून त्यांत पारा तीन दिवस उकळला असतां देखील त्याची क्षुधा प्रदीप्त होते.(१०३).

याप्रमाणें पाऱ्यास आठ संस्कार केले म्हणजे तो शुद्ध होऊन उपयोगांत आणण्यालायक होतो.

पाऱ्याला स्थिर करणें याला नियमन म्हणतात.

९ अथानुवासनम् ।

दीपितं रसराजं तु जम्बीररससंयुतम् ।
दिनैकं धारयेद्धर्मे मृत्पात्रे वा शिलोद्भवे ॥ १०४ ॥
इत्यनुवासनम् ॥

सहस्रनिम्बूफलतोयघृष्टो रसो भवेद्वह्निसमप्रभावः ।
सव्योषराजीलवणः सचित्रः सरामठो विंशतिवासराणि॥१०५॥
इति रसचिन्तामणावनुवासनम् ॥

९ अनुवासन.

मडकें किंवा दगडाचें भांडें घेऊन त्यांत दीपनक्रिया केलेला पारा ठेऊन त्याच्यावर तो बुडून जाईल इतका कागदीलिंबाचा रस ओतावा व तें पात्र एक दिवस उन्हांत ठेवावें, म्हणजे अनुवासन होतें. (१०४).

रसचिंतामणिकार म्हणतातः—

एक हजार लिंबांचा रस काढून त्यांत त्रिकटु, मोहरी, सैंधव, चित्रक आणि हिंग ह्यांची पूड करून ती घोंटावी आणि त्याबरोबरच मागील संस्कार करून दीप्त झालेला पारा वीस दिवसपर्यंत खलावा, म्हणजे तो अग्निप्रमाणें प्रभावशाली होतो. (१०५)

एतैरनुवासनान्तैर्नवभिः संस्कारैः शुद्धः सूतोऽष्टमांशोऽव-
शिष्यत इत्याह रसरत्नाकरकृन्नित्यनाथः—
स्वेदनादिनवकर्मसंस्कृतः सप्तकञ्चुकविवर्जितो भवेत् ।
अष्टमांश इह शिष्यते तदा शुद्धसूत इति कथ्यते बुधैः ॥इति।
शुद्धसूतपरीक्षेयमिति भावः । कीदृशः स्वेदनादिनवकर्माभिः
संस्कृतः पारदः सप्तकञ्चुकविवर्जितो भवेदत्र दृष्टप्रत्यय-माह
(कञ्चकविवर्जितस्येयं परीक्षा) यदा अष्टमांशोऽवाशिष्यते,
सप्तभागाः सप्तकञ्चुकसंबन्धिनो गच्छन्त्यष्टमो भागः पारद-
स्यावाशिष्यते तदा शुद्धसूतःकञ्चुकदोषविनिर्मुक्तो भवति ।
सप्तकञ्चुकाः सप्तावरणानि शिवशापाज्ञातानि, तद्विमुक्ततया
शुद्धसूतो बुधैः कथ्यत इति ॥

अनुवासनासुद्धां नऊ संस्कार पाऱ्यावर केले म्हणजे पहिल्या संस्कारापूर्वी जितका पारा घेतला असेल त्याच्या आठव्या हिश्शा-

इतका शेवटीं शिल्लक राहतो; बाकीचा सात हिस्से पारा नऊ संस्कारांच्या धडाक्यांत नाहींसा होतो.

रसरत्नाकारकर्ते नित्यनाथ म्हणतात कीं, स्वेदन वगैरे नऊ संस्कारांच्या योगानें पाऱ्याचे सात कंचुक (दोषरुप पापुद्रे) काढून टाकले म्हणजे पारा अष्टमांशच उरणार आणि तोच खरा शुद्ध पारा होय: असें शास्त्रज्ञ म्हणतात. (१०६)

ही शुद्ध पाऱ्याची परिक्षाच आहे. स्वेदन इत्यादि नऊ संस्कार पाऱ्यावर घडले म्हणजे पाऱ्याचे कंचुकरूपी सात दोष दूर होतात असा प्रत्यक्ष अनुभव आहे. हीच कंचुक झडून गेल्याची खूण आहे. कारण सात कंचुकांबद्दल सात भाग पारा नाहींसा झाला म्हणजे बाकी एकच भाग शिल्लक राहणार, आणि तो तसा राहिला म्हणजेच सप्त कंचुकांपासून मुक्त झाला असें समजावें. सात कंचुक म्हणजे दोषांचीं सात आस्तरणें पाऱ्याच्या अंगावर असतात. हे कंचुक शंकराच्या शापामुळें पाऱ्याला जडले आहेत, त्यांपासून पारा मोकळा झाला म्हणजेच त्याला शूद्ध पारा म्हणावें असें शास्त्रज्ञ म्हणतात.

अथ जारणम् ।

जारणा हि नाम गालनपातनव्यतिरेकेण घनहेमादि-ग्रासपूर्वक रसस्य पूर्वावस्थाप्रतिपन्नत्वं, फलं चास्य प्रोक्तं स्वयं महेश्वरेण-

सर्वपापक्षये जाते प्राप्यते रसजारणा ।
तत्प्राप्तौ प्राप्तमेव स्याद्विज्ञानं मुक्तिलक्षणम् ।
मोक्षाभिव्यञ्जकं देवि जारणा साधकस्य तु ॥ १०७ ॥
खल्वस्तु पिण्डिका देवि रसेन्द्रो लिङ्गमुच्यते ।
मर्दनं चन्दनं चैव ग्रासः पूजाऽभिधीयते ॥ १०८
यावद्दिनानि देवेशि वन्हिस्थो धार्यते रसः ॥ १०८ ॥
तावद्दशसहस्राणि शिवलोके महीयते ॥ १०९ ॥
दिनमेकं रसेन्द्रस्य यो ददाति हुताशनम् ।
द्रवन्ति तस्य पापानि कूर्वन्नापि न लिप्यते ॥ ११० ॥

इत्यादि ॥

आतां जारणक्रिया सांगतों

पारा न गाळतां, किंवा पातनयंत्रानें परिपातन (Distill) करून न घेतां, त्याला अभ्रक, सोनें इत्यादि जिनसांचा ग्रास चारून सुद्धां त्याचें पूर्वीचें खरूप कायम ठेवणें याचें नांव जारणा.

ही क्रिया फार महत्वाची आहे. इतकी कीं, तिचें महत्व खुद्द महादेवांनींच वर्णन केलें आहे तें असें कीं,

ज्याच्या पातकांचा क्षय झाला असेल त्यालाच जारणाक्रिया साधते, भलत्याला साधत नाहीं. ही क्रिया साधली म्हणजे मोक्षाचें लक्षण जो स्वानुभव तो त्याला प्राप्त झालाच असें समजावें. हे पार्वती, जारणा म्हणजे साधकाला मोक्षाचें साधन प्राप्त करून देणारी विद्या होय असें मला वाटतें.म्हणूनच मी म्हणतों कीं जारणक्रियेचें उपकरण जो खल तीच शाळुंका आणि पारा हेंच शिवलिंग असें समजण्यास चिन्ता नाहीं. खल करणें म्हणजे चंदन समर्पण करणें आणि पाऱ्याला अभ्रकाचा ग्रास देणें हीच त्याची पूजा होय. पारा अग्निवर टाकला असतांहि तो स्थिर राहूं लागला तर जितके दिवस तो तसा स्थिर राहील त्या प्रत्येक दिवसागणिक दहाहजार वर्षे इतका काल पारदसाधन करणारा मनुष्य शिवलोकीं मान्यतेनें राहतो. एकदिवस का होईना, परंतु जो पाऱ्याला अग्नीवर स्थिर करूं शकेल त्याचीं यच्चावत् पातकें लयास जातील आणि कोणतेंहि कर्म केलें तरी त्याला त्याची बाधा होणार नाहीं. (१०७—११०).

विपिनौषधिपाकसिद्धमेद्घृततैलाद्यपि दुर्निवारवीर्यम् ।
किमयं पुनरीश्वराङ्गजन्मा घनजाम्बूनदचन्द्रभानुजीर्णः ११११॥
रसगुणबलिजारणं विनाऽयं न खलु रुजां हरणक्षमो रसेन्द्रः
न जलदकलधौतपाकहीनः स्पृशति रसायनतामिति प्रतिज्ञा॥
अजारयन्तः पविहेमगन्धं वाञ्छन्ति सूतात् फलमप्युदारम् ।
क्षेत्रादनुप्तादपि सस्यजातं कृषीवलास्ते भिषजश्च मन्दाः॥११३

सर्वांनां हें माहीतच आहे कीं,साधारण घृतें,तेलें यांना रानांतील झाडपाल्याच्या भावना दिल्या तर तीं तेलें देखील अनिवार तेजस्वी होतात. मग पारा तर प्रत्यक्ष शंकराच्या शरीरापासून उत्पन्न झालेला; तेव्हां त्याला जर अभ्रक, सुवर्ण, रौप्य व ताम्र यांचें खाद्य मिळालें तर त्यांचें तेज कांहीं अवर्णनीय होईल ह्यांत काय नवल ? पाऱ्यामध्यें वजनानें त्याच्या सहापटीइतका गंधक जिरविल्याशिवाय तो रसराज रोगांचें उच्चाटन करूं शकणार नाहीं (असें जरी नाहीं) तरीं * त्यांत अभ्रक, सुवर्ण, चांदी, ह्या जिनसा जिरविल्यावांचून त्याला रसायन हें नांव प्राप्त होणार नाहीं इतकें मात्र खास.(११२) असें असतां कृष्णाभ्रक, सुवर्ण आणि गंधक ह्या वस्तु पाऱ्यांत जिरविण्याची कला ज्यांना साधली नाहीं त्यांनीं सुद्धां पाऱ्यापासून मोठे मोठे लाभ मिळाविण्याची इच्छा बाळगावी हा वेडेपणा नव्हे काय ? शेत नांगरावयास नको, पेरणीचे कष्ट नकोत आणि पीक मात्र पाहिजे असें म्हणणारा शेतकरी, आणि वरच्याप्रमाणें भलतीच इच्छा धरणारे वैद्य हे दोघे सारखेच मूर्ख होत. (११३).

घनरहितबीजजारणसंप्राप्तदलादिसिद्धिकृतकृत्याः ।
कृपणाः प्राप्य समुद्रं वराटिकालाभसंतुष्टाः ॥ ११४ ॥
अभ्रकजारणमादौ गर्भद्रुतिजारणं च हेम्नोऽन्ते ।
यो जानाति न वादी वृथैव सोऽर्थक्षयं कुरुते ॥ ११५ ॥

रसहृदयकार म्हणतातः—

पाऱ्याला अभ्रक न देतां दुसरे पदार्थ देऊन तेवढ्यापासूनच हलक्या प्रकारची किमया साध्य करून घेऊन जे आपणास कृतकृत्य मानतात ते खरोखर अभागी होत. प्रत्यक्ष रत्नाकर समुद्र जवळ असतांना त्या समुद्रांतून फक्त कवड्या गोळा करून तेवढ्यावरच ते संतुष्ट राहतात (असें म्हटलें पाहिजे). पाऱ्यांत प्रथम अभ्रक जिरवावयाचा आणि सोनें (गर्भद्रुति क्रियेनें) शेवटीं जिरवावयाचें, हें

---

* असा अर्थ श्लोक ११६ च्या अनुरोधानें करणें योग्य दिसतें.

ज्याला कळत नाहीं तो किमयागार नव्हे; तर उगाच पैसे खर्च करणारा मूर्ख होय. (११५).

गन्धकजारितसूतस्य फलमुक्तं शिवागमे ।—
तुल्ये तु गन्धके जीर्णे शुद्धाच्छतगुणो रसः ।
द्विगुणे गन्धके जीर्णे सर्वथा सर्वकुष्ठहा ॥ ११६ ॥
त्रिगुणे गन्धके जीर्णे सर्वजाड्यविनाशनः ।
चतुर्गुणे तथा जीर्णे वलीपलितनाशनः ॥ ११७ ॥
गन्धे पञ्चगुणे जीर्णे क्षयक्षयकरो रसः ॥
षडगुणे गन्धके जीर्णे सर्वरोगहरो रसः ॥
अवश्यमित्युवाचेदं देवीं श्रीभैरवः स्वयम् ॥ ११८ ॥

गंधक जिरविलेल्या पाऱ्याचे गुण शिवागमांत सांगितले आहेत ते असे—

जितका शुद्ध पारा तितकाच गंधक घेऊन तो त्यांत जिरविला तर त्या पाऱ्याचा गुण शतपट वाढतो. दुप्पट गंधक जिरविला तर सर्व प्रकारचीं कुष्ठें निखालस नाहींशीं करण्याचें सामर्थ्य त्या पाऱ्याला येतें. गंधक तिप्पट जिरविला तर सर्व प्रकारचें नपुंसकत्व, सुस्ती आणि दौर्बल्य ह्यांचा नाश करतां येतो. गंधक चौपट जिरविला तर अंगावरील सुरकुत्या व पांढरे केंस ही वृद्धावस्था पालटते. पांचपट गंधक जिरविला तर क्षयरोग जातो, आणि सहापट जिरविला तर त्या पाऱ्यापुढें कोणताही रोग टिकाव धरीत नाहीं हें निश्चित समज,असें शंकरांनीं स्वतः पार्वतीला सांगितलें आहे.(११८)

अन्यत्रापि—

समे गन्धे तु रोगघ्नो द्विगुणे राजयक्ष्माजित् ।
जीर्णे तु त्रिगुणे गन्धे कामिनीदर्पनाशनः ॥ ११९ ॥
चतुर्गुणे तु तेजस्वी सर्वशास्त्रार्थसिद्धिदः
भवेत्पञ्चगुणे सिद्धः षड्गुणे मृत्युजिद्भवेत् ॥ १२० ॥

दुसऱ्या एका ग्रंथांत असें आहे कीं,

पाऱ्याइतइतकाच गंधक त्यांत जिरला तर त्यानें (सर्वसाधारण) रोगांचा नाश होतो. दुप्पट जिरला तर कफक्षयाचा परिहार होतो;

टिळक ग्रंथसंग्रहालय
क्र. 316

तिप्पट गंधक जिरला तर स्त्रियांचा दर्प हरण करण्याचें सामर्थ्य येतें. चौपट जिरला तर मनुष्य तेजस्वी होऊन तो सर्व शास्त्रांत पारंगत होईल; गंधक पांचपट जिरला तर किमया साधेल आणि सहापट जिरला तर मनुष्य प्रत्यक्ष मृत्यूला सुद्धां जिंकूं शकेल. (१२०).

' षड्गुणे रोगघ्न ' इत्युक्तं यत्तत्तु मूर्च्छायामेवाधिगन्तव्यं, तत्र गन्धकस्य समग्रजारणाया अभावात्। अत्र तु समे गन्धे इति तृतीयार्थे सप्तमी; (तेन समेन गन्धेन तुल्यगन्धेन जीर्णः पारदो मूर्च्छनाविधिना मृतः, तत्फलं रोगघ्नता) एवं द्विगुणादिष्वपि व्याख्येयमिति प्रतिभाति ॥

वर श्लोक ११८ यांत सांगितलें कीं, सहापट गंधक जिरवतां आला तर पारा सर्व रोगांचा नाश करतो. ही शक्ति मूर्च्छनाक्रियेनें* येते असें समजावें; कारण मूर्च्छनाक्रियेनेंच संपूर्ण जिरला जातो. ' समे गन्धे ' याचा अर्थ ' वजनानें पाऱ्याइतका गंधक घेऊन ' असा केला पाहिजे. म्हणजे गंधक हा पाऱ्याशीं समभाग घेऊन मूर्च्छना विधीनें तो (पाऱ्यांत) जिरवून पारा मृत झाला म्हणजे त्याचें फल रोगनाश हें होतें. याप्रमाणेंच ' द्विप्पट गंधक ' इत्यादि वाक्याचा अर्थ केला पाहिजे असें उघड दिसतें.

तस्माच्छतगुणो व्योमसत्त्वे जीर्णे तु तत्समे ।
ताप्यखर्परतालादिसत्त्वे जीर्णे गुणावहः ॥ १२१ ॥
हेम्नि जीर्णे सहस्रैकगुणसंपत्प्रदायकः ।
वज्रादिजीर्णसूतस्य गुणान् वेत्ति शिवः स्वयम् ॥ १२२ ॥
देव्या रजो भवेद्गन्धो धातुः शुक्रं तथाऽभ्रकम् ।
आलिङ्गने समर्थौ द्वौ प्रियत्वाच्छिवरेतसः ॥ १२३ ॥
शिवशक्तिसमायोगात् प्राप्यते परमं पदम् ।
यथा स्याज्जारणा बह्वी तथा स्याद्गुणदो रसः ॥ १२४ ॥

× दल म्हणजे पातळ पत्रा; तांबे, रुपें ह्यांच्या पातळ पत्र्यांना सोन्यासारखा रंग आणणें ह्याचें नांव " दलसिद्धी "; " वादी म्हणजे धातुवाद अ० किमया ज्याला माहित आहे असा मनुष्य.

अभ्रक सत्व समभाग घेऊन तें पाऱ्यांत जिरविलें तर त्या पाऱ्याचा गुण शंभरपट वाढतो. तसेंच सुवर्णमाक्षिक, खापरसूत, हरताळ ह्यांचीं सत्वें जिरविल्यानेंहि वाढतें. सोनें जिरविलें तर पारा सहस्रपटीनें गुणावह होतो; आणि हिऱ्यासारखीं जीं रत्नें आहत त्यांचें सत्व जर जिरवितां आलें तर पाऱ्याचा गुण किती वाढतो तें फक्त एका ईश्वरासच माहीत.इतरांस तें सांगतां येणार नाहीं.(१२२)

गंधक हें पार्वतीचें रज आहे आणि अभ्रक हें (शंकराचें) वीर्य आहे. म्हणून गन्धक आणि अभ्रक ह्यांचें परस्पर प्रेम विलक्षण असतें; आणि त्या दोहोंचीहि पाऱ्याकडे अतिशय ओढ असते. त्या कारणानें दोन्ही एकमेकांस दृढ आलिंगन देऊं शकतात; (एकमेकांत मिसळून जातात). अर्थात् शिवस्वरूप पारा, आणि शक्तिस्वरूप गन्धक ह्यांचा योग साधला कीं मोक्षपद मिळतें. पाऱ्यांत अभ्रक जितकें जास्त जिरवावें तितका पारा अधिक गुणकारी होतो, म्हणून प्रथम गन्धक कसा जिरवितात तें सांगतों. (१२४)

अथादौ गन्धकजारणम् ।

तत्तु तत्रनिगादितदेवतापरिचरणसमनन्तरं तत्तच्छोधनप्रक्रियाभिर्बन्हीभिः संक्षिप्ताभिर्वा शुद्धस्य रसेन्द्रस्य तृणारणिमणिजन्यवन्हिन्यायेन तारतम्यमवलोकमानैः सूक्ष्ममतिभिः 'पलार्धेनापि संस्कारः कर्तव्यः सूतकस्य च' इति रसार्णववचनाद्व्यावहारिकतोलकद्वयप्रमाणेनापि कञ्चन सूतं समादाय, तत्र गन्धको नवनीताख्यः संशोध्य जार्य आषड्गुणामिति । ततो मारणविधिना हत्वा मात्रयाऽशितः पथ्ययोगेन 'समे गन्धे तु रोगघ्न' इत्यादिप्रोक्तफलकारी रसो भवति । अथ यदि रसायनगुणेच्छा चेद्गन्धकजारणोत्तरं हेमाभ्रसत्वादि यथाविभवं गन्धकजारणोत्थिते रसे प्रोक्तविधिना संसाध्य जारयित्वा मारणविधिना हत्वा मात्रया क्षेत्रीकरणपूर्वकं पथ्ययोगेन मण्डलावधि षण्मासं वर्षैकं द्विवर्षं त्रिवर्षं वा संसेव्यः । तदा तदुक्तफलमाप्नोति । यावज्जीवं सेव्यो वा संपत्तिश्चेत् । यद्वा यथावकाशं पौनः पुन्येन संसेव्यः । अथ केवलं रोगहननेच्छा चेत्स्वेदनादिदीपनान्तैः संस्कारैः रसं संशोध्य प्रोक्तविधिना गन्धकेन संमूर्च्छ्य मात्रया पथ्ययोगेन संसेव्यो यावदारोग्यमिति ।

गन्धकजारणा

रसशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें देवताची पूजा केल्यावर, 'तृणारणिमाणिजन्यवान्हि' * या न्यायानें तारतम्य पाहून शास्त्रांत दर्शविल्याप्रमाणें पाऱ्याच्या ज्या शुद्धिक्रिया सांगितल्या आहेत. त्या सर्व किंवा त्यांपैकीं जरूर तेवढ्या करून बुद्धिमन्तांनीं पारा शुद्ध करावा आणि तो हवा असेल तितका घ्यावा. " दोन तोळे देखील पारा शुद्ध करतां येतो " असें रसार्णवकार लिहितात. म्हणून वाटल्यास दोनच तोळे पारा घेऊन तो शुद्ध करावा व त्यांत लोण्या गन्धक शुद्ध करून शक्य तितका जिरवावा. तो सहा पटीपर्यंत जिरवावा. मग पाऱ्याचें भस्म करावें. तें भस्म प्रमाणशीर सेवन केल्यास वर श्लोकांत लिहिल्याप्रमाणें रोगनाश झाल्याचा अनुभव येईल.

आतां रसायनाचा गुणानुभव घेण्याची इच्छा असेल तर गन्धक जिरविल्यानंतर सवड असेल त्या मानानें सुवर्ण, अभ्रक इत्यादिकांचीं सत्वें सांगिल्याप्रमाणें तयार करून गन्धक जिरलेल्या पाऱ्याचें उत्थान करून त्या पाऱ्यांत तीं सत्त्वें जिरवावीं आणि नंतर पाऱ्याचें भस्म करावें. शरीरक्षेत्र, वमनविरेचन इत्यादि पंच कर्मानीं शुद्ध झाल्यानंतर वरील भस्म योग्य प्रमाणानें सेवन करावें व पथ्य करावें. भस्मसेवन यथाशक्ति म्हणजे चाळीस दिवस, सहा महिने एक वर्ष किंवा दोनतीन वर्षेपर्यंत सुद्धां करीत रहावें. म्हणजे लिहिल्याप्रमाणें अनुभव येईल. द्रव्यानुकूल्य असल्यास जन्मभर रसायनसेवन करावें; कांहीं हरकत नाहीं. अगर कांहीं दिवस रसायन घ्यावें. कांहीं दिवस सोडावें. पुनः कांहीं दिवस घ्यावें, असें चालून पाळून करावें. फक्त रोग नाश करण्याचीच इच्छा असेस तर

---

* ह्याचा अर्थ असा कीं, गवत जाळून केलेला अग्नि; ' अरणी ' लांकडापासून उत्पन्न होणारा अग्नि व सूर्यकांत मण्यापासून निघणारा अग्नि हे अनुक्रमानें जास्त प्रखर आणि टिकणारे असतात. अर्थात् ह्या सर्व वाक्याचा इत्यर्थ " तारतम्य पाहून " असा होतो.

पाऱ्याला स्वेदनापासून ते दीपनापर्यंत आठ संस्कार करावे आणि त्याला ग्रंथोक्तक्रियेनें गन्धक देऊन तो मूर्च्छित करावा आणि मग त्याचें योग्य प्रमाणानें सेवन करावें. परंतु पथ्य केलें पाहिजे. या-प्रमाणें रोग नाहींसा होईपर्यंत क्रम चालवावा.

अथ रसादौ पाकावलेहगुटिकाचूर्णादौ वा रसयोगे विहिते यथावचनं संशुद्धो मूर्च्छितो गन्धजीर्णो हेमादिजीर्णो वा मृतोऽमृतो वा रसो योज्य इति गुरुसङ्केतः। गन्धकजारण रहितः संशुद्धोऽपि रसो योगेषु न योज्यः, गदहन्तृत्वशक्त्यनुदयात् हेमादिजीर्णोऽप्यशुद्धस्तु कुत्रापि न योज्यः, वैगुण्यप्रदत्वात्। एवं सर्व उपरसा धातव उपधातवो रत्नान्युपरत्नानि विषोपविषप्रभृत यश्चशुद्धाः सन्तो मृता अमृता वा यथावचनं योज्या नाशुद्धा इति दिक् ॥

आतां वैद्यकांत पाक, लेह, गोळ्या, चूर्णें यांचेबरोबर जेथें पाऱ्याचा योग सांगितला असतो तेथे वर लिहिलेल्या क्रियेनें प्रथम पारा शुद्ध करून मग त्यांत गंधक जिरवून तो मूर्च्छित करून घ्यावा; किंवा सुवर्ण इत्यादि जिरवून मग तो मारावा; अथवा न मारलेलाच घ्यावा, असें आमच्या गुरूंचें मत आहे. पण पारा जरी शुद्ध केला असला तरी त्यांत गंधक जिरविल्यावांचून तो घेऊं नये. कारण त्यांत रोगनाशक शक्ति उत्पन्न झालेली नसते. पण अशुद्ध पाऱ्यांत सुवर्ण जरी जिरविलें असलें तरी तसा अशुद्ध पारा सेवन करूं नये कारण तो पारा शरीरांत बिघाड उत्पन्न करतो. याच प्रमाणें सर्व रस उपरस, धातु–उपधातु; रत्नें–उपरत्नें, विषें–उपविषें, इत्यादि वस्तु शुद्ध करूनच औषधांत उपयोगांत आणाव्या. मग त्या मारल्या असोत कीं नसोत, हें केवळ दिग्दर्शन केलें आहे.

इह खलु पुरुषेण दुःखस्य निरुपाधिद्वेषाविषयत्वात्तदभाव-श्चिकीर्षितव्यो भवति, सुखमपि निरुपाधिप्रेमास्पदतया गवेषणीयं, तदेतत्पुरुषार्थद्वयम्। अत्र स्रक्चन्दनललनादिविषयाणां सत्यपि तत्कारणत्वे (सुखकारणत्वे) नान्तरीयकदुःखसंभेदादनर्थपरंपरा-परिचितत्वान्मूर्खाणामाकाशोद्भववदाभासमानत्वादनैकान्तिकत्वा-

द्धिरोधिनां युगपददृश्यमानत्वादत्यन्ताविरहितत्वाच्च परिहरणीयम्। एकान्तात्यन्ततः पुनरेतेऽभ्युपायाः खलु हरिहरब्रह्माण इव तुल्या एव संभवान्ति ज्ञानयोगः, प्राणयोगो, रसयोगश्चेति। ननु, कथमेतेषां तुल्यतेत्यपेक्षायां ब्रूमः—मोक्षोपाये बृहद्वासिष्ठे भुशुण्डोपाख्याने वसिष्ठवाक्यम्—

खरोखर ह्या जगांत दुःख भरलेलें आहे. दुःख हा परिणाम केवळ द्वेषाचा आहे. याचा अर्थ असा कीं, आपल्याला जें नको असेल तेंच घडून येतें,हें दुःखाचें कारण होय. दुःख नको असें प्रत्येकास वाटत असतें, आणि सुख हें प्रेमविषयक असल्यानें तें हवेंसें वाटतें. ह्याप्रमाणें दुःखाचा परिहार आणि सुखाची प्राप्ति असे दोनच पुरुषार्थ अथवा ध्येयें ठरतात. आतां सुगंधिक पुष्पहार, चंदन इत्यादि सुवासिक तेलें, सुंदर तरुण विलासिनी स्त्रिया, यांच्या उपभोगापासून सुख मिळेल असें सकृत्‌दर्शनीं वाटतें पण विषयोपभोगाच्या आंत किती दुःख भरलें आहे.

आणि किती अनर्थपरंपरा उद्‌भवते याची जाणीव विचारी मनुष्याला होते, मूर्खानां तें सुख गंधर्व नगरांप्रमाणें मोठें मोहक दिसतें (पण) त्याचा परिणाम सुखमय होत नाहीं. किंबहुना परस्परविरोधी असे परिणाम एकदम अनुभवास येतात आणि पुनः दुःखपरंपरेला खळ म्हणून पडत नाहीं. अशा अनेक कारणांमुळें दुःखाचा परिहार करणें हें मनुष्याचें कर्तव्यच ठरतें. ह्या दुःखपरिहाराचे उपाय जे आम्ही सांगणार आहोत, त्याचा परिणाम ठाम ठरलेला आहे. ब्रम्हा, विष्णु, शिव हे जसे समान तसेच ते उपायहि सारख्याच योग्यतेचे आहेत. ते उपाय–ज्ञानयोग, प्राणयोग आणि रसयोग असे तीन प्रकारचे आहेत. आतां हे तिन्ही सारखे कसे म्हणून विचाराल तर बृहद्वासिष्ठ पुराणांत भुशुंडीच्या आख्यानांत वसिष्ठ वचनच तसें आहे. ते म्हणतात कीं:—

असाध्यः कस्यचिद्योगः कस्यचिज्ज्ञाननिश्चयः।
द्वौ प्रकारौ ततो देवो जगाद परमः शिवः।
प्राणानां वा निरोधेन वासनानोदनेन वा ॥ १२५ ॥

इत्यादि

* कोणाला योगसाधन नाहीं. कोणाला ज्ञानानुभव होत नाहीं, म्हणून देवाधिदेव जो शंकर त्यानें आणखी तिसऱ्या योगाचे दोन प्रकार सांगितले आहेत. योगांत पंचप्राणाचा निरोध करावा लागतो आणि ज्ञानमार्गात विषयेच्छेचा क्षय करणें जरूर पडतें. १२५) म्हणून तिसऱ्या उपायाची जरूर पडते.

याप्रमाणें या तिन्ही उपायांचें महत्व सारखेंच आहे असें दिसतें. दोन प्रकारांपैकीं पहिला प्रकार म्हणजे वनस्पति उकळून त्यांचे काढे करणें, हा कसा तरी साध्य होतोच; पण दुसरा प्रकार विषयसुखाला चटावलेल्या लोकांना देखील करतां येईल असा असल्यानें तो तर फारच चांगला असें कोणास वाटणार नाहीं? शिवाय पारा हा प्रत्यक्ष शंकराच्या शरीरापासून उत्पन्न झालेला आणि सोनें चांदी वगैरे पाहिजे तो बहुमोल धातु आपल्या स्वतः-पासून निर्माण करणारा अशा प्रकारचा असल्यानें गुणांचा समुद्र जो पारा त्याच्या मुर्च्छनेचे अनेक प्रकार (पारद–सेवन करणा-ऱ्यांना) सांगणें प्राप्तच आहे.

तस्मादेतेषां समानत्वमनवद्यम्। तत्राद्ययोः केवलं पक्वकषा-याणामपि कथञ्चन साध्यत्वात, चरमे पुनर्भोगलोलुपानामप्यधि-कारित्वात्ताभ्यां समीचीनोऽयमिति कस्य न प्रतिभाति। किंचास्य भगवन्निर्यासकतया सेवकानां स्वसंभूतसकलधातुत्वापादकस्य भगवतो रसराजस्य गुणसिन्धोः कियन्तो मूर्च्छनाः, ताः प्रसङ्गा-ल्लिख्यन्ते। अथाव्यभिचरितव्याधिघातकत्वं मूर्च्छना, तत्प्रकारा बहुविधाः। तत्र निर्गन्धसगन्धभेदेन द्विविधा भवति मूर्च्छना। निर्गन्धमूर्च्छना तु विषाद्यौषधिभिरेकरूपा परमयोगिनां संमता। सगन्धा तु बहिर्धूमान्तर्धूमानिर्धूमतास्त्रिविधा। त्रिविधाऽपि केवलं गन्धपिष्टि—गन्धबद्ध—गन्धजीर्ण— सगन्धकज्जलीधातुपिष्टिभेदेन पञ्चधा। धातुपिष्टिश्च कनकरजतशुल्बघनसत्वकालायसप्रभेदैः पञ्चधा। किंच मूर्च्छना जारणा इत्यनर्थान्तरं प्रायः। सा चेष्टिका-काचकूपी-काचसंपुट-सुवर्णयंत्रभेदेनान्तर्धूमबहिर्धूमाभ्यां द्विविधा तत्र षड्गुणगन्धकजारणा साधीयसी निगद्यते—सा तु स्वेदनमर्द-

---

* ह्या श्लोकाचें अवतरण अपुरें आहे.

नादिसंस्कारावबद्धस्य रसराजस्य कार्या। बन्धनं तु स्वाभाविक-द्रवत्वे सति वन्हिनाऽनुद्दीयमानत्वं मूर्तिबद्धत्वं, तत्तु नियमनान्तैः संस्कारैर्भवीति। अथ यदि स्वेदनादिसंस्कारान् कर्तुमसमर्थः, तं प्रति सुगमरसशोधनोपाया अप्युक्ताः सन्ति। ते यथा—तत्र पारद-ग्रहणे तत्परीक्षामाहुः। यथा—

अन्तःसुनीलो बहिरुज्वलो यो मध्यान्हसूर्यप्रतिमप्रकाशः।
योज्योऽथ धूम्रः परिपाण्डुरश्च चित्रो न योज्यो रसकर्मसिद्धयै
इति॥

मूर्च्छना म्हणजे असें कीं, रोग अथवा व्याधि हे खात्रीनें नाहींसें करण्याचें सामर्थ्य पाऱ्यांत उत्पन्न करण्याची क्रिया. मूर्च्छनेचे प्रकार पुष्कळ आहेत; पण त्यांत सगन्ध आणि निर्गन्ध असे दोन मुख्य आहेत. सगन्ध म्हणजे गन्धकाच्या योगानें, आणि निर्गन्ध म्हणजे गन्धकावांचून केलेली मूर्च्छना. बचनाग वगैरे विषें आणि औषधें यांच्या योगानें जी मूर्च्छना करितात ती निर्गन्ध मूर्च्छना, ती रसशास्त्रांना पसंतच आहे. आतां सगन्ध मूर्च्छनेचे प्रकार तीन आहेत. पहिला अंतर्धूम, दुसरा बहिर्धूम आणि तिसरा निर्धूम. ह्या तिहींतही गंधापिष्टि, गन्धबद्ध, गन्धजीर्ण, गन्ध-कज्जली आणि धातुपिष्टि असे पांच पोटभेद आहेत. त्यांपैकीं धातुपिष्टिचेहि सुवर्ण, रौप्य, ताम्र, अभ्रकसत्व आणि पोलाद यांच्या-मुळें पांच प्रकार होतात. आतां "जारणा" हें मूर्च्छनेलाच बहुधा चुकीनें दिलें गेलेलें दुसरें नांव आहे. जारणाही दोन प्रका-रची आहे. एक अंतर्धूम आणि दुसरी बहिर्धूम. इष्टिकायंत्र, कुपी-यंत्र, काचसंपुटयंत्र, सुवर्णयंत्र वगैरे जीं यंत्रें वापरण्यांत येतात त्यांच्यामुळें जारणेचे दोन प्रकार होतात. तथापि त्यांतले त्यांत सहापट गंधक जिरविण्याचा जो प्रकार आहे तो श्रेष्ठ आहे असेंच सर्वांचें मत आहे. जारणा ही पाऱ्याला प्रथम स्वेदन, मर्दन इत्यादि संस्कार करून मग करावयाची असते. (जारणेनें पाऱ्याचें बन्धन होतें.). पारा हा स्वाभाविकपणें चंचल आणि द्रवणशील. परंतु तो

अग्निवर टाकला असतां उडून न जाण्याइतका कठिण होणें ह्याचें नांव बन्धन. हें बन्धन पाऱ्याला निमयनासुद्धां सात संस्कार केले म्हणजे प्राप्त होतें.

शोधनं यथा—

राजीरसोनमूषायां रसं क्षिप्त्वा विबन्धयेत् ।
वस्त्रेण दोलिकायंत्रे स्वेदयेत्काञ्जिकैस्त्रयहम् ॥ १२७ ॥
दिनैकं मर्दयेत्पश्चात् कुमारीसंभवैर्द्रवैः ।
तथा चित्रकजैः क्वाथैर्मर्दयेदेकवासरम् ॥ १२८ ॥
काकमाचीरसैस्तद्वार्दनमेकं तु मर्दयेत् ।
त्रिफलायास्ततः क्वाथे रसो मर्द्यः प्रयत्नतः ॥ १२९ ॥
ततस्तेम्यः पृथक्कुर्यात् सूतं प्रक्षाल्य काञ्जिकैः
ततः क्षिप्त्वा रसं खल्वे रसादर्धं च सैंधवम् ॥ १३० ॥
मर्दयेन्निम्बुकद्रावैर्दिनमेकमनारतम् ।
ततो राजी रसोनश्च मुख्यश्च नवसागरः ॥ १३१ ॥
एतै रससमैस्तद्वत् सूतो मर्द्यस्तुषाम्बुना ।
ततः संशोष्य चक्राभं कृत्वा लिप्त्वा च हिङ्गुना ॥ १३२ ॥
द्विस्थालीसंपुटे धृत्वा पूरयेल्लवणेन च ।
अधःस्थाल्यां ततो मुद्रां दद्यात्दृढतरां बुधः ॥ १३३ ॥
विशोष्याग्निं विधायाधो निषिञ्चेदम्बु चोपरि ।
दद्यात्ततस्तु तीव्राग्निं तदधः प्रहरत्रयम् ॥ १३४ ॥
एवं निपत्य यात्यर्धं रसो दोषाविवर्जितः ।
अथोर्ध्वपिठरीमध्ये लग्नो ग्राह्यो रसोत्तमः ॥ १३५ ॥ इति ।

आतां एखाद्याला स्वेदन, मर्दन हे सर्व संस्कार करणें शक्य नसेल त्याच्या सोयीसाठीं पारदशोधनाचे दुसरे सोपे मार्ग आहेत; पण ते सांगण्यापूर्वी पाऱ्याची परीक्षा प्रथम सांगितली पाहिजे. ती अशी—

पाऱ्याचा अंतर्भाग निळा आणि बहिरंग चकचकीत असावें, तें इतकें कीं, तेजानें तो मध्यान्हीच्या सूर्याप्रमाणें दिसला पाहिजे. मग त्यांत थोडी धुरकट रंगाची छटा असली तरी चालेल; पण चित्र-विचित्र रंगाचा मात्र पारा रसक्रियेंत वापरूं नये. (१२६).

आतां पाऱ्याची शुद्धिक्रिया सांगतों.

मोहऱ्या व लसूण ह्यांची लुगदी करून तिच्या पोटांत पारा ठेवावा आणि फडक्यानें पोटळी बांधून ती कांजीमध्यें दोलायंत्रानें तीन दिवस उकळावी. नंतर काढून कोरफडीच्या रसांत व चित्रकाच्या काढ्यांत एकेक दिवस खलावी. त्यानंतर कावळीच्या रसांत एक दिवस खल करावा. मग त्रिफळ्याच्या काढ्यांत एक दिवस करावा. इतकें झाल्यावर पारा बाहेर काढून कांजीच्या पाण्यानें धुवून काढावा. (१२९) नंतर तो खलांत ठेवून त्यावर पाऱ्याच्या अर्ध्यानें सैंधव टाकावें आणि लिंबाच्या रसांत एकसारखा दिवसभर खल पडूं न देतां खल करावा. मग मोहऱ्या, लसूण आणि नवसागर यांचें चूर्ण समभाग घेऊन तें चूर्ण व पारा यांचा कांजीमध्यें पुनः एक दिवस खल करावा आणि तें मिश्रण सुकवावें. सुकल्यावर त्याची चकती करावी आणि ती हिंगानें लेपटावी.(१३२) मग (खापराचीं) दोन भांडीं घेऊन त्यांपैकीं एकांत सैंधवाची पूड भरून तिच्यावर ती चकती ठेवावी आणि मग त्या भांड्याच्या किंवा मडक्याचे तोंडावर दुसरें मडकें पालथें बसवून सांध्याच्या ठिकाणीं पक्का लेप द्यावा. तो वाळल्यावर सैंधव घातलेल्या पात्राखालीं जाळ लावावा व वरच्या मडक्याच्या बुडावर थंड पाण्याचा आपका वरचेवर मारीत रहावें. आंच देणें ती तीन प्रहरपर्यंत चांगली कडक द्यावी,म्हणजे खालच्या पात्रांतील पारा दोषरहित होऊन वरच्या मडक्याच्या बुडास आंतील बाजूस चिकटून बसेल. मग वरचें मडकें अलगद उचलून आंतील पारा काढून घ्यावा. (१३५)

एवं रसे गृहीते पुनस्तोलिते हीने सति पुनस्तद्यन्त्रं संमुद्य शेषस्योर्ध्वपातनं कृत्वा रसो ग्राह्य इति गुरुसंप्रदायः। अथान्यत्रापि—

एतावतस्तु संस्कारान् सूतस्य कर्तुमक्षमैः।
तन्मुख्यान् कियतः कृत्वा ग्राह्यो रोगापनुत्तये ॥ १३६ ॥

रसराजलक्ष्म्यां—

दग्धोर्णागृहधूमसाररजनीरक्तेष्टिकाकाञ्जिकैः
पिष्ट्वा व्योषकुमारिकानलवरानिम्बुद्रवैर्वासरम् ॥
व्योषाद्यम्बुनि दोलया रचितया स्विन्नं सुताभ्राङ्ग्रियुक् ।
पिष्टं भांडतलांञ्जलाश्रयगतं सूतं समभ्यद्धरेत् ॥ १३७ ॥
लवणस्नलिलदोलायत्नमध्ये दिनैकं
भुजगनयनवन्ध्याभृङ्गकल्कान्तरस्थः ।
तवनु दहनतोये काञ्जिके स्वेदितः स्यात्
सपटुमरिचाशिग्रुण्युत्तमः श्रीरसेन्द्रः ॥ १३८ ॥
एतावदप्यशक्तः कर्तुं सूतस्य शोधनं मनुजः ।
स्वेदनमर्दनमूर्ध्वं पातनमेतत्त्रयं कूर्यात् ॥ १३९ ॥

रसरत्नाकरे शोधनं यथा—

अथातः संप्रवक्ष्यामि दोषाष्टकनिवारणम् ।
इष्टिकारजनीचूर्णैः षोडशांशै रसस्य तु ॥ १४० ॥
मर्दयेत्तप्तखल्वे हि जम्बीरोत्थद्रवैर्दिनम् ।
खल्वं लोहमयं कुर्यात् पाषाणोत्थमथापि वा ॥ १४१ ॥
काञ्जिकैः क्षालयेत्सूतं नागदोषं विमुञ्चति ।
विशालाङ्कोलचूर्णेन वङ्गदोषं विनाशयेत् ॥ १४२ ॥
राजवृक्षो मलं हन्ति चित्रको वन्हिदूषणम् ।
चांचल्यं कृष्णधत्तूरस्त्रिफला विषनाशिनी ॥ १४३ ॥
कटूत्रयं गिरिं हन्ति ह्यसह्याग्निं त्रिकण्टकः ।
प्रतिदोषं कलांशेन तत्र चूर्णं सकन्यकम् ॥ १४४ ॥
सुवस्त्रगालितं खल्वे सूतं क्षिप्त्वा यथाक्रमम् ।
प्रत्येकं प्रत्यहं यत्नात् सप्तरात्रं विमर्दयेत् ॥ १४५ ॥
उद्धृत्य चारनालेन मृद्भाण्डे क्षालयेत्सुधीः ।
सर्वदोषविनिर्मुक्तः सप्तकञ्चुकवर्जितः ।
जायते शुद्धसूतोऽयं योजयेद्रसकर्मणि ॥ १४६ ॥

याप्रमाणें काढून घेतलेल्या पाऱ्याचें वजन करावें आणि तें (योग्य प्रमाणापेक्षां) कमी भरल्यास सर्व पारा हातीं लागला नाहीं असें समजून पुनः त्या पात्रास लेप लावून शिल्लक राहिलेला पारा पातनयंत्रानें पुनः पृथक काढून घ्यावा. ह्याप्रमाणें गुरूंच। सांप्रदाय आहे.

दुसऱ्या एका ग्रंथांत सांगितलें आहे कीं,

आठ संस्कारसुद्धां करणें ज्याला शक्य नसेल त्यानें मुख्य संस्कार तेवढे केले तरी सुद्धां तो पारा रोगपरिहारासाठीं औषधक्रियेंत वापरण्यास हरकत नाहीं. (१३६)

रसराजलक्ष्मींत लिहिलें आहे कीं,

लोंकरीची राख, घेरोसा, हळद व भाजून लाल झालेली विटकर यांचें चूर्ण कांजींत घोंटून बारीक करावें. मग सुंठ, मिरे, पिंपळी, कोरफडीचा बलक, चित्रक व लिंबाचा रस यांत पारा एक दिवस खलावा, आणि त्याची पोटळी बांधून त्याच त्रिकटु इत्यादिकांचे काढ्यांत दोलायंत्रानें उकळावी; आणि नंतर त्या भांड्याच्या तळांतील रसांतून पारा काढून घ्यावा. (१३७)

सर्पाक्षी, खखसा व माका ह्यांच्या चोथ्याच्या लुगदींत पारा ठेऊन पोटळी करून ती सैंधवाच्या पाण्यांत दोलायंत्रानें एक दिवसपर्यंत शिजवावी. मग चित्रकाचा काढा व कांजी यांच्या मिश्रणांत सैंधव, मिरपूड व शेवगा हे जिन्नस टाकून त्यांत तो पारा उकळावा. (१३८).

इतकें सुद्धां ज्याच्यानें होणार नाहीं त्यानें प्रथम पाऱ्याचें स्वेदन, नंतर मर्दन आणि नंतर पातन इतके तीन संस्कार जरी केले तरी पुरे. (१३९)

आतां नित्यनाथकृत जो रसरत्नाकर ग्रंथ त्यांतील पारदशोधनक्रिया सांगतोंः—

पाऱ्यांतील आठहि दोष काढून टाकण्याची क्रिया आतां मी सांगतोंः—ती अशी कीं, विटकर, हळद ह्या प्रत्येकाची पूड पाऱ्याच्या सोळाव्या हिश्शाइतकी घेऊन ती आणि पारा ह्यांचा एक दिवसपर्यंत लिंबाच्या रसांत तप्त खल्वामध्यें खल करावा. खल लोखंडाचा घ्यावा. तो न मिळाल्यास दगडाचा घेतला तरी चालेल. पारा खलल्यावर तो कांजींत कोळून कांजीनेंच धुवावा. असें केल्यानें

पाऱ्यातांल शिसें नाहींसें होतें. मग विशाला (घोडवृंदावन) अंकोल यांचें चूर्ण करून त्यांत खल करावा, म्हणजे कथील नाहींसें होतें. राजवृक्षाच्या चूर्णाशीं खल केल्यानें मळ नाहींसा होतो. चित्रक चूर्णांत खलल्यानें कडकी मोडते; काळ्या घोतऱ्याच्या रसांत खल केल्यानें चंचलपणा जातो. त्रिफळ्याच्या काढ्यांत खल केला म्हणजे विषार दूर होतो. त्रिकटु म्हणजे सुंठ, मिरे, पिंपळी यांत खलल्यानें गिरिदोष नष्ट होतो आणि त्रिकण्टक ह्या वनस्पतीबरोबर खल-ल्यानें पाऱ्यांतील जळजळीतपणा नाहींसा होतो. याप्रमाणें एकेक औषधी पाऱ्यांतील दोषरूप असा एकेक भाग काढून टाकते. (औषध घेण्यापूर्वी) पारा स्वच्छ वस्त्रानें गाळून घ्यावा आणि खलांत ठेऊन त्यांत कोरफडीचा रस घालून प्रत्येक औषधीबरोबर एकेक दिवस खल करावा. मग तो पारा खलांतून काढून मडक्यांत घालून आरनालानें स्वच्छ धुवावा, म्हणजे त्या पाऱ्यांतील सप्त कंचुक दोष नाहींसे होतात आणि पारा रसायनामध्यें उपयोग करण्यासारखा शुद्ध होतो. (१४६)

तप्तखल्वलक्षणम् ।—

अजाशकृत्तुषाग्निं च खनयित्वा भुवं क्षिपेत् ।
तस्योपरि स्थितः खल्वस्तप्तखल्वो ह्ययं भवेत् ॥ १४७ ॥

अथान्यन्मतम्—

भूगर्तेऽजशकृत्तुषानलपुटे संस्थापिते लोहजे
खल्वे जम्भजकाञ्जिकेन बालिना सार्धं दशांशेन सः ।
संमर्द्यः परिपात्य यंत्रविधिना निष्कासितः सप्तधा ।
शुद्धः पारदमर्दकैर्निगादितो वैद्यैरवद्येकरैः ॥ १४८ ॥

तप्त खल्व म्हणजे काय ?

जमीनींत एक खळगा खणून तो खळगा शेळीच्या लेंड्या आणि धान्याचा भुसा यांनीं भरावयाचा; आणि मग तो भुसा पेटवून देऊन त्यावर खल ठेऊन त्याला आंच लागेल असें करा-वयाचें, म्हणजे तप्त खल्व झाला. (१४७) अथवा

जमीनींत एक खड्डा करून तो शेळीच्या लेंड्या आणि भुसा ह्यांनीं भरून तो भुसा पेटवावा. मग त्या आगीवर लोखंडाचा खल तापत ठेऊन त्यांत पारा खलावा. खल करावयाचा तो कागदी-लिंबाचा रस, कांजी व दहाव्या हिश्शानें गंधक घेऊन त्याच्या बरोबर करावा. ह्याप्रमाणें ७ वेळां केल्यावर पातनयंत्रानें पारा वेगळा करावा, म्हणजे तो पारा नामांकित वैद्य आणि रसायनशास्त्रज्ञ यांच्या मतानें शुद्ध असा मानला जातो. (१४८)

अथान्यन्मतम्—

श्रीखण्डं देवदारुं च काकतुण्डीजयाद्रवम्।
कर्कोटीमुसलीकन्याद्रवं दत्त्वा विमर्दयेत् ॥ १४९ ॥
दिनकं पातयेत्पात्रे तं शुद्धं विनियोजयेत।

अथान्यत्सिद्धमतम्—

कुमार्या च निशाचूर्णैर्दिनैकं मर्दयेद्रसम् ॥ १५० ॥

दुसऱ्या एका ग्रंथाचें मत असें आहे कीं,

चंदन, देवदार, काकतुंडी (काकंमारी) जया, कर्कोटी, मुसळी आणि कोरफड यांचा काढा करून तो पाऱ्यावर वरचेवर थोडाथोडा घालून सबंध एक दिवसभर खल करावा आणि नंतर पातनयंत्रानें त्यांतील पारा निराळा करावा, म्हणजे तो शुद्ध झाला. मग त्याचा उपयोग करावा. (१४९)

एका रससिद्धाचें मत असें आहे कीं,

कोरफड व दारुहळदीची पूड यांच्यासीं पाऱ्याचा खल एक दिवस करून पातनयंत्रानें तो निराळा काढून घ्यावा, म्हणजे शुद्ध झाला. (१५०)

पातयेत्पातनायंत्रे शुद्धो भवति पारदः।

अथान्यत्सिद्धमतम—

एकेन लशुनेनापि शुद्धो भवति पारदः ॥ १५१ ॥
पिष्टो लवणसंयुक्तो मासैकं तप्तखल्वके।
अथवा ग्राहयेत्सूतं दरदात् स निगद्यते ॥ १५२ ॥

कञ्चुकैर्नागवाङ्गाद्यैर्विमुक्तो रसकर्मणि ।
हिङ्गुलाकृष्टसूतस्तु जीर्णगन्धसमो गुणैः ॥ १५३ ॥
निम्बपत्ररसैः पिष्टा हिङ्गुलं याममात्रकम् ।
जम्बीराणां द्रवैर्वाऽथ पात्यं पातनयन्त्रके ॥ १५४ ॥
तं सूतं योजयेत्पश्चात्सप्तकञ्चुकवार्जितम् ।
इत्येवं शुद्धिराख्याता यथेष्टं तां च कारयेत् ॥ १५५ ॥

आणखी एका रसशास्त्रज्ञाचें मत असें आहे कीं,

फक्त लसुणाची भावना दिल्यानें सुद्धां पारा शुद्ध होतो. मात्र, त्याचा खल सैंधव घालून तप्त खल्वांत एक महिनाभर केला पाहिजे. अथवा सर्व त्रास वांचवावयाचा असेल तर हिंगुळांतूनच पारा पातनानें पृथक (Distill) करून घ्यावा, म्हणजे तो शिसें, कथील इत्यादि सप्त दोषांपासून रसायनक्रियेंत निर्भेळ शुद्ध असा मानला जातो. हिंगुळांतून काढलेला पारा गंधक जिरविलेल्या पाऱ्या-इतकाच गुणदायक आहे. परंतु पहिल्या प्रथम तो हिंगूळ कडुलिंबाच्या पाल्याच्या रसांत एक प्रहरपर्यंत खलला पाहिजे; किंवा कागदी लिंबाच्या रसांत खलला तरी चालेल. मग पातनयंत्रानें पारा निराळा काढून घ्यावा. असा पारा सप्त कंचुकांच्या दोषापासून अलिप्त असतो म्हणून (औषधांत) त्याची योजना करावी. याप्रमाणें पारा शुद्ध करण्याचे जे प्रकार सांगितले आहेत त्यांपैकीं वाटेल ती क्रिया करून पारा शुद्ध करावा. (१५५)

अन्यत्रापि—

अथवा दरदाकृष्टं खिन्नं लवणाम्बुभिस्तु दोलायाम् ।
रसमादाय यथेच्छं कर्तव्यस्तेन भेषजो योगः ॥ १५६ ॥
निम्बूरसेन संपिष्टात् प्रहरं दरदाद्वृढम् ।
ऊर्ध्वपातनयंत्रेण संग्राह्यो निर्मलो रसः ॥ १५७ ॥

इति सुगमशोधनम ॥

दुसऱ्या एका ग्रंथांत म्हटलें आहे कीं,

पारा हिंगुळांतून काढावा व सैंधवाच्या पाण्यांत दोलायंत्रानें उखळावा आणि मग वाटेल त्या औषधांत त्याचा उपयोग

करावा; किंवा लिंबाच्या रसांत एक प्रहरपर्यंत हिंगूळ खलून उर्ध्व-पातनयंत्रानें त्यांतील पारा काढून घ्यावा आणि अशा रीतीनें शुद्ध झालेल्या पाऱ्याचा संग्रह करावा. ही त्यांतल्यात्यांत सोपी शोधनक्रिया सांगितली. (१५७)

अथैवं शोधितस्य मुखकरणमुक्तं तंत्रान्तरे ।—
साम्यो रसः स्यात्पट्वाशिग्रुतुत्थैः सराजिकैः सोषणकैस्त्रिरात्रम् ।
पिष्टस्ततः स्विन्नतनुः सुवर्णमुखानयं खादति सर्वधातून् ॥
अन्यन्मतम् ।—

अथ षड्बिन्दुकीटैश्च रसो मर्द्यस्त्रिवासरम् ।
लवणाम्लैर्मुखं तस्य जायते ग्रासलोलुपम् ॥ १५९ ॥
' अथवा बिन्दुलीकीटैः ' इत्यपि पाठान्तरम् ।

शुद्ध पाऱ्याला खाण्याकरतां अभ्रक, सोनें हे जिन्नस घ्यावे लागतात, म्हणून त्या पाऱ्याला मुख उत्पन्न करावें लागतें, तें करण्याकरितां सैंधव, शेवग्याची साल, मोरचूद, मोहोऱ्या आणि त्रिकटु ह्यांच्या चूर्णांत पाऱ्याचा खल तीन रात्रीपर्यंत करावा; म्हणजे त्याचें पीठ होतें. मग त्याचें स्वेदन करावें; म्हणजे सुवर्ण वगैरे पाहिजे तो धातू तो पारा खाऊन टाकतो. (१५८)

दुसरा एक ग्रथकार म्हणतो का—

शुद्ध पारा व षट् बिंदुकीट यांचा एकत्र खल तीन दिवस करावा. खलतांना त्यांत सैंधव व लिंबाचा रस घालावा. म्हणजे सुवर्ण खाण्याकरतां वखवखलेला असा पारा तयार होतो. (१५९)

शार्ङ्गधरोऽपि--

कालकूटो वत्सनाभः शृङ्गीकश्च प्रदीपनः ।
हालाहलो ब्रह्मपुत्रो हारिद्रः सक्तुकस्तथा ॥ १६० ॥
सौराष्ट्रिक इति प्रोक्ता विषभेदा अमी नव ।
अर्कसेहुण्डधत्तूरलाङ्गलीकरवीरकाः ॥ १६१ ॥
गुञ्जाहिफेनावित्येताः सप्तोपविषजातयः ।
एतैर्विमर्दितः सूतश्छिन्नपक्षः प्रजायते ॥ १६२ ॥
मुखं च जायते तस्य धातूंश्च ग्रसतेतराम् ।
अथवा त्रिकटु क्षारौ राजी लवणपञ्चकम् ॥ १६३ ॥

रसोनो नवसारश्च शिग्रुश्चैकत्र चूर्णितैः ।
समांशैः पारदादैर्तजम्बीरात्थद्रवेण च ॥ १६४ ॥
काञ्जिकैर्निम्बुतोयैर्वा सोष्णखल्वे विमर्दयेत् ।
अहोरात्रत्रयेण स्याद्रसे धातुचरं मुखम् ॥ १६५ ॥

शार्ङ्धर हा ग्रंथकार प्रथम नऊ महाविषें कोणतीं तें सांगतो:-

कालकूट, बचनाग, शृंगीक, प्रदीपन, हालाहल, ब्रम्हपुत्र, हारिद्र, सक्तुक आणि सौराष्ट्रिक हे विषांचे नऊ भेद आहेत आणि रुई, सेहुण्ड, धोतरा, कळलावी, कण्हेर, गुंज व अफू ह्या सात उपविषांच्या जाती आहेत. हीं विषें किंवा उपविषें ह्यांच्याशीं पाऱ्याचा खल जर केला तर पक्ष्याचे पंख तोडावे त्याप्रमाणें पाऱ्याचें चंचलत्व नाहींसें होऊन घास घेण्याकरितां त्याला तोंड उत्पन्न होतें आणि सुवर्णादि धातूंचा तो भराभर फडशा करून टाकतो; किंवा सुंठ, मिरें, पिंपळी यांचे दोन क्षार; मोहऱ्या, पंचलवण, लसणीचा बलक, नवसागर आणि शेवगा ह्या जिनसांचीं चूर्णें वजनानें पाऱ्याइतकीं घेऊन त्यांचा पाण्याबरोबर तप्त खल्वांत खल करावा. खल करतांना ईडलिंबाचा रस, कांजी किंवा कागदी लिंबाचा रस घालून खल करावा. याप्रमाणें तीन अहोरात्र खल केल्यास त्या पाऱ्याला सुवर्णादि धातु खाऊन टाकतां येतील असें मुख उत्पन्न होतें. (१६५)

वस्तुतस्तु दीपनस्यैवापरपर्यायो मुखकरणमिति न पृथक् संस्कारः, तत्साधकान्यूनविंशतिकर्माणीति नियमभङ्गात् ॥
अथैवं संशुद्धरसे आदौ गन्धकजारणा । शिवागमे--
अजीर्णमथ चाबीजं सूतकं यस्तु घातयेत् ।
ब्रह्महा स दुराचारी मम द्रोही महेश्वरि ! ॥ १६६ ॥

अन्यत्रापि--

गुरुशास्त्रे परित्यज्य विना जारितगन्धकात् ।
रसं निर्माति दुर्मेधाः शपेत्तं परमेश्वरः ॥ १६७ ॥

तत्र गन्धकजारणा बहिर्धूमान्तर्धूमभेदेन द्विविधा । आद्या यथा-- 'तत्र षड्गुणगन्धजारणक्रिया साधीयसी निगद्यते' इत्युक्तं प्रागेव ॥

तन्निमित्तकं सिकतायन्त्राद्वयं कथ्यते। यथा—निरवधिनिष्पीडितमृदम्बरादिपरिलिप्तामातिकठिनकाचघटिमग्रे बक्ष्यमाणप्रकारां रसगार्भिणीमधस्तर्जन्यङ्गलिप्रमाणितच्छिद्रायामनुरूपस्थालिकायामरोप्य छिद्रस्य परितो द्वित्र्यङ्गलिमितेन लवणेन निरन्तरालीकरणपुरः सरं सिकताभिरापूर्य वर्धमानकमारोपणीयं; क्रमतश्च त्रिचतुराणि पञ्चषाणि वा वासराणि ज्वलनज्वालया पचनीयामित्येकं यंत्रं; हस्तैकमात्राप्रमाणभूगर्भान्तर्निखातां प्रागुक्तकाचघटीं नातिचिपिटमृखीं नात्युच्चमुखीं मषीभाजनप्राया खर्परचाक्रिकया वा निरुद्धवदनाविवरांमृन्मयीं वा घटीं विधाय करीषैरुपरी पुढो देय इत्यन्यद्यत्रम। 'यत्रमध्ये तू भुधरः' इति त्रिविक्रम। 'कूर्मयंत्रे रसे गन्धं षड्गुणं जारयेद्बुधः' इत्यन्ये। अत्र पक्षे रागस्तथा न स्यान. तेनादौ त्रिगुणं जारयित्वा शेषः कच्छ (क)पिकोदरे देयः, तदा रागः साघुः स्यात्। अत्र कज्जलीमन्तरेण केवलगन्धकमपि साम्येन जारयान्ति ॥

अथ रससिन्दूरादिष्वनुभूतगन्धकजारणाप्रकारमाह।—

कपीकोटरमागतं रसगुणैर्गन्धैस्तुलायां विभु
विज्ञाय ज्वलनक्रमं तु सिकतायत्रें शनैः पाचयेत्।
वारंवारमनेन वृद्धिविधिना गन्धक्षये सिद्धये
सिन्दूरादुदितोऽनुभूय भणितः कर्मक्रमोऽयं मया ॥

वस्तुतः वर संदीपन म्हणून जो आठवा संस्कार सांगितला आहे त्याचेंच दुसरें नांव " मुखकरण " हें होय. पाऱ्याला मुख उत्पन्न करणें हा संस्कार (संदीपनाहून) निराळा नाहीं. हा संस्कार स्वतंत्र मानला तर संस्कारांची संख्या वाढून शास्त्राशीं विरोध येईल.

याप्रमाणें पाऱ्याचें संदीपन झाल्यावर त्यांत प्रथम गन्धक जिरवावा. शिवागमग्रंथांत श्रीशंकर म्हणतात:—

पाऱ्याला गन्धक किंवा अभ्रक यांचा ग्रास न चारतां आणि त्यांत धातूंचें बीज स्थापन न करतांच जो त्याचें भस्म करील त्याला ब्रम्हहत्त्येचें पातक लागेल. हे पार्वती ! तो दुष्ट, दुराचारी मनुष्य माझा शत्रु होय. असें समज (१६६)

दुसऱ्या एका ग्रंथांत असें आढळतें कीं—

गुरूनें सांगितलेली क्रिया किंवा शास्त्र ह्या दोहोंचाहि अनादर करून जो कोणी पाऱ्यांत गन्धक न जिरवितां त्याचें रसायन बनवितो, तो मनुष्य दुष्टबुद्धि समजावा. त्याला परमेश्वर खचित शाप देईल (१६७).

गन्धकजारणा ही बहिर्धूम व अंतर्धूम अशा दोन प्रकारची आहे,म्हणून वर लिहिलें आहे. त्यांपैकीं बहिर्धूमक्रिया म्हणजे पाऱ्याच्या सहापट गन्धक त्यांत जिरविणें ही होय आणि तीच क्रिया विशेष चांगली असें पूर्वी सांगितलें आहेच.

सहापट गन्धक जिरविल्यावांचून पारा हा रोगनाश करूं शकत नाहीं आणि त्यांत अभ्रक, सुवर्ण, रौप्य, हे धातु जिरविल्याशिवाय त्याला रसायनत्वहि प्राप्त होत नाहीं हें निश्चित आहे, असें वर (श्लो. ११२ यांत) म्हटलेंच आहे. (१६८)

म्हणून जारणाक्रिया करण्याकरतां त्या क्रियेला योग्य अशा वालुकायंत्राचें वर्णन देतों.

वालुकायंत्रें दोन प्रकारचीं आहेत. पहिला प्रकार असा कीं—आगीला दाद न देणारी अशी एक कांचेची मजबूत कुपी घ्यावी. तिचा आकार पुढें सांगितला आहे, व त्या कुपीला अगदीं बारीक वस्त्रगाळ मातीनें चोपडलेल्या कपड्यानें कापडलेप करावा. नंतर कुपींत पारा ठेवावा आणि ती कुपी खापराच्या एका हंडींत ठेवावी. ह्या हंडीच्या बुडाला एक छिद्र इतकें मोठें पाडावें कीं, त्यांत बोट शिरूं शकेल. ह्या छिद्राभोंवतीं दोन तीन अंगुलें जाडीचा मिठाचा थर द्यावा व त्या थरावर पाऱ्याची कुपी ठेवावी, आणि कुपीभोंवतीं वाळू दाट ओतून हंडी भरावी. मग त्या हंडीवर झांकण बसवावें आणि हंडीखालीं तीन चार, किंवा पांच सहा दिवसपर्यंत सुद्धां धगधगीत अग्नि द्यावा. हें एक प्रकारचें वालुकायंत्र झालें.

दुसरें वालुकायंत्र असें आहे कीं, वर लिहिल्याप्रमाणें एक कांचेची मजबूत कुपी पैदा करावी. ती अशी कीं, तिचा गळा फार उंच नसावा किंवा अगदीं तोकडा नसावा. कुपीचा घाट साधारणपणें दौतीप्रमाणें असावा आणि तिला एक खापराचो किंवा कांचेची एक चकती बसती करावी. कुपी मातीची असली तरी चालेल. अशी कुपी अगर बोळकें तयार करून एक खाडा हातभर खोल खणून त्यांत ती कुपी अथवा बोळकें ठेऊन खाडा बुजवावा आणि वर रानशेणीच्या अग्नीचें पुट द्यावें. अशा तऱ्हेचें एक यंत्र आहे. परंतु त्रिविक्रमाच्या मतानें हें "**भूधर यंत्र**" होय आणि तें नांव अन्वर्थकहि आहे. सहापट गंधक जो जिरवावयाचा तो कूर्मयंत्रानें जिरवावा असेंहि कित्येक ग्रंथकार लिहितात. गंधक जिरविला तरी प्रथम पाऱ्याला चांगलासा रंग चढत नाहीं, म्हणून पहिल्यानें तिप्पट गंधक घेऊन तो जिरवून नंतर पुन्हा तिप्पट घ्यावा आणि तो कच्छपयंत्रानें जिरवावा. म्हणजे पाऱ्याला रंग चढतो. या यंत्रांत कज्जली रूपानें नव्हे, तरी प्रत्यक्ष गंधकच पाऱ्याच्या बरोबरीनें घेऊन तो जिरवावयाचा असतो.

आतां रससिंदूर करतांना पाऱ्यांत गंधक जिरविण्यासंबंधानें जो अनुभव येतो तो प्रकार लिहितों:— (पाऱ्याच्या) सहापट गंधक वजनानें घेऊन त्या बेतानें म्हणजे एकभाग पारा घ्यावा आणि दोन्हो एकत्र करून कुपींत भरून ती वालुकायंत्रांत ठेवावी आणि क्रमानें वाढती आंच देऊन त्याचें हळू हळू पचन करावें. ह्याप्रमाणें गंधक जिरवून आपला कार्यभाग साधण्यासाठीं वाढत्या आंचीनें रससिंदूर बनतो असा अनुभव आहे. म्हणून तो क्रम येथेंहि सांगितला. (१६९)

अत्र सप्तमृत्कर्पटैः समुद्रां कूपिकां कृत्वा वालुकायन्त्रे प्रहरचतुष्टयमाग्निं दद्यात्, यथाद्रव्यं वा पुनःपुनरेवं पाकं कुर्यात्, कूपिकायन्त्रं दृढं न भवेत्तदा पुनर्नवीनं संपादयेत्, यदि रससिन्दूरं स्यात्तदोर्ध्वपातनेन हिङ्गुलवन्निष्कासयेदित्येके । (अन्येऽपि

गन्धकजारणप्रकारा यंत्राध्याये द्रष्टव्याः ।) आरोटकमंतरेण हिङ्गुलगन्धकाभ्यां पिष्टाभ्यामपि सिन्दूररसः संपाद्यः । आरोटकशब्दस्तु शुद्धपर्यायवाचकः ॥

अन्यच्च—

त्रिगुणामिह रसेन्द्रमेकमंशम् कनकपयोधरतारपङ्कजानाम् ।
रसगुणबलिभिर्विधाय पिष्टिं रचय निरन्तरमम्बुभिः कुमार्याः॥

इति कज्जलीकरणम् ।

आषड्गुणं समादिबालिजारणेन योज्योऽयं योगः । पिष्टिः पात्या कज्जालिकार्थं जारणार्थं च । प्रकारोऽयमधोयंत्रेणैव सिध्यति न पुनरूर्ध्वयन्त्रेणेति कज्जली ॥

ही क्रिया करतांना कुपीला सात वेळा मातकापडाचा पक्का लेप करावा आणि कुपी वालुकायंत्रांत ठेवून चार प्रहर अग्नि द्यावा. ज्या मानानें कुपींतील पारा व गंधक यांचें प्रमाण असेल त्या मानानें अग्नि पुनः पुनः द्यावा. जर कुपी मजबूत नसेल तर (दुसऱ्या खेपेस आंच देते वेळीं) नवीन कुपी घ्यावी आणि त्यांत तें मिश्रण भरून आंच द्यावी. जर रससिंदूर बनला तर हिंगुळाप्रमाणें ऊर्ध्वपातनक्रियेनें पारा काढून घ्यावा असेंहि कित्येकांचें मत आहे. हे गंधक जिरविण्याचे प्रकार यंत्राध्यायांत लिहिले आहेत तेथें पहावें. आरोटक बनविल्यावांचून सुद्धां हिंगुळ व गंधक यांचें एकत्र चूर्ण करून त्यापासूनहि रससिंदूर बनवावा. आरोटक शब्द शुद्धिक्रियेचाच वाचक आहे

अन्यच्च—

काचमृत्तिकयोः कूपी हेम्नोऽयस्तारयोरपि ।
कीलालायःकृतो लेपः खट्टिकालवणाधिकः ॥ १७० ॥
अनेन यंत्रद्वितयेन भूरि हेमाभ्रसत्वान्यपि जारयन्ति ।
यथेच्छमच्छैः स्वमनोविचारैर्विचक्षणाः पल्लयवन्तु भूयः १७१
एतत्रिनेत्रादिप्रयोगविषयं न तु पिष्टिमूर्च्छनाविषयम् ॥
क्षालयेदम्लवर्गेण मूर्च्छितं समलं रसम् ॥ १७२ ॥ इति

एक ग्रंथकार म्हणतो कीं,

पारा तीन भाग आणि सुवर्ण, रौप्य किंवा ताम्र ह्यांपैकीं कोणताही जिन्नस एक भाग आणि गन्धक सहा भाग याप्रमाणें

घेऊन कोरफडीच्या रसांत एकसारखा खल करून पिष्टी करावी.

गन्धक समभाग किंवा दुपटीपासून सहापटीपर्यंत घेऊन जारणाक्रियेनें तो जिरवून हा योग करण्यास हरकत नाहीं. कज्जली करावयाची असली किंवा जारणा करावयाची असली तर पिष्टी केलीच पाहिजे. हा पिष्टियोग अधःपातनयंत्रानेंच साधतो. उर्ध्वपातनयंत्रानें साधणार नाहीं. हा कज्जली योग झाला.

कुपी कांचेची असो कीं मातीची असो, सुवर्णाची असो, किंवा लोह अगर रौप्य यांची असो, तिला मध व लोहचूर्ण यांचा लेप केला तर तो खडु आणि सैंधव यांच्या लेपापेक्षांहि मजबूत होतो.

याप्रमाणें दोन्ही प्रकारच्या यंत्रानें सुवर्ण व अभ्रक यांचीं सत्वें पाऱ्यांत जिरवितात. ह्या धोरणानें आपल्या मनांत योजना करून त्याप्रमाणें अनेक प्रकारचे पारदयोग किंवा यंत्ररचना सूज्ञांनीं करावी. (१७१)

परंतु हे अनेक योग जारणेचे आहेत पिष्ठीच्या मूर्च्छनेचे नव्हेत हें लक्षांत ठेवावें.

पारा मूर्च्छित झाला असला, पण त्यांत जर मळ राहिला असला, तर तो आम्लोदकानें (कांजीनें) धुवावा व स्वच्छ करावा. (१७२)

अन्तर्धूमविपाचितषड्गुणगन्धेन जारितः सूतः ।
गु
स भवेत्सहस्रवेधी तारे ताम्रे भुजङ्गे च ॥ १७३ ॥

रसरत्नाकरे ।—

जीर्णे शतगुणे गन्धे शतवेधी भवेद्रसः ।
सहस्रगुणिते जीर्णे सहस्रांशेन वेधयेत् ॥ १७४ ॥
एतत्प्रकारस्तु तत्रैव द्रष्टव्यः; प्राधान्यं षड्गुणस्य सर्वसं-
गु
मतम् ॥

अथ षड्गुणगन्धकजारणायां कच्छपयन्त्रं यथा—
गु
आकण्ठं कलशं भूमौ निखाय जलसंभृतम् ।
शरावस्तन्मुखे स्थाप्यो मध्ये छिद्रसमन्वितः ॥ १७५ ॥
नीरावियोगिनीं तत्र छिद्रे काचविलेपिताम् ।
मृन्मूषां स्थापयेत्तस्यामूर्ध्वाधस्तुल्यगन्धकम् ॥ १७६ ॥

डॉ. टिळक आयुर्वेद ग्रंथालय, पुणे

रसं निक्षिप्य तस्योर्ध्वं शरावेण विमुद्रयेत् ।
वन्योपलाग्निं तस्योर्ध्वं जालयेद्गुरुमार्गतः ॥ १७७ ॥
स्वाङ्गशीतं समुद्धृत्य पुनस्तुर्याशगन्धकम् ।
दत्त्वा पूर्वक्रमेणैव जारयेत् षडगुणं बालिम् ॥ १७८ ॥ इति ॥

पाऱ्याच्या सहापट गंधक घेऊन अन्तर्धूमपद्धतीनें जर तो जिराविला तर तो पारा रौप्य, ताम्र अगर शिसें ह्यांच्या पत्र्यांवर आपला सहस्रवेधी प्रभाव दाखवितो.

रसरत्नाकरकार म्हणतातः—

पाऱ्याच्या शंभरपट गंधक जर जिराविला तर पारा शतवेधी होतो आणि हजारपट जिराविला तर सहस्रवेधी होतो. पण ह्या क्रिया त्याच ग्रंथांत पाहाव्या. एरवीं सहापट गंधक जिरला तरी पुरे होतो हीच पद्धती मुख्य होय असाच सर्वांचा अभिप्राय आहे (१७४)

सहापट गंधक जिरविण्याला अवश्यक जें कच्छपयंत्र तें आतां सांगतों.एक मातीचें किंवा कांचेचें) भांडें घेऊन तें जमीनति त्याच्या गळ्याइतकें पुरावें आणि तें भरून पाण्यानें त्याच्या तोंडावर एक बसकट झांकण बसवावें. त्या झाकणाच्या मध्यभागीं एक छिद्र इतकें मोठें ठेवावें कीं, त्यांत एक मूस घट्ट बसवितां येईल आणि मूस अशा रीतीनें बसवावयाची कीं, तिचा जो भाग झांकणाच्या आंत असेल तो भांड्यांतील पाण्यांत बुडून राहावा. ही मूस मातीचीच पण तिला जिल्हई कांचेची करावी आणि मुशींत गंधकव पारा हे भरावे. निमा गंधक खालीं व निमा वर बसवून मध्यें पारा ठेवावा आणि मग मुशीला झांकण पक्कें बसवून तें लेपानें चिणावें. वाफ जाऊं देऊं नये. मग गुरुनीं सांगितल्याप्रमाणें मुशीवर रानशेणींचा अग्नि द्यावा. भट्टी आपोआप थंड झाल्यावर गंधकाचा चौथा भाग घेऊन पुनः याच क्रियेनें तो जिरवावा, असेंच पुनः पुनः करून सहापट गंधक जिरवावा. (१७८).

अथान्यप्रकारः ।—

सूते गन्धं रसैकांशं निक्षिप्य मृदुखल्वके ।
तावत्संकुट्टयेत्पिण्डं भवेद्धा ताम्रपात्रके ॥ १७९ ॥
ततुल्यं गन्धकं दत्त्वा रुद्धा तल्लोहसंपुटे ।
पुटयेद्भूधरे यन्त्रे यावज्जीर्यति गन्धकः ॥ १८० ॥
एवं पुनः पुनर्गन्धं दद्याद्याशाद्गुणं बुधः ॥ १८१ ॥ इति ॥

आतां दुसरा प्रकार सांगतों.

पारा आणि त्याच्या कांहीं एक अंशाइतका गंधक घेऊन एका गुळगुळीत खलांत अगर तांब्याच्या भांड्यांत दोन्ही घालून त्यांचा असा खल करावा कीं, त्यांचो गोळी बनेल. नंतर पुनः गंधक पाऱ्याशीं समभाग होईल इतका घालून खलून तें मिश्रण लोखंडाच्या मुशींत ठेवावें आणि मूस (वायुविरोधक ; लेप देऊन पक्की बंद करावी आणि गंधक जिरेपर्यंत भूधरयंत्रांत आंच द्यावी. ह्या-प्रमाणें वरचेवर थोडा थोडा गंधक जिरवीत जावा. तो सहा पटी-पर्यंत जिरवावा. (१८१)

अथ कच्छपयन्त्रेण गन्धजारणमाह शार्ङ्गधर :—

मृत्कुण्डे प्रक्षिपेन्नीरं तन्मध्ये च शरावकम् ।
महत्कुण्डपिधानाभं मध्ये मेखलया युतम् ॥ १८२ ॥
लिप्त्वा च मेखलामध्यं चूर्णेनात्र रसं क्षिपेत् ।
रसस्योपरि गन्धस्य चूर्णं दद्यात्समांशकम् ॥ १८३ ॥
दत्त्वोपरि शरावं च भस्ममुद्रां प्रदापयेत् ।
दस्योपरि पुटं दद्याच्चतुर्भिर्गोमयोद्भवैः ॥ १८४ ॥
एवं पुनः पुनर्गन्धं षड्गुणं जारयेद्भधः ।
गन्धे जीर्णे भवेत्सूतस्तीक्ष्णाग्निः सर्वकार्यकृत् ॥ १८५ ॥ इति ॥

कच्छपयंत्रांत गंधक कसा जिरवितात, तो प्रकार शार्ङ्गधर याप्रमाणें वर्णन करतात.

एक मातीचा मोठा मोरवा घेऊन त्यांत पाणी भरावें आणि त्या मोठ्या मोरव्याच्या तोंडांवर परळ ठेवून त्याच्या मध्यभागीं थोडा खोल असा एक वांटोळा खळगा कोरावा आणि त्याला चुन्याचा लेप सारवून त्या खळग्यांत पारा ठेवावा.नंतर त्याच्यावर गंध-

काची पूड समभाग घेऊन टाकावी आणि खळग्यावर एक झांकण पालथें घालून त्याच्यावर राखेचें लुकण लावावें; आणि तें वाळल्यावर त्याच्यावर चार रानशेणीच्या अग्नीचें पुट द्यावें. याप्रमाणें सहा पट गंधक जिरेपर्यंत पुटें द्यावीं. इतका गंधक जिरला म्हणजे पाऱ्याचें तेज तीव्र होऊन तो पाहिजे त्या कार्याला उपयोगी पडतो. (१८५)

रसरत्नाकरे—

संस्थाप्य गोमयं भूमौ पक्वमूषां तथोपरि।
तन्मध्ये कटुतुम्ब्युत्थं तैलं दत्त्वा रसं क्षिपेत्॥ १८६॥
काकमाचीद्रवो देयस्तैलतुल्यः पुनः पुनः।
गन्धकं व्रीहिमात्रं च क्षिप्त्वा तां च निरोधयेत्॥ १८७॥
तत्पृष्ठे श्रावको देयः पूर्णं वा वन्हिखर्परम्।
स्वाङ्गशीतलतां ज्ञात्वा जीर्णं तैलं च गन्धकम्।
काकमाचीद्रवं चाग्निं दत्त्वा दत्त्वा तु जारयेत्॥ १८८॥
मूषाधो गोमयं सान्द्रं दत्त्वा चोर्ध्वं च पावकम्।
षड्गुणो गन्धको जार्यः सूतस्यैवं मुखं भवेत्॥ १८९॥
इत्याद्यजारणम्॥

रसरत्नाकरांतील कृतिः—

जमीनिवर रानशेणी ठेवून त्यावर चांगली भाजलेली मूस ठेवावी आणि त्यांत कडुभोंपळीचें तेल ओतून त्यांत पारा टाकावा आणि कावळीचा रस तेलाच्या बरोबरीनें घेऊन तो थोडाथोडा त्या पाऱ्यावर वरचेवर ओतावा. मग व्रीहि म्हणजे तांदुळाइतका गंधक त्यांत टाकून मुशीचें तोंड बंद करून वर झांकण ठेवून अग्नि द्यावा किंवा खापर ठेवून त्यांत आगीचें झगरें करावें. अग्नि निवाल्यावर तेल आणि गंधक जिरलें किंवा नाहीं तें पहावें. गन्धक जिरला असें दिसलें म्हणजे पुनः कावळीचा रस तेलाइतकाच घेऊन तो मुशींत ओतून (पुनः गंधक टाकून) अग्नी द्यावा व गंधक जिरवावा. मुशीखालीं गाईचें शेण दाट लावून वर अग्निपुट द्यावें. याप्रमाणें सहापट गंधक जिरला म्हणजे पाऱ्याला तोंड फुटतें. (१८९)

अथान्त्यं यथा—

सूतप्रमाणं सिकताख्ययन्त्रे दत्त्वा बालिं मृद्घटितेऽल्पभाण्डे ।
तैलावशेषं च रसं निदध्यान्मग्नार्धकायं प्राविलोक्य भूयः १९०
आषड्गुणं गन्धकमल्पमल्पं क्षिपेद्रसो जीर्णबालिर्बलीयान् ।
रसेषु सर्वेषु नियोजितोऽयमसंशयं हन्ति गदं जवेन ॥ १९१ ॥
इति गन्धकजारणम् ॥

शेवटचें पुट द्यावें तें असें:—

एका लहानशा मातीच्या बोळक्यांत तो पारा व तितकाच गन्धक घालावा आणि शिल्लक राहिलेलें तेल आणि (कावळीचा) रस हे त्या मिश्रणावर ओतावे. ते इतके कीं, पारा त्यांत अर्धा बुडून जाईल. त्याप्रमाणें तो बुडाला किंवा नाहीं हे पहावें. अशा रीतीनें गंधक सहापट जिरेपर्यंत थोडाथोडा देत जावा व (कावळीचा) रसाहि तसाच थोडाथोडा त्यावर घालावा. (याप्रमाणें सर्व गंधक जिरेपर्यंत क्रिया करावी,) म्हणजे पारा बलाढ्य होतो व त्याचा योग कोणत्याहि धातूशीं केला तरी वाटेल त्या रोगाचा तो धडाक्यासरशीं नाश करतो. (१९१)

ही गंधकजारणा झाली.

अथ स्वर्णजारणम् ।

तदुक्तं—

गन्धकजारणमादौ कुर्यादथ जारणं सुवर्णस्य ।
जलधरसत्त्वस्य ततो जारणमथ सर्वलोहानाम् ॥ १९२ ॥

आतां सुवर्ण जारणा सांगतों:—

असें म्हटलें आहे कीं:—

अगोदर (पाऱ्यांत) गन्धक जिरवून नंतर त्यांत सुवर्ण जिरवावें. मग अभ्रकभस्म जिरवावें आणि मग वाटेल तो धातू जिरवावा. (१९२)

अथ तदुपयोगिबिडकथम् ।

काञ्चनादिग्रसनतीव्रबुभुक्षाकराणि द्रव्याणि बिडानि कथ्यन्ते । यथा—

वज्रिकान्डं तु वज्राग्रविद्धमप्राङ्गुलं मृदा ।
विलिप्य गोविशाऽल्पाग्नौ पुटितं तत्र शोषितम् ॥ १९३ ॥
त्र्यहं वज्रिबिले क्षिप्तो ग्रासार्थी जायते रसः ।
ग्रसते गन्धहेमादिवज्रसत्त्वादिकं क्षणात् ॥ १९४ ॥

पण ही जारणाक्रिया सिद्धिस जाण्यास पहिल्यानें "बिड" तयार करावा लागतो त्याची क्रिया लिहितों:—

बिड म्हणजे सुवर्ण वगैरे खनिज पदार्थ खाऊन टाकण्याइतकी कडकडीत भूक पाऱ्याला लागावी म्हणून मसाल्याप्रमाणें निरानिराळे पदार्थ तयार करतात त्यांना बिड म्हणतात. ते बिड असें:—

निवडुंगाचें फळ काट्यानें कोरून त्याची मूस करावी, व ती मातीनें व शेणानें आठ बोटें जाडीपर्यंत लिंपावी. लेप सुकल्यावर अग्नीची थोडी आंच द्यावी. पारा. निवडुंगाच्या मुशींत तीन दिवस ठेऊन तसाच राहूं दिला म्हणजे त्याची भूक अतिशय वाढते आणि तो गंधक सुवर्ण वगैरे खनिज आणि कृष्णाभ्रक वगैरे सत्वें क्षणांत खाऊन फस्त करतो. (१९४)

मूर्च्छाध्यायोक्तषङ्गुणबलिर्जीर्णीपिष्टिकोत्थितरसः खल्वेऽत्यन्तं बुभुक्षितो घनहेमवज्रसत्त्वादि त्वरितमेव ग्रसतीत्यन्यप्रकारः । एतद्द्वयमपि कृत्वा व्यवहरन्त्यन्ये । अथान्ये बिडाः—

सतुत्थं टङ्कणं स्वर्जिः पटु ताम्रे त्र्यहोषितम् ।
काञ्जिकं भावितं तेन गन्धाद्यं चरति क्षणात् ॥ १९५ ॥
बिडे सकाञ्जिके क्षिप्तो रसः स्याद्ग्रासलालसः ।
ग्रसते सर्वलोहानि सर्वसत्त्वानि वज्रकम् ॥ १९६ ॥

मूर्च्छाध्यायांत सांगितल्याप्रमाणें सहापट गन्धक जिरवून पिष्टी केलेल्या पाऱ्याचें पुनः उत्थान करून तो खलला असतां त्याला अतिशय खाखा सुटते, त्यामुळें अभ्रक, सोनें, रत्नें इत्यादिकांचीं सत्वें तो तत्काळ खाऊन टाकतो. सत्वें जिरविण्याचा हाहि एक प्रकार आहे. कोणी ह्या दोन्ही प्रकारच्या क्रिया करतात.

आतां दुसरे कांहीं बिड सांगतोः—

तांब्याच्या भांड्यांत कांजी घालून त्यांत मोरचूद, टांकण-खार, सज्जीखार व सैंधव हे जिन्नस तीन दिवस भिजत ठेवावे आणि कांजींची भावना पाऱ्यास द्यावी, म्हणजे तो पारा गंधक वगैरे पदार्थ क्षणांत खाऊन टाकतो. त्याचप्रमाणें "बिड" मिसळलेल्या कांजींत पारा बुडवून ठेवला असतां त्याला खाखा सुटते. मग तो पारा पाहिजे त्या धातूला व कृष्णाभ्रक वगैरेच्या सत्वांना खाऊन टाकतो. (१९६)

अथान्यप्रकारः ।—

शङ्खचूर्णं रविक्षीरैरातपे भावयेद्दिनम् ।
तद्वज्जम्बीरजद्रावैर्दिनैकं धूमसारकम् ॥ १९७ ॥
सौवर्चलमजामूत्रैर्भाव्यं यामचतुष्टयम् ।
कण्टकारीं च संक्वाथ्य दिनैकं नरमूत्रके ॥ १९८ ॥
स्वार्जिक्षारं च कासीसं तिन्तिडीकं शिलाजतु ।
जम्बीरोत्थद्रवैर्भाव्यं पृथग्यामचतुष्टयम् ॥ १९९ ॥
निस्तुषं जयपालं च मूलकानां द्रवैर्दिनम् ।
सैन्धवं टङ्कणं गुञ्जां दिनं शिग्रुजटाम्भसा ॥ २०० ॥
एतत्सर्वं समांशं तु मर्द्यं जम्बीरजद्रवैः ।
तद्गोलं रक्षयेद्यत्नाद्बिडोऽयं वडवानलः ॥ २०१ ॥
अनेन मर्दितः सूतः संस्थितस्तप्तखल्वके ।
स्वर्णादिसर्वलोहानि सत्त्वानि ग्रसते क्षणात् ॥ २०२ ॥

इति वडवानलो बिड : ॥

बिडाचा दुसरा प्रकारः—

शंखचूर्ण रुईच्या चिकांत खलून एक दिवस उन्हांत ठेवून त्या चिकाची भावना द्यावी. त्याचप्रमाणें घेरोसा कागदी लिंबाच्या रसांत एक दिवसभर बुडवून ठेवून भावना द्यावी संचळ खाराला शेळीच्या मूत्राची भावना चार प्रहरपर्यंत द्यावी. रिगणीच्या चूर्णाला नरमूत्रांत एक दिवस उकळत ठेवून भावना द्यावी. त्याचप्रमाणें सज्जी-खार, हिराकस, चिंचोका, शिलाजित ह्या प्रत्येकास कागदी लिंबाच्या रसाची चार चार प्रहर भावना द्यावी. जपाळ बीजाची कवची

काढून टाकून त्याला मुळ्याच्या रसाची भावना एक दिवस द्यावी. सैंधव, टांकणखार व गुंजा ह्यांनां शेवग्याच्या मुळीच्या रसाची भावना द्यावी. नंतर हे सर्व जिन्नस समभाग घेऊन त्यांचा कागदी लिंबाच्या रसांत खल करावा आणि गोळी करून जपून ठेवावी. ह्याला " वडवानल बिड " म्हणतात. तप्तखल्वांत पाऱ्याला हा बिड देऊन खल केला म्हणजे सोनें वगैरे धातूंचा ग्रास तो एका क्षणांत करतो. (२०२) याप्रमाणें " वडवानल बिड " सांगितला.

मूलकार्द्रकवन्हीनां क्षारं गोमूत्रगालित ।
वस्त्रपूतो द्रवो ग्राह्यो गन्धकं तेन भावयेत् ।
शतवारं खरे धर्मे बिडोऽयं हेमजारणे ॥ २०३ ॥
इति सिद्धलक्ष्मीश्वरतन्त्रोक्तो बिड : ॥
एवं बिडान्तराण्यपि तन्त्रान्तरादनुसर्तव्यानि । इति बिडकथन ॥

आतां सिद्ध लक्ष्मी तंत्रोक्त बिड सांगतों:—

मुळा, आलें आणि चित्रक ह्यांचा क्षार गोमुत्रांत कोळून तें मिश्रण फडक्यांतून गाळून घ्यावें. ह्या मिश्रणांत गंधक भिजत ठेवून त्याला कडकडीत उन्हांत शंभर भावना द्याव्या, म्हणजे सुवर्ण जिरविण्याजोगा बिड तयार झाला.(२०३).

ह्याप्रमाणें ग्रंथांत दुसरेहि अनेक बिड सांगितले आहेत. त्यांपैकीं कोणताहि बिड तयार करावा.

चतुः षष्ट्यंशकं हेमपत्रं मायूरमायुना ।
विलिप्तं तप्तखल्वस्थे रसे दत्त्वा विमर्दयेत् ।
दिनं जम्बीरतोयेन ग्रासे ग्रासे त्वयं विधिः ॥ २०४
शनैः संस्वेदयद्भूर्जे बध्द्वा सपटुकाञ्जिके ।
भाण्डके त्रिदिनं सूतं जीर्णस्वर्णं समुद्धरेत् ॥ २०५ ॥
अधिकस्तोलितश्चेत्स्यात्पुनः स्वेद्यः समावधि ।
द्वात्रिंशत्त्षोडशाष्टांशकमेण वसु जारयेत् ॥ २०६ ॥
रूप्यादिषु च सत्त्वेषु विधिरेवंविधः स्मृतः ।
चूल्लिकालवणं गन्धमभावे शिखिपित्ततः ॥ २०७ ॥
इति स्वर्ण रूप्यादिसर्वसत्त्वजारणविधिः ॥

सुवर्ण जारण.

(पाऱ्याच्या) चौसष्टाव्या हिश्शाइतकें सोनें घेऊन त्याचे पातळ पत्रे करावे आणि त्यांना मोराच्या पित्ताचा लेप द्यावा. नंतर ते पत्रे आणि पारा ह्यांचा तप्त खल्वांत एक दिवसभर लिंबाच्या रसांत खल करावा, ह्मणजे तें सोनें पारा खाऊन टाकतो. नंतर सोन्याचा दुसरा ग्रास त्याच पद्धतीनें द्यावा. मग कांजींत सैंधव विरघळून सुवर्ण खाल्लेल्या पाऱ्याची पोटळी भूर्जपत्रांत बांधून त्या कांजीत त्याचें सावकाश स्वेदन करावें, ह्मणजे खाल्लेलें सोनें बाहेर निघतें. नंतर पारा वजन करावा. वजनांत जास्त भरला तर त्यांत सोनें शिल्लक राहिलें आहे असें समजून वजन पूर्वीइतकें होईपर्यंत पुनः पुनः स्वेदन करावें. सुवर्णाचा ग्रास देण्याकरितां सोनें घेतात तें प्रथम बाविसाव्या हिश्शाइतकें, नंतर सोळाव्या हिश्शाइतकें, नंतर आठव्या हिश्शाइतकें या क्रमानें घेतात. रुपें वगैरचीं सत्वें जिराविण्याकरितां क्रिया हीच करावयाची असते. मोराचें पित्त न मिळेल तर चुल्लींकाक्षार (म्ह० नवसागर) व गंधक ह्यांचा लेप दिल्यास चालेल.

याप्रमाणें सोनें, चांदी वगैरे धातूंची सत्वें जिराविण्याचीं क्रिया सांगितली. (२०७)

अथ तप्तखल्वलक्षणम् ।—

अजाशकृत्तुषाग्निं च खानयित्वा भुवं क्षिपेत् ।
तस्योपरि स्थितो लोहखल्वः स तप्तखल्वकः ॥ २०८ ॥
इति तप्तखल्वलक्षणम् ॥

अथ सिद्धमते दोलायंत्रेण हेमजारणं यथा—

सग्रासं पञ्चषड्भागैर्यवक्षारैर्विमर्दयेत् ॥
सूतं तत्षोडशांशेन गन्धेनाष्टांशकेन वा ॥ २०९ ॥
ततो विमर्द्य जम्बीररसे वा काञ्जिकेऽथवा ।
दोलापाको विधातव्यो दोलायन्त्रमिदं स्मृतम् ॥ २१० ॥
दिनत्रयं वा जीर्णावधि दोलापाको विधातव्य इति भावाः ॥
इति दोलाजारणम् ॥

अथान्यत्सिद्धमते कच्छपयन्त्रेण काञ्चनग्रसनं, यथा—

शाध्वद्भूताम्बुपात्रस्थशरावच्छिद्रसंस्थिता ।
पक्वमूषा जले तस्यां रसोऽष्टांशबिडावृतः ॥ २११ ॥
संरुद्धो लोहपात्र्याऽथ मुद्रितो दृढमुद्रया ।
वालुकां तदुपर्यष्टांगुलमानां विनिक्षिपेत् ॥ २१२ ॥
हठात्तदुपरि ध्मातो रसस्तद्भर्भसंस्थितः ।
मायूरमायुना लिप्तं काञ्चनं ग्रसति ध्रुवम् ॥ २१३ ॥

इति कच्छपयत्रन्त्रम् ॥

आतां तप्त खल्व सांगतों.

शेळीच्या लेंड्या आणि धान्याचा भुसा ह्यांचा अग्नि एका खड्डयांत करावा आणि त्या आगीवर लोखंडाचा खल ठेवून तो तापविला म्हणजे तप्तखल्व झाला.

दोलायंत्रानें सुवर्ण जिरविण्याचा प्रकारः--

(पाऱ्याच्या) सोळाव्या किंवा आठव्या हिश्शाइतका गंधक घेऊन त्याचा ग्रास पाऱ्यास चारावा; तो पारा एक भाग आणि जवखार पांच किंवा सहा भाग व सोन्याचा ग्रास असे एकत्र करून खलावे व नंतर पुनः कागदी लिंबाच्या रसांत अगर कांजींत खलून पोटळी बांधून दोलायंत्रांत तें मिश्रण उकळावें. याप्रमाणें दोलायंत्र क्रिया आहे. (२१०). दोन तीन दिवसपर्यंत किंवा सोनें जिरेपर्यंत उकळण्याचा क्रम चालवावा.

कोणी कच्छपयंत्रानें सुवर्णाचा ग्रास देतात, तो प्रकार असा:--

पाणी कायम राहील अशा रीतीनें एका भांड्यांत पाणी भरून त्यावर एक परळ चिकार बसतां करावा व त्या परळाचे मध्यभागीं भोंक पाडून त्यांत एक निरडलेली मूस अशा रीतीनें बसवावी कीं, ती त्या भांड्यांतील पाण्यांत बुडालेली राहील. मग त्या मुशींत पारा त्याच्या आठव्या हिश्शाइतक्या बिडानें लपेटून ठेवावा आणि मुशीवर लोखंडाचें झांकण बसवून सांध्याला लुकण

लावून लिंपून टाकावें. नंतर मुशीवर आठ अंगुळें वाळू पसरावी आणि त्यावर सडकून आंच द्यावी, ह्मणजे तो पारा मोराच्या पित्तानें लेप दिलेले सोन्याचे पत्रे खात्रीनें खाऊन टाकील (२१३)

उक्तं च—

सच्छिद्रं सलिलात्पूर्णभाण्डवक्त्रे शरावकम्।
दत्त्वा छिद्रे पक्वमूषा देया नीराधियोगिनी।
तस्यां बिडावृतः सूतो देयो लोहावृते मुखे॥ २१४॥
दत्त्वोपरि वालुकां हि मुद्रां दत्त्वा शनैः शनैः।
धमातो धमातो ग्रसत्येव काञ्चनं सूक्ष्मतां गतम्॥ २१५॥
स्वल्पं सपित्ततार्क्ष्यात्तं शनैर्देयं समावधि।
देहार्थे, धातुवादार्थे प्रयच्छन्त्यल्पबुद्धयः॥ २१६॥
इत्यपि कच्छपयंत्रम्॥

अशाच तऱ्हेचें वर्णन दुसऱ्या एका ग्रंथांत आहे. तें असें:—

एका पाण्यानें भरलेल्या भाण्ड्याच्या तोंडावर एक (खोलगट) झांकण करून त्या झांकणाच्या मध्यभागीं पाडलेल्या छिद्रामध्यें मूस घालून ती भांड्यांतील पाण्यांत बुडती राहील अशा रीतीनें बसवावी व तिच्यांत बिडानें लपेटलेला पारा ठेवावा आणि तोंड लोखंडाच्या पात्रानें बंद करून वर वाळू पसरून व (सांध्याला) लेप देऊन सावकाश आंच देऊन पुटावर पुटें द्यावीं, म्हणजे तो पारा सोन्याचा वर्ख खाऊन टाकतो ग्रासाकरतां सोन्याचे पत्रे करून त्यांना (मोराचें) पित्त व माक्षिकाचें चूर्ण थोडें चोपडावें व त्या पत्र्यांना हळू हळू ग्रास द्यावा. सोनें पाऱ्याच्या बरोबरीने भरेल इतकोदखील ग्रास देतां येतो. याचा उपयोग देहसिद्धीकडे (ह्मणजे आयुरारोग्य वाढवण्याकडे) करावा. किमयेकडे करणें हें योग्य नव्हें. किमयेकडे उपयोग करणें हें अप्रबुद्धपणाचें लक्षण आहे. (२१६)

अथ मतान्तरं यथा—

कुण्डाम्भसि लोहमये सबिडं सग्रासमीशजं पात्रे।
अतिचिपिटलोहपात्र्या पिधाय संलिप्य वान्हिना योज्यः।२१७
इयितैव रसातनयतात्पर्यं पर्यवस्यति, किंतु वादस्य न प्राधान्यम्॥

इति हेमजारणा॥

दुसऱ्या ग्रंथकाराचें मत आहे तें असें:—

एका भांड्यांत पाणी ओतावें आणि त्यांत एक लोखंडाचें भांडें ठेवून त्यांत बिड व पारा आणि सुवर्णाचा ग्रास घालून दुसऱ्या एका बसकट अशा लोखंडी भांड्यानें तोंड बंद करून सांधा लेपानें चिणून टाकावा व अग्निपुट द्यावें. इतक्या क्रियेनें पाऱ्याचें रसायन बनतें; परंतु या क्रियेंत किमयेला प्राधान्य दिसत नाहीं (२१७)

ही सुवर्णजारणा झाली.

अथ संप्रत्युभयप्राधान्येन जारणा यथा, तत्र घन सत्वजारणम्। यत उक्तं—

घनरहितबीजजारणसंप्राप्तदलादिसिद्धिकृतकृत्याः।
कृपणाः प्राप्य समुद्रं वराटिकालाभसंतुष्टाः ॥ २१८ ॥
मुक्त्वैकमभ्रसत्त्वं नान्यो रसपक्षकर्तनसमर्थः।
तेन निरुद्धप्रसरो नियम्यते बध्यते च सुखम् ॥ २१९ ॥
रक्तं पीतं च हेमार्थे कृष्णं हेमशरीरयोः।
तारकर्माणि तच्छुक्लं काचाकिट्टं सदा त्यजेत् ॥ २२० ॥
त्रुटिशो दत्वा मृदितं सोष्णे खल्वेऽभ्रसत्वहेमादि।
चरति रसेन्द्रः क्षितिखगवेतसजम्बीरबीजपूराम्लैः ॥ २२१ ॥

क्षितिखगः कासीसम्। अम्लाभावे पूर्वसाधितकाञ्जिकमपि ज्ञेयम्। अन्यच्च—

अभ्रकाजारणमादौ गर्भद्रुतिजारणं च हेम्नोऽन्ते।
यो जानाति न वादी वृथैव सोऽर्थक्षयं कुरुते ॥ २२२ ॥

इत्यभ्रकसत्त्वजारणा ॥

आतां रसायन आणि किमया या दोहोंनाहि उपयोगी अशी जारणा अभ्रकाची होय. ती सांगतों. गोविंदाचार्य ह्मणतात:—

अभ्रकसत्व पाऱ्यांत जिरविल्याशिवाय जे कोणी हलक्या प्रतीच्या किमयेचे प्रयोग करून आपण कृतकृत्य झालों असें समजतात ते मूर्ख होत. रत्नांनीं भरलेला समुद्र जवळ असतां ते बेटे त्यांतून फक्त कवड्याच गोळा करून खुष होतात असें म्हटलें पाहिजे, दुसरें काय? अभ्रकसत्वाशिवाय दुसरा कोणताहि पदार्थ पाऱ्याचे पंख तोडून त्याच्या चांचल्याचा नाश करूं शकत नाहीं.

त्याचें चांचल्य मोडून हालचाल बंद केली म्हणजे मग त्याला हवा तसा वांकवावा, घट्ट करावा, काय पाहिजे तें करावें. सोनें करावयाचें असेल तर अभ्रक तांबडें किंवा पिंवळें घ्यावें; काळें अभ्रक किमया आणि शरीरारोग्य ह्या दोहोंनाहि उपयोगी पडतें. पांढरें अभ्रक रौप्य कर्माला पाहिजे; पण कांचेच्या मळीप्रमाणें जें अभ्रक असतें तें नेहमींच टाकाऊ असतें; तें घेऊं नये. अभ्रकसत्व व सोनें वगैरे जिन्नस, तप्तखल्वांत पारा घालून त्याला थोडें थोडें देत गेलें म्हणजे तो त्यांना खाऊन टाकतो. मात्र खल करतांना त्यांत हिराकस व आम्लवेतस, कागदी लिंबू महालुंगा यांचे आंबट रस घातले पाहिजेत. (२२१) मुळांत "क्षितिखग" असा शब्द आहे, त्याचा अर्थ हिराकस.

आम्ल रस न मिळतील तर त्याबद्दल कांजी घेतली तरी चालेल.

पहिल्यानें अभ्रक सत्व जिरवून, शेवटीं सोन्याचा ग्रास गर्भद्रुतिक्रियेनें जिरवावा. ही क्रिया ज्याला माहीत नाहीं तो कसला किमयागार? तो द्रव्याची वायफळ उधळपट्टी करीत आहे असें समजावें (२२२).

अथ गर्भद्रुतिः ।

व्योमसत्त्वं समांशेन ताप्यसत्त्वेन संयुतम् ।
साकल्येन चरेद्वेवी गर्भद्रावी भवेद्रसः ॥ २२३ ॥
एवं हेमताराभ्रादयः स्वस्वरिपुणा निर्व्यूढाः प्रयोजनपमवलोक्य प्रयोज्याः । गर्भद्रुतिमन्तरेण जारणैव न स्यात् ।
अतस्तल्लक्षणमाह—वन्हिव्यतिरेकेऽपि रसग्रासीकृतानां (लोहानां) द्रवत्वं गर्भद्रुतिः ॥
बीजानां संस्कारः कर्तव्यस्ताप्यसत्त्वसंयोगात् ।
येन द्रवन्ति गर्भे रसराजस्याम्लवर्गेण ॥ २२४ ॥
शिलया निहतं नागं ताप्यं वा सिन्धुना हतम् ।
ताभ्यां तु मारितं बीजं सूतके द्रवति क्षणात् ॥ २२५ ॥

अथ दोलाजारणम् ।—

पट्वम्लक्षारगोमूत्रस्नुहीक्षीरप्रलेपिते ।
बद्धे बहिश्च वस्त्रेण भूर्जे ग्रासनिवेशितम् ॥ २२६ ॥
क्षारारनालमूत्रेषु स्वेदयेत्त्रिदिनं भिषक् ।
क्रमेणानेन दोलायां जार्यं ग्रासचतुष्टयम् ।
ततः कच्छपयंत्रेण ज्वलने जारयेद्रसम् ॥ २२७ ॥

इति गर्भद्रुतिः ॥

आतां गर्भद्रुति सांगतों—

गर्भद्रुति, अभ्रकसत्व व सुवर्णमाक्षिकाचें सत्व ह्याच्या इतका वजनानें कोणताहि धातु घेऊन सर्व एकत्र करून खलून त्याचा ग्रास पाऱ्याला दिला म्हणजे, हे पार्वती, पारा गर्भद्रावी होतो (२२३).

यावमाणें सुवर्ण, रौप्य, अभ्रक इत्यादि पदार्थांना त्यांच्या त्यांच्या मारक वस्तूची भावना देऊन आपल्या कार्याला ते उपयोगी पडतील असें करावें; गर्भद्रुति झाल्याशिवाय जारणा होतच नाहीं. म्हणून गर्भद्रुति अवश्य आहे.

याकरितां गर्भद्रुतीचें लक्षण सांगतोः—

ग्रासरूपानें पाऱ्याला चारलेले पदार्थ आंच दिल्याशिवाय द्रवरूप होतात, त्या क्रियेला गर्भद्रुति म्हणावें.

सुवर्णमाक्षिकाचें सत्व पाऱ्यांत जिरवून मग त्या पाऱ्यामध्यें आपणाला इष्ट वाटेल त्या धातूचें बीज टाकावें. म्हणजे आम्ल वर्गांतील पदार्थांच्या सहायानें पाऱ्यामध्यें नाना प्रकारच्या धातूंचीं बीजें विरून जातात.

शिशाचें बीज देणें असेल तर शिसें मनशिळानें मारलेलें असावें. सुवर्णमाक्षिक बीज देणें असेल तर प्रथम माक्षिक निर्गुडीनें मारलें पाहिजे. शिसें आणि माक्षिक या दोहोंच्या सहाय्यानें मारलेलें कोणतेंहि बीज पाऱ्यांत तत्क्षणीं मुरतें. (२२५)

मग दोलायंत्रानें जारण करावें तें असेः—

सैंधव आम्ल, क्षार, गोमूत्र व त्रिधारीः :निवडुंगाचा चीक हे एकत्र करून भूर्जपत्राला लेप करावा व त्यांत पारा व ग्रास ठेऊन भूर्जपत्रास बाहेरून फडकें गुंडाळून पोटळी बांधावी आणि क्षार, कांजी व गोमूत्र ह्यांत तीन दिवस तिचें स्वेदन करावें. याप्रमाणें क्रमानें चारी ग्रास दोलायंत्रानें पाच्याला देऊन जिरवावे आणि मग कूर्मयंत्रानें पुट देऊन आग्निमध्यें रस (?) जिरवावा. (२२७)

अथ ग्रासस्य चारणप्रमाणम् ।

चतुःषष्ट्यंशकः पूर्वो द्वात्रिंशांशो द्वितीयकः ।
तृतीयः षोडशांशस्तु चतुर्थोऽष्टांश एव च ॥ २२८ ॥
चतुःषष्ट्यंशकग्रासाद्दण्डधारी भवेद्रसः ।
जलौकावद्द्वितीये तु ग्रासयोगे सुरेश्वरि ॥ २२९ ॥
ग्रासेन तु तृतीयेन काकविष्ठासमो भवेत्
ग्रासेन तु चतुर्थेन दधिखण्डसमो भवेत् ॥ २३० ॥
अन्यत्तु दुर्जरत्वान्न लिखितम् । भगवद्गोविन्दपादास्तु कलांशमेव ग्रासं लिखन्ति । यथा—

पञ्चभिरेवं ग्रासैर्घनसत्त्वं जारयित्वाऽऽदौ ।
गर्भद्रावे निपुणो जरयति बीजं कलांशेन ॥ २३१ ॥
तन्मते चतुःषष्टिचत्वारिंशद्द्वात्रिंशद्विंशतिषोडशांशाः पञ्च ग्रासाः॥

ग्रास किती द्यावा त्याचें प्रमाण.

पहिला ग्रास पाऱ्याच्या चौसष्टाव्या हिश्शाइतका असावा, दुसरा बावीसाव्या हिश्याइतका, तिसरा सोळाव्या हिश्शाइतका आणि चौथा आठव्या हिश्शाइतका द्यावा.

पाऱ्याला चौसष्टाव्या हिश्शाइतका ग्रास मिळाला म्हणजे तो दण्डधारी होतो. त्याचा अर्थ असा कीं, पारा इतका घट्ट होतो कीं, तो वस्त्रांतून गळत नाहीं. दुसरा ग्रास पाऱ्यांत जिरला म्हणजे तो जळूप्रमाणें दिसतो. तिसऱ्या ग्रासानंतर काकविष्ठेप्रमाणें आणि चौथ्या ग्रासानंतर दह्याच्या मण्डाप्रमाणें त्याचें स्वरूप होतें (२३०)

दुसरे पुष्कळ प्रकारचे ग्रास आहेत; परंतु ते जिरविणें अवघड म्हणून येथें लिहिले नाहींत. पूज्यपाद गोविंदाचार्य एकेक ग्रास सोळाव्या हिश्शाइतकाच घ्यावा असें लिहितात. ते म्हणतातः—

"अभ्रक-सत्वाचे पांच ग्रास प्रथम देऊन ते जिरल्यावर ज्या धातूचें बीज देणें असेल त्याचा ग्रास पाऱ्याच्या सोळाव्या हिश्शाइतकाच घेऊन गर्भद्रुतिक्रियेंत निष्णात असा पुरुष तो ग्रास (पाऱ्यांत) जिरवितो" (२३१).

त्यांच्या मताप्रमाणें ग्रास पांच आहेत. पैकीं पहिला चौसष्टावा हिश्शाइतका; दुसरा चाळीसाव्या हिश्शाइतका, तिसरा तिसाव्या हिश्शाइतका, चौथा विसाव्या हिश्शाइतका आणि पांचवा सोळाव्या हिश्शाइतका घ्यावा.

अथ रञ्जनम् ।

तारकर्मण्यस्य न तथा प्रयोगो दृश्यते ॥
केवलं निर्मलं ताम्रं वापित दरदेन तु ।
कुरुते त्रिगुणं जीर्णं लाक्षारसनिभं रसम् ॥ २३२ ॥
गन्धकेन हतं नागं जारयेत्कमलोदरे ।
एतस्य त्रिगुणे जीर्णे लाक्षाभो जायते रसः ॥ २३३ ॥
कमलोदरे ताम्रे । एतत्तु नागसंबंधान्न रसायनकर्मणि ।
किंवा यथोक्तसिद्धबीजोपरि त्रिगुणताम्रोत्तारणादनु तद्बीजं समजीर्णं सत् तन्त्रेणैव रञ्जयति ॥

कुनटीहतकरिणा वा रविणा वा ताप्यगन्धकहतेन ।
दरदनिहतासिना वा निर्व्यूढं हेम तद्बीजम् ॥ २३४ ॥
.....बलिना व्यूढं केवलार्कमपि ॥
कुनटी मनःशिला, करिनागः, रविस्ताम्रं, असिर्लोहम् ॥

रंजन.

पाऱ्याला (तप्त सुवर्णाप्रमाणें) रंग आणणें.

रौप्य करावयाचें असल्यास ही रंजनक्रिया करावयास सांगितल्याचें आढळत नाहीं.

शुद्ध केलेलें निर्भेळ ताम्र घेऊन त्याला हिंगुळाची भावना द्यावी व तें भावना दिलेलें ताम्र पाऱ्याच्या तिप्पट घेऊन त्यांत जिरविलें म्हणजे पाऱ्याला लाक्षा रसाप्रमाणें रंग चढतो. (२३२)

शिसें गंधकानें मारून त्याचें सत्व ताम्रांत जिरवावें, आणि तें ताम्र तिप्पट घेऊन पाऱ्यांत जिरवावें, म्हणजे त्याला लाक्षारसाचा रंग येतो (२३३)

मुळांत " कमलोदर " असा शब्द आहे. त्याचा अर्थ ताम्र; परंतु शिशाचें सत्व ताम्रांत जिरविलें असल्यास त्या ताम्राचा उपयोग रसायनाच्या कामीं करूं नये. किंवा (शिशाचें) वर सांगितल्याप्रमाणें बीज सिद्ध करावें. तें बीज तिप्पट ताम्रांत जिरविलें असतांहि त्याच क्रियेनें पाऱ्याला सोन्यासारखा रंग येतो.

शिसें मनशीळीच्या योगानें मारून घ्यावें, किंवा गंधकानें माक्षिक मारून तें सत्व ताम्रांत जिरवून तें ताम्र घ्यावें; किंवा हिंगुळानें मारलेलें लोह घेऊन त्याची भावना सुवर्णास द्यावी, म्हणजे सुवर्णबीज तयार झालें. तें बीज पाऱ्याला द्यावें. (२३४)

मनशीळ, शिसें ताम्र आणि लोह हा अर्थ अनुक्रमें मुळांतील कुनटी, नाग, रवि, आणि असि ह्या शब्दांचा केला आहे.

अथ तारबीजम्—

कुटिलं विमला तीक्ष्णं समं चूर्णं प्रकल्पयेत् ।
पुटितं पञ्चवारं तु तारे वाह्यं शनैर्धमेत् ।
यावद्दशगुणं तत्तु तारबीजं भवेच्छुभम् ॥ २३५ ॥
कुटिलं वङ्गः, विमला कांस्यमाक्षिकं, तीक्ष्णं लोहम् ॥
सत्त्वं तालोद्भवं वङ्गं समं कृत्वा धमेद्दृढम् ।
तच्चूर्णं वाहयेत्तारे गुणान् यावत्तु षोडश ॥ २३६ ॥
प्रतिबीजमिदं श्रेष्ठं सूतकस्य तु बन्धनम् ।
जारणात्सारणाच्चैव सहस्रांशेन विध्यति ॥ २३७ ॥
वङ्गाभ्रं वाहयेत्तारे गुणानि द्वादशैव तु ।
एतद्बीजे समे जीर्णे शतवेधी भवेद्रसः ॥ २३८ ॥

आतां रौप्यबीज सांगतों:—

कथिल, विमला (म्हणजे कास्य धांतूचें माक्षिक) व पोलाद ह्या तिहींचें चूर्ण करून तें समभाग घ्यावें. त्याला पांच पुढें द्यावीं आणि तें रुप्याला देऊन भट्टींत सावकाश आंच द्यावी. याप्रमाणें तें चूर्ण रुप्याच्या दसपटीनें त्यांत जिरवावें; म्हणजे रौप्य बीज तयार झालें (२३५).

कथिलाबद्दल मुळांत कुटिल असा शब्द आहे.

हरताळाचें सत्व व कथील हे समभाग घेऊन (एकत्र करून) आंच द्यावी आणि चूर्ण होईल तें रुप्यांत हळू हळू इतकें जिरवावें कीं, तें वजनानें रुप्याच्या सोळापट भरेल. म्हणजे रौप्य बीज तयार झालें. कोणत्याहि बीजाशीं तुलना केली तरी हें बीज श्रेष्ठ प्रतीचें ठरेल. ह्यानें पाऱ्याचें बंधन होतें आणि जारणाक्रियेनें व सारण-क्रियेनें हजाराव्या हिश्शानें जरी तें वापरलें तरी तें पाऱ्यांत भिनतें. (२३७)

कथील आणि अभ्रक मिळोन बारा भाग घेऊन तें एकभाग रुप्यांत जिरवावें, म्हणजे बीज तयार झालें. हें बीज समभाग घेऊन पाऱ्यांत जिरलें म्हणजे पारा शतवेधी होतो. (२३८).

अथ हेमबीजम्—

नागाभ्रं वाहयेद्धेम्नि दिवाकर (१२) गुणं शुभम् ।
प्रतिबीजमिदं श्रेष्ठं पारदस्य तु बन्धनम् ॥ २३९ ॥
माक्षिकेण हतं ताम्रं तारं वा रञ्जयेन्मुहुः ।
तं नागं वाहयेद्बीजे द्विषोडशगुणं तथा ॥ २४० ॥
एतद्बीजवरं श्रेष्ठं नागबीजं प्रकीर्तितम् ।
समजारितमात्रेण सहस्रांशेन विध्यति ॥ २४१ ॥

सुवर्णबीज.

शिसें आणि अभ्रक हे बारा भाग घेऊन ते एक भाग सुवर्णांत जिरवावे. म्हणजे सुवर्णबीज होतें. हें कोणत्याहि सुवर्णबीजापेक्षां श्रेष्ठ असून पाऱ्याचें बंधन करूं शकतें. (२३९)

माक्षिकानें ताम्र मारून त्यानें चांदीला वारंवार भावना द्याव्या आणि बीज करण्याकरितां ते शिशांत बत्तीस पटीनें जिरवावें, म्हणजे बीज तयार झालें. हें बीज उत्तम प्रतीचें असोन त्याला नागबीज म्हणतात. त्याचा समभाग ग्रास जर पाऱ्याला दिला तर तो सहस्रवेधी होतो. (२४१).

म्हणजे हजाराव्या हिश्शानें देखील तें बीज पाऱ्यांत भिनतें.

अथ रञ्जनार्थं सारणार्थं च तैलम्।—

माञ्जिष्ठा किंशुकं चैव खादिरं रक्तचन्दनम् ।
करवीरं तथा दारु सरलो रजनीद्वयम् ॥ २४२ ॥
अन्यानि रक्तपुष्पाणि पिष्ट्वा लाक्षारसेन तु ।
तैलं विपाचयेत्तेन कुर्याद्बीजादिरञ्जनम् ॥ २४३ ॥
द्विगुणं रक्तपुष्पाणां रक्तपीतगणस्य च ।
क्काथं, चतुर्गुणं क्षीरं, तैलमेकं सुरेश्वरि ॥ २४४ ॥
ज्योतिष्मतीकरञ्जाक्षकटुतुम्बीसमुद्भवम् ।
पाटलाकाकतुण्ड्यम्बुमहाराष्ट्रीरसैः पृथक् ॥ २४५ ॥
भेकशूकरमेषाहिमत्स्यकूर्मजलौकसाम् ।
वसया चैकया युक्तं षोडशांशैः सुपोषितैः ॥ २४६ ॥
मूलतामलमाक्षीकद्वन्द्वमेलकभेषजैः ।
पाचितं गालितं चैव सारणातैलमुच्यते ॥ २४७ ॥

अत्र गन्धर्वतैलमपि रसहृदयस्वरसात् । अथ द्वन्द्वमेलकौषधानि–'ऊर्णाटङ्कणगिरिजतुमहिषीकर्णाक्षिमलशाकगोपकर्कटकाः' इति ॥

पाऱ्याला रंग आणण्याकरतां व *सारणाकरितां तेल.

मंजिष्ठ, पळस, खैर, रक्तचंदन, कण्हेर, देवदार, साग व हळद हे जिन्नस व तांबड्या रंगाचीं फुलें घेऊन त्या सर्वांचा लाक्षारसाच्याबरोबर खल करावा व त्यांत तेल सिद्ध करावें आणि त्यानें बीजाला रंग आणावा.

---

*सारण म्हणजे पाऱ्यानें वेध बिनचूक करितां यावा म्हणून पाऱ्याला देण्याकरितां तयार केलेलें तेल.

हे पार्वती, तांबडचा फुलांच्या दुप्पट तांबडचा व पिंवळ्या वर्गांतील फुलांचा काढा करावा व चौपट दुध घालून त्यांत तेल एकभाग सिद्ध करावें, म्हणजे सारणतैल झालें. (२४४).

मालकांगोणी, करंज, रुद्राक्ष, कडुभोपळी ह्यांच्या काढ्यांत तेल सिद्ध करावें. तें तेल एकभाग व बेडूक, डुक्कर, मेंढा, सर्प, मस्त्य, कांसव व जळवा यांची चरबी एकभाग असें एकत्र करावें. नंतर पाटल, काकतुंडीचा रस आणि मराटीचा रस हे सोळा भाग घेऊन त्यांच्याशीं मिश्रणाचा खल पृथक् पृथक् उत्तम रीतीनें करावा. मग भूनाग,मल, माक्षिक आणि मिलाफी औषधें ह्यांच्याबरोबर त्या तेलाचें पाचन करावें व नंतर तें गाळून घ्यावें. ह्याला सारणाचें तेल म्हणतात. (२४७).

गंधर्व तेल म्हणून जें रसहृदयांत सांगितलें आहें तें अशाच प्रकारचें आहे:—

लोंकर, टांकणखार, शिलाजित, म्हशीच्या कानांतिल व डोळ्यांतील मळ, इंद्रगोप, कीटक व खेकडे यांना " द्वंद्व मेळापक " म्हणजे दोन पदार्थांना उत्तम रीतीनें एकजीव करणारे जिन्नस (म्ह० मिलाफी) असें नांव आहे.

अथाऽपरम्—

श्वेतपुष्पैर्यथाप्राप्तैर्नानावृक्षसमुद्भवैः ।
रसं चतुर्गुणं योज्यं कङ्गुणीतैलमध्यतः ॥ २४८ ॥
पचेत्तैलावशेषं तु तस्मिंस्तैले निषेचयेत् ।
द्रावितं तारबीजं तदेकविंशतिवारकम् ।
रञ्जितं जायते सम्यग्रसराजस्य रञ्जनम् ॥ २४९ ॥

अन्यच्च—

कुटिले बलमत्यधिकं रागस्तीक्ष्णे च पन्नगे स्नेहः ।
रागस्नेहबलानि तु कमले नित्यं प्रशंसन्ति ॥ २५० ॥
बलमास्तेऽभ्रकसत्त्वे जारणरागाः प्रतिष्ठितास्तीक्ष्णे ।
बन्धस्तु सारलोहे क्रामणमथ नागवङ्गगतम् ॥ २५१ ॥
क्रामति तीक्ष्णेन रसतीक्ष्णेन च जीर्यते ग्रासः ।
हेम्नो योनिस्तीक्ष्णं रागान् गृह्णाति तीक्ष्णेन ॥ २५२ ॥

तदपि च दरदेन हतं हत्वा वा माक्षिकेण रविसहितम् ।
वसितमपि वासनया घनवच्चार्यं च जार्यं च ॥ २५३ ॥
घनवदभ्रकवत् ॥

" सारण " तेलाचा दुसरा प्रकारः--

अनेक प्रकारच्या वृक्षांचीं पांढरीं फुलें जितकीं मिळतील तितकीं आणून रस काढावा. तो रस कांगोणीच्या तेलाच्या चौपट घेऊन तो त्या तेलांत टाकून आटवून तेल उरवावें. मग त्यांत विद्रुत झालेलें रौप्य बीज एकवीस वेळा बुडवावें, म्हणजे त्यानें पाऱ्याला उत्तम प्रकारचा पांढरा रंग चढतो. (२४९)

दुसऱ्या एका ग्रंथांत वर्णन आढळतें तें असेंः--

कथलांत ताकद जास्त, पोलादांत रंग आणण्याचें सामर्थ्य जास्त, शिशांत तेलकटपणा जास्त असतो; पण तांब्यांत बल, रंग, आणि तेलकटपणा हे तिन्ही गुण आहेत, अशी त्याची तारीफ आहे. (२४९).

तें बल अभ्रकसत्वांत आहे. (धातूंमध्यें) जिरून जाऊन त्याला रंग आणण्याची शक्ति पोलादांत आहे. सारलोहाच्या (पोलादाच्या) अंगीं (पारद) बंधन करण्याची ताकद आहे आणि अंगांत भिनण्याची शक्ति शिसें व कथील यांच्यांत आहे.

पोलादामुळें पाऱ्याच्या अंगीं* क्रामणशक्ति येते; पोलादानें पाऱ्याला ग्रास पचतो. सोन्याचें मूळ स्वरूप पोलाद हेंच आहे आणि पाऱ्याला रंग चढतो तो पोलादाचे योगानेंच. (२५२)

तें पोलाद हिंगुळानें मारून भस्म करावें, किंवा माक्षिकानें ताम्रासहित मारून भस्म करावें व त्याला वासनवेलीच्या रसाची भावना देऊन त्याचा अभ्रकाप्रमाणें पाऱ्याला ग्रास द्यावा आणि जिरवावें. (२५३).

---

* क्रामण म्हणजे चोहोंकडे पसरणें.

सर्वैरभिलोंहैर्माक्षिकमादितैर्द्रुतैस्तथा गर्भे ।
बिडयोगेन च जीर्णो रसराजो बन्धमुपयाति ॥ २५४ ॥
निर्बीजे समजीर्णे पादोने षोडशांशतया ।
अर्धेन पादकनकं पादेनैकेन तुल्यकनकं च ॥ २५५ ॥
समादिजीर्णस्य सारणायोग्यत्वं शतादिवेधकत्वं च; इतो न्यूनजीर्णस्य पत्रलेपाधिकार एव । यथा—

अत्यम्लितमुद्वर्तिततारारिष्टादिपत्रमातिशुद्धम् ।
आलिप्य रसेन ततः क्रामणालिप्तं पुटेषु विश्रान्तम् ॥ २५६ ॥
पुटः प्रायेण चूल्लिकाधस्तादस्य ॥
अर्धेन मिश्रयित्वा हेम्ना श्रेष्ठेन तद्बलं पुटितम् ।
क्षितिखगपटुरक्तमृदा वर्णपुटोऽयं ततो देयः ॥ २५७ ॥
अर्धेनेत्युपलक्षणम् । क्षितिखगः कासीसम् ॥

हे सर्व धातु माक्षिकानें मारून माक्षिकाबरोबर खलून त्यांची गर्भद्रुति करावी व पाऱ्याला " बिड " देऊन त्यांत जिरवावें, म्हणजे तो बंधन पावतो.

× निर्बीजपद्धतीनें (सुवर्ण) समभाग जिरविलें तर फल चवथा हिस्सा मिळतें: सोळाऊण हिस्सा जिरविलें तर फल सोळाव्या हिश्शानें मिळेल. अर्धा हिस्सा जिरविलें तर फल पूर्वींच्या चौथ्या हिश्शानें मिळल; आणि चौथ्या हिश्शानें सुवर्ण जिरविलें तर मात्र फल पूर्ण मिळेल. (२५५)

बीज बरोबरीनें जिरविल्यास पारा सारणायोग्य आणि शतवेधी होतो. ह्यापेक्षां कमी जिरविल्यास त्यानें फक्त पत्र्यांना लेप देऊन रंग आणतां येतो.

असें लिहिलें आहे कीं:—

अतिशय आंबट पदार्थांनीं रौप्य माक्षिकाला भावना देऊन पूर्णपणें शुद्ध केलेल्या पत्र्यांना पाऱ्याचा लेप चढवावा. मग क्रामणाचा लेप देऊन पुट दिलें असतां तो लेप पक्का होतो (२५६)

हें पुट चुलीच्या तळाशीं द्यावें.

× हा श्लोक कठीण आहे.

अर्धा भाग सोनें व पुट दिलेले पत्रे एकत्र करून पुनः पुट द्यावें. मग हिराकस, सैंधव व तांबडी माती यांचा लेप देऊन रंग येतो. म्हणून रंग आणण्याकरतां पुट द्यावें. (२५७)

वरील श्लोकांत "अर्धा भाग" असें म्हटलें आहेतें केवळ उपलक्षण होय. हिराकस ह्याबद्दल मुळांत "क्षितिखग" असा शब्द आहे. (२५८)

अन्यच्च—

रज्जुभिर्भेकवङ्केभैः स्तम्भयोः सारलोहयोः ।
बध्यते रसवेतण्डो युक्त्या श्रीगुरुदत्तया ॥ २५८ ॥
शिलाऽब्धिभागा गन्धेशौ काचकूप्यां सुवर्णकृत् ।
कीलालायः कृतो योगः खट्टिकालेपनाधिकः ॥ २५९ ॥
मण्डूकपारदशिलाबलयः समानाः
संमर्दिताः क्षितिबिलेशयमन्त्रजिह्वैः ।
यन्त्रोत्तमेन गुरुभिः प्रतिपादितेन
स्वल्पैर्दिनैरिह पतन्ति न विस्मयध्वम् ॥ २६० ॥
लोहं गन्धं टङ्कणं भ्रामयित्वा तेनोन्मिश्रं भेकमावर्तयेत्तु ।
तालं कृत्वा तुर्यवङ्गान्तराले रूपस्यान्तस्तच्च सिद्धोक्तबीजे २६१॥
सिद्धमते लोहभेकि तारभेकीति बीजद्वयम् ॥
द्रुतदर्दुरपूतिलोहसेकः कुरुते हिङ्गुलखण्डपक्षखण्डम् ॥ २६२॥
शशिहेलिहिरण्यमूषिका ध्रुवमक्षीणधियामनेन लक्ष्मीम् ।
इति सिद्धमते खोटः ॥
अत्र भेकादिशब्दा धातुवाचका इत्यलं रहस्यप्रकाशेन ॥

दुसरा प्रकारः—

* अभ्रक, कथील आणि शिसें ह्या जणों काय देाऱ्या व सार आणि लोह हेच कोणी खुट, त्या खुंटांशीं अभ्रक वगैरेच्या देाऱ्यांनीं पारदरूप हत्ती बांधतां येतो. पण गुरूनीं सांगितलेल्या युक्तीनें मात्र बांधतां येतो. (२५८)

* चार प्रकारच्या शिला आणि गन्धक व पारा ह्यांना कांचेच्या कुपींत आंच दिली असतां सुवर्ण होतें, व मध आणि

श्लोक कठीण आहेत.

लोखंडाचा कीस यांचें लुकण खडूच्या लुकणापेक्षांहि मजबूत होतें. (२५९)

* अभ्रक, पारा, मनशीळ आणि गन्धक हे समभाग घेऊन हिराकस, शिसें आणि सुवर्ण ह्यांच्याशीं त्यांचा खल करून त्या मिश्रणाला भूधरयंत्रानें गुरूनीं सांगितल्याप्रमाणें घुट दिल्यास, थोडक्याच दिवसांत त्यांचें सत्व पडते. ह्यांत कांहीं आश्चर्य मानूं नका. (२६०)

* लोह, गंधक व टांकणखार हे एकत्र खलोव आणि त्या मिश्रणानें अभ्रक अग्नीमध्यें विद्रुत करावें. म्हणजे " लोहभेकी " नावांचें सिद्ध बीज बनतें.

त्याचप्रमाणें:—

तुरटी व कथील ह्यांच्यामध्यें हरताळ ठेवून त्यानें (कथील मारावें) आणि " तारभेकि " नांवाचें सिद्धबीज करण्याकरितां तें चांदीला देऊन बीज बनवावें. (२६१)

याप्रमाणें दोन सिद्ध बीजें होतात. एक " लोहभोकि " आणि दुसरें " तारभोकि. " अभ्रक, शिसें व कथील हे एकत्र विद्रुत केले आणि तो रस हिंगुळाच्या तुकड्यावर ओतला म्हणजे हिंगुळांतिल पाऱ्याचे पंख खुडले जातात. (२६२)

रौप्य, ताम्र आणि सुवर्ण यांचा एकत्र रस करून त्या मिश्रणावर तो पक्षछिन्न पारा टाकला असतां शुद्धबुद्धि साधकांना अलोट लक्ष्मी प्राप्त होते. ह्या क्रियेला खोट म्हणतात.

यात भेक वगैरे शब्द मुळांत अभ्रक इत्यादिकांकरितां आहेत. ते रस विद्या गुप्त राखण्याकरतां घातले आहेत. इतकी सूचना दिली म्हणजे पुरे.

गन्धतैलयुगलाऽयसमध्ये पूतिवारिवशमेष्यति पिष्टिः ।
तैलमेकबलिकलिपतापिष्टिसंयमः ध्रुवगपूत्याभिषेकैः ॥ २६३ ॥
दरदस्यापि पिष्टित्वेन गृहीतत्वात्पूर्वकर्माण संबन्धः ॥
इति सिद्धमते खोटः ॥

अधोऽष्ट्राङ्गुलतश्चुल्ल्याः सिध्यन्ति सिकतावृताः ।
रसगन्धशिलासर्पाः पाकादग्निविपक्रिमाः ॥ २६४ ॥

खोटान्तरम् ।—

सालूरकुटिलार्कस्थरम्भापामार्गभस्मना ।
हस्तीव बध्यते वक्रलोहखाण्डिकया रसः ॥ २६५ ॥

खोटान्तरम् ।—

भेकभास्करगन्धायोवङ्गस्य क्षारभस्मना ।
हस्तीव बध्यते लोहवक्त्रचाक्रिकया रसः ॥ २६६ ॥

इति रञ्जनवेधनानि ॥

दुसरा खोट:—गंधकाचें तेल आणि लोहचूर्ण यांच्या मिश्रणांत हिंगूळ टाकून त्यावर शिसें व कथील यांचा रस ओतावा,म्हणजे त्या रसाच्या कह्यांत हिंगूळ जातो आणि (त्यांतील पारा बंधन पावतो). तसेंच तेल, अभ्रक व गंधक ह्यांची भावना दिलेल्या हिंगुळावर शिसें व कथील यांचा रस ओतला असतां पारा बांधतां येतो. (२६३) ह्याहि क्रियेला खोट म्हणतात.

बन्धन म्हणजे पारा अग्नीवर टाकला असतांहि उड्डून न जाणें; इतका पारा स्थिर झाला म्हणजे पाऱ्याला बंधन झालें असें समजावें.

चुलीच्या तळीं आठ अगुळें (खळगा खणून त्यांत) वाळू घालून तिच्या पोटांत पारा, गंधक, मनशीळ व शिसें खुपसून ठेऊन वर पुट दिलें असतां पारा अग्नीमध्यें कायम राहू शकतो.

सालूर, कथील व ताम्र ह्यांचें भस्म केळ, आघाडा यांच्या योगानें करावें; म्हणजे लोखंडाच्या सांखळीनें हत्ती बांधावा त्याप्रमाणें (त्या भस्मानें) पारा बाधला जातो. हाहि खोटाचाच प्रकार आहे (२६५)

दुसरा प्रकार.

अभ्रक, ताम्र, गन्धक, लोह आणि कथील ह्यांचें भस्म क्षारानें केलें असतां लोखंडाच्या सांखळीनें हत्ती बांधावा त्याप्रमाणें पारा बांधला जातो. (२६६)

अथ बाह्यद्रुतयः ।

एतास्तु केवलामारोटकमेव मिलिता निबध्नन्ति, फलमस्य कल्पप्रमितमायुः; किंवा पूर्वोक्तग्रासक्रमजारिताः पूर्वोक्तफलप्रदा भवन्ति । उच्यते च—समजीर्णश्चायं शतवेधी, द्विगुणजीर्ण सहस्रवेधी; एवं लक्षायुतकोटिवेधी समनुकर्तव्यः, चतुःषष्टिगुणजीर्णस्तु धूमस्पर्शावलोकशब्दतोऽपि विध्यति ॥

आतां बाह्यद्रुति सांगतों.

हा प्रकार असा आहे कीं, बंधक पदार्थ आरोटकाशीं एकत्र झाल्याबरोबर पारा बांधला जातो. ही क्रिया साधली तर मनुष्य कल्पांन्तापर्यंत जगेल अथवा पूर्वी लिहिल्याप्रमाणें क्रमाक्रमानें (पाऱ्याला) ग्रास चारून ते जिरवावें,म्हणजे यांचें फळ काय असतें तें वर लिहिलेंच आहे. बीज समभाग जिरेल तर पारा शतवेधी होतो. दुप्पट जिरेल तर सहस्रवेधी होतो. याप्रमाणें लक्षवेधी, कोटिवेधी येथपर्यंत पाऱ्याची शक्ति वाढवितां येते. चौसष्ट पट जर बीज जिरलें तर नुसत्या धुरानें, स्पर्शानें, दृष्टीस पडल्यानें किंवा केवळ शब्दानें देखील पारा वेध करतो.

अथ सारणोच्यते ।

अन्धमुषा तु कर्तव्या गोस्तनाकारसन्निभा ।
सैव छिद्रान्विता मन्दगम्भीरा सारणोचिता ॥ २६७ ॥

अस्याभेव मूषायां तत्तैलमपगतकल्कविमलमापूर्य तस्मिन्नधिकमूष्मात्मानि द्रुतबीजप्रक्षेपसमकालमेव समावर्तनीयः सूतवरः तदनु सद्यो मुषाननमाच्छादनीयमेतत्तैलाक्तपटखण्डग्रन्थिबन्धेन, अरुणासितबीजाभ्याममुना सारणकर्मणा मिलितश्चेत्सारितः सम्यक् संयामितश्च विज्ञेयः ; प्रतिसारितस्तु द्विगुणबीजेन, तद्वतदनुसारितस्तुत्रिगुणबीजेन; अत्र त्रिविधायामेव सारणायामरुणासितकर्मणोः क्रामणार्थमीषत्पन्नगवङ्गौ विश्राणनीयाविति ॥

सारितो जारितश्चैव पुनः सारितजारितः ।
सप्तसङ्ख (शृङ्ख) लिकायोगात्कोटिवेधी भवेद्रसः ॥ २६८ ॥

इत्यादीनि कर्माणि पुनः केवलमीश्वरानुग्रहसाध्यत्वान्न प्रपञ्चितानि ॥

(द्रुतयोऽपि न दृष्टास्तु शास्त्रे दृष्टा अपि ध्रुवम् ।
विना शम्भोः प्रसादेन न सिध्यन्ति कदाचन ॥ १ ॥)

आतां सारणाक्रिया सांगतों.

गाईच्या सडाप्रमाणें उभट आकाराची अशी एक अन्धमूषा करावी; तो दिसण्यांत भबुक दिसावी व तिला एक छिद्र असावें. अशी मूस* सारणाप्रयोग करण्याला योग्य होय. (२६७)

सारणाकरतां पूर्वी तयार केलेलें तेल मळ वगैरे काढून टाकून स्वच्छ गाळून ह्याच मुशींत ओतून ती मूस भरावी. तेल सळसळीत तापलें म्हणजे विरलेलें बीज त्यांत टाकतांनाच त्याच्यार्शी पाऱ्याचा एक जीव करावा व त्याच तेलानें माखलेल्या कापडानें मुशाच तोण्ड फडक्यास गांठ देऊन बंद करावें. याप्रमाणें सारणक्रिया करून तांबडें व पांढरें बीज देऊन (पाऱ्याला) भावना दिली असतां सारणा होऊन ह्मणजे बीज भिनून त्याचें उत्तम प्रकारानें बंधनहि होतें. अशा पाऱ्याला " सारित " म्हणतात. दुप्पट बीज दिलें म्हणजे पाऱ्याला " प्रतिसारित " म्हणावें; आणि तिप्पट बीज दिलें असेल तर (पाऱ्याला) " अनुसारित " म्हणावें. याप्रमाणें लाल व श्वेत रंगाची सारणा तीन प्रकारची आहे. क्रामण करावयाचें असेल तर त्यांत किंचित् शिसें व कथील जिरवावें म्हणजे झालें.

(पाऱ्याला) सारण दिलें व नंतर जारणक्रिया केली, व पुनः सारण करून जारण केलें म्हणजे सप्त शृंखलायोग झाला. या योगानें पारा कोटिवेधी होतो. (२६८). पण ह्या सर्व क्रिया केवळ देवाच्या कृपेनेंच साध्य होण्यासारख्या असल्यानें त्यांचा विस्तार केला नाहीं.

हे द्रुतिप्रयोग शास्त्रांत लिहिलेले मीं पाहिले आहेत हें जरी खास, तरी प्रत्यक्ष केलेले पाहिले नाहींत. कारण शंकराची कृपा होईल तरच हे साधतील. एरवीं कांहीं होणार नाहीं.

---

* सारण म्हणजे पारा धातूंत भिनावा म्हणून त्यांत जिरविण्याकरितां तेल तयार करतात तें सारण तेल.

अथ क्रामणम्× ।

शिलया निहतो नागो वङ्गं वा तालकेन शुद्धेन ।
क्रमशः पीते शुक्ले क्रामणमेतत्समुद्दिष्टम् ॥ २६९ ॥
पीते स्वर्णे, शुक्ले रूप्ये ॥

आतां क्रामण सांगतों.

शिश्याचें भस्म मनशीळीनें करावें व हरताळ शुद्ध करून घेऊन त्यानें वंग मारावें, आणि ती भस्में अनुक्रमानें पीताक्रियेंत (म्हणजे सुवर्ण करण्याकरितां) व श्वेताक्रियेंत (म्हणजे चांदी करण्याकरितां) क्रामणाला उपयोगांत आणावी (२६९)

अथ खोटमार्गेण जारणवेधनरञ्जनानि ।

खोटकं स्वर्णसंतुल्यं समावर्तं तु कारयेत् ।
माक्षिकं कान्तपाषाणं शिला गन्धं समं समम् ॥ २७० ॥
भूनागैर्मर्दयेद्यामं वल्लमात्रं वटीकृतम् ।
एषा बिडवटी ख्याता योज्या सर्वत्र जारणे ॥ २७१ ॥
दरदं माक्षिकं गन्धं राजावर्तं प्रवालकम् ।
शिला तुत्थं च कङ्कुष्ठं समं चूर्णं प्रकल्पयेत् ॥ २७२ ॥
वर्गाभ्यां पीतरक्ताभ्यां कङ्गुणीतैलकैः सह ।
भावयेद्दिवसान् पञ्च सूर्यतापे पुनः पुनः ॥ २७३ ॥
रञ्जितं मृतखोटं च कल्केनानेन संयुतम् ।
वालुकाहाण्डिमध्यस्थं शरावपुटमध्यगम् ॥ २७४ ॥
त्रिदिनं पाचयेच्चूल्यां कल्को देयः पुनः पुनः ।
रञ्जितो जायते सूतः शतवेधी न संशयः ॥ २७५ ॥
लोहं गन्धं टङ्कणं धमातमेतत्तूल्यं चूर्णैर्भानुभेकाहिवह्नैः ।
सूतं गन्धं सर्वसाम्येन कूप्यामीषत्साध्यं चित्त नो विस्मयस्व
इति सिद्धमते कल्कः ॥

आतां पाऱ्याचें जे "खोट" * हें रूप आहे त्याचें जारण, वेधन, रंजन सांगतोः—

* "खोट" म्हणजे जवळ जवळ सोनेंच आहे. तें विद्रुत करावें व माक्षिक, कांतलोह (चुंबक), मनशीळ, गंधक हे जिन्नस समभाग घेऊन भूनागाच्या चूर्णाबरोबर त्यांचा एक प्रहर खल करावा

× पारदाच्या आंगीं सुवर्णोत्पादक शक्ति जास्त आणणें.

व वालभर वजनाच्या वड्या कराव्या, म्हणजे पाऱ्याकरितां " बिड तयार झाला. खोटाच्या जारणक्रियेंत सर्व ठिकाणीं ह्या बिडाचा उपयोग करावा. (२७१)

हिंगूळ, माक्षिक, गन्धक, राजावर्त, प्रवाळ, मनशीळ, मोरचूद आणि कंकुष्ठ हे समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करावें व पिंवळ्या व तांबड्या वर्गातील जिन्नस घेऊन त्यांनीं कांगोणीचें तेल सिद्ध करून चूर्णाला त्या तेलाची भावना उन्हामध्यें पांच दिवसपर्यंत पुनः पुनः द्यावी. अशा रीतीनें मृत खोटाला रंग चढला म्हणजे (कांगोणीच्या) तेलांतील (जिनसांचा) लगदा आणि खोट हे एकत्र करून खापराच्या संपुटांत ठेवून वालुकायंत्रांत चुलीवर तीन दिवसपर्यंत आंच द्यावी आणि (पाऱ्याला) तो चोथा पुनः पुनः द्यावा, म्हणजे खोटाला पीत रंग येऊन तो शतवेधी होईल. त्याविषयीं संशय धरूं नये. (२७५)

लोह, गन्धक व टांकणखार ह्यांचें चूर्ण समभाग आणि ताम्र, अभ्रक शिसें व कथील या प्रत्येकाचें चूर्णहि तितकेंच घेऊन एकत्र करून व त्या सर्वांइतकेच पारा व गंधक घेऊन कांचेच्या कुपींत आंच दिली असतां क्रिया साध्य होणारच हें लक्षांत ठेवा. आश्चर्य वाटूं देऊं नका. (२७६). ह्याप्रमाणें सिद्ध कल्कांचें वर्णन झालें.

रसदरदताप्यगन्धकमनःशिलाभिः क्रमेण वृद्धाभिः ।
पुटमृतशुल्बं तारे त्रिर्व्यूढं हेमकृष्टिरियम् ॥ २७७ ॥
अष्टानवातिभागं तु रूप्यमेकं च हाटकम् ।
सूतैकेन च वेधः स्याच्छतांशविधिरीरितः ॥ २७८ ॥
चन्द्रस्यैकोनपञ्चाशत्तथा शुद्धस्य भास्वतः ।
वन्हिरेको रसश्चैकः शतांशविधिरीरितः ॥ २७९ ॥
द्वावेव रजतयोनिताम्रयोनित्वेनोपचर्येते; एवं सहस्रवेधादयो जारणबीजवशादनुसर्तव्याः ॥
चत्वारः प्रतिवापाः सुलाक्षया मत्स्यापित्तभावितया ।
तारे वा शुल्वे वा तारिष्टेऽथवा कुष्ठौ ॥ २८० ॥

तदनु क्रामणमृदितः सिक्थकपरिवेष्टितो देयः ।
अतिविद्रुते च तस्मिन् वेध्योऽसौ कुन्तवेधेन ॥ २८१ ॥

पारा, हिंगूळ, माक्षिक, गंधक व मनशीळ हे अनुक्रमानें एकापेक्षां एक वाढते घेऊन त्यांच्यासहित पुटाग्नि देऊन भारलेल्या ताम्राची भावना तीन वेळ चांदीला द्यावी, म्हणजे सुवर्णाची बुटी तयार झाली. [२७७] मग चांदी ९८ भाग व सोनें एक भाग घेऊन त्याला त्या पाऱ्याच्या बुटीचा एक भाग दिला असतां सर्वांचेंच सोनें (१०० भाग) होतें. ह्याला शतांश वेध, किंवा शतवेध म्हणतात. तसेंच ९९ भाग चांदी, ४९ भाग शुद्ध ताम्र, एक भाग सुवर्ण आणि एक भाग पाऱ्याची बुटी असा योग केला तरीहि तो शतांशविधि झाला. (२७९).

पारा व सोनें हे दोनच पदार्थ असे आहेत कीं, ते अनुक्रमानें "रौप्य योनि" व "ताम्र योनि" होत. ह्मणून त्या धोरणानें बीजाची जास्त जारणा करून सहस्रवेध, लक्षवेध वगैरे योग– ही साधावे.

उत्तम लाखेला मत्स्यपित्ताची भावना द्यावी व तिची भावना चांदीला, ताम्राला आणि माक्षिकाला द्यावी, म्हणजे सोन्याची बुटी तयार झाली. मग क्रामणविधीनें मर्दन केलेला (पारा) घेऊन तो मोहरीच्या लुगदींत ठेवून त्याला विद्रुत केलें असतां कुन्तवेधानेंच कार्य होतें. म्हणजे ती बुटी केवळ दाभणाच्या टोंकावर राहील इतकी घेऊन जरी पाऱ्याला दिला तरी कार्य होतें. (२८१.)

तदनु सिद्धतैलेनाप्लाव्य भस्मावच्छादनपूर्वकमवतार्वं स्वाङ्गशैत्यपर्यंतमपेक्षितव्य इति ॥

विद्धं रसेन यद्द्रव्यं पक्षार्धं स्थापयेद्भुवि ।
नगरे तत आनीय विक्रीणीत विचक्षणः ॥ २८२ ॥

समापैतः सैन्धवखण्डकोटरे विधाय पिष्टिं सिकताख्यतस्थुषि ।
विशुद्धगन्धादिभिरीषदाग्निना समस्तमश्नात्यशनीयमीशजः २८३
कर्षाष्टङ्कणकज्जलीहारिरथाद्रन्धस्य च द्वौ रजः
सिद्धाख्यं सकलैः कृतं पलमथ द्वित्रैर होभिः शृतम् ।

मूयो गन्धमृतं चतुर्दशपुटैः स्यादिन्द्रगोपारुणं
तत्तारे लघुना पुटेन पुटनादर्कच्छवीमीहते ॥ २८४ ॥
कर्षा इति बहुवचनात्त्रयः , त्रिधा पत्रलेपेनेति ज्ञेयम् ॥
इति सिद्धमेत चूर्णकल्कः ॥

नंतर जिन्नस सिद्ध तेलानें भिजवून त्याच्यावर भस्म किंवा रास्न लपेटून जमीनीवर उतरून ठेवावा आणि आपोआप थंड होई-पर्यंत वाट पहावी.

पाच्याच्या बुटीनें धातूला वेध करून सुवर्ण तयार केलें असेल तें एक पंधरवडाभर जमीनींत पुरून ठेवावें व नंतर गांवांत नेऊन बाजारांत विकावें. (२८२)

सैंधवाचा एक भला मोठा खडा घेऊन तो कोरून त्यांत पिष्टि व शुद्ध गंधक वगैरे ठेऊन छिद्र बंद करावें व वालुकायंत्रांत मंदाग्नीनें आंच द्यावी, म्हणजे तो पारा सर्व गंधक खाऊन टाकतो. (२८३).

टांकणखार, कज्जली आणि हरिरथ हे जिन्नस तीन कर्ष आणि गंधकाचे रज दोन कर्ष असे घेऊन ते चार तोळे सिद्ध तेलांत दोन तीन दिवस उकळावे. ह्याप्रमाणें गंधकाला चौदा पुटें दिलीं असतां तो मृत होऊन त्याला इंद्रगोपाप्रमाणें लाल रंग येतो. मग तो मधांत खलून त्याचा लेप चांदी (च्या पत्र्यां) ना देऊन मडींत पुट दिलें असतां त्याचा रंग सूर्याप्रमाणें तेजस्वी होतो. २८४)

येथें " कर्ष " शब्दाचें बहुवचन आहे, म्हणून तीन कर्ष असा अर्थ केला आहे, आणि पत्र्यांना लेप द्यावयाचा तो तीनदां द्यावा. हा चूर्णकल्क झाला.

अथ रसचिन्तामणौ—

चत्वारः स्वर्जिकाभागा यवक्षारस्तथा पुनः ॥ २८५ ॥
क्षारिकालवणं दद्यात्तत्तथाविधमेव च ।
काकमाचीरसस्यांतर्दीयते सर्वमेव तत् ॥ २८६ ॥

शुद्धापित्तलपत्राणि सूक्ष्माणि पलयोर्द्वयोः ।
तप्ततप्तानि तान्यस्मिन् काकमाचीरसे क्षिपेत् ॥ २८७ ॥
एकविंशतिवाराणि तारतां प्रतियान्ति च ।
एवं शुभ्राणि जायन्ते रूप्यान्यूनानि किंचन ॥ २८८ ॥
आरं तारं समं कृत्वा मृतवङ्गं नियोजयेत ।
एकादशविभागेन भवेत्तारं न संशयः ॥ २८९ ॥
एषा राजवती विद्या पुत्रस्यापि न कथ्यते ।

इति राजवतीविद्या ॥

आतां रसचिन्तामणींत क्रिया सांगितली आहे ती अशी:— सज्जीखार चार भाग, जवखार चार भाग, क्षारिका लवण तितकेंच म्हणजे चार भाग घेऊन सर्व जिन्नस कांगोणीच्या रसांत खलावें. मग आठ तोळे वजनाचे शुद्ध पितळेचे पातळ पत्रे ठोकून तयार करावे आणि ते वारंवार तापवून कांगोणीच्या रसांत बुडवावे. याप्रमाणें एकवीस वेळां केलें असतां त्यांना चांदीचा रंग येतो. न्यून इतकेंच राहतें कीं, चांदी थोडीशी हिणकस होते. २८८).

शुद्ध पितळ आणि चांदी समभाग घेऊन त्यांच्या अकराव्या हिश्शाइतकें वंगभस्म त्यांत मिळवावें, म्हणजे सर्वच मिश्रण चांदीचें होतें ह्यांत संशय नाहीं. ह्या क्रियेला राजवती विद्या म्हणतात. ती स्वतःच्या मुलाला देखील कोणी सांगत नाहीं. (२८९॥).

पारदष्टङ्क एकः स्याद्विपलं पीतखर्परम् ॥ २९० ॥
मर्दयेत्सुदृढं तावद्रसो यावद्विलीयते ।
पुनर्जम्बीरनीरेण गुडेन च समन्वितम् ॥ २९१ ॥
शोषयेच्चातपे पिष्ट्वा श्लक्ष्णं कृत्वा च धार्यते ।
अर्कदुग्धस्य दातव्या भावनास्ता यथा तथा ॥ २९२ ॥
अस्य कल्कस्य सिद्धस्य भाग एकश्च टङ्कणः ।
ताम्रं भागत्रयं दत्त्वा ध्माप्यतामन्धमूषया ॥ २९३ ॥
सुवर्णं दिव्यतेजः स्यात्कुङ्कुमादतिरिच्यते ।

इति हेमवती विद्या ॥

शाकवृक्षस्य निर्यासं पलमात्रं समानयेत् ॥ २९४ ॥
शिग्रुबीजस्य चूर्णस्य रसेन परिमर्दयेत् ।
पलमात्रं च शुल्बस्य पत्रं सूक्ष्मं निघापयेत ॥ २९५ ॥

बहुशो लेपिंत कृत्वा धर्मे दत्त्वा पुनः पुनः ।
पश्चात्तद् ध्याप्यते पत्रं शुल्वं हेम प्रजायते ॥ २९६ ॥

इति हेमवती विद्या ॥

पारा एक टांक, व पिंवळें खापरसूत आठ तोळे एकत्र करून त्यांचा जोरानें इतका खल करावा कीं, पारा त्या खलानें विरून गेला पाहिजे. मग ईडलिंबाच्या रसांत गूळ घालून त्या रसांत वरील मिश्रण टाकून उन्हांत सूर्यपुट द्यावें. सुकल्यावर त्याची बारीक मऊ पूड करावी आणि रुईच्या चिकांत साधतील तितकीं पुटें द्यावीं, म्हणजे सिद्धकल्क बनतो. तो कल्क एक भाग, टांकणखार एक भाग, व तांबें तीन भाग एकत्र करून अंध मुशींत ठेऊन भट्टींत आंच द्यावी, म्हणजे त्याचें इतकें जर्द सोनें बनतें कीं, त्याच्यापुढें केशराचा रंग कांहींच नव्हे.(२९३॥)

किमयेचा आणखी प्रकार

शाक (साग) ह्या झाडाचा चीक चार तोळे, याचा शेवग्याच्या बियाच्या चूर्णाच्या रसाशीं खल करावा. मग शुद्ध तांबें तोळे ४ घेऊन ठोकून त्याचे पातळ पत्रे करावे. त्या पत्र्यांना वरील लेप देऊन तो वाळवावा. वाळल्यावर पुनः लेप द्यावा व वाळवावा. असें बरेच वेळां करावें. मग ते पत्रे मुशींत घालून आंच द्यावी, म्हणजे ताम्राचें सुवर्ण होतें (२९६).

पारद सीसको गन्धः कुनट्येतच्चतुष्टयम् ।
बीजपूराम्भसा पिष्ट्वा गाढं दिनचतुष्टयम् ॥ २९७ ॥
अथ सूक्ष्माणि पत्राणि तानि तारस्य लेपयेत् ।
बीजपूररसेनैतान्यातिमात्रेण तावता ॥ २९८ ॥
एकाधिका भवेत्पत्रभावना चात्र विंशतिः ।
विशोष्यावर्तयेत्तारं भवेत्तारस्य काञ्चनम् ॥ २९९ ॥

इति हेमवती ॥

पारदो दरदो हेममाक्षिको गन्धकः शिला ।
एतानि समभागानि काकमाचीरसेन च ॥ ३०० ॥
मर्दनीयानि गाढानि कारितव्यानि खल्वके ।
पीतापित्तलपत्राणि कृतसूक्ष्माणि तान्यथ ॥ ३०१ ॥

लेपितव्यानि चैतेन चूर्णेनाथ प्रयत्नतः ।
मध्यमस्तु पुटो देयः क्रियते चूर्णमुत्तमम् ॥ ३०२ ॥
पुनस्तारस्य भागैकं चूर्ण भागद्वयं भवेत् ।
अध ऊर्ध्वमिदं दत्त्वा क्ष्माप्यते चैकतः कृतम् ॥ ३०३
भल्लाततैलमध्ये हि क्षिप्यते गालितं च तत् ।
एवं वारद्वयं तारं तत्तैले विनिवेशयेत् ॥ ३०४ ॥
पिञ्जराभं भवेत्तारं समं हेमापि मेलयेत् ।
जायते कनकं रम्यं वर्णयुग्मं विहाय तत् ॥ ३०५ ॥

इति हेमवती ॥

किमयेचा आणखी प्रकार.

पारा, शिसें, गन्धक व मनशीळ हे चार जिन्नस महाळुंगाच्या रसांत चार दिवस खूप खलून त्याची राबडी करावी, व चांदीचे पातळ पत्रे ठोकून त्यांना त्या राबडीचा लेप द्यावा. राबडींत महाळुंगाचा रस पुष्कळ घालावा, व लेप देऊन वाळवावा. या-प्रमाणें लेपाच्या भावना एकवीस द्याव्या. मग पत्रे वाळल्यावर मुशींत घालून पुट द्यावें आणि आटवावें, म्हणजे चांदीचें सुवर्ण होतें. (२९९).

किमयेचे आणखी (४) प्रकार.

पारा, हिंगुळ, सुवर्ण माक्षिक, गंधक व मनशीळ हे जिन्नस समभाग घेऊन खलांत घालून त्यांचा कांगोणीच्या अगर कावळीच्या रसांत जोरानें खल करून राबडी बनवावी. मग पितळेचे पत्रे ठोकून पातळ करून त्यांना त्या राबडीचा लेप करावा, आणि मध्यम आंच द्यावी, म्हणजे पत्र्यांचें चूर्ण होईल. नंतर चांदी एक भाग व चूर्ण दोन भाग घेऊन ते चांदीच्या खालवर मुशींत घालून आंच द्यावी, मग काढावे आणि बिब्याचें तेल गाळून घेऊन त्या तेलांत ते बुड-वावे. असे दोन वेळ केलें असतां चांदीस लाल रंग येतो. मग ती चांदी आणि तितकेंच सोनें एकत्र करून आटवावें, म्हणजे सर्वांचें एकजात सुरेख सोनें होतें. (३०१).

अथ रसबन्धनविद्या ।

भूलताशिखरीमूलं वारिणा मर्दयेद्दृढम् ।
तालिम्पेन्मूषिकामध्ये तन्मध्ये निक्षिपेद्रसम् ॥ ३०६ ॥
पञ्चटङ्कप्रमाणं, तां मूषामङ्गारके क्षिपेत् ।
एवं बद्धो भवेत्सूतो मूषान्तःस्थो दृढो भवेत् ॥ ३०७

अस्य फलम्—

मूषामध्यगतस्तिष्ठेन्मुखरोगाविनाशनः ।
शरीरे क्रामिते सूते जरापलितजिन्नरः ॥ ३०८ ॥
स्तम्भयेच्छस्त्रसंघातं कामोत्पादनकारकः ।
पुनर्नवं वपुः कुर्यात्साधकस्य न संशयः ।
अतिकामो भवेन्मर्त्यो वलीपलितनाशनः ॥ ३०९

इति रसबन्धनम् ॥

अथान्यः प्रकारः—

पुष्पितमनोजमन्दिरमध्ये सूतो नियन्त्रितो युक्त्या ।
बद्धो भवति कियद्भिर्दिवसैः पुष्पप्रभावेण ॥ ३१० ॥

इति रसबन्धनम् ॥

आतां रसबंधनक्रिया सांगतों.

भूनाग आणि आघाड्याचें मूळ ह्यांचा पाण्यांत एकत्र चांगला खल करावा व त्याचा लेप एका मुशीला आंतल्या बाजूनें मध्यभागीं द्यावा. नंतर त्यांत शुद्ध पारा पांच टांक टाकावा, आणि मूस निखाऱ्यांवर ठेऊन आंच द्यावी,म्हणजे पारा मुशीच्या तळाशीं घट्ट होऊन बसतो. ३०७

मुशीच्या मध्यभागीं चिकटलेला तो पारा सेवन केल्यास मुखरोगांचा नाश होईल आणि शरीरांत भिनला म्हणजे पांढरे केंस वगैरे म्हातारपणाची कळा दूर होईल. शस्त्राच्या घायानें इजा होणार नाहीं. उत्तम कामोद्दीपन होईल. पारा सेवन करणाराचें शरीर [जणो काय] नवीन बनेल आणि वृद्धत्व, सुरकुत्या वगैरे जाऊन मनुष्य अत्यंत मदमस्त होईल. (३०९)

दुसरा प्रकार

कांहींतरी युक्तीनें पारा जर ऋतुस्नात स्त्रियांच्या मदनमन्दिरांत ठेवला तर कांहीं दिवसांनीं तो आर्तवसंपर्कानें घट्ट होतो. ३१०)

अथान्येऽपि बन्धभेदास्ते यथा--

पंचविंशतिसंख्याकान् रसबन्धान् प्रचक्ष्यहे ।
येन येन हि चांचल्यं दुर्ग्रहत्वं विनश्यति ॥ ३११ ॥
रसराजस्य संप्रोक्ते बन्धनार्थो हि वातिकैः ॥
हटारोटौ तथाऽऽभासः क्रियाहीनश्च पिष्टिका ॥ ३१२ ॥
क्षारः खोटश्च पाटश्च कल्कबन्धश्च कज्जली ।
सजीवश्चैव निर्जीवो निर्बीजश्च सबीजकः ॥ ३१३
शृङ्खलाद्रुतिबन्धौ च बालश्चैव कुमारकः ।
तरुणश्च तथा वृद्धो मूर्तिबन्धस्तथाऽपरः ॥ ३१४
जलबन्धोऽग्निबन्धश्च सुसंस्कृतकृताभिधः ।
महाबन्धाभिधश्चेति पञ्चविंशतिरीरिताः ॥ ३१५ ॥
कोचिद्वदन्ति षड्विंशो जलौकाबन्धसंज्ञकः ।
स तावन्नेष्यते देहे स्त्रीणां द्रावे प्रशस्यते ॥ ३१६ ॥

बंधनभेद म्हणजे घट्ट झालेल्या पाऱ्याचे आणखी प्रकार.

असे प्रकार पंचवीस आहेत. पाऱ्यांत चंचलपणा आणि हातांतून निसटून जाणें हीं लक्षणें स्वभावतःच आहेत, तीं ज्या क्रियेनें नाहींशीं होतात आणि पारा घट्ट होतो त्या क्रियेला " बंधन " हें नांव रसशास्त्रज्ञांनीं दिलेलें आहे.(३११॥)

बंधनप्रकार २५ आहेत त्यांचीं नांवें.

१ हट, २ आरोट, ३ आभास, ४ क्रियाहीन, ५ पिष्टिका, ६ क्षार, ७ खोट, ८ पाट, ९ कल्कबंध, १० कज्जली, ११ सजीव, १२ निर्जीव, १३ सबीज, १४ निर्बीज, १५ शृंखला, १६ द्रुति-बंध, १७ बाल, १८ कुमारक, १९ तरुण, २० वृद्ध, २१ मूर्ति-बंध, २२ जलबंध, २३ अग्निबंध, २४ सुसंस्कृत, आणि २५ वा महाबंध. (३१५) कांहीं ग्रंथकारांच्या मतानें २६ वा जलौकाबंध म्हणून बंध आहे; पण त्याचा औषधांत उपयोग नाहीं. कामुक स्त्रियांच्यासंबंधानें मात्र त्याचा उपयोग करतात. ३१६)

अन्यमते चत्वार एव बन्धाः, ते यथा—

पाटः खोटो जलौका च भस्म चापि चतुर्थकम् ।
बन्धश्चतुर्विधो ज्ञेयः सूतस्य भिषगुत्तमैः ॥ ३१७ ॥

अस्य लक्षणानि—

पाटः पर्पटिकाबन्धः पिष्टिबन्धस्तु खोटकः ।
जलौका पक्वबन्धः स्याद्भस्म भस्मनिभो भवेत् ॥ ३१८ ॥
सूतभस्म द्विधा ज्ञेयमूर्ध्वगं तलभस्म च ।
ऊर्ध्वं सिन्दूरकर्पूररसावन्यदधो भवेत् ॥ ३१९ ॥

कांहीं ग्रंथकारांच्या मतानें चारच बंध मुख्य आहेत. पाट, खोट, जलौका आणि भस्मबंध हे ते चार बंध होत (३१६).

त्यांचीं लक्षणें सांगतोः —

पारा घट्ट होऊन पापडीसारखा झाला म्हणजे तो पाटबंध होतो, आणि लोण्याप्रमाणे मऊ होतो तो "खोट" या नांवाचा बंध होय. त्याला पिष्टि असेंहि म्हणतात. पाऱ्याची लगड बनली म्हणजे जलौकाबंध झाला आणि भस्माप्रमाणें रंग आला म्हणजे भस्मबंध होतो. (३१८). भस्म दोन प्रकारचें आहे. पारा उडून वरच्या झांकणाला चिकटतो हा एक प्रकार; त्याला ऊर्ध्वग भस्म म्हणतात, आणि कुपीच्या तळाशींच त्याचें भस्म होऊन राहतें हा दुसरा प्रकार. त्याला तलभस्म म्हणतात. रससिंदूर, रसकापूर हीं ऊर्ध्व भस्में आणि बाकींचीं तलभस्में होत. (३१९)

अथ हठादीनां लक्षणानि—

हठो रसः स विज्ञेयः सम्यक्शुद्धिविवर्जितः ।
स सेवितो नृणां कुर्यान्मृत्युं व्याधिसमुद्भवम् ॥ ३२० ॥
सुशोधितो रसः सम्यगारोट इति कथ्यते ।
स क्षेत्रीकरणे श्रेष्ठः शनैर्व्याधिविनाशनः ॥ ३२१ ॥
पुष्टितो यो रसो याति योगं त्यक्त्वा स्वभावताम् ।
भावितो मायुमूलाद्यैराभासो गुणवैकृती ॥ ३२२ ॥
असंशोधितलोहाद्यैः साधितो यो रसोत्तमः ।
क्रियाहीनः स विज्ञेयो विक्रियां यात्यपथ्यतः ॥ ३२३ ॥
तीव्रातपे गाढतरावमर्दान्पिष्टीभवेत्सा नवनीतरूपा ।
ख्यातः स सूतः किल पिष्टिबद्धः संदीपनः पाचनकृद्विशेषात् ॥
शङ्खशुक्तिवराटाद्यैर्योऽसौ संसाधितो रसः ।
क्षारबद्धः परं दीप्तिपुष्टिकृच्छ्लनाशनः ॥ ३२५ ॥

बद्धो यः स्फो (खो) टतां याति धमातो धमातः क्षयं व्रजेत् ।
खोटबद्धः स विज्ञेयः शीघ्रं सर्वविषापहः ॥ ३२६ ॥
द्रुतकज्जलिका मोचापत्रके चिपिटीकृता ।
स पाटः पर्पटी सैव बद्धश्चाखिलरोगनुत् ॥ ३२७ ॥
मोचापत्रं कदलीपत्रम् ॥
स्वेद्यादैः साधित सूतः कल्कत्वं समुपागतः ।
कल्कबद्धः स विज्ञेयो योगोक्तफलदायकः ॥ ३२८
कज्जली रसगन्धोत्था सुश्लक्ष्णा कज्जलोपमा ।
तत्तद्योगेन संयुक्ता कज्जलीबंध उच्यते ॥ ३२९ ॥

आतां हठादिक २५ बंधांचीं लक्षणें लिहितों.

पाऱ्याची उत्तम रीतीनें शुद्धि न करतांच त्याचें बंधन करतात, त्याला हठबंध ह्मणतात. तो खाण्यांत आला असतां व्याधि उत्पन्न होऊन मृत्यू येतो.

पारा चांगला शुद्ध केल्यानंतरच ज्याचें बंधन करतात त्याला ' आरोट " म्हणतात. शरीररूपक्षेत्राला यथायोग्य बनविण्यांत तो श्रेष्ठ आहे. तो हलके हलके (गुण देऊन) सर्व व्याधी नष्ट करतो.

आपलें स्वाभाविक चांचल्य टाकून पुटाग्नीनें व (प्राण्यांचें) पित्त व औषधिंचीं मुळें याच्या भावना दिल्या गेल्यामुळें जो पारा संयोग पावून बांधला जातो त्याला " आभास " हें नांव आहे. त्या पाऱ्याच्या गुणांत थोडी विकृति आहे. (३२२).

शुद्ध न करतांच वापरलेल्या लोहादि धातूंच्या योगानें बंध पावलेल्या पाऱ्याला क्रियाहीन म्हणतात. कुपथ्य केलें असतां हा पारा अपाय करतो.

कडक उन्हामध्यें सडकून खल झाल्यामुळें जो लोण्याप्रमाणें मऊ होतो त्याला " पिष्टि " या नांवानें ओळखतात तो क्षुद्दीपन करणारा व पाचक आहे. (३२४).

शंख, मोतीं किंवा कवड्या ह्यांच्या भस्मानें जो बांधला जातो त्याला क्षारबद्ध म्हणतात; हाहि पारा क्षुद्दीपन करणारा, पौष्टिक व शूलनाशक आहे.

जो घट्ट होतो, परंतु पुनः पुनः आंच दिल्यानें जो कमी कमी होतो त्याला " खोट " म्हणतात. तो सर्व विषनाशक आहे.

प्रथम कज्जलीरूप असून नंतर विद्रुत होतो व मोचापत्रांत ज्याची घट्ट दामटी होते, त्याला पाट म्हणतात हिलाच पर्पटी किंवा पापडी म्हणतात. ह्या पर्पटीनें सर्व रोग नाश पावतात. (३२७)

मोचापत्र म्हणजे केळीचें पान असा अर्थ ग्रंथकारानें दिला आहे.

भस्मीकृतो नश्यति वन्हियोगाद्रसः सजीवः खलु संप्रदिष्टः ।
संसेवितोऽसौ न करोति भस्मकार्यं जराव्याधिविनाशनं च३३०
जीर्णाभ्रको वा परिजीर्णगन्धो भस्मीकृतश्चाखिललोहमौलिः ।
निर्जीवनामा हि स भस्मसूतो निःशेषरोगान् विनिहन्ति वेगात्
रसस्तु पादांशसुवर्णजीर्णः पिष्टीकृतो गन्धकयोगतश्च ।
तुल्यांशगन्धैः पुटितः क्रमेण निर्विजनामा सकलामयघ्नः ३३२
बीजीकृतैरभ्रकसत्त्वहेमतारार्ककान्तैः परिजारितो यः ।
हतस्ततः षड्गुणगन्धकेन सबीजबद्धो विपुलप्रभावः ॥ ३३३ ॥
वज्रादिनिहतः सूतो हतसूतसमोऽपरः ।
शृंखलाबद्धसूतस्तु देहलोहविधायकः ।
(चित्रप्रभावां वेगेन व्याप्तिं जानाति शङ्करः ?) ॥ ३३४ ॥
युक्तोऽपि बाह्यद्युतिभिश्च सूतो बन्धं गतो वा भासितस्वरूपः ।
स राजिकापादमितो निहन्ति दुःसाध्यरोगान् द्युतिबद्धनामा ॥
समाभ्रजीर्णः शिवजस्तु बालः संसेवितो योगयुतो जवेन ।
रसायनो भाविगदापहश्च सोपद्रवारिष्टगदान्निहन्ति ॥ ३३६ ॥
हरोद्भवो यो द्विगुणाभ्रजीर्ण : स स्यात्कुमारो मिततण्डुलोऽसौ ।
त्रिसप्तरात्रैः खलु पापरोगसंघातघाती च रसायनश्च ॥ ३३७ ॥

चतुर्गुणव्योमकृताशनो यो रसायनाग्र्यस्तरुणाभिधानः ।
स सप्तरात्रात्सकलामयघ्नो रसायनो वीर्यबलप्रदाता ॥ ३३८ ॥
यश्चाभ्रकं षङ्गुणितं हि जीर्णः प्राप्ताग्निसख्यः स हि वृद्धनामा ।
देहे च लोहे च नियोजनीयः शिवादृते कोऽस्य गुणान् प्रवक्ति ॥

स्वेदन केल्यामुळें ज्याचा कल्क (म्हणजे चोथा) बनतो त्याला कल्कबद्ध म्हणतात. दुसऱ्या धातूशीं त्याचा संयोग केला असतां इष्ट उपयोग होतो

पारा आणि गंधक ह्यांचें जें रासायनिक मिश्रण बनतें त्याला कज्जली हें नांव आहे. ती काजळाप्रमाणें काळी मऊ असते. दुसऱ्या अनेक औषधांशीं मिश्र केली म्हणजे तिला कज्जलीबंध हें नांव प्राप्त होतें. (३२९)

जें पारद भस्म अग्नीवर टाकलें असतां उड्डन जाऊन नाहींसें होतें त्याला सजीव म्हणावें. अशा तऱ्हेचें पारद भस्म सेवन केल्याचा कांहीं एक उपयोग नाही. वृद्धावस्था व रोग हीं दोन्ही त्यानें दूर होत नाहींत.

ज्यामध्यें अभ्रक किंवा गंधक जिरविलेला असतो आणि नंतर ज्याचें भस्म करण्यांत आलेलें असतें,त्याला निर्जीव अशी संज्ञा आहे. अशा रीतीनें भस्म झालेला पारा सर्व धातूंत श्रेष्ठ आहे. हा मात्र एकंदर रोगाचा सपाट्यासरशी नाश करतो.

ज्यामध्यें चौथ्या हिश्शाइतकें सोनें जिरविलें असतें व जो गंधकाच्या योगानें लोण्याप्रमाणें मऊ होतो, अशा पाऱ्याला बरोबरीनें गंधक देऊन क्रमानें पुट दिलें असतां तो निर्बीज बंध होतो. हा देखील सर्व रोगहारक आहे. (३३२)

ज्याला अभ्रकसत्व, सोनें, रौप्य, ताम्र, कान्तलोह देऊन तें बीज जिरवून नंतर सहा पटीनें गंधक देऊन ज्याचें भस्म केलें असतें त्याला " बीजबद्ध " पारा म्हणतात. ह्याचें सामर्थ्य फार भारी असतें. (३३३.)

वज्र म्हणजे हिरा किंवा काळा दगडी अभ्रक, ह्यांच्या योगानें मारलेला पारा हा इतर (रीतीनें) मारलेल्या पाऱ्याप्रमाणेंच दिसतो; परंतु ह्या प्रकाराला शृंखलाबंध हें नांव आहे. हा पारा शरीर लोखंडाप्रमाणें करतो. तो वेगानें विलक्षण व सामर्थ्यवान् आहे. त्याचें(शरीर) व्यापन सामर्थ्य किती तें एक देवालाच माहीत.(३३४)

बाह्य द्रुतिक्रियेनें घट्ट झालेला पारा, बद्ध झालेला असो किंवा भस्मीभूत झालेला असो, त्याला द्रुतिबद्ध म्हणतात; असा पारा मोहरीच्या चौथ्या हिश्शाइतका जरी सेवन केला तर अत्यंत खडतर अशा रोगांचाहि नाश होतो. (३३५)

ज्या पाऱ्यांत अभ्रक बरोबरीनें जिरला गेला आहे तो प्रकार बालबंध होय; अशा पाऱ्याचा योग दुसऱ्या (औषधी)शीं करून तो सेवन केला किंवा रसायन म्हणून तो सेवन केला ह्मणजे मुळी रोगच होत नाहीं, आणि पूर्वी झाले असलेले अनेक उपद्रव, अरिष्टें आणि रोग हे तर हां हां ह्मणतां नाहीसें होतात.

ज्या पाऱ्यांत दुप्पट अभ्रक जिरविलेला असतो तो प्रकार कुमारबंध होय. त्याची मात्रा तांदुळाइतकी २१ दिवस सेवन केल्यास दुष्कर्मामुळें जें अनेक रोगांचें जाळें शरीरांत वाढलें असतें त्या सर्वांचा हा पारा समूळ नाश करतो. हा पारा रसायनही आहे.

पाऱ्यांत चौपट अभ्रक जिरलें म्हणजे तें उत्कृष्ट प्रतीचें रसायन बनतें, व त्या बंधाला तरुणबन्ध असें म्हणतात. असा पारा एक आठवडाभरच सेवन केल्यास सर्व रोगांचा संहार होतो व शरीरांत बळ व वीर्य उत्पन्न करतो. (३३८)

ज्यामध्यें सहापट अभ्रक जिरलेलें असतें त्याचें अग्नीशीं सख्य झालें असें समजतात (तो अग्नीनें उडून जात नाहीं) हा प्रकार वृद्धबन्ध होय. तो औषधालाहि चालतो आणि किमया करण्यालाहि उपयोगी पडतो. त्याचा प्रभाव कोण वर्णन करील ? श्रीशंकर मात्र करूं शकतील. (३३९)

यो दिव्यमूलिकाभिश्च कृतोऽत्याग्निसहो रसः ।
विनाऽभ्रजारणात् स स्यान्मूर्तिबद्धो महारसः ॥ ३४० ॥
अयं हि जार्यमाणस्तु नाग्निना क्षीयते रस :
योजितः सर्वरोगेषु निरौपम्यफलप्रदः ॥ ३४१ ॥
शिलातोयमुखैस्तोयैः सिद्धोऽसौ जलबन्धनात् ।
स जरारोगमृत्युघ्नः कल्पोक्तफलदायकः ॥ ३४२ ॥
केवलो लोहयुक्तो वा ध्मातः स्याद्गुटिकाकृतिः ।
अक्षीणश्चाग्निबद्धोऽसौ स्वेचरत्वादिकृत्स हि ॥ ३४३ ॥
हेम्ना वा रजतेन वा सहचरो ध्मातो व्रजत्येकता
मक्षीणो निबिडो गुरुश्च गुटिकाकारोऽतिदीप्तोज्ज्वलः ।
चूर्णत्वं पटुवत्प्रयाति निहतो घृष्टो न मुञ्चेन्मलं
निर्गन्धो द्रवति क्षणात्स हि महाबद्धाभिधानो रसः ॥ ३४४॥
इति रसबन्धलक्षणम् ॥

कांहीं तरी जडीबुटीच्या योगानें जो पारा निरुत्थ होतो म्हणजे अग्नीवर टाकला तरी उडून जात नाहीं, अशा पाऱ्यांत अभ्रक जिरविलें म्हणजे त्याला मूर्तिबंध म्हणतात हा महारस होय. जारण करण्याकारितां हा भट्टींत घातला तरी कमी होत नाहीं. त्याचा पाहिजे त्या रोगावर उपयोग करावा असा फायदा होतो कीं, त्याला उपमाच नाहीं. (३४१)

ज्याचें बंधन शिलातोयानें केलेलें असतें तो पारा जलबंधनानें सिद्ध झाला असें म्हणतात. त्यानें रोगच काय, पण जरा आणि मृत्यु हे देखील दूर होतात.त्याचें फल रसार्णवांत लिहिलें आहे.(३४२)

ज्याचा केवळ लोहाशीं योग होऊन अग्निपुटानें ज्याची गोळी बनते तो अग्निबद्ध होय. तो सेवन केला तर आकाशमार्गानें गमन करणें (अदृश्य होणें) वगैरे सिद्धी प्राप्त होतात.

सोनें किंवा चांदी यांच्याशीं पारा एकत्र करूनभ भट्टींत आंच देऊन त्यांचा अशा रीतीनें एकजीव करण्यांत येतो की, तें मिश्रण (वजनांत) कमी न होतां घट्ट, जड व गोळीबंद होऊन फार झगझगीत दिसतें. हा " सुसंस्कृत बंध " होय. तसेंच पारा

अशा रीतीनें मारतात कीं, त्याचा चुरा सैंधवाप्रमाणें दिसतो, व तो खलला तरी त्यांत मळ सांपडत नाहीं आणि त्यांतून गन्धक काढून टाकटांच सो पुनः द्रवरूप होतो. ह्या क्रियेला महाबंध म्हणतात.

(३४४)

अथ नित्यनाथेन रसमूर्च्छनमुक्तम् ।—
मेघनादवचाहिङ्गुलशुनैर्मर्दयेद्रसम् ॥
नष्टपिष्टं तु तद्गोलं हिङ्गुना वेष्टयेद्बहिः ॥ ३४५ ॥
पचेल्लवणयन्त्रस्थं दिनैकं चण्डवह्निना ।
ऊर्ध्वलग्नं समादाय दृढवस्त्रेण बन्धयेत् ॥ ३४६ ॥
उर्ध्वाधो गन्धकं तुल्यं रसं दत्त्वाऽनले पचेत् ।
जीर्णे गन्धे पुनर्देयः षड्भिर्वारैः समः समः ॥
षड्गुणे गन्धके जीर्णे मूर्च्छितो रोगहा भवेत् ॥ ३४७ ॥

रसरत्नाकरकार नित्यनाथ ह्यांनीं पाऱ्याच्या मूर्च्छना प्रकाराचें वर्णन दिलें आहे तें असें:—

आघाडा, वेखंड, हिंग आणि लसूण ह्याच्यांशीं पाऱ्याचा खल करून सर्वांचा एकजीव झाल्यावर त्याचा गोळा करून त्याला बाहेरून हिंगाचा लेप करावा. नंतर गोळा लवणयंत्रांत ठेऊन दिवसभर प्रखर अग्नीची आंच द्यावी. मग यंत्राच्या वरच्या भागास चिकटलेला पारा काढून घेऊन स्वच्छ व मजबूत फडक्यांत घट्ट बांधावा आणि तितकाच गंधक घेऊन तो पाऱ्याच्या खालवर देऊन पुनः अग्नींत पुट द्यावें, म्हणजे गंधक जिरून जातो. ह्याप्रमाणें सहा वेळां करून सहा पट गंधक जिरविला असतां पारा मूर्च्छित होऊन रोगांचा नाश करतो (३४७).

मूर्च्छितलक्षणम् ।—
कज्जलाभो यदा सूतो विहाय घनचापलम् ।
मूर्च्छितस्तु तदा ज्ञेयो नानावर्णोऽपि च क्वचित् ॥ ३४८ ॥
मूर्च्छितफलम् । —
मारितं देहसिद्ध्यर्थं मूर्च्छितं व्याधिनाशने ।
रसभस्म क्वचियोगे देहार्थे मूर्च्छितं क्वचित् ॥ ३४९ ॥

मूच्छिति केलेल्या पाऱ्याचें लक्षण सांगतोः—

जो पारा काजळाप्रमाणें काळ्या रंगाचा दिसतो, ज्याला घट्टपणा आणि पातळपणा हे दोन्ही नसतात, अशा पाऱ्याला मूच्छित म्हणावें. कधीं कधीं मूर्च्छित पाऱ्याचा रंग काळा नसून दुसऱ्या अनेक प्रकारचा असतो(३४८) देहाला उत्तम कांति आणण्याकरितां योजना करणें असल्यास पारदभस्माची करावी; व आरोग्याकरितां पारा घ्यावयाचा असल्यास तो मूर्च्छित करून घ्यावा असा साधारण नियम. परंतु औषधक्रियेंत रोगनाशनाकरितां केव्हां केव्हां भस्म वापरतात व देहसिद्धीकरतां देखील कधीं कधीं मूर्च्छित पाऱ्याची योजना करितात. (३४९).

अथ रसभस्मीकरणम् ।

तत्रोर्ध्वभस्म यथा रससिन्दूराख्यम् ।—
सूतः पञ्चपलः स्वदोषरहितस्तत्तुल्यभागो बलि-
र्द्वौ टङ्कौ नवसादरस्य तुवरीकर्षश्च संमार्दितः ।
कूप्यां काचभुवि स्थितश्च सिकतायंत्रे त्रिभिर्वासरैः
पक्को वन्हिभिरूर्ध्ववत्यरुणभाः सिन्दूरनामा रसः ॥ ३५० ॥

रसराजलक्ष्म्या तु—
कूपी सप्तमृदंशुकैः परिवृता शुष्काऽत्र गन्धेश्वरौ
तुल्यौ तौ नवसारपादकलितौ संमर्द्य तस्यां न्यसेत् ।
तां यंत्रे सिकताख्यके तलविले पक्त्वाऽर्कयामं हिमां
भित्वा कुङ्कुमपिञ्जरं रसवरं भस्माददीतोत्तमम् ॥ ३५१ ॥

अन्यच्च—
पाके रूद्धं मुखं कूप्या नवसारेण जायते ।
ततः शलाकया कुर्यात्कूपिकानाशशान्तये ॥ ३५२ ॥
अनेन विधिना पाका यावन्तोऽस्य भवन्तिहि।
तावन्तो हि गुणोत्कर्षा जायन्ते रसभस्मनः ॥ ३५३ ।

पारद भस्माची क्रियाः—

यंत्राच्या वरच्या भागाला जें भस्म चिकटतें तें ऊर्ध्वभस्म होय हें वर सांगितलेंच आहे. रससिंदूर हा ऊर्ध्व भस्माचाच एक प्रकार आहे. त्याची क्रिया लिहितों.

पारा शुद्ध केला म्हणजे सप्तदोषरहित केलेला असा वीस तोळे घ्यावा; गन्धक तितकाच म्हणजे वीस तोळे, व नवसागर दोन टांक, व तुरटी एक कर्ष याप्रमाणें घ्यावे व सर्वांचा एकत्र चांगला खल करावा. नंतर तें मिश्रण कांचेच्या कुपींत घालून वालुकायंत्रांत तीन दिवस आंच द्यावी, म्हणजे कुपीच्या वरच्या भागीं तांबड्या लाल रंगाचें (पारदभस्म) रससिंन्दूर या नांवाचें जमून बसतें (३५०).

रसराजलक्ष्मी या ग्रंथांतील क्रिया:—

एक कांचेची कुपी घ्यावी आणि तिला मातकापडाचीं सात वेष्टनें देऊन तीं वाळवावीं. वाळल्यावर गन्धक आणि पारा, समभाग, व नवसागर पावभाग असे एकत्र खलून तें मिश्रण कुपींत घालावें आणि कुपी वालुकायंत्रांत तळाशीं ठेऊन बारा प्रहर अग्नि द्यावा. थंड झाल्यावर कुपी फोडून लाल झालेलें भस्म रससिंदूर या नांवाचें होतें, तें वैद्यानें काढून घ्यावें. (३५१)

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं:—

नवसागर बसवून तोण्ड पक्कें बंद केलेल्या कुपींत (गन्धक व पारा घालून त्यांना) आंच दिली असतां (भस्म होतें). नंतर सळईनें कुपींचें तोण्ड कुपी न फोडतां खोलावें. याप्रमाणें त्या भस्माला जितक्या वेळां आंच द्यावी तितक्या पटीनें त्या पारद-भस्माचा गुण वाढतच जातो (३५३).

अन्यच्च—

भागो रसस्य त्रय एव भागा गन्धस्य मापः पवनाशनस्य ।
संमर्द्य गाढं सकलं सुभाण्डे तां कज्जलीं काचकृते निदध्यात् ॥
संवेष्टय मृत्कर्पटकैर्घटीं तां मुखे सचूर्णां गुटिकां च दत्त्वा ।
क्रमाग्निना त्रीणि दिनानि पक्त्वा तां वालुकायन्त्रगतां, ततः स्यात्
बन्धूकपुष्पारूणमीशजस्य भस्म प्रयोज्यं सकलामयेषु ।
निजानुपानैर्मरणं जरां च निहन्ति बल्लक्रमसेवनेन ॥ ३५६ ॥

'गन्धस्य भागो नवसादरस्य' इति मुख्यः पाठः 'भागशब्दस्तु

कर्षत्रयवाची ' इति वृद्धाः । केचन पवनाशनशब्देन सीसकं व्याचक्षते; तच्तु धातुवादे उपयुज्यत इति ज्ञेयम् । आरूण्योत्पत्त्यै कूपीमुखे मुद्रा कार्या इति केचिद्वदन्ति, अन्ये तु मुद्रामदत्त्वैव रसभस्म संपादयान्ति; यथासंप्रदायं व्यवस्था ॥

आणखी एक क्रियाः—

पारा एकभाग, गंधक फक्त तिन भाग आणि (पवनाशन म्ह०) शिसें एक मासा याप्रमाणें घेऊन सर्व जिन्नस खलांत जोरानें खलावे, म्हणजे कज्जली होते; ती कांचेच्या कुपींत घालून मातकापड करून कुपीचें तोण्ड चुना व गूळ यांनीं बंद करावें; नंतर क्रमानें वाढत्या अग्नीची आंच वालुकायंत्रांत तिन दिवस द्यावी, म्हणजे दुपारीच्या फुलाप्रमाणें लाल रंगाचें भस्म तयार होतें. तें सर्व रोगावर अनुपानपरत्वें एक वालप्रमाणें दिलें असतां मृत्यू व वार्धक्य ह्यांचा निरास होतो. (३५६)

वरील श्लोकांत मुख्य पाठ " नवसागर एक भाग " असा आहे. भाग म्हणजे तीन कर्ष असा वृद्ध लोकांचा अभिप्राय आहे. कांहीं ग्रंथकार नवसागराबद्दल शिसें घ्यावें असें लिहितात; परंतु तें किमयेच्या क्रियेंत असें समजावें. भस्माला तांबडा रंग हवा असल्यास कुपीचें तोण्ड बंद केलें पाहिजे असें कोणी म्हणतात, परंतु कांहीं लोक तोण्ड बंद न करतांच भस्म बनवितात. याप्रमाणें ज्याची जी पद्धति त्याप्रमाणें तो भस्म तयार करतो.

अथानुपानानि--
वाते सक्षौद्रपिप्पल्यापि च कफरूजि त्र्यूषणं साग्निचूर्णम्
।पित्ते सैलं सितेन्दु व्रणवति तु वरागुग्गुलुश्चारूशुद्धः ।
चातुर्जातेन पुष्टौ हरनयनफला शालमलीपुष्पवृन्तं
किंवा कान्तालललाटाभरणमनु रसे पानमेतद्वदान्ति ॥ ३५७ ॥

आतां मात्रेचें अनुपान सांगतोंः—

वातावर मधपिंपळींत, कफावर त्रिकटु व चित्रक यांचे चूर्णाबरोबर; पित्तावर वेलदोडेचांत, उरःक्षतक्षयावर तुरटी आणि

शुद्ध गुग्गुळ यांत; पुष्टताईस चतुर्जाताबरोबर, किंवा त्रिफळा, सावरीच्या फुलांच्या डिंग्या अगर केशर यांच्याबरोबर; याप्रमाणें रससिंदुराचीं अनुपानें आहेत. (३५७)

अथ गुणाः--

अपहरति रोगवृन्दं दृढयति कायं महद्बलं कुरुते।
शुक्रशतानि च सूते सिन्दूराख्यो रसः पुंसाम् ॥ ३५८ ॥
स्मरस्यायुर्नागदगहनदावानलशिखा
परं वन्हेस्तेजो बलरुचिरतावल्लिमुदिरः।
अपि प्रौढस्त्रीणामतुलबलहारी निधुवने
रसः सिन्दूराख्यः सकलरसराजो विजयते ॥ ३५९ ॥
मुदिरो मेघः ॥

मात्रेचे गुणः--रससिन्दूरमात्रासेवनानें सर्व रोग जातात, शरीर बळकट होतें, शक्ति वाढते, आणि वीर्यवृद्धि शतपट होते. (३५८)

मदनाचें जणों आयुष्यच, अनेक रोगरूपी दाट अरण्यांतील दावाग्नीची ज्वाळाच; अग्नीचें तेज; बळ सौंदर्य ह्यांच्या वेलींचा मेघ; विलासनी स्त्रियांची कामशांति करण्यांत अप्रतिम बलवान्, असा हा रससिंदूर सर्व रसायनांचा राजाच आहे. (३५९)

" मेघ " या शब्दाबद्दल ग्रंथांत ' मुदिर ' असा शब्द आहे.

कूष्माण्डं कर्कटी कोलं कालिङ्गं करमर्दकम्।
करीरं चेति षट्कादीन् वर्जयेद्रससेवकः ॥ ३६० ॥
यस्य रोगस्य यो योगस्तेनैव सह योजितः।
रसेन्द्रो हरते व्याधीन्नरकुञ्जरवाजिनाम् ॥ ३६१ ॥

मात्रा सेवन करणारास पथ्यः--

कोहळा, कांकडी, कोळ, कलिंगड, करवंद, करीर (नेवती) हे सहा ' ककार ' म्हणजे ' क ' या अक्षरारंभाचे पदार्थ मात्रा सेवन करणारास वर्ज आहेत. ज्या रोगावर जो औषधयोग उत्तम, त्या औषधाबरोबर रससिंदूर दिला असतां मनुष्य, हत्ती, घोडे, इ. कांना होणाऱ्या सर्व रोगांचा तो विध्वंस करतो.(३६१)

अथ रसकर्पूरः ।

गैरिकतुत्थरीखटिकासैन्धवगडजं रजः कुडवम् ।
प्रत्येकं दृढहण्ढ्यामाधायास्योपरि रसः स्थाप्यः ॥ ३६२ ॥
कुंडंवामितोऽथ तदूर्ध्वं देया हण्डी तदास्यायतमुखी ।
अथ तत्सन्धेर्मुद्रां कृत्वा तदधो हुताशनो ज्वाल्यः ॥३६३ ॥
अर्मणषट्कप्रामितैर्दारुभिरनूनातिदुर्बलस्थूलैः ।
आग्निं क्रमेण दद्यादृगुरुदार्शितवर्त्मना द्विनिशम् ॥ ३६४ ॥
तदनु ततो तन्त्रवरायुक्त्या कर्पूरसंनिभं सूतम् ।
आदाय काचकुम्भे निधाय नवसादरं दद्यात् ॥ ३६५ ॥
संमर्द्य चाथ काष्ठैरर्धार्मणसांमितैः पचेद्धस्त्रम् ।
चुल्लीडमरूकमध्यं वितास्तिचतुरङ्गुलावकाशं तु ॥ ३६६ ॥
कर्तव्यं, क्रमदहनं तदधः प्रज्वालयेन्मध्यम् ।
शाशिधवलमुपरिलग्न युक्त्या संगृह्य रक्षयेद्यत्नात् ॥ ३६७ ॥

रसकापुराची क्रिया.

गेरू, तुरटी, खडु, सैंधव, सांबरलोण हे प्रत्येकी एक कुडव-प्रमाणें घ्यावें व एकत्र करून एका भक्कम मडक्यांत घालून त्याच्या-वर पारा एक कुडव ठेवावा. नंतर त्या मडक्याच्या तोण्डावर दुसरें मडकें पालथें बसवून त्याच्या सांध्यावर संधिलेप करावा आणि तें डमरूयंत्र चुलीवर ठेऊन खालीं जाळ लावावा; अगदीं बारीक नव्हेत, अगदीं जाड नव्हेत, अशीं लांकडें सहामण आणून त्यांची आंच दोन दिवस गुरूनीं सांगितल्याप्रमाणें एकसारखी द्यावी. मग थंड झाल्यावर वरच्या मडक्याच्या आंतील बाजूस पारा चिटकून बसतो तो काढून घ्यावा आणि खलांत ठेऊन त्याचा नवसागराशीं खल करावा. मग त्या मिश्रणाला अर्धामण लांकडांचा अग्नि एक दिवस द्यावा. (३६५) चुलीचा तळ आणि डमरूयंत्रांतील खालचें मडकें यांच्यामधील पोंकळी एक वीत चार बोटें इतकी ठेऊन त्या मडक्याखालीं क्रमानें वाढणारा असा जाळ लावावा भट्टी विझून थंड झाल्यावर यंत्रांतील वरच्या मडक्याला भस्म चिकटलेलें असतें तें युक्तीनें काढून घेऊन जपून ठेवावें.

वल्लं वल्लार्धं वा गुडेन जीर्णेन रोगिणे दद्यात्।
दध्योदनं तु पथ्यं देयं तस्मै च ताम्बूलम्॥ ३६८॥
हरति समस्तं रोगं कर्पूराख्यो रसो नृणाम्॥
फिरङ्गकारिकेसरी सकलकुष्ठकालानलो·
ऽखिलव्रणाविनाशकृद्व्रणजर्गतर्पीतप्रदः॥
सुवर्णसमवर्णकृद्बलहुताशतेजस्करः
समस्तगदतस्करो रसपतिः स कर्पूरकः ३६९॥
नवसादरं दद्यात् ' पारदाच्चतुर्थांशं ' इति शेषः। तुवरी
फटकडी, गडं सांभारिलवणं, शेषं स्पष्टम्॥

हें भस्म अर्ध्या वालापासून एक वालापर्यंत जुन्या गुळाशीं रोग्याला द्यावें. पथ्य दुधभात आणि वर त्रयोदश गुणी तांबूल खावा. हें रसकर्पूर नांवाचें भस्म होय. कोणताहि रोग असो, तो रोग हें भस्म नष्ट करून टाकतें. (३६८).

फिरंग (लोकांच्या संसर्गानें इकडे आलेला जो) उपदंश रोग तो समूळ नाहींसा करणारा सिंह; सर्व प्रकारच्या कुष्ठांचा कृतांत, यच्चावत् व्रण बरे करण्यांत आणि व्रणांची जखम भरून काढण्यांत वस्ताद, अंगकांति सुवर्णाप्रमाणें करण्यांत हातखंडा; शरीरामध्यें बळ, अग्निप्रदीप्तता व तेज आणणारा;आणि सर्व रोगांची दुर्दशा करणारा असा रसकर्पूर हा रसांचा राजा होय.(३६९).

वरच्या क्रियेंत नवसागर घालावयाचा तो पाऱ्याच्या चवथ्या हिश्शानें घालावा. तुवरी म्ह० तुरटी व " गड " म्ह० सांबरमीठ.

अथ रसकर्पूरस्यापरो विधिः—

शुद्धसूतसमं कुर्यात्प्रत्येकं गैरिकं सुधीः।
इष्टिकां खटिकां तद्वत्स्फटिकां सिन्धुजन्म च॥ ३७०॥
वल्मीकं क्षारलवणं भाण्डरञ्जनमृत्तिकाम्।
सर्वाण्येतानि संचूर्ण्य वाससा परिशोधयेत्॥ ३७१॥
सिन्धुजन्म सैन्धवं, वल्मीकं तज्जा मृत्, क्षारलवणं खारियालोणं, भाण्डरञ्जनमृत्तिका कुलालगृहे ' कावीस ' इति नाम॥
एभिश्चूर्णैर्युतं सूतं यावद्यामं विमर्दयेत्॥
तच्चूर्णसहितं सूतं स्थालीमध्ये परिक्षिपेत्॥ ३७२॥

तस्याः स्थाल्या मुखे स्थालीमपरां धारयेत्समाम्।
सवस्त्रकुट्टितमृदा मुद्रयेदुभयोर्मुखम् ॥ ३७३ ॥
संशोष्य मुद्रयेद्भूयो भूयः संशोष्य मुद्रयेत्।
सम्यग्विशोष्य मुद्रां तां स्थालीं चूल्यां निरोधयेत् ॥३७४ ॥
अग्निं निरन्तरं दद्याद्यावद्दिनचतुष्टयम्।
अङ्गारोपरि तद्यन्त्रं रक्षेद्यत्नाद्दहर्निशम् ॥ ३७५ ॥
शनैरुद्घाटयेद्यन्त्रमूर्ध्वस्थालीगतं रसम्।
कर्पूरवत्सुविमलं गृह्णीयाद्गुणवत्तरम् ॥ ३७६ ॥
तं देवकुसुमचन्दनकस्तूरीकुङ्कुमैर्युक्तम्।
खादन् हरति फिरङ्गं व्याधिं सोपद्रवं सपदि ॥ ३७७ ॥
विन्दति वन्हेःदीप्तिं पुष्टिं वीर्यं बलं विपुलम्।
रमयति रमणीशतंक रसकर्पूरस्य सेवकः सततम् ॥ ३७८ ॥

इति रसकर्पूरः ॥

रसकर्पूर बनविण्याचा दुसरा प्रकार

चतुर वैद्यानें गेरु, विटकर, खडू, तुरटी व सैंधव हे जिन्नस शुद्ध पाच्याच्या वजनाइतके घ्यावे आणि ते जिन्नस व वारुळांतील माती, खारीयालोण आणि कुंभाराच्या घरीं मडकीं रंगविण्यास घेतात ती काव एकत्र खलून त्यांचें चूर्ण वस्त्रगाळ करावें (३७१) (सैंधव हें खाणींत सांपडतें.) मग त्या चूर्णांत शुद्ध पारा घालून त्याचा एक प्रहर खल करावा, व तें मिश्रण मडक्यांत ठेऊन त्याच्या तोंडावर दुसरें मडकें उपडें बसवून त्यांना मातकापड करावें व वाळवावें. वाळल्यावर पुनः मातीनें लिंपावें व पुनः वाळवावें. याप्रमाणें तीन लेप द्यावे. शेवटचा लेप वाळल्यावर गाडगें चुलीवर ठेऊन चार दिवस एकसारखा अग्नि द्यावा. मग हंडी उतरून एक अहोरात्र निखाऱ्यावर ठेवावी. (३७५) निवाल्यावर वरचें मडकें हळूच उघडून त्यांत तळाला चिकटलेला कापराप्रमाणें पांढरा स्वच्छ पारा काढून घ्यावा. हा गुणानें अधिक आहे. तो देवकुसुम (लवंगा), चंदन, कस्तुरी, केशर यांच्याबरोबर सेवन केला असतां उपदंश व तत्संबंधीं अनेक विकार नाहींसे होतात. नित्य सेवन करणाराचा जठराग्नि प्रदीप्त

होतो. शरीर पुष्ट होऊन वीर्यवृद्धि होते व बळ यथास्थित वाढतें, आणि तो पुरुष शंभर स्त्रियांचा सुद्धां उपभोग घेऊं शकतो (३७९)

फिरंगव्याधि म्हणजे उपदंश.

अथ सिन्दूररसः ।
शुद्धसूतं तदर्धं तु शुद्धगन्धकमेव हि ।
तयोः कज्जलिकां कुर्याद्दिनमेकं विमर्दयेत् ॥ ३७९ ॥
मृत्कर्पटैर्विलिप्तायां कूप्यां कज्जालिकां क्षिपेत् ।
वालुकायन्त्रगां यावत्पचेद्यामचतुष्टयम् ॥ ३८० ॥
गृह्णीयादूर्ध्वसंलग्नं सिन्दूरसदृशं रसम् ।
इति सिन्दूररसः ॥

सिंदूररस.

शुद्ध पारा एक भाग व शुद्ध गन्धक त्याच्या निम्यानें असें घेऊन त्यांचा एक दिवसभर खल करून कज्जली करावी. मग मातकापडानें लपेटलेल्या कुपींत ती घालावी, आणि वालुकायंत्रांत चार दिवस आंच द्यावी. निवाल्यावर कुपीच्या वरच्या बाजूस चिकटलेलें केशराप्रमाणें लाल असें पारदभस्म जमून बसतें तें काढून घ्यावें (३८०)

अथ रसचिन्तामणौ—
नागार्जुनीति विख्याता दुग्धिका क्षितिमंडले ॥ ३८१ ॥
तया विमर्दयेत्सूतं दिनमेकं निरन्तरम् ।
काकमाचीरसैः कार्यं मर्दनं दोषनाशनम् ॥ ३८२ ॥
पारदो दशटङ्कः स्याद्दशटङ्कश्च गन्धकः ।
नौसादरश्च पादः स्यात्त्रयमेकत्र मर्दयेत् ॥ ३८३ ॥
काचस्य कूपके कृत्वा मुखं तस्य निरुध्य च ।
अष्टयामावधिर्यावत्तावत्सूतः प्रपच्यते ॥ ३८४ ॥
एवं निष्पद्यते साक्षात्तरुणादित्यसांनिभः ।
अरुणो भस्मसूताख्यः सर्वकार्यार्थसाधकः ॥ ३८५ ॥
प्रवालकोमलच्छायो नृणामत्यन्तवल्लभः ।
भक्षयेद्रक्तिकाः पञ्च मरिचेन समं रसम् ॥ ३८६ ॥
क्षुद्बोधकारकः प्रायः सद्यः कामाग्निदीपनः ।
ज्वरादिकानयं दोषान् संयोगान्नाशयत्यपि ॥ ३८७ ॥

येषु येषु प्रयुक्तो हि रसो रोगेषु सत्वरम् ।
तांश्च तान्नाशयेच्छ्रेष्ठः समर्थो रसपार्थिवः ॥ ३८८ ॥

इति सिन्दूररसः ॥

आतां रस राजचिन्तामणींतील क्रिया सांगतोः—

दुधाप्रमाणें चीक गळणारी नागार्जुनी नांवाची वनस्पति पुष्कळ ठिकाणीं असते, तिच्याबरोबर पारा एक दिवस एकसारखा खलावा. मग कावळीच्या किंवा मालकांगोणीच्या रसांत खलावा,म्हणजे पाऱ्याचे दोष दूर होतात. नंतर असा शुद्ध पारा दहा टांक, गंधक तितकाच आणि नवसागर त्याच्या चौथ्या हिश्शाइतका घेऊन एकत्र खल करावा व मिश्रण काचकुपींत घालून तिचें तोंड बंद करून आठ प्रहरपर्यंत अग्नि द्यावा. म्हणजे पारा व गंधक एकजीव होतील, आणि चंडसूर्या-प्रमाणें लाल असें भस्म तयार होईल. ह्या भस्मानें सर्व कार्यें होतात. भस्माचा रंग पोंवळ्याप्रमाणें नाजुक आणि फार मनोहर दिसतो. हें भस्म मिऱ्याबरोबर पांच रती सेवन केलें असतां भूक चांगली लागून कामोद्दीपन होतें व ज्वर वगैरे सर्व शारीरिक दोष शमन पावतात. ज्या ज्या रोगावर हा सिंदूर देतात त्या त्या रोगाचा नाश झालाच म्हणून समजावें. असें हें पारदभस्म मोठें सामर्थ्यवान् आहे. (३८८)

अथ रसस्य मारणाविधिः ।

धूमसारं रसं तूर्णं गन्धकं नवसादरम् ।
यामैकं मर्दयेदम्भैर्भागं कृत्वा समं समम् ॥ ३८९ ॥
काचकूप्यां विनिक्षिप्य तां च मृद्वस्त्रमुद्रया ।
विलिप्य परितो वक्त्रे मुद्रां दत्त्वा विशोषयेत् ॥ ३९० ॥
अधश्छिद्रयुतस्थालीमध्ये कूपीं निवेशयेत् ।
स्थालिकां वालुकापूरैर्भृत्वा चाकूपिकागलम् ॥ ३९१ ॥
चुल्ल्यां निवेश्य तदधः कुर्याद्वार्न्हिं शनैः शनैः ।
तस्मादप्याधिकं किंचित्पावकं ज्वालयेत्क्रमात् ॥ ३९२ ॥
एवं द्वादशभिर्यामैर्म्रियते रस उत्तमः ।
स्फोटयेत्स्वाङ्गशीतं तदूर्ध्वंग गन्धकं त्यजेत् ॥ ३९३ ॥
अधःस्थं च स्मृतं सूतं गृह्णीयात्तं तु मात्रया ।
यथोचितानुपानेन सर्वकर्मसु योजयेत् ॥ ३९४ ॥

पारा मारण्याची क्रिया.

घेरोसा, पारा, तुरटी, गंधक आणि नवसागर हे समभाग घ्यावे. परंतु खलांत एकेक घालून कांजीबरोबर खल करावा. याप्रमाणें सर्व जिन्नस खलल्यावर तें मिश्रण कुपींत घालावें आणि मातकापडानें लपेटून तोंड बंद करून कुपी वाळत ठेवावी. नंतर तळाशीं भोंक पाडलेल्या एका मातीच्या हंडींत ती कुपी ठेऊन तिच्या भोंवतालीं वाळू ओतावी व कुपी गळ्यापर्यंत वाळूंत गाडावी. मग हें वालुकायंत्र चुलीवर ठेऊन पहिल्यानें अग्नि कमी घ्यावा. नंतर हलकेहलके जास्त वाढवावा. याप्रमाणें बारा प्रहर आंच दिली म्हणजे पाऱ्याचें भस्म होतें. थंड झाल्यावर कुपी फोडून वरचा गंधक काढून टाकून खालचें भस्म घ्यावें व तें प्रमाणानें योग्य अनुपानाबरोबर पाहिजे त्या रोगावर द्यावें.(३९४)

अथान्यप्रकाराः—

काष्ठोदुम्बारिकादुग्धै रसं किंचिद्विमर्दयेत् ।
तद्दुग्धपिष्टाहिङ्गोश्च मूषायुग्मं प्रकल्पयेत् ॥ ३९५ ॥
क्षिप्त्वा तत्संपुटे सूतं तत्र मुद्रा प्रकल्पयेत् ।
धृत्वा तद्गोलकं प्राज्ञो मृन्मूषासंपुटेऽधिके ॥ ३९६ ॥
पचेद्गजपुटे तेन सूतकौ याति भस्मताम् ॥

अथान्यप्रकारः—

अपामार्गस्य बीजानां मूषायुग्मं प्रकल्पयेत् ॥ ३९७ ॥
तत्संपुटे क्षिपेत्सूतं मलयूदुग्धामिश्रितम् ।
मलयूः काष्ठोदुम्बारिका ॥
द्रोणपुष्पीप्रसूनानि विडङ्गमरिमेदकः ॥ ३९८ ॥
एतच्चूर्णमधश्चोर्ध्वं दत्त्वा मुद्रां प्रदापयेत् ।
तद्गोलमन्धयेत्सम्यङ्मृन्मूषासंपुटे सुधीः ॥ ३९९ ॥
मुद्रां दत्त्वा शोषयित्वा ततो गजपुटे पचेत् ।
एकेनैव पुटेनैतत्सूतस्य भस्म जायते ।
तत्प्रयोज्यं यथास्थाने यथामात्रं यथाविधि ॥ ४०० ॥

अथान्यप्रकारः—

नागवल्लीरसैर्घृष्टः कर्कोटीकन्दगर्भगः ।
मृन्मूषासंपुटे पक्वः सूतो यात्येव भस्मताम् ॥ ४०१ ॥

अन्यच्च —

पञ्चाङ्गीबर्बरीलिङ्गीद्रवैर्घस्रत्रयं रसः ।
मर्दितः पुटितो भस्म स्वर्णवर्णं प्रजायते ॥ ४०२ ॥

दुसरा प्रकार

काष्ठोदुंबराच्या (काळ्या उंबराच्या) चिकाबरोबर पाच्याचा थोडा वेळ खल करावा व त्याच (झाडाच्या) चिकांत हिंग खलून त्याच्या दोन मुशी तयार कराव्या. त्यांपैकीं एकींत खललेला पारा ठेऊन दुसरी तिच्यावर झांकणाप्रमाणें ठेऊन संधिलेप करावा. नंतर तो गोळा एका खापराच्या संपुटांत ठेऊन गजपुटानें आंच द्यावी, म्हणजे पाच्याचें भस्म होईल. (३९६)

तिसरा प्रकार

आघाडयाच्या बिया वांटून त्याच्या दोन मुशी कराव्या व त्याच्या संपुटांत काष्ठोदुंबराच्या चिकांत खललेला पारा ठेवावा व वरील पद्धतीनें आंच द्यावी. (३९७॥)

काष्ठोदुंबराला संस्कृतांत " मलयू "असा पर्याय शब्द आहे.

द्रोणपुष्पीचीं फलें, वावडिंगे, अरिमेदक (खैर) यांचें चूर्ण करून निमें खालीं व निमें वर घालून मध्यें पारा ठेवावा व गोळी करून ती चांगली लिंपावी व मातीच्या मुशींच्या संपुटांत व्यवस्थित ठेऊन तोंड बंद करून लेप द्यावा आणि सुकल्यावर गजपुटानें आंच द्यावी. एकाच पुटानें भस्म होतें. तें रोग पाहून योग्य प्रमाणानें व अनुपान योजून द्यावें (४००). द्रोणपुष्पी म्हणज गुमा.

पांचवा प्रकार

पारा नागवेलीच्या रसांत खलावा व कर्कोटीचा कांदा कोरून त्यांत ठेवावा; मग तो कांदा मातीच्या मुशींत ठेवून ती लिंपून पुटाग्नीची आंच द्यावी, ह्मणजे पाच्याचें भस्म होतें (४०१)

सहावा प्रकार

पचांगी, बर्बरी, लिंगी यांच्या रसांत पृथकपणें पाऱ्याचा खल तीन दिवस करावा. मग मुशींत घालून पुट दिलें असतां सुवर्णाप्रमाणें भस्म होतें. (४०२)

अथान्यप्रकारः—

सूतश्चतुष्पलामितः समशुद्धगन्धः
स्याद्भृयुमसारिपचुरेक इदं क्रमेण ।
संमर्दयेद्विमलदाडिमपुष्पतोयै-
र्घस्रं विमर्द्य सितसोमलमाषकेण ॥ ४०३ ॥
सितसोमलं ' शंखियासोमल ' इति भाषा ॥
एतान्निधाय सकलं जलयन्त्रगर्भे
संमुद्य संधिमुदितेन पुरा क्रमेण ।
आपूर्य यन्त्रमुदकेन दिनानि चाष्टौ
वन्हिं क्रमेण तदधो विदधीत विद्वान् ॥ ४०४ ॥
पश्चात्ततो जलमुदस्य रसं तलस्थ-
मादाय भाजनवरे सुभिषङ्निदध्यात् ।
संपूज्य शम्भुगीरिजागिरिजातनूजान्
दद्याच्छभेऽहनि रसं वरमेकगुञ्जम् ॥ ४०५ ॥
तांबूलिकादलयुतं सासितुं पयोऽमु
पीत्वाऽम्लमाषलवण रहितं सदन्नम् ।
अद्यात्कियन्त्यपि दिनानि ततो यथेच्छं
भक्ष्यं भजेदथ नरो विगतामयः स्यात् ॥ ४०६ ॥

आणखी प्रकार

पारा सोळा तोळे, तितकाच शुद्ध गंधक, आणि घेरोसा व पिचु म्हणजे कडुनिंब एकेक भाग असे निरनिराळे घेऊन त्यांचा खल डाळिंबीच्या रसरशीत फुलांचा रस आणि एक मासाभर शंख्या सोमल यांच्याशीं क्रमानें एक दिवसभर करावा. मग तें मिश्रण जलयंत्रांत ठेऊन तोंड बंद करून संधिलेप नेहमींप्रमाणें द्यावा आणि यंत्र पाण्यानें भरून त्याच्याखालीं क्रमानें थोडा थोडा वाढणारा असा अग्नि आठ दिवस द्यावा. आंच पुरी घेऊन यंत्र

निवाल्यावर पाणी काढून टाकावें आणि तळाशीं बसलेला पारा काढून दुसऱ्या स्वच्छ पात्रांत ठेवावा. नंतर शंकर,पार्वती व श्री-गणपति यांची पूजा करून शुभ दिवशीं तो पारा एक गुंजप्रमाणें रोग्यास द्यावा. विड्याच्या पानांचा रस व खडीसाखर यांत औषध घेऊन वर दुध प्यावें. आंबट, खारट व उडदाचे पदार्थ खाऊं नयेत. याप्रमाणें कांहीं दिवस पथ्यानें राहून मग यथेच्छ भोजन करावें. मनुष्य रोगमुक्त होईल (४०६)

अथ मृतसूतलक्षणम्—

अतेजा अगुरुः शुभ्रो लोहहाऽचञ्चलो रसः ।
यदा नावर्तते वन्हौ नोर्ध्वं गच्छेत्तदा मृतः ॥ ४०७ ॥
अचञ्चल इति छेदः । तन्त्रन्तरेऽपि-
अगुरुरतेजाः शुभ्रो वन्हिस्थायी स्थिरोऽधूमः ।
हेमादिधातुभोक्ता तत्कर्ता स्यान्मृतः सूतः ॥ ४०८ ॥

अथ गुणाः--

रसायनं त्रिदोषघ्नो योगवाह्यातिशुक्रलः ।
भस्मसूतोऽखिलातङ्कनाशनस्त्वनुपानतः ॥ ४०९ ॥

इति भस्मसूतगुणाः

मृत पाऱ्याचें लक्षण

स्वाभाविक पाऱ्यांत जी लकाकी असते ती मृत पाऱ्यांत मुळींच नसते. (लकाकी नसलेल्या भस्माला "निश्चंद्र" म्हणतात) मृत पारा हलका असून त्याचा रंग पांढरा असतो; तथापि लोहादि धातूंना तो मारूं शकतो, व त्याच्यांत चंचलपणा अगदीं नसतो, आणि तो अग्नीवर टाकला असतां वितळत नाहीं किंवा उडून जात नाहीं. हीं लक्षणें असलीं म्हणजे पारा मृत. दुसऱ्या एका ठिकाणीं असें वर्णन आहे कीं,

हलका, निश्चंद्र, शुभ्र व अग्नीवर टाकला असतां उडून न जाणारा निर्धूम, आणि सोनें वगैरे धातूंचा ग्रास करणारा असा जो पारा तो मृत पारद होय.

ह्याचे गुण असे कीं, हा रसायन असून त्रिदोषनाशक, योगवाही, वीर्यवर्धक आणि अनुपानपरत्वें सर्व रोगांवर चालणारा असा असतो. (४०९).

अथान्यन्मतम् ।-

अङ्कोलस्य शिफावारिपिष्टं कल्के विमर्दयेत् ।
सुतं गन्धकसंतुल्यं दिनान्ते तं निरोधयेत् ॥ ४१० ॥
पुटयेद्भूधरे यन्त्रे दिनान्ते स मृतो भवेत् ।

अथान्यच्च ।—

वटक्षीरेण सुताभ्रौ मर्दयेत्प्रहरद्वयम् ।
पाचयेत्तस्य काष्ठेन भस्मीभवति तद्रसः ॥ ४११ ॥

अथान्यच्च ।—

कटुतुंब्युद्भवे कन्दे गर्भे नारीपयःप्लुतः ।
सप्तधा म्रियते सूतः स्वेदितो गोमयाग्निना ॥ ४१२ ॥

अथान्यच्च ।—

अपामार्गस्य बीजानि तथैरण्डं च चूर्णयेत् ।
तच्चूर्णं पारदे देयं मूषयामधरोत्तरम् ॥ ४१३ ॥
रूद्धा पचेल्लघुपुटैश्चतुर्भिर्भस्मस्तां व्रजेत् ।

अथान्यच्च ।--

खरमञ्जरिबीजान्वितपुष्पकबीजैः सचूर्णितं कल्कम् ।
कृत्वा सूतं पुटयेद्दृढमूषायां भवेद्भस्म ॥ ४१४ ॥

अन्यच्च ।--

काकोदुम्बरिकाया दुग्धेन विभावितो हिङ्गुः ।
मर्दनपुटनाविधानात्सूतं भस्मीकरोत्येव ॥ ४१५ ॥

इति भस्मसूतः ॥

दुसऱ्या एका ग्रंथकाराचें मत असें:--

अंकोलाच्या मुळीच्या रसांत घोटलेला पारा अंकोलाच्याच कल्कांत समभाग गंधकाबरोबर एक दिवस खलावा, व सायंकाळीं संपुटांत ठेवून तें (लेपानें) बंद करावें आणि भूधर यंत्रांत ठेवून सकाळपासून आंच द्यावी, म्हणजे संध्याकाळपर्यंत त्याचें भस्म होतें.

आणखी एकाचें मतः—

पारा व अभ्रक यांचा वडाच्या चिकांत दोन प्रहर खल करावा, आणि मग मुशींत घालून वडाच्याच लांकडांच्या अग्नीचें पुट द्यावें, म्हणजे भस्म होतें.

आणखी एक प्रकारः—

स्त्रीच्या दुधांत पारा सात वेळ भिजवावा व कडू भोंपळ्याचें फळ कोरून त्यांत ठेवून रानशेणीचा अग्नि देऊन स्वेदन करावें, म्हणजे पारा मृत होतो. (४१२)

आणखी एक प्रकारः—

आघाड्याचें बीं आणि एरंडीचें बीं यांचें चूर्ण एकत्र खलावें व तें मुशींत पाच्याच्या खालीं वर निमें निमें घालून मुशीचें तोंड बंद करून चार लघु पुटें द्यावीं, म्हणजे भस्म होतें. (४१३)

आणखी निराळी तऱ्हाः—

आघाडयाचें बीं आणि पुष्पक बीं एकत्र खलून चूर्ण करून त्या कल्कांत पारा ठेऊन मजबूत मुशीमध्यें पुट द्यावें, म्हणजे भस्म होतें. (४१४)

आणखी दुसरी तऱ्हाः—

काळ्या उंबराच्या चिकाची हिंगाला भावना द्यावी आणि त्याच्याबरोबर पारा खलून पुट द्यावें, म्हणजे भस्म होतें. (४१५)

अथ जलौकाबन्धः ।

बालमध्यमवृद्धासु योज्या विज्ञाय तत्क्रमात् ।
नृणां रसवियुक्तानां योषा स्यात्संगमोत्सुका ॥ ४१६ ॥
बाल्ये चाष्टाङ्गुला योनौ यौवने च दशाङ्गुला ।
द्वादशैव प्रगल्भानां जलौका त्रिविधा मता ॥ ४१७ ॥

सा यथा ।—

मुनिपत्ररसं चैव शालमलीवृन्तवारि च ।
जातीमूलस्य तोयं च शिंशपातोयसंयुतम् ॥ ४१८ ॥
श्लेष्मातकफलं चैव त्रिफलाचूर्णमेव च ।
कोकिलाक्षस्य चूर्णं च पारदं मर्दयेद् बुधः ॥ ४१९ ॥

जलौका जायते दिव्या रामाजनमनोहरा ।
सा योज्या कामना[का]ले तु कामयेत्कामिनी स्वयम् ४१०
सद्यः स्खलनमाप्नोति दुःसाध्याऽपि रतेऽङ्गना ।
इति जलौकाबन्धः ॥

जलौकाबंध×

पाऱ्याची लगड करून, बाल, प्रौढ व वृद्ध स्त्रिया यांचे ठिकाणी ती व्यवस्थित ठेवली म्हणजे वीर्यहीन पुरुषांशीं देखील समागम करण्यास त्या उत्सुक होतात. लहान वयांत लगड आठ अंगुळें असावी. तरुण स्त्रीला दहा आणि प्रौढ स्त्रीस देणें तर बारा अंगुळें करावी. (४१७).

जलौकाबंध क्रिया.

अगस्त्याच्या पानांचा रस, सांवरीच्या डिंकांचा रस व शिंशपाच्या (म्हणजे शिसवीच्या) पाल्याचा रस किंवा काढा यांचे मिश्रणांत मोरीचें फळ, त्रिफळाचूर्ण, तालिमखाना चूर्ण, यांच्याशीं पाऱ्याचा खल करावा, म्हणजे त्याची देदीप्यमान लगड बनवितां येते. स्त्रियांना ती फार आवडते. तिची त्यांच्या ठिकाणी योजना केली असतां त्यांना कामेच्छा होते आणि स्त्री कितीहि जबर असली तरी तिची इच्छा जबर शांत होते. (४२०).

अथ खेचरीगुटी रसाचिन्तामणौ ।
रसं टङ्कत्रयं शुद्धं कृष्णधत्तूरबीजजे ॥ ४२१ ॥
तैले पलद्वये खल्वे मार्दितं दिनसप्तकम् ।
तावद्यावद्भवेत्तस्य जलौकारूपमुत्तमम् ॥ ४२२ ॥
माषान्नापिष्टकेनाशौ दृढसूत्रेण वेष्टयेत् ।
वर्तिं कृत्वा ततो गाढं शोषयेद्रविणा च ताम् ॥ ४२३ ॥
दशप्रस्थामते तैले सर्षपस्य विपाचयेत् ।
तैलक्षयो भवेद्यावत्तावत्साऽप्यवतार्यते ॥ ४२४ ॥
स्निग्धच्छाये निवेश्याथ शनैः सिद्धां च तां नयेत् ॥
दुग्धेनापूर्यते कुम्भः शुभस्तत्र निवेशयेत् ॥ ४२५ ॥

×ही क्रिया साधारणतः पेसरी (Pessary) प्रमाणें आहे.

विशोष्य सकलं दुग्धं गुटिका यदि तिष्ठति ।
बर्करस्य मुखे पश्चाद्गुटिकां तां प्रयच्छति ॥ ४२६ ॥
प्रविष्टा तन्मुखस्यान्तर्ज्वलमानेव त द्भृदि ।
व्याकुलं कुरुते कामं देहे स्वास्थ्यं न तस्य वै ॥ ४२७ ॥
उदरस्था यदा स्यात्तु तदाऽसौ म्रियते पशुः ।
स्वकीये वदने पश्चाद्धृत्वा शुभ्रां निरामयाम् ॥४२८ ॥
योजनानां शतं गच्छेदनायासेन साधकः ।
स्त्रीणां शतं तथा गच्छेच्छुक्रस्तम्भकरी मता ॥ ४२९ ॥
मुखस्थायामहो तस्यां प्रहारो नैव जायते ।
अन्येऽपि बहवो रोगा मुखस्था दन्तघातिनः ॥ ४३० ॥
जिव्हातालुगता ये ते कण्ठशालूककादयः ।
उपाजिव्हा द्विजिव्हा स्यादधिजिव्हा सुदारूणा ॥ ४३१ ॥
सप्तषष्टिषु ये मध्ये, हृद्रोगाः पीनसादयः ।
तांस्तांश्च नाशयत्येषा गुटिका नाम खेचरी ॥ ४३२ ॥

इति खेचरीगुटीबन्धः ॥

खेचरी गुटिका.

ही क्रिया रसचिंतामणींत सांगितली आहे: —

काळ्या धोतऱ्याचें बीं शुद्ध करून त्याचें तेल काढावें. तें तेल चार तोळे आणि शुद्ध पारा तीन टांक यांचा सात दिवस खल करावा, म्हणजे त्याची लगड बनते किंवा लगड बनेपर्यंत खल करावा. मग ती लगड उडदाच्या पिठानें लपेटून त्या लपेटावर बळकट दोरा गुंडाळावा आणि तिला काकड्याप्रमाणें आकार आणावा. मग कडक उन्हांत ती लगड वाळवून मोहरीचें तेल दहा प्रस्थ घेऊन त्यांत तो कांकडा उकळावा आणि सर्व तेल आटवावें. तेल आटल्यावर कांकडा काढून गर्द सावलींत ठेवावा. नंतर एका स्वच्छ मडक्यांत दूध भरावें व त्यांत तो कांकडा बुडवून हळू हळू सिद्ध करावा. सर्व दूध कांकडा शोषून घेईल. दूध शोषल्यावर तो कांकडा किंवा गुटिका जशीच्या तशीच राहिली म्हणजे बर्कराच्या (बकऱ्याच्या) तोंडांत घालून त्याच्या पोटांत जाईल असें करावें. गुटिका पोटांत गेली म्हणजे त्या जनावराच्या पोटांत इतकी आग

पडेल, कीं तो व्याकुळ होऊन त्याला चैन पडणार नाहीं आणि शेवटीं मरेल. पशु मेल्यावर त्याच्या पोटांतिल ती गुटिका काढून ध्यावी, ती पांढरी शुभ्र होते. मग ती स्वच्छ करून साधकानें आपल्या तोंडांत धरली असतां तो हजारों योजनें सहज जाऊं शकेल, आणि शेंकडों स्त्रियांशीं त्यानें समागम केला तरी त्याचें वीर्य स्खलन होणार नाहीं. गुटिका तोंडांत असेल तोंपर्यंत त्याच्यावर शस्त्राचा प्रहार लागणार नाहीं आणि त्या प्रमाणें पुष्कळ जातीचे मुखरोग-उदाहरणार्थ, दांत किडणें, जीभ, टाळू, घसा यांत व्रण होणें, पडजिभेचे सदुसष्ट प्रकारचे भयंकर रोग, व तसेंच हृद्रोग, पीनस इत्यादि व्याधि असे अनेक आजार जरी त्याला पूर्वी असले तरी त्या सर्वांचा ह्या गुटिकेनें नाश होतो, अशा प्रकारची चमत्कारिक ही खेचरी गुटिका आहे. (४३२.)

अथ पारदसेवनाविधिं व्याख्यास्यामः ।
क्षेत्रीकृतनिजदेहः कुर्वीत रसायनं मतिमान् ।
विधिना पथ्यविधानादमरदेहतुल्यदेहः स्यात् ॥ ४३३ ॥
अक्षेत्रीकरणे सति रसायनं यो नरः प्रयुञ्जीत ।
तस्य क्रामति न रसः सर्वांगदोषकृद्भवति ॥ ४३४ ॥
अक्षेत्रीकरणे सूतोऽप्यमृतोऽपि विषं भवेत् ।
फलसिद्धिः कुतस्तस्य सुबीजस्योषरे यथा ॥ ४३५ ॥
कर्तव्यं क्षेत्रकरणं सर्वस्मिंश्च रसायने ।
नाक्षेत्रकरणाद्देवि किंचित्कुर्याद्रसायनम् ॥ ४३६ ॥

पाऱ्याचें सेवन कसें करावें.

आपलें शरीररूप क्षेत्र पंचकर्मांनीं* अगोदर शुद्ध करून नंतर शहाण्या पुरुषानें रसायन सेवन करावें आणि पथ्य संभाळावें, म्हणजे अमर असे जे देव त्यांच्याप्रमाणें त्याचा देह होईल. पंचकर्मांनीं शरीर शुद्ध केल्यावांचून रसायन सेवन केल्यास तो पारा रसांनसांतून फिरत नाहीं (जेथच्या तेथें सांचून राहतो), त्यामुळें अनेक व्याधि उद्भवतात. पारा जरी अमृताप्रमाणें आहे तरी शरीर

*हीं कर्में कोणतीं तें पुढें सांगितलें आहे.

आंतून स्वच्छ केल्यावांचून तो सेवन केला तर तो विषाप्रमाणें मारक होतो. मग सेवन करणाराला उत्तम फल कोठून मिळणार ? खाच्चा व वाईट जमीनींत पेरलेल्या बियांपासून उत्तम पीक कसें येईल ? म्हणून कोणतेंहि रसायन घ्यावयाचें असेल तर, हे पार्वती, अगोदर शरीर शुद्ध करावें. शरीर शुद्ध केल्यावांचून कोणी रसायन सेवन करूं नये. (४३६).

अथ नित्यनाथः—

पञ्चकर्म पुरा कृत्वा पश्चात्सकलदोहिनाम् ।
योजनियो रसो दिव्यः शीघ्रं सिद्धिमवाप्नुयात् ॥ ४३७ ॥
नवज्वरेऽतिसारे च गार्भिण्यां बालवृद्धयोः ।
न कुर्यात्पञ्चकर्माणि रक्तस्रावं च दाहनम् ॥ ४३८ ॥
पाचनं स्नेहनं स्वेदो वमनं रेचनं तथा ।
एतानि पञ्चकर्माणि ज्ञातव्यानि भिषग्वरैः ॥ ४३९ ॥
अमृतं च विष प्रोक्तं शिवेन च रसायनम् ।
पञ्चकर्मभयत्रस्त्रैः सुकुमारैर्नरैरिह ॥
रेचनान्ते इदं सेव्यं सर्वदोषापनुत्तये ॥ ४४० ॥

नित्यनाथ म्हणतात कीं:—

प्रथम पंचकर्म करून नंतर दिव्य असा पारा वाटेल त्या मनुष्यास सेवन करण्यास द्यावा; तत्काळ कार्यसिद्धी होईल. परंतु ज्याला नवज्वर झाला असेल, अतिसार असेल, तसेंच जी स्त्री गर्भिणी असेल, किंवा जे अगदीं लहान अगर वृद्ध असतील त्यांनीं (वमन, विरेचन वगैरे) पंचकर्में करूं नयेत; किंवा शिरावेध करणें, डाग देणें वगैरे उपचार करूं नयेत. पाचन, स्नेहन, स्वेदन, वमन व विरेचन हीं पंचकर्में आहेत हें वैद्यांस माहीत आहेच. रसायन हें अमृत आहे; पण (भलत्याच स्थितींत दिल्यास) शिव म्हणतात कीं, तेंच विष होतें. म्हणून पंचकर्मांपासून ज्यांना त्रास झाला असेल किंवा जे नाजूक प्रकृतीचे असतील त्यांनीं सौम्य सारक औषध प्रथम घेऊन नंतर रसायन घ्यावें, म्हणजे कोणताहि उपद्रव होणार नाहीं. (४४०).

अथान्यच्च ।—

स्निग्धं स्विन्नं विरिक्तं च नीरुजं सिद्धभेषजैः ।
एतत्क्षेत्रं समासेन रसबीजार्पणक्षमम् ॥ ४४१ ॥

स्निग्धं प्रातास्त्रिदिनं घृतसैन्धवपानेन, स्विन्नं वस्त्रादिपुटवन्हिना, विरिक्तामिच्छाभेदिनारायादिसेवनेन, पलाशबीजजन्तुघ्नगुडमोदकभक्षणेन कीटपातनमपि कर्तव्यं, सिद्धभेषजैर्नीरुजं संवत्सरमयनं वा परिशीलितैः शृङ्गाराभ्रकलक्ष्मीविलासाद्यभ्रसत्त्वप्रधानप्रयोगैरिति भावः ॥

उक्तं च ।—

मृताभ्रं भक्षयेन्मासमेकमादौ विचक्षणः ।
पश्चात्तं योजयेद्देहे क्षेत्रीकरणामिच्छतः ॥ ४४२ ॥
इति शुद्धो जातबलः शाल्योदनजाङ्गलादिमुद्गरसैः ।
क्षेत्रीकृतनिजदेहः कुर्वीत रसायनं मतिमान् ॥ ४४३ ॥
घनसत्त्वपादजीर्णोऽर्धकान्तजीर्णश्च तीक्ष्णजीर्णश्च ।
क्षेत्रीकरणाय रसः प्रयुज्यते भूय आरोटः ॥ ४४४ ॥
योऽग्निसहत्वं प्राप्तः संजातो हेमतारकर्ता च ।
बद्धो रसश्च भुक्तो विधिना सिद्धिप्रदो भवति ॥ ४४५ ॥

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं,

स्नेहन, स्वेदन, विरेचन वगैरे संस्कारांनीं व सिद्ध औषधयोजनेनें ज्यांनीं व्याधिनाश करून शरीर शुद्ध केलें आहे, त्यांचें शरीर रसायनरूप बीज पेरण्याला उत्कृष्ट क्षेत्र होय; असा त्या ग्रंथकारांचा थोडक्यांत भावार्थ आहे. (४४१).

स्नेहन म्हणजे तीन दिवसपर्यंत रोज तूप पिऊन नंतर सैंधवाचें पाणी पिणें. स्वेदन म्हणजे अंगावर जाड पांघरूण घेऊन किंवा शेकाऱ्यानें घाम काढणें; आणि विरेचन म्हणजे इच्छाभेदी रस, त्रायमाणचूर्ण इत्यादि रेचक औषधें घेणें. पळसबीज आणि कृमिनाशक मोदक इत्यादि औषधेंहि घेऊन कृमि पडतील असें करणें. हेंसुद्धां विरेचनच होय, म्हणून कृमिविरेचनहि केलें पाहिजे. मग सिद्धौषधें घेऊन शरीर निरोगी ठेवलें पाहिजे. आरोग्यकरितां शृंगाराभ्रक लक्ष्मीविलास इत्यादि अभ्रकसत्वयुक्त औषधांचे उपचार एक वर्षपर्यंत, निदान सहा महिनेपर्यंत तरी, सतत केले पाहिजेत.

एका ग्रंथांत म्हटलें आहे कीं:—

शहाण्या मनुष्यानें प्रथम एक महिनाभर अभ्रक भस्म सेवन करावें. शरीरक्षेत्र शुद्ध करण्याची ज्याची इच्छा असेल अशाच मनुष्याकरितां अभ्रकभस्माचा योजना करावी. म्हणजे शरीर शुद्ध झाल्यानें मनुष्य सहजच शाल्योदन, जांगल मांस, मुगदळ वगैरे पौष्टिक पदार्थ भक्षण करतो व त्यामुळें त्याला बळ येतें. अशा रीतीनें शरीर शुद्ध झालेल्या मनुष्यानें रसायन घ्यावें. त्या रसायनांत चौथ्या हिश्शानें अभ्रक जिरविलेलें असावें व अर्ध्या हिश्शानें कान्तलोह आणि समभाग पोलाद जिरविलेलें असावें. पारा आरोटबंधाचा घ्यावा. जो अग्नीवर उडून जात नाहीं, जो सोनें किंवा रौप्य बनवूं शकतो, अशा प्रकारचा घट्ट झालेला पारा योग्य प्रकारें सेवन केला असतां तो देहसिद्धि घडवून आणतो.(४४५)

अथ रसभक्षणकालः ।

प्रभाते भक्षयेत्सूतं पथ्यं यामद्वयाधिके ।
नोल्लङ्घ्येन्त्रियामं तु मध्यान्हे चैव भोजयेत् ॥ ४४६ ॥
ताम्बुलान्तर्गते सूते विड्बन्धो नैव जायते ।
सकणाममृतां भुक्त्वा मलबन्धे स्वपेन्निशि ॥ ४४७ ॥

रसायन केव्हां सेवन करावें.

रसायन सकाळींच घ्यावें आणि दोन प्रहरीं पथ्य सेवावें. तीन प्रहर उलटल्यावर रसायन कधीं घेऊं नये.भोजन मात्र मध्यान्हीं करावें. रसायन विड्यांतून सेवन केल्यास विट्बंध× होत नाहीं. म्हणून विट्बंध होणें ज्यांना जरूर असेल त्यांनीं रात्रौ थोडथोडी गुळवेल घेऊन निद्रा घ्यावी. (४४७)

अथ रसमात्राप्रमितिः—

वल्लमेकं नरेऽश्वे तु गद्याणैकं गजे द्वयम् ।
सर्वरोगाविनाशार्थं भिषक् सूतं प्रयोजयेत् ॥ ४४८ ॥

मतान्तरम्—

घनसत्त्वकान्तकाभ्रीशङ्करतीक्ष्णाभ्रादिजीर्णस्य ।
रसस्य गुञ्जावृद्धया माषकमात्रं परा मात्रा ॥ ४४९ ॥

× शौचास घट्ट होणें.

शिवः--

गुञ्जामात्रं रसं देवि हेमजीर्णे तु भक्षयेत् ।
द्विगुणं तारजीर्णस्य रविजीर्णस्य च त्रयम् ॥ ४५० ॥
फलम् ।-
तीक्ष्णजीर्णस्य लक्षायुः पलमात्रस्य भक्षणात् ।
एवं दशपलं भुक्त्वा तीक्ष्णजीर्णस्य मानवः ॥ ४५१ ॥
तदा जीवेन्महाकल्पं प्रलयान्ते शिवं व्रजेत् ।
भस्मनः शुल्बजीर्णस्य लक्षायुः पलभक्षणात् ।
कोट्यायुर्ब्रह्मसायुज्यं वैष्णवं रूद्रजीवितम् ।
द्वित्रिचतुःपञ्चषष्टे महकल्पायुरीश्वरः ॥ ४५३ ॥
अथ हेमजीर्णस्य फलम्—
भस्मनो हेमजीर्णस्य लक्षायुः पलभक्षणात्।
विष्णुरुद्राशिवत्वं च द्वित्रिचतुर्भिराप्नुयात् ॥ ४५४ ॥

औषध घेण्याचें प्रमाण.

मनुष्याला रसायन देण्याचें प्रमाण म्हणजे एक वालभर, व घोड्याला देणें असेल तर एक गद्याणकाइतकें द्यावें. हत्तीला दोन गद्याणक याप्रमाणें वैद्यानें रसायनाची योजना सर्व रोगांवर करावी.

दुसऱ्या एकाचें मत असें आहे कीं,

ज्या पाऱ्यांत अभ्रकसत्व, कान्तलोह,कांची,शंकर(म्ह०सोनें व चांदी), पोलाद किंवा नुसतें अभ्रक जिरविलें असेल त्या पाऱ्याचें सेवन एका गुंजेपासून सुरू करावें व गुंज गुंज वाढवीत एक माशापर्यंत वाढवावें. त्यापेक्षां जास्त देऊं नये.

शंकर म्हणतातः—

ज्यांत सोनें जिरविलें आहे असा पारा घेण्याचें प्रमाण एक गुंज हें आहे. रौप्य जिरविलें असेल तर दोन गुंजा आणि ताम्र जिरविलें असल्यास तिन गुंजांप्रमाणें घ्यावें.

सेवनाचें फल.

ज्यांत पोलाद जिरविलें आहे असा पारा एकंदर चार तोळे सेवन केल्यास मनुष्य लक्ष वर्षेपर्यंत जगेल. याप्रमाणें पोलाद जिर-

विलेला पारा जर चाळीस तोळे सेवन केला तर एक महाकल्प-पर्यंत जगेल आणि प्रलयकाळीं शिवलोकाला जाईल. त्याच-प्रमाणें ताम्र जिरविलेलें पारद भस्म जर चार तोळे भक्षण केलें तर एक लक्ष वर्षेपर्यंत मनुष्य वांचेल आणि आठ, बारा, सोळा, वीस, चोवीस तोळेपर्यंत पारद भस्म सेवन करणारा महा कल्पपर्यंत म्हणजे एक कोट वर्षेपर्यंत जगेल. त्याला ब्रह्मदेवाचें, विष्णूचें व रुद्राचें आयुष्य प्राप्त होईल. फार काय, तो प्रत्यक्ष ईश्वररूप होईल. (४५३).

सोनें जिरलेल्या पारदाचें फल.

सोनें जिरलेला पारा चार तोळे सेवन केल्यास मनुष्य लक्षायू होतो; आणि आठ, बारा, सोळा तोळें भक्षण केल्यास विष्णु, रुद्र अथवा शिव यांचें स्वरूप त्याला प्राप्त होतें. (४५४)

अस्यानुपानम् ।—

वन्हेर्बलाबलं ज्ञात्वा हेमजीर्णस्य राक्तिकाम् ।
घृतेन मधुना चाद्यात्ताम्बूलं कामिनीं व्रजेत् ॥ ४५५ ॥
एको दोषो हि सूक्ष्मोऽस्ति भाक्षिते भस्मसूतके ।
त्रिसप्ताहाद्धरारोहे कामान्धो जायते नरः ॥ ४५६ ॥
नारीसंगाद्विना देवि ह्यजीर्णं तस्य जायते ।
मैथुनाच्चलिते शुक्र जायते प्राणसंशयः ॥ ४५७ ॥

तस्मादजीर्णशमनोपायमाह—

युवत्या जल्पनं कार्यं तावत्तन्मैथुनं त्यजेत् ।
लघुतां शेफसो ज्ञात्वा पश्चाद्गच्छन् सुखी भवेत् ॥ ४५८ ॥
ब्रह्मचर्येण वा योगी सदा सेवेत सूतकम् ।
समाधिकरणं तस्य क्रामणं परमं मतम् ॥ ४५९ ॥

रसायनाचें अनुपान—

मनुष्याची पचनशक्ति पाहून सोनें जिरविलेला पारा तुप-मधाबरोबर एक गुंज द्यावा. नंतर त्यानें तांबूल भक्षण करून (वाटल्यास) विलास करावा.पारा भक्षण करण्यांत एकच लहानसा दोष आहे तो हा कीं, पारद भस्म घेतल्यास एकवीस दिवसांत

मनुष्य अतिशय कामातुर होऊन बेफाम होतो व भोग न मिळाल्यास पाऱ्याचे अजीर्ण होतें आणि अजीर्ण झाल्यावर त्यानें भोग भोगल्यास तात्काळ मृत्यू येतो. (४५७)

म्हणून याला उपाय असा आहे कीं, अनेक गोष्टी बोलून मन दुसरीकडे अशा रीतीनें बळवावें कीं, भोगेच्छा उत्पन्न होऊंच नये; आणि भोगेच्छा थांबल्यावर समागम करावां, म्हणजे सुख होईल. पण योगी जर नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रतानें राहून पारा सेवन करील तर पाऱ्याचें शरीरांत क्रामण झाल्यावर (अर्थात् सर्व शरीरांत पाऱ्याचा संचार झाल्यावर) त्यायोगानें त्याला समाधिसुख अनुभवावयास सांपडेल. (४५९).

अथ रससेवनकर्तुराहारादिनियममाह—

अत्यशनातिपाने च ह्यतिनिद्रातिजागरे ।
स्त्रीणामतिप्रसंगं च ह्यामं च विवर्जयेत् ॥ ४६० ॥
अतिकोपं महाहर्षमतिदुःखमतिस्पृहाम् ।
शुष्कवादं जलक्रीडामतिचिंतां च वर्जयत् ॥ ४६१ ॥
कूष्माण्डं कर्कटीं चैव कारवेल्लं कालिंगकम् ।
कुसुम्भिकां च कर्कोटीं कदलीं काकमाचिकाम् ॥ ४६२ ॥
ककाराष्टकमेताद्धि वर्जयेद्रसभक्षकः ।
पातकं च न कर्तव्यं पशुसंगं च वर्जयेत् ॥ ४६३ ॥
चतुष्पथे न गन्तव्यं विण्मूत्रं न च लंघयेत् ।
वराणां निन्दनं देवि स्त्रीणां निन्दां च वर्जयेत् ॥ ४६४ ॥
सत्येन वचनं ब्रूयादाप्रियं न वदेद्वचः ।
कुलत्थानतसीतैलं तिलान्माषान्मसूरकान् ॥ ४६५ ॥
कपोतान् काञ्जिकं चैव तक्रभक्तं च वर्जयेत् ।
हेमचन्द्रादयः प्राहुः कुक्कुटानपि वर्जयेत् ॥ ४६६ ॥
लवणाम्ले कटुं तिक्तं पित्तलं च विवर्जयेत् ।
बदरं नारिकेलं च सहकारं सुवर्चलम् ॥ ४६७ ॥
नारङ्गं कांचनारं च शोभाञ्जनमपि त्यजेत् ।
न वादजल्पनं कुर्याद्दिवा चापि न पर्यटेत् ॥ ४६८ ॥
नैवेद्यं नैव भुञ्जीत कर्पूरं वर्जयेत्सदा ।
कुंकुमालेपनं वर्ज्यं न स्वपेत्कुशलः क्षितौ ॥ ४६९ ॥

न तु हन्यात्कुमारीं च बातलानि च वर्जयेत् ।
क्षुधार्तो नैव तिष्ठेत ह्यजीर्णे नैव कारयेत् ॥ ४७० ॥
दिवारात्रं जपेन्मंत्रं नासत्यवचनं वदेत् ।
हितं दुग्धान्नमुद्गाज्यशाल्यन्नादि सदा भजेत् ॥ ४७१ ॥
शाकं पौनर्नवं देवि मेघनादं सवास्तुकम् ।
सैन्धवं नागरं मुस्तां पद्ममूलानि भक्षयेत् ॥ ४७२ ॥
आत्मज्ञानं कथा पूजा शिवस्य च विशेषतः ।
एतांस्तु समयान्भद्रे न लंघेद्रसभक्षणे ॥ ४७३ ॥

रसायन सेवन करणाचा आहारविहार असा असावा कीं, त्यानें पेयःपदार्थ फार पिणें, फार खाणें, फार निद्रा घेणें, अतिशय जागरण करणें, किंवा अतिशय स्त्रीसंभोग करणें, इत्यादि अतिप्रसंग करूं नये. पोट फुगेल असें कांहीं खाऊं नये, अतिक्रोध, अत्यानंद, अतिदुःख, अतिहव्यास इत्यादि विकार उद्भवूं देऊं नयेत. विंतडवाद करणें, पाण्यांत फार वेळ डुंबणें, काळजी करणें हे प्रकार होतील असें करूं नये. आठ ककार वर्ज करावें. ते ककार म्हणजे कोहोळा, कांकडी, कारलें, कलिंगड, कुसुंभिका, कर्कोटि, कटोली, केळ, कांगोणी हे होत हे जिन्नस खाऊं नयेत (४६२॥)

तद्वतच त्यानें दुराचरण करूं नये. पशुसंग करूं नये. चवाठ्यावर बसूं नये. विष्ठामूत्र ही ओलांडूं नयेत. चांगल्या मनुष्याची, चांगल्या वस्तूची, किंवा चांगल्या स्त्रीची निन्दा करूं नये, सत्य बोलावें, दुरुत्तर बोलूं नये, हुलगे, जवसाचें तेल, तिळ, उडीद, मसुरा, कबूतरांचें मांस, कांजी, ताकभात हे जिन्नस खाऊं नयेत. हेमचंद्र म्हणतात कीं, कोंबड्याचेंही मांस खाऊं नये; तसेंच तिखट, आंबट, कडु, खारट, पित्तकर पदार्थ वर्ज करावे. बोरें, खोबरें, आंबा, संचळखार, नारिंग, कांचनार, शेवग्याच्या शेंगा ह्यांचा त्याग करावा. तंटाबखेडा, बडबड करूं नये, किंवा उगीच भटक्या मारीत हिंडूं

मुळांत 'न हन्यात्' असें पद आहे. त्याचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणें दिसतोः--

नये. नैवद्य खाऊं नये, कापूरहि वर्ज करावा. केशराचें उटणें लावणें जमीनीवर निजणें हें प्रकार वर्जावे. त्याचप्रमाणें, कुमारीला मारूं नये * (म्हणजे तिचें मातेरें करूं नये), वातुळ पदार्थ खाऊं नये. परंतु भूक लागली असतां उपाशी राहूं नये,व अजीर्ण होईल इतकेंहि खाऊं नये.

(सारांश) दिवसा व रात्री एकसारखा मंत्राचा जप सुरू ठेवावा. सत्य असेल तेंच बोलावें, आणि दुधभात, मुग, तूप, साळीचा भात अशा प्रकारचें जें हितकर अन्न आहे तें नेहमीं खावें हें पार्वती, माज्या खावयाच्या तर पुनर्नवा, मेघनाद (आघाडा), वास्तुक (चाकवत), सैंधव, नागरमोथे, पद्ममूळ ह्या (जातीच्या) पदार्थांस हरकत हरकत नाहीं. सदैव आत्मविचार, हरिकथा, देवपूजा, व विशेषेंकरून शिवपूजा हीं सत्कर्मे मात्र रसायन सेवन करीत असतांहि सोडूं नयेत. (४७३).

अथ रसवाग्भटे ।—

[साधितं पारदं शृङ्गदन्तवेण्वादिधारितम् ।
अर्चयित्वा यथाशक्ति देवगोब्राह्मणानपि ॥ ४७४ ॥
पर्णखण्डे धृतं सूतं जग्ध्वा तदनुपानतः ।
घृतसैन्धवधान्याकजीरकार्द्रकसंयुतम् ॥ ४७५ ॥
तण्डुलीयकधान्याकपटोलालाबुकादिकम् ।
कुस्तुम्बरी मरीचानि सैन्धवं समभागिकम् ॥ ४७६ ॥
व्यञ्जनार्थं कृतं दद्याद्रससेवकभोजने ।]
गोधूमजीर्णशाल्यन्नं गव्यं क्षीरं घृतं दधि ॥ ४७७
हंसोदकं मुद्गयूषः पथ्यवर्गः प्रकीर्तितः ।
बृहतीबिल्वकूष्माण्डं वेत्राग्रं कारवेल्लकम् ॥ ४७८
माषान्मसूरान्निष्पावान् कूलत्थान् सर्षपांस्तिलान् ।
बन्धनोद्वर्तनस्नानताम्रचूडसूरासवान् ॥ ४७९ ॥
आनूपमांसधान्याम्लं भोजनं कदलीदले ।
कांस्ये च गुरु विष्टम्भी तीक्ष्णोष्णं च भृशं त्यजेत् ।
वर्जयित्वा निषिद्धं तु विचित्ररसभुग्भवेत् ॥ ४८०
स्रवति न यथा रसेन्द्रो न च नश्यति जाठरो वन्हिः ॥४८१॥

रसवाग्भट म्हणतातः—

पाऱ्याचें बन्धन करून तो स्थिर करतां आला किंवा त्याचें भस्म करतां आलें म्हणजे पारा सिद्ध झाला. तेव्हां अशा रीतीनें पारदसाधन केल्यावर त्याची यथानुकूल पूजा करून गोब्राम्हणांचीहि यथाशक्ति पूजा करावी. मग पारा शिंगटाच्या अगर वेळूच्या काडीनें (विड्याच्या) पानावर घेऊन अनुपानासह सेवन करावा. रससेवन करणारानें भोजनामध्यें तोंडी लावण्याकरितां तांदुळजा, धने, पडवळ, भोंपळा ह्या उत्तम भाज्या खाव्या. त्यांत तूप, व सैंधव, धने, जिरे, आलें ह्यांचा मसाला व कोथिंबीर, भिरें, सैंधव हे पदार्थ समभाग टाकावे, आणि अन्न घ्यावयाचें तेंसुद्धां गहूं, जुने तांदूळ, गाईचें दूध, तूप दहीं, *हंसोदक, मुगाचें सार असें हितकर पथ्य घ्यावें. डोरली, बेल, कोहोळा, वेत्राग्र, कारलें, उडीद, मसुरा, पावटे, हुलगे, मोहोऱ्या, तीळ हे वर्ज करावे. आंग घट्ट बांधून घेणें, खूप उटणी लावून स्नान करणें, कोंबड्याचें मांस खाणें, दारु व दुसरीं आसवें पिणें हे उपचार वर्ज करावे. केळीच्या पानावर अगर कास्यपात्रांत जेऊं नये. जडान्न, अवष्टंभक अन्न, अतिशय तिखट व कढत असें अन्न खाऊं नये व निषिद्ध पदार्थहि सेवन करूं नयेत. रसायन सेवन करणारानें नानाप्रकारचे चवदार पदार्थ खावे; परंतु पारद अंगांतून निघून जाईल किंवा पचनक्रिया मंद होईल असे पदार्थ खाऊं नयेत (४८०).

अथाज्ञानादशोधितपारदभक्षणे तद्विषशमनोपायमाह—

यद्यज्ञानात्कथमपि नागादिकलङ्कितो रसो भुक्तः ।
तत्स्रावणाय विज्ञः पिबेच्छिफां कारवेल्लभवाम् ॥ ४८२ ॥

अथ रसाजीर्णे शमनोपायमाह—

रसाजीर्णे महाव्याधीन् लक्षयेद्विषगुत्तमः ।
अभ्यङ्गमनिलक्षोभे तैलैर्नारायणादिभिः ॥ ४८३ ॥
अरतौ शीततोयेन मस्तके परिषेचयम् ।
तृष्णायां नारिकेलाम्बु मुद्गयूषं सशर्करम् ॥ ४८४ ॥
उद्गारे सति दध्यन्नं कृष्णजीरं ससैन्धवम् ।
कार्षिकं स्वर्जिकाक्षारं कारवेल्लीरसप्लुतम् ।
गोमूत्रसैन्धवयुतं तस्य संस्रावणं परम् ॥ ४८५ ॥

---

*पावसाचें निवळलेलें पाणी.

तस्य रसाजीर्णस्य ॥

कर्कोटीसिन्धुगोमूत्रं कारवेल्लीरसप्लुतम् ।
सौवर्चलसमायुक्तं रसाजीर्णे पिबेन्नरः ॥ ४८६ ॥
शरपुङ्खां सुरदालीं पटोलबीजं च कांकमाचीं च ।
एतेषामेकतमं क्काथितमजीर्णे रसायने तु पिबेत् ॥ ४८७ ॥

यदाकदाचित् शुद्ध न केलेला पारा चुकून खाण्यांत येऊन त्याचें विष बाधल्यास उपाय.

न कळल्यामुळें किंवा चुकून कथील व शिसें इत्यादि दोषांनीं युक्त असा पारा सेवन करून सो बाधला असतां अंगांतून दूषित पारा निघून जाण्यासाठीं कारल्याच्या मुळीचा रस प्यावा (४८२).

रसायनसेवनानें अजीर्ण झाल्यासः—

रसायन खाल्यामुळें अजीर्ण झालें आहे कीं काय, हें वैद्यानें लक्षपूर्वक पहावें व तसें झालें तर नारायण तेल वगैरे तेलें लावून अभ्यंग करवावें, किंवा डोकें भणभणत असेल तर थंड पाण्याचा शिडकाव डोक्यावर करावा. तहान फार लागली तर नारळाचें पाणी, मुगाचा यूष साखर घालून पिण्यास द्यावा.ढेंकरा फार येत असल्यास जेवतांना दहीं-भाताशीं काळीं जिरें व सैंधव खावें. सज्जीखार एक वर्ष कारल्याच्या पाल्यांतून द्यावा. सैंधव घालून गोमूत्र पिणें हा अंगांत मुरलेला दूषित पारा टाकण्यास उत्तम उपाय आहे. (४८५)

पारा अंगांत सांचून अजीर्ण झाल्यास.

रसायन न पचल्यास निर्गुडी, कटोंली, गोमूत्र आणि कारल्याचा रस यांत संचळखार घालून तो प्यावा, किंवा शरपुंखा, देवडांगरी, पडवळाचें बीं, व कावळी ह्यांपैकीं कोणत्याहि औषधाचा काढा रसायन न जिरल्यास द्यावा. (४८७)

हारीतं प्रत्यात्रेयः—

धान्यादीनां च सर्वेषां यवगोधूमपिष्टिकाः ।
नेष्टास्तु विदलाः सर्वे मुक्त्वा मुद्गांस्तथाऽऽढकीम् ॥ ४८८ ॥
आज्यं स्नेहे मधुषु मधुरं चेक्षुजातं हि यत्स्यात् ।
श्रेष्ठं खण्डं बत वरासितं क्षारयुक्तं न तत्स्यात् ।

हिङ्गु श्रेष्ठं सकलसुरभौ सैन्धवं सिन्धुजेषु
रागे यूषाः प्रवररजनीसूरणार्द्राश्च कन्दे ॥ ४८९ ॥
अशुभं पत्रशाकं तु सर्वाणि द्विदलानि च ।
संस्कृतानि विधानेन न स्युर्दोषकराणि च ॥ ४९० ॥
केशादिजुष्टं कृतशीतमुष्णं शाकावरान्नैर्बहुलं महोष्णम् ।
निशोषितं यल्लवणाधिकं च संत्याज्यमन्नं रससेविभिस्तत् ॥४९१॥
तक्रं हितं स्नेहगतं तथा दधि गोक्षीरजातं सकलं हितं स्यात् ।
मुक्त्वा च तैलाम्बुसुरारनालं स्यादम्बुपानं न हितं रसायने ॥
तैलं च चित्रागिरिजाभवं यत्सुस्वादहीनं शटितामदग्धम् ।
विनष्टदुर्गंधं त्वशुभं च सर्वं खादेत्कदाचिन्न रसायनी नरः ४९३
पुष्पजातं फलं सर्वं मधुरं मांसशर्करम् ।
पाकयुक्तमशीर्णं च श्रेष्ठमुक्तं रसायने ॥ ४९४ ॥
असिताया सवत्सवत्सायाः प्राहुर्दुग्धं जलैः शृतम् ।
बलवृधिकरं वृष्यं श्रेष्ठमुक्तं रसायने ॥ ४९५ ॥

आत्रेय हारिताला सांगतात कीं:—

सर्व धान्यांत सातु, गहूं, साळी हे पथ्यकर आहेत; परंतु मूग व आढकीखेरीज बाकीचीं विदल धान्यें वर्ज समजलीं पाहिजेत. तैलवर्गांत तूप हितकर, गोड पदार्थांत कोणताहि ऊंस उत्तम, खडीसाखर व दालचिनीहि उत्कृष्ठ, परंतु तिच्यांत क्षार असतां उपयोगी नाहीं. तसेंच पदार्थांत हिंग, खारट पदार्थांत सैंधव, रंगामध्यें दारुहळद, कंदमुळांत सुरण व आलें हे पदार्थ नेहमीं ग्राह्य समजावे. (४८९)

पाले भाज्या व द्विदल धान्यें हीं हितकर नव्हेत; परंतु तीं जर योग्य प्रकारें (न बाधतील अशीं) शिजवून तयार केलीं तर त्यांच्यापासून त्रास होणार नाहीं. (४९०)

तसेंच कैस पडलेलें अन्न, अतिशय थंड किंवा अतिशय उष्ण पदार्थ, पुष्कळशा भाज्या व वरण घालून केलेले पदार्थ, फारच कढत, शिळा, किंवा खारट असा पदार्थ रसायन घेणारानें खाऊं नये. ताक, साईचें दहीं, गाईच्या दुधाचे पदार्थ हे सर्व उत्तम; परंतु तिळाचें पाणी, मध, आरनाल यांच्याव्यतिरिक्त इतर पेय पदार्थ किंवा

कोणते तरी पाणी पिणें कुपथ्य होय. चित्रा व गिरिजा यांच्यापासून काढलेलें तेल जर स्वादरहित, अंबुस, अर्धकच्चें जळलेलें, किंवा त्यांतील दुग्ध भाग नाहींसा झालेलें असलें तर असें तेल व दुसरे खराब जिन्नस रसायनसेवी मनुष्यानें खाऊं नयेत. (४९३)

फुलभाज्या, मधुर फळें, मांसाचे किंवा साखरेचे उत्तम शिजविलेले व न नासलेले असे पदार्थ रसायन सेवन करणाराला अत्युत्तम होत असें सांगितलें आहे. वासरू जिवंत असलेल्या कपिला गाईचें दूध, पाणी घालून उकळलेलें फार उत्तम होय. त्यानें बळ व वीर्य वृद्धिंगत होतें. (४९५)

गव्यं सुदुग्धं सलिलार्धकेन संपाच्य तत्क्षीणजलं सुशीतम्।
खण्डेन वा शर्करया समेतं रसेन्द्रभोक्ता प्रपिबेत्सदैव ॥ ४९६ ॥
दिव्यान्तरिक्षं धुनिजं च कौपं स्वयंविशीर्णाद्रिशिलातलोद्भवम्
तडागजं सारसमौद्भिदं यत्तोंय मतं त्वष्टविधं मनोरमम् ॥ ४९७ ॥
अक्षारं स्वादुमृष्टं दिनमाणिकिरणैर्वासरे तप्तमादौ
रात्रौ शीतांशुरोचिस्त्रिविधसुपवनान्दोलितं दोषहीनम्।
कर्पूरै राजचम्पैरतिशयविमलैः पाटलैलासुपुष्पै-
स्त्वगधान्यैर्वासितं यद्धराशिशिरजलं सूतसेवी पिबेद्धि ॥ ४९८ ॥
श्रीनारायणसंज्ञकेन च बलातैलेन चान्येन वा
कार्यं मर्दनकोविदै रसभुजां मल्लैः सदा मर्दनम्।
चातुर्जात लवङ्गकुङ्कुमनिशामुस्तासुमांसीभवै-
श्चूर्णैर्भृष्टमसूरमुद्गयवजैरुद्धर्तनं कारयेत् ॥ ४९९ ॥
सौख्योष्णैः सलिलैर्द्रुतं रसभुजां स्नानं सुजीर्णेऽशने
वातं पित्तकफौ निहान्ति बलकृत्वर्णकृद्बृंहणम्।
रूपद्योतिकरं मनः प्रशमनं कामस्य संवर्धनं
नारीणां च मनोहरं श्रमहरं देहे रसक्रामणम् ॥ ५०० ॥

गाईचें उत्तम दूध आणून त्यांत त्याच्या अर्ध्यानें पाणी घालून तें उकळून सर्व पाणी आटवावें. थंड झाल्यावर वाटल्यास त्यांत खडीसाखर घालून प्राशन करीत जावें. (४९६) आतां पिण्याचें उत्तम पाणी कोणतें म्हणाल तर गारा पडतात त्यांचें किंवा पावसाचें अलगद धरलेलें, किंवा वाहत्या स्वच्छ प्रवाहाचें. (स्वच्छ)

आडाचें, आपोआप फुटलेल्या खडकांतून निघणारें, शिळेच्या तळाखालून बाहेर येणारें, गोड्या तलावांतील किंवा ज्यांत सारसपक्षी कमळें इत्यादि आहेत, तें असें आठ प्रकारचें रुचिकर पाणी पिण्याला अति उत्तम होय. असें पाणी न मिळेल तर गोडें व रुचकर पाणी आणून तें तापवावें. मग उन्हांत ठेऊन सूर्यकिरणांनीं स्वच्छ होऊं द्यावें व रात्रीं चांदण्यांत उघड्या वाऱ्यावर ठेवावें, म्हणजे वाऱ्याच्या झुळकेनें तें निर्दोष होतें. मग त्यांत कापूर, चांफा, अति निर्मळ अशीं पाटलपुष्पें, दालचिनी, धने इत्यादि वासाचे पदार्थ टाकावे, व असें उत्कृष्ट थंड पाणी तयार करून तें रसायन सेवन करणारास पिण्यास द्यावें.(४९८)

मग नारायणतेल, बलातेल किंवा दुसरें एखादें तेल घेऊन त्यानें वाकबगार व रससेवन करणाऱ्या तालिमबाजाकडून मालिस करवून घ्यावें आणि चतुर्जात, लवंग, केशर, हळद, नागरमोथे, जटामांसी यांचा मसाला करून त्यांत भाजलेले मसूर, मूग व सातु यांचें पीठ मिसळून तें उटणें अंगाला लावावें. (४९९)

भोजन चांगलें जिरल्यावर लागलींच सोसेल इतकें ऊन पाणी घेऊन स्नान करावें, म्हणजे वात, पित्त व कफ हे विकार नाहींसे होतात. बळ वाढतें, व कातडीचा रंग उत्तम होतो; कांति व तेज वृद्धिंगत होतें; मन प्रसन्न राहतें व भोगेच्छा उद्दीपित होते. स्त्रियांनींसुद्धां अशा प्रकारें उपचार केल्यास रसायनाचा उपचार त्यांनाहि आल्हादकारक आणि श्रमपरिहारक वाटेल. (५००)

अथ देहसिद्धिदानन्यानपि रसेन्द्रप्रयोगान् व्याचक्ष्महे ।
श्लोकद्वयं तत्र प्रागध्येतव्यं मृतपरीक्षार्थं; यथा—
कचकचिति न दन्ताग्रे कुर्वन्ति समानि केतकीरजसा ।
योग्यानि हि प्रयोगे रसोपरसलोहचूर्णानि ॥ ५०१ ॥
वल्मीककूपतरुतलरथ्यादेवालयष्मशानेषु ।
जाता विधिनाऽपि हृता ओषध्यः सिद्धिदा न स्युः ॥ ५०२ ॥

आतां देहसिद्ध करणारें (म्हणजे जरारोगनाशक) असे आणखीहि कांहीं प्रयोग लिहितों.

प्रथम पारा हा खरोखर मृत झाला आहे कीं नाहीं, याची परीक्षा केली पाहिजे. ती अशी:—

पारद भस्म थोडेंसें जिभेवर ठेऊन दांताखालीं कचकच लागते कीं काय तें पहावें. कचकच लागतां उपयोगी नाहीं. भस्म केतकीच्या परागाप्रमाणें दिसलें पाहिजे. म्हणून, रस उपरस लोह वगैरेचीं भस्में अशा प्रकारचीं असलीं तरच तीं सेवन कर-ण्यास योग्य होत. (५०१)

औषधि किंवा वनस्पति आणणें त्या वारूळ, विहीर ह्यांचा-जवळील किंवा झाडाखालील, अथवा रस्त्यांतील, देवालयांतील अगर स्मशानांतील आणूं नयेत. अशा वनस्पती खुद्द ब्रम्हदेवानें जरी आणल्या तरी त्या निरोपयोगी होत. (५०२)

अथ सर्वप्रयोगयोग्यतया रसेंद्रमारणाय शाम्भवीं मुद्राम-भिदध्मः—

अधस्ताप उपर्यापो मध्ये गन्धकपारदौ ।
यदि स्यात्सुदृढा मुद्रा मन्दभाग्योऽपि सिध्यति ॥ ५०३ ॥
यदि कार्यमयोयन्त्रं दिह्यात्तं मृत्स्नया तदा ।
समे गन्धे तु रोगघ्नो द्विगुणे राजयक्ष्माजित् ॥ ५०४ ॥
जीर्ण गुणत्रये गन्धे कामिनीदर्पनाशनः ।
चतुर्गुणे तु तेजस्वी सर्वशास्त्रविशारदः ॥ ५०५ ॥
भवेत् पञ्चगुणे सिद्धः षड्गुणे मृत्युजिद्भवेत् ।
इत्याद्युक्तमेव ॥

आतां सर्व क्रिया सिद्ध करणारा असा "शांभवी मुद्रा" या नांवाचा आंच देण्याचा प्रकार सांगतोः

या प्रकारांत खालीं जाळ व वर (थंड) पाणी आणि मध्यें गंन्धक व पारा अशा प्रकारानें मजबूत मुशीमध्यें तिचें तोंड पक्कें बंद करून जर आंच देतां आली तर कमनशीबी मनुष्यहि सिद्ध होतो. मूस जर लोखंडाची केली तर ती अगोदर मातीनें चोपडावी आणि मग आंच द्यावी (५०३॥)

पाऱ्याच्या बरोबरीनें गंधक दिल्यास तो पारा रोगांचा नाश करतो. गंधक दुप्पट दिला असला तर कफक्षयहि बरा होतो. तिप्पट गंधक जिरविला (तो पारा खाल्ला) तर पुरुष विलासांत स्त्रियांचा दर्प हरण करील. चौपट गंधक जिरला असला तर (तो पारा सेवन करणारा) तेजःपुंज आणि सर्व शास्त्रांत प्रवीण होईल. पांचपट गंधक जिरला असल्यास रस सिद्ध होईल आणि सहापट गंधक जिरला तर प्रत्यक्ष मृत्यूला सुद्धा मनुष्य जिकूं शकेल हें वर सांगितलेंच आहे. (५०५॥)

भस्मसूतं द्विधा गन्धं शतं कन्याम्बुमार्दितम् ॥ ५०६ ॥
रूढ्वा लघुपुटे पाच्यमुधृत्य मधुसर्पिषा।
निष्कं खादेज्जरामृत्युं हन्ति गन्धामृतो रसः ॥ ५०७ ॥
समूलं भृङ्गराजं च छायाशुष्कं विचूर्णयेत्।
तत्समं त्रिफलाचूर्णं सर्वतुल्या सिता भवेत् ॥ ५०८ ॥
पलैकं भक्षयेच्चानु वर्षान्मृत्युजरापहः ॥

इति गन्धामृतो रसः ॥

आतां गंधामृत रस सांगतों.

पारद भस्म एक भाग व गंधक दोन भाग हे, कोरपडीचा रस शंभर भाग घेऊन त्या रसांत खलावे. मग त्या मिश्रणाला मातकापड गुंडाळून बंद करून लघुपुट द्यावें, आणि निवाल्यावर काढावें. ही मात्रा तूप मध यांजबरोबर निष्कप्रमाण सेवन करावी, म्हणजे जरामृत्यु यांचा नाश होईल. हें गन्धामृत रसायन होय

याचें अनुपानः--

म्हाका मुळासकट आणून सावलींत वाळवावा व त्याच्याइतकेंच त्रिफळा चूर्ण घेऊन दोहोंच्या बरोबरीनें खडीसाखर घालून चूर्ण करावें. हें चार तोळे सेवन केल्यास एक वर्षांत वार्धक्य व मृत्यू ह्यांचा नाश होतो. (५०८॥).

मृतसूतस्य पादांशं हेमभस्म प्रकल्पयेत् ॥ ५०९ ॥
क्षीराज्यमधुना मिश्रं माषैकं कान्तपात्रके।
लेहयेन्मासषट्कं तु जरामृत्युविनाशम् ॥ ५१० ॥

बाकुचीचूर्णकर्षैकं धात्रीफलरसप्लुतम् ।
अनुपानं सदा लिह्यात् स्याद्रसो हेमसुंदरः ॥ ५११ ॥
इति हेमसुंदरो रसः ॥

हेमसुंदर रस

पारद भस्म एक भाग, व सुवर्ण भस्म चौथा हिस्सा हे एकत्र खलावे; मग एका कांतलोहाच्या भांड्यांत दूध, तूप व मध घालून त्यांत मात्रा एक मासाभर कालवून तें मिश्रण सेवन करावें. याप्रमाणें सहा महिने औषध घेतलें असतां जरा, मृत्यू हे नष्ट होतात. याला अनुपानः—बावची—चूर्ण एक मासा आंवळ्च्या फळाच्या रसांत कालवून औषधाच्या मागून लागलींच प्यावें. (५११)

बालिः सूतो निम्बूरसविमृदितो भस्मासिकता-
व्हये यन्त्रे कृत्वा समरविकणाटङ्कणरजः ।
त्रिघस्रं लुङ्गाम्भोलवकदलितः क्षौद्रहविषाऽ
वलीढो माषैकं दरयति समस्तं गदगणम् ॥ ५१२ ॥
जरां वर्षैकेन क्षपयति च पुष्टिं वितनुते
तनौ तेजस्कारं रमयति वधूनामपि शतम् ।
रसः श्रीमान्मृत्युञ्जय इति गिरीशेन कथितः
प्रभावं को वाऽन्यः कथयितुमपारं प्रभवति ॥ ५१३ ॥
लुङ्गाम्भोलवकदलित इति मातुलुंगद्रवं कणशो दत्त्वा
त्रिदिनं मर्दयेदित्यर्थः । इति मृत्युञ्जयो रसः ॥

मृत्युंजय रस

गंधक आणि पारा कागदी लिंबाच्या रसांत खलून वालुका-यंत्रांत पुट देऊन त्याचें भस्म करावें. तें व ताम्र भस्म व टांकणखाराची लाही असे समभाग घेऊन महाळुंगाचा रस थोडा थोडा देऊन त्या रसांशीं तीन दिवस खल करावा, आणि ती मात्रा तूप व मध यांत एक मासा खावी, म्हणजे रोगांचें बेटच नाहीसें होतें. ते असें कीं, एक वर्षपर्यंत मात्रा घेत गेलें असतां म्हातारपणाची कळा जाऊन शरीर धष्टपुष्ट होतें, तजेला येतो व शंभर स्त्रियांचा देखील उपभोग घेण्याची ताकद येते. ह्या मात्रेला मृत्युंजय म्हणतात. हा

प्रयोग साक्षात् शंकरांनीं सांगितला असल्यानें त्यांच्याशिवाय याचा प्रभाव दुसरा कोण वर्णन करूं शकेल ? (५१३)

महाळुंगाचा रस घालणें तो थोडा थोडा घालावयाचा आणि खल तीन दिवस करावयाचा असा भावार्थ आहे.

शुद्धं रसं समावेषं प्रहरं विमर्द्य
तद्गोलकं कनकचारुफले निधाय ।
दोलागतं पच दिनं विषमुष्टितोये
प्रक्षाल्य तत्पुनरपीह तथा द्विवारम् ॥ ५१४ ॥
तत्सूतके गिरिशलोचनयुग्मगन्धं
युक्त्याऽवजार्य कुरु भस्मसमं च तस्य ।
वैक्रान्तभस्म जयपालनवांशकार्धं
सर्वैंविषं द्विगुणितं मृदितं च खल्वे ॥ ५१५ ॥
घस्रत्रयं कनकभृङ्गरसेन गाढ-
मावेश्य भाजनतले विषधूपभाजि ।
भृङ्गद्रवेण शिथिलं लघुकाचकूप्या-
मापूर्य रूद्धवसनं सिकताख्ययन्त्रे ॥ ५१६ ॥
तां वासरार्धमुपदीप्य निसर्गशीतां
दृष्ट्वा विचूर्ण्य गदशालिषु शालिमात्रम् ।
आनंदसूतमखिलामयकुम्भिसिंहं
गद्याणकार्धसितया सह देहि पश्चात् ॥ ५१७ ॥
रोगानुरूपमनुपानमपि प्रकामं
क्षोणीभुजां प्रचुरपूजनमाप्नुहि त्वम् ।
कीर्त्या दिशो धवलय स्फुरदिन्दुकान्त्या
वैद्येश्वरेति विरुदं भज वैद्यराज ॥ ५१८ ॥
तथा द्विवारमिति पूर्ववदखिलं द्विः कुर्यादिति भावः ।
गिरिशलोचनयुग्मेति षड्गुणगन्धकं, युक्त्येति काचकूप्यादौ॥

इत्यानन्दसूतरसः ॥

आनंदसूत रस.

शुद्ध पारा व बचनाग समभाग घेऊन त्याचा एक प्रहर-पर्यंत एकत्र खल करावा मग गोळी करून ती काळ्या धोत्र्याच्या फळाला भोंक पाडून त्यांत ठेवावी व छिद्र बंद करून दोलायंत्रांत

पांच दिवसपर्यंत कुचल्याच्या काढ्यांत उकळावी. नंतर स्वच्छ धुवून पुनः दुसऱ्यानें त्याचप्रमाणें उकळावी. नंतर त्या पाऱ्यांत सहापट गंधक युक्तीनें जिरवावा, म्हणजे त्या पाऱ्याचें भस्म होतें. तें भस्म व त्याच्याइतकेंच वैक्रान्त भस्म, व जेपाल बीज अठरावा हिस्सा आणि बचनाग दुप्पट असें एकत्र खलावें. नंतर तें मिश्रण काळ्या धोत्र्याच्या व म्हाक्याच्या रसांत तीन दिवस चांगलें भिजवून विषधूपयुक्त भांड्यांत ठेवून म्हाक्याच्या रसांत कालवून ती राबडी एका लहानशा कुपींत ओतावी व कुपीस मातकापड लेप करून वालुकायंत्रांत अर्धा दिवसपर्यंत आंच द्यावी. निवाल्यावर काढून घेऊन तिची पूड करावी आणि रोग्याला एक तांदूळाइतकी द्यावी. सर्व रोगरूप हत्तींना सिंहाप्रमाणें मारून टाकणारा असा हा आनंदसूत रस होय. ह्याचें प्रमाण अर्ध्या गद्याणकापर्यंत वाढवावें. मात्रा खडीसाखरेबरोबर द्यावी. (५१७)

एवंच, रोगाला अनुरूप अशाच अनुपानाची योजना करुन मोठमोठ्या राजेरजवाड्यांकडून मान सन्मान मिळवीव. चांद्रिकेप्रमाणें आपल्या धवल कीर्तीनें दिशा उज्वल कर आणि वैद्यराज ही पदवी सार्थ कर.

वर श्लोकांत दोन वेळां उकळावें असें सांगितलें आहे तें एकंदर दोन वेळां असें समजावें. "गिरीश लोचन युग्म" असा शब्द मुळांत आहे त्याचा अर्थ सहा वेळ. याप्रमाणें आनंदसूत रसाची क्रिया आहे.

सूतं गन्धं कान्तपाषाणमिश्रं ब्राह्मैर्बीजैर्मर्दयेदेकघस्रम् ।
गोलं कृत्वा टङ्कणेन प्रवेष्टय पश्चान्मृत्स्नागोमयाभ्यां धमेत्तम् ॥
शुष्के यन्त्रे सत्त्वपातप्रधाने किट्टे सूतो बद्धतामेति नूनम् ।
बद्धं पश्चात्क्षारकाचप्रयोगाद्धेम्ना तुल्यं सूतमावर्तयेत्तु ॥५२०॥
वक्त्रे खोटः स्थापितो वत्सरार्धं रोगान्सर्वान्हान्ति सौख्यं करोति ।
यद्वा दुग्धे गोलकं पाचयित्वा दद्या द्दुग्धं पिप्पलीभिः क्षये तत् ॥
लौहे पात्रे पाचयित्वा तु देयं शुष्के पाण्डौ कामलापित्तरोगे ।
बाते गोलं व्योषवातारितैले पक्त्वा तैलं गन्धयुक्तं ददीत ५२२

भार्गिमुण्डीकासमर्दाटरूषद्रावैर्गोलं पाचयेच्छ्लेष्मनुत्त्यै।
कासे श्वासे तं च दद्यात्कषायं माधवीकाक्तं पिप्पलीचूर्णयुक्तम् ॥
यस्मिन् रोगे यःकषायोऽस्ति चोक्तस्तास्मिन्गोलं पाचयित्वा कषाये
दद्यात्तत्तद्रोगनाशाय पथ्यं तत्तद्रोगे कीर्तितं यत्तदेव।
उक्तो गोलः प्राणिकल्पद्रुमोऽयं पूजां कृत्वा योजयेद्भक्तियोगात्।
युक्त्या प्रागग्निसहत्वं कृत्वा पश्चाद्धमेदित्यर्थः ॥
इति प्राणिकल्पद्रुमगोलरसः ॥
रसगन्धकताम्राणि सिन्दुवाररसैर्दिनम्।
मर्दयेदातपे पश्चाद्वालुकायन्त्रमध्यगम् ॥ ५२५ ॥
रूद्धा मूषागतं यामत्रयं तीव्राग्निना पचेत्।
तदुद्धृा सर्वरोगेषु पर्णखण्डिकया सह ॥ ५२६ ॥
दातव्या देहासिद्धयर्थं पुाष्टिवीर्यबलाय च।
सिन्दुवारो ' निर्गुण्डी ' इति भाषा। इति त्रिनेत्ररसः ॥

प्राणीकल्प द्रुमगोल.

पारा, गन्धक व कान्तलोह यांचा खल ब्राम्हबीजार्शी (म्ह० देवदाराच्या बियांबरोबर) एक दिवसपर्यंत करावा आणि गोळी करून ती टांकणखारानें लपेटून त्याला मातीनें व शेणानें लिंपावें, आणि सत्व काढण्याचें यंत्र कोरडें करून त्यांत ठेऊन दोन गोंवऱ्यांच्या अग्नीनें पुट द्यावें, म्हणजे त्या यंत्राच्या किटणानें पारा बद्ध होतो. मग तो बद्ध झालेला पारा आणि त्याच्याइतकेंच सोनें घेऊन त्याचा, कांच तयार करण्याच्या क्रियेनें द्रव करावा, म्हणजे " खोट " तयार होतो. तो खोट तोंडांत सहा महिनेपर्यंत धरला असतां सर्व रोगांचा नाश होऊन सौख्य प्राप्त होतें, किंवा दुधांत पिंपळी टाकून त्यांत ती पारदगुटिका उकडावी व तें दुध क्षयरोग्यास प्राशन करण्यास द्यावें. वाळकुंडेपणा पांडुरोग, किंवा पित्तप्रकोप अगर कावीळ हे रोग झाले असतां लोखंडाच्या भांड्यांत दूध घालून त्यांत ही गोळी उकडून दूध प्यावें. वातरोग झाले असतां वातारि तेलांत गंधयुक्त त्रिकटु टाकून त्या तेलांत गोळी शिजवून तें तेल द्यावें. कफनाश करण्याकरितां भारंगमूळ, गोरखमुंडी, कासविंदा, आडुळसा यांच्या रसांत गोळी शिजवावी आणि मग मध, पिंपळी घालून तो कषाय

श्वास, कास झाला असतां द्यावा. ज्या रोगावर जो काढा द्यावयाचा त्या काढ्यांत पारदगुटिका उकळून तो कषाय द्यावा व त्या रोगाच्या चिकित्सेंत जें पथ्य असेल तेंच करावें.याप्रमाणें हा प्राणि. कल्पद्रुम गोल सांगितला आहे. विश्वास ठेऊन त्याची योजना करीत जावें. (५२४)

वर श्लोक ५१९ यांत पुट देण्यास सांगितलें आहे तें देण्यापूर्वी, अग्नीनें पारा उडून न जाईल अशा रीतीनें त्याचा बन्ध करावा आणि नंतर पुट द्यावें.

त्रिनेत्र रस.

पारा, गंधक आणि ताम्र यांचा एकत्र खल निर्गुडीच्या रसांत एक दिवस करावा व उन्हाचा चांगला ताप देऊन मग मुशींत ठेवून, तोड बंद करून वालुकायंत्रांत तीन प्रहरपर्यंत कडक आंच द्यावी. म्हणजे मात्रा बनते. ती मात्रा पत्री खडीसाखरेबरोबर एक गुंजप्रमाणें खावी. सर्व रोगांवर चालेल. देह कान्तिमान करणें असेल, आणि पुष्टता, बळ, वीर्य हीं पाहिजे असतील तरीदेखील ही मात्रा सेवन करण्यास यावी. (५२६॥)

रसस्य द्विगुणं गंधं शुद्धं संमर्दयोद्दिनम् ॥ ५२७ ॥
अष्टलोहं तु प्रत्येकं मृतं सूतसमं क्षिपेत् ।
ब्राह्मी जया च निर्गुण्डी विषमुष्टिः पुनर्नवा ॥ ५२८ ॥
नीलिका गिरिकर्ण्यर्ककृष्णधत्तूरकं यवाः ।
वासा च काकमाची च द्रवैरासां विमर्दयेत् ॥ ५२९ ॥
गुञ्जात्रयं चतुष्कं वा सर्वरोगेषु योजयेत् ।
रोगोक्तमनुपानं वा कवोष्णं वा जलं पिबेत् ॥ ५३० ॥
अष्टलोहं स्वर्णादि । इति शार्दूलरसः ॥

शार्दूलरस.

पारा एक भाग, शुद्ध गंधक त्याचा दुप्पट असें घेऊन एक दिवस खल करावा. नंतर त्यामध्यें सुवर्णादिक अष्ट धातूंपैकीं कोणत्याहि धातूचें भस्म पाऱ्याच्या बरोबरीनें देऊन तें मिश्रण ब्राह्मी,

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय, पुणे

टाकळा, निर्गुडी,कुचला, पुनर्नवा,नीलिका, गिरिकर्णी,काळा धोतरा, सातु, अडुळसा व कावळी यांच्या रसांत लोहक्रियेप्रमाणें, खलावें म्हणजे मात्रा तयार होते. ती पाहिजे त्या रोगावर देण्यास हरकत नाहीं. मात्रा तीन किंवा चार गुंजा द्यावी व त्याबरोबर योग्य असें अनुपान द्यावें किंवा नुसतें कोमट पाणी पिण्यास द्यावें. (५३०)

सूतभस्म चतुर्भागं लोहभस्म तथाऽष्टकम् ।
मेघभस्म च षड्भागं शुद्धगन्धस्य पंचकम् ॥ ५३१ ॥
भावयेत्त्रिफलाक्काथस्तत्सर्व भृङ्गजद्रवैः ।
शिग्रुवन्हिकटुक्यार्द्धिः सप्तधा भावयेत्पृथक् ॥ ५३२ ॥
सर्वतुल्या कणा योज्या गुडैर्मिश्रं पुरातनैः ।
निष्कमात्रं सदा खादेज्जरां मृत्युं निहन्त्यलम् ॥ ५३३ ॥
ब्रह्मायुः स्याच्चतुर्मासै रसोऽयममृतार्णवः ।
तिलं कोरण्टपत्राणि गुडेन भक्षयेदनु ॥ ५३४ ॥
कोरण्टः ' कण्टसैरेया ' इति भाषा । इति अमृतार्णवरसः ॥

अमृतार्णव रस.

पारद भस्म चार भाग, लोह भस्म आठ भाग, अभ्रक भस्म सहा भाग, शुद्ध गंधक ५ भाग यांना त्रिफळ्याच्या काढ्याच्या, माक्याच्या रसाच्या आणि शेवगा,चित्रक व कुटकी यांच्या काढ्याच्या पृथक् पृथक् सात भावना द्याव्या व तें मिश्रण घट्ट झालें म्हणजे त्याच्या सारख्या वजनाच्या गोळ्या कराव्या आणि त्या जुन्या गुळाबरोबर नेहमीं निष्कप्रमाण खाव्या, म्हणजे वार्धक्य, मृत्यु ह्या आपत्ती पार नाहींशा होतात. जो मनुष्य अमृतार्णव रस चार महिने घेईल त्याला ब्रह्मदेवाइतकें आयुष्य लाभेल. मात्रा घेतल्यावर तीळ,कोरांटीचा पाला व गूळ असें एकत्र करून खावे व वर दूध प्यावें. (५३४)

वृष्यगणचूर्णतुल्यं तत्पुटपक्वं सिताद्विगुणम् ।
वृष्यात्परमातिवृष्यं रसायनं चूर्णरत्नमिदम् ॥ ५३५ ॥
अथ शतावर्यादिवृष्यगणचूर्णमाह ।—शतावरी विदारी गोक्षुर इक्षुरको वानरी बला कृष्णश्वेता मुसली मिस्रीक्षुरक-

बीजान्यतिबला इति वृष्यगणः । अत्र गन्धमूर्च्छितं रस-
मभ्रादिकं च ददति दाक्षिणात्याः । इदं रसायनाख्यचूर्णरत्नं,
अनुपेयं दुग्धादि ।
विषं त्रिकटुकं मुस्ता हरिद्रा निम्बपल्लवम् ।
विडङ्गमष्टमं चूर्णं छागमूत्रैः समं समम् ।
चणकाभा वटी कार्या योगवाहि जयाभिधा ॥ ५३६ ॥
इति जयावटी ॥
गन्धं लोहं भस्म मध्वाज्ययुक्तं सेव्यं कर्षं वारिणा त्रैफलेन ।
शुभ्रे केशे कालिमा दिव्यदृष्टिः पुष्टिर्वीर्यं जायते गन्धलोहात् ।
इति गन्धलोहम् ॥

रसायन चूर्ण.

वृष्यगणचूर्ण व त्याच्याइतकेंच अभ्रपुट देऊन तयार केलेलें (रसायन) * घ्यावें व दोन्ही एकत्र करून त्यांत दुपटीनें खडीसाखर घालावी आणि सेवन करावें. सर्व पौष्टिक रसायनांत हे चूर्णरत्न नांवाचें रसायन अतिशय पौष्टिक आहे. (५३५)

शतवर्यादि चूर्णाला वृष्य गणचूर्ण म्हणतात. वृष्यगण म्हणजे पुष्टताईचीं औषधें.तीं अशीं: शतावरी,भुइकोहोळा, गोखरु,इक्षुरक,कव-चबीज, चिकणा,काळी मुसळी, सफेत मुसळी, मिसरी, क्षुरकबीज,आणि अतिबला. या औषधांतच दक्षिणी वैद्य गंधकानें मूर्च्छित झालेला पारा किंवा अभ्रक मिश्र करून हें रसायन चूर्ण रत्न बनवितात. (त्याला अनुपान दुध.)

जयावटि.

बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, नागरमोथे, हळद, कडुलिंबाचा पाला आणि वावडिंगें ह्यांचें चूर्ण मेंढीच्या मूत्रांत वांटून त्याच्या हरभऱ्यायेवढ्या गोळ्या कराव्या. ही गोळी: योगवाही आहे. हिला जयावटि म्हणतात. (५३६)

गन्धलोह.

गंधक व लोहभस्म तूपमधाशीं कर्षप्रमणाइतकें सेवन करावे आणि वर त्रिफळ्याचा काढा घ्यावा. हें गन्धलोह घेतलें

* हा शब्द अध्याहृत घ्यावा लागतो.

असतां पांढरे केंस काळे होतात, दृष्टी दिव्य होते, आणि शरीर-पुष्टि व वीर्यवृद्धि हे लाभ त्यापासून होतात. (५३७)

अष्टांशहेमरजते शिखिमूषिकायां
संजार्य षड्गुणबार्लिं क्रमशोऽधिकं च ।
ऊर्ध्वं पयोऽग्निमधरे विनिधाय धीराः
सिद्धिं समग्रमतुलां स्वकरे कुरुध्वम् ॥ ५३८ ॥
अष्टांशेत्युपलक्षणं, अधिकमपि शतगुणपर्यंतम् ॥
रसगन्धकलोहाभ्रं समं सूताङ्घ्रि हेम च ।
सर्वं खल्वतले क्षिप्त्वा कन्यास्वरसमर्दितम् ॥ ५३९ ॥
आवेष्ट्यैरण्डपत्रैस्तु धान्यराशौ दिनत्रयम् ।
संस्थाप्य च तदुद्धृत्य सर्वरोगेषु योजयेत् ॥ ५४० ॥
एतद्रसायनं श्रेष्ठं त्रिफलामधुसंयुतम् ।
तद्यथाग्निबलं खादेद्वलीपलितनाशनम् ॥ ५४१ ॥
एकादशविधं शोषं कासं पञ्चविधं तथा ।
कुष्ठमष्टादशविधं पांडुरोगान् प्रमेहकान् ॥ ५४२ ॥
शूलं श्वासं च मदाग्निं हिक्कां चैवाम्लपित्तकम् ।
आढ्यवातं व्रणान् सर्वान् विसर्पं विद्रधिं तथा ॥ ५४३ ॥
अपस्मारं ग्रहोन्मादान् सर्वार्शांसि त्वगामयान् ।
क्रमेण शीलितो हन्ति वृक्षमिन्द्राशनिर्यथा ॥ ५४४ ॥
पौष्टिकं बल्यमायुष्यं पुत्रप्रसवकारणम् ।
चतुर्मुखेन देवेन कृष्णात्रेयाय सूचितम् ॥ ५४५ ॥

इति चतुर्मुखरसः ॥

इति श्रीसौराष्ट्रदेशोद्भवसारस्वतकुलावतंसोपाध्यायमाधवविरचितायुर्वेद-प्रकाशे सूतसाधनाध्यायः प्रथमः समाप्तः ॥ १ ॥

(पाच्यांत) सोनें व चांदी निदान आठव्या हिश्शाइतकी जिरवावी आणि क्रमाक्रमानें अधिक अधिक, याप्रमाणें सहापट गन्धकहि जिरवावा. नंतर खालीं अग्नि आणि वर पाणी या प्रकारची यंत्र-योजना करून आंच द्या,(आणि) हे बुद्धिमन्तांनों, सर्व प्रकारची लोकोत्तर सिद्धि प्राप्त करून घ्या (५३८) "आठव्या हिश्शाइतकें" असें म्हटलें आहे तें केवळ उपलक्षण आहे. वास्तविक जास्त म्हणजे शंभर पटीपर्यंत देखील सोनें–चांदी जिरवावी.

चतुर्मुख रस

पारा, गन्धक, लोह, आणि पाच्याच्या चौथ्या हिश्याइतकें सोनें हे जिन्नस समभाग घेऊन सर्वांचा कोरफडीच्या अंगरसांत खल करावा आणि गोळी करून ती एरण्डाच्या पानांत गुंडाळून तीन दिवसपर्यंत धान्याच्या राशींत पुरून ठेवावी. मग काढून ती मात्रा पाहिजे त्या रोगावर द्यावी. हें रसायन उत्कृष्ट ऊसून तें तूप, मध व त्रिफळ्याचा काढा यांत शक्तिप्रमाणें द्यावें, म्हणजे म्हातारपण, सुरकुत्या, पांढरे केस वगैरे विकार नष्ट होतात. तसेंच, अकरा प्रकारचे क्षय, पांच प्रकारचा खोकला, १८ प्रकारचीं कुष्ठें, पांडुरोग, प्रमेह, शूळ श्वास इत्यादि भयंकर रोग आणि अग्निमांद्य, उचकी, आम्लपित्त वगैरे (बारीक सारीक रोग) व सर्व प्रकारचे व्रण, कंबर धरणें, इसब, आंतील तोंडाचीं गळवें, अपस्मार, उन्माद, मूळव्याध, त्वग्रोग अशा शेंकडों व्याधींनां ही मात्रा नियमानें घेतली असतां वीज जशी झाडांना उफळून टाकते त्याप्रमाणें समूळ नाहीसें करते. ह्या रसायनानें शरीर पुष्ट होऊन बळ व आयुष्य वाढतें, संतति होते. असा हा चतुर्मुख रस खुद्द ब्रह्मदेवानें कृष्णात्रेयाला सांगितला आहे. (५४५)

याप्रमाणें आयुर्वेद प्रकाशाचा पहिला अध्याय समाप्त.

अध्याय दुसरा.

अथ द्वितीयोऽध्यायः ।

अथोपरसाः कथ्यन्ते ।

गन्धो हिङ्गुलमभ्रतालकशिलाः स्रोतोञ्जनं टङ्कणं
गु
राजावर्तकचुम्बकौ च स्फाटिका शंखः खटी गैरिकम् ।
कासीस रसकं कपर्दसिकताबोलाश्च कुङ्कुष्ठकं
सौराष्ट्री च मता अमी उपरसाः सूतस्य किंचिद्गुणैः ॥
तुल्याः स्युर्यदि ते विशोध्य विधिना संसाधिताः सेविता-
स्तत्तद्रोगहरानुपानसहितैर्योगैश्चिरायुःप्रदाः ॥ १ ॥

आतां उपरस कोणते तें सांगतों.

गंधक, हिंगूळ, अभ्रक, हरताळ, मनशीळ, सुरमा , टांकण-खार, राजावर्त, लोहचुंबक, स्फटिक, शंख, खडु (चुनखडी), काव, हिराकस, कलखापरी, कवडी, वाळु, बोळ कंकुष्ठ आणि सौराष्ट्री म्हणजे काठेवाडी माती ह्यांना उपरस म्हणतात. पाऱ्यापेक्षां यांचा गुण किंचित कमी आहे. पण योग्य क्रियेनें ते शुद्ध करून त्याचें भस्म केलें तर पाऱ्याइतकेच ते गुणावह होतात. अर्थात योग्य अनुपानासहित दिले म्हणजे तेहि रोगाचा नाश करतात आणि इतर औषधांशीं संयोग करून दिल्यास दीर्घायुष्य प्राप्त करून देतात.(१)

पार्वत्युवाच ।—

अथादौ गन्धकोत्पात्तिं प्रकारं शोधनस्य च ।
नामलक्षणसंयुक्तं वक्तुमर्हसि शङ्कर ॥ २ ॥

ईश्वर उवाच ।—

श्वेतद्वीपे पुरा देव्यास्तीरे क्षीरपयोनिधेः ।
क्रीडन्त्याः सखिभिः सार्धमभवन् प्रसृतं रजः ॥ ३ ॥
बहुलं तद्रजोऽतीव सुगन्धि सुमनोहरम् ।
दूकूलं रजसा युक्तं स्नातायाः क्षीरसागरे ॥ ४ ॥
धौतं यत् सखिभिस्तत्र तज्जातं गन्धकं रजः ।
क्षीराब्धिमथने चैतदमृतेन सहोत्थितम् ॥ ५ ॥
निजगन्धेन तान् सर्वान् हर्षयन् देवदानवान् ।
ततो देवगणैरुक्तं गन्धकाख्यो भवत्वयम् ॥ ६ ॥
रसस्य बन्धनार्थाय जारणाय भवत्वयम् ।
ये गुणाः पारदे प्रोक्तास्ते चैवात्र भवन्त्विति ॥ ७ ॥
इत्ययं गन्धको नाम विख्यातः क्षितिमण्डले ।
बालिना सेवितः पुर्वं प्रभूतबलहेतवे ॥ ८ ॥
वासुकिं कर्षतस्तस्य तन्मुखज्वालया द्रुता ।
वसा गन्धकगन्धाढ्या सर्वतो निःसृता तनोः ॥ ९ ॥
गन्धकत्वं च संप्राप्ता तस्माद्बालिवसा स्मृता ।

(हें ऐकून पार्वती म्हणते कीं), शंकरा, गन्धकाची उत्पात्ति आणि त्याचीं निरनिराळीं नांवें, लक्षणें आणि त्याचे शोधनप्रकार हे प्रथम सांगा. (२)

तेव्हां शंकर सांगतातः—पार्वती, पूर्वी क्षीरसमुद्रांतील "श्वेत-द्वीप" बेटांत तूं सख्यांसह क्रीडा करीत असतां तुझें आर्तव चोहींकडे सांडलें. तें आर्तव अत्यंत मनोहर व विपुल असून त्याचा अतिशय सुगध सुटला होता. अशा स्थितींत क्षीरसमुद्रांत तूं स्नान केलेंस त्या मुळें तुझें लुगडें रजानें भरलेलें होतें तें तुझ्या सख्यांनीं तेथेंच धुतलें. त्या रजापासून गन्धक उत्पन्न झाला; आणि क्षीरसमुद्र मन्थन केला त्यावेळीं अमृताबरोबर गन्धकही बाहेर आलें व आपल्या सुगधानें त्यानें देव आणि राक्षस ह्या दोघांनाहि आनंदित केलें, तें पाहून देव म्हणाले कीं, ज्या पदार्थाचा असा सुन्गध सुटला आहे त्याला आम्ही गन्धक हें नांव देतों. हा गन्धक पाऱ्यांत जिरून पाऱ्याचें बन्धन करील, आणि जे जे गुण पाऱ्यांत असतील ते ते या गन्धकामध्येंहि उत्पन्न होतील. तेव्हांपासून हा पदार्थ गन्धक या नांवानें प्रसिद्ध झाला. आपल्याला अतिशय बळ प्राप्त व्हावें म्हणून पूर्वी बळींनें औषध म्हणून गन्धकाचें सेवन केलें. त्या कारणानें गन्धकाला बली असेंहि नांव पडलें व जेव्हां वासुकी सर्पाचा दोर करून (देव व दानव) समुद्र घुसळूं लागले, तेव्हां त्याच्या विषारी ज्वालेनें त्या सर्पाच्या अंगांतील चरबी पातळ होऊन जिकडे तिकडे सांडली. त्या चरबीला देखील गन्धकाचाच वास येत होता, व तिचेंच पुढें गन्धकांत रूपांतर झालें, म्हणून गन्धकाला बलिवसा म्हणजे 'बलिची चरबी' असेंहि म्हणूं लागले. (९)

अथ गन्धकनामानि ।

गन्धको गान्धिकश्चापि गन्धपाषाण इत्यपि ।
सौगान्धिकश्च संप्रोक्तो बालिर्बालिवसाऽपि च ॥ १० ॥

अथ गन्धकस्वरूपम् ।

चतुर्धा गंधकः प्रोक्तो रक्तः पीतः सितोऽसितः ।
रक्तो हेमक्रियासूक्तः शुकतुण्डनिभो वरः ॥ ११ ॥
पीतश्चामलसाराख्यः श्रेष्ठो रसरसायने ।
श्वेताऽत्र खटिका प्रोक्ता लेपने लोहमारणे ।
दुर्लभः कृष्णवर्णश्च स जरामृत्युनाशनः ॥ १२ ॥

लेपने व्रणादिलेपने ॥

गन्धकाचीं नांवें.

गन्धक, गन्धिक, गन्धपाषाण, सौगन्धिक, बलि, बलिवसा हीं गन्धकांचीं नांवें आहेत.

स्वरूप.

गन्धक तांबडा, पिंवळा, पांढरा आणि काळा असा चार प्रकारचा आहे. तांबडया गंधकाचा उपयोग किमयेंत करावा. त्याचा रंग पोपटाच्या चोंचीप्रमाणें लाल असतो दुसरा पिवळा; त्याला अमलसार म्हणतात. त्याचा उपयोग पारद भस्म व रसायन करण्याच्या कामीं होतो. पांढरा गंधक म्हणून म्हणतात तो आणि खडु हे एकच. लेप देण्याला आणि लोह भस्म करण्याला हा उपयोगी पडतो(११). लेप म्हणजे जखम व व्रण यांना लावावयाचा लेप असें समजावें. काळा गंधक हा दुर्मिळ असतो. तो सेवन केला असतां जरा आणि मृत्यु हे दूर होतात. (१२)

अथ शुद्धगन्धकगुणाः कथ्यन्ते—

गन्धाश्मा ऽतिरसायनः समधुरो ह्युष्णो विपाधो कटुः
कण्डूकुष्ठाविसर्पदद्रुदलनः संदीपनः पाचनः।
आमोन्मोचनशोषणो विषहरः सूतेन्द्रवीर्यप्रदो
गौरीपुष्पभवस्तथा कृमिहरः सत्त्वात्मकः सूतजित्॥ १३ ॥

अन्यश्च—

गंधकः कटुकास्तिक्तो वीर्योष्णस्तुवरः सरः।
पित्तलः कटुकः पाके कण्डुवीसर्पजंतुजित्।
हंति कुष्ठं क्षयं प्लीहकफवातान् रसायनः॥ १४ ॥

अथ शोधितगंधकगुणाः | —

शुद्धो गन्धो हरेद्रोगान् कुष्ठमृत्युजरादिकान्।
अग्निकारी महानुष्णो वीर्यवृद्धिं करोति हि॥ १५ ॥

गन्धक हा खनिज असून उत्तम प्रकारचें रसायन आहे. तो सेवन केला असतां कंडु, कोड, विसर्प, गजकर्ण इत्यादि त्वचेचे रोग नष्ट करतो व क्षुद्दीपन करून अन्नाचें पचन करतो, आंतड्यांतील आम मोकळा करून त्याचें शोषण करतो आणि विषबाधा

नाहींशी करतो. गंधक हा पाऱ्याच्या अंगीं रोगहारक शक्ति आणतो. (सारांश काय कीं) पार्वतीच्या आर्तवापासून उत्पन्न झालेला गन्धक हा कृमिनाशक, सत्त्ववान् आणि पारा मूर्च्छित करणारा आहे.

एक ग्रंथकार म्हणतो:—

गन्धक हा तिखट, कडवट, उष्णवीर्य, किंचित् तुरट आणि अंगांत भिनणारा असा आहे. तो पित्तकर असून त्याचा विपाक (परिणाम) तीव्र असतो. तो कंडू, विसर्प आणि कृमि यांचा नाश करतो व तो रसायन असून प्लीहा, कफ आणि वात ह्यांचा धुव्वा उडावितो. (१४)

शुद्ध केलेल्या गंधकाचे गुण:—

शुद्ध गन्धक हा कुष्ठ, वार्धक्य, मृत्यू द्रव्यादि विकारांचा परिहार करतो. तो अग्नि प्रदीप्त करणारा,उष्ण आणि वीर्याची वृद्धि करणारा आहे. (१५)

अथाशोधितगन्धकदोषाः ।

अशुद्धगन्धः कुरुते च कुष्ठं तापं भ्रमं पित्तरुजं तथैव ।
रूपं सुखं वीर्यबलं निहन्ति तस्माद्विशुद्धो विनियोजनीयः ॥ १६

अथ गन्धकशोधनं कथ्यते ।
गन्धः सक्षीरभाण्डस्थो वस्त्रे कूर्मपुटाच्छुचिः ।
अथवा काञ्जिके तद्वत्सघृते शुद्धिमाप्नुयात् ॥ १७ ॥

शुद्ध न केलेल्या गंधकाचे दोष.

अशुद्ध गंधक सेवन केल्यास, कुष्ठ, दाह, भ्रम, पित्त हे व्याधि जडतात, व रूप, वीर्य आणि बल यांचा नाश होतो. म्हणून गन्धक शुद्ध केल्याशिवाय कधींहि सेवन करूं नये (१६).

गंधक शुध्द कसा करावा.

गंधक एका स्वच्छ वस्त्रावर ठेऊन दूध भरलेल्या भांड्यांत (गाळून) कच्छप यंत्रांत शिजवावा, म्हणजे शुद्ध होतो किंवा कांजति तूप घालून वरच्याप्रमाणें कृति करून उकळावा, म्हणजे शुद्ध होतो. (१७)

अथ शोधनयोग्यगन्धकलक्षणम्।

शुकपिच्छसमच्छायो नवनीतसमप्रभः।
मसृणः कठिनः स्निग्धः श्रेष्ठो गन्धक उच्यते ॥ १८ ॥

अथान्यमते शोधनम्।—

लोहपात्रे विनिक्षिप्य घृतमग्नौ प्रतापयेत्।
तप्ते घृते समानं तु क्षिपेद्गन्धकजं रजः ॥ १९ ॥
विद्रुतं गन्धकं ज्ञात्वा तनुवस्त्रे विनिक्षिपेत्।
यथा वस्त्राद्विनिःसृत्य दुग्धमध्येऽखिलः पतेत् ॥ २० ॥
शीतो निष्कासितो धौतो जलं वस्त्रेण शोषयेत्।
एवं नैर्मल्यमापन्नो गन्धकः शुद्ध उच्यते ॥ २१ ॥
एवं वारत्रयं शोध्यो भिन्ने दुग्धे प्रयत्नतः।
भक्षणार्थं हि भिषजा योगार्थं सकृदेव च ॥ २२ ॥

वस्त्रनिर्गालित शुद्धस्य प्रयोजनमाह वाग्भटः—

एवं संशोधितः सोऽयं पाषाणानम्बरे त्यजेत्।
घृते विषं तुषाकारं स्वयं पिण्डत्वमेति च ॥ २३ ॥

उत्तम गन्धकाची परीक्षा.

गंधक उत्तम प्रतीचा असला म्हणजे तो पोपटाच्या (पिवळट) पिसाच्याप्रमाणें दिसतो व लोण्याप्रमाणें चकाकतो. हाताला टणक परंतु गुळगुळीत लागतो आणि स्निग्ध म्हणजे तेलाप्रमाणें तुळ. तुळीत दिसतो. अशा प्रकारचा गन्धक श्रेष्ठ होय. (१८)

गन्धकशुद्धीचा आणखी प्रकार.

लोखंडी भांड्यांत तूप घालून तें कढवावें आणि सळसळूं लागल्यावर त्यांत तुपाइतकीच गन्धकाची पूड टाकावी. ती वितळल्यावर एका भांडचांत दूध घालून त्यावर स्वच्छ पातळ कपडा पसरून त्या कपडचांतून तें मिश्रण गाळावें, म्हणजे सर्व गंधक दुधांत गळेल. थंड झाल्यावर गंधक दुधापासून वेगळा पडेल, तो काढून स्वच्छ धुवावा आणि वस्त्रांत बांधून पाणी शोषून घेऊन कोरडा करावा. अशा रीतीनें गंधक निर्मळ केला म्हणजे शुद्ध झाला. याप्रमाणें नवीन नवीन दूध घेऊन हीच क्रिया तीन वेळ करावी. म्हणजे तो गंधक पोटांत देण्यायोग्य झाला. फक्त पाच्याची कज्जली करणें असेल तर ही क्रिया एक वेळ केली तरी पुरे. (२२)

वस्त्रांतून कशाकरितां गाळावा याविषयीं रसवाग्भटाचें मतः- गन्धक शुद्ध करते वेळेस तो गाळून घेतल्यानें त्यांतील खेड वगैरे कपड्यावरच रहातात, आणि त्यांतील विषाराचीं तुसें होऊन तीं तुपांत रहातात आणि निवळ गंधक निराळा पडून त्याची गोळी बनते. (२३)

अथास्य कूर्मपुटेन शोधनं विशदं यथा—
साज्यभाण्डे पयः क्षिप्त्वा मुखं वस्त्रेण बन्धयेत्।
गन्धकं पृष्ठदेशे तु श्लक्ष्णचूर्णितमर्पयेत् ॥
छादयेत्पृथुदीर्घेण खर्परेणैव गन्धकम् ॥ २४ ॥
सन्धिरोधः प्रकर्तव्यो भाण्खर्परयोर्मृदा।
भाण्डं निक्षिप्य भूगर्ते किंचिद्रक्षेद्बहिर्मुखम् ॥ २५ ॥
ज्वालयेत्खर्परस्योर्ध्वमाग्निं खलु वनोपलैः।
ततः क्षीरे द्रुतं गन्धं शीतं धौतं जलेन तु ॥ २६ ॥
निर्जलं वस्त्रघृष्टं तु शुद्धं योगेषु योजयेत्।

कच्छपयंत्रांत आंच देण्याचा प्रकार स्पष्ट करतोंः—

एका भांड्यांत तूप घालून त्यांतच दुध टाकावें व भांड्याच्या तोंडावर कपड्याचा दादरा बांधावा. नंतर गंधकाची पूड बारीक करून त्या कपड्यावर ओतावी आणि त्यावर एक परळ पालथा घालून भांडें व परळ यांच्या सांध्यावर मातीनें संधिलेप करावा. नंतर जमीनींत खळगा घेऊन त्यांत तें भांडें पुरावें; परंतु सर्व भांडें गाडलें जाईल असें करूं नये. त्याचा थोडा भाग जमीनीच्यावर राहील अशा रीतीनें पुरावें. मग त्या पालथ्या परळावर रानशेणी ठेऊन विस्तवाचें झगरें करावें, म्हणजे आंतील गंधक वितळून वस्त्रांतून दुधांत गळेल. भट्टी निवाल्यावर गंधक काढून पाण्यानें धुवावा व वस्त्रांत चोळून कोरडा करावा, म्हणजे शुद्ध झाला. मग त्याचा संयोग दुसऱ्या औषधाशीं करावा.(२६॥)

मतान्तरम्—
गन्धको द्रावितो भृङ्गरसे क्षिप्तो विशुध्यति।
समधैवं भक्षणार्थं योगार्थं सकृदेव तु ॥ २७ ॥

इति शुद्धो हि गन्धाश्मा नापथ्यैर्विकृतिं व्रजेत् ।
अपथ्यादन्यथा हन्यात्पीतं हालाहलं यथा ॥ २८ ॥

शुद्ध करण्याचा आणखी प्रकार.

गंधक वितळून तो माक्याचा रसांत ओतावा, म्हणजे शुद्ध होतो, व त्याचा पोटांत घेण्याकरितां उपयोग करणें असेल तर अशी क्रिया सात वेळ करावी. दुसऱ्या औषधाशीं त्याचा योग करणें असेल तर क्रिया एकच वेळ केली तरी बस होईल. शुद्ध गन्धक पोटांत दिला आणि कुपथ्य झालें तरी बाधा होणार नाहीं. परंतु अशुद्ध गंधक खाण्यांत येऊन जर कुपथ्य झालें तर हालाहल विष-प्राशन केल्याप्रमाणें तो प्राणनाशच करील. (२८)

अथ गन्धककल्पार्थं गन्धकगन्धनाशनप्रकारः—

विचूर्ण्य गन्धकं क्षीरे घनीभावावधिं पचेत् ।
सूर्यावर्तरसं चापि पुनर्दत्त्वा पचेच्छनैः ॥ २९ ॥
पश्चाच्च पातयेत् प्राज्ञो जले त्रैफलसंभवे ।
जहाति गन्धको गन्धं निजं नास्तीह संशयः ॥ ३० ॥
इत्थं विशुद्धास्त्रिफलाज्यभृङ्गमधुन्वितः शाणमितो हि लीढः ।
गृध्राक्षितुल्यं कुरुतेऽक्षियुग्मं करोति रोगोज्झितदीर्घमायुः ॥ ३१ ॥
अत्र पथ्यं तु दुग्धोदनम् । इति प्रथमो गन्धककल्पः ॥
शुद्धो गन्धो निष्कमात्रः सदुग्धः सेव्यो मासं शौर्यवीर्यप्रवृद्धयै ।
षण्मासात्स्यात्सर्वरोगप्रणाशो दिव्या दृष्टिर्दीर्घमायुःसुरूपम् ३२

इति द्वितीयो गन्धककल्पः

गन्धकाचा कल्प करण्यासाठीं त्याचा वास घालवावा लागतो त्याची क्रिया.

गन्धकाची पूड करून ती दुधांत उकळावी. इतकी कीं, तो गंधक पुनः घट्ट होईल. मग त्यांत सूर्यावर्ताचा (माक्याचा) रस घालून पुनः सावकाश शिजवावा, आणि नंतर काढून त्रिफळ्याच्या काढ्यांत टाकावा. असें केल्यानें गंधकाचा वास जाईल. याविषयीं संशय नको. (३०)

गंधक पोटांत घेण्याचें प्रमाण.

याप्रमाणें गन्धक शुद्ध करून तो त्रिफळा, तूप, मध व माक्याचा रस यांत एक शाणप्रमाण कालवून चाटावा, म्हणजे गिधाडाची नजर जशी तीव्र, त्याप्रमाणें नजर तीव्र होईल, सर्व रोग जातील आणि मनुष्य दीर्घायुषी होईल. पथ्य दूधभात खावा. हा एक गन्धककल्प झाला. (३१)

मांसलपणा, शौर्य, वीर्य ह्यांची वृद्धि व्हावी अशी इच्छा असेल तर शुद्ध गंधक रोज एक निष्कभार दुधांत महिनाभर घ्यावा, सहा महिनेपर्यंत घेतल्यास सर्व रोग नाश पावतील आणि मनुष्य दिव्यदृष्टि होऊन दीर्घायुषी व देखणा होईल (३२) हा दुसरा गन्धक कल्प.

अथ गन्धकतैलम्।--

आवर्त्यमाने पयासि दद्याद्गन्धकजं रजः।
तज्जातदधिजं सर्पिर्गन्धतैलं नियच्छति ॥ ३२ ॥
गन्धतैलं गलत्कुष्ठं हन्ति लेपाच्च भक्षणात्।
चूर्णीकृत्य पलानि पञ्च नितरां गन्धाश्मनो यत्नत-
स्तच्चूर्णं त्रिगुणे तु मार्कवरसे छायाविशुष्कीकृतम्।
यत्स्याच्चूर्णमथाभयामधुघृतं प्रत्येकमेषां पलं
वृद्धो यौवनमेति मासयुगलं खादन्नरः प्रत्यहम् ॥ ३३ ॥
इति तृतीये गन्धककल्प : ॥

गन्धकाचें तेल तयार करणें:—

दूध तापवून त्याला उकळी फुटली म्हणजे त्यांत गन्धकाची पूड टाकावी. मग तें दूध विरजून त्याचें दहीं करून लोणीं काढावें व तूप करावें. त्यांत गंधकाचें तेल उतरतें. (३२) गंधकाचें तेल सेवन केल्यानें किंवा आंगाला चोपडल्यानें महारोग नाहींसा होतो.

तिसरा गंधक कल्पः

(शुद्ध) गंधकाचे खडे वीस तोळे घेऊन त्याची मेहेनतीनें पूड करावी. ती पूड माक्याचा रस तिप्पट घेऊन त्यांत खलून मिश्रण सावलींत वाळवावें, म्हणजे त्याचें चूर्ण होतें. हिरडा, तूप व मध प्रत्येक चार चार तोळे घेऊन त्याच्याशीं तें चूर्ण खावें. असें सतत दोन महिने केल्यानें (वृद्ध) मनुष्य पुनः तरुण होतो. (३३)

यो गन्धाश्म विचूर्णितं पिबति ना तैलेन कर्षोन्मितं
नित्यं चोष्णजलावसेचनरतः काले यथा प्रत्यहम् ।
सप्ताहात्रितयान्निहन्ति सकलाः पामादिसर्वा रुजो
नित्याभ्यासवशाद्विनष्टसकलक्लेशोपतापः पुमान् ॥ ३४ ॥

इति चतुर्थो गन्धककल्पः ॥

चौथा गंधककल्प

जो मनुष्य गंधकाची पूड करून एक कर्षप्रमाण तेलाबरोबर रोज सेवन करतो आणि रोजच्याप्रमाणें वेळच्यावेळीं ऊन पाण्यानें स्नान करतो, त्याचे खरूज वगैरे त्वग्रोग एकच आठवड्यांत दूर होतात; आणि याप्रमाणें नित्य सेवन केल्यास सर्व शारीरिक क्लेश व ताप ह्यांचा परिहार होतो. (३४)

यो वाऽप्युग्रमतिः सूचूर्णितामिदं गन्धाश्म कृष्णासमं
पथ्यातुल्यमपि प्रपूजितगुरुर्भूतेशपूजारतः ।
आहारादिषु यंत्रणादिरहितः स्यात् पुष्टिवीर्याधिकः
प्रोत्फुल्लाम्बुजनेत्रयुग्मविलसच्चामीकराभासुरः ॥ ३५ ॥

इति पंचमो गन्धककल्पः ॥

पांचवा कल्पः

एखाद्या धसमुसळ्या मनुष्यानें देखील गुरू आणि श्रीशंकर यांची पूजा भक्तिभावानें करून, मग मिरें किंवा पिंपळी व हिरडे हे समभाग घेऊन त्यांच्याशीं शुद्ध गन्धकाचें बारीक चूर्ण सेवन केलें तर त्याच्या शरीराची पुष्टता व वीर्य इतकीं वाढतात कीं, त्यानें खाण्यपिण्यांत कांहींएक घरबंध न ठेवला तरी चालतें. इतकें होऊन शिवाय त्याचे नेत्र प्रफुल्ल नील कमलाप्रमाणें तेजस्वी होतात व अंगकांति सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान दिसते. (३५)

कलांशव्योषसंयुक्तं शुद्धगन्धं विचूर्णितम् ।
अरत्निमात्रवस्त्रे तद्विप्रकीर्य विवेष्टयेत् ॥ ३६ ॥
सूत्रेण वेष्टियित्वाऽथ यामं तैले निमज्जयेत् ।
घृत्वा संदंशतो वर्तिं मध्ये प्रज्वालयेच्च ताम् ॥ ३७ ॥
द्रुतो निपातितो गन्धो बिन्दुशः काचभाजने ।
तां द्रुतिं प्रक्षिपेत्पत्रे नागवल्ल्याश्च बिन्दुकाम् ॥ ३८ ॥

वल्लेन प्रमितं शुद्धं सूतेन्द्रं च विमर्दयेत् ।
अङ्गुल्या च सपत्रां तां द्रुतिं सूतं च भक्षयेत् ॥ ३९ ॥
करोति दीपनं तीव्रं क्षयं पाण्डुं च नाशयेत् ।
कासं श्वासं च शूलार्तिं ग्रहणीमपि दुर्धराम् ।
आमं विनाशयत्याशु लघुत्वं प्रकरोति च ॥ ४० ॥

इति षष्ठो गन्धककल्पः ॥

सहावा कल्प

शुद्ध गंधक एक भाग, सुंठ, मिरें, पिंपळी सोळावा हिस्सा, यांची पूड करून सर्व जिन्नस एकत्र करावे व एक वीतभर फडकें घेऊन त्यावर ती पूड पसरून फडक्याची वातीप्रमाणें वळकटी करावी आणि ती सुतानें गुंडाळून एक प्रहरपर्यंत तेलांत बुडवून ठेवावी. मग चिमट्यांत धरून ती वात दिव्यावर धरावी व पेटवावी, म्हणजे गंधक वितळून त्याचे थेंब गळूं लागतील, ते एका कांचेच्या भांड्यांत धरावे. त्यांपैकीं तीन थेंब विड्याच्या पानाला लावून त्यांत शुद्ध पारा एक वाल बोटानें चोळून लावावा आणि याप्रमाणें तो थेंब व पारा असें विड्यांत खावें, म्हणजे दीपन होऊन क्षय, पांडु-रोग, खोकला, श्वास, शूल, भयंकर संग्रहणी, आमांश अशा अनेक दुर्धर रोगांचा तात्काळ नायनाट होऊन शरीर चपळ होतें. ४०)

अन्यच्च—

शुद्धो बलिर्गोपयसा त्रिवारं ततश्चतुर्जातगुडूचिकाद्भिः ।
पथ्याक्षधात्र्यौषधभृङ्गनीरैर्भाव्योऽष्टवारं पृथगार्द्रकेण ॥ ४१ ॥
सद्धे सितां योजय तुल्यभागां रसायनं गन्धकसंज्ञितं स्यात् ।
धातुक्षयं मेहगणाग्निमान्द्यं शूलं तथा कोष्ठगतांश्च रोगान् ॥ ४२ ॥
कुष्ठान्यथाष्टादश रोगसंघान्निवारयत्येव च राजरोगम् ।
कर्षोन्मिते सेवित एते मर्त्यो वीर्यं च पुष्टिं बलमग्निदीप्तिम् ॥ ४३ ॥
वमनै रेचनैः पूर्वं देहशुद्धिं समाचरेत् ॥
जाङ्गलानि तु मांसानि छागलानि प्रयोजयेत् ॥ ४४ ॥
लवणाम्लानि शाकानि द्विदलानि तथैव च ।
स्त्रियश्चारोहणं यानं सदा चैतानि वर्जयेत् ॥ ४५ ॥

इति सप्तमः सर्वोत्तमो गन्धकरसायनकल्पः ॥

सातवा सर्वोत्तम कल्प.

शुद्ध गंधकाला गाईच्या दुधाच्या तीन वेळ भावना द्याव्या. मग चतुर्जाताचा काढा, गुळवेलीचा रस किंवा काढा, हिरडा, बेहडा आंवळकाठी, औषध, माक्याचा रस आणि आलें यांच्या आठ पृथक भावना द्याव्या, म्हणजे मात्रा सिद्ध होते. मग गंधकाइतकीच खडीसाखर घेऊन तिच्या अनुपानासह गंधकरसायन सेवन करावें, म्हणजे धातुक्षय मेद, अग्निमांद्य, शुल, कोठ्यांतील विकार, अठरा प्रकारचीं कुष्ठें इत्यादि भयंकर रोगाच्या समुदायाचा आणि त्याच-प्रमाणें कफक्षय वगैरेचा तो संहार करतो. एक कर्षप्रमाण मात्रा सेवन करीत गेल्यास वीर्य, पुष्टि, बळ ह्यांची वृद्धि होऊन अग्नि प्रदीप्त होतो. (४३.)

रसायन घेण्यापूर्वी वमन, विरेचन इ. पंचकर्मे करून देह शुद्ध करावा. पथ्य—जांगल मांस, छागल मांस हीं खावीं. खारट, आंबट भाज्या, द्विदळ व वातुळ धान्यें, स्त्रीसंग, ऊंच चढण चढणें किंवा भटक्या मारणें, हे प्रकार वर्ज करावे. (४५)

वातारितैलसंयुक्तस्त्रिफलाकौशिकेन तु ।
गन्धको रससंयुक्तो जराव्याधिविनाशनः ॥ ४६ ॥
मासमात्रप्रयोगेण शृणु वक्ष्यामि तद्गुणान् ।
अर्शो भगन्दरश्चैव तथा श्लेष्मसमुद्भवाः ॥ ४७ ॥
नश्यन्ति व्याधय सर्वे मासेनैकेन गन्धकात् ।
षण्मासस्य प्रयोगेण देवतुल्यो भवेन्नरः ॥ ४८ ॥
हंसवर्णाश्च ये केशा वलिश्चैव प्रलम्बिनी ।
चला दन्ता मन्ददृष्टिर्बलशुक्रादिसंक्षयः ॥ ४९ ॥
निर्जित्य यौवनं याति, भ्रमरा इव मूर्धजाः ।
दिव्यदृष्टिर्महाप्राणो वराह इव कर्णयोः ॥ ५० ॥
चक्षुषा तार्क्ष्यतुल्योऽसौ बलेन बलविक्रमः ।
दृढदन्तश्च वज्राङ्गो द्वितीय इव शङ्करः ।
तस्य मूत्रपुरीषेण शुल्बं भवति कांचनम् ॥ ५१ ॥

इत्यष्टमो गन्धककल्पः ॥

आठवा कल्प

वातारि तेल, त्रिफळा, व कौशिक (गुगुळ) यांच्यासह गंधक व पारा यांची योजना केली असतां वार्धक्य व रोग हे नष्ट होतात. हा प्रयोग एक महिनाभर केला असतां काय गुण येतो तो सांगतोः— मूळव्याध, भगंदर, कफरोग हे एक महिन्यांत नाश पावतात. प्रयोग सहा महिने चालूं ठेविला तर तो मनुष्य देवाप्रमाणें तेजःपुंज होतो. पांढरे केस, मोठमोठ्या सुरकुत्या, हालणारे दांत, मंददृष्टि, दुबळेपणा, वीर्यहानि हे सर्व उपद्रव दूर होऊन तारुण्य पुनः प्राप्त होतें. केंस भुंग्याप्रमाणें काळे होतात. दृष्टि दिव्य होते. मोठ्या बळकट डुकराचे कान जसे तिखट असतात तसे त्याचे कान तीक्ष्ण होतात. दृष्टि गरुडाप्रमाणें तीव्र होते. तो पुरुष बलशौर्यसंपन्न होतो. त्याचे दांत मजबूत आणि शरीर वज्राप्रमाणें बनून जाऊन तो दुसरा शंकरच कीं काय असें लोकांस वाटतें. त्याच्या विष्टामूत्रानें देखील तांब्याचें सुवर्ण होतें. (५१).

गन्धकस्य पलं चैकं रसस्यार्धपलं तथा ।
कुमारीरससंघृष्टं दिनैकं गोलकीकृतम् ॥ ५२ ॥
अन्धमूषाघृतं ध्मातं लेहयेन्मधुसर्पिषा ।
मासमात्रप्रयोगेण जरादारिद्र्यनाशनम् ॥ ५३ ॥

इति नवमो गन्धककल्पः ॥

नववा कल्प

गन्धक चार तोळे, पारा दोन तोळे हे कोरफडीच्या रसांत एकवीस दिवस खलून त्यांची गोळी करावी, मग ती अंधमुशींत घालून पुट द्यावें, म्हणजे मात्रा तयार होते ती तूप व मध यांच्याबरोबर खावी. याप्रमाणें औषध घेतलें असतां वार्धक्य आणि दारिद्र्य हीं नष्ट होतात. (५३)

त्रिफला गन्धकं भृङ्गं समभागानि कारयेत् ।
संवत्सरप्रयोगेण जीवेच्चन्द्रार्कतारकम् ॥ ५४ ॥

इति दशमो गन्धककल्पः ॥

दहावा कल्प

त्रिफळा, गन्धक आणि म्हाका हे समभाग घेऊन त्यांची मात्रा बनवावी. ती एक वर्षपर्यंत घेतल्यास तो मनुष्य यावच्चंद्र-दिवाकरौ जगेल. (५४)

गन्धकस्य पलं चैकं पिबेत्क्षीरेण संयुतम् ।
संवत्सरप्रयोगेण जीवेच्चन्द्रार्कतारकम् ।
अवध्यः सर्वभूतानां द्वितीय इव शङ्करः ॥ ५५ ॥
इत्येकादशो गन्धककल्पः ॥

अकरावा कल्प

गन्धक चार तोळे दुधाशीं सेवन करावा. याप्रमाणें औषध एक वर्षपर्यंत घेतल्यास तो मनुष्य यावतच्चंद्रदिवाकरौ जगेल. तो कोणाच्याहि हातून मरणार नाहीं आणि दुसरा शंकरच कीं काय असें लोकांस वाटेल. (५५)

अर्कक्षीरैः स्नुहीक्षीरैर्वस्त्रं लेप्यं तु सप्तधा ।
गन्धकं नवनीतेन पिष्ट्वा लिम्पेच्च वस्त्रके ॥ ५६ ॥
तद्वार्तिर्ज्वलिता देशघृता धार्या त्वधोमुखी ।
तैलं पतत्यधोभाण्डे ग्राह्यं योगेषु योजयेत् ॥ ५७ ॥
इति गन्धकतैलम् ॥

गंधकाचें तेल

रुईचा चीक व त्रिधारी निवडुंगाचा चीक यांचीं एका स्वच्छ कपडयाला सात पुटें द्यावीं, आणि गन्धक लोण्यांत खलून त्याचाहि त्या कपडयाला लेप करावा. नंतर त्या कपडयाची वाती-प्रमाणें वळकटी करावी आणि चिमटचात धरून पेटवून ती वात उलटी करावी, म्हणजे त्यांतून तेल गळूं लागेल तें त्याखालीं भांडें ठेऊन त्यांत धरावें आणि त्याची योग्य ठिकाणीं योजना करावी.५७

गन्धको मरिचैस्तुल्यः षड्गुणत्रिफलान्वितः ।
शाम्याकमूलजद्रावैर्मर्दितोऽखिलरोगहा ॥ ५८ ॥
इति द्वादशो गन्धककल्पः ॥

बारावा कल्पः

गंधक एक भाग, मिरें एक भाग, त्रिफळा सहा भाग यांचा बाहव्याच्या मुळयांच्या रसाशीं खल करावा, म्हणजे कल्प तयार झाला. वाटेल तो रोग झालेला असो, तो त्यानें नाश पावेल. (५८)

शम्याकमूलजद्रावैः संघृष्टो गन्धकोत्तमः ।
लिप्तो देहे ध्रुवं कण्डुकुष्ठपामादिनाशनः ॥ ५९ ॥
इति कण्डूत्यां त्रयोदशो गन्धककल्पः ॥

कल्प तेरावा

बाहव्याच्या मुळयांच्या आंगरसांत शुद्ध गन्धकाचा खल करावा आणि त्याचा लेप अंगाला करावा, म्हणजे खरूज, कोड वगैरे त्वग्रोग नाश पावतील. (५९)

द्विनिष्कप्रमितो गन्धः पीतस्तैलेन शोधितः ।
पश्चान्मारिचतैलाभ्यामपामार्गजलेन च ॥ ६० ॥
पेषयित्वा बालें सर्वदेहे लिप्त्वा प्रयत्नतः ।
धर्मे तिष्ठेत्ततो रोगी मध्यान्हे तक्रभक्तकम् ॥ ६१ ॥
अद्याद्रात्रौ तु सेवेत वान्हि प्रातः समुत्थितः ।
महिषीच्छगणैर्देहं संलिप्य स्नानमाचरेत् ।
शीतोदकेन पामादिकण्डूकुष्ठं प्रशाम्यति ॥ ६२ ॥
इति पामादौ चतुर्दशो गन्धककल्पः ॥

कल्प चौदावा

पिंवळा गन्धक दोन निप्क घेऊन तेलांत शुद्ध करावा. नंतर मिऱ्यें व तेल आणि आघाड्याचा कषाय यांत बारीक खलून तो लेप अंगाला व्यवस्थितपणें चोळून भर दुपारच्या उन्हांत उभें रहावें. ताकभात खावा, रात्रीं विस्तवाचा शेक घ्यावा आणि सकाळीं उठून म्हशीच्या शेणमुताचा खतारा आंगाला चोपडून थंड पाण्यानें करावें म्हणजे खरूज, इसब, कोड इत्यादि रोग पार नाहींसे होतात. (६२)

अथ हिंगुलस्य नामलक्षणगुणोत्पात्तिशोधनानि ।
हिंगुलं दरदं म्लेंछं हिंगुलश्चूर्णपारदम् ।
सुरंग रसगर्भं च बर्बरं रक्तमप्यथ ॥ ६३ ॥
दरदस्त्रिविधः प्रोक्तश्चर्मारः शुकतुण्डकः ।
हंसपादस्तृतीयः स्याद्गुणवानुत्तरोत्तरः ॥ ६४ ॥
चर्मारः शुकवर्णः स्यात्सपीतः शुकतुण्डकः ।
जपाकुसुमसंकाशो हंसपादो महोत्तमः ॥ ६५ ॥

हिंगुळाचीं नांवे, उत्पात्ति व शोधन सांगतों;

हिंगूळ, दरद, म्लेंछ, चूर्णपारद, सुरंग, रसगर्भ, बर्बर व रक्त हीं हिंगुळाचीं नांवें आहेत. त्यांपैकीं ज्याला दरद म्हणतात त्यांत चर्मार, शुकतुण्डक आणि हंसपाद असे तीन प्रकार आहेत. ते गुणानें एकापेक्षां एक अधिक असे आहेत. त्यांत चर्माराचा रंग पोपटी (अर्थात हिरवट) व शुकतुण्डाचा पिवळसर असतो; आणि हंसपाद हा सर्वांत उत्तम असून त्याचा रंग जास्वंदीप्रमाणें लाल असतो (६५).

गुणाः—

तिक्तं कषायं कटु हिंगुलं स्यान्नेत्रामयघ्नं कफपित्तहारि ॥
हल्लासकुष्ठज्वरकामलाश्च प्लीहामवातौ च गरं निहन्ति ॥६६

अथाशुद्धदरदस्य दोषाः—

अशुद्धो दरदः कुर्यादान्ध्यं क्षैण्यं क्लमं भ्रमम् ।
मोहं मेहं च संशोध्यस्तस्माद्वैद्यैस्तु हिंगुलः ॥ ६७ ॥

हिंगुळ हा कडवट, तुरट, तिखट, नेत्ररोगनाशक व पित्तकफहारक आहे. तो छातीची धडधड, कुष्ठ, ज्वर, कावीळ, पान्थरी, संधिवात, विषार इत्यादि विकारांचा नाश करतो (६६).

अशुद्ध हिंगुळ खाल्यानें डोळे आंधळे होतात, व क्षीणता, थकवा, चक्कर येणें हे व्याधि उद्भवतात; आणि मोह भेद हे रोग जडतात. म्हणून वैद्यांनीं हिंगुळ देणें तो शुद्ध करूनच द्यावा (६७).

अथ हिंगुलशोधनम् ।—

मेषीक्षीरेण हिंगूलमम्लवर्गैश्च भावयेत् ।
सप्तवारं प्रयत्नेन शुद्धिमायाति निश्चितम् ॥ ६८ ॥

वाग्भटः—

सप्तकृत्वाऽऽर्द्रकद्रावैर्लकुचस्याम्बुनाऽपि वा ।
शोषितो भावयित्वा च निर्दोषो जायते खलु ॥ ६९ ॥

हिंगुळाचें शोधन.

हिंगुळाला मेंढीचें दूध आणि आम्ल वर्गांतील औषधांचा रस यांची सात वेळां भावना हर प्रयत्नानें द्यावी, म्हणजे हिंगुळ शुद्ध होतो.

वाग्भट म्हणतात:—

हिंगुळ आल्याच्या रसांत किंवा लिंबाच्या रसांत खलून वाळवावा. याप्रमाणें त्याला सात भावना दिल्या म्हणजे तो निर्दोष होतो (६९).

अथ मारणम्—हिंगुलं तनुवस्त्रकन्चुकगतं कृत्वा, पटरञ्जनकन्दमध्यस्थं कृत्वा, मृदा संवेष्ट्य, पुटपाकविधानेन दशवनोपलैः पुटेत, एवं शतपुटानि; ततः शतपुटान्येवं वनवृन्ताकस्य, ततः शतपुटान्येवं मन्दारफलस्य ततः शतपुटान्येवामिन्द्रवारुणिकाफलस्य, ततः शतपुटान्येवमम्लवेतसफलस्य ततः सिद्धो जातश्चात्यरुणवर्णो भवति; राकिकैकामस्य पर्णखण्डेनं त्रिगन्धादिसुगन्धिद्रव्यैर्यथालाभं भक्षयेत्; द्विगुणाग्नेर्द्विगुणकामः कासश्वासक्षयज्वरादिनाशश्च ॥

तिक्तोष्णं हिंगुलं दिव्यं रसगन्धसमुद्भवम् ।
मेहकुष्ठहरं रुच्यं बल्यं मेधाग्निवर्धनम् ॥ ७० ॥

हिंगुळाचें मारण.

हिंगुळ एका पातळ कपडयांत पुरचुंडी करून बांधावा; आणि ती पुरचुंडी पटरंजनाचा (निळीचा?) कांदा कोरून त्यांत बसवून मातीनें लिपावें, व दहा रानशेणी लावून पुटपाकपद्धतीनें आंच द्यावी. याप्रमाणें शंभर पुटें द्यावीं. नंतर त्याचप्रमाणें शंभर पुटें रानवांग्यांचीं, शंभर पुटें मान्दाराच्या फळांचीं, शंभर पुटें इंद्रावणाचीं व शंभर पुटें आंबट वेलीच्या फळांचीं. (याप्रमाणें पांचशें पुटें) दिलीं म्हणजे त्याचें लाल रंगाचें भस्म तयार होतें. तें एक रतीभार विडयाच्या पानांत टाकून त्रिगन्ध इत्यादि सुगंधिक द्रव्यें घालून

तो विडा खावा. म्हणजे आहार दुप्पट होतो. कामेच्छा वाढते, खोकला, श्वास, क्षय, ताप हे नष्ट होतात.

हिंगुळ हा कडवट व उष्ण आहे. पारा आणि गन्धक यांच्या संयोगानें तो उत्पन्न होतो. त्यानें मेह व कुष्ठ हे रोग नष्ट होऊन अरोचक दूर होते, व बुद्धि, बल आणि क्षुधा वाढते (७०).

अथ हिंगुलोत्पत्तिः; सा च रसपद्धत्युक्ता लिख्यते—
अशुद्धपारदं भागं चतुर्भागं च गन्धकम्।
लोहपात्रे द्वयौ क्षिप्त्वा क्षणं मृद्वग्निना पचेत्॥ ७१॥
तस्मिन् मनःशिलाचूर्णं पारदाद्दशमांशकम्।
क्षिप्त्वा चाल्यमयोदर्व्या ह्यवतार्य सुशीतलम्॥ ७२॥
ततस्तु खण्डशः कृत्वा काचकूप्यां निरुध्य च।
वस्त्रमृत्तिकया सम्यक्काचकूपीं प्रलेपयेत्॥ ७३॥
सर्वतोऽङ्गुलमानेन छायाशुष्कां च कारयेत्।
वालुकायन्त्रगर्भे तु दिनं मृद्वग्निना पचेत्॥ ७४॥
क्रमवृद्धाग्निना पश्चात्पचेद्दिवसपञ्चकम्।
सप्ताहात्तु समुद्धृत्य हिंगुलः स्यान्मनोहरः ७५॥

हिंगुळ तयार करणें.

कसलाहि अशुद्ध पारा एक भाग, गंधक चार भाग असे एका लोखंडी भांडयांत एकत्र करून थोडा वेळ मंद आंच द्यावी (व चुलीवर असतांनांच) त्यांत मनशीळीची पुड पाऱ्याच्या दहाव्या हिश्शाइतकी टाकावी आणि लोखंडाच्या पळीनें ढवळावें. नंतर खालीं उतरून ठेऊन मिश्रण थंड होऊं द्यावें व त्याचे बारीक तुकडे करून ते एका कांचेच्या कुपींत घालून तिचें तोंड पक्कें बंद करावें आणि कुपीला चांगला एक बोट जाडीचा भक्कम मातकापडाचा लेप करावा आणि तो सावलींत वाळवावा. नंतर कुपी वालुकायंत्रांत ठेऊन अग्नि एक दिवस सौम्य द्यावा.दुसऱ्या दिवसापासून क्रमानें जास्त वाढवावा. अशा रीतीनें पांच दिवस आंच देऊन भट्टी निवूं द्यावी व सात दिवसांनीं कुपी काढून घ्यावी. फारच सुंदर असा हिंगूळ बनतो. (७५).

अन्यच्च—

ऊर्ध्वपातनयुक्त्या तु डमरूयन्त्रपाचितम् ।
हिंगुलं तस्य सूतं तु शुद्धमेव न शोधयेत् ॥ ७६ ॥
निम्बपत्ररसौर्निर्म्बूरसैर्वा याममात्रकम् ।
घृष्ट्वा दरदमूर्ध्वं तु पातयेत्सूतयुक्तिवत् ॥ ७७ ॥
तत्रोर्ध्वपिठरीलग्नं गृह्णीयाद्रसमुत्तमम् ।
शुद्धमेव हि तत्सूतं सर्वकर्मसु योजयेत् ॥ ७८ ॥
हिंगुलस्य शोधनमेव दृष्टं रसग्रन्थेषु, नान्यत् क्रियान्तर-
मिति दिक् ॥

हिंगुळांतून पारा काढण्याचा प्रकार.

उर्ध्वपातनपद्धतीनें डमरूयंत्रांत हिंगुळाला आंच देऊन त्यांतून पारा काढून घ्यावा. तो अगदीं शुद्ध असतो. त्याला पुनः शुद्ध करण्याची जरूर नाही. (परंतु प्रथम) तो हिंगुळ कागदी लिंबाच्या रसांत किंवा कडुलिंबाच्या पानांच्या रसांत एक प्रहर खलावा आणि नंतर उर्ध्वपातनपद्धतीनें आंच द्यावी, म्हणजे हिंगुळांतील उत्कृष्ट असा पारा यंत्राच्या वरील मडक्याच्या आंतील बाजूस चिकटून बसलेला आढळेल. तो काढून घ्यावा. तो शुद्धच असतो. म्हणून वाटेल त्या ठिकाणीं त्याचा उपयोग करावा. (७८)

ह्याप्रमाणें रसग्रंथांत हिंगुळाची शोधनक्रिया मात्र सांपडते, दुसरी कोणतीहि क्रिया आढळत नाहीं.

अथाभ्रकस्य नामभेदशोधनमारणसत्वपातनानि व्याख्यास्यामः ।

पुरा वधाय वृत्रस्य वज्रिणा वज्रमुद्धृतम् ।
विस्फुलिंगास्ततस्तस्य गगने परिसार्पिताः ॥ ७९ ॥
ते निपेतुर्घनध्वानाः शिखरेषु महीभृताम् ।
तेभ्य एव समुत्पन्नं तत्तद्गिरिषु चाभ्रकम् ॥ ८० ॥
तद्वज्रं वज्रजातत्वादभ्रमभ्ररवोद्भवात् ।
गगनात्पतितं यस्माद्गगनं च ततो मतम् ॥ ८१ ॥

अभ्रक—क्रिया.

उत्पत्तिः पूर्व युगांत वृत्तासुराला मारण्याकरितां इन्द्रानें वज्र उगारलें त्याच्या ठिणग्या आकाशांत चोहोंकडे उडाल्या. मेघांच्या

गडगटाप्रमाणें त्यांचा आवाज होत होत त्या पर्वतांच्य[1] शिखरावर पडल्या व त्यांच्यापासून अभ्रक बनला. तो अभ्रक ज्या ज्या ठिकाणीं ठिणग्या पडल्या त्या त्या पर्वतांत सांपडतो. (८०)

वज्रापासून उत्पन्न झाल्या कारणानें अभ्रकाला वज्र असें नांव पडलें. अभ्र म्हणजे मेघ, त्यांच्या गडगटापासून उत्पन्न झाल्यामुळें त्याला अभ्रक म्हणूं लागले, आणि आकाशांतून पडल्याच्या योगानें त्याला गगन हें नांव मिळालें.

ब्रह्मक्षत्रियाविटशूद्रभेदात्तत्स्याच्चतुर्विधम् ।
क्रमेणैव सितं रक्तं पीतं कृष्णं च वर्णतः ॥ ८२ ॥
प्रशस्यने सितं तारे रक्तं तत्तु रसायने ।
पीतं हेमनि कृष्णं तु गदेषु द्युतयेऽपि च ॥ ८३ ॥
पिनाकं दर्दुरं नागं वज्रं चेति चतुर्विधम् ।
कृष्णाभ्रं कथितं प्राज्ञैस्तेषां लक्षणमुच्यते ॥ ८४ ॥

मनुष्यांत जसे ब्राह्मण, क्षात्रिय, वैश्य व शूद्र, त्याचप्रमाणें अभ्रकांत देखील पांढरा, तांबडा, पिंवळा आणि काळा असे चार वर्ण म्हणजे प्रकार आहेत. पांढरा अभ्रक चांदी बनविण्याच्या कामीं उपयोगी पडतो. तांबडा रसायनांत वापरतात. पिंवळा किमया करण्यांत आणि काळा रोगनाशक औषधांत व (पाऱ्यामध्यें) विद्रुत करण्याकरतांहि वापरतात. काळा अभ्रक, पिनाक, दुर्दर, नाग, आणि वज्र अशा चार प्रकारचा असतो. (८३॥)

मुञ्चत्यग्नौ विनिक्षिप्तं पिनाक दलसंचयम् ।
अज्ञानाद्भक्षणं तस्य महाकुष्ठप्रदायकम् ॥ ८५ ॥
दर्दुरं त्वग्निनिक्षिप्तं कुरुते दर्दुरध्वनिम् ।
गोलाकान् बहुशः कृत्वा तत्स्यान्मृत्युप्रदायकम् ॥ ८६ ॥
नागं तु नागवद्वन्हौ फुत्कारं परिमुञ्चति ।
तद्भक्षितमवश्यं तु विदधाति भगन्दरम् ॥ ८७ ॥
वज्रं तु वज्रवत्तिष्ठेन्न चाग्नौ विकृतिं व्रजेत् ।
सर्वाभ्रेषु वरं वज्रं व्याधिवार्धक्यमृत्युजित् ॥ ८८ ॥

आतां त्याचीं लक्षणें लिहितों. पिनाक अग्नीवर टाकला असतां त्याचे कळपे उडतात. हा अभ्रक अज्ञानानें खाण्यांत आला तर रक्तपिती उठते. दर्दुर अभ्रक अग्नीवर टाकला तर त्यांतून बेडकाच्या ओरडण्याप्रमाणें आवाज निघतो, आणि त्याच्या पुष्कळशा गोळ्या बनतात. हा अभ्रक खाण्यांत आल्यास मनुष्य मरतो. नागाभ्रक अग्नीवर टाकला तर सर्पाप्रमाणें फुस्कारे निघतात. हा पोटांत गेल्यानें खात्रीनें भगंदर रोग होतो. शेवटचा वज्राभ्रक म्हणजे काळा दगड्या अभ्रक हा अग्नीवर टाकला तरी त्यांत कांहीं एक फरक नाहीं. जशाचा तसाच राहतो. म्हणून औषधांत वज्राभ्रकच वापरावा. तो म्हातारपण, मृत्यु आणि रोग यांचा समूळ नाश करणारा असा आहे. (८८)

अन्यत्रापि—

यदञ्जनाभं क्षिप्तं न वन्हौ विकृतिं व्रजेत्।
वज्रसंज्ञं हि तद्योग्यमभ्रं सर्वत्र नेतरत् ॥ ८९ ॥
अभ्रमुत्तरशैलोत्थं बहुसत्वं गुणोत्तरम्।
दाक्षिणाद्रिभवं स्वल्पसत्वमल्पगुणोत्तरम् ॥ ९० ॥

अभ्रग्रहणे विशेषः—

अभ्रं गृहीतं खनितो भिषग्भिः संखन्य सम्यक् पुरुषप्रमाणम्।
तदूभारवत्सत्त्वफलप्रदं स्यादूगुणाधिकं स्वल्पगुणं ततोऽन्यत् ॥९१

अथ वज्राभ्रकगुणाः—

अभ्रं कषायं मधुरं सुशीतमायुष्करं धातुविवर्धनं च।
हन्यात्त्रिदोषव्रणमेहकुष्ठप्लीहोदरग्रन्थिविषकृमींश्च ॥९२॥
रोगान् हन्ति दृढयति वपुर्वीर्यवृद्धिं विधत्ते
तारुण्याढ्यं रमयति शतं योषितां नित्यमेव।
दीर्घायुष्यान् जनयति सुतान् विक्रमैः सिंहतुल्या-
न्मृत्योर्भीतिं हरति सततं सेव्यमानं मृताभ्रम् ॥ ९३ ॥

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं,

जो अभ्रक काजळाप्रमाणें काळा असून अग्नीवर टाकला असतांहि त्याला कांहीं एक भंग होत नाहीं, त्याला वज्राभ्रक म्हणतात. तो औषधांकरितां घ्यावा. बाकीचे अभ्रक घेऊं नयेत. उत्तरेकडील

पर्वतावर जो अभ्रक सांपडतो तो गुणांनीं उत्तम असतो, आणि दक्षिणेकडील पर्वतावर सांपडतो त्यांत सत्व थोडें असून तें गुणांनींहि कमी असतें. (९०)

कोणता अभ्रक विशेष ग्राह्य त्याविषयीं:—

खाणींत एक पुरुषभर खोल खणल्यावर जो अभ्रक सांपडतो तोच वैद्यांनीं घ्यावा. तो जड असून त्यांत सत्व जास्त असतें आणि त्याचा गुणहि फार चांगला येतो. ह्याशिवाय इतर अभ्रक गुणानें कमी प्रतीचा समजावा. (९१)

दगड्या अभ्रकाचे गुण:—

हा अभ्रक तुरट, मधुर, थंड, आयुष्य व वीर्य यांची वृद्धि करणारा आहे. तो घेतला असतां त्रिदोष, व्रण, मेह, कुष्ठ, पानथरी, उदरांतील व इतर ठिकाणच्या गाठी, विषें, कृमि इत्यादि पुष्कळ रोगांचा नाश होतो. शरीर मजबूत होऊन वीर्य वृद्धिंगत होते आणि तारुण्यानें मुसमुसणाऱ्या शेकडों स्त्रियांची कामना तृप्त करण्याची ताकद येते.(अभ्रक भक्षण करणाऱ्या पुरुषाचे) पुत्र देखील दीर्घायुषी व सिंहाप्रमाणें पराक्रमी निपजतात. त्याला मृत्यूची बिशाद वाटेनाशी होते. पण हे सर्व लाभ जो अभ्रकभस्म नित्य सेवन करतो त्यालाच होतात. (९३)

अथाशुद्धस्य मारणे दोषमाह—

पीडां विधत्ते विविधां नराणां कुष्ठं क्षयं पांडुगदं च शोफम्।
हृत्पार्श्वपीडां च करोत्यशुद्धमभ्रं हि तद्वद्गुरु वान्हिहृत्स्यात् ९४

अथ मृताभ्रस्यापि लक्षणगुणदोषानाह—

निश्चन्द्रकं सुसूक्ष्मं च लोचनाञ्जनसंनिभम्।
तदा तु मृतमित्युक्तमभ्रकं नान्यथा मृतम् ॥ ९५ ॥

अन्यच्च—

मृतं निश्चंद्रतां यातमरुणं चामृतोपमम्।
सचन्द्रं विषवज्ज्ञेयं मृत्युकृद्व्याघ्ररोमवत् ॥ ९६ ॥
व्याघ्रश्मश्रुरोम यद्वन्मारयति तद्वादित्यर्थः ॥

अशुद्ध अभ्रकभस्माचे दोषः—

अशुद्ध अभ्रकाचें भस्म सेवन केल्यास कुष्ठ, क्षय, पांडुरोग, सूज, छातींत व बरगड्यांत कळा मारणें वगैरे नाना प्रकारचे व्याधि जडतात व जठराग्नि जरी मूळचा तीव्र असला तरी ती तीव्रता अगदीं नाहींशी होते. (९४)

अभ्रकभस्माची परीक्षा व गुणदोषः—

जें अभ्रकभस्म निश्चंद्र, अगदीं बारीक आणि डोळ्यांत घालावयाच्या काजळाप्रमाणें काळें असतें तें मृताभ्रक म्हणून समजावें.एरवीं तें खरें नव्हे. कधीं कधीं अभ्रकभस्म निश्चंद्र असूनाहि लाल रंगाचें असतें. तेंसुद्धां अमृताप्रमाणें गुणदायक आहे. परंतु तें जर निश्चंद्र नसेल तर * वाघाच्या मिशीचा केंस जसा घातक होतो तसेंच तें प्राणघातक होतें. (९६)

ज्यांत चकाकी अगदीं नसते त्याला निश्चंद्र म्हणतात.

अस्य मारणे पुटसंख्यामाह—

शतादिस्तु सहस्रान्तः पुटो देयो रसायने ।
दशादिस्तु शतान्तः स्याद्व्याधिनाशनकर्मणि ॥ ९७ ॥
सहस्रपुटपक्षे तु भावना पुटनं भवेत् ।
मर्दनं तु तथा न स्यादिति प्राचां हि संमतम् ॥ ९८ ॥

भस्म करण्याला किती पुटें दिलीं पाहिजेत त्याविषयीः—

शंभरांपासून हजारांपर्यंत जितकीं पुटें देता येतील तितकीं द्यावीं, म्हणजे अभ्रकाचें रसायन बनतें.परंतु नुसतें रोगहारक औषध म्हणूनच जर अभ्रक घेणें असेल तर दहापासून शंभरांपर्यंत पुटें दिलीं तरी पुरीं होतात. हजार पुटें द्यावयाचीं म्हणजे भावना द्यावयाच्या. नुसता खल करणें म्हणजे पुट देणें नव्हे हें सर्व प्राचीन ग्रंथकारांना मान्य आहे. (९८)

अथास्यानुपानं मात्राप्रमितिश्च—

वेल्लव्योषसमन्वितं घृतयुतं वल्लोन्मितं सेवितं
दिव्याभ्रं क्षयपाण्डुरुग्ग्रहाणिकाशूलं च कुष्ठामयम् ।

---

* वाघाच्या मिशीचा केस पोटांत गेल्यास मृत्यु येतो असें म्हणतात.

ऊर्ध्वश्वासगदं प्रमेहमरुचिं कासामयं दुर्धरं
मन्दाग्निं जठरव्यथां विजयते योगैरशेषामयान् ॥ ९९ ॥
इति रसवाग्भटात् ॥

अभ्रकाचें अनुपान व घेण्याचें प्रमाणः—याविषयीं रसवाग्भट म्हणतातः—

त्रिकटुचें चूर्ण एकवाल घेऊन त्यांत तूप टाकावें; व त्यांत वालभर अभ्रकभस्म कालवून सेवन केल्यास क्षय, पांडुरोग, संग्रहणी, शूल, कुष्ठ, श्वास (धाप), प्रमेह, अरोचक, भयंकर खोकला, अग्निमांद्य, पोटदुखी हे सर्व रोग नाहींसे होतात; आणि दुसऱ्या औषधाशीं संयोग करून दिल्यानें तर यच्चावत रोगांचा नायनाट होतो. (९९).

अथ शोधनम्—

वज्राभ्रकं धमेद्वन्हौ ततः क्षीरे विनिक्षिपेत् ।
सप्तधा भिन्नपत्रं तत्तण्डुलीयाम्लयोर्द्रवैः ॥ १०० ॥
भावयेदष्टयामं तदेवं शुध्यति चाभ्रकम् ।

मतान्तरम्—

वज्राभ्रं वान्हिसंतप्तं निक्षिप्तं सप्तसप्तधा ॥ १०१ ॥
गोदुग्धे त्रिफलाक्काथे कांजिके सुरभीजले ।
मलतः शुद्धिमायाति प्राक्षिप्तं वा त्रिधा त्रिधा ॥ १०२ ॥

रसमंजर्याम्—

अथवा बदरीक्काथे धमातमभ्रं विनिक्षिपेत् ।
मर्दितं पाणिनां शुष्कं धान्याभ्रादातीरिच्यते ॥ १०३ ॥

अभ्रकाची शुद्धि.

काळा दगडी अभ्रक घेऊन त्याला भट्टींत आंच द्यावी आणि दुधांत बुडवावा. याप्रमाणें सात वेळां आंच दिली म्हणजे त्याचे पापुद्रे मोकळे होतात. नंतर त्याला तांदुळजा आणि आम्ल-वर्ग यांच्या रसांत पृथक् पृथक् भावना द्यावी, म्हणजे अभ्रक शुद्ध झाला. (१००).

दुसरा प्रकार.

काळा दगडी अभ्रक भट्टींत भाजून गाईच्या दुधांत सात वेळ, त्रिफळ्याच्या काढ्यांत सात वेळ, कांजींत सात वेळ, आणि

सुरभीच्या काढ्यांत सात वेळ बुडवून काढला म्हणजे त्याचा मळ जाऊन शुद्ध होतो. सात वेळ बुचकळण्याचें न जमल्यास तीन तीन वेळ बुचकळून काढलें तरी चालेल. (१०२).

रसमंजराकार म्हणतात:—

अभ्रकाला भट्टींत आंच देऊन बोरीच्या काढ्यांत बुडवावा आणि नंतर हातावर चोळ चोळून कोरडा करावा; म्हणजे तो धान्याभ्रकापेक्षांहि सरस होतो. (१०३)

अथैवं शुद्धस्य धान्ययोगेन सूक्ष्मीकरणं, तस्य धान्याभ्रकमिति संज्ञा, तत्प्रकारो यथा—

पादांशशालिसंयुक्तमभ्रं बध्वाऽथ कम्बले ।
त्रिरात्रं स्थापयेन्नीरे क्लिन्नं वै मर्दयेत्करैः ॥ १०४ ॥
तन्नीर एव यत्नेन यावत्सर्वं स्रवेत्ततः ।
कम्बलाद्गलितं सूक्ष्म वालुकासदृशं च यत् ।
तद्धान्याभ्रकमित्युक्तं मारणं चाप्यथो भवेत् ॥ १०५ ॥

अत्र नीरं तु कांजिकमेव; यत उक्तं वार्तिककृता—

चूर्णाभ्रं शालिसंयुक्तं वस्त्रबद्धं हि कांजिके ।
निर्यातं मर्दनाद्यत्तद्धान्याभ्रामिति कथ्यते ॥ १०६ ॥

याप्रमाणें अभ्रक शुद्ध केल्यावर त्याचें धान्यसंयोगानें बारीक चूर्ण करावयाचें. याला धान्याभ्रकक्रिया म्हणतात, ती अशी:—

अभ्रक चार भाग, व साळीचें भात एक भाग एकत्र करून त्यांची पुरचुंडी बांधून ती पाण्यांत तीन रात्रींपर्यंत भिजत ठेवावी. भिजल्यावर त्याच पाण्यांत ती पुरचुंडी कुसकरावी आणि कांबळ्यांतून अभ्रक गळून बाहेर येईल असें करावें. याप्रमाणें कांबळ्याबाटे बाहेर आलेलें अभ्रक वाळूच्या कणाप्रमाणें बारीक होतें, त्याला धान्यभ्रक म्हणतात. नंतर त्याचें भस्म करावें. (१०५).

वर " पाणी " म्हणून लिहिलें आहे तींहि कांजीच होय. यासंबंधानें वार्तिककार म्हणतात:—

अभ्रकाची पूड व साळी एकत्र करून वस्त्राच्या पुरचुंडींत बांधून कांजींत बुडवून ठेवावी. नंतर तो पुरचुंडी चुरडल्यानें जें अभ्रक कांजींत उतरतें त्याला धान्याभ्रक म्हणतात. (१०६).

अथैवं संस्कृतस्य मारणमुच्यते—
धान्याभ्रकस्य भागैकं द्वौ भागौ शुद्धटङ्कणात् ।
पिष्ट्वा तदन्धमूषायां रुद्ध्वा तीव्राग्निना पचेत् ।
स्वभावशीतलं चूर्णं सर्वयोगेषु योजयेत् ॥ १०७ ॥
इत्येकपुटि ॥

मृत्पात्रे तु समावर्त्य समटङ्कणमभ्रकम् ।
ढालयेत्पयसि क्षिप्रं पिष्टं निश्चन्द्रतां वज्रेत् ॥ १०८ ॥
इत्येकपुटि ॥

याप्रमाणें अभ्रकाला संस्कार देऊन मग त्याचें भस्म करावें. तें असें:

धान्याभ्रक एक भाग, शुद्ध टांकणखार दोनभाग यांची एकत्र पूड करून ती मुशींत घालावी व तोंड बंद करून भट्टींत कडक आंच द्यावी. आपोआप थंड झाल्यावर त्याचा सर्व योगांत उपयोग करावा. (१०७).

यास एकपुटी अभ्रक म्हणतात.

एकपुटीचा दुसरा प्रकार:—

शुद्ध अभ्रक व तितकाच टांकणखार यांची पूड करून ती एका खापरांत ठेवून चांगली आंच द्यावी व देतांना एकसारखें ढवळावें. नंतर दुधांत बुडवून त्याचें पीठ करावें, म्हणजे तात्काळ अभ्रक निश्चंद्र होतो. (१०८).

धान्याभ्रकं समादाय शोषयित्वा तु मर्दयेत् ।
अर्कक्षीरैर्दिनं मर्द्यमर्कमूलद्रवेण वा ॥ १०९ ॥
चक्राकारं ततः कृत्वा शोषयेदातपेन तु ।
वेष्टयेदर्कपत्रैश्च सम्यग्गजपुटे पचेत् ॥ ११० ॥
पुनर्मर्द्यं पुनः पाच्यं सप्तवारं प्रयत्नतः ।
ततो वटजटाक्काथैस्तद्भद्देयं पुटत्रयम् ॥ १११ ॥
म्रियते नात्र संदेहः सर्वरोगेषु योजयेत् ॥
इति दशपुटि ॥

अथ वाग्भटः—

धान्याभ्रं कासमर्दस्य रसेन परिमार्दितम् ॥ ११२ ॥
पुटितं दशवारेण म्रियते नात्र संशयः ।
तद्वन्मुस्तारसेनापि तण्डुलीयरसेन च ॥ ११३ ॥
इति दशपुटि ॥

दशपुटी अभ्रकक्रियाः—

धान्याभ्रक घेऊन तो कोरडा करावा. नंतर रुईच्या चिकांत एक दिवस व रुईच्या मुळीच्या रसांत एक दिवस याप्रमाणें त्याचा खल करावा मग त्याची वाटोळी दामटी करून ती उन्हांत वाळवावी व वाळल्यावर रुईच्याच पानांत गुंडाळून गजपुट द्यावें. निवाल्यावर काढून वरच्याप्रमाणें पुनः खल करून पुनः गजपुट द्यावें. याप्रमाणें सात पुटें द्यावीं. नंतर वडाच्या पारंब्याच्या काढयांत खल करून पूर्वीप्रमाणेंच तीन वेळां (गज) पुटें द्यावीं. याप्रमाणें दहा पुटें बसलीं म्हणजे अभ्रक मृत होतो, याविषयीं संशय नको. भस्माचा वाटेल त्या रोगावर उपयोग करावा. ही दशपुटी अभ्रकक्रिया झाली.

वाग्भटाच्या मतानुसार दशपुटी क्रिया आहे ती अशीः—

धान्याभ्रक घेऊन तो कासविंद्याच्या पाल्याच्या रसांत खलावा व नंतर पुट द्यावें. याप्रमाणें दहा पुटें दिलीं असतां अभ्रकाचें भस्म होतें. नागरमोथ्याच्या रसांत व तांदुळज्याच्या रसांतहि खलून पुटें दिल्यास हरकत नाहीं. (११३)

धान्याभ्रकं समादाय मुस्ताक्काथैः पुटत्रयम् ।
तद्वत्पुनर्नवानीरैः कासमर्दरसैस्तथा ॥ ११४ ॥
कासमर्दः ' कसौंदी ' इति भाषा ॥
नागवल्लीदलैस्तद्वत्सूर्यक्षीरैः पुटत्रयम् ।
क्काथैर्वटजटोत्थैश्च त्रिः पुटेन्मुसलीजलैः ॥ ११५ ॥
त्रिर्गोक्षुरकषायेण त्रिः पुटेद्भानरीरसैः ।
मोचाकन्दरसैः पाच्यं त्रिवारं कोकिलाक्षजैः ॥ ११६ ॥
रसैः पुटेत्ततो लौध्रैः क्षीरादेकं पुटं मुहुः ।
दध्ना घृतेन मधुना स्वच्छया सितया तथा ॥ ११७ ॥

एकमेकं पुटं दद्यादभ्रस्यैवं मृतिर्भवेत् ।
सर्वरोगहरं व्योम जायते योगवाहकम् ॥ ११८ ॥
कामिनीमद्दर्पघ्नं शस्तं पुंस्त्वोपघातिनाम् ।
वृष्यमायुष्करं शुक्रवृद्धिसंतानकारकम् ॥ ११९ ॥
इत्येकचत्वारिंशत्पुटि ॥

एकेचाळीस पुटी अभ्रकक्रिया.

धान्याभ्रकाला नागरमोथ्याच्या काढ्याची भावना देऊन पुटद्यावें. याप्रमाणें तीन पुटें ध्यावीं. नंतर पुनर्नवाचे काढ्यांत (खलून) तीन पुटें द्यावीं. नंतर कासविंद्याच्या रसांत तीन पुटें, नागवेलीच्या रसांत तीन, रुईच्या चिकांत तीन, वडाच्या पारंब्याच्या काढ्यांत तीन, मुसळीच्या काढ्यांत तीन, गोखरूंच्या काढ्यांत तीन, कुहिलीच्या रसांत तीन, केळीच्या कांद्यांच्या रसांत तीन, लोध्राच्या रसांत तीन, आणि दूध, दहीं, तूप, मध व स्वच्छ खडीसाखर यांच्यांशीं (खलून) एक एक पुट, याप्रमाणें एकेचाळीस पुटें दिली म्हणजे अभ्रक मरतो, आणि तो योगवाही होऊन सर्व रोगांचा परिहार करतो. स्त्रियांची कामेच्छा शमन करण्याचें सामर्थ्य त्या पुरुषाला येतें. पुरुषत्व नसलेल्या लोकांना तर हा अभ्रक घेण्यासफारच प्रशस्त आहे. त्यानें आयुष्य व वीर्य यांची वृद्धि होऊनसंतति होते. (११९) याप्रमाणें एकेचाळीस पुटी अभ्रकक्रियासांगितली.

दुग्धत्रयं कुमार्यम्बु गङ्गापुत्रं नृमूत्रकम् ।
वटशुङ्गमजारक्तमेभिरभ्रं सुमर्दितम् ।
शतधा पुटितं भस्म जायते पद्मरागवत् ॥ १२० ॥
दुग्धत्रयमिति वटदुग्धं, स्नुहीदुग्धं, अर्कदुग्धं च, गङ्गापुत्रं भद्रमुस्ता । इति शतपुटि ॥

श्रीगोविन्दपादास्तु अन्यान्येव गगनमारकाणि भेषजानि लिखन्ति; यथा—अर्कदुग्धं १, वटदुग्धं २, सेहुण्डदुग्धं ३, घृतकुमारी ४, पञ्चाङ्गुलमूलपत्राणि ५, काकमाची ६, मुस्ता ७, वटप्ररोहः ८, बस्तशोणितं ९, बिल्वमूलपत्राणि १०, अग्निमन्थः ११, टिण्टुकः १२, पाटली १३, श्रीपर्णी १४, शालिपर्णी १५, पृश्निपर्णी

१६, कंटकारी १७, कदम्बः १८, बृहती १९, गोक्षुरः २०, तिलपार्णी २१, खरमञ्जरी २२, गुडः २३, सिद्धार्थको धवलः २४, पाङ्क्या २५, मालती २६, गोमूत्रं २७, हरीतकी २८, धात्री २९, बिभीतकः ३०, तालीसपत्रं ३१, चित्रकमूलपत्रं ३२, जलकुम्भी ३३, तालमूली ३४, वृषः ३५, वाजिगन्धा ३६, अगस्त्यपत्रं ३७, भृङ्गराजः ३८, कदली कन्दरसः ३९, सप्तपर्णः ४०, देवदारू ४१, गुडूची ४२, धत्तूरः ४३, कासमर्दकः ४४, मातुलानी ४५, लोध्रः ४६, तुलसी ४७, दुर्वा ४८, मारीषः ४९, मूषकपर्णी ५०, दाडिमपल्लवाः ५१, घोण्टा ५२, शङ्खपुष्पी ५३, नागवल्ली ५४ पिण्डीतगरं ५५; श्वेतपुनर्नवा ५६ हिलमोचिका ५७; मण्डूकपर्णी ५८, तिक्तिका ५९, मदनः ६०, इत्यादिभिर्मर्दनपुटनैरेकैकेनाप्यभ्रको मारणीयः । इति अभ्रकमारणयिगणः । आभिर्यथालाभं सहस्रपुटा देयाः । यथासंख्यं च प्रत्येकं सप्तदशपुटाः प्रायशा भवन्ति । एवं सहस्रसंख्या पूर्यते । इति सहस्रपुटि ॥

शतपुटी अभ्रकक्रिया:--

तीन प्रकारचें दूध,कोरफडीचा रस, गंगापुत्र, नरमूत्र, वडाच्या फुलांच्या कळ्या व शेळीचें रक्त यांच्यांत अभ्रक चांगला खलून शंभर पुटें दिलीं असतां माणकाप्रमाणें लाल भस्म होतें. (१२०)

तीन प्रकारचें दुध म्हणजे वड, त्रिधारी निवडुंग आणि रुई यांचा चीक, गंगापुत्र म्हणजे नागरमोथे असें समजावें.

श्री गोविंदाचार्य पूज्यपाद यांनीं अभ्रकभस्म करण्याकरितां निराळींच साठ औषधें सांगितलीं आहेत, त्यांचीं नांवें:-

१ रुईचा चीक, २ वडाचा चीक, ३ निवडुंगाचा चीक, ४ कोरफडीचा बलक, ५ पंचांगुलमूल आणि पातें, ६ कावळी, ७ नागरमोथा, ८ वडाच्या पारंब्या, ९ बकऱ्याचें रक्त, १० बेलाचें मूळ आणि पानें, ११ शमी किंवा ऐरण, १२ टेंटू, १३ पाटली, १४ श्रीपर्णी, १५ सालवण, १६ पिठवण, १७ उटकटारी, १८ कळंब, १९ रिंगणी, २० गोखरू, २१ तिळवण, २२ आघाडा, २३ गूळ, २४ पांढरी मोहरी, २५ पाक्क्या(पालक) २६ मालती, २७ गोमूत्र, २८ हिरडा, २९ आवळकाठी, ३० बेहेडा, ३१ तालीस, ३२ चित्रकमूळ

व पानें,३३ जलकुम्भी,३४ताडमूळ,३५ भुइकोहोळा, ३६ आस्कंद, ३७ अगस्त्याचीं पानें, ३८ म्हाका, ३९ केळीच्या कांद्याचा रस, ४० सातवण, ४१ देवदार, ४२ गुळवेल, ४३ धोतरा, ४४ कासविंदा, ४५ महाळुंग, ४६ लोध्र, ४७ तुळस, ४८ दूर्वा, ४९ माठ, ५० उंदिरकानी, ५१ डाळिंबीचीं पानें, ५२ घोण्टा, ५३ शंखाहुली, ५४ नागवेल, ५५ मोठा तगर, ५६ पांढरी पुनर्नवा, ५७ हिल्लमोचिका, ५८ दिंडा, ५९ गुळवेल किंवा कुटकी, आणि ६० गेळफळ.

याप्रमाणें एकेक वस्तू घेऊन तिच्याशीं अभ्रक खलून पुट द्यावें. जितकीं औषधें मिळतील तितक्यांचीं पुटें द्यावीं. प्रत्येक औषधाचीं बहुशः सतरा पुटें दिलीं म्हणजे एकंदर पुटें १०२० होतात. अर्थात् हजार पुटांची संख्या पुरी होते. याप्रमाणें सहस्रपुटीं अभ्रक करावा.

अथारुणभस्मन आकांक्षा भवति चेत्तत्प्रकारो रसपद्धत्यां—

अथ नागबलाभद्रमुस्ताक्काथैर्वटस्य च ।
दुग्धैर्वटजटातोयैर्हरिद्रावारिणाऽपि च ॥ १२१ ॥
माञ्जिष्ठाक्काथतोयेन सर्वैरेभिर्यथाक्रमम् ।
पुटितं भावनायोगाच्चरमे पुटने मुहुः ।
जायते ह्यरुणं चाति भस्म वज्राभ्रकादृभवम् ॥ १२२ ॥

अभ्रकभस्माचा रंग लाल करण्याची क्रिया:—

रसपद्धतिकार म्हणतोः—

नागबला, नागरमोथा, वडाचा चीक, किंवा वडाच्या पारंब्याचा रस, (दारु) हळदीचा काढा, मंजिष्ठाचा काढा, याप्रमाणें प्रत्येक वनस्पतीच्या काढ्याची किंवा रसाची भावना देऊन पुट द्यावें. शेवटचें पुट दिलें म्हणजे काळ्या अभ्रकाचें तांबडें लाल भस्म होतें. (१२२)

अथैवं मृतस्याभ्रकस्यामृतीकरणाख्यः संस्कार उक्तः ।
अरुणभस्मनस्तु पुनरमृतीकरणेन गुणवृद्धिर्वर्णहानिश्च भवति ।
तद्यथा--

त्रिफलोत्थकषायस्य पलान्यादय षोडश ।
गोघृतस्य पलान्यष्टौ मृताभ्रस्य पलान् दश ॥ १२३ ॥
ऐकध्यं लोहपात्रे तु पाचयेन्मृदुवान्हिना ।
द्रवे जीर्णे समादाय सर्वरोगेषु योजयेत् ॥ १२४ ॥

अथान्यत्रापि—

वराम्बु गोघृतं चाभ्रं कलाषड्दिक्समांशकम् ।
मृद्वग्निना पचेल्लौह्याममृतीकरणे त्विदम् ॥ १२५ ॥

गोघृतेनैवामृतीकरणमुक्तं. तद्यथा--

तुल्यं घृतं मृताभ्रेण लोहपात्रे विपाचयेत् ॥
घृते जीर्णे ततश्चूर्णं सर्वकार्येषु योजयेत् ॥ १२६ ॥

इत्यमृतीकरणम् ॥

अमृतीकरण.

अभ्रक मारल्यावर त्याला अमर करण्याची एक क्रिया आहे. तांबड्या अभ्रक भस्माला ही क्रिया केली म्हणजे त्याचा लाल रंग जातो; परंतु गुण वाढतो. अमृती करणाची क्रिया सांगतोः—

त्रिफळ्याचा काढा चौसष्ठ तोळे, गाईचें तूप बत्तीस तोळे, मृताभ्रक चाळीस तोळे असें लोखंडाच्या भांड्यांत एकत्र करून मंदाग्नि देऊन आंच द्यावी. सर्व पाणी अभ्रकांत जिरल्यावर काढून घेऊन कोणत्याहि रोगावर त्याची योजना करावी. (१२४)

दुसरा प्रकारः--

त्रिफळ्याचा काढा १६ भाग, गाईचें तूप ६ भाग आणि अभ्रक दहा भाग घेऊन लोखंडाच्या कढईत एकत्र करून हलका जाळ लावून आंच द्यावी. म्हणजे अभ्रक अमर होतो. (१२५)

केवळ गाईच्या तुपानें सुद्धां अमृतीकरण होतें, त्याची क्रिया अशीः—

गाईचें तूप व अभ्रकभस्म समभाग घेऊन एका लोखंडी कढईत टाकून आंच देऊन तूप जिरवावें व नंतर तें अभ्रक पाहिजे त्या कामीं उपयोगांत आणावें. (१२६)

अथाभ्रकसेविनां वर्ज्यपदार्थाः कथ्यन्ते—

क्षाराम्लविदलं कोलं कर्कटी कारवेल्लकम् ।
वृन्ताकं च करीरं च तैलं चाभ्रे विवर्जयेत् ॥ १२७ ॥

अभ्रक सेवन करणारास वर्ज पदार्थ.

खारट, आंबट, द्विदल धान्यें, कोल, कांकडी, कारलें, वांगें, करीर आणि तेल हे पदार्थ अभ्रक सेवन करणारानें वर्ज करावे.१२७)

अथाभ्रकसत्वनिष्कासनाविधिः कथ्यते ।—

चूर्णीकृतं गगनपत्रामथारनाले
धृत्वा दिनैकमवशोष्य च सूरणस्य ।
भाव्यं रसैस्तदनु मूलरसैः कदल्याः
पादांशटङ्कणयुतं शफरैः समेतम् ॥ १२८ ॥
पिण्डीकृतं तु बहुधा महिषीमलेन
संशोष्य कोष्ठगतमाशु धमेद्धट्टाग्नौ ।
सत्त्वं पतत्यतिरसायनजारणार्थं
योग्यं भवेत्सकललोहगुणाधिकं च ॥ १२९ ॥

एवं पतिते सत्वे ततः किं कार्यं तदाह—

कणशो यद्भवेत्सत्त्वं मूषायां प्रणिधाय तत् ।
मित्रपञ्चकयुग्धमातमेकीभवति घोषवत् ॥ १३० ॥
घृतमधुगुग्गुलुगुञ्जाटङ्कणमतत्तु मित्रपञ्चकं नाम ।
मेलयति सप्तधातुनङ्गाराग्नौ तु ध्मानेन ॥ १३१ ॥

अभ्रकसत्व करण्याचा प्रकार.

अभ्रकाच्या पापुद्र्याचें चूर्ण करून आरनालांत खल करावा व एक दिवसभर त्यांतच भिजत ठेऊन वाळवावें. नंतर त्यास चौथा भाग टाकणखार व *शफर घालून सुरणाचा रस, त्यानंतर मुळ्याचा रस व केळीचा रस यांच्या पृथक् भावना द्याव्या, आणि ' पुष्कळ गोळ्या करून ' म्हशीच्या कोरड्या शेणानें वाळवून " कोठ्यांत " ठेऊन भट्टींत घालून कडक आंच द्यावी. म्हणजे सत्व निघेल तें रसायनांत जिरविण्यास योग्य होतें व सर्व धातूंच्या भस्मापेक्षां गुणानेंहि अधिक असतें. (१२९)

सत्व निघाल्यावर काय करावें.

याप्रमाणें कणाकणानें सत्व पडल्यावर ' मित्रपंचकासह ' तें मुशींत ठेऊन आंच द्यावी, म्हणजे त्याचा एक गठ्ठा होतो.

---

* टीप—हा एक जातीचा मासा आहे.

तूप, मध, गुग्गुळ, गुंजा व टांकणखार यांच्या चूर्णाला मित्रपंचक असें म्हणतात. या मित्रपंचकाशीं धातू एकत्र करून कोळशांची कडक आंच दिली असतां कोणताहि धातु दुसऱ्या धातूंत मिसळून जातो (१३१)

अथास्य सत्वस्य शोधनमारणमाह—
अयोवच्छोधनं तस्य मारणं तद्वदेव तु ।
यद्वा—मारितं ताम्रवद्गन्धपारदाभ्यां नियोजयेत् ॥ १३२ ॥
पिण्डीकृतं तु बहुधेत्यस्य व्याख्या-तिन्दुकप्रमाणान्
बहुपिण्डान् गोलकान् कृत्वेत्यर्थः । कोष्ठगतामिति व्याख्या-
अधःपातनकोष्ठ्यां स्थापितम् । मारणं तद्वदेव तु व्याख्या-
त्रिफलादिभिर्लोहवद्भावयित्वा विंशतिवारं षष्टिवारं । शतवारं
वा पुटयित्वा सत्वभस्म संपाद्यं भक्षणार्थं, रसे जारणार्थं तु
शोधयित्वा जार्यम् ॥

सत्वाची शुद्धि आणि मारण.

अभ्रकाच्या सत्वाचें शोधन आणि मारण "लोहा" प्रमाणें करावें, किंवा ताम्राप्रमाणें भस्म करून गन्धक व पारा यांचा त्याच्याशीं संयोग करावा. (१३२)

वर "पुप्कळ गोळ्या" कराव्या म्हणून सांगितलें आहे, त्या गोळ्या टेंभुरणीच्या बियाएवढ्या कराव्या. "कोठ्यांत" म्हणजे अधःपातनपद्धतीच्या यंत्रांत अभ्रक ठेवावें."लोहाप्रमाणें" भस्म करावें. याचा अर्थ हा आहे कीं, लोहाला त्रिफळ्याच्या भावना देतात, त्याप्रमाणें अभ्रकाला भावना देऊन वीस,साठ,अगर शंभर वेळां भट्टींत पुटें देऊन सत्व काढावें आणि मग तें पोटांत घ्यावें. नुसतें अभ्रक जिरविणें असेल तर अभ्रक शुद्ध करून मग त्याचें जारण करावें.

अथास्य गुणाः--
शिशिरं सत्त्वमभ्रस्य त्रिदोषघ्नं रसायनम् ।
विशेषात्पुंस्त्वकारि स्याद्वयसः स्तम्भनं परम् ॥ १३३ ॥
नानेन सदृशं किंचिद्भैषज्यं पुंस्त्वकृत्परम् ।
सत्त्वसेवी वयःस्तम्भं लभते नात्र संशयः ॥ १३४ ॥

अथान्यच्च--

सर्वेषामुपपूर्वाणां रसानां सत्त्वमारणम् ।
कर्तव्यं भस्मसूतेन गन्धकेनाग्निगर्भके ॥ १३५ ॥
यत्रोपरसभागोऽस्ति रसे तत्सत्त्वयोजनं ।
कर्तव्यं तु गुणाधिक्याद्रसज्ञत्वमभीप्सता ॥ १३६ ॥

अभ्रकसत्त्वाचे गुण

अभ्रकसत्व थंड, त्रिदोषनाशक व रसायन आहे; व विशेषेंकरून पुरुषत्व आणण्याची त्यांत शक्ति आहे. त्यानें तारुण्य येतें व वीर्यस्तंभन होतें. (१३३)

पुरुषत्व येण्यास यासारखें दुसरें औषधच नाहीं. अभ्रकसत्व सेवन करणाराचें वीर्य स्तंभन होतें यांत खरोखरच कांहीं संशय नाहीं. (१३४)

आणखी एका ग्रंथकाराचें मत

अभ्रक वगैरे जे जे उपरस आहेत त्यांच्या सत्वांचें मारण पारदभस्मानें गंधकाच्या योगानें महाज्योतिष्मति नांवाच्या वनस्पतींत करावें. जितकें म्हणून उपरस आहेत त्यांचें सत्व पाऱ्यांत सहापटीपेक्षांहि जिरवितां आलें पाहिजे. ज्याला रसशास्त्रज्ञ म्हणवून घेणें असेल त्याला तर ही क्रिया आलीच पाहिजे. (१३५)

अथ सामान्यतः सर्वेषां सत्वपातनमुच्यते--

गुडः पूरस्तथा लाक्षा पिण्याकं टङ्कणं तथा ।
ऊर्णा सर्जरसश्चैव क्षुद्रमीनाः समांशकम् ॥ १३७ ॥
सत्वपातनवर्गेण संयुक्तं खल्वमध्यके ।
एतत्सर्वं तु संचूर्ण्य छागदुग्धेन पिण्डकाः ॥ १३८ ॥
कृत्वा ध्माताः खरांगारैः सत्वं मुंचन्ति निश्चितम् ।
पाषाणमृत्तिकादीनां लोहानां च पृथक्पृथक् ।
अन्येषामप्यसाध्यानां व्योमसत्त्वस्य का कथा ॥ १३९ ॥

उपरसाचें सत्व काढण्याचा सामान्य प्रकार

ज्या उपरसाचें सत्व काढावयाचें त्याची पूड करून ती गूळ, लाख, पिण्याक (पेंड , टाकणखार, लोंकर, राळ व क्षुद्रमीन हे सर्व समभाग घेऊन एकत्र मिसळावें. नंतर सत्व काढणारीं औषधें

त्यांत टाकून सर्वांचा एकत्र खल करून बारीक चूर्ण करावें व त्यांत मेंढीचें दूध घालून त्याच्या गोळ्या कराव्या व त्यांना कोळशाचे भट्टींत टाकून त्यांची कडक आंच द्यावी. म्हणजे दगड, माती यांच्या-सारखे पदार्थ व लोखंडासारखे अति कठिण धातु यांचेंहि सत्व निघतें. मग अभ्रकाची कथा काय ? (१३९)

अथ सत्वप्रसंगाद्द्रुतयोऽपि लिख्यन्ते, अत्र केचिद्वदन्ति—

द्रुतयो नैव जायन्ते शास्त्रे प्रोक्ता अपि ध्रुवम् ।
विना शम्भोः प्रसादेन न सिद्धयन्ति कदाचन ॥ १४० ॥

इत्येवमस्तु, तथाऽपि शास्त्ररूढत्वात्कदाचिद्भाग्ययोगाच्छङ्करभक्त्या सिद्धयन्ति, अतो मयाऽत्र लिख्यन्ते; यथा—

अगस्त्यपत्रनिर्यासैर्मर्दितं धान्यकाभ्रकम् ।
सूरणोदरमध्ये तु निक्षिप्तं लेपितं मृदा ॥ १४१ ॥
गोष्ठभूमौ खनित्वा तु हस्तमात्रे हि पूरितम् ।
मासान्निष्कासितं तत्तु जायते पारदोपमम् ॥ १४२ ॥

इत्यभ्रकद्रुतिः ॥

निजरसभावितसुरदालीचूर्णमात्रवापेन ।
द्रवति, पुनः सस्थानं भजते गगनं न कालेऽपि ॥ १४३ ॥

इत्यभ्रकद्रुतिः ॥

निजरसशतपरिभावितकंचुकिकन्दोत्थचूर्णपरिवापात् ।
द्रुतमास्तेऽभ्रकसत्वं तथैव सर्वाणि लोहानि ॥ १४४ ॥

इत्यभ्रकसत्वद्रुतिः सर्वलोहद्रुतिश्च ॥

अथानेकद्रुतिमेलनमाह—

कृष्णागरुणा मिलितै रसोनासितरामठैरिमा द्रुतयः ।
सोष्णे मिलन्ति घृष्टाः स्त्रीकुसुमपलाशबीजरसैः ॥ १४५ ॥

अथ मुक्तफलानां द्रुतिं तथाऽन्येषामपि रत्नानां द्रुतिप्रकारमाह-

मुक्तफलानि सप्ताहं वेतसाम्लेन भावयेत् ।
जम्बीरोदरमध्ये तु धान्यराशौ निधापयेत् ॥ १४६ ॥
पुटपाकेन तच्चूर्णं द्रवते सलिलं यथा ।
कुरुते योगराजोऽयं रत्नानां द्रावणं प्रिये ॥ १४७ ॥

इति मुक्तादिरत्नद्रुतयः ॥

अगस्त्यपुष्पनिर्यासैर्मर्दितं सूरणोदरे ।
गोष्ठभूस्थं घनं मासं जायते जलसंनिभम् ॥ १४८ ॥

इत्यपि धान्याभ्रकद्रुतिः द्रुतानां प्रयोजनं तु रसेन्द्रे जारणार्थ-मुपयुज्यन्त इति ज्ञेयम्।

आतां सत्वक्रिया सांगण्याच्या प्रसंगानें द्रुतिक्रियाहि सांगतों. ह्यासंबंधानें कांहीं ग्रंथकार म्हणतात कीं:--

शास्त्रांत द्रुतिक्रिया वर्णन केली आहे, तरी आमची खात्री आहे कीं, ती द्रुति करणारासहि साधत नाहीं. ती साधण्यास शंकराची कृपाच पाहिजे. त्याच्या कृपेवांचून ती कधींहि साध्य होणार नाहीं. (१४०)

असें लिहिलें आहे खरें; परंतु शास्त्रांत क्रिया लिहिली आहे व शंकरकृपेनें दैववशात् कोणाला साधलीच तर साधून जाईल, म्हणून तो प्रकार येथें लिहितों:--

आगस्त्याच्या पाल्याच्या रसांत धान्याभ्रक खलावा; नंतर सुरणाच्या कांद्यांत तो अभ्रक ठेऊन वर मातीचा लेप करावा, आणि गुरांचे गोठ्यांत एक हातभर खळगा खणून त्यांत कंद पुरून ठेवावा व एक महिन्यानंतर काढावा,म्हणजे अभ्रक पाऱ्याप्रमाणें (पातळ) होतो. (१४२)

दुसरा प्रकार:—

देवडांगरीच्या पाल्याच्या रसाच्या पुष्कळ भावना दिल्या-नंतर डांगरीच्या चूर्णाच्या पुटानें अभ्रक पातळ होतो, तो पुनः कधींहि घट्ट होत नाहीं. (१४३)

अभ्रकसत्वाची द्रुति, व सर्व धातूंची द्रुति.

कंचुकिकंदाच्या रसाच्या शंभर भावना दिल्यावर तिच्याच चूर्णाच्या पुटानें अभ्रकसत्व तावडतोब पातळ होतें आणि त्याच-प्रमाणें क्रिया केल्यास सर्व धातु पातळ होतात (१४४)

अनेक जातींचे विद्रुत पदार्थ एकत्र मिसळणें:--

कृष्णागरूचा गाभा, लसूण, पांढरा हिंग, स्त्रियांचें रज,पळसाचें बीं व रस हे कढत करून त्यांच्याशीं अनेक प्रकारच्या द्रुतींचा खल केला असतां त्या एकत्र होतात. (१४५)

आतां मोतीं व रत्नें यांची द्रुतिक्रिया सांगतोः –

मोत्यांना आंबटवेलीच्या रसाच्या भावना सात दिवस द्याव्या आणि मग तीं मोत्यें ईडलिंबाच्या आंत खुपसून ठेवून धान्याच्या राशींत पुरून ठेवावीं. नंतर पुटपाक करावा, म्हणजे तें चूर्ण पाण्याप्रमाणें पातळ होतें. हे पार्वती, हा क्रियायोग रत्नांना देखील पातळ करूं शकतो. (१४७)

अभ्रकद्रुतीचा आणखी प्रकारः—

आगस्त्याच्या फुलांच्या रसांत धान्याभ्रक खलून तो सुरणाच्या कंदांत खोचून ठेवावा, आणि गोठ्यांत खळगा खणून एक महिनाभर पुरून ठेवावें. महिन्यानें अभ्रक पाण्याप्रमाणें पातळ होतो. (१४८)

यापमाणें धान्याभ्रकाची द्रुतिक्रिया सांगितली. द्रुतींचा उपयोग पाऱ्यांत ते ते पदार्थ जिरविण्याच्या क्रियेंत करावयाचा असतो.

अथाभ्रकस्य महाप्रयोगानाह—

लक्ष्मीविलासकाभ्रं तु शृङ्गराभ्रकमेव च।
सम्यङ्गारितामित्यादि नित्यनाथोदिताभ्रकम् ॥ १४९ ॥
एते महाप्रयोगाश्च वीर्यस्तम्भाधिकारके ।
लिखितास्ते मया नेह पुनरुक्त्या प्रकीर्तिताः ॥ १५० ॥

अन्यच्च —

निश्चन्द्रमभ्रकं भस्म धात्रीव्याप्तेविडङ्गकम्।
भृङ्गाम्बुना जलैर्वाऽपि खल्वे मर्द्यं द्वियामकम् ॥ १५१ ॥
गुटिकां कारयेच्छ्लक्ष्णां छायाशुष्कां सुरक्षयेत् ।
एकैकां भक्षयेत्प्राज्ञो वर्षमेकं निरन्तरम् ॥ १५२ ॥
द्वितीये तु पुनर्वर्षे भक्षयेद्गुटिकाद्वयम् ।
एवं संवत्सरेणैव गुटिकैकां विवर्धयेत् ॥ १५३ ॥
त्रिवर्षस्य प्रयोगोऽयमभ्रकस्य प्रकीर्तितः ।
अनेन क्रमयोगेन व्योम्नःशतपलं नरः ।
अद्याद्भवेन्न संदेहो वज्रकायो महाबलः ।
मासत्रयेण रक्ताख्यं क्षयं श्वासं सुदारूणम् ॥ १५५ ॥
पंचकासांश्च हृच्छूलं ग्रहण्यर्शोगदांस्तथा ।
आमवातं तथा शोषं पांडुरोगं सुदारूणम् ॥ १५६ ॥

मृत्युकल्पं महाव्याधिं वातापित्तकफोद्भवम् ।
हन्त्यष्टादशकुष्ठानि नृणां पथ्याशिनां ध्रुवम् ॥ १५७ ॥
हन्त्यभ्रककल्पः ॥

आतां अभ्रकाच्या कित्येक महत्वाच्या योगांचीं नांवें सांगतों. लक्ष्मीविलासाभ्रक, शृंगाराभ्रक, सम्यङ्मारिताभ्रक इत्यादि अभ्रकयोग नित्यनाथांच्या ग्रंथांत आहेत. वीर्यस्तंभक प्रयोगामध्यें हे योग मीं सांगितले आहेत, म्हणून ते येथें पुनः लिहित नाहीं. (१५०)

दुसऱ्या एका ग्रंथकाराच्या मतें:--

निश्चंद्र असें अभ्रकभस्म घेऊन तें आवळकाठी, त्रिकटु व वावडिंग यांच्याशीं एकत्र करून माक्याच्या रसांत किंवा नुसत्या पाण्यांत दोन प्रहर खलावें. मग त्याच्या गोळ्या करून सावलींत वाळवाव्या, आणि एक वर्षभर नित्य एक एक गोळी खात जावी; दुसऱ्या वर्षीं रोज दोन गोळ्या घेत जाव्या. तिसऱ्या वर्षीं रोज तीन, याप्रमाणें प्रत्येक वर्षी एकेक गोळी वाढवावी. त्रैवार्षिक अभ्रक योग म्हणतात तो हाच. ह्या तीन वर्षांत चारशें तोळे अभ्रक पोटांत गेलें तर मनुष्य निःसंशय वज्रदेही बनतो. हें औषध फक्त तीन महिने जरी घेतलें तरी रक्तक्षय, भयंकर श्वास, पांच प्रकारचा खोकला, काळजांतिल कळ, संग्रहणी, मूळव्याध हे रोग, व संधिवात, शोष, खडतर असा पांडुरोग, वातपित्तकफ या दोषांपासून उत्पन्न होणाऱ्या मृत्युप्रमाणें भयंकर व्याधि, अठरा प्रकारचें कुष्ठ असे (शेंकडो) रोग हें औषध घेऊन पथ्य केल्यास खात्रीनें नाश पावतात. (१५७)

अथ हरितालस्य नामलक्षणगुणशोधनमारणानि वक्ष्यन्ते ।

हरितालं तु तालं स्यादालं तालकमित्यपि ।
हरितालं द्विधा प्रोक्तं पत्राख्यं पिण्डसंज्ञकम् ॥ १५८ ॥
तयोराद्यं गुणैः श्रेष्ठं ततो हीनगुणं परम् ।
स्वर्णवर्णं गुरु स्निग्धं सपत्रं चाभ्रपत्रवत् ॥ १५९ ॥
पत्राख्यं तालकं विद्याद्गुणाढ्यं तद्रसायनम् ।
निष्पत्रं पिण्डसंकाशं स्वल्पसत्त्वं तथा लघु ।
स्त्रीपुष्पहारकं स्वल्पगुणं तत् पिण्डतालकं ॥ १६० ॥

हरताळाचीं नांवें, लक्षण, शोधन व मारण.

हरताळ, ताल, आल, तालक हीं नांवें हरताळाचीं आहेत. हरताळ दोन प्रकारचा आहे. पत्री हरताळ आणि खडे हरताळ, त्यांपैकीं पत्री हरताळ हा गुणानें श्रेष्ठ व खडे हरताळ कमी प्रतीचा असतो हरताळ हा सोन्याप्रमाणें पिवळ्या रंगाचा, जड व गुळगुळीत असून त्याला अभ्रकाप्रमाणें पत्रे किंवा पदर असतात पत्री हरताळ इतका गुणावह आहे कीं, तो रसायनच आहे. खड्या हरताळाचे खडे असतात, त्यांत सत्व कमी असून तो वजनांत हलका असतो. व त्यानें स्त्रियांचा विटाळ बंद होतो. (१६०)

तालकगुणाः—

हरितालं कटु स्निग्धं कषायोष्णं हरेद्विषम्।
कण्डूकुष्ठादिरोगास्रकफपित्तकचव्रणान्॥ १६१ ॥

अथाशुद्धस्यासम्यङ्मारितस्य च दोषानाह--

हरति च हरितालं चारुतां देहजातां
सृजति च बहुतापानङ्गसंकोचपीडाः।
वितरति कफवातौ कुष्ठरोगं विदध्या-
दिदमाशितमशुद्धं मारितं वाऽप्यसम्यक्कम्॥ १६२ ॥
शोधितं हरितालं तु कान्तिवीर्यविवर्धनम्।
कुष्ठादिपापरोगघ्नं जरामृत्युहरं परम्॥ १६३ ॥
अशुद्धतालमायुर्घ्नं कफमारुतमेहकृत्।
तापस्फोटाङ्गसंकोचान् कुरुतेऽतो विशोधयेत्॥ १६४ ॥

अथ मृतलक्षणम्—

तालं मृतं तदा ज्ञेयं वन्हिस्थं धूमवार्जितम्।
सधूमं न मृतं प्राहुर्वृद्धवैद्या इति स्थितिः॥ १६५ ॥
इयं परीक्षा वृद्धानां मुखेभ्य एव श्रुत्वा मया पद्येन निबद्धा, परं रसशास्त्रेषु कुत्रापि न दृष्टा, भवतु सत्येयं, न ह्यमूला प्रसिद्धिरिति न्यायात्।

शुद्ध हरताळाचे गुणः--

हरताळ तिखट स्निग्ध, तुरट व उष्ण असून तो विष, कंडू, कुष्ठ हे रोग व रक्त, कफ, पित्त यांसंबंधीं विकार नाहींसे करतो. अंगावरचे केंस हरताळाच्या लेपानें जातात व व्रण बरे होतात.

अशुद्ध हरताळ किंवा कच्चा हरताळ सेवन केल्याचे दुष्परिणाम:—अशुद्ध हरताळ किंवा कच्चें भस्म सेवन केल्यास शरीराची कांति नष्ट होते. अनेक प्रकारचे ताप उद्भवून आंग आखडणें इत्यादि पीडा होतात व कफ, वात, कुष्ठ हीं उत्पन्न होतात. असे विकार अशुद्ध किंवा कच्चें हरताळभस्म सेवन केल्यानें भोगावे लागतात.

शुद्ध हरताळ कांति आणि वीर्य यांची वृद्धि करतो. कुष्ठ वगैरे रोगांचा नाश करून म्हातारपण आणि मृत्यु यांचा परिहार करतो.अशुद्ध हरताळ हा आयुष्याचा नाश करतो व कफ, वात व मेह हे उत्पन्न करतो. ताप, उठाणू अंग आंखडणें इत्यादि रोग अशुद्ध हरताळ खाल्यानें उद्भवतात, म्हणून हरताळ शुद्ध करून घ्यावा.

मारलेल्या हरताळाची परीक्षा.

हरताळ अग्नीवर टाकला असतां त्याचा धूर निघत नाहीं (त्याला निर्धूम म्हणतात).तेव्हां तो मृत झाला असें समजावें. ज्यांतून धूर निघतो तो मृत नव्हे असें अनुभविक वैद्यांचें मत आहे (१६५)

ही परीक्षा वृद्ध वैद्यांच्या तोंडून मीं ऐकलेली येथें श्लोकांत वर्णन केली आहे; परंतु रसायनशास्त्राच्या ग्रंथांत कोठें दिली नाहीं, तथापि ती खरी आहे. कारण कांहींतरी आधारावांचून कोणत्याहि गोष्टीला प्रसिद्धी मिळत नाहीं हें सर्वांस माहीतच आहे.

अथ तालकशोधनम्—

तालकं कणशः कृत्वा बद्ध्वा पोटालिकां ततः ।
दोलायन्त्रेण यामैकं सचूर्णे कांजिके पचेत् ॥ १६६ ॥
यामैकं दोलया तद्वत्कूष्माण्डस्वरसे ततः ।
तिलतैले पचेद्यामं यामं च त्रैफले जले ।
दोलायन्त्रे चतुर्यामं पक्वं शुध्यति तालकम् ॥ १६७ ॥

अथ तालकस्य मारणाविधिः—

पत्राख्यं तालकं शुद्धं पौनर्नवरसेन तु ।
खल्वे विमर्दयेदेकं दिनं पश्चाद्विशोषयेत् ॥ १६८ ॥
संशोष्य गोलकं कृत्वा चक्राकारमथापि वा ।
ततः पुनर्नवाक्षारैः स्थाल्यामर्धं प्रपूरयेत् ॥ १६९ ॥
तत्र तद्गोलकं कृत्वा पूनस्तेनैव पूरयेत् ।
स्थालीं चूल्ल्यां समारोप्य क्रमाद्धान्हिं विवर्धयेत् ॥ १७० ॥

दिनान्यन्तरशून्यानि पंच वन्हिं प्रदीपयेत् ।
एवं तान्म्रियते तालं मात्रा तस्यैकरक्तिका ॥ १७१ ॥
अनुपानान्यनेकानि यथारोगं प्रयोजयेत् ।
किंचिद्यथा—
गुडूच्यादिकषायेण गदानेतान् व्यपोहति ॥ १७२ ॥
सोपद्रवं वातरक्तं कुष्ठान्यष्टादशापि च ।
फिरङ्गदेशजं जन्तोर्हन्ति रोगं सुदुस्तरम् ॥ १७३ ॥
विसर्पमण्डलं कण्डूं पामां विस्फोटकं तथा ।
वातरक्तकृतान् रोगानन्यानपि विनाशयेत् ॥ १७४ ॥
एतद्भेषजसेवी तु लवणाम्लौ विवर्जयेत् ।
तथा कटुरसं वन्हिमातपं दूरतस्त्यजेत् ॥ १७५ ॥
लवणं यः परित्यक्तुं न शक्नोति कथंचन ।
स तु सैन्धवमश्नीयान्मधुरोपरसो हि सः ॥ १७६ ॥
इति भावप्रकाशीयं हरितालभस्म बहुभिर्बहुशोऽनुभूतमस्ति ।

हरताळाचें शोधन.

हरताळाचो पूड करून (स्वच्छ) फडक्यांत बांधून पुरचुंडी करावी. नंतर कांजींत चुना मिश्र करून त्यांत ठेऊन दोलायंत्रानें एक प्रहर उकळावा. मग कोहोळ्याच्या रसांत एक प्रहर दोलायंत्रांतच उकळावा. नंतर तिळाच्या तेलांत एक प्रहर आणि शेवटीं त्रिफळाच्या काढ्यांत एक प्रहर यांप्रमाणें दोलायंत्रांत चार प्रहर उकळल्यानें हरताळ शुद्ध होतो. (१६७).

हरताळाचें मारण.

पक्की हरताळ शुद्ध करून त्याचा पुनर्नवाच्या रसांत एक दिवस खल करावा आणि सुकवावा. अर्धवट सुकल्यावर त्याची गोळी किंवा चकती करावी. मग पुनर्नवाक्षारानें एक मडकें अर्धेच भरावें आणि त्यावर हरताळ ठेऊन वर पुनः क्षार घालून मडकें तोंडोतोंड भरावें आणि चुलीवर ठेऊन खालीं जाळ लावावा. तो प्रथम मंद असावा; नंतर हळूहळू वाढवावा. याप्रमाणें पांच दिवस एकसारखा अग्नि देऊन आंच दिली असतां हरताळ मरतो. तो घेण्याचें प्रमाण एक रति. त्यांचीं अनुपानें अनेक आहेत, तीं रोग पाहून यथायोग्य योजावीं. (१७१).

अनुपानांपैकीं कांहीं अनुपानें सांगतोः—

गुळवेलीच्या काढचांत हरताळ घेतल्यानें त्रासदायक वातरक्त, अठरा प्रकारचीं कुष्ठें, खडतर उपदंश व कंडु, इसव, गळवें, संधिवात इत्यादि अनेक रोग नाश पावतात. हरताळ सेवन करणाऱ्या रोग्यानें मीठ, आंबट पदार्थ व तिखट पदार्थ खाऊं नयेत, विस्तवाचा शेक घेऊं नये, उन्हांत बसूं नये, मीठ सोडणें शक्यच नसेल तर थोडे सैंधव खाल्लयास चालेल. कारण तो मधुर रसाचाच उपरस आहे. (१७६).

ही हरताळक्रिया भावप्रकाशांतून घेतली आहे व तिचा अनुभवहि पुष्कळांनीं घेतला आहे.

अथ लघुयोगतरङ्गिण्याम्—

जम्बीरद्रवमध्ये तु प्रक्षाल्य नटमण्डनम् ।
दशांशं टङ्कणं दत्त्वा खण्डशः परिमेलयेत् ॥ १७७ ॥
चतुर्गुणे दृढे पट्टे निबध्य प्रहरद्वयम् ।
दोलायन्त्रेण संस्वेद्य प्रदीपप्रतिमेऽनले ॥ १७८ ॥
काञ्जिके चूर्णतोये च कूष्माण्डाम्बुनि तैलके ।
त्रिफलाम्बुनि तत्पश्चात्क्षालायित्वाऽम्लवारिणा ॥ १७९ ॥
ततः पलाशमूलत्वग्वारिपिष्टं प्रशोषयेत् ।
माहिषीमूत्रसंपिष्टं पुनस्तं परिशोषयेत् ॥ १८० ॥
तं गोलकं शरावाभ्यां संपुटीकृत्य यत्नतः ।
खात गजपुटे पक्त्वा स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ॥ १८१ ॥
अजादुग्धैः पुनः पिष्ट्वा शोषयेद्गोलकीकृतम् ।
आकण्ठं भस्म पालाशं हाण्डिकायां विनिक्षिपेत् ॥ १८२ ॥
चूर्णस्य कुडवं सम्यक् दत्त्वा तत्र विचक्षणः ।
स्थापयेद्गोलकं तत्र पुनश्चूर्णं च भस्म च ॥ १८३ ॥
यथा धूमो बहिर्याति न, तथा तां विमुद्रयेत् ।
द्वात्रिंशत्प्रहरानग्नि चूल्ल्यां भक्तवदर्पयेत् ॥ १८४ ॥
स्वाङ्गशीतं समुद्धृत्य संचूर्ण्य नटमण्डनम् ।
हिमकुन्देन्दुसंकाशं निर्धूमं कृष्णवर्त्मनि ॥ १८५ ॥
रक्तिकाऽस्य प्रदातव्या पुराणगुडयोगतः ।
पथ्यं च चणकस्योक्ता रोटिका षष्टिकौदनम् ॥ १८६ ॥
निर्लोणं, किंचनाप्यन्यन्न खादन्नेकविंशतिम् ।
तिष्ठेद्दिनानि निर्वाते सर्वव्यापारवर्जितः ॥ १८७ ॥

आतां लघुयोगतंगिणींतिल क्रिया देतों. कागदी लिंबाच्या रसानें हरताळ धुवून घ्यावा व त्याच्या दहाव्या हिश्शाइतका टांकणखार घेऊन दोन्ही थोडे थोडे एकत्र करून खलावें,मग एक फडकें चार पदरीं करून त्यांत त्या मिश्रणाची घट्ट पुरचुंडी बांधावी. नंतर चुना मिसळलेल्या कांजींत, कोहोळ्याच्या रसांत, तेलांत व त्रिफळ्याच्या काढ्यांत याक्रमानें दोलायंत्रांमध्यें उकळून काढावी. यंत्राखालीं अग्नि देणें तो चांगला प्रदीप्त द्यावा. नंतर मिश्रण आम्लजलानें धुवावें आणि पळसाच्या मुळ्याच्या सालीच्या रसांत खलून वाळवावें. मग म्हशीच्या मुतांत खलून पुनः वाळवावें आणि पुनः त्याची गोळी करावी. ती गोळी खापराच्या संपुटांत ठेऊन गजपुट द्यावें आणि निवाल्यावर काढून शेळीच्या दुधांत खलावें व वाळवून त्याची गोळी करावी. नंतर एका मडक्यांत पळसाची राख आणि चुना भरावा व त्यावर ती गोळी ठेऊन तिच्यावर चुना घालून पुनः राख घालावी. आंतील हरताळाचा धूर बाहेर न जाईल अशा रीतीनें मडक्याचें तोंड पक्कें लिंपावें आणि मडकें चुलीवर ठेऊन भात शिजेल इतकी आंच बारांस प्रहर द्यावी. आपोआप निवाल्यावर हरताळ काढून घेऊन त्याची पूड करून ठेवावी, म्हणजे भस्म झालें. (१८४).

हें भस्म बर्फ, चंद्र किंवा कुंदाचें फुल यांच्याप्रमाणें पांढरें शुभ्र होतें व अग्निवर टाकलें तरी धूर निघत नाहीं. तें एक रतिइतकें जुन्या गुळांत द्यावें. पथ्य अळणी; हरबऱ्याच्या पिठाचे रोट किंवा साळीचा भात एकवीस दिवसपर्यंत खावा. दुसरा पदार्थ खाऊं नये. वारा घेऊं नये व श्रम करूं नये. वाऱ्याचा उपद्रव नाहीं अशा ठिकाणीं स्वस्थ राहून विश्रांति घ्यावी. (१८७)

अथ फलम्—

पुण्डरीकं गलत्कुष्ठं श्वित्रं कापालिकं तथा ।
काकणमृष्याजिव्हं च स्फोटमौदुम्बरं तथा ॥ १८८ ॥
वातरक्तं च पाण्डुं च दद्रूं पामां विचर्चिकाम् ।
विसर्पमथ चार्शांसि विपादीं च भगन्दरम् ॥ १८९ ॥

सर्वथा क्रमशो हन्ति सेवितं हरितालकम् ।
अन्यानपि व्रणान् सर्वानन्धकारामिवांशुमान् ॥ १९० ॥

इति हरितालमारणम् ॥

याचें फल असें कीं, भस्मसेवनानें पुढील रोग हळूहळू नष्ट होतातः—पुंडरीक, रक्तपिति, श्वित्र, कापालिक, औदुंबर, ऋष्य-जिव्ह, काकण, उपळलेला स्फोट, वातरक्त, पांडुरोग, इसब, दाद, खरूज, नायटे, चट्टे, मूळव्याध, जळवात, भगंदर असे अनेक दुःसाध्य रोग आणि अनेक प्रकारच्या जखमा, व्रण हे नाहींसे होतात. सूर्य जसा अंधकाराचा उच्छेद करतो, त्याप्रमाणें हरताळ हा रोगांचा नाश करून टाकतो. (१९०).

अथ मात्रापरिमितिः—

रोगी, तण्डुलपरिमितां मात्रां सितोपलाजीरकचूर्णानुपानेन सह भक्षयेत् । पथ्यं पूर्वोक्तं षाष्टिकौदनं गोदुग्धं वा । अष्ट-भागेन तस्य तु रक्तिपरिमिता मात्रा गुणास्तु पूर्वस्मादाधि-कतराः । विशेषस्तु —

राजयक्ष्मादिकान् रोगान् विजित्य कुरुते वपुः ।
वज्रतुल्यं जरां हत्वा नृणां पथ्याशिनां ध्रुवम् ॥ १९१ ॥

इति हरितालमारणं ॥

भस्म घेण्याचें प्रमाणः—हें भस्म तांदुळाइतकें खडीसाखर व जिरें यांत घ्यावें. पथ्य वर लिहिल्याप्रमाणें साळीचा भात, गाईचें दूध इ० घ्यावें. अर्ध्या दुधांत एक रतिइतकी मात्रा घेतल्यास फारच गुणावह होते.

विशेषतः (औषध घेऊन) पथ्य केल्यास कफक्षयासारखे भयंकर रोग नष्ट होऊन शरीर वज्राप्रमाणें मजबूत होतें आणि वार्धक्य सुद्धां निःसंशय नाहींसें होतें. (१९१)

अथ सिद्धमते—

तबक्ष्याख्यं हरितालं माहिषीमूत्रे, घृतकुमारीरसे, चूर्णतोये, शरपुं-खारसे, कूष्माण्डरसे, निम्बूरसे च पृथक्पृथक् षट्प्रहरं संशोध्यं, इति शुद्धिः । अथ मर्दनं-कूष्मांडरसेन दिनानि२१,कागदीनिम्बूरसेन दिनानि २१, धत्तूररसेन दिनानि २१, सहदेवीरसेन दिनानि २१, पलाशरसेन दिनानि २१, बदरीमूलरसेन दिनानि २१, आर्द्रकरसेन

दिनानि २१, गोभीरसेन दिनानि २१, छिक्किणीरसेन दिनानि २१, हुलहुलरसेन दिनानि२१,नागार्जुनीरसेन दिनानि२१, भृङ्गराजरसेन दिनानि २१, एरण्डमूलरसेन दिनानि २१, ब्रम्हदण्डीरसेन दिनानि २१; श्वेतलशुनरसेन दिनानि २१, पलाण्डुरसेन दिनानि २१,स्वर्णवल्लीरसेन दिनानि २१, काकमाचीरसेन दिनानि २१. बलारसेन दिनानि २१, वन्नीदुग्धेन दिनानि २१, अर्कदुग्धेन दिनानि २१, एवं दिनसंख्या ४४१, एतैर्वर्ष एको १, मासौ द्वौ २, दिनानि २१ भवन्ति । एतत्कष्टं कर्तुमशक्तश्चेत्तेन दिनशब्दो भावनापरतया बोध्यः । ततश्चाक्किकां कृत्वा तां घर्मशुष्कां कारयेत्, ततोऽतिदृढां हण्डीं मृत्कर्पटैरेकाविंशतिवारं लेपयेत्,ततस्तस्यां हाण्डिकायां पिप्पलस्य विभूतिं पूरयेदंगुष्ठपारिमितं यावत्, तदुपरि तां चाक्किकां दृढां संस्थाप्य तदुपरि पुनस्तद्विभूत्याऽतिदृढं पूरयेदाकण्ठं, ततो मुद्रां कृत्वा, क्रमविवर्धितमग्निं दद्यात्प्रहराणां चतुःषष्टिं, अष्टौ दिनानीति यावत् । सिद्धम् भस्म भवति, तद्यत्नतः संरक्षयेत् । शिवस्य महतीं पूजां कृत्वा, देवगोब्राम्हणवैद्यान् पूजयित्वा, तस्य मात्रां तण्डुलपरिमितां गुञ्जापरिमितां वा भक्षयेत्, यथारोगमनुपानानि, पथ्यं लवणाम्लतीक्ष्णतैलवर्ज्यं प्रोक्तवत् ज्ञेयम् । अस्य फलश्रुतिः— त्रिःसप्तहान्मण्डलैकेन वा श्वेतप्रभृत्यष्टादशकुष्ठानि, यावन्तो रक्तविकाराः, त्रयोदशसंनिपाताः, अपस्मारादयो यावन्तः पापरोगाः भगन्दरनाडीव्रणप्रभृतयो महाव्रणाः, प्रशीर्णं वातरक्तं, उपदंशाफिरंगाद्या लिंगरोगाः श्लीपदग्रंथिप्रभृतयः सर्वांगशोफाः, सूतिकावातरोगप्रभृतयः सर्वशीतवातविकाराः, श्वासकासाद्या वातविकाराः, दुष्टपीनसप्रभृतयः प्रतिश्यायाः, अर्शआदयोऽष्टौ महारोगाः, वान्हिमान्द्यजा ग्रहणीप्रभृतयः, मधुमेहाद्याः सर्वे प्रमेहाः, मेदोवृद्ध्यर्बुदगण्डमालाद्याः काठिनविकाराः, आमवातगृध्रस्याद्या मूढविकाराः, राजयक्ष्माद्याः शोषाः किं चाशीतिसंख्या वातरोगाः, अनुपानभेदेन चत्वारिंशत्पित्तरोगाः विंशतिसंख्याका कफजा रोगाः, दशरक्तजा रोगाः शीघ्रं प्रणश्यन्ति जराव्याधिविनाशश्च भवति; दिव्यदेहः कान्तिधृतिमान् सत्वसंयुतः कामिनीकामदर्पघ्नस्तार्क्ष्यदृष्टिः शूरो वदान्यश्च भवतीति सिद्धमते हरितालमारणम् । सिद्धाद्यैस्तु हरितालश्चतुर्विधः प्रोक्तः-वुगदादी १, गोदन्ती २, तबकी ३, पिंडतालश्च ४, एते पिंडाख्यात् क्रमेण श्रेष्ठतरा ज्ञेयाः ॥

सिद्धांच्या मताप्रमाणें हरताळक्रियाः--

तबक्या हरताळ घेऊन म्हशीचें मूत, घृतकुमारी (कोरफड), चुन्याची निवळी, शरपुंखारस, कोहोळ्याचा रस व लिंबाचा रस या प्रत्येकांत सहासहा प्रहर (भिजत ठेऊन) शुद्ध करावा व याप्रमाणें शोधन करून त्याचा खल करावा, तो असाः--कोहळ्याचा रस, कागदी लिंबाचा रस, धोत्र्याचा रस, सहदेवीचा रस, पळसाचा रस, बोरीच्या मुळ्यांचा रस, आल्याचा रस, गोम्याचा रस, नाकशिकणीचा रस, हुलहुल रस, नागार्जुनी रस, माक्याचा रस, एरंडमुळाचा रस, ब्रह्मदंडीचा रस, पांढऱ्या लसणाचा रस, कांद्याचा रस, सोनवेलीचा रस, कावळीचा रस, चिकण्याचा रस, निवडुंगाचा व रुईचा चीक ह्या प्रत्येक रसांत एकवीस दिवस प्रमाणें खल करावा, म्हणजे चारशें एकेचाळीस दिवस किंवा एक वर्ष दोन महिने आणि एकवीस दिवस इतका काल खल होतो. इतके दिवस खल करण्याची सवड नसल्यास एक दिवसाचा खल म्हणजे एक भावना असा अर्थ घेऊन ४४१ भावना द्याव्या. मग त्या हरताळाची चकती करून उन्हांत वाळवावी आणि एक मडकें घेऊन त्याला एकवीस वेळां मातकापडलेप करावा व त्यांत पिंपळाची राख आंगठा बुडेल इतकी भरावी आणि त्यावर चकती ठेऊन तिच्यावर पुनः राख मडकें भरेपर्यंत दाबून बसवावी व तोंड लिंपून क्रमानें वाढता अग्नि एकसारखा चौसष्ट प्रहर द्यावा, म्हणजे सिद्धक्रियेनें भस्म होतें. तें जपून ठेवावें. मग शंकराची महापूजा बांधून व गाई, ब्राह्मण आणि वैद्य यांची पूजा करून भस्म एक तांदुळाइतकें अगर एक गुंजभर द्यावें. रोगानुसार अनुपान योजावें. पथ्य वर सांगितल्याप्रमाणें खारट, आंबट, तिखट, तेलकट हें वर्ज करावें. याचें फळ असें कीं, तीन सप्तकें किंवा एक मंडळपर्यंत औषध घेतल्यास अठरा प्रकारचीं कुष्ठें, चार सारे रक्तविकार, तेरा प्रकारचा सान्निपात, अपस्मार, इत्यादि सर्व पापजन्य रोग; भगेंद्र, नाडीव्रण अशांसारखे दुष्टव्रण, अंगांत मुरलेले वातरक्त, गरमी, शिश्नरोग, श्लीपद, गळू अशा तऱ्हेचे सर्वांगाला सूज आणणारे विकार; तसेंच बाळंतरोग, वातरोग वगैरे सर्व शैत्यवाताचे व्याधि; श्वास, धाप हे वातरोग, घाणेरडा पीनस वगैरे

शरीर झिजविणारे रोग, मूळव्याधीसारखे आठ मोठे रोग, अग्निमांद्यामुळें उद्भवणारे संग्रहणी मधुमेह वगैरे प्रमेह; मेदोवृद्धि, गांठी, बोंडमाळा इत्यादि टणक ग्रंथीविकार; संधिवात, कंबर धरणें वगैरे हालचाल बंद करणारे आजार, क्षयासारखे शरीर शुष्क करणारे रोग, ऐशीं प्रकारचे वातरोग, चाळीस प्रकारचे पित्तरोग, वीस प्रकारचे कफरोग, दहा प्रकारचे रक्तदोष, असे शेंकडों रोग केवळ अनुपानाची योग्य योजना केल्यानें पार नष्ट होतात, वार्धक्य जातें देह दिव्य होतो, कांति, धृति, उत्साह हे वाढतात, स्त्रियांची कामेच्छा शमन करण्याची शक्ति येते, दृष्टि गरुडाप्रमाणें तीक्ष्ण होते, व मनुष्य शूर व उदार होतो. याप्रमाणें सिद्धमताप्रमाणें हरताळाक्रिया सांगितली. त्यांच्या मतानें खडचा, तबकी, गोदंती आणि बगदादी असे चार प्रकार हरताळाचे आहेत, ते त्याच अनुक्रमानें गुणानें एकापेक्षां एक श्रेष्ठ होत.

अथ तालकसत्त्वपातनाविधिः—

लाक्षा राजी तिलाः शिग्रुष्टङ्कणं लवणं गुडम् ।
तालकार्धेन संमिश्य छिद्रमूषानिरोधितम् ।
पुटेत्पातालयत्रेण सत्त्वं पतति निश्चितम् ॥ १९२ ॥

अथ रसपद्धत्याम्ः—

कुलित्थक्काथटङ्कणमाहिषीघृतमधुयुक्तं हरितालं शुद्धं दध्यादयेन भावितं हण्डिकायां क्षिप्त्वा, उपरि मल्लं सच्छिद्रं दत्त्वा, संधिलेपं कृत्वा, क्रमेण वह्निं यामचतुष्टयं दद्यात्, यावन्नीलः पीतो वा धूमो ह्यागच्छति,ततः पाण्डुरे धूमे दृष्टे सति एकप्रहरमात्रं छिद्रं गोमयेनाच्छाद्य तीव्रमाग्निं दद्यात् यामान्ते चोद्धास्य पाण्डुरधूमेऽदृष्टे सति अग्निं पूर्णं कुर्यात; पश्चाच्छीतां स्थालीमुत्तार्य सत्त्वं ग्राह्यम् ॥

अन्यच्चः

जेपालसत्त्ववातारिबीजमिश्रं च तालकम् ।
कूपीस्थं वालुकायन्त्रे सत्त्वं मुञ्चति यामतः ॥ १९३ ॥

हरताळाचें सत्व.

लाख, मोहोरी, तीळ, शेवगा, टाकणखार, मीठ व गूळ हे प्रत्येकीं हरताळाच्या अर्ध्याइतके घेऊन ते हरताळासह सच्छिद्रमुशींत बंद करून पाताळयंत्रानें पुट द्यावें, म्हणजे खालच्या मडक्यांत सत्व निःसंशय पडतें. (१९२)

रसपद्धतीप्रमाणें क्रियाः—

शुद्ध हरताळाला दहीं व तूप यांची प्रथम भावना द्यावी, आणि नंतर तो व हुलग्याचा काढा, टांकणखार, म्हशीचें तूप व मध हे जिन्नस एकत्र करून मडक्यांत ठेवावे आणि तोंडावर झांकण्या पालथें बसवून त्या झांकणाला छिद्र ठेवावें. मडकें व झांकण यांच्या सांधा लेप लावून चिणून टाकावा आणि क्रमानें वाढत्या अग्नीची आंच ४ प्रहर द्यावी. म्हणजे छिद्रांतून निळा पिंवळा धूर बाहेर येऊं लागेल. तो बंद होऊन पांढरा धूर येऊं लागला म्हणजे शेणानें छिद्र बुजवून एक प्रहरपर्यंत कडक आंच द्यावी. प्रहरानंतर छिद्र उघडून पुनः पांढराच धूर येतो असें पाहून आंच बंद करावी, व थंड झाल्यावर मडकें उतरून सत्व काढून घ्यावें.

दुसरा प्रकारः—

जेपाळसत्व, एरंडाचें बीं आणि हरताळ एकत्र करून कुपींत ठेऊन वालुकायंत्रांत एक प्रहर आंच दिली असतां हरताळाचें सत्व निघतें (१९३).

अथ मनःशिलाया नामलक्षणगुणाः शोधनं च।
मनःशिला मनोगुप्ता मनोह्वा नागजिह्विका।
नेपाली कुनटी गोला शिला दिव्यौषधिः स्मृता ॥ १९४ ॥
तालकस्यैव भेदोऽस्ति मनोह्वा च तदन्तरम्।
तालकं त्वातिपीतं स्याद्भवेद्रक्ता मनःशिला ॥ १९५ ॥
मनःशिला त्रिधा प्रोक्ता श्यामाङ्गी कणवीरिका।
द्विखण्डाख्या च तासां तु लक्षणानि निबोधत ॥ १९६ ॥
श्यामा हिंगुलवद्रक्ता किंचित्पीताऽतिदीप्तिका।
कणवीरा रक्तवर्णा चूर्णरूपाऽतिभास्युक् ॥ १९७ ॥
किंचिद्रक्ता च गौरा च द्विखण्डा भारवत्तरा।
त्रिविधासु च श्रेष्ठा स्यात्कणवीरमनःशिला ॥ १९८ ॥

मनशिळेचीं नांवें, लक्षण, गुण आणि शोधन.

मनशीळ, मनोगुप्ता, मनोव्हा, नागजिव्हिका, नेपाळी, कुनटी, गोली, शिला, दिव्यौषधि हीं मनशीळेचीं नांवें आहेत. मनशीळ हा हरताळाचाच एक भेद आहे. हरताळ पिवळा जर्द आणि मनशीळ लाल असतें. तिचें स्वरूप तीन प्रकारचें आहे.

श्यामांगी, करवीरिका आणि द्विखंडा हीं त्यांचीं नांवें होत. आतां त्यांचीं लक्षणें सांगतों. जी किंचित् पिवळसर पण एकंदरींत हिंगुळा-प्रमाणें लाल आणि फार तेजस्वी असते ती श्यामांगी. करवीरा हिची पूड होते व ती लालवट आणि फार वजनदार असते. तिसरी द्विखंडा ही देखील लालसर पांढरी आणि वजनदार असते. परंतु ह्या तिन्हीमध्यें करवीरा मनशीळ उत्तम मानली आहे. १९८

अथ गुणाः—

मनःशिला गुरुर्वर्ण्या सरोष्णा लेखनी कटुः ।
तिक्ता स्निग्धा विषश्वासकासभूतकफास्रनुत् ॥ १९९ ॥

अशुद्धमनःशिलागुणाः—

मनःशिला मन्दबलं करोति जन्तुं ध्रुवं शोधनमन्तरेण ।
मलस्य बन्धं किल मूत्ररोधं सशर्करं कृच्छ्रगदं च कुर्यात् ॥२००॥

मनशीळ ही जड, रंगोत्पादक अंगांत भिनणारी, उष्ण, लेखन, तिखट, कडु आणि स्निग्ध असून विष, श्वास, कास, मूतो-न्माद, कफ रक्तस्राव यांचा परिहार करते.

अशुद्ध मनशीळीचा दोषः—मनशीळ शुद्ध न करतांच खाल्ली तर खात्रीनें अशक्तता उत्पन्न करते, मळाचा खडा बनतो व मूत्रमार्गांत रेव उत्पन्न होऊन मूत कोंडतें व रोग होतो.

अथ मनःशिलाशोधनंः—

पचेत्र्यहमजामूत्रे दोलायन्त्रे मनःशिलाम् ।
भावयेत्सप्तधा पित्तैरजायाः शुद्धिमृच्छति ॥ २०१ ॥

अथ मतान्तरम्

जयन्तिकाद्रवे तैले दोलायन्त्रे मनःशिला ।
दिनमेकमजामूत्रे भृङ्गराजरसेऽपि च ॥ २०२ ॥

मतान्तरमुः—

अगस्त्यपत्रतोयेन भाविता सप्तवारकम् ।
शृङ्गवेररसैर्वापि विशुध्यति मनःशिला ॥ २०३ ॥

मतान्तरमुः—

भृङ्गागस्त्यजयन्तीनामार्द्रकस्वरसेषु च ।
दोलायन्त्रेण संस्विन्ना विशुध्यति मनःशिला ॥ २०४ ॥

मनशीळेची शुद्धि.

दोलायंत्रामध्यें शेळीचे मुतांत मनशीळ तीन दिवस उकडावी आणि शेळीच्या पित्ताच्या सात भावना द्याव्या, म्हणजे मनशीळ शुद्ध होते. (२०१)

दुसरा प्रकारः--

जयंतीचा (टाकळ्याचा) रस, तेल, शेळीचें मूत्र आणि माक्यांचा रस यांत मनशीळ दोलायंत्रामध्यें एक दिवस उकळावी म्हणजे शुद्ध होते (२०२).

आणखी प्रकारः--

अगस्त्याच्या पाल्याच्या रसाच्या अगर आल्याच्या रसाच्या सात भावना दिल्यानें मनशीळ शुद्ध होते. (२०३)

आणखी प्रकारः—

माका, आगस्ता, जयंती व आलें यांच्या रसांत क्रमानें दोलायंत्रामध्यें उकळून काढली असतां मनशीळ शुद्ध होते. (२०४)

अय मनःशिलासत्त्वपातनमः----

तालवच्च शिलासत्त्वं ग्राह्यं तैरेव चौषधैः।
रसपद्धत्याम्—अष्टमांशेन गुडगुग्गुललोहाकिट्टेन सर्पिषासह मर्दयित्वा मूषायां दत्त्वांऽधायित्वा कोष्ठ्यां धमाता सत्त्वं मुञ्चेत्॥

मनशीळचें सत्वः—ज्या क्रियेनें व ज्या औषधींनीं हरताळाचें सत्व निघतें, तींच क्रिया व तींच औषधें मनशीळीचें सत्व काढण्याकरितां उपयोगांत आणावीं. (२०५)

रसपद्धतींतील क्रियाः—गूळ, गुग्गुळ, व लोखंडाचा गंज हे मनशीळीच्या आठव्या हिश्यानें घेऊन त्यांच्यासुद्धां मनशीळ तुपाशीं खलून मुशींत घालावी व कोष्ठयंत्रांत आंच द्यावी, म्हणजे मनशीळीचें सत्व पडतें.

अथ स्रोतोञ्जनस्य नामभेदगुणशोधनानि।
अस्य 'सुरमा' इति भाषायां नाम।
अञ्जनं वामनं चापि कपोताञ्जनामित्यपि॥ २०५॥

इति नामानि॥

स्रोतोञ्जनं तु द्विविधं श्वेतकृष्णविभेदतः ।
तत्र स्रोतोञ्जनं कृष्णं, सौवीरं श्वेतमीरितम् ॥ २०६ ॥

अत्र केचित्पञ्चभेदान् पठन्तिः—

स्रोतोञ्जनं च सौवीरमञ्जनं च रसाञ्जनम् ।
नीलाञ्जनं तदन्यच्च पुष्पाञ्जनकमेव च ॥ २०७ ॥

इति पञ्चाञ्जनानि ॥

अथैषां लक्षणम्ः —

वल्मीकशिखराकारं भिन्नमञ्जनसंनिभम् ।
घृष्टं तु गैरिकच्छायमेतत्स्रोतोञ्जनं स्मृतम् ॥ २०८
स्रोतोञ्जनसमं ज्ञेयं सौवीरं तत्तु पाण्डुरम् ।
अथवा धूम्रवर्णाभं सौवीराञ्जनमुच्यते ॥ २०९ ॥

स्रोतोंजनाचीं नांवें, भेद, गुण व शोधन.

स्रोतोंजनाला 'सुरमा' असें नांव आहे. शिवाय अंजन, वामन, कपोतांजन हीं नांवें सुरम्याचींच आहेत. सुरमा दोन प्रकारचा म्हणजे काळा व पांढरा असतो. पांढऱ्या सुरम्याला सौवीर म्हणतात आणि काळ्याला स्रोतोंजन म्हणतात. (२०६) कांहीं आचार्यांच्या मतानें पांच भेद आहेत ते असे. स्रोतोंजन, सौवीर, रसांजन, नीलांजन, आणि पुष्पांजन. २०७)

स्रोतोंजनाचें स्वरूपः—ह्याचे खडे वारुळाच्या टोंकाप्रमाणें निघुळते असतात. ते फुटले म्हणजे रंग काळाभोर दिसतो, आणि घासले असतां ते गेरुप्रमाणें दिसतात. हें स्रोतोंजनाचें स्वरूप झालें, आतां सौवीर हें पांढुरकें किंवा भस्मी रंगाचें असतें. त्याला सौवीरांजन म्हणतात. (२०९)

अथोभयोर्गुणाः —

स्रोतोञ्जनं स्मृतं स्वादु चक्षुष्यं कफपित्तनुत् ।
कषायं लेखनं स्निग्धं ग्राहि छर्दिविषापहम् ॥ २०९ ॥
हिध्माक्षयास्रहृच्छीतं सौवीरमपि तादृशम् ।
द्वयोरञ्जनयोः किंतु श्रेष्ठं स्रोतोञ्जनं स्मृतम् ॥ २१० ॥

अथोभयोः शोधनम्—

त्रिफलावारिणि स्वेद्यं तद्वयं शुद्धिमृच्छति ।
भृङ्गराजरसे वाऽपि स्रोतः सौवीरकं शुचि ॥ २११ ॥

अथानयोः सत्त्वपातनम्—

स्रोतःसौवीरयोः सत्त्वं गृण्हीयात्कुशलो भिषक् ।
मनःशिलाविधानेन तन्नेत्र्यं परमं मतम् ॥ २१२ ॥

गुणः-दोन्ही प्रकारचा सुरमा गोड, डोळ्यांना हितकर, कफपित्तनाशक, तुरट, लेखन, स्निग्ध व ग्राही असून ओकारी बंद करतो. तो विषनाशक आहे व हिध्म, क्षय, रक्तस्राव हे आजार दूर करतो. तो थंड आहे. सौवीर देखील त्याचप्रमाणें असतो. परंतु दोहोंमध्यें काळा सुरमा श्रेष्ठ मानला आहे. (२१०)

शोधनः—त्रिफळ्याच्या काढ्यांत सुरम्याचें स्वेदन केलें असतां तो शुद्ध होतो किंवा माक्याच्या रसांत उकळला म्हणजे दोन्ही प्रकारचा सुरमा शुद्ध होतो (२११).

दोन्ही प्रकारच्या सुरम्याचें सत्व काढण्याची क्रियाः—

मनशीळीचें सत्व काढावयाची जी क्रिया आहे त्याच क्रियेनें सुरम्याचें सत्व कुशळ वैद्यानें काढावें. हें सत्व नेत्ररोगांवर फार गुणकारी असतें (२१२).

अथ रसाञ्जनोत्पत्तिनामगुणाः कथ्यन्ते—

दार्वीञ्जाथमजाक्षीरपादपक्वं यदा घनम् ।
तदा रसांजनं ख्यातं नेत्रयोः परमं हितम् ।
तार्क्ष्यजं तार्क्ष्यशैलं च रसगर्भं रसांजनम् ॥ २१३ ॥

इति नामानि ॥

अथ गुणाः—

रसांजनं कटु श्लेष्मविषनेत्राविकारनुत् ।
उष्णं रसायनं तिक्तं छेदनं व्रणदोषहृत् ॥ २१४ ॥

रसांजनाचीं उत्पत्तिः—

दारुहळदीच्या काढ्यांत चतुर्थांश शेळीचें दूध घालून तें मिश्रण आटवून त्याचा घट्ट गोळा करितात, त्याला रसांजन म्हणतात. तेंहि डोळ्यांना फार हितावह असतें. तार्क्ष्य,शैल, रसगर्भ, तार्क्ष्यज हींहि नांवें रसांजनाचींच आहेत. (२१३).

गुणः— रसांजन हें तिखट असून तें कफ, विष व नेत्र-विकार यांचा नाश करतें. तें उष्ण, कडु, रसायन व छेदन असून तें व्रणदोष घालवितें. (२१४).

अथ नीलांजनपुष्पांजनलक्षणम्--

नीलांजनं स्मृतं नीलवर्णं स्निग्धं च भारवत्।
पुष्पांजनं रीतिकिट्टामिति केचिद्वदन्ति हि ॥ २१५ ॥
अंजनानि तु सर्वाणि नेत्र्याणि परमं तथ।
विषघ्नानि विशेषाच्च हिध्माध्मानहराणि च ॥ २१६ ॥

अत्र रसाञ्जनं ' रसवन्ती ' इति भाषायां प्रसिद्धम् ॥

अथ नीलांजनशुद्धिः—

नीलाजनं चूर्णयित्वा जम्बीररसभावितम्।
दिनैकमातपे शुद्धं भवेत्कार्येषु योजयेत् ॥ २१७ ॥

अन्यच्च—

अथवा भृङ्गजद्रावे स्विन्नानि सकलान्यपि।
अंजनानि विशुध्यन्ति सत्वं तेषां शिलासमम् ॥ २१८ ॥

मनःशिलावत्सत्त्वं ग्राह्यमित्यर्थः ।

नीलांजन व पुष्पांजन यांचें स्वरूपः--

नीलांजन निळ्या रंगाचें, स्निग्ध व जड असतें व पुष्पांजनाला कोणी *रीतिकिट्ट असेंहि म्हणतात. हीं सर्व अंजनें डोळ्यांना फार हितप्रद आहेत व विशेषेंकरून तीं विषबाधा, हिध्म, पोटफुगी हे विकार दूर करतात. (२१६) रसांजन हें देशीभाषेंत रसवन्ती ह्या नांवानें लोकांना माहीत आहे.

नीलांजनाची शुद्धिः--

नीलांजनाची पूड करून त्याला कागदी लिंबाची भावना एक दिवस उन्हांत दिली असतां तें शुद्ध होतें. मग त्याचा औषधाच्या कामाकडे उपयोग करावा. सर्व अंजनें माक्याच्या रसांत शिजवून वाफारावीं, म्हणजे शुद्ध होतात; त्यांचें सत्व मनशीळ सत्वाचे कृतीनें काढावें. (२१८)

षष्ठं कुलित्थांजनामित्युक्तं राजानिघण्टौ—

कुलित्था दृक्प्रसादा च चक्षुष्या च कुलित्थका।
कुकुलाली लोकहिता कुम्भकारी मलापहा ॥ २१९ ॥

अथ कुलित्थगुणाः –

कुलित्थिका तु चक्षुष्या कषाया कटुका हिमा।
विषविस्फोटकण्डूतिव्रणदोषनिबर्हणी ॥ २२० ॥

---

* ' रीति ' या उपधातूचें वर्णन पुढें आहे.

इति वनकुलित्थांजनं, ' चाकसू ' इति पाश्चात्याः, ' चिमड ' इति भाषा । निस्तुषीकृतवनकुलित्थाचूर्णं पटेन संशोध्य शिशूनां नेत्ररोगे योजनीयम् ।

आतां सहावा प्रकार कुलित्थांजन, अर्थात् रानहुलग्यांचें अंजन, असा एक प्रकार राजनिघंटूत सांगितला आहे त्याचीं नांवें:-

कुलित्था, दृक्प्रसादा, चक्षुष्या, कुलित्थका, ककुलाली, लोकहिता, कुंभकारी, मलापट्टा अशीं आहेत.(२१९) आतां त्यांचे गुण लिहितों:—

कुलित्थक हें डोळ्यांना हितकर, तुरट, तिखट व थंड असून त्यापासून विषबाधा, गळवें, कण्डु, व्रण इ. विकार दूर होतात. (२२०)

याप्रमाणें कुलित्थांजनाचे गुण आहेत; याला देशी भाषेंत कोणी " चाकसू " " चिमठ " असें म्हणतात. रानहुलग्याचीं तुसें व कोंडा काढून टाकून त्याची अगदीं वस्त्रगाळ पूड करावी, आणि लहान मुलांच्या डोळ्यांना विकार झाला असतां तिचा उपयोग करावा.

अथ टङ्कणक्षारः ।

' सुहागा ' इति भाषा । तस्य नामलक्षणगुणशुद्धिः—

सौभाग्यं टङ्कणक्षारो धातुद्रावकमुच्यते ।
टङ्कणोऽग्निकरो रुक्षः कफघ्नो वातपित्तकृत् ॥ २२१ ॥

अशुद्धटङ्कणगुणाः--

अशुद्धटङ्कणो वान्तिभ्रान्तिकारी प्रयोजितः ।
अतस्तं शोधयेदेव वन्हावुत्फुल्लितः शुचेः ॥ २२२ ॥

अथ गुणान्तरम्--—

टङ्कणो वन्हिकृत्स्वर्णरूप्योः शोधनः परः ।
विषदोषहरो हृद्यो वातश्लेष्मविकारनुत् ॥ २२३ ॥

अपरो नीलकण्ठाख्यष्टङ्कणः पूर्वटङ्कणात् ।
श्रेष्ठो नीलच्छविः किंचिच्छोधनं तस्य पूर्ववत् ॥ २२४ ॥

टाकणखार किंवा सवागी यार्चीं नांवें, लक्षण,गुण व शुद्धि नांवें:—सौभाग्य, टंकण, धातुद्रावक हीं टाकणखाराचीं नांवें आहेत. टांकणखार भूक उत्पन्न करणारा, रुक्ष, कफनाशक आहे; परंतु त्यानें वात व पित्त वाढतें. (२२१)

अशुद्ध टांकणखाराचे दोषः—अशुद्ध टाकणखारानें वांति, चक्कर येणें वगैरे विकार होतात. म्हणून तो शुद्ध करावा. तो लोखंडाच्या पळींत टाकून विस्तवावर भाजून त्याची लाही केली म्हणजे तो शुद्ध झाला. (२२२)

टांकणखार अग्निवर्धक आहे. सोनें, चांदी, वगैरे धातू त्यानें स्वच्छ होतात. तो विषनाशक व हृद्य असून वात व कफ यांचे विकार दूर करतो. नीलकंठ नांवाचा आणखी एक प्रकार टांकणखाराचा आहे. तो साध्या टांकणखारापेक्षां उत्तम असतो. त्यांत नीळसर रंगाची झांक मारते. त्याचेंहि शोधन साध्या टांकणखाराप्रमाणेंच करावें. (२२४)

अथ राजावर्तः ।

‘ लाजावर्त ’ (लाजवर्द) इति भाषा, ‘ रेवटी ’ इति च ।

राजावर्तः स्मृतः कैश्चिद्बुधैरुपरसे तथा ।
रत्नजातो स्मृतः कैश्चिल्लक्षणं तस्य कथ्यते ॥ २२५ ॥
राजावर्तो द्विधा प्रोक्तः सरक्तो नीलिमाश्रितः ।
कथितः स गुरुः श्रेष्ठस्तदन्यो हीन उच्यते ॥ २२६ ॥

गुणाः—

राजावर्तः कटुस्तिक्तः शिशिरः पित्तनाशनः ।
प्रमेहनाशकः प्रोक्तश्छर्दिहिक्कानिवारणः ॥ २२७ ॥

अथ शोधनमारणम्—

गन्धाष्ममातुलुङ्गाम्लशृङ्गवेररसेन च ।
शुध्यति म्रियते चैव पुटितो नात्र संशयः ॥ २२८ ॥

अथ सत्त्वपातनम्—

मनःशिलाज्यसंमिश्रः पाच्यः पात्रे हि लोहजे ।
पश्चाश्च माहिषीक्षीरैर्मित्रपंचकसंयुतम् ॥ २२९ ॥
मर्दयित्वाऽथ पिण्डं तु कृत्वा मूषानिवेशितम् ।
ध्मातस्तु खदिराङ्गारैः सत्त्वं मुंचति तद्धृतम् ॥ २३० ॥

राजावर्ताची क्रिया.

राजावर्ताला देशी भाषेंत “ लाजवर्द ” किंवा ‘ रेवटी ’ असें कोणी म्हणतात. राजावर्त हा एक उपरस आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे. परंतु दुसरे कांहीं विद्वान राजावर्त हें एक प्रकारचें रत्न आहे असें म्हणतात. (२२५)

राजावर्ताचें स्वरूप दोन प्रकारचें आहे. एक लालसर व दुसरें नीळसर. त्यांत जो राजावर्त वजनदार असतो तो उत्तम. हलका राजावर्त गुणांनीं कमी प्रतीचा असतो. (२२६)

गुणः—राजावर्त हा तिखट, कडू, थंड व पित्तशामक असून प्रमेह, ओकारी, उचकी ह्या विकारांचा नाश करतो. (२२७)

राजावर्ताची शुद्धिः—गन्धपाषाण, महाळुंगाचा आंबट रस व आलें ह्यांचे रस पृथक दिल्यानें राजावर्त शुद्ध होतो व त्यांचें पुट दिलें म्हणजे त्याचें भस्म होतें (२२८)

राजावर्ताचें सत्वः—मनशीळ व तूप यांच्यार्शी राजावर्ताचें मिश्रण करून तें लोखंडाच्या भांड्यांत शिजवावें. नंतर त्यांत सौभाग्य पंचक घालून म्हशीच्या दुधांत उकळावें. द्रव भाग आटल्यावर त्याची गोळी बनवून मुशींत ठेवून (तोंड बंद) करून खैराच्या निखाऱ्यांची आंच द्यावी, म्हणजे त्यांतील सत्व निघतें. (२३०)

अथ चुम्बकः ।

स तु पाषाणजातिः । उक्तं च—

कान्तलोहाश्मभेदाः स्युश्चुम्बकभ्रामकादयः ।
चुम्बकः कान्तपाषाणोऽयस्कान्तो लोहकर्षकः ॥ २३१ ॥

अथ गुणाः—

चुम्बको लेखनः शीतो मेदोविषजरापहः ।
कण्डूपाण्डूदरक्षैण्यमोहमूर्च्छायरोगहृत् ॥ २३२ ॥

अथास्य शोधनमुपयोगश्च—

शोभाञ्जनरसे साम्लवर्गे दोलागतो दिनम् ।
शुध्यति पाचितः कान्तपाषाणः पारदोषकृत् ॥ २३३ ॥

लोहचुंबकाविषयीं

चुंबक हा एक प्रकारचा पाषाण आहे. धातुमय पाषाणाचे जे भेद आहेत त्यांतच कान्तलोह, चुंबक, भ्रामक, इत्यादि प्रकार आहेत. चुंबकाला कान्तपाषाण, अयस्कांत किंवा लोहचुंबक म्हणतात. (२३१)

त्याचे गुणः—लोहचुंबक हा लेखन व थंड असून मेदु, विष आणि म्हातारपण यांचा नाशक आहे; व तो कंडु, पांडुरोग, उदरक्षीणता, सुन्नपणा, मूर्च्छा या रोगांचा नाश करतो. (२३२)

चुंबकाची शुद्धिक्रिया:

शेवगा आणि आम्लवर्गांतील कोणत्याहि वनस्पतीचा रस एकत्र करून त्यांत दोलायंत्रानें चुंबकाचें एक दिवस पाचन करावें, म्हणजे तो शुद्ध होतो व पाऱ्याच्या गुणामध्यें जोर आणतो. (२३३)

अथ स्फाटिका ।

' फाटिकडी ' इति भाषा । तस्या नामलक्षणगुणशोधनानि—

स्फाटिका च स्फटी प्रोक्ता श्वेता शुभ्रा च रङ्गदा ।
दृढरङ्गा च रङ्गाङ्गा रङ्गदृढा च कथ्यते ॥ २३४ ॥

अथ गुणाः—

स्फाटिका तु कषायोष्णा वातापित्तकफव्रणान् ।
निहन्ति श्वित्रवीसर्पान् योनिसंकोचकारिणी ॥ २३५ ॥
स्फाटिका निर्मला श्वेता श्रेष्ठा स्याच्छोधनं क्वचित् ।
न दृष्टं शास्त्रतो, लोका वन्हावुत्फुल्लयन्ति हि ॥ २३६ ॥

तुरटी

तिचीं नांवें, लक्षण, गुण आणि शुद्धि यांविषयीं:

तुरटीलाच फटकडी म्हणतात. स्फटिका, स्फटी, श्वेता, शुभ्रा, रंगदा, दृढरंगा, रंगदृढा, रंगाङ्गा हीं तुरटीचीं नांवें आहेत. (२३४)

फटकी ही तुरट, उष्ण आणि वात, पित्त, कफ व व्रण यांचा नाश करणारी आहे ती श्वित्र (कोड) व विसर्प यांचाहि नाश करते आणि योनीचें आकुंचन करते. (२३५)

जी तुरटी स्वच्छ पांढरी असते ती उत्तम. तिची शुद्धि शास्त्रांत कोठें सांगितली नाहीं; परंतु व्यवहारांत ती अग्नींत भाजून तिची लाही करून उपयोगांत आणतात. (२३६)

अथ शंखस्य नामलक्षणगुणशोधनानि ।

शंखः समुद्रजः कम्बुः क्षुद्रः शंखनकः स्मृतः ।
द्विधा स दक्षिणावर्तो वामावर्तः शुभेतरः ॥ २३७ ॥
दक्षिणावर्तशंखस्तु पुण्ययोगादवाप्यते ।
तिष्ठति यद्गृहेऽसौ वै स लक्ष्म्या भाजनं भवेत् ॥ २३८ ॥
दक्षिणावर्तशंखस्तु त्रिदोषघ्नः शुचीनिधिः ।
ग्रहालक्ष्मीक्षयक्ष्वेडक्षामताक्ष्यामयापहः ॥ २३९ ॥
शंखः क्षारो हिमो ग्राही ग्रहणीरोगनाशनः ।
नेत्रपुष्पहरो वर्ण्यस्तारुण्यपिठिकाप्रणुत् ॥ २४० ॥

अशुद्धो गुणदो नैष शुद्धोऽम्लैः स गुणप्रदः ।
शंखश्च विमलः श्रेष्ठश्चन्द्रकान्तिसमप्रभः ॥ २४१ ॥
अम्लैः कांजिकादिभिर्दोलायन्ते स्विन्नः सन् शुध्यतीत्यर्थः।

शंख

व त्याचीं नांवें, लक्षण, गुण व शोधन.

नांवें:—शंख, समुद्रज, कंबु, क्षुद्र, शंखनक हीं शंखाचीं नांवें आहेत. शंखाचे दक्षिणावर्त आणि वामावर्त असे दोन प्रकार आहेत. (शंखाचें जें तोंड असतें त्यांत त्याची एक बाजू भोंवऱ्याप्रमाणें आंत गुंडाळलेली असते.) हा भोंवरा उजवे बाजूकडे वळला असला तर त्याला "दक्षिणावर्त" शंख म्हणतात. हा शंख अगदीं दुर्मिळ असतो आणि तो पुण्यवानाच्याच हातीं लागतो. ज्या घरीं दक्षिणावर्त शंख असेल तेथें नेहमीं लक्ष्मी नांदणारच. दक्षिणावर्त शंख हा त्रिदोषनाशक व शुद्धनिधि आहे. तो ग्रहपीडा, दारिद्र्य, क्षय, विषार, रोडकेपणा व नेत्ररोग यांचा नाश करतो (२३९).

दुसऱ्या प्रकारचे शंख:—इतर जातीचे शंख हे क्षारधर्मी, थंड, ग्राही व संग्रहणीनाशक असतात. डोळ्यांतिल फूल त्यानें झडतें, अंगाची कातडी रंगदार होते व तारुण्यपिटिकांचा नाश होतो (२४०).

अशुद्ध शंख मुळींच गुणावह नाहीं. आम्लवर्गांतिल रसानें तो शुद्ध करून घेतला पाहिजे, म्हणजे तो गुणदायक होऊन मनुष्य निर्मळ, श्रेष्ठ आणि चंद्राप्रमाणें तेजस्वी कांतीचा होतो. (२४१) आम्लवर्गापैकीं कांजी वगैरे औषधांत दोलायंत्रामध्यें शंख उकळून काढला असतां शुद्ध होतो. (२४१॥).

अथ खटिका 'खडी' इति भाषा ।
खटिका खटिनी चापि लेखनी च निगद्यते ।
खटी गौरखठी चेति द्विधाऽऽद्या मलिना स्मृता ॥ २४२ ॥
मृदुपाषाणसदृशा खटी शुभ्राऽधिका गुरुः ।
खटी दाहास्रनुच्छीता मधुरा विषशोथजित् ॥ २४३ ॥
कफघ्नी नेत्रयोः पथ्या लेखने बालकोचिता ।
पाषाणखाटिका तद्वद्व्रणपित्तास्रजिद्धिमा ॥ २४४ ॥
लेपादेते गुणाः प्रोक्ता भक्षिता मृत्तिकासमा ॥
खटी गौरखटी द्वे च गुणैस्तुल्ये प्रकीर्तिते ॥ २४५ ॥

खडूविषयीं.

नांवें:--खटिका, खटिनी व लेखनी हीं खडूचीं नांवें आहेत. खडु साधा व पांढरा असा दोन प्रकारचा आहे. साधा खडु मळकट असतो. जो खडु मऊ, पाषाणासारखा आणि सफेद रंगाचा व जड असतो तो उत्तम समजावा. (२४२॥)

खडू हा दाह व रक्तस्राव बंद करतो; तो थंड आणि मधुर असून विषार, ज्वर, सूज व कफ यांचा नाशक व नेत्रांनाहि हितप्रद आहे. खडू हा लहान मुलांकरितां लिहिण्याचें एक उत्तम साधन आहे. जो खडु पाषाणाप्रमाणें असतो, तोहि व्रण, पित्त आणि रक्तस्राव ह्यांचा परिहार करतो व थंड असतो. हे सर्व गुण खडूचा लेप शरीरावर केला असतां दिसून येतात. खडु पोटांत घेतल्यास मातीप्रमाणें लागतो. खडूंत साधा आणि सफेत असे भेद आहेत. परंतु गुणांनीं दोन्ही एकसारखेच. (२४५).

अथ गैरिकं 'गेरु' इति भाषा।

गैरिकं रक्तधातुश्च गैरेयं गिरिजं तथा।
द्विविधं गैरिकं प्राहुः स्वर्ण सामान्यगैरिकम् ॥ २४६ ॥
परैस्तृतीयमप्युक्तं पाषाणाख्यं हि गैरिकम्।
सुवर्णगैरिकं रक्ततरं शिष्टं तु रक्तकम् ॥ २४७ ॥

अथ गुणाः—

गैरिकाद्वितयं स्निग्धं मधुरं तुवरं हिमम्।
चक्षुष्यं दाहपित्तास्रकफहिक्काविषापहम् ॥ २४८ ॥
अतिकण्डूहरं रूक्षं तथा प्रोक्तमुदर्दनुत्।
पाषाणगैरिकं त्वन्यद्धिक्कालक्ष्मीविषापहम् ॥ २४९ ॥
सुवर्णगैरिकं श्रेष्ठं द्वितीयाद्गैरिकात्परम्।
गैरिकं किंचिदाज्येन भृष्टं शुद्धं प्रजायते ॥ २५० ॥

गेरु किंवा सोनकाव.

गैरिक, रक्तधातु, गैरेय, गिरिज हीं नांवें कावेचीं आहेत. कावेंत दोन प्रकार आहेत. एक सोनकाव व दुसरी साधी काव. दगडी काव म्हणून तिसरा एक प्रकार आहे असेंहि कोणी मानतात. सर्वांमध्यें सोनकाव फारच लाल असतो आणि इतर काव साधारणपणें लाल असते. (२४७).

दोन्ही प्रकारची काव स्निग्ध, मधुर, तुरट, थंड व नेत्रहितकर असून, दाह, पित्त, रक्तदोष, कफ, उचकी विषार आणि अतिशय सुटणारा कण्डु यांचा नाश करते ती रुक्ष व उदर्द (Erysipelas) नाशकहि आहे. दगडी काव देखील उचकी, निस्तेजपणा आणि विषार हे दोष दूर करते. तरी सोनकाव हीच गुणानें श्रेष्ठ मानलेली आहे. ती तुपांत किंचित् परतली असतां शुद्ध होते. (२५०).

अथ कासीसम् ।

तनु भस्मवन्मृत्तिकाऽम्ला ।
कासीसं धातुकासीसं पांसुकासीसमित्यपि ।
किंचित्तदेव पीतं तु पुष्पकासीसमुच्यते ॥ २५१ ॥
कासीसद्वयमम्लोष्णं तिक्तं च तुवरं तथा ।
वातश्लेष्महरं केश्यं नेत्र्यं कण्डूविषप्रणुत् ॥ २५२ ॥
मूत्रकृच्छ्राश्मरीश्वित्रनाशनं परिकीर्तितम् ।
सकृद्रङ्गाम्बुना स्विन्नं कासीसं निर्मलं भवेत् ॥ २५३ ॥

हिराकस.

हिराकसालाच "आम्लमृत्तिका" असे म्हणतात. कासीस, धातुकासीस, पांसुकासीस, हीं नांवें हिराकसाचीं आहेत. जो हिराकस किंचित् पिवळसर असतो त्याला पुष्पकासीस म्हणतात. (२५१).

दोन्ही प्रकारचा हिराकस अम्ल, उष्ण, कडवट व तुरट असतो. तो वात व कफ यांचा नाशक, केसांना व डोळ्यांना हितप्रद आणि कण्डू, विषार, मूत्रकृच्छ्र, मूतखडा, पांढरें कोड हे विकार नष्ट करणारा आहे. हिराकस माक्याच्या रसांत एक वेळ जरी शिजविला तरी शुद्ध होतो. (२५३).

अथ रसकः ।

' खपरिया ' इति भाषा ॥
रसकस्तुत्थभेदः स्यात्खर्परं चापि तत्स्मृतम् ।
ये गुणास्तुत्थके प्रोक्तास्ते गुणा रसके स्मृताः ॥ २५४ ॥
खर्परो द्विविधो ज्ञेयो दर्दुरः कारवेल्लकः ।
सदलो दर्दुरः प्रोक्तो निर्दलः कारवेल्लकः ॥ २५५ ॥
दर्दुरः सत्त्वपाते स्यादौषधे कारवेल्लकः ।

अथ गुणाः—

रसकः सर्वमेहघ्नः कफापित्तविनाशनः ॥ २५६ ॥
नेत्ररोगक्षयघ्नश्च लोहपारदरञ्जनः ।

अथान्यत्रापि—

खर्परं कटुकं क्षारं कषायं वामकं लघु ॥ २५७ ॥
लेखनं भेदनं शीतं चक्षुष्यं कफापित्तनुत् ।
विषाश्मकुष्ठकण्डूनां नाशनं परमं मतम् ॥ २५८ ॥

अन्यच्च—

नागार्जुनेन संदिष्टौ रसश्च रसकावुभौ ।
श्रेष्ठौ सिद्धरसौ ख्यातौ देहलोहकरौ परम् ॥ २५९ ॥
रसश्च रसकश्चोभौ येनाग्निसहनौ कृतौ ।
देहलोहमयी सिद्धिर्दासी तस्य न संशयः ॥ २६० ॥
अशुद्ध खर्परः कुर्याद्भ्रान्तिं भ्रांतिं विशेषतः ।
तस्माच्छोध्यः प्रयत्नेन यावद्भ्रान्तिविवर्जितः ॥ २६१ ॥

रसक अथवा कलखापरी

रसक हा तुत्थाचा म्हणजे अंजनाचा एक भेद आहे. खापराला‌हि रसकच म्हणतात, आणि मोरचुदाचे जे गुण आहेत ते रसकांतहि आढळतात. रसक हा दर्दुर व कारवेल्ल याप्रमाणें दोन प्रकारचा आहे. ज्याचे कळपे निघतात तो दर्दुर. कारवेल्लाचे कळपे निघत नाहींत. सत्व काढावयाचें असेल तर दर्दुर घ्यावा आणि औषधाकरितां कारवेल्ल वापरावा. (२५५ ॥)

रसकाचे गुणः—रसक हा सर्व प्रकारचे मेह व तसेंच कफ व पित्त यांचा नाश करतो; नेत्ररोग व क्षय यांचा उच्छेद करतो, आणि लोखंड आणि पारा यांना रंग आणतो.

रसक हा तिखट, क्षारधर्मी, तुरट, वान्तिकारक, हलका लेखन आणि भेदन (म्ह०सारक) आहे. तो डोळ्यांना हितकर असून कफ, पित्त, विषार यांचा नाश करतो; व मुतखडा, कुष्ठ, कंडू यांचाहि नायनाट करतो असें सर्वांचें मत आहे. (२५८)

रसकाचें महत्व इतकें आहे कीं, प्रत्यक्ष नागार्जुनानेंहि असें म्हटलें आहे कीं, देह आणि लोखंड यांना उत्कृष्टतेच्या परमावधीला नेणारे सिद्धरस दोनच आहेत, आणि ते रस आणि रसक म्हणजे पारा आणि कळखापरी हे होत. (६) ज्याला पारा आणि रसक हे

अग्नीमध्यें स्थिर करतां आले त्याच्यापुढें अजरामरत्व आणि किमया या दोन्ही सिद्धी केवळ एखाद्या बटकीप्रमाणें हात जोडून उभ्या राहतील यांत संशय कसचा ? (२६०) खर्पर शुद्ध न करतां जर खाल्ला तर तो विशेषेंकरून वांति म्ह. ओकारी आणि भ्रांन्ति म्हणजे चक्कर हे विकार उत्पन्न करतो; म्हणून खर्पर शुद्ध करूनच घ्यावा, म्हणजे त्यानें वान्ति वगैरे विकार होणार नाहींत. (२६१)

अथ शोधनम् ।—

नृमूत्रे वाऽथ गोमूत्रे जम्भाम्ले वा ससैन्धवे ।
सप्ताहं त्रिदिनं वाऽपि पक्वः शुध्यति खर्परः ॥ २६२ ॥

अथ वाग्भटः —

खर्परः परिसंतप्तः सप्तवारं निमज्जितः ।
बीजपूररसस्यान्तर्निर्मलत्वं समश्नुते ॥ २६३ ॥

अथान्यच्च—

नृमूत्रे वाऽश्वमूत्रे वा तक्रे वा कांजिकेऽथवा ।
प्रताप्य माज्जितं सम्यक् खर्परं परिशुध्यति ॥ २६४ ॥

मतान्तरम्—

कटुकालाबुनिर्यासे ह्यालोढ्य रसकं पचेत् ।
शुद्धं दोषनिर्विमुक्तं पीतवर्णं च जायते ॥ २६५ ॥

अथान्यच्च—

नरमूत्रे स्थितो मासं रसको रंजयेद्घृवम् ।
शुद्धं ताम्रं रसं तारं शुद्धस्वर्णप्रभं यथा ॥ २६६ ॥

रसकाची शुद्धिः—

नरमूत्र, गोमूत्र, पाणी व आम्ल यांचें मिश्रणांत किंवा पाणी व मींठ यांत सात दिवस किंवा निदान तीन दिवस उकळला असतां खर्पर शुद्ध होतो. वाग्भट म्हणतातः—खर्पर तापवून महाळुंगाच्या रसांत सातवेळ बुडविला म्हणजे स्वच्छ होऊन निघतो. (२६३)

दुसरा ग्रंथकार म्हणतो कीं:—नरमूत्र किंवा घोड्याचें मूत्र, अगर ताक किंवा कांजी यांत खर्पर चांगला तापवून बुडविला असतां शुद्ध होतो (२६४).

आणखी एका ग्रंथकाराचे मतानेंः—रसक कडु भोंपळ्याच्या रसांत कोळून उकळावा, म्हणजे तो दोषरहित होऊन त्यास पिंवळा रंग येतो. (२६५)

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं:—रसक एक महिनाभर नरमूत्रांत बुडवून ठेविला असतां, शुद्ध केलेलें ताम्र, शुद्ध केलेला पारा, किंवा शुद्ध रौप्य यांना त्याचे योगानें असा पिंवळा जर्द रंग चढतो कीं, जणों काय सोनेंच. (२६६)

क्वचिदस्य भस्मप्रकारः उक्तः |

खर्परं पारदेनैव चूर्णयित्वा दिनं पचेत ।
वालुकायन्त्रमध्यस्थं शोणं भस्म प्रजायते ॥ २६७ ॥

अन्यच्च—

कृत्वा खर्परपत्राणि पचेल्लवणयन्त्रके ।
जायते शोभतं भस्म सर्वरोगापहं स्मृतम् ॥ २६८ ॥

सत्त्वप्रकारस्तु—

लाक्षागुडासुरीपथ्याहरिद्रासर्जटंकणैः ।
सम्यक्संमर्द्य तत्पक्वं गोदुग्धेन प्लुतं तथा ॥ २६९ ॥
वृन्ताकमुषिकामध्ये निरूध्य गुटिकाकृतिम् ।
ध्मात्वा ध्मात्वा समाकृष्य ढालयित्वा शिलातले ॥ २७० ॥
सत्त्वं वंगाकृति ग्राह्यं रसकस्य मनोरमम् । इति ॥
रसादिषु शोधयित्वैव देयम् ॥

एका ग्रंथांत रसकभस्काचा प्रकार लिहिला आहे तो असा:— खर्पर हा पाऱ्याबरोबरच खलून वालुकायंत्रांत ठेऊन एक दिवसभर आंच देऊन काढला असतां तांबेंडें लाल भस्म होतें.

दुसऱ्या एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं:—खर्पराचे पातळ पत्रे करून मिठांत ठेवून आंच दिली म्हणजे त्याचें सुरेख भस्म होतें व त्यानें सर्व रोगांचा परिहार होतो. (२६८)

रसकाचें सत्व काढण्याची क्रिया:—

लाख, गूळ, काळी मोहरी, हिरडा, हळद, राळ आणि टांकणखार हे जिन्नस एकत्र कुटून तें मिश्रण गाईच्या दुधांत उकळून त्यांतच बुडवून ठेवावें. मग त्याची गोळी करून ती वांग्यांत ठेऊन मडींत भाजून काढून पाट्यावर घोंटावी. याप्रमाणें दोन चार वेळ माजलें असतां रसकापासून वंगभस्माप्रमाणें सुंदर सत्व निघतें. (२७०) रसक पाऱ्याबरोबर देणें झाल्यास शुद्ध करूनच द्यावा.

अथ कपार्दिका ।

" कौडी " इति भाषा ॥

कपार्दिकां कपर्दीं च वराटी च वराटिका ।
बराटिका त्रिधा प्रोक्ता श्वेता शोणा तथाऽपरा ॥ २७१ ॥
पीता सा चातिचक्षुष्या श्वेता शोणा हिमाऽव्रणा ।
आसिता बिंदुभिः श्वेतैर्लांछिता रेखयाऽथवा ॥ २७२ ॥
बालग्रहहरी नानाकौतुकेषु च पूजिता ।
पीता गुल्मयुता पृष्ठे रसयोगेषु पूजिता ॥ २७३ ॥
सार्धनिष्कप्रमाणाऽसौ श्रेष्ठा योगेषु युज्यते ।
निष्कप्रमाणा मध्या सा हीना पादोननिष्किका ॥ २७४ ॥

अन्यत्रापि—

पीताभा ग्रन्थिला पृष्ठे दीर्घवन्ता वराटिका ।
सार्धनिष्कमिता श्रेष्ठा निष्कभारा च मध्यमा ॥ २७५ ॥
पादोननिष्कभारा च कनिष्ठा परिकीर्तिता ।
वराटाः कांजिके स्विन्ना यामाच्छुद्धिमवाप्नुयुः ॥ २७६ ॥

इति शोधनम् ।

कपार्दिका अथवा कवडी.

कपार्दिकेला "कौडी" असें म्हणतात. तिचीं नांवें:—कपार्दिका, कपर्दी, वराटी, वराटिका अशीं आहेत. कवडी, पांढरी, लाल आणि पिंवळी अशा तीन प्रकारची आहे. त्यांत पिंवळसर जी असते ती नेत्रांना हितप्रद असते. पांढरी आणि लालवट असतें ती थंड व व्रणशोधक असते. जी कवडी काळसर असून तिच्यावर पांढरे ठिपके असतात अथवा रेघ असते ती बालग्रह रोग दूर करते. अशा प्रकारची कवडी नाना तऱ्हेच्या खेळांत वापरतात. जी कवडी पिंवळी असून तिच्यावर गाठी गाठी असतात, ती रसायनक्रियेंत उत्तम. जिचें वजन दीड निष्क असतें ती उत्तम एक निष्क वजनाची मध्यम; आणि निष्कापेक्षां कमी वजनाची कनिष्ठ (२७४).

दुसऱ्याहि एका ग्रंथांत म्हटलें आहे कीं:—जी कवडी रंगानें पिंवळी असून गांठाळ, लांबट आणि वजनांत (निदान) दीडनिष्क असते, ती उत्तम; एक निष्कभार असते ती मध्यम आणि पाऊण निष्कभार असते ती कनिष्ठ समजावी. कवडी कांजीमध्यें एक प्रहरभर उकळली असतां शुद्ध होते. (७६).

अङ्गाराग्नौ स्थिता ध्मांता सम्यक्प्रोत्फुल्लिता यदा ।
स्वाङ्गशीता मृता, तां तु पिष्ट्वा सम्यक् प्रयोजयेत् ॥ २७७ ॥
इति भस्म ॥

कपर्दिका हिमा नेत्रहिता स्फोटक्षयापहा ।
कर्णस्रावाग्निमान्द्यघ्नी पित्तास्रकफनाशिनी ॥ २७८ ॥

अन्यत्र—

कटूष्णा दीपनी वृष्या तिक्ता वातकफापहा ।
परिणामादिशूलघ्नी ग्रहणीक्षयहारिणी ।
रसेन्द्रजारणे प्रोक्ता बिडद्रव्येषु शस्यते ॥ २७९ ॥

उपादिंक भस्मः--कवडी कोळशांच्या निखाऱ्यांवर ठेऊन फुंकावी, म्हणजे तिची ठसठशीत लाही बनते. लाही बनून आपोआप निवाली म्हणजे तेंच भस्म. त्याची पूड करून औषधांत योजना करावी. (२७७)

कपर्दभस्मः--हें थंड, डोळ्यांना हितकर, स्फोट व क्षय यांचा नाश करणारें, कर्णरोग व अग्निमांद्य यांचा परिहार करणारें, आणि पित्त, रक्तदोष व कफदोषनिवारक असें असतें.(२७८)

दुसऱ्या ग्रंथांत आढळतें कीं, कवडी ही तिखट, उष्ण, अग्निदीपक, कामोद्दीपक, कडू वात-कफनाशक असते; व परिणामशूळ, संग्रहणी व क्षय हे रोग दूर करते. पाऱ्यांत अभ्रक वगैरे जिरविण्याला जो " बिड " तयार करतात त्यांत कवडी उत्तम मानलेली आहे (२७९)

अथ सिकता ।

' वालु ' इति भाषा ॥

वालुका सिकता प्रोक्ता शर्करा रेतिकाऽपि च ।
वालुका मधुरा शीता संतापश्रमनाशिनी ॥ २८० ॥
स्वेदप्रयोगतश्चैव शाखाशैत्यानिलापहा ।
तद्वच्च लेखनी प्रोक्ता व्रणोरःक्षतनाशिनी ॥ २८१ ॥
शर्कराभ्यक्तु गृह्णन्ति चुंबकेन ह्ययोरजः ।
सुकरं त्विदमाख्यातं तच्च संशोध्य मारयेत् ॥ २८२ ॥
इति सिकतालोहरजोग्रहणप्रकारः ॥

सिकता.

सिकता याचा अर्थ वाळू असा आहे.

नांवें:--वालुका, सिकता, शर्करा, रेतिका हीं वाळूचीं नांवें आहेत. वाळु मधूर, थंड आणि संताप व श्रम यांचा परिहार करणारी आहे. स्वेदनांत तिचा उपयोग केला असतां हातापायांची थंडी नाहींशी करते. त्याचप्रमाणें वाळूपासून अंजन तयार करतां येतें आणि ती कफक्षयाचाहि नाश करते. कोणी कोणी लोहचुंबकाच्या सहायानें वाळूतून लोखंडाचा चूर काढून घेतात. उत्तम लोह मिळविण्याची ही युक्ति उत्कृष्ट आहे. हेंच लोह घेऊन शुद्ध करून त्याचें भस्म करावें. (२८२)

अथ बोलस्य नामलक्षणगुणाः ।

बोलगन्धरसप्राणपिंडगोपरसाः समाः ।
बोलं तु त्रिविधं प्रोक्तं रक्तं शाम्यं मनुष्यजम् ॥ २८३ ॥

गुणाः—

बोलं रक्तहरं शीतं मेध्यं दीपनपाचनम् ।
मधुरं कटुकं तिक्तं ग्रहखेदात्रिदोषनुत् ॥ २८४ ॥
जरापस्मारकुष्ठघ्नं गर्भाशयविशोधनम् ।
चक्षुष्यं च सरं प्रोक्तं रक्तबोलं भिषग्वरैः ॥ २८५ ॥
इति रक्तबोलम् ॥

श्यामबोलं तीक्ष्णगन्धं दद्रुकण्डूविषापहम् ।
बह्वापस्मारकुष्ठार्शोरक्तग्रंथिं च नाशयेत् ॥ २८६ ॥
इति श्यामबोलम् ॥

अथ तृतीयं मानुषबोलम् । –

अपरं मानुषं बोलं सद्योव्रणविषापहम् ।
भग्नस्यास्थ्नस्तु सन्धानं त्रिदोषशमनं हिमम् ॥ २८७ ॥
धातुकांतिवयःस्थैर्यबलौजोवृद्धिकारकम् ।
प्रमेहपिटिकाकुष्ठसर्वव्रणविषापहम् ॥ २८८ ॥
इति मोमियाई ॥

बोळ (लक्षण व नांवें.) Myrrh

बोळ, गंधरस, प्राण, पिण्ड, गोपरस हीं सर्व नांवें बोळाचीं आहेत. बोळ रक्तचा, काळा आणि मनुष्यज अशा तीन प्रकारचा आहे. (२८३).

रक्त्याबोळ हा रक्तशोधक, थंड, बुद्धीला चालन देणारा, दीपनपाचन करणारा, मधुर. तिखट व कडू आहे. तो बालग्रह, खिन्नता आणि त्रिदोष हे नष्ट करतो. (२८४) शिवाय ह्यातारपण, अपस्मार, कुष्ठ ह्या व्याधींचा उच्छेद करून गर्भाशय स्वच्छ करतो. शिवाय तो डोळ्यांना हितकर आणि सारक असतो. अशा प्रकारचें वर्णन रक्तयाबोळाचें विद्वान वैद्यांनीं केलें आहे (२८५).

काळाबोळः--याचा वास उग्र असून तो गजकर्ण, कण्डू व विष यांचा नाशक आहे. त्याचप्रमाणें कुष्ठ, अपस्मार, मूळव्याध व सांखळलेलें रक्त हे व्याधिहि तो दूर करतो. (२८५).

आतां मुमियायी अथवा मनुष्यज-बोळ म्हणून काळ्या बोळाचाच एक प्रकार आहे. हा मानुष बोळ जखमा, व्रण ताबड-तोब बरे करतो. तो विषहारक असून मोडलेलें हाड जमवून देतो व त्रिदोषांचा नायनाट करतो. हा थंड असून धातुवर्धक, कांतिप्रद आणि चित्ताची स्थिरता, बळ व उत्साह यांची वृद्धि करणारा, प्रमेह, कुष्ठ,पुळ्या यांचा नाश करणारा, व्रणशोधक आणि विषार दूर करणारा असा आहे. (२८८).

अथ कुंकुष्ठोत्पत्तिनामलक्षणगुणाः ।

हिमाचलैकदेशे तु कंकुष्ठमुपजायते ।
तत्रैकं नालिकाख्यं स्यादन्यद्रेणुकनामकम् ॥ २८९ ॥
पीतप्रभं गुरु स्निग्धं कुंकुष्ठं शिलया समम् ।
मृद्वतीव शलाकाभं सच्छिद्रं नालिकाभिदं ॥ २९० ॥
रेणुकाख्यं तु कुंकुष्ठं श्यामपीतरजोन्वितम् ।
त्यक्तसत्त्व लघु प्रायः पूर्वस्माद्धीनवीर्यकम् ॥ २९१ ॥

अथ नामानि —

कंकुष्ठं काककुष्ठं च वरांगं कोलवालुकम् ।

अत्र केचित्। --

सद्योजातस्य करिणः शकृत्कंकुष्ठमुच्यते ।
यद्वा सद्यःप्रसूतस्य वाजिबालस्य विट् स्मृतम् ॥ २९२ ॥
नालं वा वाजिबालस्येत्येवं कंकुष्ठके भ्रमः ।
शुण्ठ्यम्बुभाविते शुद्धिं कुंकुष्ठमुपगच्छति ॥ २९३ ॥

अथ कंकुष्ठगुणाः ।—

कंकुष्ठं रेचनं तिक्तं कटूष्णं वर्णकारकम् ।
कृमिशोषोदराध्मानगुल्मानाहकफापहम् ॥ २९४ ॥

अन्यच्च—

बब्बूलमालिकाकाथजीरसौभाग्यटंकणम् ।
कंकुष्ठविषनाशाय भूयो भूयः पिबेन्नरः ॥ २९५ ॥

कंकुष्ठ.

उत्पत्ति, नांवें व गुणधर्म.

हिमालयामध्यें एके ठिकाणीं कंकुष्ठ म्हणून एक पदार्थ सांपडतो. त्याचा एक प्रकार नलिका-कंकुष्ठ या नांवाचा आहे व दुसरा रेणुक म्हणून आहे. रेणुक-कंकुष्ठ हें पिंवळसर, जड व स्निग्ध असून दगडा-प्रमाणें असतें व नलिका कंकुष्ठ हें अतिशय मऊ व सळई-प्रमाणें लांबट असून त्याला पोकळी असतें. म्हणून त्याला नलिका-कंकुष्ठ म्हणतात. (२९०) रेणुक कंकुष्ठावर जर काळसर व पिंवळा धुराळा सांचलेला असला तर त्या कंकुष्ठांतील सत्व नाहींसें होऊन तें हीनवीर्य झालेलें आहे असें समजावें. याप्रमाणें कंकुष्ठ नीट तपा-सून घ्यावें. (२९१)

नांवें:—कंकुष्ठ, काककुष्ठ, वरांग आणि कोलवालुक हीं नांवें कंकुष्ठाचीं आहेत.

दुसरे कांहीं ग्रंथकार म्हणतात:—नुकत्याच जन्मास आलेल्या हत्तीच्या छाव्याच्या, किंवा नुकत्याच झालेल्या शिंगराच्या विष्ठेला कंकुष्ठ असें म्हणतात; किंवा शिंगराच्या नाळीलाहि कोणी कंकुष्ठ म्हणतात. याप्रमाणें कंकुष्ठ हा काय पदार्थ आहे याविषयीं भल-भलत्या समजुती आहेत. असो. कंकुष्ठाला सुंठीच्या काढ्याची भावना दिली असतां तो शुद्ध होतो. (२९३)

कंकुष्ठाचे गुण:—कंकुष्ठ हें रेचक, तिखट, कडु, उष्ण आणि शरीराला तजेला आणणारें आहे; व कृमि, शोष, उदर नळाश्रित वात, गुल्म, पोटफुगी आणि कफ यांचा नाश करतें. (२९४)

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो कीं:—कंकुष्ठाचें विष बाधलें असतां बाभळीचे मुळ्याचा काढा करून त्यांत जिरें व टांकणखार

टाकावा व तो काढा वरचेवर प्यावा, म्हणजे कंकुष्ठाचें विष दूर होतें. (२९५)

अथ सौराष्ट्री ।

' सोरठीमाती ' इति भाषा ॥

सौराष्ट्री तुवरी कांक्षी मृत्तालकसुराष्ट्रजे ।
आढकी सापि च ख्याता मृत्स्ना च सुरमृत्तिका ॥ २९६ ॥
स्फाटिकाया गुणाः सर्वे सौराष्ट्र्यामपि कीर्तिताः ।
तस्मात्परस्पराभावे प्रयोज्याऽन्यतरा बुधैः ॥ २९४ ॥

सौराष्ट्री.

अथवा सोरटी माती.

सौराष्ट्री, तुवरी, कांक्षी, मृत्तालका, सुराष्ट्रजा, आढकी, सुरमृत्तिका हीं सर्व नांवें काठेवाडी मातीचीं आहेत. (२९६) जे गुण तुरटीचे तेच सोरटी मातीच्याहि ठिकाणीं आहेत. म्हणून तुरटी न मिळाल्यास सोरटी माती आणि सोरटी न मिळेल तर तुरटी याप्रमाणें उपयोग करावा. (२९७)

अथान्येऽप्युपरसाः सन्ति यथा—

अथ समुद्रफेननामगुणशोधनम् ।

अब्धिफेनोऽब्धिसारः स्यादाब्धिजश्च समुद्रजः ।
अब्धिसारस्तु चक्षुष्यो लेखनः शीतलः सरः ॥ २९८ ॥
कर्णस्रावरुजागूत्थहरः पाचनदीपनः ।
अशुद्धः स करोत्यङ्गभंगं तस्माद्विशोधयेत् ।
अब्धिफेनस्तु सांपिष्टो निंबुतोयेन शुध्यति ॥ २९९ ॥

इति समुद्रफेनः ।

आतां समुद्रफेंस वगैरे आणखी कांहीं उपरस आहेत त्यांच्यासंबंधानें लिहितों.

समुद्र फेस.

अब्धिफेन, अब्धिसार, अब्धिज, समुद्रज हीं नांवें समुद्रफेंसाचीं आहेत. समुद्रफेंस हा डोळ्यांना हितकर, लेखन, शीतल आणि शरीरांतून लवकर बाहेर सरणारा असा आहे. समुद्रफेस हा फुटलेला कान बरा करतो. तो दीपन आणि पाचन आहे. परंतु शुद्ध न केलेला समुद्रफेस जर सेवन केला तर अंग दुखूं लागतें,

म्हणून तो शुद्ध करूनच घ्यावा. समुद्रफेंस लिंबाच्या रसांत खलला म्हणजे शुद्ध होतो. (३९९).

अथ क्षुद्रशंखः ।

' क्षुद्रशंखः ' ' घोंघा ' इति भाषा । तन्नामगुणाः—

क्षुद्रशंखाः शंखनकाः [शम्बूका जलशुक्तयः] ।
शम्बूकः शीतलो नेत्ररुजास्फोटाविनाशनः ॥ ३०० ॥
शीतज्वरहरस्तीक्ष्णो ग्राही दीपनपाचनः ।
ग्रहणीरोगहन्ता च रक्तातीसारनाशनः ॥ ३०१ ॥
अस्य शुद्धिस्तु महाशंखवद्बोध्या ॥

लहान लहान शंख.

यांना क्षुद्रशंख म्हणतात. क्षुद्रशंख, शंखनक, शंबूक, जलशुक्ति हीं लहान शंखाचीं नांवें आहेत. ते थंड असून डोळ्यांचा ठणका किंवा डोळ्याला होणारी पुटकुळी यांचा नाश करतात (३००), लहान शंख हिंवताप घालवितो, तो तीक्ष्ण, ग्राही आणि दीपन पाचन आहे; व संग्रहणी आणि रक्तातिसार यांचा नाश करतो. (३०१).

मोठ्या शंखाप्रमाणेंच लहान शंखहि शुद्ध करून घ्यावे.

अथ शुक्तिः ।

' शिंपी ' ' छिप ' इति भाषा । तन्नामानि यथा राजनिघंटौ—

शुक्तिर्मुक्ताप्रसूश्चैव महाशुक्तिश्च शुक्तिका ॥
मुक्तास्फोटोऽब्धिमण्डूकी मौक्तिकप्रसवा च सा ।
ज्ञेया मौक्तिकसूर्मुक्तामाता मौक्तिकमान्दिरम् ॥ ३०२ ॥

अथ गुणाः—

मुक्ताशुक्तिः कटुः स्निग्धा श्वासहृद्रोगहारिणी ।
शूलप्रशमनी रुच्या मधुरा दीपनी परा ॥ ३०३ ॥

जलशुक्तिकानामानि—

जलशुक्तिर्वारिशुक्तिः कृमिभूः क्षुद्रशुक्तिका ॥
शम्बूका जलडिंबश्च पुटिका तोयशुक्तिका ॥ ३०४ ॥

अथ गुणाः—

जलशुक्तिः कटुः स्निग्धा दीपनी गुल्मशूलनुत् ।
विषदोषहरा रुच्या पाचनी बलदायिनी ॥ ३०५ ॥

अनयोः शोधनं गुणाश्च—

शुक्तिस्तु शिशिरा पित्तरक्तज्वरविनाशिनी ।
शोधनं शंखवत्तस्य मृतिः प्रोक्ता कपर्दवत् ॥ ३०६ ॥

शिंपलें.

राजनिघण्टांत शिंपीचीं नांवें आहेत तीं येणेंप्रमाणें:—

शुक्ति, मुक्ताप्रसु, महाशुक्ति, शुक्तिका, मुक्तास्फोटा, अब्धिमण्डुकी, मौक्तिकप्रसवा, मौक्तिकसू, मुक्तामाता आणि मौक्तिकमंदिर. (३०२)

शिंपीचे गुण:—शिंप ही तिखट परंतु स्निग्ध असून श्वास व हृद्रोग यांचा नाश आणि शूलाचा परिहार करते. ती तोंडाला चव आणणारी, मधुर आणि अतिशय पाचक अशी आहे. (३०३)

जलशुक्ति म्हणजे पाणशिंप म्हणून शिंपलीचाच एक भेद आहे. त्याचीं नांवें:—जलशुक्ति, वारिशुक्ति, कृमिभू, क्षुद्रशुक्तिका, जंबूका, पुटिका आणि तोयशुक्ति अशीं आहेत. (३०४)

पाणशिंपली तिखट, स्निग्ध व दीपन असून गुल्म व पोटशूळ यांचा नाश करते व विषाराचें शमन करते. शिवाय ती रुचकर, पाचक व बलदायकहि आहे (३०५). शिंपीचा साधारण धर्म हा आहे कीं, ती थंड असून पित्ताचा व रक्तज्वराचा नाश करते. शंखाप्रमाणेंच शिंपीचीहि शुद्धि करावी व कपर्दभस्माप्रमाणेंच भस्म करावें. (३०६)

अथ कृष्णमृत्तिकानामगुणाः ।

' कालीमाती ' इति भाषा ।
मृन्मृत्तिका प्रशस्ता तु मृत्स्ना मृत्सा च मृत्तिका ।
कृष्णमृत्क्षतदाहास्रप्रदरश्लेष्मपित्तनुत् ॥ ३०७ ॥

अथ पंकः ।

' कादव ' इति भाषा । तन्नामगुणाः—
पंकः कर्दम इत्युक्तो जम्बालः पंकिलस्तथा ।
पंको दाहास्रपित्तार्तिशोफघ्नः शीतलः सरः ॥ ३०८॥

कृष्णमृत्तिका.

हिला काळी माती किंवा " वावरी " म्हणतात.

मृत्, मृत्तिका, प्रशस्ता, मृत्स्ना, मृत्स आणि मृत्तिका हीं

नांवें काळ्या मातीचीं आहेत. काळी माती, क्षतदाह, रक्तस्राव, प्रदर कफ आणि पित्तप्रकोप यांचा परिहार करते. (३०७).

पंक.

याला "चिखल" म्हणतात.

पंक, कर्दम, जंबल व पांकिल हीं नांवें चिखलाचीं असून तो दाह, रक्तस्राव,पित्तदोष,सूज आणि कफविकार यांचा नाश करतो. व तो थंड आणि सारक आहे. (३०८).

अथ कम्पिल्लकः

कपिला ' इति लोके ॥

सौराष्ट्रदेशे संजातः कम्पिल्लस्तस्य लक्षणम् ।
इष्टकाचूर्णसंकाशः स विरेकी हि कथ्यते ॥ ३०९ ॥

उक्तं च राजनिघण्टौ—

कम्पिल्लकोऽथ रक्तांगो रेकी रेचनकस्तथा ।
रंजको लोहितांगश्च कम्पिल्लो रक्तचूर्णकः ॥ ३१० ॥

इति नामानि ॥

अथ गुणाः—

कम्पिल्लको विरेकी स्यात्कटूष्णो व्रणनाशनः ।
कफकासार्तिहारी च जन्तुकृमिहरो लघुः ॥ ३११ ॥

कम्पिल्ल.

कंपिल्ल याला व्यवहारांत "कपिला" असें म्हणतात.

कपिला ह्या जिनसाची पैदास सौराष्ट्र देशांत होते. तो ओळखण्याची खूण अशी कीं, विटकरीच्या चुऱ्याप्रमाणें त्याची पूड दिसते. "कपिला" याचा मुख्य गुण जुलाब होणें हा होय.(३०९).

म्हणूनच राजनिघण्टांतः—कपिलाचीं नांवें सांगितलीं आहेत तीं अशींः कंपिल्ल, रक्तांग, रेची, रेचनक, रंजक, लोहितांग, कम्पिल्ल आणि रक्तचूर्णक (३१०).

आतां कपिलाचे गुण सांगितले आहेत ते येणेंप्रमाणेंः—

कपिला हा रेचन करणारा, तिखट, उष्ण, व्रण बरे करणारा, कफ व कास यांचा नाशक, कृमिजंतु वगैरेचा नायनाट करणारा आणि हलका असा आहे (३११).

अथ गौरीपाषाणः ।

'सोमल' इति भाषा ॥

गौरीपाषाणकः प्रोक्तो द्विविधः श्वेतपीतकः ।
श्वेतः शंखसदृक् पीतो दाडिमाभः प्रकीर्तितः ॥ ३१२ ॥
श्वेतः कृत्रिमकः प्रोक्तः पीतः पर्वतसंभवः ।
विषकृत्यकरौ तौ हि रसकर्माणि पूजितौ ॥ ३१३ ॥

गौरिपाषाण

याला " सोमल " असें नांव आहे.

गौरिपाषाण, पांढरा आणि पिंवळा अशा दोन प्रकारचा आहे. त्यांपैकीं पांढरा हा शंखाप्रमाणें असून पिंवळा हा दाळिंबाच्या ताज्या फळाप्रमाणें पिंवळा तांबुस असा असतो (३१२).

पांढरा सोमल कृत्रिम असतो; परंतु पिंवळा हा खाणींत सांपडतो. दोन्हीं जाती विषारी आहेत खऱ्या; परंतु रसायन ह्या दृष्टीनें त्या अत्यंत उपयोगी आहेत (३१३).

अथ नवसादरः ।

नवसारः समाख्यातश्चूल्लिकालवणाभिधः ।
जायते चेष्टकापाकपवने पांडुरप्रभः ॥ ३१४ ॥
मनुष्यसूकराणां च विष्ठांतः किट्टवद्भवेत् ।
क्षरेषु गणना तस्य स्वर्णशोधनकः परः ॥ ३१५ ॥
शंखाद्रावरसे पूज्यो मुखकर्माणि पारदे ।
बिडद्रव्योपयोगी च क्षारवत्तद्गुणाः स्मृताः ॥ ३१६ ॥

नवसागर

नवसागरालाच नवसार आणि चुल्लिकाक्षार अशीं नांवें आहेतं. विटा भाजण्याच्या ज्या भट्टया असतात त्या भट्टींत विटा भाजल्यां जात असतां नवसागर उत्पन्न होतो. त्याचा रंग पांढुरका असतो. (३१४) त्याचप्रमाणें मनुष्य, डुक्कर यांच्या विष्टेंतहि नवसागर सांपडतो. त्याची गणना क्षारांत होते; आणि सोनें शुद्ध करण्याच्या कामीं तो फारच उपयोगी पडतो. शंखद्राव म्हणून जें द्रवरूप औषध तयार करतात तें तयार करण्याला व पाऱ्याला मुख उत्पन्न करण्याला तर नवसागराचा अतिशय जरूर पडते. त्याचप्रमाणें " बिड " बनविण्यांतहि त्याचा उपयोग होतो व त्याचे गुण क्षाराप्रमाणेंच आहेत (३१६).

अथाग्निजार इति क्षारविशेषः ।
अब्धितीरेऽग्निनक्रस्य जरायुः शुष्कतां गतः ।
अग्निजारस्तु संप्रोक्तः स क्षारो जारणे हितः ॥ ३१७ ॥

अथ गिरिसिंदुरम् ।
गिरिसिंदूरकं यत्तु गिरौ पाषाणजं भवेत् ।
किंचिद्धिंगुलतुल्याभं रसबंधे हितं मतम् ।
धातुवादेऽपि तत्पूज्यं नेत्ररोगघ्नमीरितम् ॥ ३१८ ॥

अग्निजार नांवाचा क्षार.

अग्निनक्र या नांवाचा एक जलचर प्राणी समुद्रांत राहतो. त्याचें जरायु म्हणजे गर्भाचें वेष्टन वाळून गेलेलें समुद्राच्या तीरावर पडलेलें सांपडतें. त्याला अग्निजार म्हणतात. हाहि एक क्षार आहे आणि त्याचा उपयोग जारणक्रियेंत होतो. (३१७)

गिरिसिन्दूर.

गिरिसिंदूर या नांवाचा एक तांबड्या रंगाचा खनिज पदार्थ आहे. तो दगडापासून उत्पन्न होतो आणि डोंगरावर सांपडतो. तो कांहींसा हिंगुळाप्रमाणें दिसतो आणि त्याचा उपयोग पाऱ्याचें बन्धन करण्याकडे होतो. त्यापासून किमयाहि बनतो. गिरिसिन्दूर हा नेत्ररोगनाशक आहे. (३१८)

अथ बोदारशृंगम् ।
' मुर्दाराशिंगी ' इति भाषा ॥
बोदारशृंगकं प्रोक्तं द्विविधं पीतपांडुरम् ।
सदंल निर्दलं तस्य जनिर्गुर्जरमण्डले ॥ ३१९ ॥
अर्बुदाख्यगिरेः पार्श्वे, सीससत्वं स्मृतं परम् ।
केश्यं पुरुषरोगघ्नं रंजनं रसबन्धकम् ॥ ३२० ॥
उक्तं च ।—
कम्पिल्लश्चपलो गौरीपाषाणो नवसादरः ।
वन्हिजारोऽथ सिंदूरं साधारणरसाः स्मृताः ॥ ३२१ ॥

बोदारशृंग.

ह्याला मुर्दाडशिंग असें म्हणतात.

मुर्माडशिंग दोन प्रकारचें आहे. एक पिंवळें व दुसरें पांढुरकें. पैकीं पाहिलें दळदार असतें, म्हणजे त्याचे कपरे निघून येतात;

आणि दुसऱ्या जातीच्या मुर्दाडशिंगाला दळ नसतें. मुर्दाडशिंग गुजराथेंत अबूच्या पहाडाच्या आसपास सांपडतें. मुर्दाडाशिंग हें शिशाचेंच सत्व आहे. ते केसांना उत्तम. त्यानें केंस चांगले राहतात; व पुरुषाला दुःखें भरतात त्यावराहि उत्तम गुणकारी आहे. त्यानें धातूला रंग आणतां येतो व पाऱ्याचें बन्धन होतें (३२०).

असे म्हटलें आहे कीं,

कपिला, चपलघातू, सोमल, नवसागर, अग्निजार, गिरिसिन्दूर ह्यांना साधारण रस असें म्हणतात. (३२१)

अथैषां शोधनम् । ——

साधारणरसां सर्वे मातुलुङ्गार्द्रकाम्बुना ।
त्रिवारं भाविताः शुष्का भवेयुर्दोषवार्जिता ॥ ३२२ ॥
महारसः स एव स्याद्वन्याद्युपरसाः स्मृताः ।
गन्धको वज्रवैक्रान्तौ सिन्दूरं बोलगौरिकम् ॥ ३२३ ॥
समुद्रफेनः खटिकाद्वयं शम्बूकताक्ष्यर्जौ ।
कासीसं कान्तपाषाणो वराटी शुक्तिहिङ्गुलाः ॥ ३२४ ॥
कङ्कुष्ठं शङ्खभूनागौ टङ्कणं च शिलाजतु ।
उक्ता उपरसा एते द्रव्यनिर्णयकारिभिः ॥ ३२५ ॥

अन्ये तु

अभ्रवैक्रान्तमाक्षीकविमलाद्रिजसस्यकम् ।
चपलो रसकश्चेति ज्ञात्वाऽष्टौ संहरेद्रसान् ॥ ३२६ ॥
गन्धाश्मगौरिके काङ्क्षीकासीसालशिलाञ्जम् ।
कङ्कुष्ठं चेत्युपरसा अष्टौ पारदकर्मणि ॥ ३२७ ॥

इति श्रीसौराष्ट्रदेशोद्भवसारस्वतकुलावतंसोपाध्यायश्रीमाधवविरचिते आयुर्वेदप्रकाशे द्वितीयोऽध्यायः ॥

जे साधारण रसांत मोडतात त्यांना महाळुंगाच्या आम्लरसाची तीन वेळ भावना देऊन शुष्क केलें म्हणजे त्यांचे दोष जाऊन ते शुद्ध होतात. महारस निराळे; आणि गन्धक वगैरे जे खनिज आहेत त्यांना उपरस म्हणतात. ते उपरस असेः—गन्धक,दगडी अभ्रक, वैक्रान्त, सिन्दूर, बोळ, काव, समुद्रफेस, खडू, चुनखडी, लहान शंख, रसांजन, हिराकस, लोहचुम्बक, कवडी, शिंपले, हिंगुळ, कंकुष्टु,

बृहत्शंख, भूनाग, टाकणखार आणि शिलाजित हे होत. ह्यांना पदार्थशास्त्रज्ञांनीं उपरस म्हणून मानलेले आहेत. रस म्हणजे पारा, आणि उपरस म्हणजे जवळ जवळ पाऱ्याप्रमाणें गुणकारी अशीं खनिज द्रव्यें. (३२५)

दुसरे कांहीं ग्रंथकार

निराळे उपरस देतात, ते असेः--अभ्रक, वैक्रान्त, माक्षिक, विमल, गेरू, हिराकस, चपल, आणि रसक असे आठ आहेत. यावरून उपरस म्हणजे काय. ह्याची साधारण कल्पना होते. ह्या उपरसांच्या योगानें रसबंधन करावें. (३२६)

याशिवाय दुसरेहि उपरस आहेत ते–

गन्धक, गेरू, कांक्षी (एक प्रकारची माती आहे), हिराकस, हरताळ, मनशीळ, सुरमा आणि कंकुष्ठ हे ते आठ उपरस होत. यांचा उपयोग पाऱ्याचें बंधन आणि रसायन करण्याकडे करावयाचा असतो. (३२७)

दुसरा अध्याय समाप्त.

अथ तृतीयोऽध्यायः।

अथ धातूपधातुनिर्णयः।

सुवर्णं रूप्यकं ताम्रं वङ्गं जसदसीसकम्।
लोहं चैते मताः सप्त धातवो गिरिसंभवाः ॥ १ ॥

अथ धातुशब्दस्य निरुक्तिः—

वलीपलितखालित्यकार्श्यबल्यजरामयान्।
निवार्य दधते देहं नृणां तद्धातवो मताः ॥ २ ॥

अथ सूर्यादिग्रहाणां धात्वाधिपत्यं व्यवहारार्थमाह——

ताम्रतारारनागाश्च हेमवङ्गौ च तीक्ष्णकम्।
कांस्यकं वर्तलोहं च धातवो नव ये स्मृताः ॥ ३ ॥
सूर्यादीनां ग्रहाणां ते कथिता नाभिभिः क्रमात्।
ताप्यं च विमला तुत्थं कांस्यं पित्तलकं तथा ॥ ४ ॥
सिन्दूरं शैलनिर्यासः स्मृताः सप्तोपधातवः।
स्वस्वधातुगुणैस्तुल्याः क्रियद्भिरपरेऽपि च।
गुणाः सन्ति विशेषेण द्रव्यान्तरसयोगजाः ॥ ५ ॥

अध्याय तिसरा

धातू आणि उपधातू यांविषयीं

मुख्य धातू सोनें, चांदी, तांबें, कथील, जस्त, शिसें आणि लोखंड असे सात आहेत. हे डोंगरांत व खाणींत सांपडतात. धात असें नांव कां पडलें, तर

अंगाला सुरकुत्या पडणें, केंस पांढरे होणें, टक्कल पडणें, वाळकुंडेपणा, दुबळेपणा, वगैरे म्हातारपणाचीं चिन्हें आणि रोग या सर्वांचें निवारण करून शरीर उत्तम स्थितींत जे धारण करूं शकतात ते धातू (२).

सूर्यादि ग्रह नऊ आहेत. त्यांपैकीं प्रत्येकाला प्रत्येक एकेक धातू प्रिय आहे. सूर्याला ताम्र, चंद्राला रौप्य, मंगळाला पितळ, बुधाला शिसें, गुरूला सुवर्ण, शुक्राला कथील, शनीला पोलाद, राहूला कासें, आणि केतूला घंटेची धातू याप्रमाणें प्रिय आहेत. त्यांचीं नांवें क्रमानें सांगितलीं. आतां सात उपधातू आहेत त्यांचीं नांवें सांगतों.

माक्षिक, रौप्यमाक्षिक, मोरचूद, कांसें, पितळ, शेंदूर आणि शिलाजित हे सात उपधातू आहेत. हे जिन्नस कांहीं कांहीं गुणांत तर धातूंच्या बरोबरीचे आहेत. शिवाय त्यांच्यांत दुसरेहि गुण आढळतात व विशेषेंकरून त्यांचा दुसऱ्या औषधांशीं संयोग केला असतां ते विशेष गुणकारी होतात (५)

अथ सुवर्णस्योत्पत्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि ।
पुरा निजाश्रमस्थानां सप्तर्षीणां जितात्मनाम् ।
पत्नीर्विलोक्य लावण्यलक्ष्मीः संपन्नयौवनाः ॥ ६ ॥
कन्दर्पदर्पविध्वस्तचेतसो जातवेदसः ।
पतितं यद्धरापृष्ठे रेतस्तद्धेमतामगात् ॥ ७ ॥
भवति कृत्रिमं चापि तद्रसेंद्रस्य वेधतः ।
मेरुसानुपतज्जम्बूफलाम्भोयोगतः परम् ॥ ८ ॥
दिव्यौषधिमणिस्पर्शादन्यद्भवति काञ्चनम् ।
एवं नानाविधानीह जायन्ते काञ्चनानि वै ॥ ९ ॥

सोनें.

त्याची उत्पात्ति, नांवें, गुण, लक्षण, शोधन व भस्माक्रिया यांविषयीं:--असें सांगतात कीं, पूर्वीं जितेंद्रिय असे सप्तर्षी आपापल्या आश्रमांत राहिले असतां तेथें त्यांच्या बायकाहि होत्या. त्या अतिशय तरुण व लावण्यसंपन्न असल्याकारणानें त्यांचें अप्रतिम रूप-लावण्य-पाहून खुद्द अग्नि कामाग्नीनें अतिशय होरपळून बेहोष झाला; आणि त्याचें वीर्य भूमीवर पडलें. तेंच वीर्य सुवर्णरूपानें आतां दृष्टीस पडतें. (७). सोनें हें स्वभावसिद्ध असें खाणींत सांपडतेंच; पण कृत्रिम सोनेंहि पाऱ्यापासून किमयेनें बनवितां येतें. शिवाय मेरु पर्वतापासून वाहणारा जो जांबूनद त्याच्या पाण्यांत पदार्थ बुडविल्यानें त्या पदार्थांचें उत्तम सोनें बनतें हाहि एक सोन्याचा प्रकार आहे (८).

त्याचप्रमाणें कांहीं दिव्यौषधि आणि परीस वगैरे मणि यांच्या स्पर्शानेंहि सोनें उत्पन्न होतें. याप्रमाणें सोन्याची उत्पत्ति पुष्कळ प्रकारांनीं झाली आहे. (९).

उक्तं च --

सुवर्णं पञ्चधा ख्यातं प्राकृतं सहजं परम् ।
वन्हिजं खनिजं तद्वद्रसेन्द्रवेधसंभवम् ॥ १० ॥
ब्रह्मांण्डं संवृतं येन प्रकृत्या प्राकृतं च तत् ।
ब्रह्मा येन सहोत्पन्नः सहजं हेम तत्स्मृतम् ॥ ११ ॥
वन्हिजं तु समाख्यातमेतानि दुर्लभानि हि ।
मनु (१४) वर्णं जगत्ख्यातं प्रायशः खनिजं हि यत् ॥ १२
तत्स्वर्णं मारणार्थं तु ग्राह्यं लक्षणलक्षितम् ।
वर्णमृत्तिकया लिप्त्वा मुनिशो ध्मापितं वसु ।
विशुध्यति वरं किंचिद्वर्णवृद्धिश्च जायते ॥ १३ ॥
यया कुम्भकाराः भाण्डानि रञ्जयित्वा पाचयन्ति सा वर्ण-
मृत्तिकेत्युच्यते, ' कावीस ' इति भाषा ।

असें सांगितलें आहे कीं,

सोन्याचे प्रकार पांच आहेत. पहिला प्राकृत, दुसरा सहज, तिसरा वन्हिज, चौथा खनिज, आणि पांचवा पारद वेधन. सर्व ब्रम्हांड ज्या प्रकृतीनें व्यापिलें आहे त्या प्रकृतीला प्राकृत म्हणतात.

दुसरा प्रकार हिरण्यगर्भ म्हणजे ब्रम्हदेवाबरोबरच जो उत्पन्न झाला तो. तिसरा अग्नीपासून झालेला. ह्या तिन्ही प्रकारचें सुवर्ण दुर्लभ आहे. (११॥) परंतु व्यवहारांत जें सोनें आहे तें बहुतकरून खाणींतून निघालेलें असतें. त्याचे एकाखालोखाल एक असे चौदा वर्ण म्हणजे " कस " लागतात. सुवर्ण भस्म करावयाचें असल्यास सर्व उत्तम लक्षणांनीं युक्त असें खाणींतील सुवर्ण घ्यावें. (१२॥). उजळा घालण्याची माती सोन्याला लिंपून सात वेळा आगींतून भाजून काढलें म्हणजे सोनें शुद्ध होतें आणि त्याचा रंगहि थोडासा उजळ होतो (१३ .

ज्या मातीनें कुंभार मडक्याला रंग देऊन तीं भाजून काढतात त्या मातीला उजळ्याची माती म्हणतात. ही कावेसारखी असते. उजळ्याला कावहि वापरतात.

मतान्तरम्—

वल्मीकमृत्तिका धूमं गैरिकं चेष्टका पटु ।
इत्येता मृत्तिकाः पंच जंबीरैरारनालकैः ॥ १४ ॥
पिष्ट्वा कण्टकवेध्यानि स्वर्णपत्राणि लेपयेत् ।
पुटेत्पृथुहसन्त्यां तु निर्वाते विंशदुत्पलैः ॥ १५ ॥
आधिकैर्वाऽधिके होम्नि यावद्वर्णो विवर्धते ।
इत्येवं पुटनैर्युक्त्या सम्यक् शुध्यति कांचनम् ॥ १६ ॥

दुसरा एक ग्रंथकार म्हणतो—

वारुळांतिल माती, घेरोसा, गेरु, विटकरीचा चुरा, सैन्धव या जिनसांना पंचमृत्तिका असें नांव आहे. ह्या पंचमृत्तिका घेऊन लिंबाचा रस आणि आरनाल यांच्या मिश्रणांत खलून त्या राबडीनें सोन्याच्या पातळ पत्र्यांना लेप करावा आणि रुंद तोंडाच्या एका शेगडींत वीस रानशेणी घालून त्या पत्र्यांना निवांत जागीं पुटाग्नि द्यावा (१५). ज्यास्त सोनें असल्यास थोड्या ज्यास्त रानशेणी घालाव्या. म्हणजे सोन्याचा रंग जास्त तजेलदार होतो आणि पुट देण्याच्या युक्तीनें सोनें शुद्ध होतें (१६).

मतान्तरम् । —

मृत्तिकाः पंच लुङ्गाम्लैः पंचवासरभाविताः ।
सभस्मलवणा हेम्नः शोधन्यः पुटपाकतः ॥ १७ ॥

अन्यच्च—

सुवर्णमुत्तमं वन्हौ विद्रुतं निक्षिपेत्त्रिशः ।
कांचनाररसे शुद्धं कांचनं जायते भृशम् ॥ १८ ॥

इति स्वर्णशोधनम् । अत्र केचित्——

इयमेव सुवर्णस्य शुद्धिर्नान्या हि विद्यते ।
तैले तक्रादिके या तु रूप्यादीनामुदाहृता ॥ १९ ॥

आणखी एक मतः——

महाळुंगाच्या आम्ल रसाचीं पुटें पंच मृत्तिकांनां पांच दिवस द्यावीं आणि त्या मृत्तिकेंत भस्म व मीठ मिसळावें व अशा मृत्तिकेचा लेप सोन्याला करावा आणि पुट द्यावें, म्हणजे पुटाग्नीनें ती मृत्तिका सुवर्णाला शुद्ध करते (१७).

आणखी एक मतः —

उत्तम सोनें घेऊन तें मुशींत घालून आटवावें आणि तो रस कांचनाराच्या रसांत ओतावा. याप्रमाणें तीन वेळ केलें असतां सोनें उत्तम रीतीनें शुद्ध होतें (१८).

याप्रमाणें सुवर्णशुद्धि सांगितली. कांहीं ग्रंथकार असेंहि म्हणतात कीं:—

सुवर्णाच्या शुद्धीचा प्रकार हाच आहे. दुसरा प्रकार नाहीं. तेल किंवा ताक यांत शुद्धि करावी म्हणून सांगितलें. तो शुद्धिप्रकार रुप्यासंबंधानें आहे असें समजावें (१९).

अथ स्वर्णनामानि—

स्वर्णं सुवर्णं कनकं हिरण्यं हेम हाटकम् ।
तपनीयं कलधौतं गाङ्गेयं भर्म कांचनम् ॥ २० ॥
चामीकरं शातकुम्भं तथा कार्तस्वरं च तत् ।
जाम्बूनदं जातरूपं महारजतमित्यपि ॥ २१ ॥

अथ सदसत्सुवर्णलक्षणम्——

दाहे रक्तं सितं छेदे निकषे कंकुमप्रभम् ।
तारशुल्बोज्झितं स्निग्धं कोमलं गुरु हेम सत् ॥२२॥
यच्छ्वेतं काठिनं रूक्षं विवर्णं समलं दलम् ।
दाहे छेदे सितं, श्वेतं कषे त्याज्यं लघु स्फुटम् ॥ २३ ॥

दलं नाम यद्धनाहतं स्फुटति ।

आतां सोन्याचीं नांवें सांगतोंः—

स्वर्ण, सुवर्ण, कनक, हिरण्य, हेम, हाटक, तपनीय, कलधौत, गांगे, भर्म, काञ्चन, चामीकद, शातकुम्भ, कार्तस्वर, जांबूनद, जातरूप, महारजत हीं सतरा नांवें सोन्याचीं आहेत(२१).

चांगल्या सोन्याची व हिणकस सोन्याची परीक्षाः—

जें सोनें तापवंलें असतां लाल होतें व तोडलें असतां तोडलेल्या ठिकाणीं पांढुरकें दिसतें आणि ज्याची कसोटीवर केसरी रंगाची रेघ उमटते तें सोनें उत्तम. चांगल्या सोन्यांत चांदी, तांबें वगैरेंची भेसळ नसते; आणि तें स्निग्ध, मऊ आणि जड असतें (२२).

जें सोनें पांढुरकें, कठिण, रुक्ष, बेरंग, मळकट पिचलेलें असतें, अगर तुकडा तोडला असतां किंवा तापविलें असतां जें काळवंडतें, ज्याची कसोटीवर पांढरी रेघ उठते व जें वजनांत हलकें भरतें तें सोनें टाकाऊ समजावें (२३).

पिचणारें म्हणजे हातोड्याच्या तडाक्यानें जें फुटतें तें पिचकें सोनें होय.

अथ स्वर्ण गुणाः—

स्वर्णं स्निग्धकषायातिक्तमधुरं दोषत्रयध्वंसनं
शीतं स्वादु रसायनं च रुचिकृच्चक्षुष्यमायुष्प्रदम् ।
प्रज्ञावीर्यबलस्मृतिस्वरकरं कान्तिं विधत्ते तनोः
संधत्ते दुरितक्षयं श्रियमिदं धत्ते नृणां धारणात् ॥ २४ ॥
दाहेऽतिरक्तमथ यत्ससितं छिदायां
काश्मीरकान्ति च विभाति निकाषपट्टे ।
स्निग्धं च गौरवमुपैति च यत्तुलायां
ग्राह्यं तदेव कनकं मृदु रक्तपीतम् ॥ २५ ॥

सोन्याचे औषधिगुण आहेत तेः—

सोनें हें स्निग्ध, तुरट, कडवट, मधुर, त्रिदोषनाशक आहे. तसेंच तें थंड, गोड, रसायन, रुचकर, नेत्रांना हितप्रद आणि आयुष्यवर्धकहि आहे. त्यानें बुद्धि, वीर्य, बल, स्मृति वाढते, आवाज खुलतो व शरीराला तजेला चढतो. दुष्कर्मानें उत्पन्न झालेल्या

रोगांचा तें नाश करतें आणि अंगावर धारण केंलें असतां पुरुषाला ऐश्वर्य आणतें (२४).

जें तापविलें असतां लाल भडक दिसतें, तोडलेल्या ठिकाणीं पांढुरकें असतें, कसावर घांसलें असतां ज्याची केशराप्रमाणें रेघ उमटते, जें स्निग्ध असून वजनांत जड भरतें, जें मऊ, लवचीक व रंगाला तांबूस पिंवळें असतें, तें सोनें घेण्यालायक होय (२५).

अन्यच्च --

सुवर्णं शीतलं वृष्यं बल्यं गुरु रसायनम्।
तुवरं स्वादु तिक्तं च पाके तु स्वादु पिच्छिलम् ॥ २६ ॥
पवित्रं बृंहणं नेत्र्यं मेधास्मृतिमतिप्रदम्।
हृद्यमायुष्करं कान्तिवाग्विशुद्धिस्थिरत्वकृत् ॥ २७ ॥
विषद्वयक्षयोन्मादत्रिदोषज्वरशोकजित्।
अपक्कमेव संशुद्धं, पक्कं तत्तु रसायनम् ॥ २८ ॥

आणखी गुणवर्णन असें कीं:--

सोनें हें थंड, धातुवर्धक, बलदायक, जड व रसायन आहे. तसेंच तें गोड, कडवट व तुरट असून पाककाळीं मधुर, परंतु थोडें पिच्छिल (मेणचट) आहे (२६). सोनें पवित्र, पौष्टिक आणि डोळ्यांना गुणकारी असतें. त्यानें बुद्धि, स्मृति आणि कल्पनाशक्ति येते. तें आल्हाददायक, आयुष्यवर्धक व कांतिवर्धक आहे. त्यानें वाचा स्पष्ट होते आणि मन स्थिर होतें (२७). तें स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारच्या विषांचा परिहार करूं शकतें आणि क्षय, उन्माद, त्रिदोष, ज्वर व शोक यांचा उच्छेद करतें. सोनें पक्क नसलें तरी तें शुद्ध असतें; आणि पचन केल्यानें तर रसायनच बनतें (२८).

अत्र पक्कापक्कप्रयोगाविवेको रसपद्धत्याम्।—

पक्कं हेम रसायनं विदुरथापक्कं तु सद्योविष-
प्रध्वंसि क्षयिबृंहणं कृमिहरं वर्ण्यं ज्वरिभ्यो हितम्
रूप्याद्येषु विमृश्यवादिभिरुपाक्षिप्तोऽस्त्यपक्के गुण-
स्ताम्रं चापि विषार्तिंहान्निगादितं वैद्यैरपक्वं ध्रुवम् ॥ २९ ॥

दृश्यते च वाग्भटे --

विषभुक्ताय दद्याच्च शुद्धायोर्ध्वमधस्तथा।
सूक्ष्मं ताम्ररजः काले सक्षौद्रं हृद्विशोधनम् ॥ ३० ॥

शुद्धे हृदि ततः शाणं हेमचूर्णस्य दापयेत्।
न सज्जते हेमपाङ्गे पद्मपत्रेऽम्बुवद्विषम् ॥ ३१ ॥

पक्व आणि अपक्व सुवर्णासंबंधानें रसपद्धतिकार म्हणतोः—

जें सोनें पक्व म्हणजे पूर्ण शुद्ध किंवा मारलेलें असतें तें रसायनच होय. परंतु जें अपक्व असतें, म्हणजे जें पूर्णपणें शुद्ध झालेलें नसतें, तेंसुद्धां विषबाधा तात्काळ नाहींशी करतें, क्षयी मनुष्याला पुष्ट बनवितें, कृमिनाश करते, व शरीराची कांति मनोहर करतें. तापकरी मनुष्याला तर तें फार हितकर आहे. इतकेंच नव्हें तर रौप्यादि धातु देखील अपक्व असले तरी त्याच्यांतहि कांहीं गुण आहे असें (धातुविद्याविशारदांनीं) सांगितलेंच आहे. उदाहरणार्थ अपक्व ताम्र (हें त्याज्यच, परंतु) तें विषनाशक आहे असें वैद्य खात्रीनें सांगतात (२९).

वाग्भटांतहि आढळतें कीं:—

पोटांत विष गेलें असतां शुद्ध केलेलें लोह घ्यावें; परंतु त्याचे अगोदर तांब्याची बारीक पूड मधाबरोबर घ्यावी. तांब्यानें (वान्ति होऊन) हृदय शुद्ध होतें. याप्रमाणें हृदय शुद्ध झाल्यावर मग सोन्याचा बारिक चुरा एक शाणप्रमाण द्यावा, म्हणजे कमळाच्या पानाला ज्याप्रमाणें पाणी चिकटून बसत नाहीं, त्याप्रमाणें सुवर्ण भक्षण करणाराच्या अंगांत विष राहूंच शकत नाहीं. (३१)

अथापक्वसुवर्णसेवने प्रकारद्वयमुक्तं तन्त्रान्तरे; तद्यथा—

अपक्वं हेम संघृष्टं शिलायां जलयोगतः।
द्रवरूपं तु तत्पेयं मधुना गुणदायकम् ॥ ३२ ॥
यद्वाऽपि तबका (वरका) ख्यं तु स्वर्णपत्रं विचूर्णितम्।
मधुना संगृहीतं चेत्सद्यो हन्ति विषादिकम् ॥ ३३ ॥
इत्यादि ज्ञेयम् ॥

त्याच ग्रंथांत अपक्व सुवर्ण सेवन करण्याचे दोन प्रकार वर्णन केले आहेत, ते असेः—

(१) अपक्व सुवर्ण सहाणेवर पाण्यांत उगाळावें. तें पाणी मध घालून प्राशन केलें असतां गुणकारी होतें. तसेंच सोन्याचा वर्ख घेऊन तो चुरून मधाशीं सेवन केल्यानें सर्व प्रकारची विषबाधा नाहींशी होते. (३३) असें समजावें. . . .

अन्यच्च गुणाविशेषादिकमाह—

सर्वौषधिप्रयोगेण व्याधयो न गता हि ये ।
कर्मभिः पंचाभिश्चापि सुवर्ण तेषु योजयेत् ॥ ३४ ॥
शिलाजतुप्रयोगैस्तु ताप्यसूतकयोस्तथा ।
अन्यै रसायनैश्चापि प्रयोगो हेम्न उत्तमः ॥ ३५ ॥

अथानुपानमाह—

मधवामलकचूर्णं तु सुवर्णं चेति तत्त्रयम् ।
प्राश्यारिष्टगृहीतोऽपि मुच्यते प्राणसंकटात् ॥ ३६ ॥
वचया बुद्धिकामस्तु श्रीकामः पद्मकेसरैः ।
शंखपुष्प्या वयोर्थी च विदार्या च प्रजार्थकः ॥ ३७ ॥

दुसऱ्या एके ठिकाणीं सोन्याचा विशेष गुण असा सांगितला आहे कीं:—

सर्व प्रकारचीं औषधें देऊन सुद्धां ज्याचा रोग हटत नाहीं, ज्यांना पंचकर्मानीं सुद्धां गूण पडत नाहीं, अशा रोग्यांनां सुवर्ण द्यावें. तें शिलाजित, माक्षिक आणि सूतक (खापरसूत) किंवा दुसऱ्या एखाद्या रसायनाशीं संयोग करून दिल्यास फार उत्तम. हा सोन्याचा प्रयोग उत्कृष्ट होय (३५).

सुवर्णाला अनुपान:—

मध, आवळकाठीचें चूर्ण हें सोन्याला उत्तम अनुपान होय. ह्या तिन्ही जिनसा एकत्र करून द्याव्या, म्हणजे भयंकर अरिष्टानें जरी रोग्याला पछाडला असला तरी त्या प्राणसंकटांतून रोगी बचावतो. ज्याला बुद्धिमांद्य असेल त्यानें वेखंडाबरोबर आणि आंगकांति उत्तम व्हावी अशी इच्छा असेल त्यानें कमळाच्या केसराबरोबर, तारुण्य हवें असेल तर त्यानें शंखपुष्पीबरोबर आणि संतति पाहिजे असेल त्यानें विदारी कंदाबरोबर सुवर्ण सेवन करावें (३७).

अथाशुद्धस्यासम्यङ्मारितस्य गुणाः—

बलं च वीर्यं हरते नराणा रोगव्रजं पोषयतीह काय ।
असौख्यकार्येव सदा सुवर्णमशुद्धमेतन्मरणं च कुर्यात् ॥३८॥
असम्यङ्मारितं स्वर्णं बलं वीर्यं च नाशयेत् ।
रोगान् करोति मृत्युं च तद्धन्याद्यत्रतस्ततः ॥ ३९ ॥

अथ स्वर्णादीनां मात्राकथनम् ।—

यववृद्धया प्रयोक्तव्यं हेम गुंजाष्टकं, रविः ।
तारं तद्द्विगुणं, लोहमन्यत्तु त्रिगुणाधिकं ॥ ४० ॥

गुंजामेकां समारभ्य यावत्स्युर्नवरक्तिकाः ।
तावल्लोहं समश्नीयाद्यथादोषबलं नरः ॥ ४१ ॥

परंतु केवळ अशुद्ध किंवा अर्धवट मारलेलें असें सोनें भक्षण करूं नये. कारणः—

तें पुरुषाचें बळ व वीर्य हरण करतें आणि शरीरात रोग उत्पन्न करतें. अशुद्ध सुवर्ण नेहमीं दुःखदायकच होय. किंबहुना तें प्राणघातहि करील (३८). जर अर्धवट मारलेलें सोनें खाण्यांत आलें तर वीर्य आणि बल यांचा नाश होतो, रोग होतात व मृत्यूहि येतो, म्हणून सोनें प्रयत्न करून उत्तम रीतीनें मारावें (३९).

सुवर्ण घेण्याचें प्रमाणः—

प्रथम जवाइतकें खावें. नंतर वाढवीत वाढवीत आठ गुंजांपर्यंत सुवर्ण देण्यास हरकत नाहीं. ताम्र किंवा रौप्य सोन्याच्या दुपटीपर्यंत द्यावें; आणि लोह तिपटीपर्यंत किंवा त्याहूनहि अधिक द्यावें (४०). लोहाला आरंभ एक गुंजेपासून करावा; आणि शेवटीं नऊ गुंजांइतकें लोह रोगाचा जोर आणि रोग्याची शक्ति हें पाहून द्यावें (४१).

अथ स्वर्णादिमारणे कियती परिभाषोच्यते; उक्तं च—

रसीभवन्ति लोहानि मृतानि सुरवंदिते ।
विनिघ्नंति जराव्याधीन् रसयुक्तानि किं पुनः ॥ ४२ ॥
लोहानां मारणं श्रेष्ठं सर्वेषां रसभस्मना ।
मूलीभिर्मध्यमं प्राहुः कनिष्ठं गंधकादिभिः ॥ ४३ ॥
अरिलोहेन लोहस्य मारणं दुर्गुणप्रदम् ।
रसादिद्रव्यपाकानां प्रमाणज्ञापनं पुटम् ॥ ४४ ॥
नेष्टो न्यूनाधिकः पाकः सुपाकं हितमौषधम् ।
पुटनात् स्याल्लघुत्वं च शीघ्रव्याप्तिश्च दीपनम् ।
जारितादपि सूतेंद्राल्लोहानामधिको गुणः ॥ ४५ ॥

अन्यच्च—

स्वर्णरूप्यवधे ज्ञेयं पुटं कुक्कुटकादिकम् ।
ताम्रे काष्ठादिजो वान्हिर्लोहे गजपुटानि च ॥ ४६ ॥

सुवर्णादिक धातूच्या भस्माचें महत्व किती आहे तें सांग-

देववंदिते पार्वती ! लोहादि धातू मारले म्हणजे ते पाऱ्या-प्रमाणेंच गुणकारी होतात, आणि ह्यातारपण व रोग नष्ट करतात; मग त्यांचा संयोग पाऱ्याशीं केला व तीं रोग्यांना दिलीं तर किती तरी झटपट रोग नाश करतील हें सांगावयास पाहिजे काय ? पाऱ्याच्या भस्माच्या योगानें लोहादि धातूंचीं भस्में करणें हा मार्ग उत्तम, वनस्पतींच्या मुळ्यांनीं भस्म करणें हा मार्ग मध्यम, आणि गन्धक वगैरे उपरस देऊन भस्म करणें हा कनिष्ठ मार्ग होय (४३).

त्यांतल्या त्यांत अरिलोहानें तर लोह मारूंच नये. तें भस्म फार वाईट. पुट देणें तेंहि रस, द्रव्य वगैरेचा पूर्ण पाक होईल अशा प्रमाणानें दिलें पाहिजे (४४). भट्टीची आंस जास्त होतां उपयोगी नाहीं व कमीहि होतां उपयोगी नाहीं. बरोबर भट्टी उतरली असतां औषध गुणकारी होतें. पुट दिल्यानें धातू हलका होतो व शरीर व्याप्त करून दीपन करतो (लोहादिकांची भट्टी जर साधली तर) अभ्रक वगैरे जिरविलेल्या पाऱ्यापेक्षांहि लोह गुणकारी होतें. (४५).

एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,

सुवर्ण व रौप्य भस्म करणें असल्यास आंच कुक्कटपुटाची द्यावी. ताम्र भस्माला अग्नि लाकडांचा द्यावा, व लोहभस्म कर-ण्याला गजपुठ द्यावें. (४६).

अथ स्वर्णादिधातूनां लोहत्वेन व्यवहार इत्याह रसपद्ध-तिकारः—

रुक्मं रूप्यमयांसि शुल्बमुरगं वंगं घनं वर्तकं ।
घोषं लोहामिदं त्रयं च चरमं नाम्नोपलोहं जगुः ।

अथैषां शोधनमाह--

तक्रे कांजिकमूत्रयोस्तिलभवे तैले कुलित्थाम्भसि ।
स्याच्छुद्धं परिवर्त्य लोहमाखिलं त्रिःसप्तधा वापितम् ॥

अथ व्याख्या-रुक्मं सुवर्णं, रूप्यं रंजत, अयांसि कांततीक्ष्ण-मुंडाख्यानि,भेदाभिप्रायेण बहुवचनं,शुल्बं ताम्रं, उरगं सीसं, वंगं त्रपु, घनं कांस्यं, वर्तकं पित्तलजातिभेदः, घोषं पंचरसं, इदमखिलं लोहं; तत्र रुक्मादिषट्कं मुख्यं लोहं, अन्त्यत्रयं घनादि तूपलोहं जगुः रसज्ञा इत्यर्थः । परिवर्त्य द्रवीकृत्य । त्रिःसप्तधा एकविंशतिवारम् । अखिलं स्वर्णादि घोषान्तम् ॥

मतान्तरम्—

सुवर्णरुप्यताम्रायःपत्राण्यग्नौ प्रतापयेत् ।
कृत्वा कण्टकवेधीनि दृष्ट्वा वन्हिसमानि च ॥ ४८ ॥
निर्षिंचेत्तप्ततप्तानि तैले तक्रे गवां जले ।
काञ्जिके च कुलित्थानां कषाये सप्तधा पृथक् ॥ ४९ ॥
एवं स्वर्णादिलोहानां विशुद्धिः संप्रजायते ।
तीक्ष्णादिलोहाकेट्टं तु संशोध्यं लोहवद्बुधैः ॥ ५० ॥

सुवर्ण, रौप्य इत्यादि धातूनां देखील लोह हेंच नांव वापरतात असे रसपद्धतिकार म्हणतो.

सोनें, चांदी, लोखंड, तांबें, शिसें, कथील, घन, वर्तक, घोष ह्या सर्वांनाच लोह म्हणतात. त्यांतल्या त्यांत पहिल्या सहांना लोह व बाकीच्यांना उपलोह म्हणतात.

आतां यांची शोधनक्रियाः—

ताक, कांजी व गोमूत्र यांचें मिश्रण, तिळेल, कुळथांचें पाणी हें क्रमानें घेऊन यांच्यांत सर्व प्रकारचे (लोह) धातू तापवून किंवा आटवून एकवीस वेळां बुडविले असतां शुद्ध होतात (४७).

या श्लोकाची व्याख्या अशीः—रुक्म म्हणजे सुवर्ण, रूप किंवा रजत म्हणजे चांदी, लोह म्हणजे चुंबक, पोलाद व बीड वगैरे सर्व प्रकारचें लोखंड, म्हणूनच मुळांत लोखंड शब्द बहुवचनी आहे. शुल्ब म्हणजे तांबें, उरग म्हणजे शिसें, वंग म्हणजे कथील, घन म्हणजे कांसें, वर्तक म्हणजे पितळेचाच आणखी एक प्रकार, घोष म्हणजे पंचरसी धातू या सर्वांचा लोहांतच समावेश होतो. पैकीं सोनें, चांदी वगैरे सहा धातूंना लोह आणि तोफ-धातु इत्यादि शेवटच्या तिहींना धातुशास्त्रांत उपलोह म्हणतात. " परिवर्त्य " या शब्दाचा अर्थ " आटवून " असा आहे. " निःसप्तधा " म्हणजे तीन वेळां सात, अर्थात् एकवीस वेळां असा भावार्थ आहे.

दुसऱ्या ग्रंथकाराच्या मतानें क्रिया अशी आहे कीं,

सोनें, चांदी व तांबें यांचे पत्रे " कंटकवेधी " सुईनें भोंक पडेल इतके म्हणजे कागदाप्रमाणें पातळ होतील इतके ठोकून तयार करून ते आगींत तापवावे, आणि तापून लाल झाले म्हणजे

लाल आहेत तोंच तेलांत किंवा ताकांत, अगर गोमूत्र, कांजी, हुलग्याचा काढा यांत पृथकपणें सात वेळ बुडवावे (४९); म्हणजे सुवर्णादि धातूंची शुद्धि होते. पोलाद वगैरे लोहकिट्ट ह्यांची शुद्धि लोहाप्रमाणेंच करावी (५०).

अथ नागवङ्गयोर्विशेषमाह—

नागवङ्गौ प्रतप्तौ च गालितौ तौ निषेचयेत् ।
सच्छिद्रश्रावपिहिते हण्डिकास्थे द्रवे शनैः ।
सप्तधैवं विशुद्धिः स्याद्रविदुग्धे च सप्तधा ॥ ५१ ॥

अन्यमतम्—

सर्वलोहानि तप्तानि कदलीमूलवारिणि ।
सप्तधाऽभिनिषिक्तानि शुद्धीमायान्त्यथोत्तमाम् ॥ ५२ ॥

अथ स्वर्णादिमारणम्—

सिद्धलक्ष्मीश्वरप्रोक्तप्रक्रियाकुशलो भिषक् ।
लोहानां सरसं भस्म सर्वोत्कृष्टं प्रकल्पयेत् ॥ ५३ ॥
शिलागन्धार्कदुग्धाक्ताः स्वर्णाद्याः सप्त धातवः ।
म्रियन्ते द्वादशपुटैः सत्यं गुरुवचो यथा ॥ ५४ ॥
इति सर्वधातुमारणं सामान्येन ॥

आतां शिसें–कथील यांच्या शुद्धिसंबंधाचा विशेष बंदोबस्त केला पाहिजे तो सांगतोः—

शिसें किंवा कथील हें तापवून पातळ केल्यानंतर शुद्धि करणारा द्रव एका जाड भांड्यांत ठेवावा व त्याच्यावर एक मजबूत झांकण बसवून त्या झांकणाला भोंक ठेवावें आणि त्या भोंकांतून शिशाचा किंवा कथलाचा पातळ रस भांड्यांतील द्रवांत हलकें हलकें ओतावा.* याप्रमाणें सात वेळ करावें. मग रुईच्या चिकांत सात वेळ याचप्रमाणें बुडवावा, म्हणजे शिसें किंवा कथील हे शुद्ध होतात. (५१).

दुसरें एक मतः—

सर्व प्रकारचे लोह तापवून (किंवा पातळ करून) केळीच्या कांद्याच्या रसांत सात वेळ बुचकळून काढले असतां उत्तम रीतीनें शुद्ध होतात (५२)

---

* शिशाचा किंवा कथलाचा रस पातळ पदार्थांत ओतल्याबरोबर आवाज होऊन वर उडतो व त्यामुळें अपघात होण्याचा संभव आहे; म्हणून बंदोबस्तानें शुद्धिक्रिया करावी.

आतां सामान्यतः धातूंच्या भस्माची क्रिया सांगतों.

हें भस्म करण्याला सिद्ध लक्ष्मीश्वरतंत्रांतील क्रिया वैद्याला माहीत पाहिजे. ती क्रिया ज्याला माहीत आहे तोच वैद्य वाटेल त्या (लोहाचें म्हणजे) धातूचें उत्कृष्ट भस्म करूं शकेल. (५३). तें असें कीं, मनशीळ व गंधक यांचा खल रुईच्या चिकांत करून त्याचा लेप सोनें, चांदी इत्यादि धातूंच्या पत्र्यांना करावा व नंतर भट्टींत पुट द्यावें. याप्रमाणें बारा पुटें दिलीं म्हणजे गुरु सांगतात त्याप्रमाणें खरोखरच त्या धातूचें भस्म होतें. (५४) याप्रमाणें धातूंची सर्वसामान्य अशी मारणक्रिया सांगितली.

स्वर्णस्य द्विगुणं सूतमम्लेन सह मर्दयेत् ।
तद्गोलकसमं गन्धं निदध्यादधरोत्तरम् ॥ ५५ ॥
चूर्णीकृतं ततो रुद्ध्वा शरावद्वयसंपुटे ।
मृदा सवस्त्रया कुट्टितया संवेष्टय यत्नतः ॥ ५६ ॥
त्रिंशद्वनोपलैर्दद्यात्पुटान्येवं चतुर्दश ।
निरुत्थं जायते भस्म गन्धो देयः पुनः पुनः ॥ ५७ ॥
इति द्विगुणरसयुक्तं सर्वोत्कृष्टं हेमभस्म ।

अथान्यमतम्—

शुद्धसूतसमं स्वर्णं खल्वे कृत्वा तु गोलकम् ।
उर्ध्वाधो गन्धकं दत्त्वा सर्वतुल्यं निरुध्य च ॥ ५८ ॥
त्रिंशद्वनोपलैर्देयाः पुटा ह्येवं चतुर्दश ।
निरुत्थं हेमभस्म स्याद्गन्धो देयः पुनः पुनः ॥ ५९ ॥
अत्रानुक्तमपि ज्ञेयं गोलकीकरणे बुधैः ।
जम्बीरद्रवदानं तु सर्वत्रैवं विनिश्चयः ॥ ६० ॥
इति सरसं हेममस्म ।
अथान्यः प्रकारः—

सुवर्णेऽग्नौ द्रुते सूतं दद्यात्सीसं कलांशकम् ।
अम्लेन मर्दयेत्तत्तु चूर्णायित्वा शनैः शनैः ॥ ६१ ॥
पश्चात्तद्गोलकं कृत्वा तुल्यगन्धरजोगतम् ।
शरावसंपुटे स्थाप्यं संधिं रुद्ध्वा पचेत्ततः ॥ ६२ ॥
त्रिंशद्वनोपलैः सम्यक्सप्तधैवं पुनः पुनः ।
अम्लेन गोलकं कृत्वा पचेत्स्वर्णमृतिर्भवेत ॥ ६३ ॥

अथान्य प्रकारः—

रसस्य भस्मना वाऽथ रसेनालेप्य वै दलम्।
हिङ्गुहिङ्गुलसिन्दूरशिलासाम्येन मेलयेत्॥ ६४॥
संमर्द्य कांचनद्रावैदीनं कृत्वाऽथ गोलकम्।
तं भाण्डस्य तले दत्त्वा भस्मना पूरयेद्दृढम्॥ ६५॥
अग्निं प्रज्वालयेद्गाढं द्युनिशं स्वाङ्गशीतलम्।
उद्धृत्य सावशेषं चेत्पुनर्देयं पुटद्वयम्।
निरुत्थं जायते भस्म सर्वकर्मसु योजयेत्॥ ६६॥

इति हेमभस्म॥

सुवर्णभस्माचा दुसरा एक प्रकार सांगतोः—— सोनें व त्याच्या दुप्पट पारा घेऊन दोहोंचा खल आम्ल रसांत करावा, आणि त्या मिश्रणाला गोळीसारखा आकार द्यावा. मग गंधक चुरून तें चूर्ण एका खापरांत ठेवून त्यावर ती गोळी ठेवून पुनः तिच्यावर गंधकाचा चुरा घालावा आणि वर दुसरें एक खापर पालथें बसवून संपुट बंद करावें. नंतर त्या संपुटाला मातकापडानें काळजीपूर्वक लपेटावें व तीस रानशेणीच्या अग्नीचें पुट द्यावें. याप्रमाणें चौदा पुटें दिलीं म्हणजे सोन्याचें भस्म निरुत्थ होतें. या क्रियेंत प्रत्येकवेळीं गंधकाचा चुरा नवीन दिला पाहिजे. (५७). याप्रमाणें दुप्पट पारा आणि एकपट सोने असा भस्मप्रकार आहे. आतां दुसऱ्या एका ग्रंथकाराचें मत सांगतों.:——

शुद्ध पारा आणि सोनें समभाग घेऊन त्यांची गोळी करावी आणि ती एका संपुटांत ठेवून तिच्याखालीं व वर गंधकाची पूड सोनें व पारा यांच्या बरोबरीनें द्यावें; आणि संपुट बंद करुन तीस रानशेणीच्या अग्नीचें एक पुट याप्रमाणें चौदा पुटें द्यावीं. म्हणजे सोन्याचें निरुत्थ भस्म होतें. मात्र गंधक प्रत्येक वेळीं पुनः नवीन दिला पाहिजे. (५९). जरी या श्लोकांत गोळी करतांना लिंबाच्या रसांत खलून गोळी करावी असें सांगितलेलें नाहीं, तरी अशा क्रियेंत जंबीर रस सर्व ठिकाणीं योजावयाचा असें निश्चयानें समजावें (६०) याप्रमाणें पारदयुक्त सुवर्णभस्माची क्रिया आहे.

आतां आणखी एक प्रकार सांगतों:—

सोनें मुशींत आटल्यावर त्यांत पारा व शिसें सोळाव्या हिश्शाइतकें टाकावें आणि सर्व मिश्रणाचा बारीक चुरा करून सर्वांचा खल एखाद्या आम्ल द्रव्याबरोबर करावा. नंतर मिश्रणाची गोळी बनवावी व गंधक समभाग घेऊन त्याची पूड गोळीच्या खालीं व वर घालून ती गोळी एका शरावसंपुटांत ठेवावी व त्याचें सांधे लेपानें चिणून टाकावे. मग ३० रानशेणींची आंच द्यावी. याप्रमाणें सात वेळ करावें; परंतु प्रत्येक खेपेस पुनः नवीन आम्ल रस घालून गोळी करीत जावी आणि आंच द्यावा, म्हणजे सुवर्णाचें भस्म होईल (६३).

दुसरा प्रकारः—

पाच्याचें भस्म घेऊन त्यानें किंवा नुसत्या पाच्यानेंच सोन्याच्या पातळ पत्र्यांना लेप करावा; व हिंग, हिंगूळ, शेंदूर, मनशीळ हे समभाग घेऊन कांचनाराच्या रसांत एकत्र करावें आणि सर्वांचा एकत्र खल एक दिवसभर करावा; म्हणजे मिश्रणाची गोळी बनते. ती गोळी एका मडक्यांत ठेवून वर राख बसवून मडकें तोंडातोंड रेचून भरावें आणि मडक्याखालीं एक अहोरात्र सपाटून जाळ लावावा. नंतर मडकें थंड होऊं द्यावें. आपोआप थंड झाल्यावर काढून पहावें. धातूचा अवशेष दिसल्यास पुनः तशींच आणखी दोन पुटें द्यावीं, म्हणजे सोन्याचें निरुद्ध भस्म होतें. त्याचा सर्व ठिकाणीं उपयोग करावा (६६).

अथान्यप्रकारः—

काञ्चनाररसैर्घृष्ट्वा समसूतकगन्धयोः ।
कज्जलीं हेमपत्राणि लेपयेत्समया तया ॥ ६७ ॥
कांचनाररजःकल्कैर्मूषायुग्मं प्रकल्पयेत् ।
धृत्वा तत्संपुटे गोलं मृन्मूषासंपुटे ततः ॥ ६८ ॥
निधाय संधिरोधं च कृत्वा संशोष्य गोलकम् ।
वन्हिं खरतरं कुर्यादेवं द्द्यात्पुटत्रायम् ।
निरुत्थं जायते भस्म सर्वकर्मसु योजयेत् ॥ ६९ ॥

इति हेमभस्म ॥

कांचनारप्रकारेण लांगली हन्ति कांचनम् ।
ज्वालामुखी तथा हन्यात्तथा हन्ति मनःशिला ॥ ७० ॥
लांगली कालिहारी । इति हेमभस्म ॥
शिलासिंदूरयोश्चूर्णं समयोरर्कदुग्धकैः ।
सप्तधा भावयित्वा तु शोषयेच्च पुनः पुनः ॥ ७१ ॥
तत्स्तु गालिते होम्नि कल्कोऽयं दीयते समः ।
अतितरां धमेद्भूयो यथा कल्को विलीयते ॥ ७२ ॥
एवं वेलात्रयं दद्यात्कल्कं हेममृतिर्भवेत् ।
इति रसवर्जं हेमभस्म ॥

आणखी एक प्रकारः—

पारा व गंधक समभाग घेऊन त्यांचा कांचनाराच्या रसांत खल करावा, म्हणजे कज्जली बनते. नंतर सोन्याचे पातळ पत्रे व कज्जली समभाग घेऊन तिचा त्या पत्र्यांना लेप करावा, व त्याच कांचनाराच्या चोथ्याच्या दोन मुशी संपुटासारख्या करून त्या संपुटांत पत्रे ठेऊन तें संपुट पुनः दुसऱ्या एका खापराच्या संपुटांत ठेवावें आणि सांध्यावर निरोधक लेप द्यावा. लेप वाळल्यावर संपुटाला कडक आंच द्यावी. याप्रमाणें तीन पुटें बसलीं म्हणजे सोन्याचें निरुत्थ भस्म होतें. त्याचा सर्व ठिकाणीं उपयोग करावा (६९).

ज्याप्रमाणें कांचनाराच्या रसाचा उपयोग केल्यानें सुवर्णभस्म होतें, त्याचप्रमाणें कळलावीच्या रसानेंहि होतें. कळलावीप्रमाणेंच मोरवेलचा रस किंवा मनशीळ यांचा उपयोग केल्यानेंहि भस्म होतें (७०).

लांगली म्हणजे कळलावीचा कांदा. हा मोठा तीव्र आहे.

आणखी एक प्रकारः—

मनशीळ व शेंदूर समभाग घेऊन चूर्ण करावें व त्याला रुईच्या चिकाच्यां सात वेळ भावना द्याव्या. प्रत्येक खेपेस भावना दिल्यावर पुनः पुनः वाळवावें (७१) नंतर सोनें मुशींत आटवून त्याच्यावर मनशीळ व शेंदूर यांचा कल्क समभाग टाकावा आणि पुनः इतकी कडक आंच द्यावी कीं, तो कल्क वितळून जाईल.

या प्रमाणें तीन वेळ नवीन कल्क द्यावा, म्हणजे सुवर्णाचें भस्म होतें (७२॥)

अथ स्वर्णभस्मपरीक्षा—

जांबवाभं सुवर्णस्य भस्म प्राहुर्भिषग्वराः ॥ ७३ ॥

अथ सुवर्णद्रुतिः ।—

चूर्णं सुरेंद्रगोपानां देवदालीफलद्रवैः ।
भावितं हेम्नि निक्षिप्तं करोति जलवद्द्रुतिम् ॥ ७४ ॥
मण्डूकास्थिवसाटंकहयलालेंद्रगोपकैः ।
कनकं प्रतिवापेन सुचिरं तिष्ठति द्रुतम् ॥ ७५ ॥

याप्रमाणें पाऱ्याचा जोड न देतां सुवर्णभस्म करण्याची क्रिया सांगितली.

आतां सुवर्णभस्माची परीक्षा सांगतोः—

रसशास्त्राच्या अनुरोधानें सुवर्णाचें भस्म सोन्याच्याच रसाप्रमाणें असतें (७३).

सोन्याची द्रुति म्हणजे पाणी करण्याची क्रिया.

इंद्रगोप कीटकांचें चूर्ण व देवडांगरीचा रस यांची भावना सोन्याला देत गेलें म्हणजे सोनें पाण्याप्रमाणें पातळ होतें ७४).

तसेंच बेडकाचीं हाडें व चरबी, आणि टांकणखार व घोड्याची लाळ व इंद्रगोप कीटक यांची भावना सोन्याला देत गेलें असतां सोनें पाण्याप्रमाणें पातळ होऊन नेहमीं तसेंच पातळ राहतें (७५).

अथ रूप्यस्योत्पत्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि ।

त्रिपुरस्य वधार्थाय निर्निमेषैर्विलोचनैः ।
शिवो निरीक्षयामास क्रोधेन परिपूरितः ॥ ७६ ॥
समभवत्ततस्तूल्का तस्यैकस्माद्विलोचनात् ।
वीरभद्रोऽपरस्मात्तु गणो वान्हिरिव ज्वलन् ॥ ७७ ॥
तृतीयो ह्यश्रुविन्दुस्तु लोचनादपतद्भुवि ।
तस्माद्रजतमुत्पन्नं नानाभूमिषु सांस्थितम् ।
भवति कृत्रिमं चापि वङ्गादेः सूतयोगतः ॥ ७८ ॥

आतां रुप्याची उत्पत्ति, नांवें, लक्षण, गुणधर्म व शोधन आणि भस्मक्रिया सांगतों.

पूर्वी त्रिपुरासुराचा वध करण्याकरतां शंकर तयार झाले, त्या वेळेस क्रोधानें संतप्त होऊन ते पापण्यासुद्धां न हलवितां एकसारखे टक लावून पाहूं लागले. तेव्हां त्यांच्या एका नेत्रांतून उल्का (अंतरिक्षांतील ज्वाला) निघाल्या; आणि दुसऱ्या नेत्रावाटे वीरभद्र व त्याचे सेवक हे निघाले. परंतु तिसऱ्या डोळ्यावाटे मात्र एक अश्रुबिंन्दु भूतलावर पडला. त्या आश्रुबिन्दुपासून रौप्य उत्पन्न झालें. तें आतां अनेक देशांत सांपडतें, किंवा कथील आणि पारा यांच्या संयोगापासून कृतीनेंहि बनवितां येतें. (७८)

अन्य तु—

सहजं कृत्रिमं चैव खनिजं रजतं त्रिधा ।
कैलासादिस्थितं यद्धि सहजं रजतं हि तत् ॥ ७९ ॥
रसेन्द्रवेधसंजातं संप्रोक्तं कृत्रिमं च तत् ।
हिमाचलादिभूमौ च जायते खनिजं च तत् ॥ ८० ॥
खनिजं मारणार्थं तु ग्राह्यं लक्षणलाक्षितम् ।
गुरु स्निग्धं मृदु श्वेतं दाहच्छेदघनक्षमम् ॥ ८१ ॥
वर्णाढ्यं चन्द्रवत्स्वच्छं रूच्यं नवगुणं शुभम् ।
कृत्रिमं काठिनं रूक्षं रक्तं पीतं दलं लघु ॥ ८२ ॥

दुसरे ग्रंथकार म्हणतात कीं:—

चांदी तीन प्रकारची असते. एक सहज, दुसरी कृत्रिम, आणि तिसरी खनिज. कैलास वगैरे दुर्गम पर्वतावर उघड्यावर सांपडते ती सहज. पाऱ्याच्या संयोगानें बनते ती कृत्रिम, आणि खाणींतून निघते ती खनिज.(८०) उत्तम लक्षणांनीं युक्त व खाणींत सांपडलेली अशी जी चांदी असेल तीच भस्माकारितां घ्यावी.

जडपणा, स्निग्धता, मऊपणा, पांढरा रंग,थोड्या आंचेनें पाणी न होणें, एकाएकीं न तुटणें, ठोकलें असतां पत्रा बनणें, उत्तम तजेला, आणि चंद्राप्रमाणें स्वच्छपणा हे नऊ गुण उत्तम चांदींत आढळतात.

कृत्रिम चांदी ही कठीण, रुक्ष, तांबुस, पिंवळसर, पिचणारी आणि हलकी असते. ८२)

गुणाः—

रूप्यं शीतं काषायाम्लं स्वादुपाकरसं सरम्।
वयसः स्थापनं स्निग्धं लेखनं वातापित्तजित्॥ ८३॥
प्रमेहादिकरोगांश्च नाशयत्यचिराद्ध्रुवम्।
गुटिकाऽस्य धृता वक्त्रे तृष्णाशोषविनाशनी॥ ८४॥

रसपद्धत्याम्—

अपक्करजतं नैव संयोज्य स्वर्णवद्ददे।
पक्वं भस्मापि तन्नैव योज्यं ताम्रादिभस्मवत्॥ ८५॥
अभावाद्व्यवहारस्य किंच श्वित्रहरं हि तत्।
इति लोकप्रासिद्धिस्तु तस्माद्योज्यं रसादिषु॥ ८६॥

चांदीचे औषधिगुणः—

रुपें हें थंड, तुरट, आम्ल, पाककाळीं मधुर आणि सारक आहे. त्यानें तारुण्य येतें. तें स्निग्ध असून लेखन आहे. तसेंच तें वात-पित्तनाशक आहे व प्रमेह वगैरे रोगांचा खात्रीनें तत्काळ नाश करतें; आणि त्याची गुटिका करून ती तोंडांत धरली असतां शोष पडत नाहीं.(८४)

रसपद्धतिग्रंथांत आढळतें कीं:—

सोनें अपक्व दिलें तरी चालतें. परंतु रौप्य हें अपक्व स्थितींत रोग्याला देऊं नये; आणि जरी तें पक्व असलें, म्हणजे पूर्णपणें भस्म झालेलें असलें, तरी ताम्रभस्माप्रमाणें नुसतेंच देऊं नये. कारण तसें देण्याचा प्रघात नाहीं. रौप्यभस्मानें पांढरें कोड़ जातें हें लोकांत प्रसिद्ध आहे; म्हणून रौप्यभस्म पाऱ्याचें भस्म वगैरे बरोबर द्यावें. (८६)

गुणग्रन्थेऽपि क्वचित्—

प्रोक्तकर्मसु संयोज्यं रजतं हि विधानतः। इति॥

अथाशुद्धरजतमारणे दोषमाह—

तारं शरीरस्य करोपि तापं विड्बन्धतां यच्छति शुक्रनाशम्।
वीर्यं बलं हन्ति तनोश्च पुष्टिं महागदान् पोषयति ह्यशुद्धम्॥

अथ रजतमारणम्। तत्रास्य विशेषशोधनम्। उक्तं च—

तैलतक्रादिशुद्धस्य रजतस्य विशेषतः।
शोधनं मुनिभिः प्रोक्तं तद्यथावान्निगद्यते॥ ८८॥

सूक्ष्मपत्रीकृतं रूप्यं प्रतप्तं जातवेदासि ।
निर्वापितमगस्त्यस्य रसे वारत्रयं शुचि ॥ ८९ ॥
तारं तप्तं त्रिधा क्षिप्तं तैले ज्योतिष्मतीभवे ।
खर्परे भस्मचूर्णाभ्यां परितः पालिकां चरेत् ॥ ९० ॥
तत्र रूप्यं विनिक्षिप्य समसीससमन्वितम् ।
जातसीसक्षयं यावद्धमेत्तात्वपुनः पुनः ।
इत्थं संशोधितं रूप्यं मृतं योज्यं रसादिषु ॥ ९१ ॥

कोठें कोठें गुणवर्णनांत असेंहि आढळतें कीं:--

वर सांगितलेल्या स्थितींत रोग्याला पद्धतशीर रीतीनें रौप्य-भस्म द्यावें.

रौप्य शुद्ध केल्यावांचून जर त्याचें भस्म केलें तर दोष आहे. तो असा कीं:--

अशुद्ध रुप्याचें भस्म ज्वर उत्पन्न करतें व मलबद्धता आणुन रेताचा नाश करतें; आणि वीर्य, बळ व शरीराची पुष्टि ह्यांची हानि करून शरीरांत भयंकर रोग मात्र माजवतें. (८७)

रौप्यभस्माक्रिया सांगतों.-परंतु त्यापूर्वी चांदी विशेष प्रकारानें शुद्ध केली पाहिजे ती अशी:--

जरी चांदी तेल, ताक इत्यादिकांत बुचकळून शुद्ध केलेली असली तरी पूर्वीच्या ऋषींनीं तिची जी विशेष शुद्धि सांगितली आहे तिचें व्यवस्थितपणें वर्णन करतों.(८८)चांदीचे पातळ पत्रे करून भट्टींत तापवावे आणि ते अगस्त्याच्या पाल्याच्या रसांत तीन वेळ बुडवावे, म्हणजे शुद्ध होतात (८९). चांदी तापवून मालकांगोणीच्या तेलांत तीन वेळ बुडवावी, म्हणजे शुद्ध होते.(किंवा) एका खापरांत राख आणि चुना यांचें आळें करून त्यांत चांदी व तिच्या-इतकेंच शिसें टाकून शिसें जळून जाईपर्यंत भट्टींत फुंकावें, म्हणजे चांदी शुद्ध होते. अशी शुद्ध चांदी घेऊन मारून ती रसायनांत योजावी (९१).

अथ मारणम् --

विधाय पिष्टिं सूतेन रजतस्याथ मेलयेत् ।
तालं गन्धं समं शुद्धं तन्मर्द्यं निम्बुकद्रवैः ॥ ९२ ॥
गोलकीकृत्य संशुद्धं मूषायां स्वर्णवद्दृढम् ।
द्विस्त्रैः पुटैर्भवेद्भस्म योज्यमेतद्रसादिषु ॥ ९३ ॥

इति सरसं रूप्यभस्म । मतान्तरम्—

हिङ्गूलेन च माक्षिकेण बलिना तुल्येन जम्भाम्भसा
लिप्तं रौप्यदलं पुटेन पटुना स्याद्भस्म मूषास्थितम् ॥ ९४ ॥

पटुना पुटेन गजपुटेन । मतान्तरम्—

तारपत्रं तुर्यभागं भागैकं शुद्धतालकम् ।
एतज्जम्बीरजद्रावैः कल्कीकृत्याखिलं भिषक् ॥ ९५ ॥
तेन तारस्य पत्राणि लेपयेच्छोषयेत्ततः ।
शरावसंपुटे तेषामूर्ध्वाधो गन्धकं क्षिपेत् ॥ ९३ ॥
तारतुल्यं ततस्तानि रुद्धा गजपुटे पचेत् ।
त्रिंशदुत्पलकैर्वाऽपि विंशद्भिस्तारपञ्चता ॥ ९७ ॥
भागैकं तालकं मर्द्यं याममम्लेन केनचित् ।
तेन भागत्रयं तारपत्राणि परिलेपयेत् ॥ ९८ ॥
घृत्वा मूषापुटे रुद्धा पुटेत्त्रिंशद्धनोत्पलैः ।
समुद्धृत्य पुनस्तालं दत्त्वा रुध्द्धा पुटे पचेत् ।
चतुर्दशपुटैरेवं तारं भस्म प्रजायते ॥ ९९ ॥

इति रूप्यभस्म ॥

रौप्य भस्मक्रियाः—

पाऱ्याचा पिष्टीबंध करून त्यांत चांदी मिसळावी, आणि त्या मिश्रणाचा खल शुद्ध हरताळ व गंधक समभाग घेऊन त्यांचे-बरोबर लिंबाच्या रसांत करून गोळी बनवावी. ही शुद्ध चांदीची गोळी सुवर्णाप्रमाणेंच संपुटांत ठेवून पुट द्यावें. दोन तीन पुटें दिलीं म्हणजे चांदीचें भस्म होतें. तें रसायनाबरोबर द्यावें (९६). याप्रमाणें पाऱ्याचा जोड देऊन चांदीचें भस्म करावें. दुसरें एक मत असें आहे कीं—

हिंगूळ, माक्षिक आणि गंधक समभाग घेऊन त्यांचा लिंबाच्या रसांत खल करून त्या राबडीनें चांदीच्या पत्र्याला लेप करावा आणि मुशींत ठेवून उत्कृष्ट पुट द्यावें, म्हणजे भस्म होतें (९४).

उत्कृष्ट पुट म्हणजे " पटु पुट. " त्याचा अर्थ " गजपुट " असा आहे.

टिळक ग्रंथसंग्रहालय, पुणे

आणखी एक मत असें आहे:—

चांदीचा पत्रा चार भाग, व शुद्ध हरताळ एक भाग असें घेऊन लिंबाच्या रसाशीं खल करून राबडी करावी आणि तिनें चांदीच्या पत्र्यांना लेप द्यावा. लेप वाळल्यावर ते पत्रे संपुटांत ठेवून त्यांच्या खालीं वर चांदीच्या भारोभार गंधक द्यावा आणि संधिलेप करून तीस किंवा वीस गवऱ्यांच्या अग्नीनें "गजपूट" द्यावें. (९७)

चांदी पांच भाग व हरताळ एक भाग घेऊन एखाद्या आम्ल रसाबरोबर त्यांचा खल एक प्रहरभर करावा. म्हणजे राबडी होते. नंतर तीन भाग चांदीचे पत्रे करून त्यांना त्या राबडीचा लेप करावा आणि वाळल्यावर मुशीच्या संपुटांत पत्रे ठेवून संधिलेप करून तीस गवऱ्यांच्या अग्नीचें पुट द्यावें. निवाल्यावर काढून पुनः हरताळ देऊन संपुटांत घालून बंद करून पुट द्यावें. याप्रमाणें चौदा पुटें दिलीं म्हणजे चांदीचें भस्म होतें (९९).

स्नुहीक्षीरेण संपिष्टं माक्षिकं तेन लेपयेत्।
तालकस्य प्रकारेण तारपत्राणि बुद्धिमान्।
चतुर्दशपुटैरेवं तारं भस्म प्रजायते ॥ १०० ॥

इत्यपि रूप्यभस्म। इति रसं विना मध्यमं रूप्यभस्म।

मतान्तरम्—

सूतगन्धकयोस्तारतुल्ययोः कज्जलीं भिषक्।
द्रवीकृत्य कुमार्यद्भिस्तारपत्राणि लेपयेत् ॥ १०१ ॥
शरावसंपुटे रुध्द्वा त्रिंशदुत्पलकैः पचेत्।
द्विवारं रजतस्याशु भस्म स्यात् प्रायशः सितम् ॥ १०२ ॥

इत्यपि रससंयुक्तं रूप्यभस्म। अथ द्रुतिः—

शतधा नरमूत्रेण भावयेद्देवदालिकाम्।
तच्चूर्णावापमात्रेण द्रुतिः स्यात्स्वर्णतारयोः ॥ १०३ ॥

रौप्य भस्माचा दुसरा एक प्रकारः—

त्रिधारी निवडुंगाच्या चिकांत माक्षिक खलून त्या राबडीनें चांदीच्या पत्र्यांना लेप देऊन हरताळाप्रमाणें कृति करावी. वरच्याप्रमाणें चौदा पुटें दिलीं गेलीं म्हणजे चांदीचें भस्म होईल. (१००). याप्रमाणें मध्यम जातीचें रौप्यभस्म सांगितलें.

आतां आणखी एकाचें मत लिहितोंः—

चांदीच्या भारोभार पारा आणि गंधक घेऊन त्यांची कज्जली करावी आणि ती कोरफडीच्या रसांत खलून राबडी करून त्या राबडीनें चांदीच्या पत्र्यांना लेप करावा. लेप वाळल्यावर पत्रे खापराच्या संपुटांत ठेवून संधिलेप करून तीस गोवऱ्यांच्या अग्नींचें पुट द्यावें. याप्रमाणें दोन पुटें मिळाल्याबरोबर चांदीचें ताबडतोब भस्म होतें आणि तें बहुतकरून पांढरें असतें (१०२).

आतां रौप्यद्रुति सांगतोंः—

देवडांगरीला नरमूत्राच्या शंभर भावना द्याव्या, आणि चूर्ण करावें. त्या चूर्णाचा चुवा चांदीला दिला म्हणजे तत्क्षणीं चांदीचें पाणी होतें व सोन्याचेंहि होतें (१०३).

अथ ताम्रस्योत्पत्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि—

शुक्रं यत्कार्तिकेयस्य पतितं धरणीतले ।
तस्मात्ताम्रं समुत्पन्नामिदमाहुः पुराविदः ॥ १०४ ॥
ताम्रं तु द्विविंध प्रोक्तं नेपालं म्लेच्छनामकम् ।
अतिशोणं मृदु कृष्णं कठिनं, क्रमशः स्मृतम् ॥ १०५ ॥

नामानि—

ताम्रमौदुम्बरं शुल्बमुदुम्बरामितो स्मृतम् ।
रविप्रियं म्लेच्छमुखं सूर्यपर्यायनामकम् ॥ १०६ ॥

ताम्राची उत्पत्ति, नांवें, लक्षण, गुणधर्म आणि शोधन व मारण.

कार्तिकस्वामीचें रेत जमीनीवर पडलें. त्यापासून ताम्र उत्पन्न झालें असें ग्रंथकार म्हणतात. तें ताम्र दोन प्रकारचें आहे. एक नेपाळी आणि दुसरें म्लेंच्छ. नेपाळी ताम्र लाल आणि मऊ असतें व म्लेंच्छ ताम्र काठिण असून काळें असतें (१०५).

नांवेंः—ताम्र, औदुंबर, क्षुल्ब, उदुंबर, रविप्रिय, म्लेंच्छमुख, सूर्य हीं तांब्याचीं नांवें आहेत (१०६).

लक्षणम्—

जपाकुसुमसंकाशं स्निग्धं मृदु घनक्षमम् ।
लोहनागोज्झितं ताम्रं नेपालं मृत्यवे शुभम् ॥ १०७ ॥
कृष्णं रूक्षमतिस्तब्धं श्वेतं चापि घनासहम् ।
लोहनागयुतं शुल्बं म्लेच्छं दुष्टं मृतौ त्यजेत् ॥ १०८ ॥

अन्यच्च—

न विषं विषमित्याहुस्ताम्रं तु विषमुच्यते ।
एको दोषो विषे ताम्रे त्वष्टौ दोषाः प्रकीर्तिताः ॥ १०९ ॥
भ्रमो मूर्च्छा विदाहश्च स्वेदक्लेदनवान्तयः ।
अरुचिश्चितसंत्ताप एते दोषा विषोपमाः ॥ ११० ॥
तैलक्रादिशुद्धस्य तद्दोषाविनिवृत्तये ।
शुल्बस्य शोधनं प्राज्ञैर्विशेषास्तमुदाहृतम् ॥ १११ ॥

तांब्याचें लक्षणः—तांबें जपाकुसुमाप्रमाणें डाळिंबी रंगाचें मवाळ, मऊ आणि ठोकलें असतां पातळ पत्रे होण्यासारखें (म्हणजे घनवर्धनीय) असतें. नेपाळी ताम्रांत लोखंड किंवा शिसें नसतें. भस्म करण्याला नेपाळी ताम्र उत्तम (१०७). दुसरें जें म्लेंच्छ ताम्र म्हणून असतें तें काळें, रुक्ष, वद्बद वाजणारें, पांढुरकें व हातोड्यानें ठोकलें असतां फुटणारें असें असतें. अशा तांब्यांत लोखंड, शिसें यांची भेसळ असते, म्हणुन भस्म करण्याकरतां म्लेंच्छ ताम्र घेऊं नये. आणखी असें कीं,

ज्याला विष असें म्हणतात तो पदार्थ खरोखरी विष नव्हे, तर तांबें हेंच विष आहे. कारण विषांत दोष एकच; परंतु ताम्रांत आठ दोष आहेत (१०९). चक्कर येणें, मूर्च्छा आणणें, अंगाची आग करणें, घाम फुटणें, आंग चिकट होणें, वान्ति होणें, रुचि नाहींशी होणें आणि संताप होणें असे आठ प्रकारचे विषाप्रमाणें विकार (अशुद्ध) ताम्रानें होतात. ते दोष घालविण्याकरितां तापलेलें तांबें तेलांत व ताकांत बुडवून तें शुद्ध करतात. परंतु त्याची खरी शुद्धि पुढें सांगितलेल्या विशेष प्रकारानें केली पाहिजे (१११).

यथा—

स्नुह्यर्कक्षीरासिन्धूत्थैस्ताम्रपत्राणि लेपयेत् ।
अग्नौ प्रताप्य निर्गुण्डीरसे संसेचयेत्त्रिशः ।
स्नुह्यर्कक्षीरसेकैर्वा शुल्बशुद्धिः प्रजायते ॥ ११२ ॥

अन्यमतम्—

गोमूत्रेण पचेद्यामं ताम्रपत्रं दृढाग्निना ।
साम्लक्षारेण संशुद्धिं ताम्रमाप्नोति सर्वथा ॥ ११३ ॥

इति विशेषशुद्धिः

तो प्रकार असा:—

त्रिधारी निवडुंग व रुई यांचा चीक आणि मीठ हीं एकत्र करून त्याचा लेप तांब्याच्या पत्र्यांना द्यावा आणि ते पत्रे भट्टीत लाल करून निगुंडीच्या रसांत तीन वेळ बुडवावे किंवा त्रिधारी निवडुंग व रुईचा चीक यांत बुडविले तरी ताम्राची शुद्धि होते (११२).

दुसऱ्या एकाच्या मतानें:—

कडक आंच लावून त्या अग्नीवर गोमूत्रांत तांब्याचा पत्रा एक प्रहरपर्यंत उकळावा, किंवा आम्ल व क्षार यांच्या मिश्रणांत उकळावा, म्हणजे तांब्याची सर्व तऱ्हेची शुद्धि झाली (११३).

अथ मारणम्—

सूक्ष्माणि ताम्रपत्राणि कृत्वा संस्वेदयेद्बुधः ।
वासरत्रायमम्लेन ततः खल्वे विनिःक्षिपेत् ॥ ११४ ॥
पादांशं सूतकं दत्त्वा याममम्लेन मर्दयेत् ।
तत उद्धृत्य पत्राणि लेपयेद्द्विगुणेन च ॥ ११५ ॥
गन्धकेनाम्लघृष्टेन तस्य कुर्याच्च गोलकम् ।
ततः पिष्ट्वा च मीनाक्षीं चांगेरीं वा पुनर्नवाम् ॥ ११६ ॥
तत्कल्केन बहिर्गोलं लेपयेद्धत्तूरोन्मितम् ।
घृत्वा तद्गोलकं भाण्डे शरावेण च रोधयेत् ॥ ११७ ॥
वालुकाभिः प्रपूर्याथ विभूतिलवणाम्बुभिः ।
दत्त्वा भाण्डमुखे मुद्रां ततश्चुल्ल्यां विपाचयेत् ॥ ११८ ॥
क्रमवृद्धाग्निना सम्यग्यावद्यामचतुष्टयम् ।
स्वाङ्गशीतं समुधृत्य मर्दयेत्सूरणद्रवैः ॥ ११९ ॥
यामैकं गोलकं तच्च निक्षिपेत्सूरणोदरे ।
मृदा लेपस्तु कर्तव्यः सर्वतोऽगुलमात्रकः ॥ १२० ॥
पाच्यं गजपुटे क्षिप्तं मृतं भवति निश्चितम् ।
वमनं च विरेकं च भ्रमं क्लममथारुचिम् ।
विदाहं स्वेदमुत्क्लेदं न करोति कदाचन ॥ १२१ ॥
चांगेरी चतुष्पत्रा, मीनाक्षी हुनगुंदा पत्रशाकम् ।

इति ताम्रभस्म ।

याप्रमाणें विशेष शुद्धि सांगितली. आतां मारणक्रिया सांगतों.

तांब्याचे पातळ पत्रे करून त्यांचें आम्लरसांत तीन दिवस स्वेदन करावें आणि मग काढून खलांत टाकावें. नंतर चौथ्या हिश्शाइतका पारा त्यांत घालून आम्ल रसाबरोबर एक प्रहर खल करावा.मग ते काढून घ्यावे आणि दुप्पट गंधक घेऊन तो आम्लांत खलून त्या गंधकानें त्या पत्र्यांस लेप द्यावा (११५) आणि खलून गोळा करावा. मग मीनाक्षी (जलपिंपळी), चुका, व पुनर्नवा हे एकत्र वांटून त्या चोथ्यानें ताम्राच्या गोळ्यास दोन बोटें जाडीचा लपेटा द्यावा आणि तो गोळा खापराच्या मडक्यांत ठेऊन त्याच्यावर झांकण बसवावें आणि मडकें वाळूनें, राखेनें आणि मिठानें भरावें व तोंड बंद करून संधिलेप करावा, आणि नंतर हंडी चुलीवर ठेवून पचन करावें. (११६). अग्नि क्रमानें वाढता असा चार प्रहर एकसारखा द्यावा आणि भट्टी आपोआप थंड झाल्यावर ताम्राचा गोळा काढून त्याचा सुरणाच्या रसाशीं एक प्रहरपर्यंत खल करावा व सुरणाचाच कांदा कोरून त्यांत तो गोळा बसवून तोंड बंद करून कांद्याभोंवतीं एक बोटभर जाडीचा मातीचा लेप द्यावा आणि वाळल्यावर गजपुटाची आंच द्यावी, म्हणजे त्या तांब्याचें खाक्षीनें भस्म होईल. (१२०॥)

अशा रीतीनें ताम्र मारलें गेलें म्हणजे त्यापासून वान्ति, जुलाब, भ्रमण, थकवा, अरुचि, अंगाची आग, घाम सुटणें, अंग चिकट होणें, वगैरे विकार केव्हांहि होत नाहींत (१२१).

मुळांत " चांगेरी, " मीनाक्षी " असे शब्द आहेत. त्यांचा अर्थ अनुक्रमें आंबटचुका व जलपिंपळी असा आहे. ह्या पालेभाज्या असतात. याप्रमाणें ताम्रभस्मक्रिया सांगितली.

अथान्य प्रकारः-

ताम्रपादांशतः सूतं ताम्रतुल्यं तु गन्धकम् ।
मर्दयेद्यामयुग्मं तु यावत्कज्जलिका भवेत् ॥ १२२ ॥
तां तु कन्यारसैः पिष्ट्वा ताम्रपत्राणि लेपयेत् ।
संशुष्काणि ततस्तानि शेषकज्जलिकान्तरम् ॥ १२३ ॥
निक्षिप्य हण्डिकामध्ये शरावेण निरोधयेत् ।
सन्धिरोधं द्वयोः कुर्यादम्बुभस्माविलेपनैः ॥ १२४ ॥

हण्डिकां पटुनाऽऽपूर्य भस्मना वा गलावधि ।
पिधायारोप्य चुल्लथां तु वार्न्हि प्रज्वालयेद्दृढम् ॥ १२५ ॥
चतुर्यामं ततः स्वांगशीतलं तत्समुद्धरेत् ।
अम्लापिष्टं मृतं ताम्रं लिम्पेत्सूरणगं मृदा ।
पचेत्पांचमृतैर्वाऽपि त्रिधा वान्त्यादिशान्तये ॥ १२६ ॥

आतां दुसरा प्रकारः—

ताम्राच्या चौथ्या हिश्शाइतका पारा आणि तांब्याच्या भारोभार गंधक घेऊन त्यांचा एकत्र खल दोनप्रहरपर्यंत करावा; म्हणजे कज्जली बनेल. नंतर ती कज्जली कोरफडीच्या रसाशीं खल्लून त्या राबडीनें तांब्याच्या पत्र्यांना लेप द्यावा. लेप वाळल्यावर ते पत्रे व राहिलेली कज्जली असें मडक्यांत घालून शराबानें झांकून संधिलेप करावा. संधिलेप पाण्यांत भस्म कालवून त्यानें करावा. मग मडक्यांत सैंधव किंवा भस्म घालून मडकें गळ्याइतकें भरावें आणि तोंड बंद करून तें चुलीवर ठेवून कडक आंच चार प्रहरपर्यंत द्यावी (१२५) आणि थंड झाल्यावर काढून घ्यावें. अशा रीतीनें ताम्र मृत होतें. नंतर मृत ताम्र सुरणाच्या कांद्यांत ठेवून कांद्याला वर सांगितल्याप्रमाणें मातीचा लेप करावा आणि आंच द्यावी. * पंचामृतांत टाकून आंच दिली तरी चालेल. असें केल्यानें ताम्रभस्मापासून वान्ति वगैरे विकार होत नाहींत (१२६).

ह्या ठिकाणीं पुट सांगितलें आहे ते गजपुट समजावें.

अत्र गजपुटो बोध्यः ।
जम्भाम्भसा सैन्धवसंयुतेन सगन्धकं स्थापय शुल्बपत्रम् ।
पङ्क्तायमानं पुटयस्व युक्त्या वान्त्यादिकं यावदुपैति शान्तिम् ॥

अथ रससंयुक्तं ताम्रभस्म । रसपद्धत्याम्—

अर्धांशेन रसेन तुल्यबालिना जम्भाम्बुपिष्टेन च
लिप्त्वा ताम्रदलानि संस्तरचितान्यर्कस्य पक्वच्छदैः ।
भाण्डेऽरन्ध्राणि तिन्तिणीकविटपत्वग्भस्मसंपूरिते ।
घस्रैकं परिपाचितानि शुचिना तीव्रं म्रियन्ते सकृत् ॥ १२८॥

संस्तरचयन तु पक्वार्कपत्रं हण्किायां दत्त्वा तत्र, कज्जलीं तदुपरि ताम्रपत्रं पुनस्तदुपरि कज्जलीं तदुपरि पक्वार्कपत्रं, एवं

---

* पंचामृतः—दूध, दहीं, तूप, मध व साखर.

क्रमेणेति भावः । भाण्डेऽरान्धिणीत्यादि अयमर्थः—आदावरन्धवाति भाण्डे अम्लिकात्वग्भस्म चतुरङ्गलं दृढं प्रसार्य, तत्र ताम्रसंस्तरं दत्त्वा, तदुपरि पुनर्भस्मचूर्णं कृत्वा, उपरि शरावमृत्कर्पटानि दत्त्वा, चुल्लथामारोप्य प्रहरचतुष्टयपर्यन्तमाग्निं तीव्रतरं दत्त्वा तानि म्रियन्ते स्वाङ्गशितानि ग्राह्याणि । शुचिरत्र वान्हिः ।

अथान्य प्रकारः—

शुल्बपत्राणि सुतेन चतुर्थांशेन लेपयेत् ।
अम्लपिष्टेन द्विगुणमूर्ध्वार्धो दापयेद्दलिम् ॥ १२९ ॥
चांगेरीकल्कगर्भस्थं भाण्डे यामं पचेद्दृढम् ।
ताम्रपत्रं मृतीभूतं सर्वयोगेषु योजयेत् ॥ १३० ॥

अन्यच्च-

जम्बीररससंपिष्टरसगन्धकलेपितम् ।
ताम्रपत्रं शरावस्थं त्रिपुटैर्याति भस्मताम् ॥ १३१ ॥

अन्यच्च-

गन्धेन शिलया वापि रविदुग्धेन लेपितम् ।
जम्भाम्भसा च ताम्रं वै पुटैर्भस्मत्वमाप्नुयात् ॥ १३२ ॥

इति रसरहितं ताम्रभस्म मध्यमपक्षीयम् ।

रसपद्धतिकार म्हणतो:—

लिंबाच्या रसाशीं सैंधव व गंधक मिसळून त्यांत तांब्याचा पातळ पत्रा टाकावा. तो त्या राबडीनें लपेटला गेला म्हणजे युक्तीनें त्याला पुट द्यावें. म्हणजे (भस्म होऊन तें ताम्र) वान्ति, भ्रान्ति वगैरे करीत नाहीं (१२७). याप्रमाणें पारा देऊन ताम्रभस्माची क्रिया सांगितली. रसपद्धतिकार आणखी म्हणतो—

पारा तांब्याच्या अर्ध्या हिश्शानें व गंधक भारंभार घेऊन त्यांचा लिंबाच्या रसांत खल करून त्या राबडीनें तांब्याच्या पत्र्यांना लेप करावा. मग एक मडकें तळाशीं भोंक पाडलेलें घेऊन त्यांत चिंचेच्या सालीची राख भरावी व त्यावर तांब्याचे पत्रे व रुईचीं पिकलेलीं पानें यांचे आलटून पालटून थर द्यावे आणि (तोंड बंद करून) त्या मडक्याखालीं दिवसभर प्रखर अग्नि लावावा, म्हणजे तांब्याचें ताबडतोब भस्म होतें. (१०८).

थर कसे द्यावयाचे तें सांगतो. मडक्यामध्ये अर्ध्यानें रुईचीं पिकलेलीं पानें भरावीं; तीं अशीं. प्रथम पाऱ्यागंधकाची कज्जली,

तिच्यावर तांब्याचा पत्रा, पुनः त्याच्यावर कज्जली व तिच्यावर रुईचें पिकलेलें पान या क्रमानें थर द्यावे आणि मडक्यांत (याप्रमाणें) रुईचीं पिकलेलीं पानें अर्ध्यानें भरावीं,असा अर्थ आहे. अगोदर मडक्याच्या बुडाला एक भोंक पाडून मडक्यांत विंचेच्या सालीची राख बुडाशीं चार बोटेंपर्यंत दाबून भरावी, आणि मग त्याच्यावर वर लिहिल्यापमाणें तांब्याच्या पत्र्याचा थर द्यावा,आणि नंतर त्याच्यावर पुनः राख बसवून तोंडावर झांकण ठेवून तोंड व झांकण मातकापडानें बंद करावें आणि चुलीवर मडकें ठेवून चार प्रहरपर्यंत त्यास चांगली कडक आंच द्यावी. म्हणजे ताम्र मरतें. भट्टी थंड झाल्यावर ते पत्रे काढून घ्यावे. अग्नीबद्दल मुळांत " शुचिः " शब्द योजला आहे.

ताम्रभस्माचा आणखी प्रकारः——

तांब्याच्या चौथ्या हिश्शानें पारा घेऊन त्याचा ताम्रपत्रांनाः लेप करावा व दुप्पट गंधक घेऊन तो आम्लरसांत खलून ठेवावा. मग आंबट चुक्याच्या पाल्याची लुगदी करून तिच्या पोटांत ते पत्रे घालून त्याच्या खालीं व वर खललेला गंधक देऊन लुगदी बंद करून मडक्यांत ठेवावी व खूब पाचन करावें, म्हणजे ताम्राचें भस्म होतें. त्याचा वाटेल त्या रोगावर उपयोग करावा. (१३०)

आणखी प्रकारः—

पारा व गंधक यांचा लिंबाच्या रसांत खल करून त्याचा तांब्याच्या पत्र्यांना लेप देऊन ते पत्रे संपुटांत बंद करावे व तीन पुटें द्यावीं, म्हणजे ताम्राचें भस्म होतें. (१३१)

आणखी प्रकारः—

गंधक किंवा मनशिळ यांचा रुईचा चीक व लिंबाचा रस यांत खल करून ताम्रपत्रांना लेप द्यावा आणि पुट द्यावें, म्हणजे ताम्राचें भस्म होतें. (१३२) हा प्रकार पारा दिल्यावांचून ताम्रभस्म करण्याचा आहे. हें ताम्रभस्म मध्यम प्रतीचें असतें.

अथ सोमनाथी ताम्रभस्म-

शुल्बतुल्येन सूतेन बलिना तत्समेन च ।
तदर्धांशेन तालेन शिलया च तदर्धया ॥ १३३ ॥

तदर्ध पारदादर्धं तालं, तालार्धा मनःशिला ॥
विधाय कज्जलीं श्लक्ष्णां भिन्नकज्जलसंनिभाम् ।
यन्त्राध्यायाविनिर्दिष्टगर्भयन्त्रोदरान्तरे ॥ १३४
कज्जलीं ताम्रपत्राणि पर्यायेण विनिक्षिपेत् ।
प्रपचेद्यामपर्यन्तं स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ॥ १३५ ॥

अथ गुणाः—

तत्तद्रोगहरानुपानसाहितं ताम्रं द्विवल्लोन्मितं
संलीढं परिणामशूलमुदरं शूलं च पाण्डुं ज्वरम् ।
गुल्मप्लीहयकृत्क्षयाग्निसदनं मेहं च मूलामयं
दुष्टां च ग्रहणीं हरेद्ध्रुवामिदं श्रीसोमनाथाभिधम् ॥ १३६ ॥

ताम्रभस्मलक्षणम्—

बार्हिकण्ठप्रभं ताम्रं मृतं भवति केवलम् ।
पिष्टं चूर्णत्वमायाति सरसं चेत्सचान्द्रिकम् ॥ १३७ ॥

अथ ताम्रगुणाः—

ताम्रं कषायं मधुरं च तिक्तमम्लं च पाके कटु सारकं च ।
पित्तापहं श्लेष्महरं च शीतं तद्रोपणं स्याल्लघु लेखनं च १३८
पाण्डूदरार्शोगरकुष्ठकासश्वासक्षयान् पीनसमम्लपित्तम् ।
शोफं कृमिं शूलमपाकरोति प्राहुः परे बृंहणमल्पमेतत् ॥ १३९ ॥
दाहः स्वेहोऽरुचिर्मूर्च्छा क्लेदो रेको वामिर्भ्रमः ।
असम्यक्छोधिते दोषास्ताम्रेऽसम्यक्च मारिते ॥ १४० ॥

आतां सोमनाथी ताम्रक्रिया सांगतोः—

पारा व ताम्र हे समभाग आणि गंधकहि ताम्राच्या बरोबरीनें घेऊन हरताळ अर्ध्यानें आणि मनशिळ चौथा हिस्सा घ्यावी. (१३३) (अर्ध्यानें म्हणजे पाऱ्याच्या अर्ध्यानें, व मनशीळ हरताळाच्या अर्ध्यानें घ्यावी). मग पारा, गंधक, हरताळ व मनशीळ एकत्र खलून त्यांची काजळाप्रमाणें मऊ व काळीभोर कज्जली करावी आणि यंत्राध्यायांत वर्णन केल्याप्रमाणें गर्भयंत्र तयार करून त्या यंत्रांत कज्जली तांब्याचे पत्रे यांचे आलटून पालटून थर द्यावे आणि एक प्रहरपर्यंत आंच द्यावी, म्हणजे भस्म होतें. भट्टी आपोआप थंड झाल्यावर तें काढून घ्यावें. (१३५)

सोमनाथी ताम्राचे गुणः—

त्या त्या रोगावर योग्य अनुपान योजून दोन वाल प्रमाणें हें ताम्र चाटावें, म्हणजे परिणामशूळ, उदर, पांडुरोग, ज्वर, गुल्म,

प्लीहा, यकृत्, क्षय, अग्निमांद्य, प्रमेह, मूळव्याध, खराब संग्रहणी अशा अनेक व्याधींचा हें सोमनाथी ताम्र खात्रीनें पार नायनाट करून टाकतें. (१३६)

ताम्रभस्माचें लक्षण:—

ताम्र हें (बहुतकरून) मोराच्या कंठाच्या रंगाप्रमाणें निळें बनलें म्हणजे तें मृत झालें असें समजावें. मृत झालेलें ताम्र हातानें चुरडलें असतां त्याचें पीठ होतें. तें निश्चंद्र असतें; परन्तु पारा देऊन भस्म केलें असेल तर मात्र भस्मांत चकाकी दिसते. (१३७).

भस्माचे गुणधर्म:—

ताम्रभस्म हें तुरट, मधुर, कडु व आम्ल असून पाककाळीं तिखट व सारक आहे. तें पित्त व कफ यांचा परिहार करणारें, थंड जखम भरून आणणारें, हलकें व लेखन असतें आणि तें पांडुरोग, उदर, मूळव्याध, विषार, कुष्ठ, खोकला, श्वास, क्षार, पीनस, आम्ल-पित्त, सूज, कृमि व शूळ अशा नानाप्रकारच्या रोगांचा नाश करतें. ताम्र हें थोडक्या प्रमाणानें शरीर पुष्ट करतें असेंहि कोणी म्हणतात. (१३९)

परंतु ताम्र जर चरोबर शुद्ध केलेलें व मारलेलें नसलें तर त्यानें अंगाची आग होऊन घाम, अरुचि, मूर्च्छा, चिकटपणा, जुलाब, वांति, चक्कर असे विकार उत्पन्न होतात. (१४०)

अथ वङ्गस्य नामलक्षणशोधनमारणानि ।
वङ्गं रङ्गं त्रपु प्रोक्तं तथा पिच्चटामित्यपि ।
खुरकं मिश्रकं चेति द्विविधं वङ्गमुच्यते ॥ १४१ ॥
खुरकं श्रेष्ठमुद्दिष्टं मिश्रकं चावरं स्मृतम् ।
खुरकं चन्द्ररूप्याभं खुराकारं च कीर्त्यते ।
एतल्लक्षणांभिन्नं तु वङ्गं मिश्रकनामकम् ॥ १४२ ॥

आतां वंग म्हणजे कथील ह्या धातूचीं नावें, लक्षणें, शोधन व मारणाक्रिया सांगतों.

नांवें:—वंग, रंग, वायु, त्रपू, पिश्चट, हीं नांवें रंगाचीं आहेत. ह्याचे खुरक व मिश्रक असे दोन भेद आहेत. त्यांपैकीं " खुरक " हें उत्तम आणि " मिश्रक " हें कनिष्ठ दर्जाचें असतें. खुरक कथलाचें स्वरूप चंद्राप्रमाणें किंवा चांदीप्रमाणें शुभ्र व चकचकीत

असतें. याहून भिन्न म्हणजे काळसर जें कथील असतें तें सर्व मिश्रक म्हणून समजावें. (१४२)

गुणाः—

रङ्गं लघु सरं रूक्षमुष्णं मेहकफकृमीन्।
निहान्ति पाण्डुकुं श्वासं चक्षुष्यं पित्तलं मनाक् ॥ १४३ ॥
सिंहो यथा हास्तिगणं निहान्ति तथैव वङ्गोऽखिलमेहवर्गम्।
देहस्य सौख्यं प्रबलेन्द्रियत्वं नरस्य पुष्टिं विदधाति नूनम् १४४

अन्यत्रापि—

वङ्गं तीक्ष्णोष्णरूक्षं कफकृमिवामिजिन्मेहमेदोनिलघ्नं
कासश्वासक्षयघ्नं प्रशमितहुतभुङ्मान्द्यमाध्मानदारि।
बल्यं वृष्यं प्रभाकृन्मनसिजजनकं सर्वमेहप्रणाशि
प्रज्ञाकृद्वर्ण्यमुच्चैरलघुरतिरसस्यास्पदं बृंहणं च ॥ १४५ ॥

अन्यच्च—

बल्यं दीपनपाचनं रुचिकरं प्रज्ञाकरं शीतलं
सौन्दर्यैकविवर्धनं हितकरं नीरोगताकारकम्।
धातुस्थौल्यकरं क्षयिक्षयहरं सर्वप्रमेहापहं
वङ्गं भक्षयतो नरस्य न भवेत्स्वप्नेऽपि शुक्रक्षयः ॥ १४६ ॥
अशुद्धममृतं वङ्गं प्रमेहादिगणप्रदम्।
गुल्महृद्रोगशूलार्शःकासश्वासवमिप्रदम् ॥ १४७ ॥

गुणधर्मः—कथील हलकें, सारक, रूक्ष व उष्ण असून प्रमेह, कफ, कृमि, पांडुरोग, श्वास यांचा नाश करतें. तें नेत्रांना हितकारी परंतु किंचित पित्तकर आहे. सिंह ज्याप्रमाणें हत्तीच्या कळपाचा सप्पा उडवितो, त्याप्रमाणें कथील सर्व प्रकारच्या प्रमेहांचा नाश करून शरीराला आराम देतें आणि पुरुषाचें इंद्रिय बळकट करून शरीर पुष्ट बनवितें. (१४४)

आणखी असें कीं:—

वंग हें तीव्र, उष्ण, रूक्ष व कफ, कृमि, मेह आणि वायु यांचा नाश करणारें व खोकला, श्वास आणि क्षय यांचा उच्छेद करणारें, अग्निमांद्य आणि पोटफुगी यांचा धुव्वा उडविणारें आहे. तें बल वाढवितें, पुरुषत्व देतें, शरीराची कांति तजेलेदार करून कामोद्दीपन करतें आणि सर्व प्रकारच्या मेहांचा नाश करतें. बुद्धीला तीव्रता देणारें अशी त्याची सर्वत्र प्रख्याति आहे. तें रतिसुखाची

लालसा पूर्ण करणारें असें स्थान आणि शरीर गुटगुटीत करण्याचें साधन आहे. (१४५)

दुसऱ्या एके ठिकाणीं असें आहे कीं,

वंगभस्म बलदायक, दीपन, पाचन, रुचिकर, बुद्धिवर्धक आणि थंड आहे. शरीर सुंदर करणारें असें तेंच औषध. तें हितकर असून आरोग्य देतें. शरीरातील सर्व धातु तें पुष्ट करतें, क्षयाचा नायनाट करतें, सर्व जातीचे प्रमेह घालवितें आणि वंगभस्म घेणाऱ्या मनुष्याचा स्वप्नांत सुद्धां वीर्यनाश होत नाहीं. (१४६)

परंतु अशुद्ध किंवा अर्धकच्चें वंगभस्म जर खाल्लें तर उलट प्रमेह उत्पन्न होतो व तसेंच गुल्म, हृद्रोग शूळ, मूळव्याध, खोकला, श्वास आणि वांति हे आजार होतात. (१४७)

वङ्गभस्मकरणं-अस्य शोधनं विशेषशोधनं च प्रागुक्तम् ॥

शुद्धं वङ्गं क्षिपेद्भाण्ड्यां चुल्लिस्थायां शनैः शनैः ।
तदधो ज्वालयेदाग्निं द्रुते वङ्गे क्षिपेत्पुनः ॥ १४८ ॥
आपामार्गं चतुर्थांशं चूर्णं संचालयेदिदम् ।
स्थूलाग्रया ह्ययोदर्व्या यावत्तद्भस्म जायते ॥ १४९ ॥

अत्र रहस्यम्—

चूर्णप्रक्षेपणं कार्यं स्वल्पं स्वल्पं मुहुर्मुहुः ।
यावद्भस्म भवेद्रङ्गं तावच्चूर्णं समापयेत् ॥ १५० ॥
शरावपिहितं पश्चात् स्थापयेत्तत्र तद्भिषक् ।
रजः सर्वं ततोऽधस्तात्कुर्यादाग्निं तु तीव्रकम् ॥ १५१ ॥
यावदङ्गारवर्णं तद्रजः समुपजायते ।
स्वाङ्गशीतं ततो ग्राह्यं मारणाय रजः शुभम् ॥ १५२ ॥

वंगाची शुद्धिक्रिया व विशेष शुद्धि पूर्वीच सांगितली आहे. वंग शुद्ध करून एक मडकें चुलीवर ठेवून त्यांत हलकें हलकें टाकावें व खालीं चांगला जाळ लावावा. कथील पातळ झालें म्हणजे त्यांत चौथा हिस्सा आघाड्याची पूड टाकून लोंखडाच्या उलथण्यानें सारखें ढवळावें, म्हणजे वंगभस्म होतें. (१४९)

यांतला मुद्दा असा आहे कीं,

आघाडयाची पूड थोडथोडी वरचेवर टाकावी व वंग घोटावें. भस्म होईपर्यंत पूड पुरवावी. मडक्याचे तोंडावर झांकण

ठेवून सर्व कण एके ठिकाणीं करावे आणि चुलीखालीं दणदणीत जाळ लावावा. तो इतका कीं, ते कथलाचे रज लाल होतात. मग आपोआप थंड झाल्यावर ते रज भस्म म्हणून घ्यावेत.(१५२)

प्रकारान्तरं रसपद्धत्या—

वङ्गे घर्षणकाल एव भिषजः पीतायवानीरजो
न्यस्यान्ति क्षणशः शिलाजतु तथा भस्माप्यपामार्गजम् ।
क्षिप्त्वा रंगदलान्यरुष्कपिशितैर्भाण्डे तु चिश्चात्वचो
भूत्यां संस्तरसंस्थितानि पुटत। कुर्वन्ति भस्मान्यपि १५३

घर्षणकाले वक्ष्यमाणपलाशदण्डादिना घर्षणे; पीता हरिद्रा, यवानी, अनयो रजः; क्षणशः क्षणं क्षणं यावत् पिष्टिर्भवति तावद्भिषजो न्यस्यान्ति, ततो भस्मनः शुद्ध्यर्थं शिलाजतुं क्षिपान्ति शिलाजतुरत्र श्वेतो ग्राह्यः सोरकाख्यः; तथेति अपामार्गजं भस्म घर्षणकाले वा क्षिपन्ति । अत्र भस्मीकृत्य तदुपरि शरावं दत्त्वा तीव्रतरं वान्हिं कृत्वा यथाऽङ्गारवर्ण भवति तथा कर्तव्यम् । पश्चात्स्वांगशीतं ग्राह्यम् । मारणार्थं तद्भस्म भवति । प्रकारान्तरं-क्षिप्त्वेति संस्तरस्तु भस्म दत्त्वा तदुपरि पत्रं, एवं क्रमेण । पुटं गजपुटम् ॥

प्रकारान्तरं तत्रैव—

यद्वैतस्य दलानि विंशतिगुणे पिण्याकचूर्णेऽतसी-
संभूते शणपट्टवार्तिनि पुनस्तद्वद्यवान्या अपि ।
कीर्णानि क्रमशो निबध्य सुदृढं रज्ज्वा गजाह्वे पुटे
स्युर्भस्म त्रपुणि स्थिते तु पुटतोऽपक्केऽयमेव क्रमः १५४

व्याख्या—अतसीपिण्याकचूर्णयवानीचूर्णयोः समुच्चयः, शणपट्टवार्तिनीति उभयोर्विशेषणं; क्रमशः पटे उभयोश्चूर्णं तत्रैकं पत्रं पुनश्चूर्णमित्यादि । अथैवमन्यतमप्रकारेण निष्पन्नस्य वङ्गभस्मन. पुनर्भारणेन निरुत्थीकरणमाह—

रसपद्धतींत निराळाच प्रकार आहे.

वंग घोटीत असतांनाच वैद्यलोक हळद, यवासा यांचें चूर्ण क्षणोक्षणीं देत राहतात, किंवा शिलाजित अगर आघाड्याची राखहि देतात. नंतर वंगाचे कण व अरुष्क (Semecarpus Anacardium) हे मडक्यांत टाकून त्यावर चिंचेच्या राखेचा थर द्यावा आणि अशा तऱ्हेनें पुट देऊन वंगभस्म करावें (१५३).

व्याख्याः—घोटीत असतांना म्हणजे पळसाच्या दांडीनें किंवा उलथण्यानें घोटीत असतां (' हळद ' हिच्याबद्दल ग्रंथांत "पीता" असा शब्द आहे) व यवानी म्हणजे यवासा (याला कोणी धमासा व कोणी " अजवान " असें म्हणतात.) या जिनसांची पूड क्षणो-क्षणीं म्हणजे वंगाचा चुरा होईपर्यंत वैद्यलोक टाकीत राहतात. मग त्याच्या शुद्धीकरतां शिलाजित किंवा सोरा टाकतात किंवा आघाड्याची राख घोटीत असतांना टाकतात. याप्रमाणें (साधारण) भस्म झाल्यावर मडक्याच्या तोंडावर झांकण ठेवून खालीं दणकून जाळ लावावा. इतका कीं, ते रज निखाऱ्याप्रमाणें लाल होतील. मग आपोआप थंड होऊ द्यावे आणि थंड झाल्यावर त्या रजांचें भस्म करावें; किंवा दुसऱ्या प्रकारानें म्हणजे प्रथम राख आणि राखेवर कथलाचा पत्रा, त्याच्यावर पुनः राख याप्रमाणें थर देऊन गजपुटानें भस्म करावें.

त्याच ग्रंथांत आणखी एक प्रकार असा आहेः—

वंगाचे पातळ पत्रे करून अतसी म्हणजे तागाच्या बियांची पेंड वीस भाग आणि अजवान तितकाच [वीस भाग] असें घ्यावें. पेंड आणि अजवान एकत्र करून एका ताग्याच्याच फडक्यावर वंगाचे पत्रे व मिश्रण असे क्रमानें ठेवून फडक्याची पुरचुंडी करावी आणि दोरीनें आंवळून बांधावी आणि मग गजपूट देऊन भाजावी, म्हणजे पुरचुंडींतील वंगाचें भस्म होतें. भस्म पक्क करावयाचें असलें तरी कृति अशीच करावी. (१५४)

व्याख्याः—तागाची पेंड आणि अजवान हे जिन्नस एकत्र करून तागाच्याच फडक्यावर पसरावे. मग क्रमानें चूर्णाचा एक थर आणि त्यावर वंगाचा पत्रा, नंतर त्यावर चूर्णाचा पुनः थर, याप्रमाणें करावें. यापैकीं कोणत्याहि क्रियेनें वंगाचें भस्म करून तें पक्के म्हणजे निरुत्थ करण्याकरितां क्रिया करावी ती अशी—

अथैवं वङ्गजं भस्म शुद्धतालेन मेलयेत् ।
समेन वाऽङ्घ्रिणांशेन ह्यष्टमांशेन वा ततः ॥ १५५ ॥
मर्दयेन्निम्बुकद्रावैरथवा कन्याकाद्रवैः ।
यामैकं वा द्वियामं वा दृढं मर्द्यार्थ चाक्रिकाम् ॥ १५६ ॥

कृत्वा घर्मविशुष्कां तां पिप्पलस्य त्वगन्तरे ।
संस्थाप्यैवं ततः पश्चात्सप्तधा विपचेद्भिषक् ॥ १५७ ॥
उत्तमं वङ्गभस्म स्यान्निरुत्थं खटिकाप्रभम् ।
सर्वकार्यकरं चैव जायते वैद्यजीवनम् ॥ १५८ ॥
द्वितीयादिपुटे तालं न देयं किन्तु घर्षणैः ।
प्रोक्तद्रव्येण चक्राभं कृत्वा शुष्कं पुटेन्मुहुः ॥ १५९ ॥

पिप्पलस्य त्वगन्तरे स्थापनाविधिः—

पिप्पलत्वग्भवं चूर्णं मर्द्यं स्थाप्यं शरावके ।
चक्रिकां तत्र संस्थाप्य शेषमूर्ध्वं न्यसेद्रजः ॥ १६० ॥
संपिधायाथ संरुध्य मृत्कर्पटाविलोपितम् ।
शुष्कं गजपुटे क्षेप्यं रहस्यामिति कीर्तितम् ॥ १६१ ॥
वदन्ति कोचित् पुटनाद्यदा भस्म भवेन्मृदु ।
तदाऽन्तिमपुटान्यस्य स्वल्पच्छगणकानि हि ॥ १६२ ॥
इति वङ्गरजसो निरुत्थीकरणेन भस्मत्वापादनम् । अथ प्रकारान्तरम्—

वङ्गं सतालमर्कस्य पिष्ट्वा दुग्धेन तत्पुटेत् ।
शुष्काश्वत्थभवैर्वल्कैः सप्तधा भस्मतां व्रजेत् ॥ १६३ ॥

वंगभस्म एक भाग, शुद्ध हरताळ तितकाच किंवा अर्ध्यानें अगर चौथ्या हिश्शाइतका घेऊन दोहोंचा लिंबाच्या रसांत खल करावा (१५५) किंवा कोरफडीच्या रसांतहि करावा. खल एक प्रहर ते दोन प्रहरपर्यंत करावा. मग मिश्रणाची चकती करून उन्हांत वाळवावी आणि ती पिंपळाच्या सालीच्या चूर्णांत ठेवून आंच द्यावी. म्हणजे खडूप्रमाणें पांढरें शुभ्र असें वंगभस्म होतें. तें सर्व कार्यांस उपयोगी पडतें व वैद्याचा योगक्षेम चालवितें. दुसरें पुट देणें झाल्यास हरताळ देऊं नये. परन्तु नुसताच खल करून पुन्हां दामटी करून वाळवून पुट द्यावें. (१५९)

दामटी पिंपळाच्या सालींत कशी ठेवावी:—

पिंपळाच्या सालीचें चूर्ण करून खलून तें एका परळांत ओतावें, त्यावर ती दामटी ठेवून तिच्यावर पुनः चुरा टाकावा आणि वर दुसरें संपुट पालथें बसवून मातकापडानें चिणावें आणि वाळल्यावर गजपुटाची आंच द्यावी असें त्यांतील रहस्य आहे.(१६१)

कोणी म्हणतात कीं, जेव्हां पुट दिल्यानें भस्म मऊ होतें तेव्हां त्याचीं अखेरचीं पुटें लहानलहान किंवा थोडथोडया शेणींचीं द्यावीं. (१६२)

याप्रमाणें वंगभस्म निरुत्थ झालें म्हणजे त्याला खरें भस्म म्हणावें. निरुत्थ करण्याचा आणखीहि प्रकार आहे तो असा:—

हरताळ आणि रुईचा चीक यांच्याशीं वंगाचा खल करून पिंपळाच्या वाळलेल्या सालींचा जाळ लावून वंगाला सात वेळ अग्निपुट द्यावें, म्हणजे भस्म होतें. (१६३)

अथ मध्यमपक्षेण वङ्गमारणम्—

वन्हौ संस्थाप्य हण्ड्यां तु रजनीरजसा शुभम् ।
वंगभस्म विधायाथ सोरकं तत्र मेलयेत् ॥ १६४ ॥
वङ्गतुर्यांशकं पश्चाच्छरावेण पिधापयेत् ।
मन्दमाग्निं घटीमेकां दत्त्वाऽथ स्वाङ्गशीतलम् ॥ १६५ ॥
कुन्देन्दुधवलं वङ्गभस्म ग्राह्यं स्वकार्यकृत् ॥ १६६ ॥

अथान्यः प्रकारः—

वन्योपलोपरिस्थे तु गोणीखण्डे क्षिपेद्रजः ।
तिन्तिणीवल्कलस्याथ तिलांस्तत्र विनिक्षिपेत् ॥ १६७ ॥
अङ्गुलार्धप्रमाणेन तत्र वङ्गदलं न्यसेत् ।
गु
खण्डीकृतं पुनस्तेन क्रमेणैवाऽथ विन्यसेत् ॥ १६८ ॥
तिलतिन्तिणिकावल्कं गोमायेनाग्निना दहेत् ।
स्वाङ्गशीतं ततो ग्राह्यं युक्त्या वंगस्य भस्म तत् ।
श्वेतं तु लवणाभासं सुसूक्ष्मं सर्वकार्यकृत् ॥ १६९ ॥
अत्र पक्षद्वये तालदानं प्राज्ञैरुपेक्षितम् । इत्यपि वंगभस्म।

मतान्तरम्—

मृत्पात्रे द्राविते वंगे चिंचाश्वत्थत्वचो रजः ।
क्षिप्त्वा वंगचतुर्थांशमयोदर्व्या प्रचालयेत् ॥ १७० ॥
ततो द्वियाममात्रेण वंगभस्म प्रजायते ।
अथ भस्मसमं तालं क्षिप्त्वाऽम्लेन विमर्दयेत् ॥१७१ ॥
ततो गजपुटे पक्त्वा पुनरम्लेन मर्दयेत् ।
तालेन दशमांशेन याममेकं ततः पुटेत् ।
एवं दशपुटैः पक्वं वंगं भवति मारितम् ॥ १७२ ॥

इति दशपुटि वंगभस्म॥

मध्यम प्रकारचें भस्म करण्याचा प्रकारः—

पूर्वीप्रमाणें हळदीच्या चूर्णासह वंगभस्म एका मडक्यांत ठेवून तें अग्निवर ठेवावें आणि मडक्यांतील चूर्णाच्या चौथ्या हिश्शानें त्यांत सोरा मिसळून खापरानें हंडीचें तोंड बंद करून एक घटकाभर मंदाग्नि द्यावा. आपोआप थंड झाल्यावर वंगाचें कुंदाच्या फुलाप्रमाणें पांढरें शुभ्र भस्म झालेलें आढळेल. तें काढून घ्यावें आणि त्यानें आपलें कार्य साधावें. (१६६)

भस्माचा आणखी प्रकार—

रानशेणीवर एक गोणपाटाचा तुकडा ठेवावा व त्यावर चिंचेच्या सालीचा चुरा पसरून त्यावर तीळ पसरावे. याप्रमाणें दोन बोटें जाडीचा थर करावा. त्या थरावर कथलाच्या पत्र्याचा तुकडा ठेवून पुनः त्यावर तीळ व तिळांवर पुनः चिंचेच्या सालीचा चुरा याप्रमाणें पहिल्याप्रमाणें थर द्यावा. (आणि पोटळी बांधून) गवऱ्यांच्या अग्नीचें पुट द्यावें. अग्नि विझून भट्टी आपोआप थंड झाल्यावर आंतील वंगाचें भस्म होतें. तें युक्तीनें काढून घ्यावें. तें मिठाप्रमाणें पांढरें व बारीक होतें व सर्व कामाला उपयोगी पडतें. (१६९)

वरील दोन्ही प्रकारांत हरताळ मुळींच वगळला आहे. तरीहि वंगाचें भस्म करतां येतें.

आणखी एक मत असें आहे कीं:—

एका खोलगट खापरांत कथील वितळवावें आणि त्याच्यावर चिंच आणि पिंपळ यांच्या सालीची पूड टाकावी. पूड कथलाच्या चौथ्या हिश्शानें घ्यावी व लोखंडाचे पळीनें ढवळावें. याप्रमाणें दोन प्रहरपर्यंत आंच दिली म्हणजे वंगाचें भस्म होतें. तें भस्म घेऊन त्यांत तितकाच हरताळ घालून आम्ल रसाशीं खल करावा आणि गजपुटानें आंच द्यावी. नंतर काढून दहाव्या हिश्शाइतका हरताळ घेऊन आम्ल रसाशीं पुन्हां एक प्रहर खल करावा आणि पुनः पुट द्यावें. याप्रमाणें दहा पुटें दिलीं म्हणजे वंग अगदीं मृत होतें (१७१). याला दशपुटी वंग म्हणतात

अथ यशदस्य नामलक्षणगुणमारणानि ।
'जस्ता' इति भाषा ॥

यशदं रंगसंकाशं रीतिहेतुश्च तन्मतम् ।
उक्तं च—
जशदं गिरिजं तस्य दोषाः शोधनमारणे ।
वंगस्येव हि बोद्धव्या गुणांस्तु प्रवदाम्यहम् ।
गुणाः--
जसदं तुवरं तिक्तं शीतलं कफापित्तहृत् ।
चक्षुष्यं परमं मेहान् पाण्डुं श्वासं च नाशयेत् ॥ १७४ ॥

जस्ताचीं नांवें, लक्षण, शोधन व मारण.

जस्त हें कथलाप्रमाणेंच दिसतें. त्याचें शोधन आणि मारण ह्या सर्व क्रिया कथलाप्रमाणेंच करावयाच्या.

जस्त हें पर्वतांत सांपडतें. जस्ताचे दोष, त्याची शुद्धि व मारण वगैरे प्रकार वंगासारखेच आहेत. आतां जस्ताचे गुण सांगतों (१७३).

जस्त हें तुरट, कडवट, थंड, व कफ आणि पित्तनाशक आहे. तें नेत्रांना अत्यंत हितकर असून प्रमेह, पांडुरोग आणि श्वास यांचा नाश करतें.

अथ नागस्योत्पत्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि ।
दृष्ट्वा भोगिसुता रम्यां वासुकिस्तु मुमोच यत् ।
वीर्यं जातस्ततो नागः सर्वरोगापहो नृणाम् ॥ १७५ ॥
नागः सीसं च वध्रं च योगेष्टं नागनामकम् ।
नागनामकं भुजंगादिपर्यायवाचकमित्यर्थः ॥
सीसं रंगगुणं ज्ञेयं विशेषान्मेहनाशनम् ॥ १७६ ॥
अन्यच्च—
नागः समीरकफपित्तविकारहन्ता
सर्वप्रमेहवनराजिकृपीट्टयोनिः
उष्णः सरो रञ्जतरंजनकृद्व्रणार्शो—
गुल्मग्रहण्यतिसृतिक्षणदांशुमाली ॥ १७७ ॥
नागस्तु नागशततुल्यबलं ददाति
व्याधिं विनाशयति जीवनमातनोति ।
वार्न्हिं प्रदीपयति कामबलं करोति
मृत्युं च नाशयति संततसेवितः सः ॥ १७८ ॥

शिसें व त्याची उत्पत्ति, लक्षण वगैरे.

शेषाची सुंदर कन्या पाहून वासुकी सर्प मोहित झाला आणि त्याचें वीर्य स्खलन झालें. त्यापासून शिसें निर्माण झालें व म्हणूनच शिशाला नाग असें नांव पडून सर्व रोगांचा परिहार करण्याची शक्ति त्याच्या अंगीं आली (१७५).

शिशाचीं नांवें:—नाग, सीस, वध्र, योगेष्ट, भुजंग इत्यादि नांवें शिशाचीं आहेत.

गुण:—जे गुण वंगांत तेच गुण शिशांतहि आहेत. शिसें हें विशेषेंकरून मेहाचा नाश करतें. (१७६). शिसें हें वात, कफ, पित्त यांचें नाशक, व सर्व प्रकारच्या प्रमेहरूपवनाला दावानलाप्रमाणें आहे. तें उष्ण, सारक, चांदीला सुवर्णाप्रमाणें रंग आणणारें, आणि व्रण, मूळव्याध, गुल्म, संग्रहणी, धुपणी वगैरे रोगरूप पिशाचांचा सूर्यच होय. (१७७). नागभक्षणानें शंभर हत्तींचें बळ येतें, रोग नाश पावतात व आयुष्य वाढतें, जठराग्नि प्रदीप्त होतो, कामोद्दीपन होतें आणि नेहमीं सेवन केल्यास साक्षात् मृत्यूचाहि नाश करतां येतो (१७८).

अशुद्धः कुरुते नागः प्रमेहक्षयकामलाः ।
तस्मात्संशुद्ध एवायं मारणीयो भिषग्वरैः ॥ १७९ ॥

अपक्वदोषाः—

पाकेन हीनौ किल नागवंगौ कुष्ठानि गुल्मांश्च तथाऽतिकष्टान्।
पांडुप्रमेहानलसादशोथभगन्दरादीन् कुरुतः प्रभुक्तौ ॥ १८०॥

अस्य शोधनं विशेषशोधनं च प्रागुक्तम् । अथ मारणम्--

चिंचाश्वत्थत्वश्चचूर्णं चतुर्थांशेन निःक्षिपेत् ।
मृत्पात्रे विद्रुते नागे लोहदर्व्या प्रचालयेत् ॥ १८१ ॥
यामैकेन भवद्भस्म तत्तुल्या तु मनःशिला ।
कांजिकेन द्वयं पिष्ट्वा पुटेद्गजपुटेन च ॥ १८२ ॥
स्वांगशीतं पुनः पिष्ट्वा शिलया कांजिकेन च ।
पुनः पचेच्छरावाभ्यामेवं षष्टिपुटैर्मृतिः ॥ १८३ ॥

इति षष्टिपुटि नागभस्म ॥

तांबूलरससंपिष्टाशिलालेपात्पुनः पुनः ।
द्वात्रिंशद्भिः पुटैर्नागो निरूथं भस्म जायते ॥ १८४ ॥

इति द्वात्रिंशत्पुटि नागभस्म ॥

परंतु जर शिसें अशुद्ध भक्षण केलें तर प्रमेह, क्षय, कावीळ इत्यादि रोग जडतात, म्हणून शिसें प्रथम शुद्ध करून घेऊनच वैद्यांनीं त्याचें भस्म करावें (१७९).

अपक्व नागभस्माचे दोषः—

जर नाग (शिसें) किंवा वंग पक्व म्हणजे पक्कें झालेलें नसेल तर तें खाण्यांत आल्यास, कुष्ठ, गुल्म इत्यादि भयंकर कष्ट देणारे रोग होतात. तसेंच पांडु, प्रमेह, अपचन, सूज, भगंदर असे दुःसाध्य रोगहि कच्चें नागभस्म खाल्ल्यानें होतात.

शिशाची शुद्धि व त्याचप्रमाणें विशेष शुद्धि पूर्वीच सांगितली आहे. आतां भस्मक्रिया सांगतोः—

पिंपळाची साल, चिंचेची साल यांचें चूर्ण शिशाच्या चौथ्या हिश्शानें घेऊन तें खापरांत शिसें वितळल्यावर त्याच्यावर टाकीत जावें व लोखंडाच्या पळीनें ढवळावें. याप्रमाणें एक प्रहर केल्यावर भस्म होतें. नंतर तितकी मनशीळ घेऊन भस्म आणि मनशीळ यांचा कांजीमध्यें खल करून गजपुटाचें पुट द्यावें. आपोआप थंड झाल्यावर पुनः मनशीळ देऊन कांजींत खलून शरावसंपुटांत पुट द्यावें. याप्रमाणें साठ पुटें दिलीं म्हणजे शिसें पूर्णपणें मृत होतें. (१८३) याप्रमाणें साठपुटी नागभस्म झालें.

इतकीं पुटें देण्यास सवड नसेल तर भस्म व मनशीळ यांचा खल विड्याच्या पानांच्या रसांत करून फक्त २२ पुटें दिला म्हणजे नागभस्म निरुत्थ म्हणजे पक्कें होतें (१८४).

हें बावीस पुटी भस्म सांगितलें. आतां दुसरी एक रीत सांगतोः—

अथान्यमतम्—

भूभुजंगमगार्स्तं च पिष्ट्वाऽहेः पत्रमादिहेत्
हण्ड्यामग्नौ द्रवीकृत्य वासापामार्गसंभवम् ॥ १८५ ॥
क्षारं विमिश्रयेत्तत्र चतुर्थांशं गुरूक्तितः ।
प्रहरं पाचयेच्चुल्ल्यां वासादर्व्या विघट्टयन् ॥ १८६ ॥
चूर्णीभूतं पिधायाथ कुर्यादाग्निं समं पुनः ।
तत उद्धृत्य तच्चूर्णं शुद्धया शिलयाऽन्वितम् ॥ १८७ ॥

वस्वंशयाऽथ तत्सर्वं वासानीरैर्विमर्दयेत्।
पुटेत्पुनः समुध्दृत्य तद्द्रवेण विमर्दयेत्।
एवं सप्तपुटैर्नागः सिन्दूराभो भवेद्ध्रुवम् ॥ १८८ ॥

भूभुजङ्गः भूनागः, अगस्तिर्मुनिद्रुमस्तत्पर्णरसम्। क्षारं सौकार्याद्भस्म ग्राह्यम्। गुरूक्तिः स्वल्पं स्वल्पं प्रातिक्षणं देयमित्येवंरूपा, प्रहरं यावद्भस्म भवत्यखिलं तावत्, न तु प्रहरानियमः ॥

इति निरुत्थं नागभस्म।

भूनाग आणि आगस्त्याचा रस एकत्र खलून त्यानें शिशाच्या पत्र्यांना लेप करावा आणि मडक्यांत ठेऊन जाळ लावून ते पत्रे वितळवावे. पत्रे वितळले म्हणजे अडुळसा व आघाडा यांचे क्षार(एकत्र करून ते) शिशाच्या चौथ्या हिश्शानें घेऊन शिशाच्या रसाशीं गुरूच्या सांगण्याप्रमाणें मिश्र करून तें मिश्रण आडुळशाच्या दांडीनें ढवळावें व अशा रीतीनें एक प्रहर आंच द्यावी. (१८६) म्हणजे शिशाचा चुरा होईल. चुरा झाल्यावर त्याच्यावर पणती झांकण ठेऊन कडक आंच द्यावी, इतकी कीं, तें चूर्ण निखाऱ्याप्रमाणें लाल होईल. मग थंड झाल्यावर उतरून त्याच्या आठव्या हिश्शाइतकी शुद्ध मनशीळ घेऊन आडुळशाच्या रसाशीं एकत्र खल करावा आणि पुनः पुट द्यावें. नंतर उतरून त्याच रसाशीं खल करून पुट द्यावें. याप्रमाणें सात पुटें बसलीं म्हणजे तें शिसें निश्चयानें शेंदरा-सारखें लाल बनेल (१८८).

भूनाग ह्याच्याबद्दल मूळ ग्रंथांत " भूभुजंग " असा शब्द आहे. अगस्त्याचा रस म्हणजे अगस्त्याच्या पानांचा रस. " क्षार " करण्यापेक्षां आडुळसा वगैरे वनस्पतींची राख करणें सोपें आहे व क्षाराऐवजीं ती राख वापरल्यास चालेल. गुरूंच्या सांगण्याप्रमाणें वेळोवेळीं थोडथोडा क्षार किंवा भस्म टाकावयाचें, एकदम टाकावयाचें नाहीं हा भावार्थ. प्रहरपर्यंत आंच द्यावी याचा अर्थ एक प्रहरपर्यंतच असा नव्हे, तर शिशाचें भस्म बनेपर्यंत काय कमीजास्त वेळ लागेल तोंपर्यंत दिली पाहिजे. प्रहरपर्यंत हा अबाधित नियम नव्हे.

याप्रमाणें निरुत्थ नागभस्माची क्रिया आहे.

अथ रसपद्धत्याम्—

नागं काष्ठकुशानुना पटुघटभ्राष्ट्रे द्रुतं कन्यका-
मूलैर्घृष्टामिभाशनार्कबहुपाद्ब्रह्मद्रुमूलायसाम् ।
दण्डेनान्यतमस्य वा यदवधि स्यात्पिष्टिका तत्पुनः
सिन्दूरारुणमृद्धृतं च शिलया वस्वंशया योजितम् १८९
कन्यावारिविभावितं पुनरपि प्राक्प्राक्रियोत्पादितं
त्रिः स्याद्भस्म करीषवन्हिपुटितं प्रान्तेऽतिमन्दं सकृत् ।
कन्यामूलविघट्टनाराहितया वङ्गोऽपि भस्मीभवे-
त्पूर्वप्रक्रिययैव मानसाशिलास्थाने तु दत्तालयः ॥ १९० ॥

व्याख्या—इभाशनः पिप्पलः, अर्कः, प्रसिद्धः, बहुपान्न्यग्रोधः, ब्रह्मद्रुः पलाशः, आयसं लोहं, एतेषामन्यतमस्य दण्डेन दर्व्या यद्-वाधि पिष्टिका स्यात्तद्वाधि पटुघटभ्राष्ट्रे दृढघटार्धखण्डे, नागं काष्ठाग्निना द्रवीकृत्य, तत्र कन्यामूलं शुष्कं कन्यारसं वा दत्त्वा, घृष्टं कुर्यादिति भावार्थः । त्रिःसप्तवारं कन्यावारिणा मार्दितं शराव-संपुटस्थं करीषाग्निषु गजपुटेषु त्रिःपुटितं प्रान्तेऽतिमन्दपुटितं भस्म स्यात् । अमुं प्रकारं वङ्गेऽप्यतिदिशति—कन्येत्यादि । स्पष्टम् ।

आंतां रसपद्धतींतील क्रिया सांगतों.

लांकडांचा आग्नि पेटवून त्यावर एका चांगल्या भक्कम मड-क्यांत शिसें तापवून तें वितळवावें. वितळल्यावर त्यास कोरफडीच्या मुळ्या देऊन पिंपळ, रुई, वड, पळस यांचें मूळ अगर लोखंड यांच्या घोटणीनें तें ढवळीत रहावें. म्हणजे शिशाचें पीठ होईल. पिठ झाल्यावर (हि तसेंच ढवळावें म्हणजे) तें चूर्ण शेंदराप्रमाणें लाल होतें. मग उतरून त्यांत आठव्या हिश्शाइतकी मनशीळ टाकावी (१८९) व कोरफडीच्या रसाची भावना देऊन पुनः पूर्वीप्रमाणें (पुट) क्रिया करावी. याप्रमाणें तीन वेळां गोवऱ्यांच्या आचींनें पुट दिलें असतां उत्तम भस्म होतें. कदाचित थोडी कसर राहिल्यास पुनः एकवार मंदाग्नीनें पुट द्यावें. याच क्रियेनें वंगाचेंहि भस्म होतें. मात्र कोरफडीच्या मुळीनें ढवळावयाचें नाहीं. (इतर वनस्पतींनीं ढवळून) भस्म करावें आणि मनशिळेऐवजीं हरताळ देऊन वरच्याप्रमाणेंच पुटक्रिया करावी (१९०).

व्याख्या:—पिंपळ, रुई, वड, पळस, लोखंड यांचेबद्दल मूळ ग्रंथांत अनुक्रमें " इभाशन, " अर्क, " बहुपात्, " ब्रह्मद्रु "

आणि 'आयस' असे शब्द आहेत. यांपैकीं कोणत्याहि वनस्पतीची घोटणी करावी किंवा लोंखडाचीहि करावी आणि वितळलेल्या शिशाचें पीठ बनेपर्यंत घोटावें. शिसें एका चांगल्या म्हणजे मजबूत मडक्यांत ठेवून जाळ लावून वितळवावें आणि कोरफडीच्या मुळ्याचें चूर्ण किंवा कोरफडीचा रस त्यांत (युक्तीनें) टाकावा आणि घोटावें. पुट द्यावयाचें म्हणजे एकवीस वेळां कोरफडीच्या रसाशीं खल करून शिशाचें चूर्ण खापराच्या संपुटांत ठेवून गोवऱ्यांची आंच देऊन तीन वेळ गजपुट द्यावें. ही क्रिया वंगावरहि केल्यास चालेल असें रसपद्धतिकार म्हणतो. मात्र तेथें कोरफड नको.

अथान्यः प्रकारः—

नागं खर्परके निधाय कुनटीचूर्णं ददीत द्रुते
निम्बूत्थद्रवगन्धकेन पुटितं भस्मीभवत्याशु तत्।
एवं तालकवापतस्तु कुटिलं चूर्णीकृतं तत्पुटे-
द्वन्घाम्लेन समस्तदोषरहितं योगेषु योज्यं भवेत् १९१

अथान्यः प्रकारः—

त्रिभिः कुम्भिपुटैर्नागो वासारसविमर्दितः।
सशिलो भस्मतामेति तद्रजः सर्वमेहनुत् ॥ १९२ ॥

कुम्भी गजः। नागो नागपिष्टिः। सशिलोऽष्टमांशशुद्धाशिलायुक्तः। 'शरावसंपुटस्थः' इत्यध्याहार्यम्। इति नागभस्मीकरणम्।
अथ नागभस्मनि विशेष उक्तो रसपद्धतिकृता। तद्यथा—
सर्वेषां मतमेतदेव भिषजां यत्तारसीसोद्भवं
पार्थक्येन गुणावहं न भासितं प्रोक्तापलोहस्य च।
किं कार्यं भासितस्य चेच्छृणु रसादिष्वेव योज्यं हि त—
त्तादृक्सद्वचनानुरोधबलतः प्रोक्ता व्यवस्था इति ॥१९३॥

आतां दुसरा प्रकारः—

खापरांत शिसें तापवून तें वितळलें म्हणजे त्यास मनशिळीची पूड किंवा कागदी लिंबाचा रस आणि गंधक द्यावा आणि पुट द्यावें, म्हणजे ताबडतोब भस्म होतें. याच्यप्रमाणें हरताळ देऊन कथलाची पूड करावी आणि लिंबाचा रस आणि गंधक यांत घोटून पुट द्यावें, म्हणजे निर्दोष असें नागभस्म होतें. त्याचा सर्व औषधी योगांत उपयोग करावा (१९१).

आणखी एक प्रकारः—

अडुळशाच्या रसांत मनःशिलेसह शिसें खलून त्यास तीन कुंभिपुटें दिलीं म्हणजे भस्म होतें. त्या भस्मानें सर्व प्रकारचे प्रमेह जातात (१९२).

" कुंभिपुट " म्हणजे गजपुट. शिसें याचा अर्थ वितळून चुरा झालेलें शिसें असा घ्यावयाचा. मनशीळ आठव्या हिश्शानें टाकावी आणि पुट देणें तें खापरांच्या संपुटांत चूर्ण घालून संपुट बंद करून द्यावें असें श्लोकांत लिहिलें नाहीं; परन्तु " संपुटांत ठेवून हे शब्द अध्याहृत घेतले पाहिजेत. याप्रमाणें नागभस्म सांगितलें. आतां रसपद्धतिकारानें नागमस्माचा विशेष सांगितला आहे तो असाः—

सर्व रसवैद्यांचें असें मत दिसतें कीं, रौप्यभस्म व नागभस्म हीं भस्में एकएकटीं दिलीं असतां तितकीं गुणावह होत नाहींत. त्याचप्रमाणें उपलोहाचेंहि भस्म स्वतंत्रपणें फारसें उपयोगी पडत नाहीं. मग यांचें भस्म पाहिजे कशाला अशी शंका येईल म्हणून सांगतों कीं, हीं भस्में पारा, अभ्रक इत्यादिकांचे भस्माशीं योग करून द्यावीं, असें पुष्कळ विद्वान व अनुभवी वैद्यांचें मत आहे, म्हणून हा खुलासा येथें केला आहे (१९३).

अथ नागेश्वरः ।

पलप्रमितं नागं तिलतैले सप्तवारं विशोध्य, पश्चाद्विस्तीर्णहण्डिकायां द्रवीकृत्य वर्तुलपाषाणेन मर्दनपूर्वकं कासीसस्योत्तमस्य चूर्णं नागपरिमितं स्वल्पं स्वल्पं दत्त्वा दत्त्वा मारयेत्। मृतं नागं घटीद्वयं वन्हावेव स्थाप्यम्। पश्चाद्भाजने तच्चूर्णं दत्त्वा उष्णोदकेन सप्तवारं सुधौतं घर्मसंशुष्कं च विधाय, अर्कदुग्धेन प्रहरद्वयं मर्दयेत्। पश्चात्तच्चाक्रिकां कृत्वा, संशोष्य, शरावसंपुटे धृत्वा, पञ्चषट्कपरिमितैर्वनोपलैः पुटेत्। स्वाङ्गशीतं गृहीत्वाऽनयैव रीत्या रसेन प्रहरद्वयं मर्दयित्वा पुटेत्। पश्चात् पारदः पलामितः, गन्धको अमलसाराख्यः पलप्रमितः, द्वयोः कज्जलीं कृत्वा, पूर्वसिद्धमृतनागे विमिश्य मर्दयित्वा, सहदेव्या रसेन मर्दयेत्प्रहरद्वयं, ततश्चाक्रिकां कृत्वा विशोष्य शरावसंपुटे धृत्वा पूर्णं गजपुटं दद्यात्। ततः स्वाङ्गशीत गृहीत्वा, कुमारीरसेन मर्दयेत्. तदुपरि अर्कदुग्धेन मर्दयेत् प्रहरकं, पश्चात्तच्चक्रिकां कृत्वा संशोष्य शरावसंपुटे धृत्वा पञ्चषट्कपरिमितैर्वनोपलैः पुटेत्; तदुत्तरं तस्य सहदेव्या २सेन पुटैकं

दद्यात्, ततः सिद्धो जातः। अथ प्रयोगः—रक्तिकाद्वयमस्य बाकुचीचूर्णेन सह देयं। दिनानि चत्वारिंशत्, पथ्यं गोधूमातिलतैलं, औषधं भक्षयित्वा घर्मे प्रहरैकं स्थेयं, ततोऽल्पादिनैर्मण्डलपाकाज्जलस्रावोत्तरं क्रमेण सवर्णता। देवदारुदारुचिनीबाकुचीयुक्तं गलत्कुष्ठे, त्रिकटुदेवदारुयुक्तं वातरक्ते, मूत्रकृच्छ्रे बाकुचीयुक्तं, दुग्धोदनं सर्वत्र पथ्यम्। इति नागेश्वरो रसः॥

नागेश्वररस सांगतोः—

।शिसें तोळे चार घेऊन ते तिळाच्या तेलांत सात वेळ बुडवून शुद्ध करावें आणि मग एक मजबूत व मोठ्या रुंद तोंडाच्या मडक्यांत ठेवून तापवून वितळवावें आणि वाटोळ्या दगडाच्या घोटणीनें घोंटावें. घोटीत असतांना उत्तम मोरचुदाची पूड त्यांत थोडथोडी टाकीत जावी, म्हणजे शिशाचें भस्म होईल. तें भस्म दोन घटका तसेंच मडक्यांत ठेऊन खालीं जाळ लावावा. नंतर दुसऱ्या एका परळांत ठेऊन कढत पाण्यानें सात वेळ स्वच्छ धुवावें आणि उन्हांत ठेऊन वाळवावें. नंतर त्याचा रुईच्या चिकाशीं दोन प्रहरपर्यंत खल करावा आणि त्याची वाटोळी दामटी करून ती वाळवून संपुटांत ठेऊन पांच सहा रानशेणीच्या आंचीनें पुट द्यावें. आपोआप थंड झाल्यावर काढून पूर्वीप्रमाणेंच रसाशीं दोन प्रहर खलून पुनः पुट द्यावें. मग चार तोळे पारा आणि चारच तोळे आंवळ्या गंधक यांची कज्जली करून ती वरील नागभस्मांत मिश्र करून सहदेवीच्या रसांत दोन प्रहर खल करावा आणि पुनः दामटी करून वाळवून पूर्वीप्रमाणें संपुटांत बंद करून पूर्ण गजपुट द्यावें. आपोआप थंड झाल्यावर कोरफडीच्या रसांत एक प्रहर खल करावा. त्यानंतर रुईच्या चिकांत एक प्रहरभर करावा. मग खललेल्या वस्तूची दामटी करून वाळवून पांच सहा रानशेणींत पुट द्यावें व पुनः सहदेवीच्या रसांत खल करून पुट द्यावें, म्हणजे भस्म सिद्ध झालें. आतां त्याची योजना अशीः— दोन रतिभार बाबचीच्या चूर्णाशीं चाळीस दिवस द्यावें. पथ्य—गहूं व तिळाचें तेल. औषध घेऊन एक प्रहर उन्हांत बसावें, म्हणजे थोडक्याच दिवसांत मण्डलकुष्ठाच्या चट्ट्यांतून लस गळून जाऊन क्रमानें शरीरकांति उत्तम होते. देवदार, दारूहळद आणि

बाबचा यांत दिलें असतां रक्तपिति जाते. वातरक्त झालें असतां सुंठ, मिरे, पिंपळी आणि देवदार यांच्याशीं द्यावें. मूत्रकृच्छ्रांत बावचीच्या चूर्णाबरोबर सर्व रोगांत पथ्य दूधभात. याप्रमाणें नागेश्वर रसक्रिया आहे.

अथ लोहस्योत्पत्तिनामलक्षणभेदगुणशोधनमारणानि ।
पुरा लोमिलदैत्यस्य निहतस्य सुरैर्युधि ।
उत्पन्नानि शरीरेभ्यो लोहानि विविधानि वै ॥ १९४ ॥

अथ नामानि—

लोहोऽस्त्री शस्त्रकं तीक्ष्णं पिंडं कालायसायसी ।
मुंडं तीक्ष्णं तथा कांतमिति लोहं त्रिधा स्मृतम् ॥ १९५ ॥
मुण्डं तु त्रिविधं तत्र मृदु कुण्ठं कडारकम् ।
तीक्ष्णकं षड्विधं प्राहुः खराख्यं सारसंज्ञकम् ॥ १९६ ॥
हुन्तालमपरं तारावट्टं बाजिरकालकम् ।
कांतं पंचविधं ज्ञेयं भ्रामकं चुम्बकं तथा ॥ १९७ ॥
कर्षकं द्रावकं तद्वद्रोमकांतं च पंचमम् ।
एकास्यं द्विमुखं त्र्यास्यं वेदास्यं शरवक्त्रकम् ।
सर्वतोमुखमित्येवमुत्तमाधमकांतकम् ॥ १९८ ॥

आतां लोहाची उत्पत्ति, नांवें, गुणधर्म, वगैरे सांगतों.

पूर्वी देवांनीं युद्धामध्यें लोमिल नांवाच्या दैत्याला ठार मारला. तेव्हां त्याच्या शरीरापासून लोहाच्या निरानिराळ्या जाती उत्पन्न झाल्या. (१९४),

नांवें—लोह, शस्त्रक, तीक्ष्ण, पिण्ड, कालायस, आयस हीं लोखंडाला नांवें आहेत. मुण्ड, व तीक्ष्ण म्हणजे तिखें व चुंबक अथवा कान्तलोह असे लोखंडाचे मुख्य प्रकार तीन आहेत. (१९५)

त्यांत मुण्डाचे प्रकारः—मृदु, कुण्ठ आणि कडारक असे तीन; तिख्याचे खर, सार, हुन्ताल, अपर, तारावट्ट व बाजीरकालक असे सहा, आणि कान्तलोहाचे भ्रामक, चुंबक, कर्षक, द्रावक आणि रोमकान्त असे पांच प्रकार आहेत. त्याशिवाय कांतलोहाचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ वर्गात एकमुख, द्विमुख, त्रिमुख, चतुर्मुख, पंचमुख, आणि सर्वतोमुख असे आहेत ते निराळेच (१९८).

लक्षणम्—

भेदानां लक्षणान्यत्र न संप्रोक्तानि गौरवात् ।
आख्यया प्रस्फुटानि स्युर्मुख्यानां लक्ष्म कथ्यते ॥ १९९ ॥
मुण्डं तु वर्तुलं भूमौ पर्वतेषु च जायते ।
गजवल्ग्यादि तीक्ष्णं स्यात् कांतं चुम्बुकसंभवम् ॥ २०० ॥

अन्यच्च—

मुण्डात्कटाहपात्रादि जायते, तीक्ष्णलोहतः ।
खड्गादिशस्त्रभेदाः स्युः, कांतलोहं तु दुर्लभम् ॥ २०१ ॥
मुण्डाच्छतगुणं तीक्ष्णं तीक्ष्णात्कांतं शताधिकम् ।
तस्मान्मुण्डं परित्यज्य तीक्ष्णं वा कांतमुत्तमम् ॥ २०२ ॥
' मारणाय ' इति शेषः ।

लक्षण:—या सर्व भेदांचीं लक्षणें सांगूं लागल्यास फार विस्तार होईल म्हणून सांगत नाहीं. शिवाय तीं लक्षणें नांवांवरूनच कळून येण्यासारखीं आहेत. तथापि त्यांपैकीं मुख्यें प्रकारांचीं मात्र लक्षणें सांगतों. (१९९).

मुण्ड जातीच्या लोखंडाचे गोळे असतात. ते जमीनींत किंवा पर्वतावरील खाणींत सांपडतात. हत्तीचे अंकुश वगैरे ज्याचे करतात तें तिखें होय व कांतलोह हा लोहचुंबकाचाच प्रकार आहे.(२००)

आणखी असें कीं:—

मुंड लोखंडाच्या कढया वगैरे भांडीं करतात. तरवारी वगैरे शस्त्रें तिखयाचीं म्हणजे पोलादाचीं करतात. कान्तलोह हें दुर्मिळ आहे. मुण्ड लोखंडापेक्षां तिखें किंवा पोलाद हें शतपट उत्तम, आणि तिखयापेक्षां शंभरपट कांतलोह उत्तम, म्हणून मुण्ड किंवा पोलाद हीं दोन्ही टाकून देऊन (भस्माकरतां) कान्तलोहच घ्यावें. (२०२).

" भस्माकरतां " हे शब्द अध्याहृत घेतले आहेत.

अथ तीक्ष्णकांन्तयोर्विशेषलक्षणानि—

कासीसामलकल्काक्ते लोहेऽङ्गं दृश्यते स्फुटम् ।
तीक्ष्णलोहं तदुद्दिष्टं मारणायोत्तमं विदुः ॥ २०३ ॥

अन्यच्च—

क्षमाभृच्छिखराकाराण्यङ्गान्यम्लेन मर्दिते ।
लोहे स्युर्यत्र सूक्ष्माणि तत्सारमभिधीयते ॥ २०४ ॥

अस्य गुणाः—

लोहं साराव्हयं हन्यादग्रहणीमतिसारकम् ।
अर्धसर्वांगजं वातं शूलं च परिणामजम् ॥
छर्दिं च पीनसं पित्तं श्वासमाशु व्यपोहति ॥ २०५ ॥

आतां पोलाद व कान्तलोह ह्यांचीं विशेष लक्षणें सांगतों:—— हिराकस आणि हरताळ याच्या कल्कानें लेप केला असतां जें लोखंड तोंड दिसण्याइतकें स्वच्छ निघतें तें पोलाद घ्यावें. भस्मीकरतां तें उत्तम होय (२०३).

आणखी असें कीं:——

आम्लरस चोळला असतां ज्या लोहपत्र्यावर पर्वतशिखरा-प्रमाणें बारीक आकार दिसूं लागतात तें सारलोह होय (२०४).

त्याचे गुण:——सारलोह हें संग्रहणी, अतिसार, अर्धांगवात, सर्वांगवात, शूळ, परिणामशूळ, ओकारी, पीनस, पित्त व श्वास यांचा तात्काळ नाश करते (२०५).

अथ कांतलक्षणगुणाः—

यत्पात्रे न प्रसरति जले तैलबिंदुः प्रतप्ते ।
हिंगुर्गंधं त्यजति च निजं तिक्तता निंबकल्कः ।
तप्तं दुग्धं भवति शिखराकारकं नैति भूमिं ।
कृष्णांगः स्यात्सजलचणकः कांतलोहं तदुक्तम् ॥ २०६ ॥

कांतायः कामलाशोफकुष्ठानि क्षयगुल्मकौ ।
अर्शःशूलोदरप्लीहमामवातं भगन्दरम् ॥ २०७ ॥
अम्लपित्तं यकृच्चापि शिरोरोगं हरेद्ध्रुवम् ।
बलं वीर्यं वपुःपुष्टिं कुरुतेऽग्निं विवर्धयेत् ।
गदान् विजयते सर्वान् कांतलोहं न संशयः ॥ २०८ ॥

कान्तलोहाचे गुण:—ज्या लोहपात्रांत पाणी घालून तें पाणी तापविलें व त्या पाण्यावर तेलाचा थेंब टाकला तर तेल पसरत नाहीं; ज्या लोहपात्रांत हिंग ठेवला असतां त्याचा वास जातो किंवा कडुलिंबाच्या पानांचा कडुपणाहि नाहींसा होतो; ज्या लोहपात्रांत दुध तापविलें असतां फुगतें, परंतु ओतूं जात नाहीं आणि ज्यांत हरभरे भिजत घातले असतां ते काळे होतात तें कान्तलोह होय. (२०६).

कान्तलोह हें कावीळ, सूज, कुष्ठ, क्षय, गुल्म, शूळ, मूळ-व्याध, पांथरी, संधिवात, भगंदर, आम्लपित्त, यकृत् आणि शिरोरोग इत्यादि अनेक रोगांचा खात्रीनें नायनाट करतें आणि बळ, वीर्य, शरीराची पुष्टता व क्षुधा वृद्धिंगत करते. याप्रमाणें कान्तलोह हें सर्व रोगांवर जय मिळवितें ह्यांत संशय नाहीं. (२०८)

अथ सामान्यगुणाः—

लोहं शीतं सरं तिक्तं मधुरं तुवरं गुरु।
रूक्षं वयस्यचक्षुष्यं लेखनं वातलं, जयेत् ॥ २०९ ॥
कफं पित्तं गरं शूलं शोफार्शःप्लीहपांडुताः।
मेदोमेहकृमीन् कुष्ठं तात्किट्टं तद्गुणं स्मृतम् ॥ २१० ॥

अथ लोहदोषाः—

गुरुता दृढतोत्क्लेदः कश्मलं दाहकारिता।
अश्मदोषः सदुर्गंधो दोषाः सप्तायसः स्मृताः ॥ २११ ॥

अथाशुद्धदोषाः—

षण्ढत्वकुष्ठामयमृत्युदं भवेदृद्रोगशूलौ कुरुतेऽश्मरीं च ।
नानारुजानां च तथा प्रकोपं करोति हल्लासमशुद्धलोहम् २१२

अथासम्यङ्मारितस्य दोषाः—

जीवहारि मदकारि चायसं देहशूलकृदसंस्कृतं ध्रुवम्।
पाटवं न तनुते शरीरके दारुणां हृदि रुजां च यच्छति २१३

सर्व प्रकारच्या लोखंडाचे सामान्य गुणधर्मः—

लोह हें थंड, सर, कडवट, मधुर, तुरट, जड, रुक्ष, तरतरी आणणारें, नेत्ररोगनाशक, लेखन, परंतु वातकर आहे. कफ, पित्त, विषार, शूळ, सूज, मूळव्याध, प्लीहा, पांडुरोग, मेदवृद्धि, प्रमेह, कृमि, कुष्ठ या रोगांचा नाश लोह तर करतेंच; परंतु लोहाकिट्टामध्यें (लोखंडाच्या गंजामध्यें) देखील हा रोगनाशक गुण आहे. (२१०)

लोहांतील स्वाभाविक दोषः—जाड्य, ताठरपणा, अंगाचा घाम, मळकटपणा, आग, मुतखडा, अंगाला घाण येणें हे सात दोष लोहापासून होतात (२११).

लोह शुद्ध न करतां वापरलें तर नपुंसकत्व व कुष्ठ हे रोग किंबहुना मृत्युसुद्धां येईल. अशुद्ध लोहानें हृद्रोग, शूळ, मूतखडा होतो, शरीरांत अगोदरच जे रोग झालेले असतात ते वाढतात

आणि काळीज थडथड उडणें (Palpitation) हाहि रोग होण्याचा संभव असतो. (२१२)

लोहभस्म बरोबर न साधलें तर त्यानें प्राणनाश होतो, मद चढतो किंवा पोटशूळ तरी निश्चयानें होतो. शिवाय शरीरांत चपळाई रहात नाहींच; पण उलट काळजाचा रोग मात्र होण्याची भीति असते. (२१३)

अथ केचित्—

न रसेन विना लोहं न लोहं चाभ्रकं विना ।
एकत्वेन शरीरस्य बंधो भवति देहिनः ॥ २१४ ॥
पारदेन विना लोहं यः करोति पुमानिह ।
उदरे तस्य किट्टानि जायन्ते नात्र संशयः ॥ २१५ ॥
वस्तुतस्तु प्राशस्त्याय रसयोगो रसाभ्रयोगश्च । अथानुपानमेतस्य—

त्रिफलामधुसंयुक्तं सर्वरोगेषु योजयेत् ।
पथ्याशिनामयोभस्म यथोक्तगुणदं भवेत् ॥ २१६ ॥
अस्य मात्राप्रमाणं प्रागुक्तम् । अथ लोहसेविनां वर्ज्यानि—

कूष्माण्डं तिलतैलं च माषान्नं राजिकां तथा ।
मद्यमम्लं मसूरांश्च त्यजेल्लोहस्य सेवकः ॥ २१७ ॥

कांहींचें म्हणणें आहे कीं:—

पाऱ्यावांचून लोहाला महत्व नाहीं, आणि अभ्रकावांचूनहि नाहीं. नुसतें लोहच औषध म्हणून दिलें तर सेवन करणाराचें शरीर जखडल्यारखें मात्र होतें. जो पाऱ्याशीं संयोग केल्याशिवाय लोह नुसतेंच घेतो त्याच्या पोटांत त्या लोहाचें किट्टण सांचून राहतें ह्यांत संशय नाहीं. (२१५)

वस्तुतः लोहाबरोबर पारा व अभ्रक यांच्या भस्माचा संयोग करणें चांगलें. आतां लोहाला अनुपान सांगतोः—

कोणत्याहि रोगावर त्रिफळ्यांत मध घालून त्यांत तें द्यावें. लोह घेऊन जे पथ्यानें राहतात त्यांना त्या लोहापासून सांगितलेला गुण येतोच. (२१६).

लोह घेण्याचें प्रमाण पूर्वी सांगितलेंच आहे. आतां लोह सेवन करणाऱ्यानें कोणते पदार्थ खाऊं नयेत तें सांगतोः—

कोहळा, तिळाचें तेल, उडीद, मोहरी, आंबट पदार्थ, मसुर हे जिन्नस लोह घेणारानें खाऊं नयेत.

अथ लोहोपद्रवे—

मुनिरसापिष्टविडङ्गं मुनिरसलिप्तं चिरं स्थितं घर्मे ।
द्रावयति लोहादोषान् वन्हिर्नवनीतपिण्डमिव ॥ २१८ ॥
काले मलप्रवृत्तिर्लाघवमुदरे विशुद्धिरुद्गारे ।
अंगेषु नावसादो मनःप्रसादोऽस्य परिपाके ॥ २१९ ॥

अस्य लोहस्य ॥

कृमिरिपुसहितं लीढं सहितं स्वरसेन वङ्गसेनस्य ।
क्षपयत्याचिरान्नियतं लोहाजीर्णोद्भवं शूलम् ॥ २२० ॥
आरग्वधस्य मज्जाभी रेचनं किट्टशान्तये ।
भवेद्यद्यतिसारश्च पीत्वा दुग्धं तु तं जयेत् ॥ २२१ ॥

लोहापासून विकार उत्पन्न झाला तर आगस्त्याच्या पानांच्या रसांत वावडिंगें खलून, आगस्त्याच्याच पाल्याच्या रसांत तें चूर्ण चाटावें आणि बराच वेळ उन्हांत बसावें, म्हणजे विस्तवापुढें जसें लोणी वितळतें, त्याप्रमाणें लोहाचे दोष विरून जातात. शौचास यथाकाळीं साफ होतें, पोट हलकें होतें, करपट ढेंकरा येत नाहींत, थकवा जातो, मन प्रसन्न रहातें. हे सुपरिणाम लोहाचा उत्तम परिपाक झाल्यानें अनुभवास येतात (२१९).

वंगसेन म्हणजे अगस्ता. त्याच्या रसाबरोबर किंवा वावडिंगाच्या चूर्णाबरोबर जर औषध घेतलें तर लोह न पचल्यामुळें जो शूळ उत्पन्न होतो त्याचा तात्काळ निरास होतो किंवा बाहव्याच्या शेंगेंतील मगज घेऊन जुलाब झाले म्हणजे लोहाचें किट्टण बसल्यामुळें होणारे आजार हटतात. पण बाहव्यामुळें जर फारच रेच झाले तर त्यावर दूध प्यावें, म्हणजे जुलाब थांबतील (२२१).

अथ लोहमारणम्—

जीर्णशस्त्रादिखण्डा वा पुराणा यन्त्रखण्डकाः ।
तीक्ष्णजास्ते हि गृह्णन्ति मारणार्थं भिषग्वराः ॥ २२२ ॥

यन्त्रखण्डकाः यन्त्रीलोहामिति प्रसिद्धा लोके । येषां छिद्रेषु स्वर्णसूत्रं क्षिप्त्वा संदंशेनाकृष्य वर्धयन्ति स्वर्णकारास्तानि यन्त्रलोहानीति प्रसिद्धिः । शस्त्रादिखण्डाः खड्गकट्टारिकाच्छुरिकादिजाः । अन्येऽपि तादृशसंबन्धिना ग्राह्याः ॥

तेषां कण्टकवेधीनि यथाशक्ति दलानि वै ।
निर्मलानि विधायादौ शोधयेत्प्रोक्तवर्त्मना ॥ २२३ ॥
पश्चाच्छुद्धदलान्येषां लोहकारैस्तु चूर्णयेत् ।
शुल्कं दत्त्वा कुट्टयेद्वा तच्चूर्णमथ मारयेत् ॥ २२४ ॥

आतां लोहभस्मक्रिया सांगतोः--

जुन्या हत्याराचे तुकडे अगर जुन्या यंत्रांचे तुकडे हे पोलादाचे असतात, ते लोहभस्मासाठीं वैद्यानें जमा करावे.

यंत्राच्या तुकड्यांना " यंत्रीलोह " असें नांव प्रसिद्ध आहे. कानर्शाचे तुकडे चापट ठोकून त्यांना बारीक बारीक भोकें पाडून त्यांत सोनार लोक सोन्याची तार रोचतात आणि दुसऱ्या बाजूनें सांडसानें बाहेर खेंचून काढून ती तार वाढवून लांब व बारीक करतात. त्या तुकड्यांना यंत्रीलोह म्हणतात, हें सर्वांना माहीत आहेच; हत्याराचे तुकडे म्हणजे तरवारी, कट्यारी, सुऱ्या वगैरे किंवा तशाच दुसऱ्या हत्यारांचे तुकडे हे भस्माकरतां चालतील.

असे तुकडे ठोकून कंटकवेधी म्हणजे कागदाप्रमाणें करवतील तितके पातळ करावे आणि ते स्वच्छ करून वर सांगितलेल्या कृतीनें शुद्ध करावे (२२३). नंतर त्या शुद्ध केलेल्या पत्र्यांचा लोहाराकडून रेतीप्रमाणें चुरा करावा किंवा पैसे देऊन कोणाकडून तरी चांगले कुटून त्यांचा भुगा करावा आणि तें चूर्ण मारणाकरितां घ्यावें (२२४).

अथ सुगमपक्षः—

शाणोद्धान्तं सारचूर्णं गृहीतं चुम्बकाश्मना ।
शस्त्रकृल्लोहकाराणां गृहे तद्दहुलं भवेत् ॥ २२५ ॥
तच्चूर्णं तु समानीय सुधौतं निर्मलं शुचि ।
युक्त्या संशोध्य शास्त्रोक्तविधिना तं तु मारयेत् ॥ २२६ ॥

युक्तिस्तु दृढशरावे वा लोहजशरावे वा तच्चूर्णं संस्थाप्य, कोकिलैः शुल्कानीतैर्धर्मयित्वा लोहकारादिभिर्धमापयित्वा वा भस्त्रावातेन अग्निं समानं दृष्ट्वा, संदंशेन निष्कास्य, तन्मध्ये तैलतक्रादि देयं; एवं सुकरं भवति । तैलतक्रादिषु चूर्णे निक्षिप्तं चेत्पुनः पुनस्तस्मान्निष्कासने महत्प्रयास इति । एवं यथाबुद्धिवैभवं शोधयेत् ।

पुनरन्योऽपि चूर्णप्रकारः--

संशुद्धं लोहजं पत्रं तप्तं तप्तं वराजले ।
गोजले वा मुहुः क्षिप्तं क्षिप्रं चूर्णत्वमाप्नुयात् ॥ २२७ ॥

पुनरन्योऽपि चूर्णप्रकारः—

स्थूलाभ्यः सिकताभ्योऽपि चुम्बकेन शनैर्मुहुः ।
लोहचूर्णं हि गृह्णन्ति सुसूक्ष्मं मारणे हितम् ॥ २२८ ॥

सर्वांत सोपी युक्ति अशी कीं:—

सहाणेवर पोलाद घासतात त्यावेळीं त्याचा चुरा खालीं पडतो, तो लोहचुंबकानें गोळा करावा. असला चुरा शिकलगाराच्या दुकानांत पुष्कळ सांपडतो. तो चुरा आणून चांगला धुवून स्वच्छ निर्मळ करून त्याची पद्धतशीर शुद्धी करून मग मारण करावें (२२६).

व्याख्या:—पद्धतशीर म्हणजे एका मजबूत खापराच्या संपुटांत किंवा लोखंडाच्या कढईत चुरा ठेऊन मोलानें मजूर लावून तो भट्टींत फुंकावा किंवा लोहाराच्या भट्टींत त्याला भात्यानें आंच द्यावी.निखाऱ्याप्रमाणें लाल झाल्यावर सांडसानें संपुट बाहेर काढावें आणि त्या चुऱ्यावर तेल व ताक ओतावें; तेलांत किंवा ताकांत चुरा बुडवूं नये. कारण बारीक चुरा ताकांतून बाहेर काढण्यास फार त्रास पडतो. याप्रमाणें अक्कल चालवून लोहशुद्धि करावी. दुसराहि एक प्रकार आहे तो असा:—

शुद्ध केलेला लोहाचा पत्रा घेऊन तो पुनः पुनः तापवून त्रिफळ्याच्या काढ्यांत किंवा गोमूत्रांत वारंवार बुडविला असतां त्याचा चुरा होतो (२२७).

दुसरा एक प्रकार असा आहे कीं: —लोहचुंबक वाळूंत हळू हळू फिरवावा, म्हणजे त्याला लोखंडाचे बारीक बारीक कण चिकटतात. भस्माकरतां तें लोहचूर्ण उत्तम होय. (२२८).

अथ विशेषशोधनम्—

तैलतक्रादिसंशुद्धं लोहं शोध्यं विशेषतः ।
प्रोक्तदोषविनाशाय तद्दिशामिमिहोच्यते ॥ २२९ ॥
त्रिफलाष्टगुणे तोये त्रिफलाषोडशं पलम् ।
तत्क्वाथे पादशेषे तु लोहस्य पलपञ्चकम् ॥ २६० ॥
कृत्वा पत्राणि तप्तानि सप्तवारं निषेचयेत् ।
एवं प्रलीयते दोषो गिरिजो लोहसंभवः ॥ २३१ ॥

अथात्र कान्तलोहे विशेषः—

शशरक्तेन संलिप्तं किंवाऽऽर्कपयसाऽऽयसम् ।
दलं हुताशने ध्मातं सिक्तं त्रैफलवारिणि ॥
त्रिशः कान्तस्य संशुद्धिरित्येवं परमा भवेत् ॥ २३२ ॥

अन्यत्रापि—

तप्तं क्षाराम्लसंयुक्तं शशरक्तेन भावितम् ।
कान्तलोहं भवेच्छुद्धं सर्वदोषविवर्जितम् ॥ २३३ ॥

अत्रान्योऽपि विशेषः—

तत्तव्याध्युपयुक्तानामौषधानां जलेऽयसः ।
प्रक्षेपं प्राह तत्त्वज्ञः सिद्धो नागार्जुनस्ततः ॥ २३४ ॥
ततः सामान्यविशेषशोधनतः । अन्यच्च—
सर्वाभावे निषेक्तव्यं क्षीरतैलाज्यगोजले ।
शुद्धस्य शोधनं ह्येतद्गुणाधिक्याय संमतम् ॥ २३५ ॥

इति विशेषशोधनम् ।

आतां विशेष शुद्धि सांगतों:—

जरी तेल व ताक यांत बुडवून लोह शुद्ध केलें तरी पूर्वी सांगितलेले लोहदोष घालविण्याकरितां त्यांची जी विशेष रीतीनें शुद्धि केली पाहिजे, ती आतां सांगतों. त्रिफळा एकभाग,पाणी आठ भाग, आणि पल* या नांवाचे गवत सोळावा हिस्सा यांचा काढा करून तो काढा चौथा हिस्सा उरवावा आणि त्या काढ्यांत लोह वीस तोळे घेऊन त्याचे पत्रे करून ते तापवून सात वेळ बुडवावे. याप्रमाणें केलें असतां पर्वतामुळें जे दोष लोहांत आलेले असतात त्यांचा परिहार होतो. (२३१).

कांतलोहाची विशेष शुद्धि:—

लोहाच्या पत्र्याना सशाच्या रक्ताचा अगर रुईच्या चिकाचा लेप करावा आणि ते पत्रे भट्टींत लाल करून त्रिफळ्याच्या काढ्यांत तीन वेळ बुडवावे,म्हणजे कान्तलोह उत्तम रीतीनें शुद्ध होतें.(२३२)

दुसऱ्या एके ठिकाणीं दिलेली रीति:—

कान्तलोहाचे पत्रे सशाच्या रक्तानें चोपडून ते तापवून क्षाराम्लांत (म्ह. क्षार आणि अम्ल यांच्या मिश्रणांत) बुडवावे, म्हणजे कान्तलोह शुद्ध व सर्वदोष रहित होतें.

---

* " पल याचा अर्थ मांस किंवा एक प्रकारचें गवत असा आहे.

दुसराहि एक विशेष असा आहे कीं:—

ज्या ज्या रोगावर लोहाचा उपयोग करावयाचा असेल त्या त्या रोगावर जीं औषधें द्यावयाचीं त्यांच्या काढ्यांतच लोह तापवून बुडवावें, अशी युक्ति मर्मज्ञ आणि शास्त्रप्रवीण असा जो नागार्जून त्यानेंच सांगितली आहे. (२३४).

या सामान्य व विशेष शुद्धिप्रयोगांतच एक प्रकार असा आहे कीं, दुसरें कांहीं करण्याचें न जुळेल तर शुद्ध लोह तापवून दुध, तेल, तूप आणि गोमूत्र यांत क्रमानें बुडवून काढावें. ही विशेष शुद्धि केल्यानें लोहाचा गुण अधिकच वाढतो. ही गोष्ट शास्त्रज्ञांना मान्यच आहे. (२३५).

अथ भस्मप्रकारः—

संशुद्धं लोहचूर्णं तु समानीय भिषग्वरः ।
संमर्दयेद्दिनं चैकमामतिन्दुकजै रसैः ॥ २३६ ॥
त्रिफलाभृङ्गराजस्य कण्टकारीरसस्य च ।
पुटानि त्रीणि दत्तानि सत्यं वारितरं भवेत् ॥ २३७ ॥
तत्तद्रोगानुपानेन सर्वरोगहरं भवेत् ।
लाला अनूपरायेण उपदिष्टं न संशयः ॥ २३८ ॥
शुद्धस्य सूतराजस्य भागो भागद्वयं बलेः ।
सारचूर्णं द्वयोस्तुल्यं मर्दयेत्कन्यकाम्बुना ॥ २३९ ॥
यामद्वयं हि तद्गोलं संवेष्ट्यैरण्डजैर्दलैः ।
ततः सूत्रेण संबध्य स्थापयेत्ताम्रसंपुटे ॥ २४० ॥
समुद्य वदनं तस्य मृदा संशोष्य तत्पुनः ।
त्रिदिनं धान्यराशिस्थं तत उद्धृत्य मर्दयेत् ॥ २४१ ॥
वस्त्रेण गालितं चूर्णं नीरे तरति हंसवत् ।
सोमामृतमिति ख्यातं लोहभस्म प्रकीर्तितम् ॥ २४२ ॥

इति निरग्निकं सोमामृताभिधं लोहभस्म ।

याप्रमाणें विशेष शुद्धि सांगितली. आतां भस्म प्रकार सांगतों.

शुद्ध केलेलें लोहचूर्ण घेऊन त्याचा टेंभुर्णीच्या कच्चा फळांच्या रसांत एक दिवस खल करावा. त्याचप्रमाणें त्रिफळा, म्हाका, रिंगणी यांच्या रसांतहि खल करून तीन पुटें द्यावीं, म्हणजे लोह खरोखरच वारितर*होईल.(२३७) मग यावर अनुपान योजून तें

---

* वारितर पाण्यावर तरेल इतकी बारीक पूड.

भस्म रोग्यास दिलें असतां सर्व रोगांचा परिहार होईल. हा अनुभव लाला अनुपराय यांनीं सांगितला आहे,म्हणून त्याविषयीं संशय नको. शुद्ध पारा एकभाग, शुद्ध गंधक दोन भाग, आणि दोहोंच्याइतकें लोहभस्म घेऊन कोरफडीच्या रसांत दोन प्रहर खल करून त्यांची गोळी करावी आणि ती एरंडाच्या पानांत गुंडाळून दोऱ्यानें गुंडाळावी आणि तांब्याच्या पुटांत ठेऊन त्यांचें तोंड मातीनें लिंपावें. वाळल्यावर तें संपुट तीन दिवस धान्याच्या राशींत खुपसून ठेवावें. मग काढून पुनः खलावें आणि वस्त्रगाळ करावें. ती वस्त्रगाळ पूड हंसाप्रमाणें पाण्यावर तरेल. ह्या लोहभस्माला "सोमामृत" म्हणतात. (२४२)

ही आंच दिल्याशिवाय लोह तयार करण्याची "सोमामृत' भस्मक्रिया सांगितली.

अथ रसपद्धत्यां सूर्यतापि लोहभस्म उक्तम्—

शाणोद्धान्तमयस्तु कान्तमथवा क्षिप्त्वाऽर्धलेलीतकं
दत्वाऽऽढ्यंशरसं विमर्द्य सलिलैर्भृङ्गाद्रिकर्णीरसैः ।
पक्वं सूर्यपुटैश्चतुर्दशादिनैरेरण्डपत्रावृतं
भस्म स्याद्गृहधूमधूसरुचि प्राग्धान्यराशिस्थितम् २४३

व्याख्या—संशुद्धं लोहं शाणोद्धान्तं शाणं शस्त्रोत्तेजकं शस्त्रं तत्र घर्षणेन पतितं उद्धान्तं पतितमयः सारलोंह, अथवा तेनैव प्रकारेण पतितं कान्तलोंह, तत्रार्धलेलीतकं गन्धकं क्षिप्त्वा, तत्र चतुर्थांशं शुद्धपारदं च दत्वा, सर्वं विमर्द्य पूर्वं शुष्कमेव मर्दयित्वा पश्चात्सालिलैः काञ्जिकादिभिः, पश्चाद्भृङ्गस्वरसेन तथा आद्रिकर्णी गिरिकर्णी तस्याः स्वरसैर्विमर्द्य, सूर्यपुटैः पक्वं चतुर्दशादिनैर्भावनाभिः, पश्चादरण्डपत्रावृतं गोलकं कृत्वा धान्यराशिस्थं त्रिदिनं, गृहधूमधूसरुचि अलिन्दधूमतुल्यं भस्म स्यात्। अत्र सूर्यपुटानि प्रातःकालादारभ्य सन्ध्यापर्यन्तं शुष्कमर्दनेन संपादनीयानि, भावना तु संन्ध्यायां यथाऽऽर्द्रभावं संपद्यते तथा कार्या। अत्र भावनानियमो नास्ति, मर्दनस्यैव भस्मसंपादनत्वात्। इति सूर्यतापि लोहभस्म।

आतां उन्हाच्या उष्णतेनें करावयाच्या "सूर्यतापि" लोहभस्माचा रसपद्धतींतील श्लोक सांगतों.

सहाणेवरून (घासून) बाहेर पडलेलें लोह किंवा कांत-लोह घेऊन त्यांत अर्ध्यानें " लेलीतक " घालून व चतुर्थांश शुद्ध पारा देऊन खल करावा. मग पाणी, भृंगराज व गिरिकर्णी यांत खल करून सूर्यपुटानें चौदा दिवस पचन करावें. नंतर तें मिश्रण एरंडाच्या पानांत गुंडाळून धान्याच्या राशींत ठेवावें, म्हणजे घेरोशाच्या रंगाप्रमाणें धुरकट रंगाचें भस्म होतें (२४३)

हा श्लोक समजण्यास कठिण आहे; म्हणून ग्रंथकारानें त्यावर व्याख्या केली आहे ती अशी:—शुद्ध केलेले व सहाणेवर घासून " बाहेर पडलेलें " म्हणजे धार लावण्याच्या सहाणेवर पोलाद घासतांना जो चुरा पडतो तो पोलादाचा चुरा किंवा तसाच घासलेला कांतलोहाचा चुरा घ्यावा. मग त्यांत अर्धा भाग लेलीतक म्ह० गंधक आणि चतुर्थांश म्हणजे लोहाच्या चौथ्या हिश्शानें पारा घालून सर्वांचा एकत्र खल कोरडाच करावा. मग पाणी म्हणजे कांजीचें पाणी घेऊन त्यांत खल करावा. मग त्याचा माक्याच्या रसांत आणि " गिरीकर्णी " म्हणजे गोकर्णीच्या रसांत खल करून चौदा भावना देऊन सूर्यपुटानें आंच द्यावी. मग गोळी करून ती एरंडाच्या पानांत गुंढाळून तीन दिवस धान्याच्या राशींत ठेवावी. म्हणजे घरांतील घेरोशाप्रमाणें धुरकट रंगाचें भस्म तयार होतें. सूर्यपुटें द्यावयाचीं तीं सकाळपासून संध्याकाळपावेतों जिन्नस कोरडा होईपर्यंत खलून द्यावीं आणि भावना द्यावयाचीं तीं संध्याकाळीं जें मिश्रण रसानें ओलें होईल इतकी द्यावी. येथें भावना किती द्यावयाच्या त्याचा नियम नाहीं. केवळ खल करूनच हें भस्म बनवावयाचें असतें. याप्रमाणें सूर्यतापि लोहभस्मक्रिया सांगितली.

मतान्तरम्—

योगीन्द्रैरनुभूतोऽयं क्रमोऽन्यो लोहमारणे ।
कथ्यते रामराजेन कौतूहलधियाऽधुना ॥ २४४ ॥

यथा—

सूतकाद्विगुणं गन्धं दत्वा कुर्याच्च कज्जलीम् ।
द्वयोः सममयश्चूर्णं मर्दयेत्कन्यकाद्रवैः ॥ २४५ ॥
यामयुग्मं ततः पिण्डं कृत्वा ताम्रस्य पात्रके ।
धर्मे धृत्वा रुबूकस्य पत्रैराच्छादयेद्बुधः ॥ २४५ ॥

यामद्वयाद्भवेदुष्णं धान्यराशौ न्यसेत्ततः ।
दत्वोपरि शरावं तु त्रिदिनान्ते समुद्धरेत् ॥ २४७ ॥
पिष्ट्वा च गालयेद्वस्त्रादेवं वारितरं भवेत् ।
एवं सर्वाणि लोहानि स्वर्णादीन्यपि मारयेत् ॥ २४८ ॥
इत्यपि सूर्यतापि लोहभस्म स्वर्णादिभस्म च ।

आणखी प्रकार सांगतोः--

रसयोग्यांनीं अनुभवलेला व खरा असा लोहमारणाचा दुसरा एक प्रकार आहे तो कुतूहलवुद्धीनें रामराजानें आतां सांगितला आहे तो असाः--

पारा एक भाग व त्याच्या दुप्पट गंधक घेऊन खलून कज्जली करावी व दोहोंइतकेंच लोहचूर्ण घालून कोरफडीच्या रसांत दोनप्रहरपर्यंत खल करावा. मग मिश्रणाची गोळी करून ताम्रसंपुटांत ठेवून संपुट उन्हांत ठेवावें व वर एरंडाचीं पानें झांकण घालावीं. याप्रमाणें दोन प्रहर उन्हांत ठेवल्यानें संपुट तापेल. मग तें धान्याच्या राशींत खुपसून ठेवावें आणि तीन दिवसांनंतर काढावें. मग चुरून खलावें आणि वस्त्रांतून गाळून घ्यावें. असें केल्यानें भस्म वारितर होतें. याप्रमाणें पाहिजे तो लोह, किंबहुना सोनें सुद्धां, मारून भस्म करतां येतें. (२४८)

याप्रमाणें सूर्यतापि लोह भस्म व सुवर्णभस्मक्रिया सांगितली.

अथाग्निपक्वं लोहभस्म तत्रैव—

शाणाकृष्टमयोरजस्त्रिदिवसं पिष्टं वरावारिणा
यद्वा रक्तपुनर्नवादलरसैर्यद्वाऽद्रिकर्णीरसैः ।
चाङ्गेरीसलिलैस्तथैव सलिलैर्वा नीरवानीरजै—
स्त्रिंशद्वन्तिपुटैः परैर्जलतरं स्याद्भस्म जम्बूप्रभम् ॥ २४९ ॥

व्याख्या—शाणाकृष्टं शाणोपरि आकृष्टं यच्छुद्धं लोहं तीक्ष्णं कान्तं वा, तस्य रजः चुम्बकपाषाणादिना निःसारितं; वरा त्रिफला, अद्रिकर्णी गिरिकर्णी, चाङ्गेरी अम्लपर्णी, नीरवानीरो जलवेतसः, एषामन्यतमस्य रसेन त्रिदिवसं पिष्टं त्रिवारं भावितं, पश्चाद्वन्तिपुटैः पक्वं भस्म स्यात्त्रिंशत्संख्याकगजपुटैरित्यर्थः । परैरतो प्यधिकैर्गजपुटैरुत्कृष्टतरं जलतरं भस्म स्यादित्यर्थः । अत्र वाशब्दः समुच्चये । तेन एतैरौषधैर्यथा त्रिंशत्पुटानि भवन्ति तथा कार्यम् ।

त्रिदिवसशब्दस्तु भावनात्रयवाचकः, न त्वेकैकादिनसाध्यभावना-वाचकः । इत्यग्निपक्वं त्रिंशत्पुटि शतपुटि वा लोहभस्म ।

आतां अग्निपुटी लोहभस्म सांगतोः—

हा श्लोक रसपद्धतींतच आहे.

सहाणेवरून घेतलेलें लोहचूर्ण त्रिफळ्याचा पाण्यांत किंवा तांबड्या पुनर्नवेच्या पानांच्या रसांत किंवा गिरिकर्णीचा रसांत अगर चांगेरीच्या रसांत अथवा " नीरवानीरा "चें चूर्ण व पाणी यांच्या मिश्रणांत तीन दिवस खलावें.मग त्याला ३० किंवा अधिक गजपुटें द्यावीं; म्हणजे जांभळ्या रंगाचें वारितर लोहभस्म होतें. (२५९)

व्याख्याः—सहाणेवरील म्हणजे सहाणेवर घासलें असतां जो चुरा पडतो तो चुरा, लोहाचा, पोलादाचा किंवा कांतलोहाचा घ्यावा. चुरा लोहचुंबकानें गोळा करावा, म्हणजे त्यांत मिसळ असत नाहीं. मग त्रिफळ्याचा काढा किंवा गिरिकर्णी म्ह. गोकर्णी, चांगेरी म्हणजे आंबट चुका, नीर वानीर म्हणजे पाणवेत यांपैकीं मिळेल त्या वनस्पतीच्या रसांत अथवा काढ्यांत तीन दिवस खलून भावना द्याव्या. मग तीस गजपुटापर्यंत पुटें द्यावीं. जास्त दिलीं तर तितकें उत्तमच. याप्रमाणें पुटें बसलीं म्हणजे 'वारितर' लोह बनतें. येथें "किंवा" म्हटलें आहे. परंतु त्याचा अर्थ समुच्चयवाचक आहे. तीस पुटें दिलीं जातील असें करावें. तीन दिवस म्हणजे तीन भावना द्यावयाच्या. परंतु असा अर्थ नव्हे कीं, एकेक दिवशीं एकेकच भावना द्यावयाची. याप्रमाणें अग्निपुट लोहभस्म सांगितलें. याला तीस पुटें द्यावीं किंवा शंभरहि द्यावीं.

अन्यच्च—

प्रक्षिपेद्वादशांशेन दरदं तीक्ष्णचूर्णतः ।
मर्दयेत्कन्यकाद्रावैर्यामंयुग्मं ततः पुटेत् ॥
एवं सप्तपुटैर्मृत्युं लोहचूर्णमवाप्नुयात् ॥ २५० ॥

इति सप्तपुटि लोहभस्म । मतान्तरम्—

काकोदुम्बरिकानीरैर्लोहपत्राणि सेचयेत् ।
वन्हितप्तानि षड्वारं कुट्टयेत्तदुलूखले ॥ २५१ ॥

तत्पञ्चमांशाहिंगूलं क्षिप्त्वा सर्वं विमर्दयेत् ।
कुमारीनीरतः श्लक्ष्णं पुटेद्गजपुटेन तु ॥ २५२ ॥
त्रिवारं त्रिफलाक्काथैस्तत्संख्यैरपि तत्त्ववित् ।
निरुत्थं जायते लोहं त्रिधाऽप्यत्र न संशयः ॥ २५३ ॥
इत्यग्निपक्वं सप्तपुटि लोहभस्म । मतान्तरम्—
निम्बूफलस्य पानीयैः सकासीसैः प्रपूरिते ।
कांस्यपात्रे क्षिपेत्खड्गखण्डांश्चण्डातपास्थितान् ॥ २५४ ॥
दिनैकेन स्फुटन्त्येते दिनान्ते तांस्तु पेषयेत् ।
त्रिफलाक्वाथापिष्टं तच्चूर्णं गजपुटे पचेत् ॥ २५५ ॥
पौनःपुन्येन यावत्स्यात्तद्वारितरमुत्तमम् ।
ततः पारद्गन्धाभ्यां तत्समाभ्यां हि मर्दितम् ।
पूर्ववद्धान्यराशिस्थं तीक्ष्णं सर्वोत्तमं भवेत् ॥ २५६
इति लोहभस्म ।

दुसरा प्रकारः—

पोलादाच्या बाराव्या हिश्शाइतकें हिंगुळ घेऊन दोहोंचा खल कोरफडीच्या रसांत एकत्र दोन प्रहरपर्यंत करावा आणि मग पुट द्यावें. याप्रमाणें सात पुटें बसलीं म्हणजे लोह मरून जाऊन त्याचें भस्म होतें. (२५०).

हें सप्तपुटि लोहभस्म सांगितलें. आतां आणखी एक प्रकार सांगतोंः—

लोहाचे पत्रे करून ते लाल झाले म्हणजे त्यांच्यावर काळ्या उंबराचा रस शिंपडावा. याप्रमाणें सहा वेळ केल्यानंतर ते पत्रे उखळांत कुटावे. नंतर त्यांत पांचव्या हिश्यानें हिंगुळ घालून सर्वांचा खल कोरफडीच्या रसांत अगदीं बारीक करावा आणि तीन वेळ गजपुटानें आंच द्यावी. त्रिफळ्याच्या काढ्यांत वरच्या-प्रमाणेंच खल करून गजपुटें दिल्यासहि चालेल. तीन पुटांनंतर लोहभस्म निरुत्थ होतें यांत संशय नाहीं. (२५३).

याप्रमाणें सहा पुटि अग्निभस्म झालें. आतां दुसरा एक प्रकार सांगतोंः—

कागदी लिंबाच्या रसांत हिराकस निरवून तो रस एका कांशाच्या पात्रांत ओतावा आणि त्यांत पोलादाच्या हत्याराचे तुकडे कडक उन्हांत तापवून बुडवावे. याप्रमाणें एक दिवसभर

करावें. म्हणजे ते तुकडे फुटतील. फुटल्यावर संध्याकाळीं त्यांचें चूर्ण करावे आणि त्रिफळ्याच्या काढ्यांत बारीक खल करून गजपुट द्यावें. याप्रमाणें वारंवार खलून पुटें द्यावीं, म्हणजे लोह उत्तम रीतीनें वारितर होईल. मग समभाग पारा व गन्धक घेऊन त्यांचा लोहाबरोबर खल करावा आणि पूर्वीप्रमाणें धान्याच्या राशींत तीन दिवस पुरून ठेवावें, म्हणजे तें भस्म फारच उत्कृष्ट होतें (२५६).

मतान्तरम्—

लोहं पत्रमतीव तप्तमसकृ (१००)त्क्काथे क्षिपेत्त्रैफले
चूर्णीभूतमिदं पुनस्त्रिफलजे क्वाथे पचेद्द्वाजले ।
मत्स्याक्षीत्रिफलारसेन पुटयेद्यावान्निरूत्थं भवे-
त्पश्चादाज्यमधुप्लुतं सुपुटितं सिद्धं भवेदायसम् ॥ २५७ ॥

मत्स्याक्षी शालश्ची । इति लोहभस्म । मतान्तरम्—

परिलुप्तं दाडिमपत्रवारा लौहं रजः स्वल्पकटोरिकायाम् ।
म्रियेत वस्त्रावृतमर्कभासा योग्यं पुटैः स्यात्त्रिफलादिकानाम् ।

इति लोहभस्म । मतान्तरम्—

लोहचूर्णं पलं खल्वे सोरकस्य पलं तथा ।
अच्छगन्धपलं चापि सर्वमेकत्र मर्दयेत् ॥ २५९ ॥
कुमार्यार्द्रैर्दिनं कुर्याद्गोलकं रुबुपत्रकैः ।
संवेष्ट्य च मृदा लिप्त्वा पुटेद्गजपुटे भिषक् ॥ २६० ॥
स्वाङ्गशीतं समुद्धृत्य सिन्दूराभमयोरजः ।
मृतं वारितरं ग्राह्यं सर्वकार्यकरं परम् ॥ २६१ ॥

आणखी एक प्रकार सांगतोः—

लोहाचे पातळ पत्रे करून ते तापवून लाल झाले म्हणजे त्रिफळ्याच्या काढ्यांत बुडवावे. याप्रमाणें वारंवार म्हणजे सुमारें शंभर वेळां देखील करावें. मग त्याचें चूर्ण करून पुनः त्रिफळ्याच्या काढ्यांत व गोमुत्रांत उकळावें. मग मत्स्याक्षी आणि त्रिफळा यांच्या काढ्यांत खलून गजपुट दिलें असतां निरुत्थ भस्म होतें. मग तूप व मध यांत खलून पुनः पुट द्यावें, म्हणजे 'सिद्धलोह' तयार होतें. (२५७).

मत्स्याक्षी म्हणजे–चुका असा कोणी कोणी अर्थ करतात.

आणखी प्रकारः–

डाळींबीच्या पानांच्या रसांत लोहाचा चुरा खलून तें मिश्रण एका लहानशा हंडींत ओतून वस्त्रानें झांकून उन्हांत ठेवावें. याप्रमाणें केलें म्हणजे लोह बनेल. मग तें भस्म त्रिफळ्याच्या काढ्यांत खलून पुटें द्यावीं, म्हणजे लोह निरुत्थ होतें (२५८).

आणखी प्रकारः--

लोहाचा चुरा चार तोळे, सोरा चार तोळे, शुद्ध गंधक चार तोळे असें एका खलांत घालून एकत्र खल कोरफडीच्या रसांत एक दिवसभर करावा. मग गोळा करून तो एरंडाच्या पानांत गुंडाळावा आणि मातकापडलेप करून गजपुटाची आंच द्यावी. आपोआप थंड झाल्यावर काढावें. म्हणजे शेंदऱ्या रंगाचें वारितर असें लोह तयार होतें. त्याचा सर्व ठिकाणीं उपयोग करावा. हें एकपुटी लोह सांगितलें (२६१).

इत्येकपुटि लोहभस्म ।

सर्वमेव मृतं लोहं ध्मातव्यं मित्रपञ्चकैः ।
यद्येवं स्यान्निरुत्थं तु सेव्यं वारितरं हि तत् ॥ २६२ ॥
मधुघृतगुग्गुलुगुञ्जाटङ्कणमेतत्तु मित्रपञ्चकं नाम ।
मेलयति सप्तधातूनङ्गाराग्नौ प्रपुटनेन ॥ २६३ ॥
मध्वाज्यं मृतलोहं च सरूप्यं संपुटे क्षिपेत् ।
रुद्वा ध्वाते च संग्राह्यं रूप्यं वै पूर्वमानकम् ॥
तदा लोहं मृतं विद्यादन्यथा मारयेत्पुनः ॥ २६४ ॥

इति मृतामृतलोहपरीक्षा ।

लोहाची परीक्षाः—लोहभस्म आणि मित्रपंचक एकत्र करून अग्नींत भाजावें. फक्त लोहच शिल्लक राहून तें वारितर असेल तर खुशाल सेवन करावें (२६२).

तूप, मध, गुग्गुळ, गुंजा व टाकणखार यांच्या मिश्रणाला मित्रपंचक म्हणतात हें पूर्वी सांगितलेंच आहे. हें मित्रपंचक आणि सप्तधातु असे एकत्र करून निखाऱ्यावर फुंकून आंच दिली असतां एकत्र मिळून जातात. त्याचप्रमाणें तूप, मध व लोहभस्म आणि थोडी चांदी असे एकत्र करून संपुटांत बंद करून आंच द्यावी. रुपें पूर्वीप्रमाणें आणि वजनानें पूर्वीइतकेंच राहिलें तर लोह मृत झालें असें समजावें. नाहींतर पुनः खल करून पुट मारावें (२६४).

गन्धकेनोत्थितं लोहं तुल्यं खल्वे विमर्दयेत् ।
दिनैकं कन्यकाद्रावै रुद्ध्वा गजपुटे पचेत् ॥
इत्येवं सर्वलोहानां कर्तव्येयं निरुत्थितिः ॥ २६५ ॥
इत्यपक्वस्य निरुत्थीकरणम् । अथ मृतलोहस्यामृताकरणम्—
द्विगुणे त्रिफलाक्काथे तुल्ये पिष्ट्वाऽप्ययोरजः ।
विपचेन्मध्यपाकेन सर्वव्याधिजरापहम् ॥ २६६ ॥
इत्यमृतीकरणम् ।

कच्चें लोह निरुत्थ कसें करावें.

गंधक टाकून लोह उत्थित झालें (अर्थात पुनः निराळें झालें) म्हणजे तें घेऊन एक दिवसभर पुनः कोरफडीच्या रसांत खलावें आणि संपुटांत बंद करून गजपुट द्यावें. याप्रमाणें क्रिया केली असतां पाहिजे तें लोह निरुत्थ होतें (२६५).

लोहाचे अमृतीकरणः—

त्रिफळ्यांचा काढा लोहाच्या चूर्णाच्या दुप्पट घेऊन त्यांत तो चुरा खलावा आणि काढा समभाग राहीपर्यंत उकळावा. अग्नि कडक देऊं नये. म्हणजे अमृत असें लोह होतें. तेंहि म्हातारपण व रोग यांचा परिहार करतें (२६६).

ईडलिंबाच्या रसांत हिंगूळ खलून त्यांत लोह तापवून लाल करून बुडवावें. याप्रमाणें पुष्कळ वेळ क्रिया केली तरीहि त्या लोहाचें भस्म होतें याविषयीं खात्री देतों.

जम्बीररससंयुक्ते दरदे तप्तमायसम् ।
बहुवारं विनिक्षिप्तं म्रियते नात्र संशयः ॥ २६७ ॥

अथ लोहद्रुतिः—

देवदाल्या रसैर्भाव्यं गन्धकं दिनसप्तकम् ।
तस्य प्रवापमात्रेण लोहास्तिष्ठन्ति सूतवत् ॥ २६८ ॥
सुरदालीभवं भस्म नरमूत्रेण गालितम् ।
तत्क्षारावापतः कान्तद्रुतिस्त्रिसप्तवारतः ॥ २६९ ॥
इति कान्तद्रुतिः

लोहद्रुति म्हणजे लोह धातु पाण्याप्रमाणें पातळ स्थितींत ठेवणें:—

गंधकाला देवडांगरीच्या रसाची सात दिवस भावना द्यावी, म्हणजे त्यांत लोह बुडवितांक्षणींच तें पाऱ्याप्रमाणें पातळ होऊन राहतें.

देवडांगरीचें भस्म नरमूत्रांत गाळून घ्यावें आणि त्याचा क्षार काढावा. त्या क्षाराची कान्तलोहाला एकवीस वेळां भावना दिली म्हणजे कान्तलोहदेखील पातळ होतें. (२६९)

अथ मण्डूरोत्पत्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि ।
ध्यायमानमयो वन्हौ परित्यजति यन्मलम् ।
लभते किट्टसंज्ञां हि तदनेकाविधं मतम् ॥ २७० ॥

उक्तं च–

ध्यायमानस्य लोहस्य मलं मण्डूरमुच्यते ।
लोहासिंघाणिका किट्टी सिंहानं च निगद्यते ॥
यस्य लोहस्य ये प्रोक्ता तत्किट्टमपि तद्गुणम् ॥ २७१ ॥

लक्षणानि—

ईषच्छोणं गुरु स्निग्धं मुण्डाकिट्टं जगुर्बुधाः ।
भिन्नाञ्जनप्रभं किट्टं विशेषाद्गुरु निर्व्रणम् ॥ २७२ ॥
निःष्कोटरं च विज्ञेयं तीक्ष्णाकिट्टं मनीषिभिः ।
पिङ्गं रूक्षं गुरुतमं मन्ददीर्घमकोटरम् ॥
छिन्नं तु रजतच्छायं स्यात्किट्टं तत्त कान्तजम् ॥ २७३ ॥

अन्यच्च—

अकोटरं गुरु स्निग्धं दृढं शतसमाधिकम् ।
चिरोज्झितजनस्थानसंस्थितं किट्टमाहरेत् ॥ २७४ ॥
शतोत्थमुत्तमं किट्टं मध्यं चाशीतिवार्षिकम् ।
अधमं षष्टिवर्षीयं ततो हीतं विषोपमम् ॥ २७५ ॥

आतां मण्डूराची उत्पत्ति व गुणधर्म वगैरे सांगतोः—

लोखंडाला भट्टीमध्यें आंच देतांना त्याचा मळ जो उडून पडतो त्याला किटण म्हणतात. तेंच किटण मंडूर होय. याचे पुष्कळ प्रकार आहेत. (२७०)

लोखंड भट्टींत तापलें म्हणजे त्याचा जो मळ निघतो तो मण्डूर. त्याची लोह, सिंहानिक, किट्टी, सिंहान अशीं नांवें आहेत. कोणत्याहि लोहाचें किट्ट गुणानें त्या लोहासारखेंच असतें.

मण्डूराचीं लक्षणें:--

मंडूर हा किंचित् तांबडा, जड, व स्निग्ध (मवाळ) असतो. त्याला मुण्ड किट्ट म्हणतात. त्यांत जो काजळाप्रमाणें कुळकुळीत असतो तो फार जड असून त्याला खोंचा नसतात.पोलादाच्या किट्टणाला निःकोटर असें नांव आहे. कान्तलोहाचा मंडूर असतो तो पिंगट, रुक्ष, अतिशय जड, दिसण्यांत मजबूत व लांबट असतो. त्याला खांचखळगे नसतात आणि तो मोडला असतां मोडल्या ठिकाणीं चांदीप्रमाणें चकाकतो. (२७३)

मंडूर कोणता पसंत करावा:—

ज्यांत खांचखळगे नसतात, जो जड व स्निग्ध (तुकतुकीत) दिसतो, जो मजबूत असतो आणि शेकडों वर्षें मनुष्याची वस्ती नाहीं अशा ठिकाणीं जो सांपडतो तो मण्डूर भस्माकरितां पैदा करावा. शंभर वर्षांचा जुना मण्डूर उत्तम, ऐंशीं वर्षांचा मध्यम आणि साठ वर्षांचा कनिष्ठ समजावा. साठ वर्षांपेक्षां कमी वर्षांचा मंडूर टाकाऊ. तो विषाप्रमाणें समजावा. (२७४).

अथ किट्टमारणम्—

अक्षाङ्गारर्धमेतत्किट्टमक्षपात्रस्थगोजले ।
अष्टौ वारांस्तु निर्वाप्य ततः सूक्ष्मं विचूर्णयेत् ॥
तच्चूर्णं मधुना लीढं पाण्डुं हन्ति सकामलम् ॥ २७६ ॥

अथ किट्टगुणाः--

किट्टं कषायं शिशिरं पाण्डुश्वयथुशोफजित् ।
हरते कामलां कुम्भकामलां च हलीमकम् ॥ २७७ ॥
किट्टाद्दशगुणं मुण्डं मुण्डात्तीक्ष्णं शताधिकम् ।
तीक्ष्णाल्लक्षगुणं कान्तं भक्षणात्कुरुते बलम् ॥ २७८ ॥
सुवर्णमथवा रौप्यं मृतं यत्र न विद्यते ।
कान्तलोहेन कर्माणि तत्र कुर्याद्भिषग्वरः ॥ २७९ ॥
स्वर्णाभावे मतं ताप्यं ततोऽपि स्वर्णगैरिकम् ।
रूप्यादीनामलाभे तु प्रक्षिपेद्धिमलादिकम् ॥ २८० ॥

इति श्रीसौराष्ट्रदेशोद्भवसारस्वतकुलावतंसोपाध्यायश्रीमाधवविरचिते आयुर्वेदप्रकाशे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

मण्डूराचें मारण:—

लोखंडाचें जुनें किट्ट घेऊन तें बेहड्यांच्या निखाऱ्याच्या भट्टींत भाजावें आणि बेहड्याचा काढा व गोमूत्र यांच्या मिश्रणांत आठ वेळ बुडवावें. मग त्याची बारीक पूड करावी. ती पूड मधाशीं चाटली असतां पांडुरोग व कावीळ हे नाहींसे होतात (२७६).

मंडूर हा तुरट आणि थंड आहे. तो पांडु, श्वास, सूज, पिवळें अंग, कावीळ आणि कुंभकामला (कावीळ व सूज) हे रोग नाहींसे करतो. (२७७) मंण्डुरापेक्षां साधें (मुण्ड) लोखंड दसपट गुणावह असतें. मुण्डापेक्षां पोलाद शंभरपट आणि पोलादा-पेक्षां कान्तलोह लक्षपट गुणकारी असतें व तें सेवन केलें असतां बलदायक होतें. जेव्हां सुवर्ण किंवा रौप्य यांचें भस्म मिळूं शकत नाहीं तेव्हां कान्तलोह भस्माचा वैद्यानें रोगांवर उपयोग करावा. सुवर्ण भस्म न मिळेल तर सुवर्णमाक्षिक घ्यावें. माक्षिक नसेल तर सोनकाव घ्यावा. त्याचप्रमाणें रौप्य भस्म नसेल तर विमल म्हणजे रौप्य माक्षिक खुशाल औषधांत वापरावें (२८०).

तिसरा अध्याय समाप्त.

अथ चतुर्थोऽध्यायः :

अथोपधातुनिरूपणम् ।

अथ तेषु स्वर्णमाक्षिकम्—'सोनामखी' इति लोके ।
स्वर्णमाक्षिकमाख्यातं तापीजं मधुमाक्षिकम् ।
ताप्यं माक्षिकधातुश्च माक्षिकं चैव तन्मतम् ॥ १ ॥
किंचित्सुवर्णसाहित्यात्स्वर्णमाक्षिकमीरितम् ।
उपधातुः सुवर्णस्य किंचित्स्वर्णगुणैः समम् ॥ २ ॥
न केवलं स्वर्णगुणा वर्तन्ते स्वर्णमाक्षिके ।
द्रव्यान्तरस्य संसर्गात्सन्त्यन्येऽपि गुणा यतः ॥ ३ ॥
किन्तु तस्यानुकल्पत्वात् किञ्चिदूना गुणास्ततः ।
तथाऽपि काञ्चनाभावे दीयते स्वर्णमाक्षिकम् ॥ ४ ॥
कान्यकुब्जाख्यविषये जायते स्वर्णमाक्षिकम् ।
तपतीतीरतोऽपि स्यादित्येवं तद्भियोनिकम् ॥ ५ ॥
कान्यकुब्जोद्भवं ताप्यं विज्ञेयं स्वर्णवर्णकम् ।
तपतीतीरगं तत्तु पञ्चवर्णमुदाहृतम् ॥ ६ ॥

अध्याय चवथा.

उपधातूंचें वर्णन.

सुवर्णमाक्षिक अथवा सुवर्णमुखी.

सुवर्णमाक्षिकालाच तापीज (म्हणजे तापी नदींत सांपडणारें), मधुमाक्षिक, ताप्य, माक्षिक धातु व माक्षिक अशीं नांवें आहेत. माक्षिकांत सुवर्णाच्या छटेसारखा रंग दिसतो म्हणून त्याला सुवर्णमाक्षिक म्हणतात. हा सुवर्णाचा उपधातु असून गुणांनीं कांहींसा सोन्याप्रमाणें आहे. [२.] सुवर्ण माक्षिकांत सोन्यासारखे गुण आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांत दुसरीं द्रव्यें असल्यानें दुसरेहि अनेक गुण त्यांत आढळतात. हा सोन्याचाच उपधातु असल्यानें त्यांत गुण सोन्यापेक्षां किंचित कमीच असतात. तरी सुवर्णाच्या अभावीं माक्षिकच देतात. माक्षिक कनोज देशांत सांपडतें, तापी नदींतहि आढळतें व म्हणूनच त्याला ताप्य किंवा तापीज म्हणतात. कनोज प्रांतांतील माक्षिक सोन्याप्रमाणें दिसतें, आणि तापी नदींतील माक्षिक पंचरसी धातुप्रमाणें असतें.(६).

लक्षणें:—माक्षिक सोन्याप्रमाणें चकचकीत, व जड असतें. त्याला कोचा नसतात व तें सोन्याप्रमाणें दिसतें. पण हातावर घासलें असतां हाताला काळा डाग पडतो.

लक्षणम्—

स्वर्णाभं स्वर्णमाक्षीकं निष्कोणं गुरुतायुतम् ।
कालिमां विकिरेत्तत्तु करे घृष्टं न संशयः ॥ ७ ॥

अथ मारणयोग्यस्य लक्षणम्—

स्वर्णवर्णं गुरु स्निग्धमीषन्नीलच्छवि स्फुटम् ।
कषे कनकवद्घृष्टं तद्वरं हेममाक्षिकम् ॥ ८ ॥

गुणाः—

सुवर्णमाक्षिकं स्वादु तिक्तं वृष्यं रसायनम् ।
चक्षुष्यं बास्तिहृत्कण्ठपाण्डुमेहाविषोदरम् ॥ ९ ॥
अर्शः शोफं विषं कण्डूं त्रिदोषमपि नाशयेत् ।
अनुपानं वराव्योषं वेल्लं साज्यं हि माक्षिके ॥ १ ॥

भस्माला उत्तम माक्षिक कोणतें द्यावें—

जें सोन्याप्रमाणें चमकदार, तुकतुकीत, आणि स्पष्टपणें किंचित निळसर असतें व कासावर घांसलें असतां ज्याची पिंवळी रेघ उमटते तें सुवर्ण माक्षिक होय. तें उत्तम.

गुणधर्मः— सुवर्णमाक्षिक गोड, कडवट, धातुवर्धक आणि रसायन आहे. तें डोळ्यांना हितप्रद असून, वम्ति, हृदय, कंठ इत्यादि ठिकाणचे रोग व त्याचप्रमाणें प्रमेह, विषार, उदर, मूळव्याध, सूज, विष, कण्डू आणि त्रिदोष यांचा नाश करून टाकतें. त्यांचें अनुपान त्रिफळा किंवा त्रिकटु यांत किंवा तूप व मध यांचेबरोबर एक वालभर द्यावें. (१०).

अथाशुद्धस्यासम्यङमारितस्य च दोषाः—

मन्दानलत्वं बलहानिमुग्रां विष्टाम्भितां नेत्रगदान् सकुष्ठान्।
मालां विधत्तेऽपि च गण्डपूर्वां शुद्ध्यादिहीनं खलु माक्षिकं तु ॥

अथोपधातूनां भिन्नानि शोधनानि धातुशोधनेभ्यो विलक्षणानि सन्ति। तत्र स्वर्णमाक्षिकशोधनम्—

माक्षिकस्य त्रयो भागा भागैकं सैन्धवस्य च।
मातुलुङ्गद्रवैर्वाऽथ जम्बीरस्य द्रवैः पचेत् ॥ १२ ॥
चालयेल्लोहजे पात्रे यावत्पात्रं सुलोहितम्।
भवेत्ततस्तु संशुद्धं स्वर्णमाक्षिकमत्र तु ॥ १३ ॥

माक्षिकस्य माक्षिकचूर्णस्य

अशुद्ध किंवा कच्चें माक्षिक खाण्यापासून होणारे विकारः— अग्निमांद्य, भयंकर अशक्तपणा, मलावष्टंभ, नेत्ररोग, कुष्ठ, गंडमाळा इत्यादि अनेक दुष्ट रोग अशुद्ध किंवा कच्चें माक्षिक भक्षण केल्यानें जडतात. (११).

उपधातूंच्या शोधनाक्रिया निरनिराळ्या व धातूंच्या शुद्धिक्रियेपासून अगदीं भिन्न आहेत. त्यांपैकीं सुवर्णमाक्षिकाचें शोधन सांगतोः—

माक्षिक तीन भाग, सैंधव एकभाग हे एकत्र खलून कढईत ठेऊन महाळुंगाच्या किंवा ईडलिंबाच्या रसांत उकळावें, मिश्रण वरचेवर ढवळावें व चुलीवर इतकें तापवावें कीं, तीं कढई लाल होईल. असें झालें म्हणजे माक्षिक उत्तम रीतीनें शुद्ध झालें. (१३)

अथ मारणम्—

माक्षिकस्य चतुर्थांशं दत्त्वा गन्धं विमर्दयेत् ।
उरुबूकस्य तैलेन ततः कार्याऽस्य चक्रिकाँ ॥ १४ ॥
शरावसंपुटे धृत्वा पुटेद्गजपुटेन च ।
धान्यस्य तुषमूर्ध्वाधो दत्त्वा शीतं समुद्धरेत् ।
सिन्दूराभं भवेद्भस्म माक्षिकस्य न संशयः ॥ १५ ॥

इति स्वर्णमाक्षिकमारणम् । मतान्तरम्--

कुलत्थस्य कषायेण घृष्ट्वा तैलेन वा पुटेत् ।
अजामूत्रेण वा नूनं म्रियते स्वर्णमाक्षिकम् ॥ १६ ॥

इति स्वर्णमाक्षिकमारणम्

अथ सत्त्वाकृष्टिः—

एरण्डोत्थेन तैलेन गुञ्जा क्षौद्रं च टङ्कणम् ।
मर्दितं तस्य वापेन सत्वं माक्षिकज भवेत् ॥ १७ ॥

इति माक्षिकसत्वम

माक्षिक कसें मारावें:—

माक्षिक एकभाग व गंधक चौथा भाग असे एरंडेलांत एकत्र खलून त्यांची लुगदी करावी; तो लुगदी खापराच्या संपुटांत ठेऊन खालवर धान्याचा भुसा घालून गजपुट द्यावें. आपोआप थंड झाल्यावर काढून घ्यावें. म्हणजे माक्षिकाचें शेंदरी रंगाचें लाल भस्म होतें यांत संशय नाहीं. (१५).

दुसऱ्या एकाच्या मताप्रमाणें क्रिया:--

माक्षिक हुलग्याच्या काढ्यांत किंवा तेलांत, अगर शेळीचे मुतांत खलून पुट द्यावें, म्हणजे भस्म होतें. (१६).

याप्रमाणें माक्षिकाची भस्मक्रिया सांगितली. आतां त्याचें सत्व काढण्याची कृति सांगतो:—

एरंडेल तेल, गुंजा, मध आणि टांकणखार यांत माक्षिक खलून भावना दिल्या असतां माक्षिकाचें सत्व बनतें. (१७) याप्रमाणें सुवर्णमाक्षिकक्रिया सांगितली.

अथ तारमाक्षिकम्—

तारमाक्षिकमन्यत्तु तद्भवेद्रजतोपमम् ।
किंचिद्रजतसाहित्यात्तारमाक्षिकमीरितम् ॥ १८ ॥

अनुकल्पतया तस्य ततो हीनगुणाः स्मृताः ।
न केवलं रौप्यगुणा वर्तन्ते तारमाक्षिके ॥ १९ ॥
द्रव्यान्तरस्य संसर्गात् सन्त्यन्येऽपि गुणा यतः ॥ २० ॥

आतां रौप्य माक्षिकक्रिया सांगतों:

रौप्य माक्षिक हें निराळेंच आहे. तें चांदीप्रमाणें दिसतें व त्यांत किंचित चांदीसारखी चकाकी असते, म्हणून त्यास रौप्य माक्षिक म्हणतात. रौप्य न मिळाल्यास त्याचेऐवजीं या माक्षिकाची योजना करतात. तथापि रुप्यापेक्षां माक्षिकांत कांहीं गुण कमीच. आतां रौप्यमाक्षिकांत कांहीं गुण रौप्याप्रमाणें आहेतच; पण त्यांत दुसरे जिन्नस मिसळले असल्यामुळें दुसरेहि कांहीं गुण आढळतात. (२०).

अथैतत्स्वरूपलक्षणम्—

कांस्यवच्चाक्यचिक्याढ्यं कषे घृष्टं तु रूप्यवत् ।
गुरु स्निग्धं सितं यत्तच्छ्रेष्ठं स्यात्तारमाक्षिकम् ॥ २१ ॥
स्वर्णमाक्षिकवद्दोषा विज्ञेयास्तारमाक्षिके ।
अतस्तद्दोषशान्त्यर्थं शोधनं तस्य कथ्यते ॥ २२ ॥

यथा—

कर्कोटीमेषशृङ्गयुत्थैर्द्रवैर्जम्बीरजैर्दिनम् ।
भावयेदातपे तीव्रे विमला शुध्यति ध्रुवम् ॥ २३ ॥

विमला तारमाक्षिकम् । कर्कोटी खखसा, मेषशृङ्गी मेढाशिंगी ।

तन्मारणम्—

स्वर्णमाक्षिकवज्ज्ञेयं तारमाक्षिकमारणम् ।
विमलाया गुणाः किंचिन्न्यूनाः कनकमाक्षिकात् ॥ २४ ॥

इति तारमाक्षिकशोधनमारणम् ॥

रौप्य माक्षिकाचें स्वरूप व लक्षण--

रौप्यमाक्षिक काशाप्रमाणें चकचकीत दिसेंत आणि वर्कलावर घासलें असतां चांदीप्रमाणें कस देतें. त्यांत जें जड, स्निग्ध व पांढरें असतें ते रौप्य माक्षिक श्रेष्ठ होय.

सुवर्णमाक्षिकांत जसे दोष आहेत तसेंच ते रौप्य माक्षिकांतहि आहेत. म्हणून दोषनिवृत्तीसाठीं त्याची शुद्धि सांगतों:—

कर्कोटी, मेषशृंगी आणि ईडलिंबु यांच्या रसांत एक दिवस खलून उन्हांत भावना द्यावी, म्हणजे रौप्य माक्षिक शुद्ध होतें.

विमला म्हणजे रौप्य माक्षिक, कर्कोटी म्हणजे वांझ कर्टोली, व मेषशृंगी म्हणजे मेढशिंगी यांचा रस काढून त्या रसानें माक्षिकाला भावना द्यावी.

रौप्य माक्षिकाचें भस्म:—

ज्या रीतीनें सुवर्णमाक्षिकाचें भस्म करतात त्याच रीतीनें रौप्य माक्षिकाचेंहि भस्म करावें. कारण रौप्य माक्षिकाचे गुण जरी सुवर्णमाक्षिकापेक्षां कांहीं कमी आहेत, तरी दोन्ही उपधातू सार—ख्याच.

याप्रमाणें माक्षिकाची शुद्धि आणि मारणक्रिया सांगितली.

अथ विमला ।

माक्षिकस्यैव भेदान्तरं, प्रायशस्तत्रैव तपतीतीरसांनिध्यावु—त्पद्यते । तत्स्वरूपलक्षणशोधनमारणानि रसपद्धत्यां यथा—

तापीजं द्विरुदाहरन्ति विमलामाक्षीकभेदादिह
त्रेधाऽऽद्या तु सुवर्णकांस्यरजतच्छायानुकारादमूः ।
तिस्रोऽप्यस्रयुताश्चतुस्रिफलका वृत्ताः स्वनामश्रियो
मध्योक्ता सफला तु शुध्यति दिनं वासाजशृङ्गीरसे ॥२५॥
स्विन्ना जम्भरसेऽपि तालबलिना वस्वंशकेनाम्भसा
जम्भस्यैव परिप्लुता दशपुटैर्जीवेन्न योगानुगाः ॥ २६ ॥

व्याख्या—तापीजं माक्षिक द्विविधमुक्तं, विमलामाक्षिकभेदात् । इह द्विविधभेदमध्ये. आद्या विमला, सा तु त्रेधा त्रिविधा । विमलाशब्दस्तु त्रिलिङ्गः । एका विमला सुवर्णच्छायानुकारात्; द्वितीया कांस्यच्छायानुकारात्, तस्मात्कांस्याविमलाऽप्यस्तीति सूचितं तृतीया रजतच्छायानुकारात् : तत्तन्नामपूर्विका विमला भवन्ति । यथा—स्वर्णाविमला, कांस्यविमला, रजताविमला चेति । तत्र स्वर्णाविमला स्वर्णमाक्षिकभेदः, कांस्यविमला कांस्यमाक्षिकभेदः, एतद्वचनसामर्थ्यादेव कांस्यस्यापि माक्षिकोऽस्तीति गम्यते, रजताविमला रजतमाक्षिकभेद. । अथैषां माक्षिकेभ्यो भेदकानि लक्षणान्याह—अमूस्तिस्रोऽपि; अस्रं धारा, फलकं चिपिटं, वृत्तत्वं वर्तुलत्वं; स्वनामश्रिय इत्यनेन स्वर्णादिप्रभा उक्ताः; मध्या कांस्य विमला सफला उक्ता साचिपिटोक्ता । त्रयाणामपि शोधनमारणमाह—शुध्यन्तीति । दिनं चतुर्यामम् । वासा अटरूषः, अजशृङ्गी मेषशृङ्गी, अनयो रसे चूर्णीकृत्य वस्त्रबद्धं कृत्वा स्विन्नास्तथा निम्बुरसे स्विन्नाः शुध्यन्ति । पश्चात्तालकः शुद्धः, बलिर्गन्धकः

सोऽपि शुद्धः, तेन ममुचितेन अष्टमांशेन जम्भाम्भसा त्रिवारं भाविता दशपुटैर्न जीवेत् म्रियते । पुटे च प्रत्येकं भावना देया । तद्भस्म योगानुगं भवति यत्र रसे उक्तं तत्र प्रयोज्यम् ।

आतां विमलाची क्रिया.

विमला हा माक्षिकाचाच भेद आहे हें वर सांगितलेंच आहे. हा उपधातू बहुतकरून तापीनदीच्या कांठाच्या आसपास सांपडतो. या धातूचें स्वरूप, लक्षण, शोधन व मारण यांची क्रिया रसपद्धतींत लिहिली आहे ती येथें देतों.

तापी तीरावर सांपडणारें माक्षिक दोन प्रकारचें आहे ते प्रकार--विमला व माक्षिक हे होत. त्यांत विमला सुवर्ण विमल, कास्य विमल आणि रौप्य विमल अशा तीन तऱ्हेचा आहे. हे भेद करण्याचें कारण त्या धातूप्रमाणें विमलाचा वर्ण दिसतो म्हणून; विमलापैकीं तीन जातींना अस्त्र म्हणजे धारा असतात; पण चारीहि जाती एकंदरींत चपट्या व वाटोळ्या आकाराच्या असतात. त्यांपैकीं मधला विमल चापटच असतो. सर्व जातींचा विमल, वासा, व आजशृंगी यांच्या रसांत व कागदी लिंबाच्या रसामध्यें दिवसभर उकळावा. नंतर हरताळ व गंधक हें आठव्या हिश्शाइतकें घेऊन त्यासुद्धां लिंबाच्या रसाच्या भावना देऊन दहा पुटें द्यावीं. म्हणजे विमलामृत होतो. (२२)

व्याख्या:—तापीज म्ह. माक्षिक. तें विमल व माक्षिक अशा दोन प्रकारचें आहे. यांपैकीं पहिला जो विमल तो तीन प्रकारचा आहे विमल हा शब्द तिन्ही लिंगी आहे. एक विमला सोन्याप्रमाणें चकाकते, म्हणून सुवर्ण विमला, दुसरी कांशाप्रमाणें म्हणून कास्य विमला आणि तिसरी चांदीप्रमाणें म्हणून रौप्यविमला. याप्रमाणें त्या त्या नांवाच्या तीन विमला आहेत. (वस्तुतः) सुवर्णविमल हा सुवर्ण माक्षिकाचा, कांस्यविमल हा कांस्य माक्षिकाचा आणि रौप्यविमल हा रौप्य माक्षिकाचाच भेद आहे हें शब्दरचनेवरूनच लक्षांत येतें.आतां या माक्षिकांच्या प्रकारचीं लक्षणें सांगतों. हे तिन्ही भेद अस्त्रयुक्त असतात. अस्त्र म्हणजे धारा अथवा कोर. सर्व प्रकारचें विमल खडबडीत असतें. त्याला पुष्कऱ्ठ धारा किंवा कोरा असतात. पण एकंदरीनें तें रंगानें आपआपल्या नांवाप्रमाणें

असून शिवाय चपट आणि वाटोळ्या आकाराचें असतें. कांस्य विमल चपटेंच असतें. ह्या तिन्ही विमलांची शोधनपद्धति अशी कीं, वासा म्हणजे अडुळसा व अजाशृंगी म्हणजे मेढाशिंगी यांच्या रसांत विमल रुलावा आणि पोटळी बांधून कांगदी लिंबाच्या रसांत त्याचें एक दिवसभर म्हणजे चार प्रहर स्वेदन करावें. म्हणजे विमल शुद्ध होतो. नंतर शुद्ध हरताळ व शुद्ध बलि (म्ह. गंधक) हे दोन्ही मिळून विमलाच्या आठव्या हिश्शानें घेऊन लिंबाच्याच रसांत विमलांस तीन वेळा भावना देऊन दहा पुटें दिलीं असतां विमल मृत होतो. पुट देण्यापूर्वी पुनः पुनः भावना दिल्या पाहिजेत. ह्या भस्माचा ज्या ज्या औषधाशीं योग करावा त्या औषधाप्रमाणें गुण करतें.

उक्तं च

त्रेधा स्याद्विमलः स्वर्णपूर्वको कांस्यपूर्वकः ।
रूप्यपूर्वश्च विख्यातस्तत्तत्कान्त्या स लक्ष्यते ॥ २७ ॥
विमलस्तपतीतीरवर्तिन्यद्रिविभागके ।
उत्पद्यते परैः कांस्यमाक्षिकोऽयमिति स्मृतः ॥ २८ ॥
आद्यो हेमक्रियासूक्तश्चरमः श्वेतकर्मसु ।
मध्यस्तु कांस्यपूर्वो यः स प्रोक्तो वै रसादिषु ॥ २९ ॥

अथ लक्षणगुणाः—

वर्तुलः कोणसंयुक्तः स्निग्धश्च फलकान्वितः ।
मरुत्पित्तहरो वृष्यो विमलश्च रसायनः ॥ ३० ॥

अनुपानमपि रसपद्धत्याम्—

वेल्लव्योषवराज्येन विमलः सेवितो यदि ।
भगन्दरादिकान् रोगान्नृणां जयति दुस्तरान् ॥ ३१ ॥

म्हटलेंच आहे कीं:—

विमल तीन प्रकारचा आहे. त्याच्यापूर्वी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य हे शब्द जोडतात. कारण तो त्या त्या धातूप्रमाणें दिसतो. विमल हा तापीच्या काठच्या पर्वतांत सांपडतो. त्याला कांहीं लोक कांस्य माक्षिक असेंहि म्हणतात. सुवर्ण विमल सोनें बनविण्याच्या कामीं, व कांस्यविमलरौप्य बनविण्याच्या कामाकडे उपयोगी पडते. परंतु रौप्य विमल हा मात्र फक्त रसायनांत उपयोगी आहे. (२९)

विमलाचें लक्षणः—विमल हा वाटोळा, खडबडीत, स्निग्ध, चपटा असून वात, पित्तनाशक, धातुवर्धक आणि रसायन आहे.

(३०)

याचें अनुपान रसपद्धतींत असें लिहिलें आहे कीं:—

विमलभस्म त्रिकटु, किंवा त्रिफळा व तूप यांच्यासीं वाल-भर सेवन केलें असतां भगंदरासारखे जरी असाध्य रोग झालेले असले तरी त्या रोगांवर रोगी जय मिळवितो.

अथ रसपद्धत्याम्—

माक्षीको द्विरहादिमः कनकरुग्दुर्वर्णवर्णोऽपरः
कांस्यश्रीकमुशान्ति केचन परं सर्वेऽपि पूर्वत्विषः ।
निष्कोणा गुरवः किरन्ति निभृतं घृष्टाः करे कालिकां
स्विन्नास्ते रुवुतैललुङ्गसलिलैर्यामेन शुध्यन्ति च ॥ ३२ ॥
पक्का वा घटिकाद्वयेन कदलीकर्कोटिकाकन्दयो-
रम्ब्वा कूर्मपुटैस्त्रिभिः पटुतंर लुङ्गवम्बुगन्धप्लुताः ।
स्युर्भस्मानि जघन्यमध्यमशुभास्ते व्युत्क्रमेणोदिता
बृष्याः पाण्डुपटीयसो बलकरा योगोपयुक्तः पुनः ३३

व्याख्या—माक्षीको द्विविधः—आदिमः कनकरुक्. तेनासौ कनकमाक्षिक इत्यर्थः; परा द्वितीयः, दुर्वर्णवर्णः दुर्वर्णं रजतं तद्वर्णः, अतो रजतमाक्षिकमिति; कांस्यश्रीकं कांस्यवर्णं केचन आचार्याः परं तृतीयं कांस्यमाक्षिकमुशान्ति । सर्वेऽपि माक्षिकत्रय-मपि, पूर्वत्विषः विमलोक्तवर्णा भवन्तीत्यर्थः । विमलाभ्यो भेदकं लक्षणमाह—निष्कोणा धारारहिताः, गुरवो भारयुक्ताः, करे हस्ते घृष्टाः कालिका किरान्ति । शुद्धिमाह-स्विन्ना इति । रुवुतैलमेरण्ड-तैलं, लुङ्गं मातुलुङ्गं यत्सालिलैः कर्कोटिका खखसा तस्याः कन्दं मूलं, तयोरम्ब्वा जलेन पक्काः शुध्यान्ति । स्वेदनं तु चूर्णीकृत्य दोलायंत्रेण । पश्चाल्लुङ्गाम्बु मातुलुङ्गरसः, गन्धकश्च, आभ्यां भाविताः, कूर्मपुटैस्त्रिभिर्दग्धा भस्मानि स्युः । ते च व्युत्क्रमेण कां-स्यतारसुवर्णसंज्ञकाः जघन्यमध्यमोत्तमा उदिताः । बृष्या शुक्रप्रदाः पाण्डुपटीयसः पाण्डुघ्नाः । तथा बलकराः योगे उपयुक्ताः सन्तो बलकरा भवन्ति माक्षीकविमलानिर्णयः ॥

रसपद्धतिकार लिहितोः—

माक्षिक हा सुवर्णमाक्षिक व रौप्यमाक्षिक असा दोन प्रकारचा आहे. कोणी कोणी कांस्य माक्षिक म्हणून तिसरा भेद मान-

तात. परंतु हे सर्व भेद माक्षिक त्या त्या धातुप्रमाणें दिसतो म्हणून होतात. त्याला कोरा नसतात व तो जड असून हातावर घासला असतां काळी रेघ उमटते. माक्षिक हें एरंडेल, महाळुंगाचा रस, यांत एक प्रहरभर, किंवा केळ व कर्कोटी यांच्या कांद्याच्या रसांत दोन घटिका स्वेदन केल्यानें शुद्ध होतो आणि महाळुंगाचा रस व गंधक यांची भावना देऊन तीन कूर्मपुटांनीं त्याचें भस्म होतें. माक्षिकाचे भेद त्यांच्या उलट क्रमानें कनिष्ठ, मध्यम व उत्तम आहेत. माक्षिक हें धातुवर्धक, पांडुरोगनाशक बलवर्धक असतें. तें कोणत्याहि औषधाशीं मिश्रण करून देण्यास हरकत नाहीं. (३३)

व्याख्या:--माक्षिक दोन प्रकारचें आहे. पहिलें सोन्याप्रमाणें चमकतें म्हणून त्याला सुवर्णमाक्षिक, आणि दुसरें रुप्या-प्रमाणें म्हणून त्याला रौप्य माक्षिक म्हणतात. कोणी ग्रंथकार कांस्य माक्षिक म्हणजे कांशाप्रमाणें दिसणारें माक्षिक असा आणखी भेद मानतात. तिन्ही प्रकारच्या माक्षिकाचे भेद त्या त्या धातूच्या सादृश्यावरून उत्पन्न होतात. त्यांत भेद इतकाच कीं, विमलाला कोरा असतात आणि माक्षिकाला कोरा नसतात. माक्षिक आणि विमल हे वजनानें जड असतात आणि हातावर घांसले असतां काळी रेघ उमटते.आतां त्याची शुद्धि अशी कीं,रुबु म्हणजे एरंड ह्याचें तेल व महाळुंगाचा रस, व कर्कोटी ह्मणजे करटोली तिच्या कांद्याचा रस असे घेऊन त्यांत माक्षिकाचें स्वेदन करावें, म्हणजे शुद्ध होतें. स्वेदन करावयाचें तें दोलायंत्रांत उकळून करावयाचें. उकळल्यावर महाळुंगाचा रस व गंधक एकत्र करून त्यांची भावना देऊन कच्छप-यंत्रांत पुटें दिलीं असतां माक्षिकाचें भस्म होतें. वर सुवर्ण माक्षिक, तार माक्षिक आणि कांस्य माक्षिक असे जे प्रकार सांगितले त्याच्या उलट क्रमानें ते कनिष्ठ, मध्यम व उत्तम असे आहेत. सर्व प्रकारचें माक्षिक धातुवर्धक, पाण्डुरोगनाशक व बलप्रद असून दुसऱ्या औष-धाशीं त्यांचा योग केला असतां त्या औषधाचा जोर वाढवितात. याप्रमाणें माक्षिकाचा विषय संपला.

अथ तुत्थोत्पत्तिनामलक्षणशोधनगुणाः ।
गरुडेनामृतं पीत्वा पश्चात्पीतं विषं पुरा ।
वान्तं मरकताद्रौ तु तद्वनं शिखितुत्थकम् ॥ ३४ ॥

तुत्थं वितुन्नकं चापि शिखिग्रविं मयूरकम् ।
तुत्थं ताम्रोपधातुः स्यात्किंचित्ताम्रेण तद्भवेत् ॥ ३५ ॥
किंचित्ताम्रगुणं तस्माद्वक्ष्यमाणगुणं च तत् ।
तुत्थस्यैव भवेद्भेदः खर्परं तद्गुणं च तत् ॥ ३६ ॥
शिखिकण्ठसदृक्छायं भाराढ्यं तुत्थकं च यत् ।
गुणवत्तत्परिज्ञेयमन्यद्धीनगुणं मतम् ॥ ३७ ॥

मोरचुदाची उत्पत्ति वगैरे लिहितों.

गरुडानें प्रथम अमृत पिऊन नंतर विष प्राशन केलें. परंतु त्याला वान्ति होऊन तें विष मरकत पर्वतावर पडलें. पुढें तें कठिण होऊन त्याचें शिखितुत्थ म्हणजे मोरचूद झालें. तुत्थ, वितुन्नक, शिखिग्रीव, मयूरक हीं नांवें मोरचुदाचीं आहेत. मोरचूद हा ताम्राचा उपधातू असून तो तांब्यापासूनच होतो. म्हणून त्यांत ताम्राचेहि कांहीं गुण आहेत. खर्पर हाहि मोरचूदाचाच एक भेद आहे. जें मोरचूद मोराच्या कंठाप्रमाणें गर्द निळें आणि जड असतें तें मोरचूद उत्तम होय. तें गुणांत सरस; बाकीचें हिणकस होय. (३७).

गुणः—

तुत्थं तु कटुकं क्षारं कषायं वामकं लघु ।
लेखनं भेदनं शीतं चक्षुष्यं कफपित्तहृत् ॥ ३८ ॥
विषाश्मकुष्ठकण्डूघ्नं खर्परं चापि तद्गुणम् ।
वान्तिं भ्रान्तिमशुद्धं तत् कुरुते, शोधितं शुभम् ॥ ३९ ॥

शोधनम्—

विष्ठया मर्दयेत्तुत्थं मार्जारककपोतयोः ।
दशांशं टङ्कणं दत्त्वा पचल्लघुपुटे तथा ॥
पुटं दद्या पुटं क्षौद्रैर्देयं तुत्थविशुद्धये ॥ ४० ॥

इति तुत्थशुद्धिः । प्रकारान्तरम्—

ओतोर्विंशा समं तुत्थं सक्षौद्रं टङ्कणाङ्घ्रियुक् ।
त्रिधैव पुटितं शुद्धं वान्तिभ्रान्तिविवर्जितम् ॥ ४१ ॥

प्रकारान्तरम्—

लुलितं चाम्लवर्गेण स्नेहसिक्तं हि तुत्थकम् ।
दोलायां बाजिगोमूत्रे दिनं पक्षं विशुध्यति ॥ ४२ ॥

इति तुत्थशुद्धिः ॥

मोरचुदाचे गुणः—तुत्थक (मोरचूद) हें तिखट, क्षारसम, तुरट, वांति, करणारें, हलकें, लेखन, जुलाब करणारें, थंड आणि डोळ्यांना हितप्रद आहे. तें कफपित्ताचा नाश करतें आणि विषार, मूतखडा, कुष्ठ व कण्डू यांचें शमन करतें. खर्पर देखील मोरचूदा-प्रमाणें आहे. मोरचूद शुद्ध न करतांच घेतला तर त्यानें वांति, भ्रांन्ति हे विकार होतात. परंतु शुद्ध केला असतां तो गुणदायक होतो.

शोधनः—मांजर व कबूतर यांची विष्ठा घेऊन त्यांच्यार्शी मोर-चुदाचा खल करावा आणि त्यांत दहाव्या हिश्शानें टांकणखार घालून लघुपटानें आंच द्यावी. मग एक दह्याचें व एक मधाचें याप्रमाणें दोन पुटें देऊन मोरचूद शुद्ध करावा. (४०)

दुसऱ्या ग्रंथांतहि आहे कीं,

मांजराची विष्ठा, व मध समभाग, आणि टांकणखार दहावा हिस्सा एकत्र खलून तीन पुटें दिलीं असतां मोरचूद वांतिभ्रांति-रहित होतो. (४१)

आणखी प्रकारः—

आम्लवर्गापैकीं रस घेऊन त्यांत मोरचूद खलून त्यावर तेल चोपडावें. मग घोड्याचें मूत्र आणि गोमूत्र यांत दोलायंत्रानें एक दिवस पचन करावें; म्हणजे मोरचूद शुद्ध होतो. (४२)

याप्रमाणें शुद्धि झाली.

क्वचिन्मारणमप्युक्तं तुत्थकस्य—

गन्धाश्मटङ्कणयुतं लकुचद्रावमार्दितम् ।
अन्धमूषांगतं द्वित्रिकुक्कुटैर्मृतिमाप्नुयात् ॥ ४३ ॥

अथ तुत्थसत्त्वाकृष्टिः—

तुत्थं टङ्कणसंयुक्तं निम्बूद्रवविमर्दितम् ।
अन्धमूषागतं ध्मातं सत्त्वं मुञ्चति ताम्रकम् ॥ ४४ ॥

आतां मोरचुदाचें भस्महि कांहीं ग्रंथांत दिलें आहे तो प्रकारः—

मोरचूद, गंधक व टांकणखार असे लिंबाच्या रसांत एकत्र खलून अन्ध मुशींत बंद करून दोन किंवा तीन कुक्कुटपुटें द्यावीं, म्हणजे भस्म होईल. (४३)

मोरचूदाचें सत्व.

मोरचूद व टांकणखार हे लिंबांच्या रसांत खलून अंधमुशींत बंद करून भट्टींत आंच दिली असतां मोरचुदाचें तांबडचा रंगाचें सत्व निघतें. (५५)

अथात्र मुद्रिकोपयुक्तत्वेन भूनागस्वरूपं सत्त्वाकृष्टिश्च प्रोच्यते—

भूनागः क्षितिनागश्च भुजङ्गो रक्तजन्तुकः ।
क्षितिजः क्षितिजन्तुश्च भूमिजो रक्ततुण्डकः ॥ ४५ ॥

गुणाः—

भूनागो वज्रमारः स्यान्नानाविज्ञानकारकः ।
रसस्य जारणे प्रोक्तं तत्सत्त्वं तु रसायनम् ॥ ४६ ॥
वर्षासु वृष्टिसंक्लिन्नभूगर्भे संभवन्ति हि ।
जन्तवः कृमिरूपा ये ते भूनागा इति स्मृताः ॥ ४७ ॥
चतुर्विधास्तु भूनागाः स्वर्णादिखनिसंभवाः ।
स्वर्णभूमिभवाः पीता रूप्यभूमिभवाः सिताः ॥ ४८ ॥
ताम्रभूमिभवास्ताम्राः कृष्णा लोहमयीभवाः ।
रसेन्द्रप्राणरूपास्ते भूनागाः सिद्धसंमताः ॥ ४९ ॥
स्वर्णादिभूमिसंभूता दुर्लभास्ते प्रकीर्तिताः ।
ताम्रभूमिभवाः प्रायः सुलभा गुणवत्तराः ॥ ५० ॥

आता आगठ्या करण्याकरितां उत्तम तांब लागत म्हणून भूनागाचें स्वरूप सांगतों व त्यांच्या सत्वाची कृतिहि सांगतों. भूनाग, क्षितिनाग, भूभुजंग, रक्तजंतुक, क्षितिज, क्षितिजंतु, रक्ततुंडक हीं नांवें भूनागाचीं (म्हणजे गांडुळाचीं) आहेत. (४५)

गुणः—भूनाग याचे योगानें वज्र म्हणजे कृष्णाभ्रक किंवा हिरा यांचें भस्म होतें. भूनागासंबंधाच्या माहितीपासून नाना प्रकारचे अनुभव मिळतात. पाऱ्यांत गंधक किंवा अभ्रक जिरविण्यांत भूनागाचा उपयोग होतो आणि खुद्द भूनागांचें सत्व हेंहि रसायनच आहे. भूनाग म्हणजे गांडुळ. हे किडे पावसाळ्यांत जमीन भिजली म्हणजे जमीनींत उत्पन्न होतात आणि ते दोरीच्या आकाराचे एक प्रकारचे कृमिच आहेत. तरी त्यांस भूनाग असें म्हणतात (४७). ते चार प्रकारचे आहेत. त्यांची उत्पत्ति सोन्यांच्या वगैरे खाणीजवळ होते. जे सोन्याच्या खाणींत उत्पन्न होतात ते पिवळे असतात,

रुप्याच्या खाणींत होतात ते पांढरे, तांब्याच्या खाणींत होतात ते तांबडे आणि लोहाच्या खाणींत होतात त्यांचा काळा रंग असतो. भूनाग हे पाऱ्याचे केवळ प्राणच होत ही गोष्ट सर्व रसशास्त्रज्ञांना मान्य आहे. सोन्याच्या खाणींत उत्पन्न होणारे भूनाग हे दुर्लभ असतात. परंतु तांब्याच्या खाणींत होणारे तांबडे भूनाग हे बहुतकरून सर्वत्र आढळतात आणि ते गुणांनींहि उत्तम असतात. (५०)

उक्तं च —

ताम्रभूभवभूनागान्निशापिष्टान् समेन तान् ।
गुडगुग्गुलुलाक्षोर्णामत्स्यापिण्याकटङ्कणैः ॥ ५१ ॥
दृढमेतैश्च संयोज्य मर्दयित्वा धमेत्सुखम् ।
मुञ्चन्ति ताम्रवत्सत्त्वं ते, पक्षा अपि बर्हिणाम् ॥ २५ ॥
ते भूनागाः ॥

शीतं भूनागसत्त्वं तु सर्वकुष्ठव्रणप्रणुत् ।
तद्युक्तजलपानेन स्थावरं चापि जंगमम् ॥ ५३ ॥
विषं नश्यति, तत्पात्रगतः सूतोऽग्नितो दृढम् ।
एवं मयूरपक्षोत्थसत्त्वस्यापि गुणा मताः ॥ ५४ ॥

दृढं बध्यते इत्यर्थः । इति भूनागसत्त्वमयूरपक्षसत्त्वगुणाः ॥
प्रकारान्तरेण तुत्थसत्त्वम्—

तुत्थस्य टङ्कणं पादं चूर्णयेन्मधुसर्पिषा ।
तुत्थेन मिश्रितं धमातं कोष्ठीयमे दृढाग्निना ।
धमापितं द्रवते सत्त्वं कीरतूण्डसमप्रभम् ॥ ५५ ॥

इति तुत्थसत्त्वम् ।

तांब्याच्या खाणीच्या जमीनीवर उत्पन्न झालेले भूनाग आणि हळद असें एकत्र चूर्ण करून गूळ, गुग्गुळ, लाख, लोंकरींतील किडा, पेंड व टांकणखार यांच्याशीं त्यांचा जोरानें खल करून एकजीव करावा. मग स्वस्थपणें भट्टींत घालून आंच द्यावी, म्हणजे भूनागापासून तांब्याप्रमाणें सत्त्व निघतें. तसेंच मोराच्या पिसाऱ्यापासूनहि निघतें (५२)

याप्रमाणें भूनागाचें महत्व आहे.

भूनागसत्व हें फार थंड आणि सर्व प्रकारच्या कुष्ठांचा नाश करणारें आहे. तें सत्त्व कालवलेलें पाणी जर प्यालें तर सर्व प्रकारचीं

विषें, मग तीं स्थावर असोत किंवा जंगम असोत,नाश पावतात. भूनागाच्या सत्वाचें पात्र तयार करून त्यांत पारा ठेवला तर तो घट्ट होतो. त्याला कितीहि आंच दिल्यानें तो उडून जात नाहीं. याचप्रमाणें मोराच्या पिसाच्या सत्वाचीही गोष्ट आहे

याप्रमाणें भूनागसत्व व मोराच्या पिसाच्याचें सत्व सांगितलें. आतां मोरचूदसत्व सांगतों—

मोरचूद एक भाग, टांकणखार चौथा हिस्सा, पैकीं टांकणखार तूप व मध यांत चुरावा आणि मग तो मोरचुदाशीं एकत्र करून कोष्ठी यंत्रांत कडक आंच लावून पुट द्यावें. याप्रमाणें आंच दिल्यावर मोरचुदापासून राघूच्या चोचीप्रमाणें लाल सत्व निघतें. (५५)

रसपद्धत्यां तुत्थसत्त्वभूनागसत्त्वयोर्मिलितयोर्मुद्रिकायाः फलमुक्तम्—

घस्रं पूतिकरञ्जतैलनिहितं पादांशसौभाग्यकं
धमातं तुत्थरजोऽथ पात्रापिहितं दीपैरलातत्रयैः ।
यद्वा मानुषनीलकेशनिहितं मुञ्चेत्क्षणात्तुत्थकं ।
ताम्रं शोणितबिन्दुबन्धुरमदो भूनागसत्त्वं तथा ॥ ५६ ॥
एताभ्यां रविवासरे रचितया संप्लावितं मुद्रया
पीतं वारि विषद्वयग्रहहरं सद्यः प्रसूतिप्रदम् ।
तद्वत्तत्परिमृष्टतप्ततिलजस्नेहोऽमुना मन्त्रितो
मंत्रेणाशु निहन्ति शूलमतुलं दृग्दोषभूतग्रहम् ॥ ५७ ॥
सद्यः स्त्रीप्रसवप्रदो निगदितः सद्यो व्रणारोपणो
लिप्तो लोचनयोर्हितो विनिहितः प्राग्भालुकिप्रोदितः ॥

व्याख्या घस्रमित्यादि । दुर्गन्धिकरञ्जतैल दिनं निहितं पश्चात्पादांशटङ्कणयुतं पश्चात्तुत्थरजो मर्दितमन्धमूषायां निहितं दीप्तकाष्ठत्रयैर्धमातं सत्वं मुञ्चति । प्रकारान्तरमाह - यद्वा मानुषकेशैरेकीकृत्य धमातं क्षणात्ताम्रं शोणितबिन्दुबन्धुरं सत्वं मुञ्चेत् । अथैवमेव भूनागसत्वं ग्राह्यमित्याह—अदो भूनागेत्यादि एवमेव भूनागसत्वं निष्कासयेत् । मुद्रिकोपयुक्तत्वेनात्रैवोक्तम् । उभाभ्यां मिलिताभ्यां रविवासरे रचितया मुद्रया संप्लावितं वारि पीतं विषद्वयं स्थावरजङ्गमविषं, ग्रहाः स्कंदादयः, एतेषां नाशकं, सद्यः स्त्रीप्रसवजनकं च । गुणान्तरमाह—तद्वदिति, परिमृष्टस्तप्ततिलजस्नेहः अनया मुद्रया मिश्रितः वक्ष्यमाणेन मन्त्रेण मंत्रितः अतुलं शूलं

लेपनमात्रेण निहन्ति, तथा दृग्दोषं भूतग्रहं चेति; तथा सद्यः स्त्रीप्रसवदो भाक्षितः, लिप्तः सन् सद्यो व्रणारोपणः, लोचनयोर्विनिहितो नेत्ररोगहर्ता भवति । इति ॥

भालुकिप्रोदितमत्रस्तु—

' रामवत्सोमसेनानीमुद्रिकायां तथाऽक्षरम् ।
हिमालयोत्तरे पार्श्वे अश्वकर्णो महाद्रुमः ।
तत्र शूलं समुत्पन्नं तत्रैव विलयं गतम् ॥ ५८ ॥ इति ॥

अथ प्रकारांतरं भूनागसत्वस्य—सुवर्णरूप्यताम्रायस्कांतभूमिषु जातान् भूनागान् ताद्विष्टां वा तदुत्पात्तेतत्संश्लिष्टमृत्तिकां वा रजनीतोयेन प्रक्षाल्य, क्षुधितं कुक्कुटं मयूरं वा क्रमेण चारयित्वा, ताद्विष्टां कुडवमात्रां गृहीत्वा, क्षारामलैः सह पेषयित्वा, विशोष्य, खर्परे दत्वा, भर्जनं कुर्यात् । तां मषीं द्रावणवर्गेणैकीकृत्य, भूषामध्ये निवेश्य, घटिकाद्वयं धमेत । तस्मिन् शीतीभूते स्फोटकमाहृत्य प्रक्षाल्य रवकान् संगृह्य टंकणं दत्वा सुवर्णवद्धमेत् । तस्यैकीभूतस्य भूनागताम्रस्य मयूरतुत्थताम्रस्य च मिश्रणेन मुद्रिका कार्या, सा प्रोक्तगुणा भवति । सुवर्णेन युक्ताऽपि वा मुद्रिका कार्या, साऽप्यचिन्त्यसामर्थ्या भवति । अथ तदुत्पत्तिमृत्तिकादिकं तु भृङ्गनिर्गुण्डीद्रवैर्द्रावणवर्गेण चैकीकृत्य मर्दयेत, पश्चाद्दृढमूषायां वटकीकृतं प्राक्षिप्य घटीद्वयं धमेत् । तत्पक्वं विचूर्ण्य रवकान् भारवत्तरानणून् द्वादशांशताम्रयुक्तान् कृत्वा धामयित्वा रवकान् कुर्यात् । तेन वज्रादिद्रावणं कुर्यात् । इदं वारद्वयं त्रयं वज्रे दत्तं द्रुतं भवति । इदं तु वज्रस्य पारदस्य (?) द्रावणार्थे परमतेजो भवति । गुणास्तु प्रागुक्ताः । इति भूनागसत्वानिरूपणम् ॥

विशुद्धं तुत्थकं योज्यमंजनादौ भिषग्वरैः ।

रसपद्धतिग्रंथांत भूनागसत्व व मोरचुदाचें सत्व एकत्र करून त्यांची आंगठी करण्याचें फार महत्व वर्णन केलें आहे तें असें:— घाणेऱ्या करंजाच्या तेलांत मोरचूद बुडवून ठेवावा व त्याच्या चौथ्या हिश्शानें टांकणखार चुरून त्याच्याशीं त्या मोरचुदाचें चूर्ण एकत्र करून ते संपुटांत बंद करावें व तीन लांकडाचा अग्नि देऊन आंच द्यावी. म्हणजे मोरचुदाचे सत्व निघतें, किंवा माणसाच्या काळ्या केंसांच्या संपुटांत ठेऊनहि आंच दिली तरी सत्व निघतें. तें रक्ताप्रमाणें लाल बुंद असतें. भूनागाचें सत्वहि तसेंच लाल असतें. (५६)

हीं दोन्ही सत्वें रविवारीं एक गठ्ठा करून त्याची आंगठी करावी आणि ती आंगठी पाण्यांत ढवळावी; तें पाणी दोन्ही प्रकारचें विष किंवा ग्रहपीडा यांचा परिहार करतें. त्या पाण्यानें अडलेली स्त्री लवकर प्रसूत होते. त्याचप्रमाणें तिळाचें तेल तापवून त्यास त्या आंगठीनें स्पर्श करून अभिमंत्रित केलें कीं कसाहि शूळ असो, तो नष्ट झालाच म्हणून समजावें. व दृष्टिदोष, पिशाचबाधा आणि ग्रहबाधा ह्याहि नष्ट झाल्याच. (५७) वरील आंगठीच्या तेलानें प्रसूति सुकर होते हें सांगितलें आहेच; पण जखमा सुद्धां त्यानें बऱ्या होतात. आणि भालुकीच्या म्हणण्याप्रमाणें नेत्ररोग देखील तेलानें जातात. (५७॥).

व्याख्या:—घाणेरड्या करंजाच्या तेलांत प्रथम मोरचूद ठेवावें व नंतर त्याच्या चौथ्या हिश्शाइतका टांकणखार घेऊन दोहोंचा खल करून अन्धमूषेमध्यें बंद करून तीन लांकडाच्या अग्नीनें आंच द्यावी, म्हणजे मोरचूदाचें सत्व निघतें. दुसरा प्रकार असा आहे कीं, मोरचूद व माणसाचे केंस हे एकत्र करून भट्टीमध्यें फुंकावे, म्हणजे तात्काळ सत्व निघतें. तें रक्ताप्रमाणें लालभडक असतें. असेंच भूनागसत्व काढावें. कारण आंगठी करण्याकडे त्याचा उपयोग आहे. याप्रमाणें दोन्ही सत्वें एकत्र करून रविवारीं त्यांची आंगठी बनवावी. ही आंगठी पाण्यांत ढवळावी व तें पाणी प्यावें, म्हणजे सर्व प्रकारचें स्थावरजंगम विष, ग्रहबाधा ह्यांचें निराकरण होतें. अडलेली स्त्री प्रसूत होते. आंगठींत दुसराहि गुण आहे, तो हा कीं, तिळाचें तेल तापवून त्यांत आंगठी बुडवून तें तेल मंत्रावें आणि त्याचा लेप करावा, म्हणजे लेप करतांक्षणीं कसलाहि शूळ असो, किंवा दृष्टिदोष, ग्रहबाधा असो, सर्वांचा बंदोबस्त होतो. तेल पिण्यास दिलें असतां स्त्री प्रसूत होते. जखमेला लावलें असतां जखम भरते, आणि डोळ्यांना लावलें असतां डोळे दुरुस्त होतात.

आतां तेल मंत्रावयाचा मंत्र सांगतोः—

त्या आंगठीवर राम, सोम, कार्तिकेय अशीं अक्षरें कोरावीं आणि तोंडानें हा मंत्र म्हणावा—

हिमालयाच्या उत्तरभागीं अश्वकर्ण हें झाड ।
घेतां त्याचें नांव झडकरि शूळ होई मुरदाड ॥

दुसराहि एक प्रकार असा आहे कीं, सोन्याच्या, चांदीच्या, तांब्याच्या किंवा लोहचुंबकाच्या खाणींत किंवा आसपास उत्पन्न होणारे भूनाग जमा करावे. ते न मिळतील तर त्यांची विष्ठा पैदा करावी. निदान ते उत्पन्न होतात त्या ठिकाणची माती तरी आणून ठेवावी व जमा केलेले भूनाग वगैरे जिन्नस हळदीच्या किंवा निळीच्या पाण्यानें धुवावे. ते भूनाग वखदखलेल्या कोंबड्यांना किंवा मोरांना खावयास द्यावे व त्यांची विष्ठा जमा करावी. ती क्षार व आम्ल यांच्यासह खलून वाळवून खापराच्या परळांत भाजावी. मग त्या राखेंत (सवागी वगैरे) द्रावण वर्गांतील जिन्नस मिसळावे आणि मिश्रण मुशीमध्यें ठेऊन भट्टींत दोन घटका आंच द्यावी. थंड झाल्यावर तो मुशींतील खोटक घेऊन धुवावा व त्यांतील धातूचे रज जमा करून टांकणखार घालून सोनें आटवतात त्या प्रमाणें आटवावे, म्हणजे भूनागांतील ताम्र व मोरचूदांतील ताम्र एकत्र होतें, मग त्याची आंगठी करावी. त्या आंगठींत वर लिहिल्याप्रमाणें गुण असतात. तें तांबें व सोनें एकत्र करून त्याचीहि आंगठी करावी. तिचाहि प्रभाव कांहीं औरच असतो. भूनाग न मिळाले व ते उत्पन्न होतात तेथील मातीच मिळाली तर त्या मातींत म्हाका, निर्गुडी यांचा रस घालावा व खलावें व गोळी करून एका मजबुत मुशीमध्यें ठेवून दोन घटका खूब आंच द्यावी. याप्रमाणें आंच दिल्यावर त्यांतील तांब्याचे रवे निराळे होतात, त्यांपैकीं कांहीं मोठे व जड असतात. कांहीं बारीक असतात ते सर्व गोळा करून त्यांत बाराव्या हिश्शानें ताम्र मिसळावें आणि एकत्र आटवून रवे पाडावे. त्या रव्यांनीं अभ्रकाचें द्रावण होतें. हे रवे टाकून काळ्या दगडी अभ्रकाला तीनदां आंच दिली म्हणजे त्याचें द्रावण होतें. भूनाग ताम्र हें कृष्णाभ्रक वगैरेचें द्रावण करण्यांत फारच कार्यक्षम आहे. त्याचे गुण वर लिहिले आहेतच. याप्रमाणें भूनागसत्वक्रिया झाली.

अंजन करण्याला वैद्यांनीं शुद्ध मोरचूदच वापरावा.

अथ कांस्यपित्तलयोरुत्पत्तिनामलक्षणगुणशोधन-
मारणानि ।

अष्टभागेन ताम्रेण द्विभागं कुटिलं युतम् ।
एकत्र द्रावितं तत्स्यात्कांस्यं सौराष्ट्रजं शुभम् ॥ ५९ ॥
ताम्रत्रपुजमाख्यातं कांस्यं घोषं च कंसकम् ।
उपधातुर्भवेत्कांस्यं द्वयोस्तरणिरंगयोः ॥ ६० ॥
कांस्यस्य तु गुणा ज्ञेयाः स्वयोनिसदृशा बुधैः ।
संयोगजप्रभावेन तस्यान्येऽपि गुणाः स्मृताः ॥ ६१ ॥

यथा—

कांस्यं कषायतिक्तोष्णं लेखनं विशदं सरम् ।
गुरु नेत्रहितं रूक्षं कफपित्तहरं परम् ॥ ६२ ॥
कांस्यं च द्विविधं प्रोक्तं पुष्पतैलिकभेदतः ।
पुष्पं श्वेततमं तत्र तैलिकं कपिशप्रभम् ।
एतयोः प्रथमं श्रेष्ठं संसेव्यं रोगशांतये ॥ ६३ ॥

कांस्यधातूची उत्पत्ति वगैरे.

आठ भाग तांबें आणि दोन भाग कथील यांचें जें मिश्रण त्याला कांसें म्हणतात. मिश्रण दोन्ही एके ठिकाणीं आटवून करतात. सुराष्ट्र देशांतील कांसें उत्तम असतें.

ताम्रत्रपुज, कांस्य, घोष, कंसक हीं कांशाचीं नांवें आहेत. ताम्र आणि वंग ह्या दोहोंचाहि उपधातु कांस्य हाच आहे. ६०

कांशाचे गुण कांहीं ताम्राप्रमाणें आणि कांहीं कथलाप्रमाणें मिळून दोन्ही धातूंचे असतात. परंतु संयोग झाल्यानें त्यांत आणखीहि कांहीं दुसरे गुणधर्म उत्पन्न होतात (६१).

गुणधर्मः—कांस्य हें तुरट, कडवट, उष्ण, लेखन, स्वच्छ, सारक व जड असतें. तें नेत्रांना उत्तम, परंतु रूक्ष आहे. तें कफ व पित्त यांचा नाश करतें. कांशाचे भेद दोन आहेत. एक पुष्प व दुसरे तैलिक. पैकीं पुष्प हें पांढुरकें आणि तैलिक हें उदी रंगाचें असतें. त्यामध्यें पुष्पजातीचें कांस्य हें उत्तम असून औषधाकरतां त्याचा उपयोग करावा.

अथ पित्तलम्—

पित्तलं त्वारकूटं स्यादारो रीतिश्च कथ्यते ।
राजरीतिर्ब्रह्मरीतिः कपिला पिंगलाऽपि च ॥ ६४ ॥

रीतिरप्युपधातुः स्यात्ताम्रस्य यशदस्य च ।
पित्तलस्य गुणा ज्ञेयाः स्वयोनिसदृशा बुधैः ॥ ६५ ॥
संयोगजप्रभावेन तस्यान्येऽपि गुणाः स्मृताः ।
रीतिका द्विविधा प्रोक्ता तत्राद्या राजरीतिका ॥ ६६ ॥
काकतुण्डी द्वितीया स्यात्तयोराद्या गुणाधिका ।
संतप्ता कांजिके क्षिप्ता ताम्रा स्याद्राजरीतिका ॥ ६७ ॥
काकतुण्डी तु कृष्णा स्यान्नासौ सेव्या विजानता ।
श्वेतं दीप्तं मृदुज्योतिः शब्दाढ्यं स्निग्धानिर्मलम् ॥ ६८ ॥
घनाग्निसहसूत्रांगं कांस्यमुत्तममीरितम् ।
शुद्धा स्निग्धा मृदुः शीता सुरंगा सूत्ररूपिणी ।
हिमोपमा शुभा स्वच्छा राजरीतिः प्रकीर्तिता ॥ ६९ ॥

पितळः——आरकूट, आर, पितळ, रीति, राजरीति, ब्रह्मरीति, कपिला, पिंगला हीं नांवें पितळ धातूचीं आहेत. पितळ हा ताम्र आणि जस्त या दोहोंचाहि उपधातु आहे, त्यामुळें त्याचे गुण ताम्र व जस्त ह्या दोहोंप्रमाणें असतात व कांहीं केवळ संयोगामुळेंच दुसरेहि उत्पन्न होतात. पितळेचा रीति जो एक भेद आहे त्यांत पाहिला राजरीति व दुसरा काकतुंडी असे दोन पोटभेद आहेत. त्यापैकीं राजरीति पितळ हें उत्तम होय. राजरीति तापवून जर अम्लांत वरचेवर बुडविली तर राजरीतीला तांब्याचा रंग चढतो. परंतु काकतुण्डी उलट काळसर होते, म्हणून वापरण्याला काकतुण्डी घेऊं नये. कांसे व राजरीति हे उपधातु ध्यावे. (६७॥)

जें कांसें पांढुरकें व चकचकीत असतें, ज्याचा तजेला आल्हादकारक व नाद खणखणीत असतो, जें स्निग्ध निर्मल असतें आणि घनानें ठोकून व भट्टींत तापवून जें सुताप्रमाणें वांकवितां येतें तें कांसें वापरावें.

त्याचप्रमाणें जी शुद्ध, स्निग्ध, मऊ, थंड, रंगदार असेल व जी सुताप्रमाणें वांकणारी, हात लावला असतां बर्फाप्रमाणें थंड व स्वच्छ असेल अशी राजरीति उत्तम. ती वापरावी. (६९)

गुणाः—

रीतिकायुगलं रूक्षं तिक्तं च लवणं रसे ।
शोधनं पांडुरोगघ्नं क्रिमिघ्नं नातिलेखनम् ॥ ७० ॥

एतस्य भस्म तु निम्बाष्टकचूर्णेन सह भल्लातातिलब्रह्मबीजाजमोदाग्नीभिः सेवितं जन्तुघ्नं भवति श्वेतकुष्ठहरं भवति। सुवर्णरीतिचूर्णमन्नादिना छागेन भक्षितं तद्विष्ठां खर्परे लिप्त्वा पश्चात्तत्खर्परं दग्धं रीतिं मुंचति। तां रीतिमेकीकृत्य, आवर्त्य, मुद्रिकां कृत्वा धारयेत्। सा सुवर्णचतुर्दशवर्णतुल्या भवति।

दोन्ही प्रकारच्या रीती रूक्ष व कडवट असतात आणि तिची चव खारट असते. राजरीति शोधक, पांडुरोगाचा नाश करणारी, कृमिहारक आणि फार लेखन नव्हे अशा प्रकारची असते.

राजरीतीचें भस्म करून तें निम्बाष्टकचूर्ण व बिब्बा, तीळ, ब्रह्मबीज,*अजमोदा व चित्रक यांच्याबरोबर सेवन केलें असतां कृमिनाश होतो व पांढरें कोडहि नाहींसें होतें. सुवर्णरीतीची पूड अन्नांत मिसळून मेंढराला खाण्यास द्यावी आणि त्या मेंढराच्या लेंड्या गोळा करून, कुसकरून त्यांचा एका खापराला आपल्या बाजूनें लेप करावा. मग तें खापर भाजावें, म्हणजे आंच लागून रीति धातु निराळी निघेल. ते रज जमा करून आटवून त्याची आंगठी बनवावी व बोटांत घालावी. ही आंगठी चौदा कशी सोन्याप्रमाणें दिसते.

अथोभयोः शोधनमारणम्—

पत्तलीकृतपत्राणि कांस्यरीत्योः प्रतापयेत्।
निषिंचेत्तप्ततप्तानि तैले तक्रे च कांजिके ॥ ७१ ॥
गोमूत्रे च कुलत्थानां कषाये च त्रिधा त्रिधा।
एवं कांस्यस्य रीतेश्च विशुद्धिः संप्रजायते ॥ ७२ ॥

विशेषशोधनं यथा—

गोमूत्रेण पचेद्यामं कांस्यपत्राणि बुद्धिमान्।
दृढाग्निना विशुध्यन्ति पक्वान्यम्लद्रवेऽपि वा ॥ ७३ ॥
रीतिस्तप्ता तु निर्गुण्डीरसे श्यामारजोन्विते।
निषिक्ता शुद्धिमायाति पक्वा वाऽम्लद्रवेऽपि च ॥ ७४ ॥

अथ मारणम्—

अर्कक्षीरेण संपिष्टो गन्धकस्तेन लेपयेत्।
समेन कांस्यपत्राणि शुद्धान्यम्लद्रवैर्मुहुः ॥ ७५ ॥

---

* पळसबीज किंवा देवदार

ततो मूषापटे धृत्वा पुटेद्गजपुटेन च ।
एवं पुटद्वयात्कांस्यं रीतिश्च म्रियते ध्रुवम् ॥ ७६ ॥

अन्यच्च--

कांस्यकं राजरीतिं च ताम्रवच्छोधयेद्भिषक् ।
ताम्रवन्मारणं चापि तयोरुक्तं भिषग्वरैः ॥ ७७ ॥

कांस्याचें व रीतीचें शोधन व मारणः-

कास्य व रीति ह्यांचे पातळ पत्रे ठोकून तापवावे आणि तापलेले आहेत तोंच ताक, तेल, कांजी, गोमूत्र व कुळथांचा काढा यांपैकीं प्रत्येकांत तीन तीन वेळ बुडवून काढावे, म्हणजे कांसें व रीति हे शुद्ध होतात. (७२)

आतां विशेष शोधन लिहितोंः--कांशाचे पातळ पत्रे कडक आंच देऊन गोमुत्रांत एक प्रहर उकळावे, किंवा आम्लांत उकळावे, म्हणजे ते शुद्ध होतात. त्याचप्रमाणें निर्गुडीच्या रसांत श्यामा* वनस्पतीची पूड टाकून त्यांत रीतीचे पत्रे बुडवावे, म्हणजे शुद्ध होतात. किंवा एखाद्या आम्ल रसांत बुडाविले तरीहि शुद्ध होतात. (७४).

आतां भस्माक्रियाः--गन्धक समभाग घेऊन तो रुईच्या चिकांत खलावा व त्यानें कांशाच्या पत्र्यांना लेप द्यावा. पण असें करण्यापूर्वी कांशाचे पत्रे अम्लांत वारंवार बुडवून शुद्ध केलेले असावे. मग ते लेपानें चोपडलेले पत्रे मुशींत घालून बंद करून गजपुटाची आंच द्यावी. याप्रमाणें दोन पुटें दिल्याबरोबर कांस्य किंवा रीति यांचें भस्म होतें. (७६)

कांस्य आणि रीति यांचें शोधन ताम्राप्रमाणेंच करावें आणि ताम्राच्याच कृतीनें त्यांचें मारणहि करावें, असें विद्वान वैद्य म्हणतात (७७).

अथ भर्तसंज्ञं पञ्चलोहं पञ्चरसनामकमधिकोपधातुर्भवति ।

यथा—

कांस्यं रीतिस्तथा ताम्रं नागो वङ्गश्च पञ्चमः ।
एकत्र द्रावितैरेतैः पञ्चलोहं प्रजायते ॥ ७८ ॥

---

* श्यामा हें नांव पुष्कळ वनस्पतींना दिलेलें आहे.

नामानि—

पञ्चलोहं पञ्चरसं वर्तुलं भर्तामित्यपि ।
व्यञ्जनं सूपमन्यच्च तद्भाण्डे साधितं शुभम् ॥ ७९ ॥
आदौ तैलादिके शोध्यं पश्चात्तत्त्वाऽजमूत्रके ।
निषिक्तं शुद्धिमायाति पञ्चलोहं न संशयः ॥ ८० ॥
अर्कक्षीरेण संपिष्टगन्धतालकलेपनात् ।
पञ्चकुम्भिपुटैर्भंर्त म्रियते योगवाहकम् ॥ ८१ ॥
इति भर्तमारणम् ॥

घृतवर्जं बुधैः सर्वं पाच्यं कांस्यस्य पात्रके ।
भोजनं तु प्रशस्तं स्याद्रीतिका मध्यमा स्मृता ॥ ८२ ॥

आतां भर्त म्ह० पंचलोह, ज्याला पंचरसी धातु म्हणतात, त्या उपधातूचें वर्णन देतोः—

कांस्य, रीति, ताम्र, शिसें आणि कथील हे पांच धातु एकत्र आटविले म्हणजे भर्त अथवा पंचरसी धातु तयार झाला. (७८)

पंचलोह, पंचरस, वर्तुल, भर्त हीं नांवें पंचरसी धातूचीं आहेत. चटण्या, कोशिंबिरी किंवा दुसरा एखादा उत्तम पदार्थ जर पंचरसी धातूच्या भांड्यांत तयार केला तर तो फारच उत्तम होतो. पण अगोदर त्या धातूची शुद्धि केली पाहिजे. ती अशी कीं, पंचरसी धातू अगोदर तापवून तेलांत बुडवावी.मग पुनः तापवून शेळीच्या मुतांत बुडवावी, म्हणजे पंचलोह शुद्ध होतें. (८०) आणि

गंधक व हरताळ हे रुईच्या चिकांत खलून त्यानें पंचरसी धातूच्या पत्र्यांना लेप देऊन पांच गजपुटें दिलीं म्हणजे पंचरसी धातूचें भस्म होतें. हें योगवाही आहे.

कांशाच्या भांड्यांत फक्त तूप कढवूं नये. बाकी वाटेल तो पदार्थ त्या भांड्यांत करावा. कांशाच्या ताटांत जेवणहि जेवावें. रीति धातूचें पात्र जेवावयाला मध्यम मानलेलें आहे. (८२)

अथ सिन्दूरम् ।

सिन्दूरं रक्तरेणुश्च नागगर्भं च सीसकम् ।
सीसोपधातुः सिन्दूरं गुणैस्तत्सीसवन्मतम् ॥ ८३ ॥
संयोगजप्रभावेण तस्याप्यन्ये गुणाः स्मृताः ।
सिन्दूरमुष्णं वीसर्पकुष्ठकण्डूविषापहम् ।
सन्धानं चापि भग्नस्य व्रणशोधनरोपणम् ॥ ८४ ॥

अथ शोधनं; तत्र शोधनयोग्यासिन्दूरलक्षणम्—

सुरंगोऽग्निसहः स्निग्धः सूक्ष्मः स्वच्छो गुरुर्मृदुः ।
सुवर्णाकरजः शुद्धः सिन्दूरो मंगलप्रदः ।
दुग्धाम्लयोगतस्तस्य विशुद्धिर्गादिता बुधैः ॥ ८५ ॥

मतान्तरम्—

सिन्दूरं निम्बुकद्रावैः पिष्ट्वा धर्मे विशोषयेत् ।
ततस्तण्डुलतोयेन तथाभूतं विशुद्ध्यति ॥ ८६ ॥
सिन्दूरस्य प्रयोगे हि न दृष्टः कुत्राचित् पृथक् ।
तस्मादुक्तस्थले योज्यमुपदेशो गुरोरिति ॥ ८७ ॥

शेंदूर.

सिंदूर, रक्तवर्ण, नागगर्भ, सीसगर्भ हीं शेंदराचीं नांवें आहेत. शेंदूर हा शिशाचा उपधातू असून गुणानें शिशाप्रमाणेंच असतो. शिवाय नेहमींप्रमाणें संयोगजन्य असे दुसरे गुणहि त्यांत उत्पन्न होतातच. शेंदूर हा उष्ण आहे. तो विसर्प, कुष्ठ, कण्डू व विषबाधा यांचा नाश करितो. मोडलेलें हाड सांधण्यास त्याचा उपयोग होतो आणि त्यानें जखम स्वच्छ राहते. (८४).

शेंदराचें लक्षण.

शेंदूर हा रंगदार, अग्नीवर ठाकला असतां उडून न जाणारा, स्निग्ध, बारीक, स्वच्छ, वजनांत जड व मऊ असावा. त्यांतले त्यांत जो सोन्याच्या खाणींत सांपडतो तो शेंदूर शुद्ध असून मंगलकारक असतो. त्याची शुद्धि दुध आणि आम्ल यांत करावी. (८५)

दुसरा प्रकार

शेंदूर लिंबाच्या रसांत खलून उन्हांत ठेऊन वाळवावा. मग तांदुळाच्या धुवणांत खलून पुनः तशाच तऱ्हेनें वाळवावा, म्हणजे शुद्ध होतो. पोटांत घेण्याकरितां शेंदराचा उपयोग करण्याविषयीं शास्त्रांत प्रयोग नाहीं. म्हणून फक्त वर सांगितलेल्या कारणाकरतांच तो उपयोगांत आणावा असें आमच्या गुरूंचें सांगणें आहे.

अथ शिलाजतोरुत्पत्तिनामलक्षणगुणशोधनानि ।

शिलाजतु द्विधा प्रोक्तं तत्राद्यं गिरिसंभवम् ।
द्वितीयं क्षारभूम्यां स्यान्मृत्तिकाजलयोगतः ॥ ८८ ॥

आद्यं यथा—

निदाघे धर्मसंतप्ता धातुसारं धराधराः ।
निर्यासवत्प्रमुञ्चन्ति तच्छिलाजतु कीर्तितम् ॥ ८९ ॥
सौवर्णं राजतं ताम्रवायसं च चतुर्विधम् ।
शिलाजतु हि विज्ञेयं तत्तल्लक्षणलक्षितम् ॥ ९० ॥
सौवर्णं तु जतापुष्पवर्णं भवति शैलजम् ।
मधुरं कटु तिक्तं च शीतलं कटुपाकि च ॥ ९१ ॥
राजतं पाण्डुरं शीतं कटुकं स्वादुपाकि च ।
ताम्रं मयूरकण्ठाभं तीक्ष्णमुष्णं च जायते ॥ ९२ ॥
लौहं जटायुपक्षाभं सतिक्तं लवणं भवेत् ।
विपाके कटुकं शीतं सर्वश्रेष्ठमुदाहृतम् ॥ ९३ ॥...

अन्यच्च—

गोमूत्रगान्धि यत्कृष्णं स्निग्धं मृदु तथा गुरु ।
तिक्तं कषायं शीतं च सर्वश्रेष्ठं तदायसम् ॥ ९४ ॥

शिलाजित.

शिलाजित दोन प्रकारचा आहे. पहिल्या प्रकारचा म्हणजे जो पर्वतापासून निघतो तो. दुसरा खाऱ्या मातींत पावसाचें पाणी सांचून त्यांत बनतो तो (८८). पैकीं पर्वतांत उत्पन्न होणारा ग्राह्य. त्याचें वर्णन असें:—

उन्हाळ्यांत उन्हानें पर्वत तापतात तेव्हां अनेक धातूंचें सार एकत्र मिसळून झाडांतून चीक निघतो त्याप्रमाणें पर्वतांतून चीक पाझरतो, त्याला शिलाजित म्हणतात. (८९) सुवर्ण, रौप्य, ताम्र आणि आयस म्हणजे लोखंडी असे शिलाजिताचे चार भेद आहेत. ते त्या त्या धातूच्या लक्षणांनीं युक्त असतात. सुवर्ण शिला, जित जपाकुसुमाप्रमाणें लाल असून पर्वतांत सांपडतो; तो मधुर, तिखट कडू, थंड व पाककाळीं तिखट असा आहे. रौप्य शिलाजित पांडुरका, थंड, तिखट आणि पाककाळीं मधुर असतो. ताम्र हा मोराच्या कंठाप्रमाणें गर्दनिळा, तीक्ष्ण, उष्ण असतो आणि लोह शिलाजित काळ्या तपकिरी रंगाचा, कडवट, खारट आणि पाक-काळीं तिखट परंतु थंड असतो. लोहाशिलाजित हा सर्वांत उत्तम होय. (९३).

लोहशिलाजिताला गोमूत्राचा वास येतो. तो काळा, स्निग्ध, मऊ आणि जड असून कडु, तुरट व थंड असतो. अशा प्रकारचा लोंखडी शिलाजित हाच सर्वांत उत्तम होय. (९४).

लक्षणान्तरम्--

तत्तु गुग्गुलुसंकाशं तिक्तं च लवणान्वितम् ।
विपाके कटु शीतंच सर्वश्रेष्ठं तदायसम् ॥ ९५ ॥
वातपित्ते तु सौवर्णं श्लेष्मपित्ते तु राजतम् ।
ताम्रजं कफरोगेषु लोहजं तत्त्रिदोषनुत् ॥ ९६ ॥
विन्ध्याद्रौ बहुलं तेषु तत्र लौहं यतोऽधिकम् ।
तच्छोधनमृते व्यर्थमनेकमलमेलनात् ॥ ९७ ॥

विशेषगुणाः—

शिलाह्वं कटु तिक्तोष्णं कटुपाकं रसायनम् ।
छेदि योगावहं हन्ति कफमेहाश्मशर्कराः ॥ ९८ ॥
मूत्रकृच्छ्रं क्षयं श्वासं वातास्रार्शांसि पाण्डुताम् ।
अपस्मारं तथोन्मादं शोथकुष्ठोदरकृमीन् ॥ ९९ ॥

अथाशुद्धशिलाजतुगुणाः—

अशुद्धं दाहमूर्च्छार्तिभ्रमापित्तास्रशोषकृत् ।
शिलाजतु विधत्ते हि मान्द्यमग्नेश्च विड्ग्रहम् ॥ १०० ॥

जो गुग्गुळाप्रमाणें दिसतो व कडु आणि खारट असतो तो लोह शिलाजित होय. हा पाककाळीं तिखट परंतु थंड आहे. हाच सर्वांत उत्तम होय. (९५) वातपित्तावर सुवर्णशिलाजित चालतो. कफपित्तावर रौप्याची योजना करावी. केवळ कफावर ताम्र शिलाजित चांगला. परंतु लोह शिलाजित हा तिन्ही दोषांचा नाश करतो. (९६) लोहशिलाजित विंध्यपर्वतांत पुष्कळ सांपडतो. कारण तेथें लोखंड फार आहे. परंतु शिलाजितांत अनेक तऱ्हेचे गदळ पदार्थ मिसळलेले असतात. म्हणून शिलाजित शुद्ध केल्या-वांचून देणें व्यर्थ होय. (९७)

शिलाजिताचे विशेष गुणः—

शिलाजिताला शिला असेंहि म्हणतात. तो तिखट, कडु, उष्ण व पाककाळींहि तिखट असून रसायन आहे. तो योगवाही असून कफ, मेह, मूतखडा आणि मूत्रमार्गांतील रेव यांचा नाश करतो. मूत्रकृच्छ्र (ह्म० लघुशंकेचा मार्ग संकुचित किंवा बंद होणें)

क्षय, श्वास, वायु, रक्तदोष, मुळव्याध, पांडुरोग यांचा परिहार करतो व अपस्मार उन्माद, सूज, कुष्ठ, उदर आणि कृमि यांचाहि नाश करतो. (९९)

अशुद्ध शिलाजिताचे दोष.

अशुद्ध शिलाजितापासून दाह, मूर्च्छा, भ्रम, पित्त, रक्तदोष आणि शोष उत्पन्न होतो व अग्निमांद्य आणि शौचास खडा हेहि रोग होतात. (१००)

अथ शाधनम्—

शिलाजतु समानीय लोहजं लक्षणान्वितम् ।
बहिर्मलमपाकर्तुं क्षालयेत्केवलाम्बुना ॥ १०१ ॥
अथ तस्यान्तर्मलविनाशोपायमाह हारीतः—
लोहास्थितं निम्बगुडूचिकेन्द्रयवैर्यथावत्परिभावयेत्तत् ।
संतानिकाकीटपतङ्गदंशदुष्टौषधीदोषनिवारणाय ॥ १०२ ॥
सन्तानिका अन्तःसंमिश्रिता दुष्टमृत्तिका । अथ भावनार्थं क्काथकल्पनामाह वाग्भटः—

तुल्यं गिरिजेन जले वसुगुणिते भावनौषधं क्काथ्यम् ।
तत्क्काथे पादांशे पूतोष्णे प्राक्षिपेद्विरिजम् ॥ १०३ ॥
तत्समरसतां यातं संशुष्कं प्राक्षिपेद्रसे भूयः
स्वैः स्वैरेवं क्काथैर्भाव्यं वारान् भवेत्सप्त ॥ १०४॥

म्हणून शिलाजित शुद्ध केला पाहिजे तो असा:—

लक्षणांनीं युक्त असा लोह शिलाजित मिळवावा आणि त्यांतील कचरा काढून टाकण्याकरितां पाण्यानें स्वच्छ धुवून घ्यावा. (१०१)

त्याच्या आंत मिसळलेला मळ काढून टाकण्याची क्रिया हारीत यांनीं याप्रमाणें सांगितली आहे ती अशी:—

शिलाजित लोखंडी भांड्यांत ठेवावा व कडुलिंब, गुळवेल, व इंद्रजव यांच्या काढ्याची त्याला योग्य रीतीनें भावना द्यावी, म्हणजे मिसळलेली माती, किडे, पतंग, विषारी जंतु, वाईट औषधी इतक्यांचा त्याच्यावर जो दुष्परिणाम झाला असतो तो नाहींसा होतो. (१०२)

मूळ ग्रंथांत " संतानिका " असा शब्द आहे, त्याचा अर्थ वाईट जातीची माती. शिलाजित शुद्ध करण्याकरितां वाग्भटानेंहि एक काढा सांगितला आहे. तो असाः—

जितका शिलाजित असेल त्याच्या आठपट पाणी घेऊन शुद्धि द्रव्य समभाग घ्यावें व त्याचा काढा करावा. चौथा हिस्सा काढा उरला म्हणजे त्यांत शिलाजित टाकावा. त्यांत तो विरला म्हणजे पाणी आटवून कोरडा करावा व पुनः दुसऱ्या रसांत टाकावा. याप्रमाणें निरनिराळ्या औषधींच्या काढ्याच्या त्यास सात सात भावना द्याव्या. (१०४)

अथैवं भावनां दत्त्वा, संशोष्य, केवलेन जलेन शोधनम् कर्तव्यम् ।
तत्प्रकारमाहाग्निवेशः—
उष्णेऽथ काले रवितापयुक्ते व्यभ्रे निवाते समभूमिभागे ।
चत्वारि पात्राण्यसितायसानि न्यस्यातपे तत्र कृतावधानः १०५
शिलाजतु श्रेष्ठमवाप्य पात्रे प्राक्षिप्य तस्माद्विगुणं च तोयम् ।
उष्णं तदर्धं क्वथितं च दत्त्वा विलोडयेत्तन्मृदितं यथावत् ॥ १०६ ॥
सूक्ष्मवस्त्रपूतं प्राविधाय तत्तु सस्थापनीयं पुनरेव तत्र ।
ततस्तु यत्कृष्णमुपैति चोर्ध्वं संतानिकावद्रविराश्मितप्तम् १०७
पात्रे तदन्यत्र ततो विदध्यात्तस्यांतरे कोष्णजलं निधाय ।
ततश्च तस्मादपरत्र पात्रे तस्माच्च पात्रादपरत्र भूयः ॥ १०८ ॥
पुनस्ततोऽन्यत्र निधाय कृष्णं यत्संहृतं तत्पुनराहरेच्च ।
यदा विशुद्धं जलमच्छमूर्ध्वं प्रसन्नभावान्मलमेत्यधस्तात् १०९

याप्रमाणें भावना देऊन शिलाजित शुष्क करावा; नुसत्या पाण्यानेंहि त्याची शुद्धि करतात. त्याची पद्धति अग्निवेशानें याप्रमाणें दिली आहेः—

उन्हाळ्यांत कडक उन्ह पडलें असतांना आकाश निरभ्र आहे व वारा मुळींच नाहीं असें पाहून, एका सपाट जागीं उन्हामध्यें पोलादाचीं चार पात्रें तापत ठेवावीं व त्यांच्याकडे लक्ष ठेवावें. मग उत्तम प्रतीचा शिलाजित आणून तो त्यांपैकीं एका पात्रांत दुपटीनें गरम पाणी ओतून त्यांत टाकावा. नंतर त्या पाण्याच्या अर्ध्यानें त्यांत (औषधीचा) सळसळणारा गरम काढा टाकावा आणि शिलाजित त्यांत घोटून त्याची शुद्धि करावी. ती अशी कीं,

शिलाजित पाण्यांत मिसळल्यावर तें पाणी स्वच्छ वस्त्रांतून गाळून पुनः उन्हांत ठेवावें. म्हणजे उन्हाच्या तापानें त्यांतील काळा पदार्थ तंतूप्रमाणें वर तरंगत येतो. (१०७) मग तो काढून घेऊन बाकीचें मिश्रण दुसऱ्या पात्रांत कोमट पाणी घालून त्यांत टाकावें. त्यांत पहिल्याप्रमाणेंच पदार्थ वर तरंगून येतो. मग तिसऱ्या पात्रांत नंतर चौथ्या पात्रांत मिश्रण टाकावें. आतां काळा पदार्थ वर येत नाहीं, पाणी स्वच्छ राहतें व मळ तळाशीं बसतो, इतकें झाल्यावर मळ व पाणी टाकून देऊन शुद्ध शिलाजित घ्यावा. बहुतकरून चौथ्या पात्रांत धुतल्यानें तो शुद्ध होतो. त्याची परीक्षा सांगतों.

शिलाजित अग्नीवर टाकला असतां धूर निघत नाहीं आणि त्याचा आकार पिंडीप्रमाणें बनतो. त्यांतील थोडासा गवताच्या काडीच्या टोकाला लावून पाण्यांत टाकला तर तंतूप्रमाणें लांब होऊन पाण्याच्या तळाशीं जमून बसतो. (१०९) त्याला गोमूत्रासारखा वास येतो आणि तो काळा असतो. तो शिलाजित शुद्ध होय.

तदा त्यजेत्तत्सलिलं मलं च शिलाजतु स्याज्जलशुद्धमेवम् ।
चतुर्थपात्राद्गलितं हि सर्वं परीक्षणं तस्य वदामि भूयः ११०

यथा—

वन्हौ क्षिप्तं तु निर्धूमं पक्वं लिंगोपमं भवेत् ।
तृणाग्रेणांभसि क्षिप्तमधो गलति तंतुवत् ।
गोमूत्रगन्धि कृष्णं तु शुद्धं ज्ञेयं शिलाजतु । १११ ॥

एवं शुद्धस्य गुणाः प्रागुक्ताः । अथ नामानि—

शिलाजत्वद्रिजतु च शैलनिर्यास इत्यपि
गैरेयमश्मजं चापि गिरिजं शैलधातुजम् ॥ ११२ ॥

अथ शीघ्रकार्यवशात्संक्षिप्तशोधनं यथा—

गोदुग्धत्रिफलाभृङ्गद्रवैः पिष्टं शिलाजतु ।
दिनैकं लोहजे पात्रे शुद्धिमायात्यसंशयम् ॥ ११३ ॥
इति संक्षिप्तशुद्धिः । अथैवं शुद्धस्य गुणोत्कर्षाय भावना प्रोक्ता—

त्रिफलावारिगोदुग्धमूत्रैर्भाव्यं शिलाजतु ।
स्वल्पं स्वल्पं विधानेन स्थापयेत्काचपात्रके ॥ ११४ ॥

अगुर्वादिशुभैर्धूपैर्धूपयेत्तत्प्रयत्नतः ॥
मात्रया शीलयेत्पश्चात्स्निग्धशुद्धो यथाविधि ॥ ११५ ॥
एकत्रिसप्तसप्ताहं कर्षमर्धपलं पलम् ।
हीनमध्योत्तमो योगः शिलाजस्य क्रमान्मतः ॥ ११६ ॥
क्षीरेणालोडितं कुर्याच्छीघ्रं रासायनं फलम् ।
हन्याद्रोगानशेषांश्च जीर्णे हितामिताशनः ॥ ११७ ॥
व्यायामातपमारूतचेतःसंतापगुरुविदाह्यादि ।
उपयोगादपि परतो द्विगुणं परिवर्जयेत्कालम् ॥ ११८ ॥
कुलत्थान काकमाचीं च कपोतांश्च सदा त्यजेत् ।
माहेन्द्रमुदकं कौपं पिबेत्मास्रवणांबु वा ॥ ११९ ॥

नांवें:--शिलाजित, इन्द्रजतु, शैलनिर्यास, गैरेथ, अश्मज, गिरिज, शैलधातुज हीं नांवें शिलाजिताचीं आहेत. (११२)

फारच घाई असेल तर ताबडतोबीचें शोधन सांगतों:--

गाईचें दूध, त्रिफळ्याचा काढा, म्हाक्याचा रस यांच्यांत शिलाजित टाकून लोखंडाच्या खलांत त्याचा एक दिवसभर खल करावा, म्हणजे तो निःसंशय शुद्ध होतो. (११३)

ह्याप्रमाणें शिलाजित शुद्ध करून त्याचा गुण वृद्धिंगत व्हावा म्हणून त्याला भावना द्याव्यात त्या:--

त्रिफळ्याचा काढा, गाईचें दूध व त्याचप्रमाणें गोमूत्र यांच्या भावना शिलाजिताला द्याव्या. भावना देते वेळीं शिलाजित थोडा थोडा टाकून भावना द्याव्या. मग तो एका कांचेच्या भांड्यांत ठेवावा आणि आगरु वगैरे सुवासिक धूपानें धुपवावें. याप्रमाणें शिलाजित स्निग्ध व शुद्ध असा झाला म्हणजे थोड्या प्रमाणानें घेण्यास आरंभ करावा. एक सप्तक, तीन सप्तकें, सात सप्तकें इतके दिवस द्यावा. एका सप्तकांत एक तोळा, तिन सप्तकांत दोन तोळे, सात सप्तकांत चार तोळे शिलाजित सेवन करावा. याप्रमाणें शिलाजितसेवनाचे कनिष्ठ, मध्यम व उत्तम असे योग क्रमानें सांगितले. शिलाजित दुधाबरोबर घेतला असतां रसायनाप्रमाणें फल देतो व मिताहार ठेवून पथ्य सेवन केलें असतां यच्चावत् रोगांचा नाश करतो (११७) शिलाजित जितके दिवस घेतला असेल त्याच्या दुप्पट दिवस पथ्य करावें व तोंपर्यंत अतिश्रम करणें, उन्हांत फिरणें,

सोसाट्याच्या वाऱ्यांत हिंडणें, संताप करून घेणें, जड अन्न खाणें, जळजळणारा पदार्थ सेवन करणें हे वर्ज करावेत. हुलगे, कांगोणी (किंवा केळें), कबूतराचें मांस हे पदार्थ मुळींच खाऊं नयेत. पाणी पिणें तें सुद्धां पावसाचें, स्वच्छ विहिरीचें, किंवा झऱ्याचें प्यावें. (११९)

न सोऽस्ति रोगो भुवि साध्यरूपो जत्वश्मजं यं न जयेत्प्रसह्य।
तत्कालयोगैर्विधिवत्प्रयुक्तं स्वस्थस्य चोर्जां विपुलां दधाति२०
सर्वानुपानैः सर्वेषु रोगेषु विनियोजितम् ।
जयत्यभासतो नूनं तांस्तान् रोगान्न संशयः ॥ १२१ ॥
रसोपरससूतेन्द्ररत्नलोहेषु ये गुणाः ।
विशन्ति ते शिलाधातौ जरामृत्युजिगीषया ॥ १२२ ॥

अस्य भस्मप्रकारो रसपद्धत्याम् —

शिलया गन्धतालाभ्यां मातुलुंगरसेन च ।
पुटितं हि शिलाधातु म्रियतेऽष्टगिरिण्डकैः ॥ १२३ ॥

सत्वप्रकारस्तु—

पिष्टं द्रावणवर्गेण साम्लेन गिरिसंभवम् ।
रुद्ध्वा मूषोदरे ध्मातं कोकिलैः सत्वमृच्छति ॥ १२४ ॥

साध्य स्थितींत असून ज्याला शिलाजित धडाक्यासरशी जिंकू शकत नाहीं असा एकहि रोग दिसत नाहीं. शिलाजिताचा कोणताहि योग ताबडतोब योग्य रीतीनें अमलांत आणला असतां शरीर निरोगी होऊन ओज विपुल वाढतें. (१२०)

त्या त्या रोगाचें अनुपान योजून शिलाजित वाटेल त्या रोगावर द्यावा. तो वारंवार घेत गेल्यानें वाटेल तो रोग असो, त्याचा नाश करतां येतो. रस, उपरस, पारद, रत्नें, लोह या सर्वांत जे जे गुण आहेत ते जरा, रोग, मृत्यु यांना जिंकण्याकरतां शिलाजितांत प्रवेश करतात. (१२२)

शिलाजिताचें भस्म करण्याचा प्रकार रसपद्धतींत लिहिला आहे, तो असा:—

गंधक, हरताळ यांच्याशीं, मनशिळाशीं व महाळुंगाचा रस यांच्याशीं खलून शिलाजिताला आठ रानशेणींचें पुट द्यावें, म्हणजे त्याचें भस्म होतें. (१२३)

शिलाजित सत्व:—

द्रावण वर्गांतील जिनसा व आम्लरस यांच्यांत शिलाजित खलून मुशींत बंद करून निखाऱ्यांवर कडक आंच दिली म्हणजे त्याचें सत्व निघतें (१२४).

अथ द्वितीयं शिलाजतु रसपद्धत्याम् —

द्वितियं सोरकाख्यं स्याच्छ्वेतवर्णं शिलाजतु ।
अग्निबाणोपयुक्तं तद्धितं मूत्रामयेषु च ॥ १२५ ॥

उक्तं च—

पांडुरं सिकताकारं कर्पूराभं शिलाजतु ।
मूत्रकृच्छ्राश्मरीमेहकामलापांडुनाशनम् ॥ १२६ ॥
एलातोयेन संभिन्नं सिद्धं शुद्धिमुपैति तत् ।
नैतस्य मारणं सत्त्वपातनं विहितं बुधैः ॥ २७ ॥
उत्पत्तिस्तु मृत्तिकाविशेषाज्जलाविशेषाज्जायते ॥

इत्युपधातुनिरूपणम् ॥

रसपद्धतींत शिलाजिताचा दुसरा एक भेद सांगितला आहे. तो ग्रंथकार म्हणतो कीं,

ज्याला सोरा म्हणतात तोहि शिलाजिताचाच एक भेद आहे. दारूचे बाण तयार करण्याकडे त्याचा उपयोग होतो आणि तो मूत्ररोगावर देतात. (१२५) म्हटलें आहे कीं,

पांढरा, वाळुप्रमाणें कणीदार व कापराप्रमाणें चकाकणारा असा जो शिलाजिताचा भेद आहे तो मूत्रकृच्छ्र, मूतखडा, प्रमेह, कावीळ व पाण्डुरोग यांचा नाश करतो. (१२६)

वेलदोड्याच्या कषायांत तो खलला म्हणजे शुद्ध होतो. त्याचें मारण किंवा सत्व काढणें वगैरे प्रकार शास्त्रकारांनीं दिलेले नाहींत. (१२७)

सोन्याची उत्पत्ति, विशेष प्रकारची माती व पावसाचें पाणी यांच्या संयोगानें होतें.

अथ चपलाख्य उपधातुराधिकोऽस्ति । तद्यथा रसपद्धत्याम्—

चत्वारश्चपला सितासितहरिच्छोणप्रभेदैः पुन-
र्मोघौ शोणितशोणकज्जलनिभौ लाक्षावदाशुद्रवात् ।
शेषौ तु द्रवतश्चिरेण सुभगौ तौ शुध्यतः सप्तधा
कर्कोट्यार्द्रकजम्भलस्य सलिले संस्वेदितौ वाप्लुतौ १२८

प्राथम्याद्रसबन्धकौ तदुपरि स्यातां तु योगानुगौ
वृष्यौ दोषहरौ बुधैर्निगदितौ माक्षीकभूम्युद्भवौ ।
मोघौ निष्फलौ । शेषौ हरितसितौ । सुभगौ गुरुतरौ । प्राथम्यात्प्रथमतस्तु रसबन्धकौ भवतः । शेषं स्पष्टम् । अन्यत्रापि—
चतुर्धा चपलः प्रोक्तः श्वेतः कृष्णोऽरुणो हरित् ।
वङ्गवत्पलवते वन्हौ चपलस्तेन कीर्तितः ॥ १२९ ॥

गुणाः—

चपलः स्फाटिकच्छायः षडस्त्रः स्निग्धको गुरुः ।
त्रिदोषघ्नोऽतिवृष्यश्च रसबन्धविधायकः ॥ १३० ॥
अयं तूपरसे कौश्चित्पाठितोऽन्यै रसेषु च ।
विषोपविषधान्याम्लैर्मार्दितश्चपलस्ततः ।
अन्धमूषागतो ध्मातः सत्वं मुंचति कार्यकृत् ॥ १३१ ॥
इति चपलः ॥

इति श्रीसौराष्ट्रदेशोद्भवसारस्वतकुलावतंसोपाध्यायश्रीमाधवविरचिते आयुर्वेदप्रकाशे चतुर्थोऽध्यायः ॥३॥

आतां चपल या नांवाचा आणखी एक उपधातू रसपद्धतींत सांगितलेला आहे त्याविषयीं माहिती देतोः—

चपल.

चपल धातू पांढरा, काळा, हिरवट आणि तांबडा अशा चार प्रकारचा आहे. त्यांतले दोन प्रकार म्हणजे काळा आणि तांबडा हे निरुपयोगी होत. कारण जरा उष्णता लागली कीं, ते लाखेप्रमाणें तावडतोब वितळतात. बाकीचे दोन लवकर वितळत नाहींत व उत्तम असतात म्हणून ते शुद्ध करतां येतात. करटोली, आलें आणि लिंबु ह्यांच्या रसांत चपलाचें स्वेदन करावें किंवा तो तापवून रसांत सात वेळा बुडवावा, म्हणजे शुद्ध होतो (१२८).

दोन्ही प्रकारचा चपल पारदाचें बंधन करतो. चपल हा योगवाही आहे. माक्षिकाच्या जमीनींत जो सांपडतो तो चपल, धातुवर्धक व त्रिदोषनाशक आहे. काळा आणि तांबडा हे 'निरुपयोगी' अर्थात् औषधिक्रियेंत निष्फळ आहेत. बाकीचे दोन म्हणजे हिरवळ आणि पांढरा हे दोन्ही उत्तम म्हणजे वजनदार असतात. चपल हा धातू पहिल्या प्रथमच पाऱ्याचें बन्धन करतो. दुसऱ्याहि ग्रंथांतून असेंच आहे कीं,

चपल हा पांढरा, काळा, तांबडा आणि हिरवळ अशा चार जातींचा आहे. ह्या जाती रंगावरून झालेल्या आहेत. चपल हा कथलाप्रमाणें अग्नींत वितळून उडून जातो, म्हणून त्याला चपल म्हटलें आहे (१२९).

गुणः—चपल हा स्फाटिकाप्रमाणें दिसतो. त्याला सहा पैलू असतात. तो स्निग्ध, वजनदार, त्रिदोषनाशक,अतिशय धातुवर्धक व पारदाचें बन्धन करणारा आहे. कांहीं ग्रंथकार ह्याची उपरसांत गणना करतात. दुसरे याचा रसांतच समावेश करतात. चपल याचा विष, उपविष, धान्य, आम्लरस यांच्यार्शी खल करून अन्ध मूषेंत ठेऊन भट्टींत आंच दिली ह्मणजे सर्व कामास उपयोगी पडेल असें सत्व त्यांतून निघतें. (१३१)

चवथा अध्याय समाप्त.

अथ पञ्चमोऽध्यायः ।

अथ रत्नोपरत्नानानामुत्पात्तिनामलक्षणगुणशोधनमारणानि ।

उक्तं च—

मणयोऽपि च विज्ञेयाः सूतबन्धस्य कारकाः ।
देहस्य धारका नृणां जराव्याधिविनाशकाः ॥ १ ॥

रत्नानिरुक्तिः--

धनार्थिनो जनाः सर्वे रमन्तेऽस्मिन्नतीव यत् ।
अतो रत्नमिति प्रोक्तं शब्दशास्त्रविशारदैः ॥ २ ॥

अथ रत्ननामानि स्वरूपनिरूपणं च--

रत्नं क्लीबे मणिः पुंसि स्त्रियामपि निगद्यते ।
तत्त पाषाणभेदोऽस्ति वज्रादि च तदुच्यते ॥ ३ ॥

अध्याय पांचवा.

रत्नें, उपरत्नें यांचें वर्ण, शोधन वगैरे.

रत्नामध्यें देखील मोठमोठे गुण आहेत. रत्नें पारदाचें बन्धन करतात आणि देह सुस्थितींत ठेऊन म्हातारपण व रोग यांचा नाश करतात.

व्युत्पत्तिः--

पैसा मिळवूं इच्छिणाऱ्या लोकांचें मन ज्याच्यामध्यें अतिशय रमून जातें त्या वस्तूला रत्न म्हणतात. अशी रत्नशब्दाची व्युत्पत्ति शब्दशास्त्रज्ञांनीं दिलेली आहे. (२)

नांवें व स्वरूपः--

रत्न, मणि, इत्यादि नांवें रत्नाचीं होत. रत्न ही पाषाणाचीच एक जात आहे. हिरा हा रत्नांतच मोडतो. (३)

रसपद्धत्याम्—

वज्रं विद्रुममौक्तिके मरकतं वैदुर्यगोमेदके
माणिक्यं हरिनीलपुष्पदृषदौ रत्नानि नाम्ना नव ।
यान्यन्यान्यपि सन्ति कानिचिदिह त्रैलोक्यसीम्नि स्फुटं
नाम्ना तान्युपरत्नतान्युपगतान्याहुः परीक्षाकृतः ॥ ४ ॥

वज्रं हीरकः, विद्रुमं प्रवालं, मौक्तिकं मुक्ता, मरकतं गरुडोद्गारः 'पन्ना' इति भाषा, वैदूर्यं विदुरमाणिः, गोमेदः अनेनैव नाम्ना प्रसिद्धः, माणिक्यं पद्मरागः, हरिनीलः इंद्रनीलः, पुष्पदृषत् पुष्परागः । शेषं स्पष्टम् ॥

विष्णुधर्मोत्तरेऽपि--

मुक्ताफलं च वैदूर्यं हीरकं पद्मरागकम् ।
पुष्परागं च गोमेदं नीलं गारुत्मतं तथा ।
प्रवालं च तथैतानि महारत्नानि वै नव ॥ ५ ॥ इति ॥

रत्नाचीं नांवें रसपद्धतींत दिलीं आहेत तीं अशीं:--

वज्र, विद्रुम, मौक्तिक, मरकत, वैडुर्य, गोमेद, माणिक्य, हरिनील, पुष्पदृषद हीं नऊ रत्नाचीं नऊ नांवें आहेत. यांच्याशिवाय या त्रैलोक्याच्या मर्यादेंत दुसऱ्या कांहीं रत्नांप्रमाणें मोलवान् वस्तु असतील, त्या सर्वांना तज्ज्ञांनीं उपरत्न असें नांव दिलें आहे. (४)

व्याख्या:-- वज्र म्ह० हिरा, विद्रुम म्ह० पोवळें, मौक्तिक म्ह० मोती, मरकत म्ह० पाच याला पन्ना असेंहि म्हणतात. हा गरुडाच्या मुखांतून निघालेला आहे. वैडुर्य म्ह० लसण्या, गोमेद, माणिक्य म्ह० माणीक याला पद्मराग असेंहि नांव आहे. हरिनील म्ह० इंद्रनीळ, पुष्पदृषद म्ह० पुष्पराग अथवा पुष्कराज.

विष्णुधर्मोत्तर पुराणांतहि नऊ रत्नांचीं नांवें दिलीं आहेत. मुक्ताफळ, हिरा, वैडुर्य म्हणजे लसण्या, माणीक, पुष्कराज, गोमेद, इंद्रनीळ, पाच आणि पोंवळें हीं नऊ महारत्नें होत. (५)

उपरत्नान्यन्यत्र--

वैक्रांतः सूर्यकांतश्च चंद्रकांतस्तथैव च ।
राजावर्तो लालसंज्ञः पेरोजाख्यस्तथाऽपरः ॥ ६ ॥
मुक्काशुक्तिस्तथा शङ्खः कर्पूराश्माऽथ काचजाः ।
मणयो नीलपीताद्या ह्यन्ये विषहराश्च ये ॥ ७ ॥
वन्ह्यादिस्तम्भका ये च ते सर्वे हि परीक्षकैः
गणिता ह्युपरत्नेषु मणयो लोकविश्रुताः ॥ ८ ॥

आतां उपरत्नें सांगतोः—

वैक्रान्त, सूर्यकांत, चंद्रकांत, राजावर्त, लाल, पेरोजा, शुक्ति, (शिंपला), शंख, कर्पूराश्मा, कांचेचे लोलक, तसेंच निळे, पिवळे माणि आणि ज्यांच्यामध्यें विषाचा परिहार करण्याचें सामर्थ असतें असे सर्व जिन्नस यांना उपरत्नें म्हणावें. त्याचप्रमाणें अग्नीचा जोर (दाह) थांबविणारे जे लोकप्रसिद्ध कांहीं मणी आहेत त्यांचाहि समावेश परीक्षक तज्ज्ञ मण्यांतच करितात. (८)

अथ रत्नानां नामानि—

हीरकः पुंसि वज्रोऽस्त्री चन्द्रो मणिवरश्च सः ।
गारुत्मतं मरकतमश्मगर्भो हरिन्मणिः ॥ ९ ॥
माणिक्यं पद्मरागः स्याच्छोणरक्तं च लोहितम् ।
पुष्परागो मंजुमणिः स्याद्वाचस्पतिवल्लभः ॥ १० ॥
इन्द्रनीलं च नीलं च, गोमेदः पीतरक्तकम् ।
वैदूर्यं दृरजं रत्नं स्यात्केतुग्रहवल्लभम् ॥ ११ ॥
मौक्तिकं शौक्तिकं मुक्ता तथा मुक्ताफलं च तत् ।
पुंसि क्लीबे प्रवालः स्यात्पुमानेव तु विद्रुमः ॥ १२ ॥
शुक्तिः शंखो गजः क्रोडः फणी मत्स्यश्च दर्दुरः ।
वेणुश्चाष्टौ समाख्याता सुज्ञैर्मौक्तिकयोनयः ॥ १३ ॥

रत्नांचीं नांवेंः—हिरा, वज्र, चंद्र, मणिवर हीं हिऱ्याचीं नांवें; मरकत, गारुत्मत, अश्मगर्भ, हरिन्माणि हीं पाचेचीं; माणिक्य, पद्मराग, शोणरक्त, लोहित हीं नांवें माणकाचीं; पुष्पराग, मञ्जुमणि, वाचस्पती वल्लभ हीं पुष्कराजांचीं; इंद्रनील व नीळ हीं निळाचीं;

गोमेद पीतरक्तक, हीं गोमदार्चीं; वैदूर्य, दूरजरत्न, केतुग्रहवल्लभ हीं लसण्याचीं; मौक्तिक, शौक्तिक, मुक्ता, मुक्ताफळ हीं मोत्याचीं, प्रवाल, विद्रुम हीं पोंवळ्याचीं; याप्रमाणें नऊ रत्नांचीं नांवें आहेत.

आतां मोतीं ज्या आठ ठिकाणीं सांपडतें तीं ठिकाणें—— शिंपला, शंख, हत्तीचें गंडस्थळ, नागाची फडा, मोठा मासा, मोठा बेडूक आणि वेळू अशा आठ जागीं मोतीं उत्पन्न होतें.(१३)

अथ हरिकोत्पत्तिलक्षणानि ।

दधीच्यस्थ्नः समुत्पन्नः पविस्तस्य कणाः क्षितौ ।
विकीर्णास्ते तु वज्राख्यां भजन्ते तच्चतुर्विधम् ॥ १४ ॥
श्वेतं द्विजाभिधं रक्तं क्षत्रियाख्यं तदीरितम् ।
पीतं वैश्यांख्यमुद्दिष्टं कृष्णं स्याच्छूद्रसंज्ञकम् ॥ १५ ॥
विप्रो रसायने प्रोक्तः सर्वासिद्धिप्रदायकः ।
क्षत्रियो व्याधिविध्वंसी जरामृत्युहरः परः ॥ १६ ॥
वैश्यो धनप्रदः प्रोक्तस्तथा देहस्य दार्ढ्यकृत् ।
शूद्रो नाशयति व्याधीन् वयःस्तम्भं करोति च ॥ १७ ॥
स्त्रीपुंनपुंसकाश्चैते लक्षणीयाश्च लक्षणैः ।
सुवृत्ताः फलसंपूर्णास्तेजोयुक्ता बृहत्तराः ॥ १८ ॥
पुरुषा हरिकास्ते वै रेखाबिन्दुविवर्जिताः ।
रेखाबिन्दुसमायुक्ताः षडस्त्रास्ते स्त्रियः स्मृताः ॥ १९ ॥
त्रिकोणाश्च सुदीर्घाश्च विज्ञेयास्ते नपुंसकाः ।
सर्वेषु पुरुषा श्रेष्ठा वेधका रसबन्धकाः ॥ २० ॥
स्त्रियः कुर्वन्ति कायस्य कान्तिं स्त्रीणां सुखप्रदाः ।
नपुंसकास्त्ववीर्याः स्युरकामाः सत्त्ववर्जिताः ॥ २१ ॥
स्त्रियः स्त्रीभ्यः प्रदातव्या क्लीबान् क्लीबे प्रयोजयेत् ।
सर्वेभ्यः पुरुषा योज्या बलाढ्या वीर्यवर्धनाः ॥ २२ ॥

हिऱ्याविषयीं.

दधीच ऋषींच्या अस्थींचें विश्वकर्म्यानें वज्र केलें त्या वज्राचे जे कण जमीनीवर इकडे तिकडे विखरले त्यांचेच हिरे बनले. हिरा चार रंगांचा असतो. पांढरा हा ब्राह्मण, तांबडा हा क्षात्रिय, पिवळा हा वैश्य आणि काळसर हा शूद्र जातीचा होय. विप्र वर्णाचा हिरा रसायनाला घ्यावा. त्यानें सर्व सिद्धि प्राप्त होतात. क्षत्रिय वर्णाचा तांबडा हाहि उत्तम. त्यानें म्हातारपण, रोग आणि मृत्यु हे दूर

होतात. वैश्य वर्णाच्या हिऱ्यानें धन प्राप्त होतें व देह बळकट होतो आणि शूद्र वर्णाचा काळसर हिरा देखील तारुण्याचें रक्षण करून रोगांचा नायनाट करतो. हिऱ्यांमध्यें पुरुषलक्षणी, स्त्रीलक्षणी आणि नपुंसक असेहि हिरे असतात. भरदार न तुटलेले, तेजस्वी आणि मोठे असे जे हिरे ते पुरुष. त्यांच्यामध्यें रेघा किंवा ठिपका वगैरे अयब नसतो. ज्यांच्यामध्यें रेघ, ठिपका हे असतात व ज्यांना सहा धारा असतात ते स्त्रीसंज्ञक, आणि जे त्रिकोणी व लांबट असतात ते नपुंसक समजावे. (१२)

या सर्वांत पुरुषसंज्ञक हिरा उत्तम. कारण तो वेधक असून पाऱ्याचें बंधन करतो. (२०) स्त्रीजातीचे हिरे शरीराची कांति वाढवितात आणि स्त्रियांना सुखप्रद होतात. परंतु नपुंसक हिरे हे कुचकामाचे. त्यांत सत्व नसतें, कांहीं नसतें. (२१) म्हणून स्त्रीसंज्ञक हिरे बायकांना आणि नपुंसक हिरे नपुंसकांना द्यावे, आणि पुरुषांनीं पुरुषसंज्ञक हिरे द्यावे. त्यानें पुरुष बलाढ्य आणि वीर्यशाली होतो. (२२).

अथ रसपद्धत्यां हीरकोत्पत्तिरन्यथोक्ता। यथा—

जातः प्राग्बलनामको दितिसुतोऽवध्यस्त्रिलोक्यां पुन-
र्देवैर्देहमयं मखे मणितनुः सर्वात्मना याचितः।
दत्त्वाऽथ स्वशरीरमव्यथमयं धीरः सुराणां पुर—
स्तस्थौ तैः स तु सप्ततन्तुभुजिभिः स्वर्गेश्वरायार्पितः २३
चिच्छेदाथ शिरोऽस्य वज्राशिरसो वज्रेण वज्री पुन—
र्भूतो रत्नसमुच्चयो बल इति स्माहुः पुराणर्षयः।
मूर्ध्नो वा वदनादमुष्य पवयो ये जज्ञिरे ते द्विजा
बाहुभ्यामुरसोऽस्य ये समभवंस्ते संस्मृताः क्षत्रियाः २४
नाभीतः कटितश्च ये निपतितास्ते नाम भूमिस्पृशो
जानुद्वन्द्वप२द्वयप्रपतितास्ते नाम शूद्रा मताः ॥ २५॥

प्राक् कृतयुगे। मखे तत्कृतयज्ञे। अजेयत्वाच्छत्रोरयं देहयाचनावसर इति भावः। सप्ततन्तुभुजिभिर्यज्ञभुग्भिः। शेषं स्पष्टम् ॥

रसपद्धतींत हिऱ्यांची उत्पत्ति दुसऱ्या तऱ्हेनें वर्णन केली आहे, ती अशी—

पूर्वी प्राकबल नांवाचा दैत्य त्रैलोक्याला अजिंक्य झाला त्या वेळीं माणितनु (दधीच ऋषि) हा यज्ञ करीत होता. त्याच्या यज्ञांत जाऊन देवांनीं त्याचा देहच अतिशय काकुळतीनें मागितला. तेव्हां त्या सत्वधीर पुरुषानें आपला निरामय देह (लोककार्याला) अर्पण करून तो देवांच्या पुढें उभा राहिला, आणि नंतर हविर्भागाचा स्वीकार करणाऱ्या देवांनीं त्याला इंद्राच्या स्वाधीन केलें. (२३).

पुढें माणितनु याच्या सहायानें वज्रहस्त इंद्रानें त्या वज्राप्रमाणें अभेद्य मस्तकाच्या दैत्याचें मस्तक वज्रप्रहार करून उडविलें. तेव्हां त्या दैत्याचा देह रत्नमयच बनला, व त्याला बल हें नांव पूर्वीच्या ऋषींनीं दिलें. त्या बलाच्या मस्तकापासून किंवा मुखापासून ब्राम्हण वर्णाचे हिरे झाले, बाहु आणि छातीपासून क्षत्रिय वर्णाचे हिरे उत्पन्न झाले, नाभि आणि कंबर याच्यांपासून वैश्य किंवा कृषि करणारे उत्पन्न झाले, आणि गुडघे व पाय यांच्यापासूनच निघाले ते शूद्रसंज्ञक हिरे झाले. (२५)

पुनः प्रकारान्तरेण हीरकोत्पत्तिः—

पूर्वं मन्दरमथ्यमानजलधिप्रत्युत्थिता या सुधा
तां प्रायः पिबतः सुरासुरगणस्यास्यादिमे बिन्दवः ।
ये भूमौ पतिता विकर्तनकरव्रातैः पुनः शोषिता—
स्ते वज्राण्यभवञ्जनुर्ननु पवेरित्यूचिरे केचन ॥ २६ ॥

स्पष्टम् । अत्र युगभेदेन व्यवस्था, अस्तु वा त्रिभ्य उत्पत्तिः ; तथा सति किं बाधकम् ।

व्याख्या—पूर्वी म्ह. कृतयुगांत, यज्ञांत म्हणजे माणितंतूनें केलेल्या यज्ञांत दैत्य अजिंक्य झाला म्हणूनच देहयाचनेचा प्रसंग देवावर ओढवला. मुळांत " सप्ततंतुभुजिभिः " असा शब्द आहे. त्यांचा अर्थ हविसेवन करूं इच्छिणारे असा आहे. सप्ततंतु म्हणजे यज्ञ.

हिऱ्याच्या उत्पत्तीचा आणखीहि प्रकार वर्णन केला आहे.

पूर्वी मंदराचलाची रवि करून देव-दैत्य समुद्रमंथन करितांना त्यांतून अमृत निघालें, तें अमृत देव व दैत्य प्राशन करीत असतां त्यांच्या मुखांतून जे थेंब भूमीवर पडले त्यांतील ओलावा

सूर्याच्या किरणांनीं शुष्क होऊन गेला व बिंदूचे हिरे बनले अशीहि हिऱ्याच्या उत्पत्तीची कथा कोणी वर्णन करतात. (२६).

या तीन निरनिराळ्या तऱ्हेच्या तीन उत्पात्ति सांगितल्या आहेत. त्या युगभेदामुळें निराळ्या असोत किंवा तिन्ही खऱ्या असोत, कसेंहि असलें तरी बिघडतें कोठें ? असो.

अथैवमुत्पात्तिमुक्त्वा हीरकस्याष्टप्रकारकं विज्ञानमाह—

उत्पात्तिर्गुणदोषजातिखनयो हस्तांगुलीचालनं
मूल्यं मण्डलिकेति रत्नदृषदां ज्ञानं वरं चाष्टधा ।

अत्रैकप्रसरेण नोक्तमपि तत्तत्तत्परीक्षास्थल—

श्लोकश्लोकितमेकशः खलु विदांकुर्वंतु वैज्ञानिकाः ॥ २७ ॥

मंडली रत्नपरीक्षकाणां सभा । उत्पत्त्यादिकं भिन्नभिन्नश्लोकोक्तमपि परीक्षावसरे एकशः एकत्र विदांकुर्वंतु जानन्त्विति । एतेन समस्तश्लोकैर्व्यस्तश्लोकैरपि एकीभूतैरिव हीरकपरीक्षा कर्तव्येति भावः ।

याप्रमाणें उत्पात्ति सांगितल्यानंतर आतां त्याची विशेष माहिती सांगतों.

उत्पात्ति, गुण, दोष, जात, खाण, हाताच्या बोटांनीं स्पर्श करून परीक्षा करणें, किंमत करणें, रत्नपारख्यांची योग्यता जाणणें असें आठ प्रकारचें ज्ञान हिऱ्याच्या परीक्षेंत श्रेष्ठ प्रतीचें समजतात. ही माहिती एकाच ठिकाणीं जरी सांगितलेली नसली, आणि निरनिराळ्या परीक्षेच्या माहितीचे श्लोक निरनिराळे असले तरी ते श्लोक व माहिती एकत्र करून रत्नपरीक्षकांनीं हें ज्ञान अनुभवानें संपादावें. (२७)

मुळांत "मंडली" असा शब्द आहे, त्याचा अर्थ रत्नपारख्यांची सभा असा आहे. हिऱ्यांची उत्पात्ति, गुण वगैरे यांची माहिती निरनिराळ्या ठिकाणीं दिलेली असते. तरी परीक्षा करते वेळेस ती एकत्र करून मग परीक्षा करावी. सर्व श्लोकांचा एकत्र सारांश काढावा व निरनिराळाहि काढावा व अशा रीतीनें परीक्षेचें ज्ञान संपादावें. याप्रमाणें सर्वसामान्य माहिती सांगितली.

भूमिं प्रतिपाद्य पवेर्भेदानाह—

ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्रविभिदा ज्ञेयश्चतुर्धा पविः
पुंस्त्रीक्लीबविभागतः पुनरसौ प्रत्येकमुक्तस्त्रिधा ।

तत्र श्वेतरुचिर्द्विजः स्फाटिकवद्रक्तस्तु किंचिन्नृपो
वैश्यः पीतरुगाघ्रिजस्त्वासितभास्तत्राप्ययं पूरुषः ॥ २८ ॥
रेखाबिन्दुविवर्जितोऽष्टफलकः स्वच्छच्छवियों भवे-
त्सा स्त्री या तु षडस्रबिन्दुसहितो रेखान्वितोदाहृतः ।
निष्कोणाश्चिपिटास्त्रिकोणवपुषो दीर्घा विपुंस्त्वा पुन—
र्धार्याः स्त्रीनृनपुंसकैर्युवतिपुंषण्डाभिधानाः क्रमात् २९
व्याख्या—यः स्फटिकवच्छ्वेतरुचिः स द्विजः, यः किंचिद्रक्तः
स नृपः क्षत्रियः, शेषं स्पष्टम् । अथोत्तमपवेः संधारणादिभिर्घर्मार्थौ भवत इत्याह—

यद्वेदाध्ययनात्क्रतोरपि कृतेर्दानस्य वा यत्फलं
तत्प्राप्नोति पुमानतो वरतनोर्वज्रस्य संधारणात् ।
चातुर्वर्ण्यपरिग्रहादपि चतुर्वर्णाश्रयश्रेयसा
संयुक्तामुररीकरोतु न कथंकारं स भूतिं पराम् ॥ ३० ॥
अथ शूद्रवर्णोऽपि पविर्द्विजवर्णात्पवेरधिक इत्याह—
शूद्रादप्यधमो द्विजो यदि गुणैर्हीनः पविर्ब्राम्हणा--
दप्युच्चैरयमर्घमर्हति पुनः शूद्रो गुणैर्गौरवात् ।
आधिव्याधिसरीसृपानलरिपुव्याघ्रापमृत्युग्रहा—
स्तं नैवाभिभवन्ति यस्य सदने तिष्ठेत्पवित्रः पविः ॥ ३१ ॥

आतां हिऱ्यांचे भेद सांगतों.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र याप्रमाणें हिऱ्यांत चार भेद आहेत आणि तसेंच पुरुष, स्त्री आणि नपुंसक असेंहि तीन भेद आहेत. ब्राम्हणवर्णी हिरा पांढऱ्या रंगाचा स्फटिकाप्रमाणें असतो. क्षत्रिय वर्णाचा हिरा लालसर, वैश्य वर्णाचा हिरा पिवळा आणि शूद्र वर्णाचा हिरा काळसर असतो. हिऱ्यांच्या रंगांत फरक असतो, तेजांत फरक नाहीं. पुरुषजातीच्या हिऱ्यांत रेखा व ठिपका हे अयव नसतात, तो अष्टकोनी स्वच्छ आणि तेजस्वी असतो. स्त्री जातीचा हिरा षट्कोणी असून त्यांत बिंदु किंवा रेखा हे असतात आणि नपुसक हिऱ्याला कोन नसतात, तो चपटा किंवा त्रिकोणी अगर लांबट असतो. याप्रमाणें हिरे हे पुरुष, स्त्री किंवा नपुसक वर्गांतिल असतात. (२९)

व्याख्या:—स्फटिकाप्रमाणें जो पांढरा असतो तो ब्राम्हण वर्णीं; जो लालवट असतो तो क्षात्रिय. याप्रमाणें उत्तम हिरा अंगावर धारण करण्यानें धर्म व अर्थ दोन्ही साधतात.

म्हणून म्हटलें आहे कीं:—

वेदाध्ययन, यज्ञयाग किंवा दान या सत्कर्मानीं जें फल मिळतें, तेंच फळ पुरुषानें उत्तम हिरा शरीरावर धारण केल्यानें त्याला प्राप्त होतें. कारण हिऱ्याच्या ठिकाणींहि चातुवर्ण्याचा अंतर्भाव आहे. यामुळें चातुर्वर्ण्याच्या धर्माचा आश्रय केल्यानें जें कल्याण होणार त्याच्याशीं संयुक्त झालेल्या उत्कृष्ट वैभवाचा वांटे-करी हिरा धारण करणारा पुरुष कां होणार नाहीं ?

कांहीं प्रसंगीं शूद्र जातीचा हिरा ब्राम्हण जातीच्या हिऱ्यां-पेक्षांहि महत्वाचा असतो. ज्याप्रमाणें गुणहीन ब्राह्मण शूद्रांपेक्षांहि कमी प्रतीचा समजतात, त्याप्रमाणें पांढरा हिरादेखील जर त्यांत अयब असेल आणि शूद्र जातीचा काळसर हिरा जर गुणांनीं युक्त असेल तर त्या काळसर हिऱ्याचीच किंमत अधिक समजावी. हिऱ्याच्या अंगीं गुण असा आहे कीं, ज्याच्या घरांत उत्तम प्रतीचा हिरा असेल, त्याच्या घरांत काळजी, रोग, सर्पविंचू, अग्नि, शत्रू, वाघ, अपमृत्यु, ग्रहबाधा इत्यादि अरिष्टें त्यांचें कांहीं एक वांकडें करूं शकत नाहींत. (३१)

अथ पवेर्दोषानुपदिशति—

बिन्दुः काकपदं यवः किल मलो रेखेति नान्मोदिता
दोषाः पञ्च पवेरथात्र कथितो बिन्दुः समो बिन्दुना ।
कृष्णो रक्त इति क्रमेण स पुनर्द्वेधा मतो वर्तुला—
वर्ताकारभिदा ग्रहीतुरफलः शस्तो न सर्वोऽपि सः ३२
ग्रहीतुर्ग्राहकस्य अफलः धनादिलाभस्याकर्ता । सर्वोऽपि बिन्दुर्न शस्तः । अथ काकपदं लक्षयति —

ज्ञेयं काकपदं तु काकचरणाकारं परीक्षाकृता
वज्रे श्रीमति संस्थितं पुनरिदं धर्तुर्भवेन्मृत्युदम् ।
यवं लक्षयति—
रक्तापीतसिताऽसितच्छविभिदा ज्ञेयश्चतुर्धा यवा-
कारस्तत्र यवः सितः खलु पवे पूज्योऽपरे निन्दिताः ॥ ३३ ॥

अथ मलं लक्षयति—

धाराकोणकमध्यसंस्थिततया त्रेधा मलो रत्नीव-
द्व्याख्यातः स पृनर्ग्रहीतुरनलव्याघ्रादिभीतिप्रदः ।

अथ रेखां लक्षयति—

सव्यासव्यनिवासिनि तदपरा तत्र स्थिता छेदिनी
छिन्ना चोर्ध्वगतिर्गतोर्ध्वमिति ता रेखाश्चतस्रो मताः ॥ ३४ ॥

अथ तासां फलमाह—

सव्या तत्र शुभा पराः पुनरमूर्दौर्भाग्यदा वर्तुले-
ऽप्यन्तर्भेदिनि लग्नकोणिनि पवौ दोषास्त्वार्किंचित्कराः ।

अत्रोक्तानां दोषाणामपवादमाह—वर्तुले इत्यादि । एवंभूते वज्रे आर्किंचित्करा निष्फला इत्यर्थः ।

हिऱ्यांत दोष म्हणजे अयब असतात ते हे:—

ठिपका, काकपद, जव, मळ (धुरकटपणा) आणि रेघ हे पांच अयब हिऱ्यांत असतात. ठिपका म्हणजे बिंदु किंवा छिट्टा. तो काळा किंवा तांबूस असा असतो व वर्तुळाकार किंवा भोंवऱ्याप्रमाणें दिसतो. असा छिट्टा हिऱ्यांत असला तर तो हिरा जवळ बाळगल्यापासून कांहीं उपयोग नसतो. अशा हिऱ्याची कोणी उत्तमांत गणना करीत नाहीं (३२)

छिट्टा असलेला हिरा मालकाला धनाचा लाभ होऊं देत नाहीं व एकंदरींत तो चांगलाहि नाहीं.

काकपद म्हणजे हिऱ्यावर कावळ्याच्या पावलाप्रमाणें खूण असते. इतर दृष्टीनें चांगल्या अशा हिऱ्यावर जरी असें काकपद असलें तरी मालकाला त्यामुळें मृत्यु येईल. जव म्हणून जो अयब आहे तो जवाप्रमाणें दिसतो, व रंगानें तो तांबडा, पिवळा, पांढरा, काळा असा चार प्रकारचा असतो. (३३)

मळ म्हणजे हिऱ्याला जे पैलू असतात त्या पैलूच्या धारे-जवळ, कोपऱ्यांत किंवा मध्येंच अशा तीन ठिकाणांपैकीं कोठेंतरी गढूळपणा दिसतो. गढूळपणा असलेला हिरा जवळ बाळगणारावर अग्निभय, व्याघ्रभय वगैरे अनर्थ कोसळतात. आतां रेघ म्हणून जो अयब आहे, त्याचें स्वरूप असें कीं, ती रेघ उजवीकडे वळलेली किंवा डावीकडे वळलेली असते, अथवा ती तेथेंच दुसऱ्या रेघेला

छेदून जाते किंवा तिलाच शेंडे फुटतात, अगर तिचा वर जाण्याचा झोंक दिसतो, किंवा ती वर झुकलेली असते. याप्रमाणें रेघेचे चार प्रकार आहेत. (३४) यांत उजवीकडे वळलेली रेघ शुभ, बाकीच्या रेघा भाग्यहानि सुचवितात, परंतु हिरा जर वर्तुलाकार, अंत-र्भेदी, लग्नकोणी असा असेल तर ह्या आयबापासून नुकसान नाहीं. (३४॥)

रेघेचा अयब वाईट, परंतु त्याला अपवाद आहेत. वर्तुळाकार वगैरे आकाराचा हिरा असेल तर रेघ हा अयब असला तरी हरकत नाहीं.

अथ पवेर्गुणानुद्दिशति—

अच्छत्वं लघुता तथाऽष्टफलता षट्कोणता तीक्ष्णताऽ—
प्येतान् पंच गुणान् गृणन्ति गुणिनो देवोपभोग्येपवौ ॥ ३५ ॥

उत्तमे पवौ अच्छत्वमादर्शादिवत्, लघुता तुषवत्, अष्टफ—लता अष्टफलकता, तीक्ष्णता अन्यमणिभेदकता, एते पञ्च गुणाः ।

आतां चांगल्या हिऱ्याचें लक्षण सांगतों.

स्वच्छपणा, वजनांत हलकेपणा, स्वाभाविकपणें अष्टकोण किंवा षट्कोण व पैलूंना धार असणें हे पांच गुण खुद्द देवांनीं उप-भोग घेण्याला योग्य अशा उत्तम हिऱ्यामध्यें असतात. (३५)

स्वच्छपणा म्हणजे आरशाच्या कांचेप्रमाणें प्रतिबिंब दिसण्या-सारखा स्वच्छपणा, वजनांत हलका भरणें; आठकोण धार म्हणजे कांचेला कापण्याचें सामर्थ्य असणें असे पांच गुण हिऱ्यात असतात.

अथोपसंहारव्याजेन खानिं निरूपयति—

जातिः प्राक्तु निरूपिता जानिरपि प्रोक्ता खनिस्त्वष्टधा
द्वे द्वे तत्र युगे युगे प्रभवतस्तत्रादिमे कोशलः ॥
कालिङ्गस्तदनन्तरे निगादितो वङ्गस्तथा मालवः
सौराष्ट्रो मणिपुण्ड्रकस्त्वथ कलौ सोपारवज्राकरौ ॥ ३३ ॥

आदिमे कृतयुगे, कोशलः कोशलदेशः कालिङ्गदेशश्च; त्रेता-युगे वङ्गदेशः मालवश्च द्वापरे सौराष्ट्रदेशः मणिपुण्ड्रकपर्वतश्च; कलौ तु सोपारदेशः वज्राकरो वैरागरश्च ' वैरागड ' इति भाषा ।

अथ मौल्यज्ञानार्थं मानपरिभाषामाह--

चत्वारः सितसर्षपाः पनसिका, ते द्वे पुनस्तण्डुल-
स्ताम्यामेव यवो, यवः पुनरयं पिण्डेऽस्ति किंचित्पृथुः ।

पिण्डे। गात्रमिति द्विधा पविवपुः संज्ञाऽस्य संज्ञामिमां
ज्ञात्वा मानमिदं च तोलनिकया संतोल्य मौल्यं वदेत् ॥ ३७ ॥
तन्मौल्यं विचार्य वाच्यामित्याह—
मौल्यं न प्रतिदेशमास्ति सदृशं येनेदामित्थं मया
वाच्यं तच्च तथापि गद्यत इह त्रैराशिकक्रान्तये ॥ ३८ ॥

हिऱ्याच्या जाती सांगितल्याच आहेत व उत्पत्तीचे प्रकारहि वर्णन केले आहेत. आतां हिऱ्यांच्या आठ खाणी आहेत त्या कोणत्या तें शेवटीं सांगतों. प्रत्येक युगांत त्यांतील दोन दोन खाणी प्रसिद्ध असतात. त्या आठ खाणी म्हणजे कोसल, कलिग ह्या दोन; त्यांच्यानंतर वंग आणि मालव; नंतर सौराष्ट्र व मणिपुड्रक; आणि शेवटीं कलियुगांत सोपार व वज्राकर. अशा आठ खाणी आहेत.

कृतयुगांत कोसल म्ह. अयोध्येंतील व कलिंग देशांतील खाणी प्रसिद्ध होत्या. त्यानंतर त्रेतायुगांत बंगाल्यांत आणि माळव्यांत उत्तम खाणी सांपडल्या. द्वापरयुगांत काठेवाड, आणि मणिपुंड्रक पर्वत येथील खाणी प्रसिद्धीस आल्या आणि कलियुगांत सोपार आणि वैरागड येथील खाणी सुप्रसिद्ध आहेत.

आतां वजनाचें कोष्टक देतोः—

चार काळ्या मोहऱ्यांच्या वजनाइतकी एक पनसिका असते. दोन पनसिका म्हणजे एक तंदुळ, दोन तंदुळ म्हणजे एक जव. आकारमानानें जव म्हणजे पिण्ड. पिण्ड जरा मोठा असला म्हणजे त्याला गात्र म्हणतात. याप्रमाणें पिण्ड दोन प्रकारचे आहेत. या संज्ञा लक्षांत ठेऊन व हिऱ्याचा आकार पाहून आणि वजन करून त्या अनुरोधानें किंमत करावी. (३७)

हिऱ्याची किंमत सगळीकडे एकसारखी नसते. देशादेशांत निरनिराळी असते, म्हणून जेथील किंमत तेथें सांगावी. तथापि तीन प्रकारच्या धोरणाला अनुलक्षून किंमत करण्याची पद्धति ह्या ठिकाणीं देतों. (३८)

यथा—

पिण्डस्तु त्रिविधो लघुः समगुरू तत्रोत्तमं लाघवे
साम्ये मध्यममल्पमेव गदितं मौल्यं गुरुत्वे बुधैः ।

त्रेधा लाघवतस्त्रिधा गुरुतया षोढा च सामान्यतो ।
मूल्यं द्वादशधेदृशं खलु मतं तत्तारतम्यं क्रमात् ॥ ३९ ॥
पिण्डस्तण्डुलसांमितो यवपृथुः संभाव्य चित्ते पुन—
र्वज्रं तेन समं विचार्य चतुरो मौल्यं ततो निर्दिशेत् ।
तच्चेत्तत्क्रमतान्निवृत्तिकगुणैर्युक्तश्चतुर्भिः पवि-
र्निष्कं तण्डुलसंमितो यवपृथुः प्राप्नोति मौल्यं यदि ॥४०॥
पिण्डो यस्य यवद्वयेन सदृशो माने पुनस्तण्डुलो
मौल्यं तस्य पवेश्चतुर्गुणमुदाहर्तव्यमेवं पुनः ।
पिण्डश्चेत्त्रिचतुःशरर्तुयवभः स्यादष्टदिक्षोडश-
द्विर्द्विर्वार्धितमस्य तण्डुलमितेर्वज्रस्य मौल्यं तथा ॥ ४१ ॥
वृद्धत्वे तु यवोपमः प्रकृतितस्तत्पादतो मानवा-
नष्टाविंशतिवर्धितं प्रथमतः प्राप्नोति मौल्यं माणिः ।
पिण्डे सप्तयवोपमः परिमितौ स्यात्तण्डुलैकक्रमो
वज्रो वारितरो लभेत परमं मौल्यं सहस्रद्वयम् ॥ ४२ ॥
स्याच्चेत्साङ्घ्रियवोपमः पविरथो माने गुरुस्तण्डुलः
क्षीयेतास्य मणेरथ द्विगुणितं मौल्यं क्षयेऽयं क्रमः ।
इत्थं युक्तिबलाद्विचार्य चतुरो मौल्यं मणेरादिशे-
दर्घस्यासति वज्रवर्ष्मणि यथा दोषे क्षयं कल्पयेत् ॥ ४३ ॥
यावत्स्यादृगुणिनस्ततस्त्वंगुणिनो वृद्धेश्चतस्रः कला-
श्छेत्तव्याः कुशलेन देशसमयद्रव्यात्मविज्ञानिना ॥४४॥

पिण्ड (Mass) तीन प्रकारचा असतो; हलका, सम आणि जड. त्यांत आकाराच्या मानानें पाहतां जो हिरा वजनांत हलका असतो तो उत्तम, आकारमानाच्या बेताचें वजन असलेला सम म्ह० मध्यम, आणि जास्त वजनाचा कनिष्ठ; वजनांत हलके हिरे उत्तम. त्यांचे किंमतींत तीन प्रकार. कनिष्ठ हिऱ्यांचे तीन, आणि मध्यम हिऱ्यांचे सहा, मिळोन हिऱ्याच्या किंमतीचे बारा प्रकार होतात. ते तारतम्यानें ओळखावे. (३९)

जो हिरा आकारानें जवाइतका आणि वजनांत तंदुळभार, तो हिरा सम समजावा. त्याच्या मानानें बाकीच्या हिऱ्यांची किंमत ठरवावी. आकारानें मध्यम व वजनांत त्याच्या बेताचे आकारानें मोठे व वजनानें हलके, आकारानें लहान व वजनांत जास्त आणि आकारानें मोठे व वजनांतहि जास्त अशा चार गुणांनीं किंमत होत

असते. कांहीं एक प्रमाण पाहिजे, म्हणून आकारानें जवायेवढा व वजनानें तंदुळभार हिऱ्याची किंमत जर एक निष्क मानली (४०)

तर ज्याचा आकार दोन जवांइतका परंतु वजन तितकेंच म्ह० एक तंदुळ असलें तर त्याची किंमत चौपट सांगावी. याप्रमाणें आकार तीन जवांयेवढा, किंवा चार, पांच, सहा, आठ, दहा किंवा सोळा जवायेवढा जरी असला तरी वजनांत एकच तंदुळभार असेल तर जवाच्या संख्येच्या दुपटीनें किंमत होते. (४१)

आकारानें जवायेवढा, परंतु वजनांत पाव जव, अशा हिऱ्याची किंमत एकदम अठ्ठावीस पट होते. आकारानें सात जवांइतका आणि वजनांत तंदूळ किंवा त्यापेक्षां क्रमानें कमी असून हिरा पाण्यावर तरंगणारा जर असेल तर त्याची किंमत दोन हजार पट होईल. (४२)

हिरा आकारानें जवाइतका आणि वजनांत जड म्हणजे एक तंदुळभार किंवा त्यापेक्षां जास्त, तर त्याची किंमत दुप्पट धरली असली तरी क्रमानें कमी कमी होत जाते. असा क्रम आहे. या सर्व गोष्टी चातुर्य आणि अनुभव यांच्या अनुरोधानें ध्यानांत घेऊन चतुर पुरुषानें हिऱ्याची किंमत करावी. परंतु ही किंमत म्हणजे निर्मळ हिऱ्याची झाली. पण जर त्यांत अयब असेल तर किंमत कमीच होणार. (४३)

अथ मौल्यप्रयोक्तुर्गुणानाह—

कर्मज्ञो लघुपाणिरर्थविमुखः शास्त्रप्रवीणो गुणी
निःसंदिग्धमतिर्विदेशाविधिविन्मौल्यप्रयोक्ता भवेत्।
अज्ञानादविचार्य मौल्यमधमः कुर्यान्मणेः कुत्सितं
कुष्ठी सोऽत्र भवेदमुत्र क्ष पुनर्गच्छेन्महारौरवम् ॥ ४५ ॥

कर्मज्ञ इत्यादि। लघुपाणिर्येन गृहीत्वा दत्तं गुणाय भवति सः, अर्थविमुखः मध्येऽकापट्यं कृत्वा स्थितो यस्तादृशः, गुणी ऊहापोहविचारचतुरः, निःसंदिग्धमतिः अनेकरत्नग्रहणेन जात-मतिः, विदेशाविधिवित् देशान्तरस्थभाषामौल्यादिज्ञः। एवं प्रयोक्ता रत्नमौल्यस्य भवेत्। अथैतादृग्चातुर्याभावे प्रयोक्तुर्दोष—माह अज्ञानादिति। अमुत्र परलोके, महारौरवं नरकम्।

हिऱ्याची परीक्षा करणारा पारखी कसा असावा.

पारखी हा कुशळ, यशस्वी हाताचा, निरपेक्ष, शास्त्रपारंगत, गुणवान्, किंमतीविषयीं आणि रत्नाच्या गुणाविषयीं ज्याला कधीं संशय पडत नाहीं, निरनिराळ्या देशांतील किंमत त्यांच्या पद्धतीनें योग्य प्रकारानें जाणणारा असा असावा. परंतु जो अज्ञानानें किंवा अविचारानें रत्नाची मूर्खासारखी भलतीच किंमत सांगेल तो अधम होय. त्याला या जन्मांत कोड फुटेल व मृत्युनंतर तो महारौरव-नरकाला जाईल. (४५)

व्याख्या:—मुळामध्यें " लघुपाणि " असा शब्द आहे. त्याचा अर्थ हलक्या हाताचा, ह्मणजे ज्यानें जिन्नस आपण घेऊन दुसऱ्यास दिला असतां तो लाभदायक होतो. निरपेक्ष म्ह० ग्राहकाशीं कपट न करणारा; गुणवान् म्ह० चिकित्सेनें ऊहापोह करणारा; ज्याला संशय नाहीं, म्हणजे पुष्कळ वेळां देवघेव केल्यानें ज्याला त्यांतली चांगली माहिती झाली आहे असा. इतर देशांतील पद्धत म्हणजे निरनिराळ्या देशांची भाषा व तेथील किंमतीचें मान जाणणारा. याप्रमाणें रत्नपारखी असावा. याप्रमाणें करामत अंगांत नसतां जो या भानगडींत पडतो तो या लोकीं व परलोकीं दुःखी होतो.

अथ मुद्रादौ पविविन्यासप्रकारमाह—

यत्स्यादङ्गममुष्य निम्नमुदितं सद्भिः शिरस्तत्पवे-
र्विस्तीर्णं तु तलं ततः स शिरसा योज्योऽङ्गुलीयादिषु ।

व्याख्या—यदमुष्य हीरकस्य निम्नमङ्गं गम्भीरं सद्भिस्त-च्छिर उदितं, विस्तीर्णं तु तलमुदितम्। अङ्गुलीयादिषु मुद्रिकादिषु शिरसैव योज्यो न तलेन ।

परीक्षाप्रकारमाह—

वामं वामविलोचनः करतलं विस्तार्य तस्मिन् पार्वि
तर्जन्या परिचालयेदवहितः प्रायस्तलेन स्थितः ॥ ४६ ॥

अवहितः पण्डितः, वामं करतलं विस्तार्य, तस्मिन् पार्वि तर्जन्या परिचालयेत् । कीदृशः ? वामविलोचनः वक्रदृष्टिः सन्नेव । प्रायस्तलेन नीचत्वेनावस्थितः ।

आंगठीवर रत्न कसें बसवावें:—

ज्या रत्नाचें जें अंग म्हणजे भाग निमुळता असेल तें त्याचें शिर आणि जो भाग पसरट असेल तो त्याचा तळ असतो. म्हणून आंगठीवर रत्न बसविणें तें शिरावर राहील असें बसवावें.

व्याख्या:—ज्या हिऱ्याचा जो भाग भबुक व निमुळता असतो त्याला शिर म्हणतात, आणि जो विस्तीर्ण असतो तो त्याचा तळ होय. आंगठीवर वगैरे खडा बसवावयाचा असेल तर त्याचें शिर वरच्या बाजूस होईल असा बसवावा.

परीक्षा कशी करावी—

माहितगारानें आपल्या डाव्या हाताच्या तळावर हिरा ठेऊन डाव्या डोळ्यानें त्याच्याकडे सूक्ष्म दृष्टि ठेऊन हिऱ्याचें शिर वर करून तो बोटानें फिरवून पाहावें. (४६)

व्याख्या:—माहितगार म्हणजे परीक्षक, त्यानें आपला डावा हात पसरून त्याच्यावर हिरा ठेऊन तो बोटानें फिरवावा आणि काय करावें, तर हिरा बुडाचे बाजूनें हातावर ठेऊन आपला डोळा वांकडा करून त्याच्याकडे पाहावें.

किं विचारणीयं तदाह—

जातिर्दोषगुणौ खनिर्गिरिकथे रङ्गापरङ्गौ छावि-
र्मौल्यं चेति दशप्रकारमशनेर्जानाति यो लक्षणम् ।
बाह्याभ्यन्तरतः प्रविष्ट इव स स्याच्छास्त्रतो मण्डली
तेषां संसदमाह चार्यविबुधः श्रीमण्डलीं मण्डली ॥ ४७ ॥

व्याख्या—कथा इतिहासः, रङ्गः शुक्लादिः अपरङ्गो नीलादिः; छविः कान्तिः, मौल्यं देशदेशीयं, इति दशप्रकारं पवेर्यः लक्षणं जानाति स मण्डलीं प्राविशेत् । क इव ? पवेर्बाह्याभ्यन्तरतः प्राविष्ट इव । कस्माच्छास्त्रतः । मण्डलीसंज्ञाया अर्थमाह—तेषामिति । तेषां मण्डलिकानां रत्नविदां सभां मण्डलीमाहुः ॥

परीक्षा कोणत्या गोष्टीची करावी—

हिऱ्याची जात, त्यांतले दोष व गुण, तो कोठें सांपडतो, पर्वतावर किंवा खाणींत ह्याची माहिती; त्याचा मुख्य रंग, उपरंग, त्याची कान्ति, किंमत याप्रमाणें दहा गोष्टी जो जाणतो तो पारखी- असा मनुष्य शास्त्राप्रमाणें जणो त्या हिऱ्याला आंतबाहेर व्यापून

राहतो. असे अनेक पारखी एके ठिकाणीं जमले म्हणजे त्यांना पारखीमंडळ म्हणावें. त्याला रत्नाच्या श्रींचें मंडळ म्हणतात. (४७)

व्याख्या:—माहिती म्हणजे हिरा कोणाकोणापाशीं होता. मुख्य रंग म्हणजे शुभ्र, तांबडा वगैरे; उपरंग म्हणजे निळसरपणा; कांति म्हणजे तेज, किंमत म्हणजे निरनिराळ्या देशांप्रमाणें किंमत, याप्रमाणें हिऱ्याची परीक्षा दहा प्रकारांनीं करावी. ह्यांत जो निष्णात असेल त्यानेंच मंडळींत यावें. असा मनुष्य हिऱ्यांच्या जणो अंतरंगांतच शिरल्याप्रमाणें मंडळींत प्रवेश करतो आणि तो प्रवेश शास्त्राप्रमाणें असतो. मंडळी म्हणजे नुसता जमाव नव्हे, तर रत्नपारखी लोकांचा समुदाय असा अर्थ आहे.

अथ मण्डलीप्रवेशानर्हान् वक्ति—

हीनाङ्गः प्रविशेन्न तां न पतितो नो वाऽन्त्यजो नाबला
भाण्डाद्यैरिह मौल्यमल्पमधिकं प्रोक्तं न दोषाय तत् ।
व्युत्क्रम्योत्तममध्यमाविपर्यासेन यद्यत्तथा
स्नेहाल्लुब्धतया तु संसदि पुनः कुष्ठी भवेन्मण्डली ॥ ४८ ॥

स्पष्टम् । अथैकेन मौल्याविचारणा न कार्येत्याह—

नैको मौल्यविचारणां विरचयेन्नैकः परीक्षेत वा
भ्रान्तेः पूरुषधर्मतस्तु कृतके मुह्यन्ति सुज्ञा मणौ ।
शाणक्षाराविलेखनेन विनुदेत्संदेहमन्ये पुन-
र्लिख्यन्ते कुलिशेन हन्त कुलिशं केनापि नो लिख्यते ॥ ४९ ॥

व्याख्या – भ्रमप्रमादादीनां पुरुषधर्माणा सत्त्वात्संदेहे शाणक्षारविलेखनेन पार्वं विलिखेत् अन्ये तु मणयः कुलिशेन लिख्यन्ते । इति हीरकपरीक्षा ॥

रत्नपारख्यांच्या मंडळींत बसण्याला नालायक कोण—

ज्याच्या शरीराला एखादा अवयव नसेल किंवा जो भ्रष्ट असेल त्यानें मंडळींत जाऊं नये, घाणेरडे धंदे करणारांनीं जाऊं नये, तसेंच बायका आणि बोलभांड लोकांनींहि जाऊं नये. अशा लोकांनीं हिऱ्याची किंमत कमी सांगितली काय आणि जास्त सांगितली काय, त्यांत अर्थ नाहीं व दोषाहि नाहीं. परंतु माहितगार मनुष्यानें उत्तम, मध्यम, कनिष्ठ जातीच्या हिऱ्यासंबंधानें उलटापालट करून भिडेमुळें किंवा लोभामुळें जर भलतीच किंमत सांगितली तर अशा रत्नपारख्याला कोड फुटतें. (४८)

रत्नपारखी झाला तरी एकट्यानें किंमत करूं नये.

एकट्यानें बसून किंमतीची वाटाघाट करूं नये किंवा परीक्षा करूं नये. कारण चुकणें हा पुरुषधर्मच आहे; आणि एकाद्या बनावट हिऱ्याची परीक्षा करतांना मोठमोठे परीक्षकहि फसतात. म्हणून परीक्षकांनीं सहाण, क्षारप्रयोग, विलेखन इत्यादि उपायांनीं आपला संशय दूर करून घ्यावा. खुबी हीच आहे कीं, हिऱ्यानें दुसऱ्या पदार्थावर ओरखडा ओढतां येतो. परंतु हिऱ्यावर दुसऱ्या कशाचीच मात्रा चालत नाहीं. (४९)

व्याख्या:—मनुष्याला भ्रांति पडते व त्याच्याकडून चूकहि होते, म्हणून खडा सहाणेवर घासणें, त्याला क्षार लावणें किंवा दुसऱ्या कशानें तरी त्याच्यावर ओरखडा ओढून पाहणें हे परीक्षेचे प्रकार: करून पहावे. हिऱ्याशिवाय दुसऱ्या वाटेल त्या खड्यावर हिऱ्यानें सहज ओरखडा उठतो. याप्रमाणें हिऱ्याची परीक्षा लिहिली.

येऽष्टौ मौक्तिकभूमयः करिकिरित्वक्सारमत्स्याम्बुमु-
क्कम्बूरोगतिशुक्तयोऽत्र चरमोत्पन्नं पुनर्विश्रुतम् ।

करिमौक्तिकलक्षमाह·—

यद्दन्तावलकुम्भसंभवमदः पीतारुणं मन्दरुक्
धात्रीदभ्रतयाऽत्र रत्नमधमं काम्बोजकुम्भीन्द्रजम् ॥५०॥

अथ किरिर्वराहः, तज्जमौक्तिकलक्षमाह—

एकाकी शिशुरेव निःस्पृहतया यः काननं गाहते
तस्यानादिवराहवंशजनुषः कोलस्य मूर्ध्नी स्थितम् ।
कङ्कोलाकृतिमिन्दुकुन्दधवलं दैवाद्वाप्नोति चे—
न्मुक्तां यः समुपास्यते स निधिभिर्मर्त्यो धनाधीशवत् ॥

अथ त्वक्सारो वंशः, तज्जमौक्तिकलक्षमाह—

मुक्ताः सन्ति कुलाचलेषु करकाकान्तिद्रुहो वंशजाः
कर्कन्धूफलबन्धवो निदधते कण्ठेषु सिद्धाङ्गनाः ।

मोतीं उत्पन्न होण्याचीं ठिकाणें आठ सांगितलीं आहेत. हत्ती, वराह, कळक, मत्स्य, मेघ, शंख, नाग आणि शिंपला हीं तीं ठिकाणें होत. त्यांपैकीं शिंपल्यांतील मोतीं मात्र हल्लीं प्रसिद्ध आहे.

हत्तीमध्यें सांपडणारें मोतीं–

जें मोतीं हत्तीच्या गंडस्थळांत सांपडतें तें पिवळें–तांबडें अशा मिश्ररंगाचें व जरा मंद तेजाचें असतें. त्यांत कांबोज देशांतील प्रचंड हत्तीमध्यें जें सांपडतें त्यांतील अगदीं कनिष्ठ प्रतीचें मोतीं आंवळ्यांहून मात्र किंचित लहान असतें. (५०)

वराहाच्या डोळ्यांतील मोतीं—

अनादि जो भगवंताचा वराह अवतार त्याच्या वंशजांपैकीं जो एखादा लहान बालक अगदीं दाट जंगलांत बेमुरवतपणें हिंडत असतो अशा वराहाच्या मस्तकांत तें मोतीं आढळतें. त्याचा आकार कंकोळाएवढा, परंतु रंग चंद्राप्रमाणें किंवा कुंद पुष्पाप्रमाणें पांढरा स्वच्छ असतो. असलें मोतीं जर दैववशात् कोणाला लाभलें तर कुबेराच्या जवळ जसे नवनिधि असतात तसेच ते निधि अशा मनुष्याभोंवतींहि नाचत राहतात. (५१)

कळक किंवा वेळू यांच्या पोटांतिल मोतीं—

मोठमोठ्या पर्वतांवर जे कळक असतात त्यांच्या पोटांत मोतीं सांपडतें. तें आकाशांतून पडणाऱ्या गारांप्रमाणें शुभ्र व बोरीच्या फळाएवढें मोठें असतें. हें मोतीं सिद्ध गन्धर्व यांच्या सुंदर स्त्रिया कंठांत धारण करतात.

मत्स्यजमौक्तिकलक्ष्माह—

प्रोष्ठीगर्भभवस्तु मौक्तिकमाणिर्गुञ्जासमः पाटली-
पुष्पाभः स न लभ्यते भुवि जनैरस्मिन् कलौ पापिनि ॥

अथाम्बुमुञ्चोघस्तज्जमौक्तिकलक्ष्माह—

यन्मेघोदरसंभवं तदवनीमप्राप्तमेवामरै-
व्योंमस्थैरपनीयते विनिपतद्धर्षासु मुक्ताफलम् ।
तिग्मांशोरपि दुर्निरीक्ष्यमकृशं सौदामिनीसंनिभं
देवानामपि दुर्लभं न मनुजाः स्युस्तस्य पात्रं पुनः ॥ ५३ ॥

अथ कम्बुः क्षुद्रशंखः, तज्जमौक्तिकलक्ष्माह—

शंखस्य श्रुतिहारिणो जलनिधौ ये वंशजः कम्बव-
स्तेष्वन्तः किल मौक्तिकं भवति यत्तच्छुक्तारानिभम् ।
कापोताण्डसमं सुवृत्तमकृशश्रीकं सुरूपं लघु
स्निग्धं स्पर्शपवित्रमत्र न पुनर्मर्त्यैस्तदासाद्यते ॥ ५४ ॥

अथ उरोगतिः सर्पः, तज्जमौक्तिकलक्ष्माह-

शेषस्यान्वयिनां फणासु फणिनां यन्मौक्तिकं जायते
वृत्तं निर्मलमुज्ज्वलं शशिरुचि श्यामच्छवि श्रीकरम्।
यामच्छवि श्यामाभासं, तत्फलमाह—
कंकोलाकृति कोटिकोसुकृतैः प्राप्नोति चेन्मानवः
स स्याद्वाजिगजाधिपो नृपसमो जातोऽपि नीचे कुले॥
आस्ते सद्मनि चेत्स पन्नगमणिस्तं यातुधानामरा
हर्तुं रन्ध्रमवेक्षते तदीतरः कुर्यान्महाशान्तिकम्।

माशाच्या पोटांतील मोतीं.

मोठमोठ्या माशांच्या पोटांत जें मोतीं सांपडतें तें गुंजेप्रमाणें किंवा पाटलीच्या फुलाप्रमाणें लाल रंगाचें असतें. परंतु ह्या पातकी कलियुगांत तें कोणालाहि मिळत नाहीं. (५२)

आकाशांतील ढगांतसुद्धां मोतीं उत्पन्न होतें.

परंतु तें मोतीं ढगांत उत्पन्न होऊन पावसाळ्यांत पर्जन्याच्या धारांबरोबर भूमीवर पडण्यापूर्वीच आकाशांतील देव तें हरण करतात. हें मोतीं सूर्याच्यानेंदेखील पाहवत नाहीं. तें आकारानें मोठें आणि तेजानें विद्युल्लतेप्रमाणें असतें. असलें मोतीं देवांनादेखील सांपड-ण्याची मारामार; मग मनुष्याला तें कोठून मिळणार ? (५३)

लहान शंखांतील मोतीं, त्याचें वर्णन.

कानाला ज्याचा ध्वनि मधुर लागतो अशा मोठ्या शंखांचे जे लहान वंशज समुद्रांत असतात त्यांच्या पोटांतसुद्धा मोतीं सांपडतें. तें शुक्राच्या चांदणीसारखें तेजःपुंज असतें, आणि आकारानें तर कबूतराच्या अंड्याऐवढें मोठें, गोलबंद, देदीप्यमान, मनोहर असून फार जड नसतें. तें स्निग्ध, व स्पर्शाला अत्यंत पवित्र असें असतें, परंतु त्यांत गोम इतकीच कीं, हें मोतीं माणसांना सांपडत नाहीं. (५४)

उरानें सरपटणारा प्राणी म्ह० सर्प त्यांतील मोत्याचें वर्णन.

शेषाच्या वंशांत उत्पन्न झालेल्या नागांच्या फणांमध्यें जें मोतीं असतें, तें गोलबंद, निर्मळ, चंद्राप्रमाणें तेजःपुंज, किंचित् निळसर, परंतु मोठें मनोरम असतें. त्याचा आकार कंकोळाएवढाच असतो. पण हें मोतीं कोट्यानुकोट जन्म मनुष्यानें पुण्य करावें तरच

मिळेल; आणि हें ज्याला मिळेल तो जरी नीच कुळांत जन्मलेला असला तरी त्याच्या दारीं गजान्त लक्ष्मी झुलत राहील. (५५)

नागाच्या फणेंतील हें मोतीं ज्या घरांत असेल तेथून तें लांबविण्यास सांपडावें म्हणून देव, पिशाच्च, राक्षस हे कांहीं तरी उणेपणा शोधीतच असतात; म्हणून नेहमीं सर्वारिष्टापासून शांति करीत राहिलें पाहिजे.

अथ शुक्तिजमौक्तिकलक्ष्माह—

वज्राघातविघट्टिताद्बलमुखात्भ्रष्टाः पुनर्ये द्विजाः
क्षारोदन्वति यत्र यत्र पतितास्ते ते भवन्नाकराः ॥ ५६ ॥
आदायः पृथुबर्बरो जलनिधौ स्यादारवाटस्ततो
नाम्ना सिंहलकोर्मिजौ तदुपरि स्यात्पारसीकोऽपरः ।
अत्रोदन्वति शुक्तिजीवजठरक्रोडैककोणस्थिताः
स्वातीशम्बरबिन्दवः परिणमन्त्याक्लिन्नमुक्ततातया ॥ ५७ ॥
सुस्निग्धं मधुवर्णमुत्तमरुचि स्यात्सिंहले मौक्तिकं
स्निग्धं पीतरुगिन्दुबिम्बरुचिरं स्यादारवा (ला)टोद्भवम् ।
श्वेतं स्निग्धमतीव बन्धुमतरं स्यात्पारसीकोद्भवं
रूक्षं किंचन वर्णसंकरयुतं स्याद्बार्बरं मौक्तिकम् ॥ ५८ ॥
शोणं तूर्मिजसंभवं विदुरतिस्निग्धं तथाऽऽदायजं
चातुर्वर्ण्ययुतं सुलक्षणमतिश्लक्ष्णं कविश्रीधरम् ।
कविः शुक्रः ॥

आतां शिंपल्यांतील मोत्याचें वर्णन देतों—

पूर्वी वल राक्षसाला इंद्रानें वज्रप्रहारानें मारिलें तेव्हां त्या वज्रप्रहारानें त्या राक्षसाचे दांत तुटून समुद्रांत पडले. तेथें मोत्यांचे शिंपले सांपडण्याचीं ठिकाणें उत्पन्न झालीं. (५६)

समुद्रांतील तीं ठिकाणें म्हणजे आदाय (म्हणजे) जेड्डा, बर्बर अथवा अरबस्तानचा किनारा, आरवाट (कराची), नंतर सिंहलद्वीप व जवळची सामुद्रधुनी, आणि त्यानंतर इराणचें आखात अशीं तीं ठिकाणें होत. या ठिकाणच्या समुद्रांत शिंपल्याच्या पोटांत जे किडे असतात त्यांच्या उदरांतील बाजूच्या एका कोंपऱ्यांत, स्वाती नक्षत्राच्या पावसाचे जे थेंब पडतात तेच पावसाचे थेंब स्वच्छ व निर्मळ अशा मोत्याचा आकार धारण करतात. (५७)

सिंहलद्वीपांत जें मोतीं होतें तें अतिशय घोटीव, मधासारख्या रंगाचें व फारच पाणिदार असतें. आरवाट्यांत जें उत्पन्न होतें तेंहि घोटीव, पिवळसर परंतु चंद्राप्रमाणें मनोहर असतें. परंतु इराणच्या आखातांतील मोतीं पांढरें शुभ्र आणि फारच घोटीव व मनाला अतिशय मोहून टाकणारें असतें. परंतु अरबस्तानच्या किनाऱ्या-जवळील मोतीं रुक्ष व मिश्र वर्णाचें असतें. (५८)

आतां आदायनजीकच्या[1] समुद्रांतील मोतीं तांबूस आणि अत्यंत पाणीदार असतें. त्यांत शुभ्र, तांबूस, पिवळसर आणि काळसर अशा चारीहि जाती असतात. हें मोतीं एकंदरींत सुलक्षण, मृदु आणि शुक्राप्रमाणें कांतिमान् असतें. 'शुक्र' याबद्दल मुळांत "कवि श्रीधर" असें पद आहे.

षट्स्वेतेष्वपि रुक्मिणीव जगति ख्यातिं गता रुक्मिणी
नाम्ना शुक्तिरनीदृगुत्तमगुणा सिन्धौ समुज्जृम्भते ॥५९॥
तस्या गर्भभवं तु कुंकुमनिभं सर्वासु जातिष्वपि ।
श्रेष्ठं भूरिगुणं वदन्ति कृतिनः श्रेयस्करं तद्भवेत् ।
स्वच्छं लघ्वादि लघूदकद्युतियुतं मुक्ताफलं किंचन ।
स्थूलं स्निग्धमतीव निर्मलमिलाभूमौ प्रकाशं सदा ॥६०॥
आम्नायोदितमस्य मौल्यमवनौ तालद्वयीजघ्नको
राशिर्हेमकृतः कृतस्तदधमं वा मध्यमं जायते ।
दोषान् पंच लघून्, गुरुंश्च चतुरः, षट् चैव दोषेतरान्
छायास्त्रित्वामिता गृणन्ति सुधियो मुक्तामणौ ते पुनः ॥

या सहाहि ठिकाणच्या मोत्यांमध्यें श्रीकृष्णाची जशी रुक्मिणी, त्याप्रमाणें एका विशेष ठिकाणीं रुक्मिणी नांवाची जगद्विख्यात शिंपली सांपडते. तिचे गुण इतके अप्रतिम आहेत कीं, तिच्या-सारखी तीच; तिला दुसरी तोडच नाहीं. (५९) अशा ह्या रुक्मिणी शिंपेच्या उदरांत जें मोतीं सांपडतें तें सर्व मोत्यांत अगदीं पहिल्या प्रतीचें, सर्वगुणसंपन्न आणि कल्याणकारक असतें. (त्यांतहि) स्वच्छ, अतिशय घोटीव अथवा तुकतुकीत, निर्मळ आणि जमीनीवर नेहमीं प्रकाश करणारें असें एखादें मोतीं असतें. (६०) अशा मोत्याची किंमत शास्त्राप्रमाणें करावयाची म्हणजे सोन्याची रास

दोन ताडांइतकी उंच केली तरी ती अगदीं कनिष्ठ किंवा फार तर मध्यम मानाची किंमत हाईल, इतकें अमोल हें मोतीं असतें.

मोत्यांत पांच प्रकारचे लहान दोष आणि चार मोठे दोष, इतर सटरफटर गोष्टी सहा व तीन प्रकारच्या छटा, अशा तऱ्हेनें परीक्षापद्धति मोत्यासंबंधानें शास्त्रज्ञांनीं लिहिली आहे. (६१॥)

दीर्घं पार्श्वकृशं त्रिवृत्तमपि च त्र्यस्रं ततः कापिलं
पंचैते खलु मौक्तिकेषु गादिता दोषास्तु साधारणाः ।
नाम्नैवोदितलक्षणाः पुनरमी विच्छिन्निरुद्योगिता-
दौर्भाग्यप्रभुताविनाशलघुताकौलीनताकारिणः ॥ ६२ ॥
शुक्तिस्पर्शनमत्स्यनेत्रजठराकारातिरक्तांकताः
श्वित्रक्रोश (? दरिद्रतामृतिकरा दोषा बृहन्तस्त्वमी ।
तेष्वन्त्यौ विशदौ स्वशुक्तिसदृशस्त्वाद्यो द्वितीयस्ततो
मत्स्याक्षच्छविलांछनः पुनरमी शस्ता न मुक्ताफले ॥ ६३ ॥
दीप्तिगौरवबृत्ततविमलतासुस्निग्धताकांतताः
स्युः षट् शुक्तिमणौ गुणा इति गुणैर्युक्तं पुनर्मौक्तिकम् ।
यः कण्ठे बिभृयात्समस्तजनुषामंहः समाप्तिं नये-
च्छायास्तु त्रिविधा स्मृता मधुसिताश्रीखंडखंडश्रियः ॥
वृत्तस्थूलगुरुरुकच्छुचि शुभं नीवीं तु तत्प्राप्नुया-
त्सत्यं त्वत्र तुलामुशन्ति कवयो जातिस्पृशं मौक्तिकम् ।
गुंजा द्वित्रियवाद्भवोदिह पुनर्माषश्चतुर्भिश्च तैः
शाणः शाणयुगात्कलञ्ज उदगान्निष्कस्तदेकादशात् ॥ ६५ ॥
इति मुक्तोत्पत्तिलक्षणानि ॥

लांबट बाजूला बारीक, तीन फुगवट्या, तीन कोन, काळसर रंगाची झांक असे पांच प्रकारचे साधारण दोष मोत्यांत असूं शकतात. कांहीं दोष असे आहेत कीं, नांवावरूनच त्यांचें लक्षण समजतें व अडथळा, आळस, दुर्भाग्य, अधिपत्यनाश, हलकेपणा, नालस्ती इत्यादि आपत्ती त्यांच्यामुळें उद्भवतात. (६२)

तसेंच शिंपल्याला चिकटून बसणें, मत्स्याच्या डोळ्यांप्रमाणें किंवा पोटाप्रमाणें त्याच्यावर डाग किंवा फारच तांबडी लाल छटा, हे अयब मोठ्यांपैकीं आहेत; आणि ते असले तर मालकाला पांढरें कोड, दारिद्र्य व मृत्युहि येतो. या दोषांपैकीं शेवटचे दोन दोष कोणते तें श्लोकावरून सहज कळतें. परंतु पहिला

दोष म्हणजे शिंपल्याप्रमाणें (लांबट) आकार व दुसरा दोष म्हणजे मत्स्याच्या डोळ्याप्रमाणें (मोत्यावर) आकृति. एकंदरींत हे असले दोष मोत्यांत चांगले नाहींत. (६३)

मोतीं तेजस्वी, जड, गोलबंद, निर्मळ, घोटीव, कांतीनें मन मोहून टाकणारें अशा सहा गुणांनीं युक्त असावें. या सहा गुणांनीं युक्त असें मोतीं जो कंठांत धारण करील तो सर्वांचें पातक दूर करील. या प्रकारचें मोतीं असावें. त्याला तीन तऱ्हेच्या छटा असूं शकतात. एक मधाच्या रंगाची, दुसरी काळसर आणि तिसरी चंदनाच्या गाभ्यासारखी (६४)

जें मोतीं वाटोळें, टप्पोरें, वजनदार, झकास आणि स्वच्छ असतें तसेंच मोतीं (व्यापारी) शेलका माल म्हणून ठेवातात. ह्यांत कांहीं एक खोटें नाहीं. कीं, जें मोतीं जातीवंत असतें त्याच्याच वजनाची बिनाखी शहाणे लोक करीत असतात. तीं वजनें अशीं:— दोन किंवा तीन जवांची गुंज (गुंजा आठ म्हणजे मासा), चार माशांचा एक शाण, दोन शाणांचा एक कलंज, आणि अकरा कलंजांचा एक निष्क याप्रमाणें वजनें ठरलीं आहेत.

मोत्यांची उत्पत्ति वगैरे विषय समाप्त झाला.

अथ रसरत्नसमुच्चयोक्तानि सर्वेषां लक्षणाणि गुणाश्च लिख्यन्ते। वज्रस्य—

वज्रं च षड्गोपेतं सर्वरोगापहारकम्।
सर्वाघशमनं सौख्यदार्ढ्यकारि रसायनम्॥ ६६ ॥
काकपादं च भस्माकं रेखाक्रान्तं तु वर्तुलम्।
आधारं मलिनं बिंदुसंत्रासि स्फुटितं तथा।
नीलाभं चिपिटं रूक्षं तद्वज्रं दोषलं त्यजेत्॥ ६७ ॥
यत्पाषाणतले निकाषनिकरे नोद्वृष्यते निष्ठुरै-
र्यच्चान्योपललोहमुद्गरमुखैर्लेखं न यात्याहतम्।
यच्चान्याग्निजलीलयैव दलयेद्वज्रेण वा भिद्यते
तज्जात्यं कुलिशं वदान्ति कुशलाः स्थाप्यं महार्घं च तत् ६८
अष्टास्रं चाष्टफलकम् षट्कोणमतिभासुरम्।
अम्बुदेन्द्रधनुर्बारितरं पुवज्रमुच्यते।
पुंस्त्रीनपुंसकं वज्रं योज्यं पुंस्त्रीनपुंसके॥ ६९ ॥

आतां रसरत्नसमच्चयांतील लक्षणें सांगतों--

हिऱ्याच्या ठिकाणीं सहाहि रस (म्हणजे सहा प्रकारची चव) आहे. तो सर्व रोगांचा नाश करतो. सर्व पातकांचेंदेखील शमन करतो. तो सुखकारक व देहाला मजबुती आणणारा रसायन आहे. भस्माच्या रंगाचा किंवा कावळ्याच्या पायाच्या आकृतीचा डाग, रेघा, वर्तुळ, बसकट आकार, मळकटपणा, छिद्रा, पोचा हे हिऱ्याचे अयब आहेत. हे अयब असणारा हिरा. किंवा निळसर रंगाचा चापट, रुक्ष दिसणारा असा हिरा वाईट असतो, म्हणून तो घेऊं नये. (६७)

दगडावर, कसोटीवर कितीहि जोरानें घासला तरी ज्याची रेघ उमटत नाहीं किंवा दुसऱ्या खडचानें अथवा लोखंडाच्या कानशीनें कितीहि घासण्याचा प्रयत्न केला तरी ज्याच्यावर कांहीं ओरखडा उमटत नाहीं, उलट जो कोणत्याहि कठिण वस्तूवर सहज ओरखडा ओढूं शकतो व जो स्वतः दुसऱ्या हिऱ्यानेंच घांसल जातो त्यालाच खरा हिरा म्हणून समजावें. तो आंगठीवर बसवावा अशा हिऱ्याला फार किंमत पडते. (६८)

हिऱ्याला आठ कोन असतात, व पैलूहि स्वाभाविकपणें आठच असतात. क्वचित सहादेखील कोन असतात; परंतु हिऱ्याला तेज अतिशय असतें. त्यांत इंद्रधनुष्यानें रंग दिसतात, व तो "वारितर"हि असतो. अशाला "पुरुष हिरा" म्हणतात. कांहीं हिरे स्त्री, कांहीं नपुंसक असतात. म्हणून पुरुष हिरा पुरुषानें वापरावा. स्त्रीहिरा स्त्रियांना द्यावा आणि नपुंसक हिरा नपुंसकांकडे योजावा. (६९)

आयुष्पदं झाटिति सद्गुणदं च वृष्यं
दोषत्रयप्रशमनं सकलामयघ्नम् ।
सूतेन्द्रबन्धरस सद्गुणकार्त्स्यदायि
मृत्युञ्जयं तदमृतोपममेव वज्रम् ॥ ७० ॥

अन्यत्रापि-

वज्रं समीरकफापित्तगदाग्निहन्या-
द्वज्रोपमं च कुरूते वपुरुत्तमाश्रि ।
शोषक्षयभ्रमभगन्दरमेहमेदो-
पाण्डूदरश्वयथुहारि च षड्रसाढ्यम् ॥७१॥

अशुद्धं कुरुते वज्रं कुष्ठं पार्श्वव्यथां तथा ।
पांडुं तापं गुरुत्वं च तस्मात्संशोध्य मारयेत् ॥ ७२ ॥
आयुः पुष्टिं बलं वीर्यं सौख्यं करोति च ।
सोवितं सर्वरोगघ्नं मृतं वज्रं न संशयः ॥ ७३ ॥

हिरा हा आयुष्य देणारा, सद्गुणांची तत्काळ वृद्धि करणारा, आणि अंगांत पौरुषाचा जोम उत्पन्न करणारा असा आहे. तो त्रिदोष आणि इतरहि सर्व रोग यांचा नाश करतो, पाऱ्याचें बंधन करतो रसांमध्यें सर्व प्रकारचे उत्तम गुण उत्पन्न करतो आणि मृत्युलादेखील जिंकतो. अशा दृष्टीनें हिरा केवळ अमृताप्रमाणें आहे (७०)

आणखीहि असें लिहिलें आहे कीं:—

हिरा हा वात, कफ व पित्त आणि दुसरेंहि रोग यांचा नायनाट करतो. शरीर वज्राप्रप्राणें बलकट करून त्याला उत्कृष्ट कांति आणतो आणि शोष, क्षय, भ्रम, भगंदर, मेह, मेद, पांडु, उदर, श्वास या सर्वांचा फडशा उडवून देतो. त्याच्या अंगीं सर्व रस असतात. (७१)

परंतु हिरा शुद्ध न करतांच वापरला तर कुष्ठ उत्पन्न होतें, बरगडयांत शूळ उद्भवतो, व पांडु, ज्वर, गाडय इत्यादि विकार जडतात. म्हणून हिरा शुद्ध करूनच औषधांत वापरावा. (७२)

हिरा हा आयुष्यपुष्ट्यादि, बल, वीर्य, कांति व सौख्य देतो; आणि जर त्यांचें भस्म सेवन केलें तर सर्व रोगांचा तो नाश करतो यांत मुळींच संशय नको. (७३)

अथ वज्रशोधनम्—
व्याघ्रीकन्दगतं वज्रं दोलायन्त्रेण पाचयेत् ।
सप्ताहं कोद्रवक्काथे कुलिशं विमलं भवेत् ॥ ७४ ॥
अन्यत्र दिनान्यप्युक्तानि—
कुलत्थकोद्रवक्काथे दोलायन्त्रे विपाचयेत् ।
व्याघ्रीकन्दगतं वज्रं त्रिदिनं तद्विशुध्यति ॥ ७५ ॥
व्याघ्री कण्ठकारिका । प्रकारान्तरम्—
व्याघ्रीकन्दगतं वज्रं मृदा लिप्तं पुटे पचेत् ।
अहोरात्रात्समुद्धृत्य यहमूत्रेण सेचयेत् ।
वज्रीक्षरिणे वा ।सिञ्चेत्कुलिशं विमलं भवेत् ॥ ७६ ॥

प्रकारान्तरम् —

गृहीत्वा हि शुभे वज्रं व्याघ्रीकन्दे विनिक्षिपेत् ।
महिषीविष्ठया लिप्त्वा करीषाग्नौ विपाचयेत् ॥ ७७ ॥
त्रियामं वा चतुर्यामं यामिन्यन्तेऽश्वमूत्रके ।
सेचयेत्पाचयेदेवं सप्तरात्रेण शुध्यति ॥ ७८ ॥

हिऱ्यांचें शोधन.

कंटकारीच्या कंदांत हिरा ठेऊन दोलायंत्रानें हरकाच्या काढ्यांत त्याचें सात दिवस पचन करावें, म्हणजे हिरा स्वच्छ होतो. (७४). तीन दिवसच पचन करावें असेंहि कोठें कोठें सांगितलें आहे. उदाहरणार्थ,

कुळीथ आणि हरीक यांच्या काढ्यांत हिरा कंटकारीच्या कंदांत ठेऊन त्याचें दोलायंत्रानें तीन दिवस पचन केलें म्हणजे शुद्ध होतो. (७५)

व्याघ्री म्हणजे कंटकारी, तिचा कंद कोरून त्यांत हिरा ठेऊन मातकापडाचा लेप करावा आणि एक अहोरात्र पुट द्यावें. मग काढून घोड्याच्या मूत्रांत बुडवावा, किंवा निवडुंगांच्या चिकांत बुडवावा, म्हणजे हिरा स्वच्छ होईल. (७६)

दुसरा प्रकार—

व्याघ्रीचा चांगला कंद येऊन तो कोरून त्यांत हिरा ठेऊन ह्मशीच्या शेणाच्या कंदाच्या भोंवतीं लेप द्यावा, आणि वाळल्यावर गोंवऱ्याच्या अग्नीनें पुट तीन प्रहर किंवा चार प्रहरपर्यंत देऊन मग सकाळीं तो हिरा घोड्याच्या मूत्रांत बुडवावा व याचप्रमाणें सात दिवस पचनक्रिया करावी, म्हणजे हिरा शुद्ध होतो. (७८)

अथ वज्रमारणम्—

त्रिवर्षारूढकार्पासमूलमादाय पेषयेत् ।
त्रिवर्षनागवल्लया वा निजद्रावैः प्रपेषयेत् ॥ ७९ ॥
तद्गोलके क्षिपेद्वज्रं रुद्ध्वा गजपुटे पचेत् ।
व
एवं सप्तपुटैर्नूनं कुलिशं मृतिमाप्नुयात् ॥ ८० ॥

इति वज्रभस्म । अथान्यः प्रकारः—

त्रिसप्तवारं संप्ततं खरमूत्रेण सेचितम् ।
मत्कुणैस्तालकं पिष्ट्वा तद्गोले कुलिशं क्षिपेत् ॥ ८१ ॥

प्रध्मातं वाजिमूत्रेण सिक्तं पूर्वक्रमेण वै ।
भस्मीभवति तद्वज्रं शङ्खशीतांशुसुन्दरम् ॥ ८२ ॥

इति वज्रभस्म । अथान्यः प्रकारः —

कांस्यपात्रस्थभेकस्य मूत्रे वज्रं समावपेत् ।
त्रिसप्तशस्तु संतप्तं वज्रमेवं मृतं भवेत् ॥ ८६ ॥

इति वज्रभस्म । कांस्यपात्रस्थभेकस्येत्यस्य व्याख्या-कांस्यस्य उत्तानां कटोरिका, तत्रस्थो भेको मण्डूकः अङ्गुल्यादिना घर्षितः पात्रस्य चिक्कणया बहिर्गन्तुमशक्तो भीतः समूत्रं सृजति; इति मूत्रग्रहणार्थमयं यत्न इति भावः ॥ अन्य प्रकारः—

मेषशृङ्गं भुजङ्गास्थि कूर्मपृष्ठाम्लवेतसम् ।
शशदन्तं समं पिष्ट्वा वज्रीक्षीरेण गोलकम् ॥ ८४ ॥
कृत्वा तन्मध्यगं वज्रं म्रियते भ्रातमेव हि ।

इति वज्रभस्म । अथन्यः सुगमः प्रकारः—

हिङ्गसैन्धवसंयुक्ते क्षिपेत्क्काथे कुलत्थजे
तप्तं तप्तं पुनर्वज्रं भवेद्भस्म त्रिसप्तधा ॥ ८५ ॥

इति वज्रभस्म ।

हिऱ्याचें भस्म करण्याचा प्रकारः—

तीन वर्षांच्या कपाशीच्या झाडाचें मूळ आणून त्याचें चूर्ण करावें आणि तीन वर्षांची जुनी जी नागवेल असेल तिच्या पानांच्या रसांत तें चूर्ण खलून त्याची लुगदी करावी, आणि त्यांत हिरा ठेऊन संपुट बंद करून गजपुट द्यावें. याप्रमाणें सात पुटें बसलीं म्हणजे हिरा मृत होईल (८०)

दुसरा प्रकारः—

हिरा तापवून गाढवाच्या मूत्रांत एकवीस वेळ बुडवावा, आणि ढेंकूण आणि हरताळ एकत्र खलून त्याच्या संपुटांत तो हिरा ठेऊन आच द्यावी आणि पूर्वीसारखाच पण घोड्याच्या मूत्रांत थंड करावा. म्हणजे हिऱ्याचें भस्म शंख किंवा चंद्र ह्यांच्याप्रमाणें पाढरें शुभ्र होतें. (८२)

दुसरा एक प्रकारः—

एका काशाच्या भांड्यांत बेडूक ठेवावा, आणि हिरा तापवून एकवीस वेळां त्या बेडकाच्या मूत्रांत बुचकळावा. म्हणजे हिरा मृत होईल. (८३)

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय, पुणे

व्याख्या:—काशाचें एक पातेलें बनवावें आणि त्यांत एक भला मोठा बेडूक ठेवावा आणि त्या बेडकाला बोटानें (किंवा दुसऱ्या कशानें तरी) डंवचावें. भांडें गुळगुळीत असल्याकारणानें त्याला वर चढतां येत नाहीं; त्यामुळें डवचण्यानें भेदरून जाऊन तो त्या भांड्यांत मुततो. बेडकाला अशाकरतांच डवचावयाचें कीं, त्यानें लघुशंका करावी. मग त्या मूत्रांत हिरा बुडवावा.

दुसरा प्रकार:—

मेंढ्याचें शिंग, भुजंगाचें हाड, कांसवाची पाठ, आम्लवेतस आणि सशाची दाढ हे जिन्नस एकत्र कुटून निवडुंगाच्या चिकांत खरडून लुगदी करावी व त्या लुगदींत हिरा ठेऊन भट्टींत पुट द्यावें, म्हणजे हिऱ्याचें भस्म होतें. (८४)

दुसरा एक सोपा प्रकार—

कुळथाच्या काढ्यांत हिंग आणि सैंधव टाकावें,आणि हिरा पुनः पुनः तापवून त्या काढ्यांत बुडवावा. असें एकवीस वेळ केलें म्हणजे त्याचे भस्म होतें. (८५)

याप्रमाणें हिऱ्याच्या भस्माची क्रिया आहे.

अथ विद्रुमलक्षणगुणाः ।

पक्वबिम्बीफलच्छायं वृत्तायतमवक्रकम् ।
स्निग्धमव्रणकं स्थूलं प्रवालं सप्तधा शुभम् ॥ ८३ ॥
आगाररञ्जनाक्रान्तं वक्रं सूक्ष्मं सकोटरम् ।
रूक्षं कृष्णं लघु श्वेतं प्रवालमशुभं त्यजेत् ॥ ८७ ॥
बालार्ककिरणारक्ता सागरसलिलोद्भवा लता याऽस्ति ।
न त्यजति निजरुचिं निकषे घृष्टाऽपि सा स्मृता जात्या ८८
प्रवालं मधुरं साम्लं कफापित्तादिदोषनुत् ।
वीर्यकान्तिकरं स्त्रीणां धृतं मङ्गलदायकम् ॥ ८९ ॥
क्षयपित्तास्रकासघ्नं दीपनं पाचनं लघु ।
शमनं विषभूतादेर्विद्रुमं नेत्ररोगहृत् ॥ ९० ॥

पोवळें व त्याचे गुणधर्म, वगैरे.

जें पोवळें पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल, गोल, लांबट, बिन-छिद्राचें, घोटीव, अंगावर खळगा नसलेलें, जाडजूड अशा सात लक्षणांनीं युक्त असेल तें उत्तम होय.

याच्या उलट म्हणजे अंगावर चुन्याचा पांढरा थर असलेलें, वांकडेंतिकडें, बारीक, भोंकें असलेलें, रुक्ष, काळसर, हलकें, पांढुरकें, असलें पोंवळें अशुभ असतें. तें घेऊं नये. (८७)

सकाळच्या सूर्याप्रमाणें लाल रंगाची, व समुद्रांत उत्पन्न होणारी अशी पोंवळ्याची वेलच असते तिचा तुकडा पोवळें होय. जें पोवळें कसावर कितीहि घासलें तरी त्याची चकाकी कमी होत नाहीं, तें पोवळें जातीवंत समजावें. (८८)

गुणः—पोवळें हें मधुर आहे. आम्ल पदार्थांशीं त्याचा योग झाल्यास तें कफ व पित्त यांचे दोष दूर करते, वीर्याची जोड करून देऊन कान्तिहि आणतें. पोंवळें बायकांनीं वापरल्यास मंगलदायक आहे. (८९)

पोंवळें हें क्षय, पित्तप्रकोप, रक्तदोष, खोकला यांचा नाश करून दीपन व पाचन करतें. तें हलकें असून विषबाधा इत्यादिकांचा परिहार करते आणि नेत्ररोगहि दूर करतें. (९०)

अथ मौक्तिकम्—

लघादि श्वेतं लघु स्निग्धं राश्मिवन्निर्मलं महत् ।
ख्यातं तोयप्रभं वृत्तं मौक्तिकं नवधा शुभम् ॥ ९१ ॥
नक्षत्राभं वृत्तमत्यंतमुक्तं स्निग्धं स्थूलं निर्मलं निव्रणं च ।
न्यस्तं धत्ते गौरवं यत्तलायां तन्निर्मौल्यं मौक्तिकं सौख्यदायि ॥
यद्विच्छायं मौक्तिकं व्यंगकायं
शुक्तिस्पर्शी रक्तता चार्तिं धत्ते ।
मत्स्याक्षीकं रूक्षमुत्तानानिम्नं
नैतद्धार्यं धीमताऽमौख्यदायि ॥ ९३ ॥
लवणक्षारक्षोदिनि पात्रे गोमूत्रपूरिते क्षिप्तम् ।
मर्दितमपि शालितुषैर्यदविकृतं ततु भौतिकं जात्यम् ॥ ९४ ॥
मौक्तिकं सुमधुरं सुशीतलं दृष्टिरोगशमनं विषापहम् ।
राजयक्ष्मपरिकोपनाशनं क्षीणवीर्यबलपुष्टिवर्धनम् ॥ ९५ ॥
कफपित्तक्षयध्वंसि कासश्वासाग्निमान्द्यनुत् ।
पुष्टिदं वृष्यमायुष्यं दाहघ्नं मौक्तिकं मतम् ॥ ९६ ॥

मोत्याचे गुण पुनः सांगतोः—

निर्मळ उत्तम मोतीं हें आल्हादजनक, शुभ्र, स्निग्ध, चंद्रकिरणांप्रमाणें निर्मल, मोठें, प्रख्यात, पाण्याच्या प्रभेप्रमाणें प्रतिबिंबोत्पादक व गोलबंद असें नवगुणात्मक आहे. (९१)

जें मोतीं चांदणीप्रमाणें चमकदार, वाटोळें गरगरीत, स्निग्ध, टप्पोरें, निर्मळ, छिद्र न पडलेलें, असून वजनांत जर जड भरलें तर त्याला किंमतच नाहीं. तें मोतीं सुखदायक होतें. (९२)

जें निस्तेज आहे, ज्याला अयब आहे, जें शिंपल्याप्रमाणें दिसतें व जें फार लाल, व मत्स्याच्या नेत्राप्रमाणें, रुक्ष, उथळ, निमुळतें असतें तें श्रीमतांनीं अंगावर धारण करूं नये. तें दुःखदायक असतें. (९३)

एका भांड्यांत मीठ आणि क्षाराची पूड व गोमूत्र भरून त्यांत मोतीं टाकावें आणि साळीच्या कोंड्यानें चोळावें. असें केलें असतां जें तेजस्वी राहील तेंच जातिवंत मोतीं म्हणून समजावें.(९४)

मोत्याचे गुणः-मोतीं हें मधुर, थंड, नेत्ररोगांचा आणि विषांचा नाश करणारें असतें. त्यानें भडकलेला कफक्षय दूर होऊन वीर्याची हानि भरून येते, व बळ आणि शरीरपुष्टि यांची वृद्धि होते. (९६)

मोतीं हें कफ, पित्त, क्षय यांचा विध्वंस करतें, खोकला श्वास आणि अग्निमांद्य यांचा धुव्वा उडवितें. तें पुष्टिदायक, धातुवर्धक, आयुष्यवर्धक आणि दाह शमन करणारें असें आहे.

अथ माणिक्यं पद्मराग इति च ।
माणिक्यं मधुरं स्निग्धं वातपित्तविनाशनम् ।
रत्नप्रयोगाविज्ञानां रसायनकरं परम् ॥ ९७ ॥
स्निग्धं सुगात्ररचितं दीप्तं स्वच्छं सुरङ्गं च ।
तज्जात्यं माणिक्यं कल्याणं धारणात्कुरुते ॥ ९८ ॥
यद्विच्छायं शर्करिलं कर्कशधूम्रं स्वरागविकलं च ।
विरुपलघु माणिक्यं न धार्यं दोषावहं त्याज्यम् ॥ ९९ ॥
कुशेशयदलच्छायं स्वच्छं स्निग्धं महत्स्फुटम् ।
वृत्तायतं समं गात्रं माणिक्यं त्वष्टधा शुभम् ॥ १०० ॥
माणिक्यं दीपनं वृष्यं कफवातक्षयार्तिनुत् ।
भूतवेतालपापघ्नं कर्मजव्याधिनाशनम् ॥ १०१ ॥

माणिक.

गुणः—माणिक हें मधुर, स्निग्ध व वातपित्ताचा नाश करणारें आहे. रसशास्त्रांत प्रयोग करून जे निष्णात झाले आहेत त्यांच्या मतें तर माणिक हें फार मोठें रसायन आहे.

तें स्निग्ध असून दिसण्यांत ठाकठीक, देदीप्यमान, स्वच्छ आणि रंगदार जर असेल तरच तें जातिंवत माणिक समजावें. तें वापरल्यानें कल्याण होतें. परंतु जें निस्तेज, वाळूप्रमाणें कण दिसणारें, खरखरीत, धुरकट, असेल व त्याचा वास्तविक जो रंग आहे तो त्यांत नसेल, असें विरूप व हलकें माणिक वापरूं नये. तें वाईट म्हणून टाकून द्यावें.

ज्या माणकाचा रंग तांबडचा कमळाच्या पाकळीप्रमाणें लाल असतो, जें घोटीव, मोठें, ठसठशीत व वाटोळें, लांबट, नीट-नेटकें, अशा आठ लक्षणांनीं युक्त असतें तें शुभ होय.

गुणः—माणिक हें दीपन, धातुवर्धक आणि कफ, वात क्षय यांची पीडा पार नाहींशी करणारें आहे. तें भूत, पिशाच्च यांची बाधा दूर करतें व ज्या व्याधि दुष्कर्मांनीं उत्पन्न होतात त्यांचाहि निःपात करून टाकतें (१०१)

अथ गारुत्मतम् ।

मरकतं विषघ्नं हि शीतलं मधुरं रसे ।
अम्लपित्तहरं रुच्यं पुष्टिं भूतनाशनम् ॥ १०२ ॥
स्वच्छं च गुरु सुच्छायं स्निग्धं गात्रं च मार्दवम् ।
अव्यंगं बहुरंगं च शुभं मरकतं मतम् ॥ १०३ ॥
शर्करिलं रूक्षमालिनं लघु हीनकांतिकलमाषम् ।
त्रासयुतं विकृतांगं मरकतममरोऽपि नोपभुंजीत ॥ १०४ ॥
यच्छैवालशिखण्डिशाड्वलहरित्काथैश्च काकच्छदैः
खद्योतेन च बालकोरवपुषा शैरीषपुष्पेण च ।
छायाभिः सततं दधाति तादिदं निर्दिष्टमष्टात्मकं
जात्यं यत्तपनातपैश्च परितो गारुत्मतं रंजयेत् ॥ १०५ ॥

पाच किंवा पन्ना.

गुणः—पाच ही विषनाशक, शीतळ आणि रसदृष्टीनें मधुर आहे. ती आम्लपित्ताचा विध्वंस करते, व रुचकर, पुष्टिकारक आणि भूतबाधानाशक अशी आहे. (१०२)

जी पाच स्वच्छ, वजनदार, रंगदार, स्निग्ध गुळगुळीत, अयब नसणारी आणि निरनिराळ्या रंगांची झाक दाखविणारी अशी असते, ती पाच उत्कृष्ट होय.

जिच्यामध्यें वाळूप्रमाणें कण दिसतात, जी रुक्ष, मळकट, हलकी, कांतिहीन, भस्मी, डोळ्याला त्रास वाटणारी, आणि वांकडी-तिकडी अशी असेल ती पाच प्रत्यक्ष देवांनींहि वापरूं नये. (१०४)

हिरवें गर्द शेवाळ, मोराचा पिसारा, हरळीचा हिरवा अर्क, चास पक्षी, काजवा, कोवळी कळी, शिरीष पुष्प, अशा आठ पदार्थांची निरनिराळी झाक जिच्यामध्यें सदोदित दिसते, आणि जी सूर्याच्या किरणानीं भोंवतालचा प्रदेश हिरवागार करून सोडते, तिला जातिवंत पाच म्हणावें. (१०५)

अथ वैदूर्यम् ।

वैदूर्यमुष्णमम्लं च कफमारुतनाशनम् ।
गुल्मप्रभृतिरोगघ्नं भूमिजं च शुभावहम् ॥ १०६ ॥
एकं वेणुपलाशपेशलरुचा मायूरकण्ठत्विषा
मार्जारेक्षणापिंगलच्छविजुषा ज्ञेयं त्रिधा छायया ।
यद्गात्रं गुरुतां दधाति नितरां स्निग्धं तु दोषोज्झितं
वैदूर्यं विदलं वदन्ति सुधियः स्वच्छं च तच्छोभनम् ॥
विच्छायं मृच्छिलागर्भं लघु रूक्षं त्वसत्कृतम् ।
सत्रासं चिपिटं कृष्णं वैदूर्यं दूरतस्त्यजेत् ॥ १०८ ॥
वैदूर्यं श्यामशुभ्राभं समं स्वच्छं गुरु स्फुटम् ।
भ्रमच्छुभोत्तरीयेण गर्भितं शुभमीरितम् ॥ १०९ ॥
घृष्टं यदात्मना स्वच्छं स्वच्छायां निकषात्मनि ।
स्फुटं प्रदर्शयेदेतद्वैदूर्यं जात्यमुच्यते ॥ ११० ॥
वैदूर्यं रक्तपित्तघ्नं प्रजायुर्बलवर्धनम् ।
पित्तप्रधानरोगघ्नं दीपनं वृष्यमेव च ॥ १११ ॥

वैडूर्य.

वैडूर्य हें उष्ण, आम्ल आणि कफ व वात यांचा नाश करणारें आहे. तें गुल्म वगैरे रोगांचा परिहार करतें. जें वैडूर्य भूमींत सांपडतें तें शुभ्र समजावें. (१०६)

एकदा त्यांत कळकाच्या पानाप्रमाणें नाजुक झांक मारते. एकदां मोराच्या गळ्याप्रमाणें निळी छटा दिसते आणि एकदां मांजराच्या डोळ्याप्रमाणें पिंगट लकेर भासते, याप्रमाणें वैडूर्यांत तीन छाया दिसतात. जें वैडूर्य वजनांत अतिशय जास्त भरतें, जें घोटीव आणि निर्दोष, बिनपदराचे व स्वच्छ असतें, तेंच शुभदायक होय असें शास्त्रकार म्हणतात. (१०७)

जें निस्तेज असतें व ज्याच्यांत माती किंवा साध्या दगडाप्रमाणें कांहीं दिसतें, जें वजनांत हलकें असतें जें रुक्ष असून लाभदायक नसतें, आणि जें त्रास देणारें, चपटें व कृष्णवर्ण असतें तें वैडूर्य अगदीं लांब फेकून द्यावें. (१०८)

वैडूर्य हें कांहींसें श्यामवर्ण व कांहीं शुभ्र वर्ण असें असतें. तें सारख्या आकाराचें* स्वच्छ, जड, आणि उठावदार दिसतें आणि चोहोंकडे फिरणारी अशी एक पांढरी रेघ त्यांत दिसतें.

जें स्वच्छ असून कसावर घासलें तरी स्वच्छ, तजेलेदार राहतें आणि पूर्वीप्रमाणेंच उठावदार दिसतें तें जातिवंत समजावें.

गुणः — वैडूर्य हें रक्तपित्तनाशक आहे. तें संतति, आयुष्य व बल यांची वृद्धि करतें आणि पित्तप्रकोपानें झालेल्या रोगांचा संहार करून दीपन व वीर्यवृद्धि करतें (१११)

अथ गोमेदम्।

सुस्वच्छगोजलच्छायं स्निग्धं स्वच्छं समं गुरु।
निर्दलं मसृणं दीप्तं गोमेदं शुभमष्टधा ॥ ११२ ॥
गोमेदकोऽम्ल उष्णश्च वातकोपविकारजित्।
दीपनः पाचनश्चैव धृतोऽयं पापनाशनः ॥ ११३ ॥
पात्रे यत्र न्यस्ते पयः प्रयात्येव गोजलोज्ज्वालितम्।
घर्षेऽप्यहीनकान्ति गोमेदं तं बुधा विदुर्जात्यम् ॥ ११४ ॥
गोमेदं कफपित्तघ्नं क्षयपाण्डुक्षयंकरम्।
दीपनं पाचनं रुच्यं त्वच्यं बुद्धिप्रबोधनम् ॥ ११५ ॥

---

* म्हणजे त्याला पैलू नसतात.

विच्छायं लघु रूक्षाङ्गं चिपिटं हटलाञ्चितम् ।
निष्प्रभं पीतकाचाभं गोमेदं न शुभावहम् ॥ ११६ ॥

गोमेद.

निर्मळ गोभूत्र पाहिलें तर त्याचा जसा रंग तसा, गोमेदाचा असतो. गोमेद हा घोटीव, सारख्या आकाराचा, स्वच्छ, वजनदार, दळरहित, गुळगुळीत आणि तजेलदार अशा आठ लक्षणांनीं युक्त असतो. (११२)

तो अम्ल, उष्ण व वातविकारनाशक आहे. तसाच तो दीपन, पाचन व स्थिर असून पातकांचा नाश करतो.

परीक्षा:—

आणि कसावर घासला तरीहि ज्याचें तेज कमी होत नाहीं त्याला शास्त्रकार जातिवंत गोमेद म्हणतात.

गोमेद हा कफ, पित्तनाशक, व क्षय, पांडुरोग यांचा संहार करणारा आहे. तो दीपन, पाचन, तोंडाला रुचि आणणारा, अंगाची कातडी स्वच्छ करणारा, व बुद्धि तीव्र करणारा आहे.

जो गोमेद बेरंग, हलका, रुक्ष, थबकडा असतो, ज्याचे कळपे निघतात, जो निस्तेज व पिवळ्या कांचेसारखा दिसतो तो अशुभ होय.

अथेन्द्रनीलम् ।

एकच्छायं गुरु स्निग्धं स्वच्छं पिण्डितविग्रहम् ।
मृदुर्मध्ये लसज्ज्योतिः सप्तधा नीलमुत्तमम् ॥ ११७ ॥
श्वासकासहरं वृष्यं त्रिदोषघ्नं सुदीपनम् ।
विषमज्वरदुर्नामपापघ्नं नीलमीरितम् ॥ ११८ ॥
नीलकस्तिक्तकः श्रेष्ठः कफापित्तानिलापहः ॥ ११९ ॥
यो दधाति शरीरस्य शौरिर्मङ्गलदो भवेत् ॥ ११९ ॥
न निम्नो निर्मलो गात्रे मसृणो गुरुदीप्तिकः ।
तृणग्राही मृदुर्नीलो दुर्लभो लक्षणान्वितः ॥ १२० ॥
सितशोणपीतकृष्णाश्छाया नीले क्रमादिमाः कथिताः ।
विप्रादिवर्णासिद्धयै धारणमस्यापि वज्रवत्फलवत् ॥ १२१ ॥
अस्त्यानचान्द्रिकास्यन्दसुन्दरीक्षीरपूरितम् ।
यत्पात्रं रञ्जयत्याशु स जात्यो नील उच्यते ॥ १२२ ॥

इंद्रनील माणि.

इंद्रनील हा रंगानें एकसारखा, वजनदार, घोंटीव, स्वच्छ व पिंडीच्या आकाराचा असतो. मध्यभागीं तो फारच मऊ [गुळगुळीत] असून सर्व आंगावर चांगलीच झकाकी असते.उत्कृष्ट नीळाच्या अंगीं वर लिहिलेलीं सात लक्षणें असतात. (११७).

इंद्रनीळ हा श्वास व खोकला दूर क'तो, तो वीर्यपोषक असून त्रिदोषनाशक आणि उत्तम अग्निदीपक आहे. तो विषम-ज्वर म्हणजे एक दोन दिवसाआड येणारा ताप नाहींसा करतो आणि दुष्कीर्ति व पातकें यांचाहि संहार करतो. अशी नीळाची प्रख्याति आहे. (११८).

उत्कृष्ठ नीळ हा चवीला कडु, व कफ, पित्त आणि वात यांचा नाशक आहे. जो मनुष्य आंगावर नीळ वापरील त्याचें शनि ग्रह कल्याण करतो.

नील हा निम्न म्हणजे निमुळता नसतो.तो निर्मळ, स्पर्शाला फार गुळगुळीत आणि खूप तेजस्वी असतो. तसाच तो तृणाकर्षक* व मऊ असतो. अशा प्रकारच्या लक्षणांनीं युक्त जो नीळ तो फार करून आढळत नाहीं. (१२०)

नीळ नीळा खरा; पण त्यांतहि, पांढुरकी, तांबुस, पिवळी, काळी अशी झाक मारते. म्हणून हिऱ्याप्रमाणें नीळांतहि चार वर्ण आहेत व त्या त्या वर्णाचा नीळ ब्राम्हण वगैरेनीं अंगावर वापरावा. त्यांचें फळ हिऱ्याप्रमाणेंच आहे.

परीक्षाः—भर पौर्णिमेच्या चांदण्याच्या प्रवाहांत गौरवर्ण सुंदर स्त्रीच्या हातांत दुधानें भरलेलें भांडें द्यावें आणि त्या (दुधावर) इंद्रनीळाचा प्रकाश पाडावा, म्हणजे अशा स्थितींतहि इद्रनील असेल तर त्या दुधाचा देखील रंग ताबडतोब निळा दिसूं लागेल. (१२२).

टीपः— * ही खूण फार महत्वाची आहे. इंद्रनील रेशमी वस्त्रानें घासावा व गवताची काडी वगैरेसारख्या हलक्या पदार्थाजवळ आणावा, म्हणजे ती काडी इंद्रनीलाला झटकन चिकटते. हाच चमत्कार विद्युच्छक्ति-मुळें घडतो.

अथ पुष्परागम् ।

सच्छायपीतगुरुगात्रसुरङ्गशुद्धं
स्निग्धं च निर्मलमतीव सुवृत्तशीतम् ।
यत्पुष्परागममलं क्षयनाशकारि
पुष्णाति कीर्तिमतिशौर्यसुखायुरर्थान् ॥ १२३ ॥
कृष्णाबिन्द्वाङ्कितं द्व्यक्षं धवलं मालिनं लघु ।
विच्छायं शर्कराङ्गाभं पुष्परागं सदोषकम् ॥ १२४ ॥
घृष्टो निकशपदे यत्पुष्यति यो रागमधिकमात्मीयम् ।
एष खलु पुष्परागो जात्यस्तथाऽयं परीक्षकैरुक्तः ॥ २५ ॥
पुष्परागं गुरु स्निग्धं स्वच्छं स्थूलं समं मृदु ।
कर्णिकारप्रसूनाभं मसृणं शुभमष्टधा ॥ १२६ ॥
पुष्परागं विषच्छर्दिकफवातग्निमान्द्यनुत् ।
कुष्ठार्शोदाहरोगघ्नं दीपनं लघु पाचनम् ॥ १२७ ॥

पुष्कराज (पुष्पराग)

जो पिवळ्या जर्द रंगाचा, वजनदार, एकजात एकरंगी व स्वच्छ असतो, जो घोटीव, अतिशय निर्मळ, आकारानें गरगरीत व स्पर्शाला गार लागतो; ज्यावर मळकट छिट्टे डाग वगैरे कांहीं नसतात; असा जो पुष्कराज असेल तो उत्तम होय. हा क्षयरोग दूर करून कीर्ति, शौर्य, सुख, आयुष्य व संपत्ति यांची जोड करून देतो. (१२३)

ज्या पुष्कराजावर काळा छिट्टा असेल, किंवा दोन खोंचा असतील, जो पांढरा, मळकट, हलका, बेरंगी अथवा वाळूप्रमाणें ज्यांत कण दिसत असतील, असा पुष्कराज चांगला नव्हे. (१२४)

कसावर घासला असतां ज्याचें तेज कमी न होतां उलटें अधिकच वाढतें, असा पुष्कराज रत्नपरीक्षकांच्या मतानें उत्तम होय. पुष्कराज हा वजनदार, स्निग्ध, स्वच्छ, स्थूल, आकारानें सारखा आणि मऊ असतो. त्याचा रंग कर्णिकेच्या [म्ह० पिवळ्या कण्हेरीच्या] फुलाप्रमाणें असून तो फार गुळगुळीत असतो. उत्कृष्ट पुष्कराजाचें लक्षण असें आठ प्रकारचें आहे. (१२६)

गुणः—पुष्कराज हा विषबाधा, ओकारी व कफवात आणि अग्निमांद्य यांचा विध्वंस करितो, आणि कुष्ठ, मुळव्याध व दाह

यांचा परिहार करतो. तो दीपन, पचनाला हलका आणि शिवाय पाचकहि आहे. (१२७)

अथ सर्वेषां समुच्चितं लक्ष्म—

श्यामः स्यादिन्द्रनीलस्त्वतिमसृणतनुश्चाथ गारुत्मतः स्या-
न्नीलच्छायोऽतिदीप्तोऽप्यथ मिहिरमणिः सूर्यतप्तोऽग्नि मुक्स्यात्
चन्द्रांशुस्पर्शतोऽम्भः स्रवति शशिमणिः पुष्परागस्तु पुष्प-
प्रख्यः श्रीवज्रमुच्चैर्धनसमभिहतं सांविशेल्लोहापिण्डे ॥ १२८ ॥
वैदुर्यं यद्बिडालेक्षणरुचि गदितं स्याच्च गोमेदरत्नं ।
गोमूत्राभं विधूमज्वलदनलनिभं पद्मरागं वदन्ति ।
मुक्ताशंखप्रवालं सरिदधिपतिजं विश्वविख्यातमेत—
द्राजावर्तं तु पीतारुणमृदुसुरभिक्षोणिभागोत्थमाहुः ॥ १२९ ॥

आतां सर्व रत्नांचें सामान्य वर्णन देतोः—

इंद्रनील हा श्यामवर्णाचा आणि अतिशय गुळगुळीत असा असतो. पाचेंत नीळसर झांक असून तेज फार असतें. सूर्यकान्त मणि हा उन्हांत धरला असतां त्यांतून विस्तव पडतो.* चंद्रकांत मण्याला चांदण्यांत धरला म्हणजे त्याला पाझर फुटतो. पुष्कराज हा केवळ फुलाप्रमाणें आहे; आणि उत्तमोत्तम हिरा लोखंडावर ठेवून त्याच्यावर घण मारला असतांना तो लोखंडांत घुसून बसतो. [१२८]

वैडुर्य हें मांजराच्या डोळ्याप्रमाणें दिसतें. गोमेदाचा रंग गोमूत्राप्रमाणें असतो. म्हणूनच त्याला गोमेद म्हणतात. माणकाचा रंग धूर नसलेल्या अग्निप्रमाणें म्हणजे जळजळीत निखाऱ्याप्रमाणें लाल असतो. मोती, शंख आणि पोंवळे हे समुद्रांत सांपडतात हें सर्वांना माहीत आहेच. आतां राजावर्ताचा रंग कांहीं पिवळा व कांहीं तांबडा असा असतो, तो मऊ आणि सुगंधि माती जेथें असतें अशा जमीनींत सांपडतो. (१२९)

अथ पंचरत्नानि—

पुष्परागं महानीलं पद्मरागं सवज्रकम् ।
मरकतं च संप्रोक्ताः पंच रत्नवराः शुभाः ॥ १३० ॥

अथ मणयः—

वैक्रांतः सूर्यकांतश्च हीरकं मौक्तिकं माणिः ।
चन्द्रकान्तस्तथा चैव राजावर्तश्च सप्तमः ॥
गरुडोद्भारकश्चैव ज्ञातव्या मणयो ह्यमी ॥ १३१ ॥

---

*हा प्रयोग बहिर्गोल भिंगानेंहि करतां येतो.

पूर्वोक्ताश्च । अथ वज्रव्यतिरिक्तानां मणीनामुत्पत्तिः—

गोमेदतार्क्ष्यवायजदेवेज्यमणीन्दुतरणिकांताद्याः ।
नानावर्णगुणाढ्या विज्ञेयाः स्फाटिकजातयः प्राज्ञैः ॥ १३२ ॥

वायजं वैदूर्यं, देवेज्यः पुष्परागः, शेषं स्पष्टम् ।

आतां मुख्य अशीं पांच रत्नें आहेत त्यांचीं नांवें:—

पुष्कराज, इंद्रनीळ, माणिक, हिरा आणि पाच हीं: पांच अमूल्य रत्नें आहेत. त्यांसच पंचरत्नें म्हणतात. [हीं सर्व खनिज आहेत हें लक्षांत ठेवावें.]

आतां माणि कोणते ते सांगतों:—

वैक्रांत [तोरमल्ली], सूर्यकांत, हिरा, मोतीं, माणिक, चंद्रकांत, सातवा राजावर्त आणि आठवी पांच यांना माणि असें म्हणतात. (१३१)

हिऱ्याशिवाय बाकीच्या मण्यांची उत्पत्ति व जाती सांगतों:—

गोमेद, पाच, वायज, देवेज्य, सूर्यकांतमणि, चंद्रकांतमणि हे सर्व नाना गुणांनीं युक्त आहेत व या सर्वांची जात स्फटिक असें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. (१३२)

वायज म्ह० वैडुर्य अथवा लसण्या, देवेज्य म्ह० पुष्कराज असा अर्थ आहे.

अथ स्फाटिकः—

स्फाटिकः सितोपलः स्यादमलमाणिर्निर्मलोपलं स्वच्छम् ।
स्वच्छमणिरमलरत्नं निस्तुषरत्नं शिखिप्रियं नवधा ॥ १३३ ॥
स्फाटिकः समवीर्यः स्यात् पित्तदाहार्तिशोषनुत् ।
तस्याक्षमालां जपतां दत्ते कोटिगुणं फलम् ॥ १३४ ॥
यद्वज्रातोयाबिंदुच्छवि विमलतमं निस्तुषं नेत्रहृद्यं
स्निग्धं शुद्धांतरालं मधुरमतिहिमं पित्तदाहास्रहारि ।
पाषाणैर्यान्निघृष्टं स्फुटितमपि निजां स्वच्छतां नैव जह्या—
त्तज्जात्यं जात्वलभ्यं शुभमुपतनुते शैवरत्नं विचित्रम् ॥

आतां स्फटिकांचीं नांवें:—

स्फटिक, सितोपल, अमलमणि, निर्मलोपल, स्वच्छ, स्वच्छमणि, अमलरत्न, निस्तुषरत्न, शिखिप्रिय अशीं नांवें स्फटिकाचीं आहेत. [१३३]

गुणः—स्फटिक हा समधात आहे; तो पित्त, दाहरोग आणि शोष यांचा निरास करतो. स्फटिकाचे माणि करून त्याच्या माळेनें जर जप केला तर जपाचें फळ कोटिपट अधिक मिळतें. [१३४]

जो माणि शुद्ध गंगाजलाप्रमाणें शुभ्र, अतिशय निर्मल, निस्तोष आणि नेत्रांना आनंददायक असतो, जो स्निग्ध, व ज्याचें अंतरंग शुद्ध असतें, जो मधुर, व अत्यंत थंड असून पित्त, दाह व रक्तदोष यांचा परिहार करतो, कसावर जोरानें घासला असतां, किंवा फुटला असतांहि ज्याचा स्वच्छपणा बिघडत नाहीं, असा शंकराला प्रिय व जातिवंत परंतु विलक्षण असा स्फटिक नांवाचा माणि असतो, तो खरोखर दुर्मिळ आहे. [१३५]

अथ भवति सूर्यकांतस्तपनमाणिस्तपनश्च रविकांतः ।
दीप्तोपलोऽग्निगर्भो ज्वलनाश्मार्कोपलश्च वसुनामा ॥ १३६ ॥
रविकांतो भवेदुष्णो निर्मलश्च रसायनः ।
वातश्लेष्महरो मेध्यः पूजनाद्रवितुष्टिदः ॥ १३७ ॥
शुद्धः स्निग्धो निर्व्रणो निस्तुषोऽन्त-
र्यो निर्घृष्टोऽत्यन्तनैर्मल्यमेति ।
यः सूर्यांशुस्पर्शानिस्यूतवन्हि—
र्जात्यः सोऽयं कथ्यते सूर्यकांतः ॥ १३८ ॥

सूर्यकांत, तपनमणि, तपन, रविकांत, दीप्तोपल, अग्निगर्भ, ज्वलनाश्मा, अर्कोपल, वसु हीं नांवें सूर्यकांताचीं आहेत. [१३६]

सूर्यकांत हा उष्ण, निर्मळ व रसायन आहे; तो वातकफ-नाशक आणि बुद्धिवर्धकहि आहे. त्याच्या पूजनानें सूर्य संतुष्ट होतो. (१३७)

जो शुद्ध, स्निग्ध [घोटीव], निर्व्रण [खांचखळगे नसणारा] असा असतो, ज्याचा आंतील भाग देखील निस्तोष असतो, जो कसावर घासला तरीहि अतिशय स्वच्छ रहातो आणि जो सूर्याच्या किरणांनीं अग्निज्वाला सोडतो, तोच अस्सल म्हणजे जातिवंत सूर्यकांत माणि होय. [१३८]

इन्दुकान्तश्चन्द्रकान्तश्चन्द्राश्मा चन्द्रजोपलः ।
शीतात्मा चान्द्रिकाद्रावः शशिकांतश्च सप्तधा ॥ १३९ ॥

शिशिरश्चन्द्रकांतस्तु स्निग्धः पित्तास्रतापनुत् ।
शिवप्रीतिकरः स्वच्छो ग्रहालक्ष्मीविनाशनः ॥ १४० ॥
स्निग्धं शीतं पीतमत्रासमन्त-
र्धत्ते चित्ते स्वच्छतां यन्मुनीनाम् ।
यश्च स्रावं याति चंद्राशुसंगा-
ज्जात्यं रत्नं चंद्रकांताख्यमेतत् ॥ १४१ ॥

इंदुकांत, चंद्रकांत, चंद्राश्मा, चंद्रजोपल, शीताश्मा, चंद्रिकाद्राव, शशिकांत हीं सात नांवें चंद्रकांत मण्याचीं आहेत.

चंद्रकांत हा अतिशय थंड व स्निग्ध असून पित्त आणि रक्तदोष यांचा परिहार करतो. तो शिवप्रिय व स्वच्छ आहे आणि ग्रहबाधा व दारिद्र्य यांचा पार नाश करून टाकतो. (१४०)

जो स्निग्ध, थंड, पीतवर्ण असून आल्हाददायक असतो, ज्याच्या योगानें मुनींचीं मनें देखील प्रसन्न राहतात, जो चंद्रकिरणांच्या स्पर्शानें पाझरतो आणि जो जातिवंत रत्न आहे तो चंद्रकांत माणि होय. [१४१]

राजावर्तो नृपावर्तो राजन्यावर्तकस्तथा ।
आमर्तमणिरावर्तः स्यादित्येष शराव्हयः ॥ १४२ ॥
राजावर्तः कटुः स्निग्धः शिशिरः पित्तनाशनः ।
सौभाग्यं कुरुते नृणां भूषणेषु प्रयोजितः ॥ १४३ ॥
निर्गारमासितमसृणं नीलं गुरु निर्मलं बहुच्छायम् ।
शिखिकण्ठसमं सौम्यं राजावर्तं वदन्ति जात्यमाणिम् ॥१४४॥
पेरोजं हरिताश्मा च भस्मांगं हरितं द्विधा ।
पिरोजं सुकषायं स्यान्मधुरं दीपनं सरम् ॥ १४५ ॥
स्थावरं जंगमं चैव संयोगाच्चापि यद्विषम् ।
तत्सर्वं नाशयेच्छीघ्रं मूलभूतादिदोषजम् ॥ १४६ ॥ इति ॥

राजावर्त, नृपावर्त, राजन्यावर्तक, आवर्तमणि व आवर्त हीं पांच नावें राजावर्तांचीं आहेत.

राजावर्त हा तिखट, स्निग्ध, थंड व पित्तनाशक आहे. त्याचा दागिना करून अंगावर घातला असतांना मनुष्याला भाग्य प्राप्त होतें. [१४३]

जो विषदोषरहित, काळसर व गुळगुळीत असतो,त्याचप्रमाणें जो निळसर, वजनदार व निर्मळ असतो, ज्यांत अनेक रंगाची छटा असली तरी जो साधारणपणें मोराच्या कंठाप्रमाणें दिसतो व सौम्य असतो अशा प्रकारच्या मण्याला जातिवंत राजावर्त म्हणतात. (१४४).

पेरोज, हरिताश्मा, किंवा भस्मांग व हरित हीं नांवें "पिरोजा" या खड्याचीं आहेत. तो फार तुरट, मधूर, दीपन व सारक असतो. सर्व प्रकारचीं स्थावर किंवा जंगम किंवा संयोगजन्य जीं विषें आहेत तीं विषें व शरीरांत मूळचेच जर दोष असतील तर ते दोष या सर्वांचा पिरोज हा झटपट फडशा उडवून देतो. (१ : ६).

अथोपरत्नानां शोधनमारणं, उक्तं च—

रत्नोपरत्नान्येतानि शोधनीयानि यत्नतः ।
अशुद्धानि न कुर्वंति गुणान् रोगांस्तु तन्वते ॥ १४७ ॥
शुध्यत्यम्लेन माणिक्यं जयन्त्या मौक्तिकं शुचि ।
विद्रुमं क्षारवर्गेण तार्क्ष्यं गोदुग्धतः शुचि ॥ १४८ ॥
पुष्परागं च संधानैः कुलत्थक्काथसंयुतैः ।
तन्दुलीयजलैर्वज्रं नीलं नीलीरसेन च ॥ १४९ ॥
रोचनाद्विश्च गोमेदं वैदूर्यं त्रिफलाजलैः ।
धृतान्येतेषु संस्विन्नान्याशु शुध्यन्ति दोलया ॥ १५० ॥
लकुचद्रावसंपिष्टैः शिलातालकगन्धकैः ।
वज्रं विनाऽन्यरत्नानि म्रियन्तेऽष्टपुटैः खलु ॥ १५१ ॥
इति सर्वरत्नभस्मीकरणम् । अत्र काश्चिद्विशेषः—

सर्व रत्नांची संकलित रीतीनें शोधन व मारणक्रियाः—

सर्व रत्नें व तशींच उपरत्नें यांचें शोधन मोठ्या प्रयत्नानें करावें. कारण तीं जर अशुद्ध वापरलीं तर गुण देत नाहींतच; पण उलट रोग मात्र उत्पन्न करतात (१४७).

आम्लरसानें माणिक शुद्ध होतें, जयंती (जास्वंद किंवा टाकळी) हिच्या रसानें मोतीं, क्षारवर्गांतील जिनसांनीं पोंवळें आणि गाईच्या दुधानें पाच शुद्ध होते.

कुळथाच्या काढ्यांत एखादा तुरट पदार्थ किंवा कांजी टाकून त्या काढ्यानें पुष्पराग शुद्ध करावा, हिरा तांदुळज्याच्या रसानें आणि

नीळ निळीच्या रसानें शुद्ध करावा. रोचन वृक्षाच्या रसानें किंवा काढ्यानें गोमेद शुद्ध करावा व त्रिफळ्याच्या काढ्यानें वैडूर्य शुद्ध करावा. हीं सर्व रत्नें दोलायंत्रामध्यें वरील काढ्यांत पचन करून वाफारून काढलीं म्हणजे शुद्ध होतात. (१५०)

मनशीळ, हरताळ, गन्धक हे कागदी लिंबाच्या रसांत खलून त्याची भावना हिंग्याशिवाय पाहिजे त्या रत्नास देऊन आठ पुटें दिलीं म्हणजे निःसंशय तावडतोब त्या रत्नाचें भस्म होतें.

रत्नादिनामलाभे तु ग्राह्यं तस्योपरत्नकम् ।
मौक्तिकस्याऽप्यभावे तु मुक्ताशुक्तिं प्रयोजयेत् ॥ १५२ ॥

अत्र गुरुचरणाः—

न हन्याद्धीरकादीनि नवरत्नानि बुद्धिमान् ।
महामौल्यानि तेषां तु वधे रौरवमृच्छति ॥ १५३ ॥

तर्हि ऋषिभिः कथं हननक्रियोक्तेति संदेहनिवृत्त्यर्थं परं परोपदेशप्राप्तं बीजमास्ति; तद्यथा—

वज्रादीनां तु संस्कारे क्रियमाणे पतन्ति ये ।
गात्रेभ्यः खण्डकाः स्वल्पास्तान् हन्याद्बुद्धिमान् भिषक् ॥
यद्वा तत्खानिजाता ये तज्जातीयाः सुलक्षणाः ।
स्वल्पमूल्यास्तु तेषां हि वधे नास्तीह पातकम् ॥ इति १५५

अन्यच्च—

गुणा यथैव रत्नानामुपरत्नेषु ते तथा ।
तेषु किंचित्ततो हीना विशेषोऽयमुदाहृतः ॥ १५६ ॥

याप्रमाणें रत्नाची भस्मक्रिया आहे. आतां त्यांतील विशेष सांगतों. रत्न जर न मिळेल तर त्या रत्नाचें उपरत्न घ्यावें; मोतीं न मिळाल्यास मोत्यांचे शिंपले घेऊन त्यांचें भस्म करावें.

याविषयीं आमचे गुरुमहाराज म्हणतातः—

हिरा आणि त्याच्याप्रमाणें दुसरीं जीं नव महारत्नें आहेत त्यांना मारून वैद्यानें त्यांचें भस्म करूं नये. तीं रत्नें अतिशय किमतीचीं असतात, म्हणून अशीं किंमतवान रत्नें मारून त्यांचें भस्म केल्यास तो मनुष्य रौरवनरकास जाईल. [१५३]

तर मग ऋषींनीं रत्नांची भस्मक्रिया सांगितली कशाला, असा कोणाला संशय येईल; परंतु यांत परंपरेनें समजलेलें मर्म असें आहे कीं,

हिरे वगैरे जीं रत्नें असतात त्यांना पैलू पाडण्यांत किंवा ते साफसूफ करण्यांत त्याचे बारीक बारीक जे तुकडे पडतात ते घेऊन बुद्धिवान वैद्यानें त्यांचें भस्म करावें किंवा त्यांच्याच खाणींतील त्यांच्याच जातींपैकीं सुलक्षण परंतु किमतीनें कमी अशा रत्नांचें भस्म केल्यास त्यांत पातक नाहीं. (१५५].

शिवाय जे गुण रत्नांत असतात तेच बहुतेक त्यांच्या उपरत्नांतहि आढळतात. परंतु ते गुण तितक्याच मानानें उपरत्नांत नसतात. कांहीं थोडे कमी असतात इतकाच काय तो रत्नांत आणि उपरत्नांत फरक. [१५६].

अथोपरत्नेषु वैक्रान्तोत्पत्तिनामगुणशोधनमारणानि ।

देव्या हते महादैत्ये माहिषासुरसंज्ञके ।
तद्देहरुधिरोद्भूता बिन्दवो यत्र यत्र हि ॥ १५७ ॥
पतिता विन्ध्यकाद्रेस्तु दक्षिणोत्तरतो रणे ।
वज्रकारास्तु ते जाता वैक्रान्ता इति विश्रुताः ॥ १५८ ॥

गौरीमते तु –

विकृता वज्रखण्डा ये वैक्रान्ताख्यां भजन्ति ते ।
जातयः शोधनं हिंसा गुणास्तेषां तु वज्रवत् ॥ १५९ ॥

अन्यश्च—

भैरवं गणनाथं च संपूज्य बलिपूर्वकम् ।
सुमुहूर्ते ततः कार्यं वैक्रान्तग्रहणं बुधैः ॥ १६० ॥
वैक्रान्तः श्वेतपीतादिभेदेनाष्टप्रकारकः ।
कारणे स्वर्णरूप्यादेः स्वस्ववर्णः शुभो मतः ॥ १६१ ॥
वैक्रान्तः कृष्णवर्णो यः षट्कोणो वसुकोणकः ।
मसृणो गुरुतायुक्तो निर्मलः सर्वासिद्धिदः ॥ १६२ ॥

उपरत्नांतिल वैक्रान्ता [तोरमल्ली] विषयीः--

दुर्गादेवीनें महिषासुर नांवाच्या महादैत्याचा वध केला तेव्हां त्याच्या रक्ताचे थेंब विन्ध्य पर्वतावर त्याच्या दाक्षिण आणि उत्तर बाजूस जेथें पडले तेथें तेथें हिऱ्याप्रमाणें एक रत्न उत्पन्न झालें. त्याचें नांव वैक्रांत अथवा तोरमल्ली [१५८].

गौरीच्या मतानें–

हिऱ्याचें विकार पावलेले जे तुकडे असतात त्यांना वैक्रांत असें नांव प्राप्त झालें आहे. परंतु त्यांची जात हिऱ्याचीच, आणि शोधन, मारणक्रिया व गुणधर्म हे सर्व हिऱ्याप्रमाणेंच आहेत. [१५९].

वैक्रांतासंबंधाचा प्रकार असा आहे कीं:--

कालभैरव, गणाधीश यांची पूजा करून त्यांना बलि व नैवेद्य वगैरे अर्पण करून सुमुहुर्तावर वैद्यानें वैक्रांत आणावा. शुभ्र, पिवळा इत्यादि रंगांवरून वैक्रांताचे आठ प्रकार आहेत. सुवर्ण करणें असेल तर पिवळा घ्यावा, चांदी करणें असेल तर पांढरा वैक्रांत घ्यावा. त्या त्या कामाकरितां तो तो वैक्रांत घ्यावा. तो शुभावह होतो. जो वैक्रांत काळ्या रंगाचा व षट्कोणी किंवा अष्टकोणी असतो आणि गुळगुळीत, वजनदार व निर्मळ असतो तो वैक्रांत सर्व सिद्धिदायक म्हणून समजावें [१६२]

गुणाः--

वैक्रान्तो वज्रसदृशो देहलोहकरो मतः ।
विषघ्नो रसराजस्य ज्वरकुष्ठक्षयप्रणुत ॥ १६३ ॥

अन्यत्रापि—

वैक्रान्तस्तु त्रिदोषघ्नः षड्रसो देहदार्ढ्यकृत् ।
पाण्डूदरज्वरश्वासकासयक्ष्मप्रमेहनुत् ॥ १६४ ॥
अशुद्धौ वज्रवैक्रान्तौ किलासं दाहसंततिम् ।
पार्श्वपीडां तथा पाण्डुं कुरुतौ तौ विशोधयेत् ॥ १६५ ॥

गुणधर्मः—वैक्रांत हा गुणांनीं हिऱ्याप्रमाणें आहे. त्याच्या योगानें देहसिद्धि म्हणजे आयुरारोग्य आणि लोहसिद्धि म्हणजे किमयाहि करतां येते. पाऱ्यांत जें विष असतें त्या विषाचा वैक्रांत नाश करतो, व ज्वर, कुष्ठ आणि क्षय यांचाहि धुव्वा उडवितो.

दुसऱ्या एका ग्रंथांतील वचनः—

वैक्रांत हा त्रिदोषनाशक, षड्रसयुक्त असून तो शरीर मजबूत करतो आणि पांडुरोग, उदर, ज्वर, श्वास, खोकला, कफ, क्षय आणि प्रमेह यांचा नायनाट करतो. पण जर अशुद्ध वैक्रांत किंवा हिरा हे उपयोगांत आणले तर पांढरें कोड, दाह, पांडुरोग, बरगडींत

कळा ह्या रोगांची पीडा मागें लागलीच म्हणून समजा. याकरितां वैक्रांत व हिरा हे शुद्ध करूनच वापरावे. (१६५)

शोधनमारणे—

वैक्रान्तो वज्रवच्छोध्यो ध्मातः सिक्तोऽश्वमूत्रके ।
वज्रवन्मृतिमापन्नो वज्रस्थाने प्रयोजयेत् ॥ १६६ ॥

प्रकारान्तरम्—

कुलित्थक्काथसंस्विन्नो वैक्रान्तः परिशुध्यति ।
म्रियतेऽष्टपुटैर्गन्धनिम्बूकद्रवसंयुतः ॥ १६७ ॥

इति वैक्रांतभस्म । सत्त्वप्रकारस्तु—

सत्त्वपातनयोगेन मर्दितश्च वटीकृतः ।
मूषास्थो घाटिकाध्मातो वैक्रांतः सत्त्वमुत्सृजेत् ॥ १६८ ॥

इति वैक्रांतसत्त्वम् । अथान्यः प्रकारः—

वैक्रांतानां पलं चैकं कर्षैकं टंकणस्य च ।
रविक्षीरैर्दिनं भाव्यं मर्द्य शिग्रुद्रवैर्दिनम् ॥ १६९ ॥
गुंजापिण्याकवन्हीनां प्रतिकर्षाणि योजयेत् ।
एतेन गुटिकां कृत्वा कोष्ठयिन्त्रे धमेद्दृढम् ।
शंखकुन्देन्दुसंकाशं सत्त्वं वैक्रांतजं भवेत् ॥ १७० ॥

इति वैक्रांतसत्त्वम् ॥

वैक्रांताची शुद्धि व भस्मः—

वैक्रांताची शुद्धि हिऱ्याप्रमाणें करावी. त्याला भट्टींत तापवून घोडऱ्याच्या मुतांत बुडवावें, म्हणजे त्या कृतीनें हिऱ्याप्रमाणेंच त्याचें भस्म होईल, आणि तें हिऱ्याच्या भस्माबद्दल उपयोगांत आणावें. (१६६)

दुसरा प्रकारः—

कुळथाच्या काढ्यांत वैक्रांत शिजवून वाफारून काढला म्हणजे तो शुद्ध होतो, व गंधक आणि लिंबाचा रस यांच्याशीं त्याचा खल करून आठ पुटें दिलीं म्हणजे त्याचें भस्म होतें. (१६७)

वैक्रांताचें सत्वः—सत्व काढण्याच्या ज्या पद्धति आहेत त्याप्रमाणें वैक्रांताचा खल करून त्याची वडी बनवावी आणि मुशीमध्यें ठेवून एक घटका आंच द्यावी, म्हणजे त्याचें सत्व पडेल.

दुसरा प्रकारः—

वैक्रांत तोळे चार आणि टांकणखार कर्ष एक यांना रुईच्या पाकाची भावना एक दिवस द्यावी. नंतर शेवग्याच्या रसांत एक दिवस खल करावा आणि गुंज, पिंड्याक (पेंड) आणि चित्रक ह्यांपैकीं प्रत्येक जिन्नस एकेक कर्ष घेऊन त्यांत तो खललेला वैक्रांत घोटून एकत्र करून गोळी करावी व कोष्ठीयंत्रांत ती गोळी ठेवून सपाटून आंच द्यावी, म्हणजे शंख, कुंद अंगर चंद्र यांच्याप्रमाणें वैक्रान्ताचें शुभ्रवर्णी सत्व पडतें (१७०). याप्रमाणें वैक्रांतक्रिया सांगितली.

अन्येषां तूपरत्नानां शोधनमारणाविधिार्श्वेत्यः।

गुणास्तु—

रत्नानि सोपरत्नानि चक्षुष्याणि सराणि च ।
ग्रहालक्ष्मीविषक्षैण्यपापसंतापजिति च ॥ १७१ ॥

भाक्षितानि तु—

यक्ष्मपांडुप्रमेहार्शःकासश्वासभगन्दरान् ।
ज्वरवीसर्पकुष्ठार्तिशूलकृच्छ्रव्रणामयान् ।
घ्नन्ति पुण्ययशःक्रान्ति पुण्यानि च नृणां भृशम् ॥ १७२ ॥
अथ नवग्रहसानुकूल्यार्थं नवरत्नजटितमुद्रा धार्या । तस्यां

बाकीच्या उपरत्नांचें शोधन व मारणाक्रिया नक्की आढळत नाहीं.

गुणः—रत्नें आणि उपरत्नें हीं नेत्रांना हितकर व सारक असतात; त्यांच्या योगानें ग्रह, दारिद्र्य, विष, क्षीणता, पातकें, सन्ताप या रोगांवर जय मिळवितां येतो.

त्याच्या भस्माचें सेवन केल्यासः—

कफ, क्षय, पांडु रोग, प्रमेह, मूळव्याध, खोकला, श्वास, भगंदर, ज्वर, विसर्प, कुष्ठ, यातना, शूळ, मूत कोंडणें, व्रण इत्यादि रोग नष्ट होतात. सत्कीर्तीचा लाभ होतो. शिवाय अनेक प्रकारचें पुण्य भरपूरपणें पदरीं पडतें. (१७२)

नवरत्नविन्यासप्रकारमाह--

दिक्प्राची कुलिशस्य, मौक्तिकमणेराग्नेयिका, दाक्षिणा
दिग्वल्लीप्रभवस्य, नैर्ऋतककुप् गोमेदसो, वारुणी ।

नीलांशोरथ, दिक् विदूरजमणेर्वायोः, कुबेरस्य दिक्
पुष्पस्याथ, हरिन्मणेर्हरहरिच्छेषस्य शेषा हरित ॥ १७३ ॥

कुलिशं वज्रं, वल्लीप्रभवं प्रवालं, नीलांशुरिन्द्रनीलः, विदूरजं वैदूर्यं, पुष्पः पुष्परागः, हरिन्मणिः गरुडोद्धारः, हरहरित ऐशानी, शेषस्य माणिक्यस्य, शेषा मध्या दिक्, कार्णिकायां न्यसेदित्यर्थः । अथाशक्तस्य ग्रहप्रातिकूल्ये धारणदाने आह ॥

माणिक्यं द्युमणेर्बुधस्य गरुडोद्धारो गुरोः पुष्पकं
गोमेदं तमसः प्रवालमवनीसूनोर्विधोर्मौक्तिकम् ।
नीलं मंदगतेः कवेस्तु कुलिशं केतोर्बिडालाक्षकं
रत्नं रत्नाविदो वदन्ति विहितं दाने तथा धारणे ॥ १७४ ॥

द्युमणेः सूर्यस्य, तमसः राहोः, अवनीसूनोर्मंगलस्य, मन्दगतेः शनैश्चरस्य, कवेः शुक्रस्य, बिडालाक्षकं विदूरमाणिः, एषां प्रातिकूल्ये यथासंभवं दानं धारणं च कार्यम् ॥

नवग्रहांची अनुकूलता व्हावी म्हणून नवरत्नें जडलेली आंगठी करून हातांत घालावी. तीं रत्नें कोणत्या अनुक्रमानें बसवावीं तें सांगतोः—

पूर्वेकडे हिरा, आग्नेयेस मोतीं, दक्षिणेस वल्लीप्रभाव, नैऋत्य दिशेस गोमेद, पश्चिमेस लीलांशु, वायव्येस विदूरज, उत्तरेस पुष्प, शिवदिशेस हरित गरुडोद्धार किंवा पाच, आणि राहिलेल्या दिशेस माणिक याप्रमाणें नऊ रत्नें जडावीं. (१७३)

हिरा या शब्दाबद्दल मुळांत "कुलिश" शब्द आहे. वल्लीप्रभव म्ह० पोंवळें, नीलांशु म्ह० इंद्रनील, विदूरज म्ह० वैडूर्य, पुष्प म्हणजे पुष्कराज, हरित गरुडोद्धार म्हणजे पाच, शिवदिशा म्ह० ईशान्य, राहिलेली दिशा म्हणजे मध्यभाग, अर्थात आंगठीच्या मध्य बिंदूवर माणिक जडावें आणि भोंवतीं आठ रत्नें जडावीं. तसेंच ग्रह प्रतिकूल असतील तर कोणत्या ग्रहाकरितां कोणतें रत्न दान द्यावें तें लिहितोः—

सूर्याच्या प्रसन्नतेसाठीं माणिक, बुधाला पाच, गुरुच्या प्रसन्नतेकरितां पुष्कराज, अंधकारमय ग्रहाकरितां गोमेद, भूमीसुतासाठीं पोंवळें, चंद्राकरितां मोतीं, मन्दग्रहाकरितां इंद्रनील, कविसाठीं हिरा, केतुकरितां वैडूर्य. यांप्रमाणें नवग्रहांच्या प्रसन्नतेकरितां तीं तीं रत्नें दान करावीं किंवा अंगावर धारण करावीं. (१७४)

द्युमणि म्ह. सूर्य, अंधकारमयग्रह म्हणजे राहु, भूमिपूत्र म्हणजे मंगळग्रह, मन्दग्रह ह्मणजे शनि, कवि म्हणजे शुक्र, वैडूर्य म्हणजे लसण्या. याप्रमाणें जो ग्रह प्रतिकूल असेल त्याकरतां जुळल्यास रत्न दान करावें व अंगावरहि वापरावें.

अथ मुक्ताफलानां द्रुतिं तथाऽन्येषामपि रत्नानां द्रुतिप्रकारमाह-

मुक्ताफलानि सप्ताहं वेतसाऽम्लेन भावयेत् ।
जंबीरोदरमध्ये तु धान्यराशौ निधापयेत् ॥ १७५ ॥
पुटपाकेन तच्चूर्णं द्रवते सलिलं यथा ।
कुरुते योगराजोऽयं रत्नानां द्रावणं प्रिये ॥ १७६ ॥
इति मुक्तादिरत्नद्रुतयः । अथ सौराष्ट्रीसत्वम्--
सिताऽसिता च सौराष्ट्री गोपित्तैर्भावयेत्तु तात् ।
शतवारं प्रयत्नेन मित्रपंचकसंयुताम् ।
ध्मानान्मुंचाति सत्वं तु क्रामकं कोष्ठयन्त्रके ॥ १७७ ॥

अथ सस्यकसत्वम्-

सस्यकं चूर्णितं भाव्यं दिनं शशकशोणितैः ।
स्त्रीमूत्रे वाऽथ यामैकं तत्पादांशां निशां क्षिपेत् ॥ १७८ ॥
मर्द्य करंजतैलेन यामैकं गोलकं च तत् ।
अन्धमूषागतं ध्मातं घटिकार्धं दृढाग्निना ।
इंद्रगोपकसंकाशं सत्वं मुंचाति शोभनम् ॥ १७९ ॥

इति श्रीसौराष्ट्रदेशोद्भवसारस्वतकुलावतंसोपाध्यायश्रीमाधवविरचिते आयुर्वेदप्रकाशे पंचमोऽध्यायः ॥५॥

आतां मोत्याची व त्याचप्रमाणें इतर रत्नांची द्रुतिक्रिया लिहितों:--

मोतीं खलून त्याला अम्ल वेतसाच्या रसाच्या भावना सात दिवस द्याव्या. नंतर तें चूर्ण लिंबाच्या फळांत ठेऊन धान्याच्या राशींत खुपसून ठेवावें. मग पुटपाक झाला ह्मणजे त्या चूर्णाचें पाणी होतें. पार्वती, याप्रमाणें हा योग द्रुतिकरितां सांगितला. (१७६)

आतां सौराष्ट्राची सत्वक्रिया लिहितों:—

सौराष्ट्री काळी आणि पांढरी अशा दोन रंगाची असते. तिला गोरोचनाच्या शंभर भावना प्रयत्नानें द्याव्या, आणि मित्र पंचकाबरोबर खलून कोष्ठयंत्रांत आंच द्यावी, म्हणजे (शरीरांत) चोहोंकडे पसरणारें असें सत्व निघतें. (१७७).

सस्यकाचें सत्व.

सस्यकाचें चूर्ण करून सशाच्या रक्ताची त्याला भावना एक दिवस द्यावी किंवा स्त्रीमूत्राची भावना एक प्रहर द्यावी. नंतर त्यांत चौथ्या हिश्यानें हळदीची पूड टाकावी आणि करंजाचें तेल घालून एक प्रहरभर खल करावा; व गोळी करून अन्धमूषेंत अर्ध्या घटकेपर्यंत कडक आंच द्यावी, म्हणजे इंद्रगोप किटकाच्या रंगाप्रमाणें लाल रंगाचें सत्व निघतें.

याप्रमाणें रत्नें आणि उपरत्नें यांची क्रिया आहे.

पांचवा अध्याय समाप्त.

अथ षष्ठोऽध्याय.

अथ विषोपविषलक्षणजातिगुणसेवापरिहाराध्यायं व्याख्यास्यामः ।

अथ विषोत्पत्तिः—

शृणु देवि प्रवक्ष्यामि यत्रोत्पन्नं महाविषम्।
भेदांस्तस्य वरारोहे यत्र तत्र सविस्तरम् ॥ १ ॥
देवदैत्योरगाः सिद्धा अप्सरोयक्षराक्षसाः ।
पिशाचाः किन्नराश्चैव मिलित्वा च वरानने ॥ २ ॥
एकतो बलिराजस्तु ब्रह्माद्याश्च तथैकत्।
मन्थानं मन्दरं कृत्वा नागराजेन वेष्टितम् ॥ ३ ॥
क्षीराब्धिमन्थनं तत्र प्रारब्धं सुरसुन्दरि ।
सुधादीनि सुरत्नानि निर्गतानि ततः परम् ॥ ४ ॥
अतीव मन्थनाद्देवि मन्दराघातवेगतः ।
आहिराजश्रमादेव विषज्वाला विनिर्गता ॥ ५ ॥
ततोऽतिघोरा सा ज्वाला निमग्ना क्षीरसागरे ।
(तथा तत्रैव चोत्पन्नं कालकूटं महाविषम् ।
प्रलयानलसंकाशं क्रुद्धः काल इवोत्कटम् ॥)
तां दृष्ट्वा विबुधाः सर्वे दानवाश्च महाबलाः ॥ ६ ॥
विषण्णवदनाः सद्यः प्राप्ताश्चैव मदान्तिकम् ।
ततस्तैः प्रार्थ्यमानोऽहमपिबं विषमुत्तमम् ॥ ७ ॥
अभुक्ततोऽवशिष्टं तु मूलरूपेण तद्विषम् ।
पत्ररूपेण कुत्रापि मृत्तिकारूपतः क्वचित् ॥ ८ ॥
कन्दरूपेण कुत्रापि तेषां लक्षणमुच्यते ।

अध्याय सहावा.

विषें आणि गुणविषें यांविषयीं.

हे पार्वती, जलाल विष कोठें व कसें उत्पन्न झालें तें तुला आतां सांगतों आणि, हे सुंदरी, त्यांतील भेदांचीहि तुला सविस्तर माहिती करून देतों.

देव, दैत्य, सर्प, सिद्ध, अप्सरा, यक्ष, राक्षस, पिशाच्च, किन्नर हे सर्व मिळून, हे सुंदरी, समुद्रमंथन करूं लागले.

तेव्हां एका बाजूला बली आणि दैत्य व दुसऱ्या बाजूकडे ब्रह्मादिक देव असे उभे राहून नागराज वासुकीचा दोर आणि मंदराचल पर्वताची रवी करून क्षीरसमुद्राचें मंथन सुरू केले; त्या मंथनाच्या अमृत इत्यादि चौदा रत्नें बाहेर आलीं. परंतु मंथनाच्या जोराचें मंदराचलाचे धक्के बसल्यानें वासुकी थकून गेला व त्या योगानें त्याच्यापासून विषारी ज्वाला बाहेर पडूं लागल्या.(५)

त्या भयंकर विषारी ज्वाला क्षीरसमुद्रांतच जिरल्या; पण त्यामुळें समुद्रांतून काळकूट नांवाचें अतिभयंकर विष उत्पन्न झालें.

तें पाहून देव व दैत्य हे दोघे जरी बलिष्ठ होते तरी त्यांची गाळण उडाली आणि ते धांवत माझ्याचकडे आले. नंतर त्यांनी प्रार्थना केली म्हणून मीं तें काळकूट विष प्राशन केलें, तरी देखील त्यांतील कांहीं भाग कोठें वनस्पतीरूपानें, कोठें मृत्तिका (खनिज रूपानें) कोठें कन्दरूपानें पृथ्वीवर सांपडतो. त्याचें लक्षण सांगतों

विषं तु गरलं क्ष्वेडं कालकूटं च नामतः ।
अष्टादशाविधं ज्ञेयं विषं कन्दभवं बुधैः ॥ ९ ॥
तेष्वष्टौ सौम्यभेदाः स्युर्भक्षणाद्घ्नन्ति मानवम् ।
उग्रास्तु दश संस्पर्शाद्घ्राणाद्वाऽपि मारकाः ॥ १० ॥

यथा—

सक्तुको मुस्तकः कौर्मो दार्वीकः सार्षपस्तथा ।
सैकतो वत्सनाभश्च श्वेतशृङ्गी तथैव च ॥ ११ ॥
भैषज्यर्थं तु चैतानि विषाण्यष्टौ समाहरेत् ।
जराव्याधिहराणि स्युर्विधिना शीलितानि हि ॥ १२ ॥

लक्षणापूर्वी नांवें सांगतोः—विष, गरल, क्ष्वेड, काळकुट इत्यादि नांवाचीं विषें १८ प्रकारचीं आहेत. हीं सर्व कन्दविषें होत. म्हणजे विषारी झाडांच्या मुळाशीं उत्पन्न होणारे कन्द होत. अशा झाडांचे कन्द महाविषारी असतात. (९)

त्यांमध्यें आठ कंद जरा सौम्य आहेत, म्हणजे ते पोटांत गेले तरच मनुष्य मरतो. परंतु दुसरे दहा कंद तर फारच भयंकर आहेत. त्यांना नुसता स्पर्श केला किंवा त्यांचा वास घेतला तरी तो घातक होतो. (१०)

उदाहरणार्थ सक्तुक, मुस्तक, कौर्म, दार्वीक, सार्षप, सैकत, वत्सनाभ आणि श्वेतशृंगी हे विषांचे आठ प्रकार सौम्य आहेत. म्हणून त्यांचा औषधांत उपयोग करतात. तीं विषें यथायोग्य पद्धतीनें आणि योग्य प्रमाणानें पोटांत घेतलीं असतां म्हातारपण आणि व्याधि यांचा नाश होतो.

लक्षणानि—

चित्रमुत्पलकन्दाभं सुपेष्यं सक्तुवद्भवेत् ।
सक्तुकं तद्विजानीयाद्दीर्घवेगं महोत्कटम् ॥ १३ ॥
ह्रस्ववेगं च रोगघ्नं मुस्तकं मुस्तकाकृति ।
कूर्माकृति भवेत्कौर्मं दार्वीकं हि फणाकृति ॥ १४ ॥
ज्वरहृत्सार्षपं रोमि सर्षपाभकणान्वितम् ।
स्थूलसूक्ष्मकणैर्युक्तः श्वेतपीतैर्विरोमकः ॥ १५ ॥
ज्वराद्धिसर्वरागघ्नः कन्दः सैकत उच्यते ।
यः कन्दो गोस्तनाकारो न दीर्घोऽङ्गुलिपञ्चकात् ॥ १६ ॥
न स्थूलो गोस्तनादूर्ध्वं द्विविधो वत्सनाभकः ।
आशुकारी लघुस्त्यागी शुक्लः कृष्णोऽन्यथा भवेत् ॥ १७ ॥
प्रयोज्यो रोगनाशे तु जारणायां रसायने ।
गोशृङ्गवद्विधा शृङ्गी श्वेतः स्याद्बहिरन्तरे ॥ १८ ॥
एतानि सक्तुकादीनि वातरक्ते त्रिदोषके ।
उन्मादेऽपस्मृते कुष्ठे मोहे चापि नियोजयेत् ॥ १९ ॥
वातरक्ते वातप्रधानरोगे रक्तप्रधानरोगे उभयप्रधानरोगे वा

इति तत्त्वार्थः

आतां त्यांचें आठांचें वर्णन देतों सक्तु ह्या कन्दाचें सहज पीठ करतां येतें, म्हणून त्यास सक्तुक म्हणतात. हें सत्तूप्रमाणें दीर्घवेगी आहे. याची लहर फार वेळ टिकते आणि ती प्राणघातक असते.दुसरें मुस्त नांवाचें विष आहे, त्याचा वेग अथवा लहर थोडा वेळ टिकते, म्हणून त्याचा रोगनाशक औषधांत उपयोग करतात. या विषाचा आकार नागरमोथ्याप्रमाणें दिसतो कौर्म विषाचा कंद कूर्माकार व दार्विकाच्या कंदाचा आकार नागफणीप्रमाणें असतो. सार्षप विष बेतानें सेवन केलें असतां ज्वराचा नाश होतो. ह्याच्या काद्यांवर मोहरीएवढे कण असतात व मध्यें मध्यें बारीक खोची असतात. सैकत विषाचा जो कन्द असतो त्यावरहि वाळूप्रमाणें लहान मोठे, पांढरे, पिवळे असें कण असतात; पण त्याच्यावर छिद्रें किंवा लव नसते. या कंदानेंहि ज्वराचा नाश करतां येतो. असा हा सैकत विषाचा कन्द होय. गाईच्या सडाप्रमाणें बारीक व लांबट परंतु पांच अंगुळांपेक्षां जास्त लांब नव्हे व गाईच्या सडापेक्षां जास्त जाड नव्हे असा दोन तऱ्हेचा एक विषारी कंद आहे. त्याला बचनाग म्हणतात. हा पांढुरका व काळ्या रंगाचाहि असतो, त्याचा परिणाम झटपट होतो. तो तावडतोब भिनणारा आणि पोटांतील पदार्थ बाहेर टाकणारा असा आहे. त्याचा उपयोग रोगनाश करण्याकडे आणि पाऱ्यांत बीज जिरविण्याकडे अवश्य करावा. ज्याला गाईच्या शिंगाप्रमाणें शिंगें असतात व जो आंतबाहेर पांढऱ्या रंगाचा असतो तो कंद श्वेतशृंगीचा होय. (१८)

या आठ विषांचा उपयोग वातरक्त, त्रिदोष, मोह, उन्माद, अस्पमार, कुष्ठ या रोगांचा संहार करण्याकडे करावा (१९)

वातरक्त म्हणजे ज्यामध्यें वाताचा जोर असतो, रक्तदोषाचा जोर असतो किंवा दोहोंचाहि जोर असतो अशा वातरक्त रोगांवर उपयोग करावा असा खरा अर्थ आहे.

अथ वर्ज्यानि—

कालकूटस्तथा मेषशृङ्गी दर्दुरकस्तथा ।
हालाहलश्च कर्कोटो ग्रन्थिर्हारिद्रकस्तथा ॥ २० ॥
रक्तशृङ्गी केसरश्च यमदंष्ट्रा च पण्डितैः ।
त्याज्यानीमानि योगेषु विषाणि दश तत्त्वतः ॥ २१ ॥

लक्षणानि—

देवासुररणे देवैर्हतस्य पृथुमालिनः ।
दैत्यस्य रुधिराज्जातस्तरुरश्वत्थसंनिभः ॥ २२ ॥
निर्यासः कालकूटोऽस्य मुनिभिः परिकीर्तितः ।
सोऽहिच्छत्रे शृङ्गवेरे कोङ्कणे मलये भवेत् ॥ २३ ॥

शृङ्गवेरः पर्वतविशेषः ॥

घनं सुकठिनं रूक्षं भिन्नाञ्जनसमप्रभम् ।
कन्दाकारं समाख्यातं कालकूटं महाविषम् ॥ २४ ॥

ज्या विषांचा उपयोग औषधांत करीत नाहींत तीं दहा आहेत. त्यांचीं नांवें काळकूट, मेषशृंगी, दर्दुरक, हालाहल, कर्कोट, अब्धि, हारिद्रक, रक्तशृंगी, केसर आणि यमदंष्ट्र अशीं आहेत.

त्यांचीं लक्षणें:—

पूर्वी देवदैत्यांचें घोर युद्ध झालें त्यांत ' पृथुमाली' नांवाचा दैत्य मारला गेला. त्याच्या रक्तापासून पिंपळाच्या झाडाप्रमाणें दिसणारा एक विषारी वृक्ष उत्पन्न झाला. त्या वृक्षाचा जो काळाकुट्ट चीक तेंच कालकूट विष होय. हा वृक्ष "अहिच्छत्र " या नांवाच्या नगरांत, शृंगवेर नांवाच्या पर्वतावर. कोंकण प्रांतांत किंवा मलय पर्वतावरहि आढळतो. (२३)

काळकूट हा महा भयंकर विषारी चीक घट्ट, रूक्ष, दगडाप्रमाणें कठीण आणि रंगानें काळ्याभोर काजळाप्रमाणें असतो. त्याचा आकार एकाद्या कन्दाप्रमाणें असून त्याला काळकूट विष म्हणतात. (२४)

लक्षणान्तरम्—

वृत्तः कन्दो भवेच्छुष्को जम्बीरफलवच्च यः ।
ज्ञानीयात्तं कालकूटं घ्राणमात्रान्मृतिप्रदम् ॥ २५ ॥
मेषशृङ्गाकृतिः कन्दो मेषशृङ्गीति कीर्त्यते ।
दर्दुराकृतिकः कन्दो दर्दुरः कथितस्तु सः ॥ २६ ॥
गोस्तानाभफलो गुच्छस्तालपत्रच्छदस्तथा ।
तेजसा यस्य दह्यन्ते समीपस्था द्रुमादयः ॥ २७ ॥
असौ हालाहलो ज्ञेयः किष्किन्धायां हिमालये ।
दक्षिणाब्धितटे देशे कोङ्कणेऽपि च जायते ॥ २८ ॥

अन्तर्नीलो बहिः श्वेतो हालाहल उदाहृतः ।
कर्कोटाभं तु कर्कोटं खरं ब्राह्येऽन्तरे मृदु ॥ २९ ॥
हरिद्राग्रन्थिवद्ग्रन्थिः स स्यात्कृष्णोऽतिभीषणः ।
मूलाग्रयोस्तु वृत्तः स्यादायतः पीतगर्भकः ॥ ३० ॥
कञ्चुकाढ्यः स्निग्धपर्वो हारिद्रः स तु कन्दकः ।
गोशृङ्गेऽग्रे च निक्षिप्ते नासयाऽसृक्प्रवर्तते ॥ ३१ ॥
लघुर्गोस्तनवत्कन्दो रक्तशृङ्गीति ताद्विषम् ।
शुष्कार्द्रवत्साकिञ्जल्कं मध्ये तत्केसरं विदुः ॥ ३२ ॥
श्वदंष्ट्रारूपसंस्थाना यमदंष्ट्रेति सोच्यते ।
रसायने धातुवादे विषवादे क्वचित्क्वचित् ।
दशैतानि प्रयुज्यन्ते न भैषज्ये रसायने ॥ ३३ ॥

एका ग्रंथांत असें वर्णन दिलें आहे कीं:—

वाटोळा, वाळलेला व आकारानें लिंबाएवढा असा कंद काळकूट विषाचा असतो. काळकूट विष इतकें भयंकर आहे कीं, त्याचा नुसता वास घेतला तरी देखील मनुष्य किंवा पशु ठार मरतो. (२५)

दुसऱ्या विषारी कंदाचा आकार मेंढ्याच्या शिंगाप्रमाणें असतो, म्हणून त्याला "मेषशृंगी" म्हणतात. दर्दुरक विषाच्या कंदाचा आकार बेडकाप्रमाणें असतो, म्हणून त्याला तसें नांव दिलें आहे. गाईच्या सडाप्रमाणें ज्याच्या फलांचा गुच्छ दिसतो, आणि पानें ताडाच्या पानांप्रमाणें असतात, असा एक विषारी वृक्ष आहे. तो इतका जलाल आहे कीं, त्याच्या तेजानें आसपासचीं झाडें देखील जळून जातात. ह्मणून या विषाला हालाहल विष म्हणतात. त्यानें मृत्यूहि हालेाहाल येतो. हा हालाहल विषाचा वृक्ष किष्किंधेच्या रानांत किंवा हिमालयांत, अगर दक्षिणसमुद्राच्या किनाऱ्यावर किंवा हुना कोंकणांत देखील उत्पन्न होतो. हालाहल विषाचा कंद आंतल्या बाजूनें निळा व बाहेरून पांढरा असतो. (२८॥)

कर्कोट विषाचा कांदा कर्कोट फळाप्रमाणें बाहेरून खडबडित परंतु आंतून मऊ असा असतो; तसेंच हारिद्रकाच्या कंदाला हळदीप्रमाणें गांठी असतात. हा कंद रंगानें बाहेरून काळा असून

फार जलाल आहे. तो मुळाशीं व शेंड्यांशीं वांकडा असतो आणि (हळदीप्रमाणेंच) लांबट व आंत पिवळ्या रंगाचा असतो (३०). त्याला वर सालपट असतें आणि त्याचा पेरें स्निग्ध असतात. अशा प्रकारचें स्वरूप हारिद्र विषाचें आहे.

ज्याचे शेंडे गाईच्या शिंगाप्रमाणें वळलेले असतात, जो नाकाला लावल्याबरोबर नाकांतून रक्त वाहूं लागतें, असा रक्तशृंगी नांवाचा विषारी कंद आहे तो वजनांत हलका व आकारानें गाईच्या सडाप्रमाणें असतो. तो दिसण्याला वाळलेल्या कुड्याप्रमाणें दिसतो, परंतु त्याला मध्यें केसर असतात. त्याला "केसर" हेंच नांव आहे. आतां दहावा विषारी कंद यमदंष्ट्र हा आहे. हा दिसण्यांत कुत्र्याच्या दाढेप्रमाणें तीक्ष्ण दिसतो आणि तो फारच विषारी असल्याकारणानें त्याला "यमदंष्ट्र" असें नांव पडलें आहे.

या दहा विषांचा उपयोग फार थोडया प्रसंगीं ह्मणजे रासायनिक क्रियेंत पारदप्रयोगांत, किमयेंत आणि विषप्रयोग व त्याचा उतारा अशा कारणांकरितां होतो, नाहीं असें नाहीं ; पण आरोग्यदायक औषधीक्रियेंत व आरोग्यकारक रसायनांत मात्र या दहा विषांचा उपयोग करीत नाहींत. (३३)

अथ कौश्चिन्नव भेदा उक्तास्ते यथा—

वत्सनाभः सहारिद्रः सक्तुकश्च प्रदीपनः ।
शृङ्गीकः कालकूटश्च सौराष्ट्रिकस्तथैव च ॥ ३४ ॥
हालाहलो ब्रह्मपुत्रो विषभेदा अमी नव ।
पलाशपत्रवत्पत्रैस्तद्बीजसदृशैः फलैः ॥ ३५ ॥
स्थूलः कन्दो भवेत्तस्य प्रभावस्तु महान् स्मृतः ।
सिन्दुवारसदृक्पत्रो वत्सनाभ्याकृतिस्तथा ॥ ३६ ॥
यत्पार्श्वे न तरोर्वृद्धिर्वत्सनाभः स भाषितः ।
वर्णतो लोहितो यः स्याद्दीप्तिमान् दहनप्रभः ॥ ३७ ॥
महादाहकरो घ्राणात्कथितः स प्रदीपनः ।
वर्णतः कपिलो यत्स्यात्तथा भवति सारकः ।
ब्रह्मपुत्रः स विज्ञेयो जायते मलयाचले ॥ ३८
शेषाः पूर्वमुक्ता एव । अथैषामुत्पत्तिस्थानानि-वत्सनाभःपर्व तक्षोणीपूत्पद्यते, हारिद्रो हरिद्राकक्षेषु;/सक्तुकः पर्वतदेशे, प्रदीपन-

समकक्षेषु, सौराष्ट्रीकः सुराष्ट्रदेशे, शृङ्गीकः कपिलेषु नदीकक्षेषु, कालकूटोऽहिच्छत्रादौ, हालाहलः किष्किन्धादौ, ब्रह्मपुत्रः ब्रम्हनाम कश्चन पर्वतप्रदेशास्तस्य कक्षेषु ॥

कांहीं ग्रंथकार विषाचे नऊच भेद मानतातः—

वत्सनाभ म्ह० बचनाग, हारिद्र, सक्तुक, प्रदीपन, सौराष्ट्रिक शृङ्गिक, काळकूट, हालाहल, ब्रम्हपुत्र असे नऊ भेद विषाचे आहेत. ह्यांपैकीं बचनाग प्रसिद्ध आहे. त्याचीं पानें पळसाच्या पानाप्रमाणें आणि फळ पळसाच्या बीजाप्रमाणें असतें. ह्याच्या विषाचा प्रभाव फार भयंकर असतो. निर्गुडीच्या पानाप्रमाणें सुद्धां बचनागाचीं पानें असतात आणि मुळीचा आकार वासराच्या बेंबींतील नाळेप्रमाणें असतो. बचनागाच्या आसपास चांगलें झाड वाढसिच लागत नाहीं. बचनाग अशा प्रकारचा असतो.

रंगानें तांबडा आणि पानें पिसाऱ्याप्रमाणें असून जो अग्नीप्रमाणें लाल असतें व नाकाजवळ नेलें असतां आगीनें जें नाकाचा भडका करून सोडतें, तें प्रदीपन विष होय. जें: रंगानें काळें व पोटांत गेलें असतां भयंकर जुलाब होतात, तें ब्रम्हपुत्र नांवाचें विष हें मलयाचलावर सांपडतें (३८). दुसऱ्या विषांचें वर्णन वर आलेलें आहेच.

आतां या विषांच्या उत्पत्तीचीं स्थानें सांगतों. बचनाग पर्वताच्या खोऱ्यांत, हारिद्र हळदीच्या बेटांत, सक्तुक पर्वतावर, प्रदीपन सपाट प्रदेशांत, सौराष्ट्रिक काठेवाडांत, शृङ्गिक नदीकाठच्या काळ्या जमिनींत, कालाकूट अहिच्छत्र नगरींत, हालाहल किष्किधेंत, ब्रम्हपुत्र ब्रह्म या नांवाच्या एका पर्वताच्या खोऱ्यांत याप्रमाणें त्या त्या ठिकाणीं सांपडतात.

अथैषां वर्णाः—

ब्राह्मणं पाण्डुरं विद्यात्क्षत्रियं रक्तवर्णकम् ।
वैश्यं पीतप्रभं शूद्रं कृष्णवर्णं विनिन्दितम् ॥ ३९ ॥
ब्राह्मणं दीयते रोगे क्षत्रियं विषभक्षणे ।
वैश्यं व्याधिषु सर्वेषु सर्पदष्टाय शूद्रकम् ॥ ४० ॥

अथ विषगुणाः—

विंष रसायनं बल्यं वातश्लेष्मविकारनुत् ॥
कटुतिक्तकषायं च मदकारि सुखप्रदम् ॥ ४१ ॥

व्यवायि शीतनुद्ग्राहि कुष्ठवातास्रनाशनम् ।
श्वासकासाग्निमांद्यानि प्लीहोदरभगन्दरान् ।
गुल्मपांडुव्रणार्शांसि नाशयेद्विधिसेवितम् ॥ ४२ ॥

अन्यत्रापि—

विषं प्राणहरं प्रोक्तं व्यवायि च विकाशि च ।
वातकफहृदाग्नेयं योगवाहि मदावहम् ॥ ४३ ॥
तदेव युक्तियुक्तं तु प्राणदायि रसायनम् ।
पथ्याशिनां त्रिदोषघ्नं बृंहणं वर्यिवर्धनम् ॥ ४४ ॥

व्यवायि सकलकायं व्याप्य पाकगमनशीलं, विकाशि ओजः-शोषणपूर्वकसंधिबंधशिथिलीकरणशीलं, आग्नेयं अधिकांगिन्यंशं, योगवाहि सांगिगुणग्राहकं, मदावहं तमोगुणाधिक्येन बुद्धिवि-ध्वंसकम् ॥

आतां विषाच्या रंगाचे सामान्य भेद सांगतोः--

पांढुरके विष तें ब्राह्म विष, तांबड्या रंगाचें क्षत्रिय, पिवळें वैश्य जातीचें आणि काळें शूद्र जातीचें समजावें. तें अति जहरी असतें.

गुणः—

विष हेंहि रसायन आहे. त्याच्या अंगीं बलवर्धक सामर्थ्य असून तें वात, कफ हे विकार नाहींसें करतें; तें तीक्ष्ण, कडू, तुरट, कैफ आणणारें व (केव्हां केव्हां) सुखकारकहि होतें. तें व्यापक, शैत्य नाहींसें करणारें, स्तंभक आणि योग्य पद्धतीनें घेतल्यास कुष्ठ, वात, रक्तदोष यांचा परिहार करतें व अग्निमांद्य, श्वास, खोकला, पानथरी, उदर, भगंदर अशा भयंकर रोगांचाहि निःपात करतें; आणि त्याचप्रमाणें गुल्म, पांडुरोग, व्रण, मूळव्याध ह्यांचाहि नाश करतें. (४२)

दुसऱ्या ग्रंथांतंहि असेंच वर्णन आहे.

विष हें प्राणहरक, शरीराला व्यापणारें, शरीर घसटून टाकणारें, तीव्र, वातकफनाशक, योगवाही व बेहोष करणारें असें असतें. परंतु त्याचा अकलेनें उपयोग केला तर तें प्राणांचें रक्षण करतें व रसायनाप्रमाणें गुण देतें आणि पथ्यानें राहणाऱ्या मनुष्याचे त्रिदोषजन्य रोग दूर करून त्यांना पुष्टता व वीर्यवृद्धि यांची जोड करून देते. (४४)

"व्यापणारें" म्हणजे सर्व शरीरांत भिनून परिणाम झटपट घडवून आणणारें, घसटून टाकणारें म्ह० "विकाशी", अर्थात शरीरांतील ओज शोषून घेऊन साधन् सांधे खिळखिळे करून मनुष्याला बेजार करणारें असा अर्थ आहे. तीव्र म्हणजे जलाल. 'योगवाहि' याचा अर्थ असा कीं, दुसऱ्या औषधाशीं मिसळून दिलें असतां त्या औषधाच्या गुणाला जोर आणणारें, बेहोष करणारें म्हणजे तमोगुणाचा जोर वाढवून विचारशक्ति नाहींशी करणारें, अशा गुणाचें विष असतें.

अथ विषशोधनम्—

ये दुर्गुणा विषेऽशुद्धे ते स्युर्हीना विशोधिते ।
तस्माद्विषं प्रयोगेषु शोधितं योजयेद्भिषक् ॥ ४५ ॥

यथा—

उद्धरेत्फलपाके तु नवं स्निग्धं घनं गुरु ।
अव्यावृत्तं विषघ्नैस्तु वातादिभिरशोषितम् ॥ ४६ ॥
विषहरैर्मयूरमण्यादिभिः ॥
कृत्वा चणकवत्स्थूलान् विषभागांस्तु भाजने ।
तत्र गोमूत्रकं क्षिप्त्वा प्रत्यहं नित्यनूतनम् ॥ ४७ ॥
शोषयेत्त्रिदिनादूर्ध्वं धृत्वा तीव्रातपे ततः ।
प्रयोगेषु प्रयुंजीत भागमानेन तद्विषम् ॥ ४८ ॥
इयं शुद्धिः ग्रीष्मर्त्वादावुचिता, तत्र तीव्रातपसद्भावात् ॥
रक्तसर्षपतैलेन लिप्ते वाससि धारयेत् ।
विषं शुद्धं प्रयत्नेन नान्यत्र गुणहानितः ॥ ४९ ॥

अथ तीव्रातपाभावे प्रकारांतरेण शोधनं—

कृत्वा चणकवत्स्थूलान् विषभागांस्तु स्वेदयेत् ।
गोदुग्धे घटिकाः पंच शुद्धिमायाति तद्विषम् ॥ ५० ॥
न प्रोक्तं शोधनं यस्य विषस्योपविषस्य वा
गोदुग्धे स्वेदनं तस्य कर्तव्यं शुद्धिकारकम् ॥ ५१ ॥

आतां विषशुद्धि सांगतोंः—

विषांत जे जे वाईट गुण असतात ते दोष शुद्धीनें जातात; निदान पुष्कळ कमी होतात. म्हणून वैद्यानें विषाची शुद्धि करूनच तें उपयोगांत आणावें. (४५)

विषापासून उपयोग व्हावा याकरितां विष पैदा करावयाचें तें ताजें, रसरशीत घट्ट, वजनदार व विषनाशक जिनसांच्या संपर्कापासून अलिप्त आणि वाऱ्यानें किंवा उन्ह वगैरे यांनीं शुष्क न झालेलें असें आणावें.

विषनाशक जिन्नस म्हणजे मोर, कोंबडें व एक प्रकारचा मणि असतो तो.

विषाचे बारीक तुकडे हरभऱ्याएवढे करून ते एका मोरड्यांत ठेऊन त्याच्यावर गोमूत्र ओतावें आणि त्यांत तें भिजत टाकावें. गोमूत्र रोज जुनें काढून टाकून नवीन ताजें घालीत जावें. (४७)

याप्रमाणें तीन दिवस केल्यावर ते तुकडे रखरखीत उन्हांत वाळत टाकावे, आणि मग त्या विषाचा योग्य प्रमाणानें उपयोग करावा. (४८)

हा शुद्धीचा प्रकार भर उन्हाळ्याच्या दिवसांतच होण्यासारखा आहे. कारण रखरखीत उन्ह त्याच दिवसांत पडत असतें.

मग एक फडकें तांबड्या मोहऱ्यांच्या तेलानें चोपडून त्या फडक्यांत शुद्ध केलेल्या विषाच्या तुकड्यांची पुरचुंडी बांधून काळजीनें जपून ठेवावी. असें केलें म्हणजे त्या विषाचा गुण कमी होत नाहीं.

रखरखीत उन्ह नसेल तर शुद्धि कशी करावी:—

विषाचे हरभऱ्याएवढे तुकडे करून त्यांचें गाईच्या दुधांत पांच घटिकापर्यंत स्वेदन केलें म्हणजे त्या विषाची शुद्धि होते. ज्या विषाची किंवा उपविषाची शुद्धि एकाद्या विशेष तऱ्हेनें सांगितली नसेल त्या विषाची शुद्धि गाईच्या दुधांत त्याचें स्वेदन केल्यानें होते. (५१)

योगतरंगिण्याम्—

विषं तु खण्डशः कृत्वा वस्त्रखण्डेन बन्धयेत् ।
गोमूत्रेऽथ विनिक्षिप्य स्थापयेदातपे त्र्यहम् ॥ ५२ ॥
गोमूत्रं तु प्रदातव्यं प्रत्यहं नूतनं बुधैः ।
त्र्यहेऽतीते तदुद्धृत्य शोषयेन्मृदु पेषयेत् ।
शुध्यत्येवं विषं सेवायोग्यं भवति रोगजित् ॥ ५३ ॥

अथान्यः प्रकारः—

खण्डीकृत्य विषं वस्त्रपरिबद्धं तु दोलया ।
अजापयासि सांस्विन्नं यामतः शुद्धिमाप्नुयात् ॥ ५४ ॥
क्षीराभावे ह्यजायास्तु गव्यक्षीरेण शोधयेत् ।
जायते दोषनिर्मुक्तं विषं योगेषु योजयेत् ॥ ५५ ॥

अथान्यः प्रकारः—

विषग्रंथि मले न्यस्य माहिषे दृढमुद्रितम् ।
करीषाग्नौ पचेद्यामं वस्त्रपूतं विषं शुचि ॥ ५६ ॥
इति विषशुद्धिः ॥

समटंकणसंपिष्टं ताद्विष्टं मृतमुच्यते ।
योजयेत्सर्वरोगेषु न विकारं करोति च ॥ ५७ ॥

अन्यमतम्—

तुल्येन टंकणेनैव द्विगुणेनोषणेन च ।
विंष संयोजितं शुद्धं मृतं भवति सर्वथा ।' ५८ ॥
इति विषकल्पार्थं विषमारणम् ।

योगतरङ्गिणीकार म्हणतो कीं:—

विषाचे बारीक बारीक तुकडे करून वस्त्राच्या पुरचुंडीत बांधावे आणि ती पुरचुंडी गोमूत्रांत सोडून भांडें उन्हांत तीन दिवस ठेवावें. मात्र दररोज जुनें गोमूत्र काढून टाकून नवें घालीत जावें. तीन दिवसांनंतर पुरचुंडी सोडून त्यांतील विष काढून वाळवावें आणि बारीक चूर्ण करून ठेवावें. याप्रमाणें केलें असतां विष शुद्ध होऊन पोटांत घेण्याला लायक होतें व त्यानें रोगनाशहि करतें येतो. (५३)

दुसरा प्रकारः—

विषाचे तुकड करून त्याचा पाटळा एका फडक्यात बांधावी आणि ती शेळीच्या दुधांत टाकून एक प्रहरपर्यंत स्वेदन करावें, म्हणजे विषाची शुद्धि होते. शेळीचें दूध न मिळाल्यास गाईचें दूध घ्यावें आणि त्यानें विषाची शुद्धि करावी, म्हणजे तें विष दोषांपासून मुक्त होतें. मग त्याची रोगपरिहारार्थ योजना करावी. (५५)

आणखी दुसरा प्रकारः—

विषाचा गड्डा म्हशीच्या शेणाचें संपुट करून त्यांत बंद करावा. वर मृत्तिकालेप पक्का करावा आणि गोंवराच्या आर्गीत तें संपूट भाजून काढावें. थंड झाल्यावर संपुट फोडून विष काढून वस्त्रांत घालून धुवून घ्यावें. (५६]

याप्रमाणें विषाची शुद्धिक्रिया आहे.

विषाची पूड करून त्याच्याइतकाच टांकणखार वजनानें घेऊन दोहोंचा एकत्र खल करावा. म्हणजे तें विष शुद्ध होऊन मृतहि होतें. मग त्याचा रोगावर उपयोग करावा. त्या विषापासून दुष्परिणाम होत नाहींत. (५७)

आणखी एकाचें मत असें कीं:—

विषाइतकाच्च टांकणखार आणि दुप्पट त्रिकटु असे घेऊन सर्वांचा एक जीव होईपर्यंत खल करावा, म्हणजे विष शुद्ध होऊन मृतहि होतें. (५८)

विषार्चीं औषधें तयार करण्याकरितां हा विषमारणविधि सांगितलेला आहे.

अथ विषसेवा –

नानारसौषधैर्ये तु दुष्टा यांतीह नो गदाः ।
ते नश्यन्ति विषे दत्ते शीघ्रं वातकफोद्भवाः ॥ ५९ ॥
शरद्ग्रीष्मवसंतेषु वर्षासु च न दापयेत् ।
हेमंताशिशिरतौं तु विधिना मात्रयाऽर्पयेत् ॥ ६० ॥
चतुर्मासैर्हरेद्रोगान् कुष्ठलूतादिकानपि ।
अशीतिर्यस्य वर्षाणि वसुवर्षाणि यस्य वा ॥ ६१ ॥
विषं तस्मै न दातव्यं दत्तं चेद्रोगकारकम् ।
दातव्यं सर्वरोगेषु घृताशिनि हिताशिनि ॥ ६२ ॥
क्षीराशिनि प्रयोक्तव्यं रसायनरते नरे ।
ब्रह्मचर्यप्रधानं हि विषकल्पं समाचरेत् ।
पथ्यैः स्वस्थमना भूत्वा तदा सिद्धिर्न संशयः ॥ ६३ ॥

आतां विषाचा उपयोग पोटांत देण्याकरितां कां करावयाचा. अनेक प्रकारचे रस, औषधि यांचा उपयोग केला तरी कांहीं दुष्ट रोग असे खाष्ट असतात कीं, तें कांहीं केल्या जात नाहींत.

अशा तऱ्हेच्या वात–कफ–दोषांपासून जडलेले रोग विषाचा उपयोग करतांच नष्ट होतात. (५९)

विष पोटांत द्यावयाचें तें शरत्, ग्रीष्म व वसन्त या ऋतूंत देऊं नये (कारण विषाची आग असते ती ह्या ऋतूंत वृद्धिंगत होण्याच्या संभव असतो म्हणून), हेमन्त व शिशिर या ऋतूंतच योग्य पद्धतीनें व योग्य प्रमाणानें विषाचा उपयोग करावा. असें केल्यानें—

कुष्ठ, लूता वगैरेसारखे कष्टसाध्य दुर्धर रोगदेखील चारच महिन्यांत पार नाहींसे होतात; परंतु रोगी ऐंशीं वर्षांचा किंवा आठ वर्षांचा किंवा त्यापेक्षां लहान असला तर अशा रोग्यांना विषयोजना करूं नये. अशांना विषौषध दिल्यास रोग वाढेल मात्र कमी होणार नाहीं.

म्हणून आठ वर्षांच्यावरील व ऐंशी वर्षांच्या आंतील रोग्यांस, ते तूप खाणारे, दूध पिणारे व पथ्यानें वागणारे असे असतील तरच विषौषध द्यावें. तसेंच रसायन घेणारासहि विषौषध दिल्यास हरकत नाहीं. त्यांतून ब्रम्हचर्यानें राहणाऱ्यास विषौषध खुशाल द्यावें, आणि स्वस्थ अन्तःकरणानें पथ्य करावें, म्हणजे खात्रीनें रोगनाश होईल. (६३)

अथ विषानधिकारिणः—

न क्रोधिते न पित्तार्ते न क्लीबे राजयक्ष्माणि ।
क्षुत्तृष्णाश्रमकर्मार्दवसोविनि क्षयरोगिणि ॥ ६४ ॥
गार्भिण्यां बालवृद्धेषु न विषं राजमंदिरे ।
न दातव्यं न भोक्तव्यं विषं वादे कदाचन ॥ ६५ ॥
आचार्येण तु भोक्तव्यं शिष्यप्रत्ययकारकम् ।
विषं शुद्धं हि तदपि मात्रया नान्यथा भजेत् ॥ ६६ ॥
शमनं सर्वरोगाणां दृष्टिपुष्टिकरं विषम् ।
विधिना मात्रया काले भवेत्पथ्याशिनां नृणाम् ॥ ६७ ॥

विषौषध कोणास देऊं नये त्याविषयीं:—

कोपिष्ट मनुष्य, पित्तप्रकृति, नपुंसक, कफक्षयी, भुकेनें, तान्हेनें व्याकुळ झालेला, श्रमांचीं कामें करणारा, प्रवासी, व झिजत चाललेला मनुष्य यांना विषप्रधान औषध देऊं नये. त्याचप्रमाणें

मर्मार स्त्री, लहान मुलें, वृद्ध मनुष्यें, राजाच्या कुटुंबांतील मनुष्यें यांना असलें जलाल औषध देऊं नये, व त्यांनींहि घेऊं नये, अगर बादाकरितां म्हणजे उगीचच्या उगीचहि घेऊं नये. (६५)

शिष्याला खात्री वाटावी म्हणून खुद्द वैद्यानें विषौषध घ्यावें, परंतु असलें औषध जपून वापरावें. कारण विष शुद्ध जरी केलें तरी तें अल्प प्रमाणानेंच घेतलें पाहिजे. म्हणजे सर्व रोगांचा नाश होऊन दृष्टि स्वच्छ आणि शरीर पुष्ट होतें; पण औषध घेणारानें तें योग्य पद्धतीनें व अल्प प्रमाणानें घेऊन पथ्यानें राहिलें पाहिजे.(६७)

अथ विषमात्राकथनम्—

यवाष्टकं भवेद्यावदभ्यस्तं तिलमात्रया ।
सर्वरोगहरं नृणां जायते शोधितं विषम् ॥ ६८ ॥

मतांतरम्—

प्रथमे सार्षपी मात्रा द्वितीये सर्षपद्वयम् ।
तृतीये च चतुर्थे च पंचमे दिवसे तथा ॥ ६९ ॥
षष्ठे च सप्तमे चैव क्रमवृद्धया विवर्धयेत् ।
सप्तसर्षपमात्रेण प्रथमं सप्तकं नयेत् ॥ ७० ॥
क्रमहान्या तथा देयं द्वितीये सप्तके विषम् ।
यवमात्रं विषं देयं तृतीये सप्तके क्रमात् ॥ ७१ ॥
वृद्धया हान्या प्रदातव्यं चतुर्थे सप्तके तथा ।
एवं सात्म्ये समायाते परां मात्रां भिषग्वरः ॥ ७२ ॥
स्थिरीकुर्याद्यथेच्छं तु ततस्त्यागं तु कारयेत् ।
सेवनक्रमहान्याऽयं विषकल्प इतीरितः ॥ ७३ ॥
यवमात्रं ग्रसेत्स्वच्छो गुञ्जामात्रं तु कुष्ठवान् ।
एवं यवाष्टपर्यंत परा मात्राऽधिका नहि ॥ ७४ ॥

अथ विषे पथ्यानि—

घृतं क्षीरं सिता क्षौद्रं गोधूमांस्तण्डुलान्यवान् ।
मरिचं सैंधवं द्राक्षां मधुरं पानकं हिमम् ॥ ७५ ॥
ब्रम्हचर्यं हिमं देशं हिमं कालं हिमं जलम् ।
विषस्य सेवको मर्त्यो भजेदतिविचक्षणः ॥ ७६ ॥

विषौषध घेण्याचें प्रमाणः—

प्रथम तिळाएवढें औषध घेऊन त्याचा अभ्यास होतां होतां तें आठ जवांपर्यंतहि घेण्यास हरकत नाहीं. कारण शुद्ध केलेलें विष मनुष्याच्या यच्चावत् रोगांचा नाश करतें. (६८)

आणखी एकाचें मत:—

प्रथम एक मोहरीइतकें ध्यावें, दुसऱ्या खेपेस (दुसऱ्या दिवशीं) दोन मोहऱ्यांइतकें, याप्रमाणें तिसऱ्या, चौथ्या, पांचव्या, सहाव्या व सातव्या दिवशीं त्या क्रमानें वाढतें ध्यावें. याप्रमाणें पहिल्या सप्तकाचे शेवटीं घेण्याचें प्रमाण सात मोहोऱ्यांइतकें चढवावें. (७०)

परंतु दुसऱ्या सप्तकांत त्याच क्रमानें घेण्याचें प्रमाण उतरत उतरत कमी करावें. तिसऱ्या सप्तकांत आरंभीं जवाइतकें देऊन चढवीत जावें व चवथ्या सप्तकांत पुनः उतरत्या प्रमाणांत द्यावें याप्रमाणें चार सप्तकांच्या अनुभवानें रोग्याला देण्याचे प्रमाण निश्चित करून त्याप्रमाणें कांहीं दिवस औषध देऊन मग सोडून देण्यास सांगावें. विषयुक्त औषधें वापरण्याची पद्धति ही अशी असते. या पद्धतिला विषकल्प म्हणतात. (७२) चांगला मनुष्य असेल (म्हणजे रोग बिकट नसेल तर) औषधाचें प्रमाण जवाइतकें धरावें. कुष्ठी मनुष्यास विषौषध एक गुंजेइतकें द्यावें. परंतु कांहीं असलें तरी विषौषध देण्याचें जास्तींत जास्ती प्रमाण आठ जवांपर्यंत आहे. यापेक्षां जास्त केव्हांहि देऊं नये.

विषौषधांत पथ्य:—

तूप, दूध, खडीसाखर, मध, गहु, तांदूळ, सातु, मिरे सैन्धव, द्राक्षें, हें पथ्य करावें. पाणी पिणें तें मधुर व थंड प्यावें, ब्रम्हचर्य पाळावें, औषध घेणें तें थंड प्रदेशांत, थंडीचे दिवसांत द्यावें व पाणीहि थंडच प्यावें. याप्रमाणें विषौषध सेवन करणाऱ्या मनुष्यानें फार चातुर्यानें वागावें. (७६)

अथ विषपरीक्षा—

मात्राधिकं यदा मर्त्यः प्रमादाद्भक्षयेद्विषम् ।
अष्टौ वेगास्तदा तेन जायन्ते तस्य देहिनः ॥ ७७ ॥
प्रशमः प्रथमे वेगे द्वितीये वेपथुर्भवेत् ।
दाहस्तृतीयवेगे स्याच्चतुर्थे पतनं भुवि ॥ ७८ ॥
पञ्चमे तु वमेत्फेनं षष्ठे वैकल्यमेव च ।
जडता सप्तमे वेगे मरणं चाष्टमे भवेत् ॥ ७९ ॥



विषवेगानिति ज्ञात्वा मंत्रद्रव्यैर्विनाशयेत् ।
यावन्नाष्टमवेगं तु संप्राप्नोति हि मानवः ॥ ८० ॥

विष बाधल्याची परीक्षा--

प्रमाणाबाहेर विष पोटांत गेल्यास, किंवा चुकून विष खाण्यांत आल्यास, त्या रोग्याच्या क्रमाकमानें आठ अवस्था होतात. पहिल्यानें तो हलक होतो. नंतर त्याला कंप सुटतो. नंतर दाह होतो. नंतर त्याच्यानें उभें राहवत नसल्यामुळें तो जमीनीवर पडतो. पांचवी अवस्था म्हणजे तोंडाला फेंस येतो. सहावी अवस्था म्हणजे वैकल्य (म्ह• हातपाय गार पडूं लागतात), सातवी तंद्रा (Coma), आणि आठवी अवस्था म्हणजे मृत्यु होय. (७९)

रोग्याला होणारी भावना विषाची आहे असें समजतांच त्याचा उतारा मंत्रांनीं व औषधोपायांनीं करण्याच्या उद्योगाला लागावें आणि रोग्याच्या सर्व भावना नाहींशा होईपर्यंत उपाय चालू ठेवावे.

अतिमात्रं यदा भुक्तं वमनं तस्य कारयेत् ।
अजादुग्धं ददेत्तावद्यावद्भ्रान्तिर्न जायते ॥ ८१ ॥
अजादुग्धं यदा कोष्ठे स्थिरीभवति देहिनः ।
विषवेगं तदोत्तीर्णं जानीयात्कुशलो भिषक् ॥ ८२ ॥
तदा जीर्णमिति क्वचित्पाठः ॥
विषं हन्याद्रसः पीतो रजनीमेघनादयोः ।
सर्पाक्षी टङ्कणं वाऽपि घृतेन विषहृत्परम् ॥ ८३ ॥

चत्वारो योगाः—

पुत्रजीवकमज्जा वा पीता निम्बुकवारिणा ।
विषवेगं निहन्त्येव वृष्टिर्दावानलं यथा ॥ ८४ ॥
गोघृतपीता हरति विषं गरलं च वन्ध्यकर्कोटी ।
सकलविषोपशमनी त्रिमूली सुरभिजिव्हा च ॥८५॥
अतिमात्रं यदा भुक्तं तदाऽज्यं टङ्कणं पिबेत् ।
विषं सवेगं तेनाशु नाशमाप्नोति निश्चितम् ॥ ८६ ॥

विष अधिक प्रमाणांत खालें गेलें असेल तर त्यास जेणेंकरून वांति होईल ती योजना करावी आणि वांति होण्याचें थांबेपर्यंत शेळीचें दुध देत जावें. (वांति होऊं लागल्यावर पोटांत विष

शिलक आहे तोंपर्यंत शेळीचें दुध पोटांत ठरणार नाहीं असा आशय दिसतो.)

जेव्हां शेळीचें दूध रोग्याच्या कोठ्यांत वांति न होता स्थिर राहील तेव्हां विष जिरलें किंवा त्याचा वेग उतरला असें असें चतुर वैद्यानें समजावें (८२).

रजनी व मेघनाद (म्ह० दारूहळद व तांदूळजा) यांचा रस प्याला असतां विषाचा नाश होतो व त्याचप्रमाणें मुंगूसवेल व टांकणखार हे तुपाबरोबर सेवन केले असतांहि विषबाधा दूर होते. (८३)

चार प्रकारचे उतारे आहेत ते सांगतों:—

पुत्रवंतीच्या बियांतील मगज व लिंबाचा रस हे सेवन केले असतां पाऊस ज्याप्रमाणें रानांतील वणवा विझवून टाकतो, त्याप्रमाणें विषबाधेचें शमन होतें.

वांझकर्टोलीचा रस गाईचे तुपांत प्याला असतां विष (म्हणजे वनस्पतीचें विष व गरळ म्हणजे सर्पादिकांचे जहर या सर्वांचा परिहार होतो. त्रिमूली (विषघ्नी) व सुरभिजिव्हा ह्याहि वनस्पती विषनाशक आहेत. (८५)

विषार पोटांत फारच गेला असेल तर टांकणखार तुपांत घालून तें तूप पिण्यास द्यावें. म्हणजे विषाच्या लहरी :खात्रीनें नाहींशा होतील. (८६)

वाग्भटः—

आदौ वान्ताविरिक्तस्य हरिद्रे कटभीं गुडम् ।
सिन्धुवारकनिष्पावबाष्पिकाशतपर्विकाः ॥ ८७ ॥
तन्दुलीयकमूलानि कुक्कटाण्डमवल्गुजम् ।
नावनाञ्जनपानेषु योजयेद्विषशान्तये ॥ ८८ ॥
विषभुक्ताय दद्याच्च शुद्धायोर्ध्वमधस्तथा ।
सूक्ष्मं ताम्ररजः काले सक्षौद्रं हाद्विशोधनम् ॥ ८९ ॥
शुद्धे हृदि ततः शाणं हेमचूर्णं च दापयेत् ।
न सज्जते हेमपाङ्के पद्मपत्रेऽम्बुवद्विषम् ॥ ९० ॥
जायते विपुलं चायुर्गरेऽप्येष विधिः स्मृतः ।
साधकांना हितार्थाय सदाशिवमुखादृतम् ॥ ९१ ॥
क्षिप्रं सर्वविषघ्नं च मंत्र वै प्रवदाम्यहम् ।

याविषयीं वाग्भट म्हणतातः—

अगोदर वान्ति करणारीं औषधें देऊन रोग्याचें पोट वांति होऊन रिकामें झालें असतां हळद, कुटकी (कटभी) व गूळ असे त्यास खाण्यास द्यावे, किंवा तांदुळज्याच्या मुळांचा रस, कोंबडीच्या अंड्यांतील बलक व बावच्या ह्याचें अंजन करावें व त्याचेंच पाणी पोटांत द्यावें. म्हणजे विषबाधा शांत होईल.

जुलाब व वांति होऊन जो रोगी वर व खालीं दोहोंकडून शुद्ध झालेला असेल अशा रोग्याला (पुनः एकदा) पैसा कोळून मधाशीं द्यावा, म्हणजे त्याची छाती मोकळी होईल. (८९)

छाती मोकळी झाल्यावर सोन्याचा बारीक चुरा किंवा सोनें उगाळून एक शाणभर द्यावें, म्हणजे विष उतरेल. कारण कमलाच्या पानावर जसें पाणी ठरत नाहीं, त्याप्रमाणें सोनें पोटांत गेलें असतां तेथें विष रहात नाहीं. (९०)याप्रमाणें विष बाहेर पडल्यावर मनुष्य जगतो, इतकेंच नाहीं तर तो मनुष्य दीर्घायु होतो. विषावर हा उतारा उत्तम आहे. (९१)आतां साधकांच्या कल्याणासाठीं सर्व विषाराचा तात्काळ विध्वंस करणारा असा जो एक मंत्र आहे तो श्रीशंकरांच्या मुखांतून निघालेला आहे. तो मंत्र मी येथें लिहितोः—

ॐ नमो भगवति श्रीघोणे हर २ दर २ पर २ वर २ वभ्र २ लर २ लीं २ हर २ भां २ सर २ शं २ क्षव २ क्षीं २ हीं २ भगवति श्रीघोणे यः ३ सः ३ वर २ रं सं ४ खण्डावररूपे द्रीं ३ वर विहङ्गम मानुषयोगक्षेमं वद शेखरिरखः स्वाहा इति मंत्रः।

विद्यायाः स्मृतिमात्रेण नश्यन्ते गुह्यकादयः ॥
सप्तजपिततोयेन प्रोक्षयेद्विषदूषितम् ॥९२॥
उत्तिष्ठति स वेगेन शिखाबन्धेन धारयेत्।
त्रिमंत्रितेन शङ्खेन दुन्दुभिं वादयेद्यदि ॥ ९३ ॥
देशान्तरगतं शब्दो निर्विषं कुरुते क्षणात्।
विषं दृष्ट्वा यदा मंत्री मंत्रमावर्तयेत्सकृत् ॥ ९४ ॥
यान्ति निर्विषतां दृष्ट्वा ह्यपि भारशतानि च।

मंत्र ॐ नमोभगवति इत्यादि–

या मंत्राचें नुसतें स्मरण केलें तरी सर्व यक्षपिशाच्च वगैरे दुष्ट लागीर नाहींसें होतें. या मंत्राचा जप सात वेळ करून पाणी मंत्रावें आणि तें पाणी विषार बांधलेल्या रोग्या (च्या मस्तका)वर शिंपडावें आणि त्याचे केंस धरून डोकें वर उचलावें, आणि शंख मंत्रून तो फुंकावा व नौबद वाजवावी म्हणजे रोगी खाडादिशीं उठून बसेल. शंख आणि नौबद यांचा आवाज चोहोंकडे फांकल्याबरोबर रोग्याचें विष उतरतें. (९३॥)

विषार बाधलेल्या मनुष्याकडे पहात राहून मांत्रिकानें मंत्र जरी एकच वेळ म्हटला तरी देखील विषाचें शेंकडों पट ओझें त्याच्या नुसत्या पाहण्यानेंच दूर होऊन रोगी मनुष्याला उतार पडतो.

अथापरं मनुं वक्ष्ये साधकानां हिताय वै ।
येन निर्विषतामेति सर्पादिविषपीडितः ॥ ९५ ॥

ॐ नमो प्रजण्डगरुडाय पाक्षिराज्ञाय विष्णुवाहनाय विन. तासुताय हे गरुड २ कास्यपसुत २ वैनतेय २ तार्क्ष्यस्वर्णवज्रच-ञ्चवज्रतुण्डवज्रनखप्रहरणाय अनन्तवासुकितक्षककर्कोटकपद्ममहा-पद्मशङ्खपालकुलिकजयाविजय अष्टमह'नागकाल उच्चाटनी मूषक-विषप्रहरणाय हन २ धुन २ शीघ्रं कम्प २ आवेशः २ ठः ठः रहे श्रीगरुडाय नमः । इति ॥

मंत्रेणानेन मंत्रज्ञो जलं चुलकमात्रकम् ।
जपितं सप्तवारांस्तु पाययेद्गतचेतनम् ॥ ९६॥
सर्पादिविषवेगेन सद्यो निर्विषतामियात् ।
त्रिवारमेव पानीयं दातव्यं न पिबेद्यदि ॥ ९७ ॥
मुखमध्ये तदा सेकाः कर्तव्यास्तज्जलस्य हि ।
अथवा मस्तके तस्य तर्जन्या ताडयेद् बुधः ।
त्रिवारं मंत्रपूर्वं तु निर्विषो भवति क्षणात् ॥ ९८ ॥

आतां साधकांच्या कल्याणाकरितां दुसरा एक मंत्र लिहितों. या मंत्राच्या प्रभावानें सर्प वगैरे विषारी जंतु चावल्यानें जें जहर आंगांत भिनतें त्याचा नाश होतो. (९५)

मंत्र ॐ नमो प्रचंड गरुडाय इत्यादि.

मांत्रिकानें आपल्या तोंडांत पाण्याचा गुळणा धरून हा मंत्र सात वेळ जपावा आणि तें पाणी विषारानें बेशुद्ध झालेल्या रोग्यास पाजावें, म्हणजे साप वगैरेचें जहर झपाट्यानें उतरतें, आणि मनुष्य विषरहित होतो. मात्र मंतरलेलें पाणी तीन वेळां पाजलें पाहिजे. परंतु पाणी त्याच्या पोटांत न जाईल तर त्याचें तोंड उघडून त्या पाण्याचे थोडे थेंब तरी त्याच्या तोंडांत घालावे, किंवा निदान मांत्रिकानें तीन वेळां मंत्र म्हणून आपल्या तर्जनीनें त्या रोग्याच्या डोक्यावर टिचक्या माराव्या.ह्मणजे देखील विष उतरेल.(९८)

अथ वृश्चिकविषहरणमंत्रः—

ॐ कालो विंछु कर्तरीयालो सोनानी चाँच रूपानो पन्नोरो विछु उतरे तो उतारू न तो गरूडमो हंकारूं आवेगो मोर खावेगो तोड विंछु विनरे तो हाक हलोला करे मेरी भाक्ति गुरूकी शाक्ति फुरो मंत्र ईश्वरोवाच ॥

मंत्रेणानेन मंत्रज्ञो भूत्या करगृहीतया ।
मार्जयन्मंत्रमुच्चार्य सप्तकृत्वा त्रिवारकम् ॥ ९९ ॥
सद्यो निर्विषतां कुर्यान्नरं वृश्चिकदंशितम् ।
बर्हिपिच्छादिना वाऽपि मार्जयन्नाशयेद्विषम् ॥ १०० ॥
अथापरो वृश्चिकविषहरो मंत्रः—ॐ नमो पुनपुरो ।
मार्जयन्मुखवातेन मंत्रेणानेन मंत्रवित् ।
तिस्रो रेखाः प्रकुर्यात्तु सरला भुवि चात्मनः ॥ १०१ ॥
सन्मुखास्तासु मंत्रेण रेखैकां तिर्यगायताम् ।
प्रकुर्वन्निर्विषीकुर्यान्मंत्रवृत्त्या मुहुर्मुहुः ॥ १०२ ॥
मुहुर्मुहुरिति २१ वारं; अनुभूतं मंत्रद्वयमपि ।

आतां विंचू उतरण्याचा मंत्र सांगतोः—

मंत्र ॐ कालो विंछु इ०

मांत्रिकानें हातांत भस्म घ्यावें आणि वरील मंत्र सात वेळ म्हणून तें भस्म विंचू चावलेल्या मनुष्याच्या दंशावर फुंकावें. याप्रमाणें तीन वेळ फुंक मारली असतां विंचू चावलेल्याचें विष तात्काळ उतरेल. भस्म नसलें तर मंत्र म्हणून (मोराच्या पिसानें) दंशाची जागा झाडावी, म्हणजे विष उतरेल. [१००]

" ॐ नमो पुनपुरो " हा विंचवाचा दुसरा एक मंत्र आहे. ह्या मंत्र ह्मणत ह्मणत मांत्रिकानें दंशावर तोंडानें फुंक मारावी किंवा आपल्यासमोर जमीनीवर तीन आडव्या रेघा अंतरा अंतरानें ओढाव्या आणि एक एक रेघ ओलांडून अलीकडे ये असें रोग्यास सांगावें व आपण मंत्राचा जप एकसारखा चालूच ठेवावा. याप्रमाणें रोग्यांस केलें असतां मंत्राच्या प्रभावानें रोग्याचें विष उतरतें. (१०२)

एकसारखा जप चालू ठेवावा याचा अर्थ असा कीं, मंत्राचा निदान एकवीस वेळां जप झाला पाहिजे.

अथोपविषाणि.—

अर्कसेहुंडधत्तूरलांगलीकरवीरकाः ।
गुंजाऽहिफेनामित्येताः सप्तोपविषजातयः ॥ १०३ ॥
एतैर्विमर्दितः सूताश्छिन्नपक्षः प्रजायते ।
मुखं च जायते तस्य धातूंश्च ग्रसते क्षणात् ॥ १०४ ॥
अर्कसेहुंडयोर्दुग्धामितराणां जटा भवेत् ।
प्रयोज्यो रसयोगेषु यद्वा पंचांगजो रसः ॥ १०५ ॥

मतांतरम्—

अर्कस्नुग्लांगलीगुंजाहयारिविषमुष्टयः ।
आफेनोन्मत्तजेपाला नवोपाविषजातयः ॥ १०६ ॥
भंगा तु आनीश्चितैव, मांसगणे अजाजीवत् ॥

आतां उपविषें सांगतोः—

रुई, वई निवडुंग, धोतरा, कळलावी, कण्हेर, गुंज, अफू हे सात जिन्नस सात उपविषें होत. (१०३)

ह्या उपविषांपैकीं एखादें विष (शुद्ध करून) घेऊन त्याचा पाऱ्याशीं खल केला असतां पाऱ्याचे पंख तुटून जाऊन तो स्थिर होतो. त्याला तोंड उत्पन्न होतें आणि त्याच्या योगानें तो धातूंना खाऊन टाकतो. खल करतांना रुई व निवडुंग यांचा चीक घ्यावा. दुसऱ्या उपविषांच्या मुळांचा रस घ्यावा, किंवा त्यांचें झाड उपटून त्यांच्या पंचागाचा रस घ्यावा, आणि त्यांत पाऱ्याचा खल करावा. (१०५)

दुसरे कांहीं ग्रंथकार उपविषें नऊ आहेत असें म्हणतात. त्यांचीं नांवें:—रुई, निवडुंग, कळलावी, गुंज कण्हेर, कुचला, अफू, भांग व जपाळ अशीं आहेत. (१०६)

"भांग" हिला उपविष म्हणावें किंवा कसें याचा निश्चय झालेला नाहीं.

अथोपविषशुद्धिः—

लांगली शुद्धिमायाति दिनं गोमूत्रसंस्थिता ।
इति लांगलीशुद्धिः ।
गुंजा कांजिकसंस्विन्नः प्रहरं शुद्धिमृच्छति ।
इति गुंजाशुद्धिः ।
किंचिदाज्येन संभृष्टो विषमुष्टिर्विशुद्धयति ॥ १०७ ॥
इति विषमुष्टिशुद्धिः ।
जेपालं रहितं त्वगंकुररसज्ञाभिर्मेले माहिषे ।
निक्षिप्तं त्र्यहमुष्णतोयाविमलं खलवे सवासोऽर्दितम् ।
लिप्तं नूतनखर्परेषु विगतस्नेहं रजःसंनिभ
निंबूकांबुविभावितं च बहुशः शुद्धं गुणाढ्यं भवेत् ।
इति जेपालशुद्धिः ।
धूर्तबीजं तु गोमूत्रे चतुर्यामोषितं पुनः ।
कंडितं निस्तुषं कृत्वा शुद्धं योगेषु योजयेत् ॥ १०९ ॥
इति धत्तूरबीजशुद्धिः ।
शृंगवेररसैर्भाव्यमहिफेनं त्रिसप्तधा ।
शुद्धयत्युक्तेषु योगेषु योजयेत्तद्विधानतः ॥ ११० ॥
इत्यहिफेनशुद्धिः ।
बब्बूलत्वक्कषायेण भङ्गां संस्वेद्य शोषयेत् ।
गोदुग्धभावनां दत्त्वा शुष्कां सर्वत्र योजयेत् ॥ १११ ॥
इति भङ्गांशुद्धिः ।

आतां उपविषांची शुद्धि लिहितों—

गोमूत्रांत एक दिवसभर भिजत ठेवल्यानें कळलावी शुद्ध होते आणि गुंज कांजीमध्यें एक प्रहरभर उकळली म्हणजे शुद्ध होते.

कुचल्याच्या बिया थोड्या तुपांत परताव्या, म्हणजे शुद्ध होतात.

जपाळाची शुद्ध.

जपाळबीजाची कवची व मोख काढून टाकून बी फोडून म्हशीच्या शेणांत तीन दिवस खुपसून ठेवावें. नंतर काढून उन्ह पाण्यानें स्वच्छ धुऊन घ्यावें. मग अडुळशाच्या रसाशीं एकत्र

करून खलून राबडी करावी. नंतर एक कोरें खापर घेऊन त्याच्या आंतील बाजूस त्या राबडीचा लेप द्यावा. म्हणजे त्यांतील द्रवांश व तेल त्या खापरांत जिरून जाईल. लेप कोरडा झाल्यावर पूड खरडून घ्यावा. तो स्वच्छ कोरडा होत. मग तिला कागदी लिंबाच्या रसाच्या बऱ्याच भावना द्याव्या, म्हणजे जपाळ शुद्ध होऊन गुणकारी होतो. (१०८).

धोतऱ्याची शुद्धि.

धोतऱ्याचें बीं ठेंचून गोमूत्रांत चार प्रहर भिजत ठेवावें. नंतर ते कांडून तुसें कोंडा काढून टाकावा म्हणजे शुद्ध होतें. मग त्याचा उपयोग औषधांत करावा.

अफू.

अफूला आल्याच्या रसाच्या भावना एकवीस वेळ द्याव्या, म्हणजे अफू शुद्ध होते. नंतर तिचा उपयोग औषधाकडे करावा.

भांग.

भांग घेऊन ती बाभळीच्या सालीच्या काढ्यांत उकळावी. नंतर वाळवून गाईच्या दुधाची भावना द्यावी. कोरडी झाल्यावर शुध्द झाली असें समजावें. मग ती उपयोगांत आणावी. (१११)

अथ विषतैलम्—

रङ्गं विषं टङ्कणमूषणं च तुत्थं समांशं कुरू देवदाल्याः ।
रसेन पिष्टो विषवज्रपातो रसो भवेत्सर्वविषैकहन्ता ॥११४॥
निष्कोऽस्य संजीवयति प्रयुक्तो नृमूत्रयोगेन च सर्वथैव ।
जट्टाविषेणाकुलितं तथाऽन्यैर्दूषीविषैर्घूर्णितमातुरं च ॥११५॥
रङ्गं वङ्गभस्म । इति विषवज्रपातो रसः ।

विषांचें तेल.

अगरु चंदनाप्रमाणेंच कांचेच्या यंत्रांत विषांचें तेल काढावें, आणि त्या तेलांत पाऱ्याचा खल करावा, म्हणजे त्याची भूक फारच

वाढते. याप्रमाणेंच धोतरा वगैरेच्या बियांचें तेल पद्धतशीर काढून त्याचा उपयोग औषधांत ठरल्याप्रमाणानेंच करावा. उगाच भरमसाट प्रमाणानें वापरूं नये. (११३).

" विषवज्रपात " या नांवाचें औषध.

रंग (म्ह० वंगभस्म), शुद्ध केलेलें कोणतेंहि विष टांकणखार, त्रिकटु, मोरचूद हे समभाग घेऊन चुरून देवडांगरीच्या रसांत खलून गोळ्या कराव्या. ह्याला विषवज्रपात हें अन्वर्थक नांव दिलें आहे. कारण ही गोळी कोणत्याही जहरावर चालते. ही गोळी गोमूत्रांत एक निष्कभार खलून रोग्यास दिली असतां रोगी जणो-काय पुनः जिवंतच होतो. जहर कसलेंहि असो, विषारी मुळ्या बांधलेल्या असोत किंवा एखादें विषारी जनावर चावल्यामुळें मनुष्य बेशुद्ध झालेला असो, सर्व ठिकाणीं हें औषध चालतें. (११५).

अथ लवणभेदी सुधानिधिः—

पिष्टं पांशुपटुप्रगाढममलं वज्रत्र्यम्बुना नैकशः
सूतं धातुयुतं खटीकवलितं तं संपुटे रोधयत्।
अन्तःस्थं लवणस्य तस्य च तले प्रज्वाल्य वान्हिं हठा—
च्छुभ्रं ग्राह्यमथेन्दुकुन्दधवलं भस्मोपरिस्थं शनैः ॥ ११६ ॥
तद्बल्लाद्वितयं लवङ्गासहितं प्रातः प्रभुक्तं च यै—
रूर्ध्वं रेचयति त्रियाममसकृत्पेयं जलं शीतलम्।
एतद्धान्ति च वत्सरावधि विषं षाण्मासिकं मासिकं
शैलोत्थं गरलं मृगेन्द्रकुटिलोद्भूतं च तात्कालिकम्॥

पांशुपटु खारीलवणम्। वज्रत्र्यम्बुना वज्रीदुग्धेन, अनेकशः सूतं च पिष्टम्। मृगेन्द्रकुलोद्भूतं सिंहश्मश्रुभक्षणजानितम्। रसक-र्पूरवदस्य प्रक्रिया। इति सकलविषघ्नो लवणभेदी सुधानिधिरसः॥

लवणभेदी सुधानिधी.

खारीलवण स्वच्छ करून वज्रीच्या रसांत अतिशय बारीक खलावें. खल अनेकवार करावा व अशा तऱ्हेनें तो खार तयार करून ठेवावा. नंतर पाऱ्यांत कोणतीही धातू जिरवून त्या पाऱ्याला खडूच्या लुगदीनें लपेटावें व संपुटांत वरील मीठ भरून त्यांत तो गोळा खुपसून ठेवावा. मग संपुट पक्कें बंद करून खालीं सडकून जाळ पेटवून कडक आंच द्यावी. म्हणजे कुंदांच्या श्वेतपुष्पाप्रमाणें पांढरें शुभ्र असें पाऱ्याचें भस्म होऊन वर चिकटतें. तें काढून घ्यावें.११६

हें भस्म व लवंगाचें चूर्ण एकत्र करून दोन वालांइतकें सकाळीं खावें, म्हणजे तीन प्रहरानंतर चांगले जुलाब होतात. जुलाब झाल्यावर थंडपाणी वरचेवर थोडें थोडें प्यावें. म्हणजे तकवा राहील. या उपायानें विषार अंगांत भिनून एक महिना, सहा महिने, किंवा एक वर्ष जरी झालें असलें तरी तो विषार दूर होईल. मग तो विषार खनिज विषाचा असो, जहरी प्राण्याचा असो, किंवा सिंहाच्या केंसांचा असो. कोणताही विषार या औषधानें ताबडतोब नाहींसा होतो.

खारीलवण म्हणजे सांबरलोण, वज्रीरस म्हणजे त्रिधारी निवडुंगाचा चीक, अनेक वेळ म्हणजे वारंवार खल करावा. सिंहाचे केंस म्हणजे वाघ व सिंह यांच्या मिशांचे केंस असें समजावें. हें भस्म करण्याची क्रिया रसकापुराप्रमाणें आहे. याप्रमाणें सर्व विषनाशक असें "लवणभेदी सुधानिधि" हें औषध सांगितलें.

अथ क्षारकल्पना—

क्षारवृक्षस्य काष्ठानि शुष्काण्यग्नौ प्रदीपयेत्।
नीत्वा तद्भस्म मृत्पात्रं क्षिप्त्वा नीरे चतुर्गुणे ॥ ११८ ॥
विमर्द्य धारयेद्रात्रौ प्रातरच्छं जलं नयेत्।
तन्नीरं क्काथयेद्भह्वौ यावत्सर्वं विशुष्यति ॥ ११९ ॥
ततः पात्रात्समुद्धृत्य क्षारो ग्राह्यः सितप्रभः।
चूर्णाभः प्रतिसार्यः स्यात् पेयः स्यात्क्काथवत्स्थितः।
इति क्षारद्वयं धीमानुक्तकार्येषु योजयेत् ॥ १२९ ॥

इति क्षारकल्पना।

इत्यायुर्वेदप्रकाशे श्रीमदुपाध्यायसारस्वतकुलावतंसकाशीनिवासिश्रीमाधव-विरचिते विषोपविषादिसाधनाध्यायः षष्ठः समाप्तः ॥

समाप्तोऽयमायुर्वेदप्रकाशः।

आतां क्षार कसे तयार करावे तें सांगतों:—

ज्या झाडांचा खार काढावयाचा त्या झाडाचीं लांकडें चांगली वाळवून तीं स्वच्छ जागीं निखालस जाळून त्याची राख जमा करावी. मग ती राख (न पाझरणाऱ्या) मातीच्या डेऱ्यांत ठेऊन त्यांत राखेच्या चौपट पाणी घालावें व राख चांगली कोळावी. रात्रीं याप्रमाणें करून मिश्रण सकाळपर्यंत तसंच राहूं द्यावें. सकाळीं

स्वच्छ निवळी वर येईल ती गाळून घ्यावी व दुसऱ्या मडक्यांत ओतून पाणी आटवावें. सर्व पाणी आटलें म्हणजे तळाशीं पांढरा शुभ्र खार राहतो, तो काढून घ्यावा. हा क्षार चुन्याप्रमाणें सफेत असतो. त्याचा लेप देतात व पाण्यांत जिरवून काढ्याप्रमाणें पोटा-तहि देतात. एका क्षाराचा लेप करावा व दुसरा एक क्षार पोटांत घ्यावा आणि याप्रमाणें चतुर वैद्यानें सांगितलेल्या प्रसंगीं दोन क्षारांचा उपयोग करावा.

अध्याय सहावा समाप्त.

याप्रमाणें " आयुर्वेदप्रकाश " हा ग्रंथ समाप्त झाला.

" आयुर्वेदप्रकाश स्य " महाराष्ट्र्यां सतां मुदे ।
अर्थोऽकारि मया, तेन प्रीयतां श्रीविनायकः ॥

2263 [illegible]

टिळक ग्रंथसंग्रहालय
ग्रं. सं. 2396
वाई जि. सातारा